ई-५ अ

एम. ए. शिक्षणशास्त्र भाग-१

अभ्यासपत्रिका क्र.४

अध्यापक शिक्षण

© UNIVERSITY OF MUMBAI

डॉ. देवानंद शिंदे
प्रभारी कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

डॉ. धनेश्वर हरिचंदन
प्रभारी संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

प्रा. अनिल आर. बनकर
सहयोगी प्राध्यापक इतिहास आणि सहाय्यक
संचालक व प्रभारी अध्ययन साहित्य विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

प्रकल्प समन्वयक : **डॉ. हेमलता चारी (निवृत्त)**
माजी उप-संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

संपादन व लेखन : **प्रा. सुनिताा लोंढे,**
शासकीय अध्यापक महाविद्यालय,
धोबी तलाव, मुंबई-४००००१.

भाषांतर : **प्रा. निला कामत,**
गोखले एज्यूकेशन ट्रस्ट, अध्यापक महाविद्यालय,
परेल, मुंबई-४०००१२.

: **प्रा. सुभाष वाघमारे,**
पी.व्ही.डी.टी.महिला अध्यपक महाविद्यालय,
एस.एन.डी.टी. कॅम्पस, चर्चगेट, मुंबई-४०००२१.

: **डॉ. सुधीर मोंडकर**
नवचिंतामणी सोसायटी, नवपाडा,
ठाणे-४००६०२.

मूळ लेखक : **डॉ. गीता शेट्टी** (सेट झेव्हिअर्स, अध्यापक संस्था)
डॉ. इंदू गर्ग, (प्रमुख, शिक्षणशास्त्र विभाग,मुंबई विद्यापीठ)
डॉ. करुणा गुप्ता, (पिलाईल अध्यापक महाविद्यालय)
डॉ. करुणा सिन्हा, (शिक्षणशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ)
डॉ. नागराज राव, (आर. बी. बी. महाविद्यालय)
डॉ. स्वर्णलता हरीचंदन,
(साईनाथ एज्यूकेशन ट्रस्ट, एच.बी.बी.एड.महाविद्यालय)

पुनर्मुद्रण : मार्च २०१८, एम. ए. शिक्षणशास्त्र भाग -१, अभ्यासपत्रिका क्र.४, अध्यापक शिक्षण

प्रकाशक : प्रभारी संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई-४०० ०९८.

अक्षरजुळणी : अश्विनी आर्टस्,
गुरुकृपा चाळ, एम्. सी. छगला मार्ग, बामणवाडा,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०९९.

मुद्रण : उचिथ ग्राफिक प्रिन्टर्स प्रा. लि.
६५, आईडियल इन्डस्ट्रीयल ईस्टेट, एस. बी. मार्ग,
लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३. www.uchitha.com

अनुक्रमणिका

क्रमांक	अध्याय	पृष्ठ क्रमांक
१)	अध्यापक शिक्षणाची संकल्पना	०१
२)	अ) स्वातंत्र्यपूर्व भारतातील अध्यापक शिक्षण	२४
	ब) स्वातंत्र्योत्तर भारतातील अध्यापक शिक्षण	३४
	क) युनायटेड किंग्डम (यु.के) व युनायटेड स्टेट्स् ऑफ अमेरिकेतील (यु.एस.ए.) अध्यापक शिक्षण	४३
	ड) चीन आणि दक्षिण आफ्रिकेतील अध्यापक शिक्षण	६३
३)	अध्यापक शिक्षणाच्या संस्था	७७
४)	पूर्वप्राथमिक आणि प्राथमिक स्तरावरील अध्यापक शिक्षण	९४
५)	माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावरील अध्यापक शिक्षण	११५
६)	पदवी स्तरावरील अध्यापक शिक्षणक्रम	१३०
७)	अ) शिक्षक प्रशिक्षणातील महत्वाचे मुद्दे व समस्या	१४९
	ब) शिक्षण प्रशिक्षणातील खाजगीकीकरण, जागतिकीकरण आणि स्वायत्तता	१६७
८)	अ) शिक्षक प्रशिक्षणावरील उपक्रमशील पद्धती	१८६
	ब) शिक्षक प्रशिक्षणावरील नाविन्यपूर्ण उपक्रम (भाग - २)	२१३
९)	अध्यापक शिक्षणातील संशोधन	२३५
१०)	अ) अध्यापकशिक्षण: एक व्यवसाय	२४५
	ब) शिक्षक-परिणामकारकता	२६३

❖❖❖❖

Syllabus
Paper IV : Teacher Education

Course Objectives :

To develop an understanding of

- Concept, development and agencies of Teacher Education.
- Teacher Education programmes at Different Levels – Their Objectives, Structure, Curriculum, and Role and Competencies of the Teacher
- Need for Teacher Education at Tertiary Level
- Issues, Problems and Innovative Practices in Teacher Education
- Research and professionalism in Teacher Education

Module I: Teacher Education : Concept Development and Agencies

1. **Concept of Teacher Education**
   (a) Meaning and Nature of Teacher Education
   (b) Need, Scope and Objectives of Teacher Education
   (c) Changing Context of Teacher Education in the Indian Scenario
   (d) Changing Context of Teacher Education in the Global Scenario
2. **Development of Teacher Education in India**
   (a) Teacher Education in Pre Independence India
   (b) Teacher Education in Post Independence India
   (c) Teacher Education in U.K. and U.S.A.
   (d) Teacher Education in China and
3. **Agencies of Teacher Education**
   (a) Agencies of Teacher Education at the State Level and their Role and Functions – State Institute of Education (SIE), SCERT, State Board of Teacher Education (GBTE), University Departments of Education.
   (b) Agencies of Teacher Education at the National Level and Their Role and Functions – UGC, NUEPA, NCTE, NCERT.
   (c) Agencies of Teacher Education at the International Level and Their Role and Functions – UNESCO.

Module II : Teacher Education at Different Levels : Objectives, Structure, Curriculum and Role and Functions.

4. Teacher Education at Pre Primary and Primary Levels

(a) Objectives of Teacher Education Programme at Pre Primary and Primary Levels as Recommended by the NCTE.

(b) Structure of Teacher Education Programme at Pre Primary and Primary Levels as Recommended by the NCTE.

(c) National Curriculum Framework for Teacher Education Programme at Pre Primary and Primary Levels as Recommended by the NCTE.

(d) Role and Competencies Required of the Teacher at the Pre-Primary and Primary Levels

5. Teacher Education at Secondary and Higher Secondary Levels

(a) Objectives of Teacher Education Programme at Secondary and Higher Secondary Levels as Recommended by the NCTE.

(b) Structure of Teacher Education Programme at Secondary and Higher Secondary Levels as Recommended by the NCTE.

(c) National Curriculum Framework for Teacher Education Programme at Secondary and Higher Secondary Levels as Recommended by the NCTE.

(d) Role and Competencies Required of the Teacher at the Secondary and Higher Secondary Levels.

6. Teacher Education at Tertiary Level

(a) Need for Teacher Education for Preparation of Teachers in Higher Education

(b) Objectives of Teacher Education Programme at Tertiary Level

(c) Structure of Teacher Education Programme and Institutions at Tertiary Level

(d) Curriculum for Teacher Education Programme at Tertiary Level

(e) Role and Competencies Required of the Teacher at the Tertiary Level

Module III : Issues, Problems and Innovations in Teacher Education

7. Major Issues and Problems of Teacher Education

(a) Maintaining Standards in Teacher Education – Admission Policies and Procedures, Recruitment of Teacher Educators

(b) Service Conditions of Teacher Educators

(c) Quality Management of Teacher Education

(d) Privatization, Globalization and Autonomy in Teacher Education

8. Innovative Practice in Teacher Education

(a) Cooperative and Collaborative Teacher Education

(b) Constructivist and Reflective Teacher Education

(c) e-Teacher Education

(d) Methods of value oriented Teacher Education – Value Clarifying Discussions, Contrived Incidents.

Module IV : Research and Professionalism Teacher Education

9. Research in Teacher Education

(a) Nature and Scope of Research in Teacher Education

(b) Areas of Research in Teacher Education (Teaching, Teacher Characteristics, Teacher Performance, Teacher Education, Teacher Educators and Teacher Education Institutions)

(c) Trends in Research in Teacher Education

(d) Implications of Research for Teacher Education

10. Teacher Education as a Profession

(a) Concept of Profession and Professionalism

(b) Developing Professionalism, Professional Ethics and Professional Code of Ethics for Teacher Educators

(c) Meaning and Components of Teacher Effectiveness

(d) Enhancing and Evaluating Teacher Effectiveness through Performance Appraisal of Teachers and Teacher Educators

References :

1. Arora, G.L. (2002) Teachers and Their Teaching Delhi, Ravi Books.
2. Chaurasia Gulab (2000) Teacher Education and Professional Organizations Delhi, Authorspress.
3. Dillon Justin and Maguire Meg (1997) Becoming A Teacher : Issues in Secondary Teaching Buckingham, Open University Press.
4. Dunking, Michael, J. (1987) The International Encyclopaedia of Teaching and Teacher Education Oxford, Pergamon Press.
5. Elahi, Nizam (1997) Teacher's Education in India New Delhi, APH Publishing Corporation
6. Kundu, C.L. (1998) Indian Year Book on Teacher Education New Delhi, Sterling Publishers Privatization Ltd.
7. McNergney, Robert F. and Herbert, Joanne M. (2001) Foundations of Education : The Challenge of Professional Practice Boston Allyn and Bacon.
8. Misra, K.S. (1993) Teachers and Their Education Ambala Cantt., The Associated Publishers.
9. Mohanty Jagannath (2000) Teacher Education in India
10. Murray, Frank B. (Ed.) (1996) Teacher Educator's Handbook; Building A Base for Preparation of Teachers, San Francisco, Jossey – Bass Publishers.
11. National Council for Teacher Education (NCTE) (1998) NCTE Document New Delhi, Published by Member Secretary, NCTE.

❖❖❖❖

१

अध्यापक शिक्षणाची संकल्पना

घटक रचना :

१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ अध्यापक शिक्षणाचा अर्थ व त्याची वैशिष्ट्ये

१.३ अध्यापक शिक्षणाची गरज, व्याप्ती आणि उद्दिष्ट्ये

१.४ भारतीय संदर्भात अध्यापक शिक्षणाची बदलती रुपरेषा

१.५ भारतीय संदर्भात अध्यापक शिक्षणाची बदलती रुपरेषा

१.६ सारांश

१.० उद्दिष्ट्ये :

हा घटक वाचल्यावर तुम्ही खालील गोष्टी करु शकाल :

- अध्यापक शिक्षणाचा अर्थ स्पष्ट करु शकाल.
- अध्यापक शिक्षणाच्या वैशिष्ट्यांची चर्चा करु शकाल.
- अध्यापक शिक्षणाची उदिष्टे विषद करु शकाल.
- अध्यापक शिक्षणाची व्याप्ती वर्णन करु शकाल.
- भारतीय संदर्भात अध्यापक शिक्षणाची बदलती रुपरेषा स्पष्ट करु शकाल.
- जागतिक संदर्भात अध्यापक शिक्षणाच्या बदलत्या रुपरेषेचे विश्लेषण करु शकाल.

१.१ प्रस्तावना :

शैक्षणिक संस्था, त्यांच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक अनुभूती देऊन, अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानाच्या उजेडाकडे नेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करत असते. बदल घडवून आणण्यासाठी संस्थेमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका शिक्षक करत असतात. एन्.सी.टी.ई (१९९८) ने माध्यमिक शिक्षक प्रशिक्षण गुणवत्ता संदर्भात असे म्हटले आहे की, "कोणत्याही शैक्षणिक कार्यक्रमात शिक्षक हा महत्त्वाचा घटक आहे. कोणत्याही पातळीवर शैक्षणिक प्रक्रिया राबविण्याची महत्त्वाची जबाबदारी शिक्षकाची असते." ह्यावरुन असे जाणवते की राष्ट्राचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी, शिक्षक घडविण्यावर भर देणे अत्यावश्यक आहे. राष्ट्राच्या शिक्षण-प्रणातील सक्षम शिक्षकांचे महत्त्व अनन्य साधारण आहे. राष्ट्रीय अभ्यासक्रम रचना २००५ (National Curriculum Framework) नुसार, शिक्षकांकडून बऱ्याच मागण्या व अपेक्षा केल्या गेल्या आहेत आणि त्यासाठी सेवापूर्व व सेवांतर्गत अशा दोन्हीही शिक्षक प्रशिक्षणातून त्या साधणे जरुरीचे आहे.

१.२ अध्यापक शिक्षणाचा अर्थ व त्याची वैशिष्ट्ये :

अध्यापक शिक्षणाचा अर्थ :

विद्यार्थ्यांच्या संपादनाचा दर्जा व कक्षा हे मुख्यतः शिक्षकाच्या क्षमता, संवेदनशीलता व प्रेरणा ह्यावर अवलंबून असतात, हे सर्वश्रुतच आहे.

राष्ट्रीय अध्यापक शिक्षण मंडळानुसार, (National Council for Teacher Education) अध्यापक शिक्षण म्हणजे, व्यक्तीला पूर्व प्राथमिक पासून उच्च शिक्षणाच्या पातळीपर्यंत शिकविता येण्यासाठी शिक्षण, संशोधन व प्रशिक्षणाचा कार्यक्रम होय.

अध्यापक शिक्षणाचा कार्यक्रम हा शिक्षकाचे नैपुण्य व क्षमता विकसित करण्याचा असा कार्यक्रम आहे, की जेणेकरुन शिक्षक व्यावसायिक जबाबदाऱ्या व आव्हाने पेलण्यासाठी सक्षम बनतो.

गुड यांच्या शिक्षण शब्दकोशान्वये (Dictionary of Education), अध्यापक शिक्षण म्हणजे, "सर्व औपचारिक व न-औपचारिक कृती व अनूभुती, ज्या व्यक्तीला शिक्षण व्यवसायातील सभासदाच्या जबाबदाऱ्या सांभाळायला व त्या परिणामकारकरित्या पार पाडायला मदत करतात."

१९०६ ते १९५६ ह्या काळात शिक्षक तयार करण्याच्या कार्यक्रमाला अध्यापक-प्रशिक्षण कार्यक्रम असे म्हटले जायचे. ह्या कार्यक्रमातून शिक्षक हा तंत्रज्ञ कामगार किंवा कारागीर बनायचा कारण त्याची उद्दिष्टे संकुचित होती व भर फक्त कौशल्ये विकसित करण्यावर होता. अध्यापक शिक्षणाबद्दलचा दृष्टिकोन हा संकुचित असल्यामुळे त्याची व्याप्ती मर्यादित होती. डब्लू. एच्. किलपॅट्रिक ह्यांनी असे म्हटले आहे, की प्रशिक्षण हे प्राण्यांना व सर्कशीत काम करणाऱ्यांना दिले जाते, तर माणसांना शिक्षण दिले जाते.

अध्यापक - शिक्षण हे शिकविण्याची कौशल्ये, अध्यापनशास्त्र व व्यावसायिक कौशल्ये, ह्यांना समाविष्ट करते.

अध्यापक शिक्षण = (शिकविण्याची कौशल्ये) + (अध्यापन शास्त्राचे ज्ञान) + (व्यावसायिक कौशल्ये)

शिकविण्याच्या कौशल्यांमध्ये विविध तंत्रे, पद्धती व अशा बारकाव्यांचे प्रशिक्षण दिले जाते, ज्यामुळे शिक्षक शिकविण्याचे, प्रबलनाचे आणि परिणामकारक मूल्यमापनाचे कार्य नियोजनपूर्वक व परिणामकारकरित्या करु शकतात. ह्यात, परिणामकारक वर्ग-व्यवस्थापनाचे कौशल्य, शिक्षण सामग्री बनविण्याचे व परिणामकारकरित्या वापरण्याचे कौशल्य आणि संप्रेषणाचे कौशल्य ह्याचा समावेश होतो.

अध्यापन शास्त्रामध्ये तत्त्वज्ञानात्मक, समाजशास्त्रीय आणि मानस शास्त्रीय विचार केला जातो, जेणेकरुन शिक्षकांना वर्गामध्ये अध्यापन कौशल्ये वापरण्यासाठी भक्कम असा पाया तयार होतो.

व्यावसायिक कौशल्यांमध्ये त्या सर्व पद्धतींचा, तंत्रांचा समावेश होतो की, ज्यामुळे शिक्षकांची व्यावसायिक वाढ तर होतेच, पण त्याबरोबर अध्यापन व्यवसायाचीही वाढ होते. ह्यात वर्तन कौशल्ये (Soft Skills), समुपदेशन कौशल्ये, संगणक कौशल्ये, माहिती शोधून काढण्याचे कौशल्य व व्यवस्थापन कौशल्ये व सर्वात महत्त्वाचे सतत जन्मभर शिकत रहाण्याचे कौशल्य, त्यांचा समावेश होतो.

अध्यापन कौशल्ये, अध्यापन शास्त्र आणि व्यावसायिक कौशल्ये ह्यांच्या एकत्रिकरणांमुळे शिक्षकांमध्ये योग्य ज्ञान, दृष्टिकोन व कौशल्ये निर्माण होतात, जेणेकरुन, त्यांचा सर्वांगिण विकास साध्य करता येतो.

अध्यापक शिक्षणाचे स्वरुप :

१) अध्यापक शिक्षण ही सतत चालणारी प्रक्रिया आहे आणि त्याचे सेवापूर्व व सेवांतर्गत घटक हे एकमेकांना पूरक आहेत. अध्ययन आणि अध्यापक शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीय ज्ञानकोशा (१९८७) नुसार, “अध्यापक शिक्षण हे तीन भागात मानले पाहिजे. सेवापूर्व, सेवेची सुरुवात (Induction), सेवांतर्गत हे तीन टप्पे हे सतत चालणाऱ्या प्रक्रियेचे भाग मानले गेले आहेत.”

२) “शिक्षक हे जन्मजात असतात, घडविले जात नाहीत”, अशा प्रतिपादनाच्या विरुद्ध, “शिक्षक हे घडविले जातात, जन्मजात नसतात”, अशा प्रतिपादनावर अध्यापक शिक्षण आधारित आहे. शिकविणे किंवा अध्यापन ही कला आहे, तसेच शास्त्र ही आहे आणि म्हणूनच शिक्षकांना फक्त ज्ञानच प्राप्त करायचे नसते, तर ज्याला ‘धंद्यातील खाचाखोच्या किंवा क्लुप्त्या’ म्हणता येतील, अशी कौशल्येही आत्मसात करायची असतात.

३) अध्यापक शिक्षण हे सर्वसमावेशक आहे, ते फक्त सेवापूर्व व सेवांतर्गत कार्यक्रमांपुरतेच मर्यादित नसून, त्याचा विविध सामाजिक व विस्तारित (Extension Activities) कार्यक्रमांशीही संबंध असतो. उदा. प्रौढ शिक्षण, न-औपचारिक शैक्षणिक कार्यक्रम, साक्षरता आणि सामाजिक विकासाचे कार्यक्रम.

४) ते सतत विकसित होणारे व गतीशील आहे. गतीशील समाजाची आव्हाने पेलू शकतील, असे शिक्षक घडविण्यासाठी अध्यापक – शिक्षणाला नवीन सुधारणा व प्रवाह त्याप्रमाणे बदल करावे लागतात.

५) अध्यापक शिक्षणाचा सर्वात महत्त्वाचा भाग आहे. अभ्यासक्रम, आराखडा, रचना, संघटन आणि आदान-प्रदान, तसेच त्याचे औचित्य / योग्ययोग्यता.

६) इतर व्यावसायिक शैक्षणिक कार्यक्रमांप्रमाणेच अध्यापक – शिक्षण अभ्यासक्रमाचा आशय, उपयोजनात्मक आवश्यकतेवर आधारित असतो, तसेच त्यात विविध ज्ञान शाखातील अर्थपूर्ण संकल्पनाचे सैद्धांतिक आकलनही असते. पण अध्यापक शिक्षणातील आशय हा विविध ज्ञानशाखातील संकल्पना व तत्त्वे ह्यांचे फक्त मिश्रण नाही तर संकल्पनात्मक एकजिनसी असा विशिष्ट सर्वंकष आशय असतो.

७) अध्यापक शिक्षणाचा कार्यक्रम हा स्तराप्रमाणे वेगवेगळा असतो. म्हणजेच, हा कार्यक्रम वेगवेगळ्या स्तरांसाठी श्वास बनविलेला असतो. जेणेकरुन नवीन शिक्षकांना, त्यांच्याकडून जी कार्ये अपेक्षित आहेत त्यासाठी त्यांना तयार करण्याची प्रक्रिया जास्त परिणामकारक बनते.

८) ही अशी प्रणाली आहे जेथे पुरविलेली माहिती, प्रक्रिया व निष्पत्ती ह्यांचे परस्परावलंबित्व असते.

आपली प्रगती तपासा :

१. अध्यापक - शिक्षणाचा अर्थ स्पष्ट करा.

२. अध्यापक शिक्षणाच्या स्वरुपाचे वर्णन करा.

१.३ अध्यापक शिक्षणाची गरज, व्याप्ती आणि उद्दिष्टे :

अध्यापक शिक्षणाच्या अमेरिकन आयोगाने असे योग्यपणे म्हटले आहे, की, “देशाचा दर्जा हा त्याच्या नागरिकांच्या दर्जावर अवलंबून असतो. त्याच्या नागरिकांचा दर्जा हा पूर्णपणे नसला, तरी बहुतांशी त्यांच्या शिक्षणाच्या दर्जावर अवलंबून असतो, त्यांच्या शिक्षणाचा दर्जा हा पूर्णपणे नसला, तरी मुख्यत्वेकरुन, त्यांच्या अध्यापकांच्या दर्ज्यावर अवलंबून असतो.”

२१ व्या शतकातील अमेरिकन शिक्षणासाठी कृती करण्यासाठी केलेल्या आवाहनात, १९९६, क्लिंटन ह्यांनी असे दर्शविले आहे की, “प्रत्येक जमावाच्या प्रत्येक वर्गात हुषार आणि स्वतःला सर्वस्वी वाहून घेतलेले, असे शिक्षक असायला पाहिजेत. जर आपण शिक्षकी पेश्यात होतकरु लोकांची भरती केली आणि त्यांना उच्च प्रतीचे प्रशिक्षण देऊन, त्यांची योग्य तयारी करुन घेतली तर आपण २१ व्या शतकासाठी चांगल्या दर्जाच्या शिक्षकांची तजवीज खात्रीने करु शकतो.”

अध्यापक शिक्षणाची गरजेची खालील कारणे आहेत.

१) देशाची शैक्षणिक ध्येये गाठण्यासाठी, अध्ययन प्रक्रियेत शिक्षकांचा शैक्षणिक व व्यावसायिक दर्जा हा महत्त्वाचा घटक आहे, हे सर्वश्रुत आहे. जर अभ्यासक्रमाचे संक्रमणाचा दर्जा परिणामकारक करुन, त्यायोगे विद्यार्थ्यांचे अध्ययन आणि सामाजिक परिवर्तन साधायचे असेल, तर शिक्षक घडविण्यासाठी प्रशिक्षणापेक्षा संस्कारांवर भर दिला पाहिजे. ज्यावर विशेष लक्ष द्यायला हवे, असे घटक म्हणजे,

- शैक्षणिक तयारीचा कालावधी
- आशय ज्ञानाची पातळी व दर्जा
- विविध अध्ययन – अध्यापन परिस्थिती हाताळण्यासाठी शिक्षकांना लागणारी वेगवेगळी अध्यापन शास्त्रीय कौशल्ये
- व्यवसायाशी बांधिलकी
- विशिष्ट काळात चर्चिले जाणाऱ्या मुद्दांविषयी व अडचणींविषयी संवेदनशीलता
- प्रेरणेची पातळी

शिक्षक घडविताना जर फक्त प्रशिक्षणावर भर दिला तर हे शक्य नाही. शिक्षकाची सर्वांगिण घडण आवश्यक आहे आणि म्हणून प्रशिक्षणापेक्षा संस्कारावर भर देणे आवश्यक आहे.

२) सर्व मुलांना व्यवस्थित शिकवण्यासाठी (सुसंस्कारित करण्यासाठी), शिक्षकांकडे आवश्यक ज्ञान व कौशल्ये आहेत हे फक्त पहाणे पुरेसे नसते तर सर्वच विद्यार्थ्यांची अध्ययन पातळी वाढविण्याची जबाबदारी घेऊन, त्याप्रमाणे ह्यांनी कृती करणे आवश्यक असते.

३) व्यक्ती अध्यापक – शिक्षण घेण्यासाठी येतात तेव्हा त्यांच्या काही श्रद्धा, मूल्ये, बांधिलकी, व्यक्तिमत्व व नैतिक बंधने असतात, की जी त्यांच्या संस्कारावर व शालेय जीवनावर अवलंबून असतात आणि त्यांच्या ते शिक्षक म्हणून कसे आहेत, तसेच अध्यापक शिक्षणातून काय शिकतात, ह्यावरही परिणाम होतो. शिक्षक बनू इच्छिणाऱ्या उमेदवाराला चिकित्सकपणे स्वतःच्या श्रद्धा, मूल्ये तपासून पाहून, त्याचा संबंध अध्ययन – अध्यापन आणि आशयाशी जोडून, चांगल्या अध्यापनाविषयी स्वतःचा दृष्टिकोन तयार करण्यासाठी, त्याला शिकण्यासाठी प्रेरित करण्यासाठी आणि आपल्या कामावर लक्ष केंद्रित करण्यासाठी मदत करणे, हे अध्यापक शिक्षणाचे मुख्य कार्य आहे. (फायमन – नेम्सर, २००१)

४) राष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या अहवालात (The National Academy of Education Committee's Report) (डार्लिंग – हमाँड आणि ब्रान्सफोर्ड, २००५) असे लिहलेले आहे. "दररोज शिक्षकांना अनेक गुंतागुंतीचे / अवघड निर्णय घ्यावे लागतात. ह्यासाठी त्यांना विविध ज्ञानाचा व सूज्ञतेचा आधार घ्यावा लागतो, तसेच त्याचा विद्यार्थ्यांच्या भवितव्यावरही परिणाम होऊ शकतो. योग्य निर्णय घेण्यासाठी विद्यार्थ्यांचा विकास, अध्ययनातील फरक, भाषा, सांस्कृतिक भेद आणि व्यक्तीभेद, आवडी – निवडी व अध्ययन पद्धती ह्यांचा योग्य परिणाम साधून जास्तीत जास्त अध्ययन कसे साधावे, ह्याचे ज्ञान आवश्यक आहे."

वर दिलेल्या अवतरणातील अध्ययन व कृती क्षेत्राबद्दलच्या पायाभूत ज्ञानाखेरीज शिक्षकांना, जास्त माहिती मिळविण्यासाठी आवश्यक पायऱ्या आणि सद्य परिस्थिती व त्याला योग्य असे निर्णय घेण्यासाठी आवश्यक सूज्ञता असण्याची शिक्षकांना गरज आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे शिक्षकांनी आपल्या निर्णयाच्या मुळाशी विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेतले पाहिजे.

५) इतर शैक्षणिक प्रयत्नांप्रमाणेच, शिक्षक अध्ययनात सुद्धा व्यावसायिक बांधिलकी किंवा संरचना असते आणि त्यात बदल होण्याची शक्यताही असते. आपण एखाद्याचे व्यक्तिमत्व बदलू शकत नाही पण आपण दुसऱ्यांबद्दलची त्याची मनोवृत्ती बदलू शकतो आणि अध्यापनाकडे वैयक्तिकपेक्षा व्यावसायिक भूमिका विकसित करु शकतो.

६) शिक्षण मंत्रालयाच्या "शिक्षणाचे आव्हान : धोरणात्मक दृष्टिकोन" (Challenge of Education : A Policy Perspective) (१९८५) मध्ये नमूद केल्याप्रमाणे, "शिक्षण क्षेत्रातील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे शिक्षक कृती धोरणे काहीही ठरविली, तरीही शेवटी ती शिक्षकांनाच स्वतःच्या कृतीतून अध्यापन – अध्ययन प्रक्रियेतून राबवायची असतात. भारत हा वर्ग अध्यापनात क्रांती घडविणाच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे, सक्षम आणि स्वतःला शिक्षणासाठी वाहून घेतलेले असे शिक्षक शिक्षण क्षेत्रात असल्याशिवार शिक्षण प्रणाली ही राष्ट्रीय विकासाचे साधन बनणार नाही.

शिक्षकांने शिक्षण – व्यवसायासाठी पुरेसे ज्ञान, कौशल्ये, त्यात रस व योग्य मनोवृत्ती विकसित करायला हवी. मानसशास्त्रीय तत्त्वज्ञानात्मक, समाजशास्त्रीय उपपत्ती, नवीन माध्यमे व साहित्य ह्यामुळे शिक्षकाचे काम हे जास्त गुंतागुंतीचे व तांत्रिक बनलेले आहे. शिक्षक सुनियोजित व सृजनशील अशा सेवापूर्व व सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमातून कार्यकुशल बनू शकतात.

अध्यापक शिक्षणाची व्याप्ती :

अध्यापक शिक्षणाची व्याप्ती खालील मार्गांनी कळू शकेल;

- शिक्षणाच्या विविध पातळींवरील अध्यापक शिक्षण
- अध्यापक शिक्षणाचा त्रिकोणी पाया
- अध्यापक शिक्षणाची विविध अंगे

शिक्षणाच्या विविध पातळीवरील अध्यापक शिक्षण :

अध्यापक शिक्षण हे शिक्षणाच्या पूर्व - प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व उच्च शिक्षण, ह्या सर्व पातळ्यांवरील / स्तरावरील शिक्षकांपर्यंत पोहोचते. विद्यार्थ्यांच्या आणि शिक्षणाच्या गरजा व आवश्यकता, प्रत्येक स्तरावर वेगळ्या असतात. त्यामुळे पातळी आणि स्तराप्रमाणे, अध्यापकाची तयारी आवश्यक असते. अध्यापक शिक्षण हे व्यावसायिक (शिक्षण) संस्थातील शिक्षकांची अध्यापन कौशल्ये विकसित करण्यासही मदत करते. व्यावसायिक संस्थातील शिक्षकांना त्यांच्या स्वतःच्या विषयाचे तात्विक व व्यवहार्य ज्ञान असते. त्यांना त्यांच्या

व्यवसायात शिरणाऱ्या नवीन विद्यार्थ्यांना हाताळण्यासाठी अध्यापक प्रशिक्षणाबद्दलची माहिती आवश्यक असते. अध्यापक शिक्षण हे विशेष शिक्षण (Special Education) आणि शारीरिक शिक्षण ह्यांनाही सामावून घेते. म्हणजेच, जेथे शिक्षक (अध्यापक) आहेत, तेथे अध्यापक शिक्षण पोहोचते.

विविध स्तरांवर, नवीन शिक्षकांना प्रभावीपणे तयार करण्यासाठी ज्ञानाचा (आशयाचा) पाया हा विशेष व वेगवेगळा असतो.

अध्यापक शिक्षणाचा त्रिकोणी पाया :

प्रत्येक स्तराशी संबंधित शिक्षणाची बांधणी (रचना) करण्यासाठी, प्रत्येक स्तराशी संबंधित अध्यापक शिक्षणाबद्दलची, उच्च पातळीची शैक्षणिक व बौद्धिक जाण असणे आवश्यक असते. ह्यासाठी, शिक्षणशाखेशी संबंधित अशा इतर शाखा – म्हणजेच मानसशास्त्र, समाजशास्त्र आणि तत्वज्ञान ह्यातील तात्विक ज्ञानाची निवड आणि अध्यापक शिक्षणाला योग्य असा त्यात बदल करणे आवश्यक असते. अध्यापक शिक्षणाचा आशय हा तत्त्वज्ञान, समाजशास्त्र आणि मानसशास्त्र ह्या ज्ञानशाखांमधून घेतलेला असतो. ह्या ज्ञानशाखा अध्यापक शिक्षणाचे योग्य आकलन व उपयोजन करण्यास योग्य असा ज्ञानाचा पाया देतात. तात्त्विक पाया, विद्यार्थी – शिक्षकांना तत्त्वज्ञानाचे विविध विचार – प्रवाह, प्राचीन व अर्वाचीन तात्त्विक विचार, विविध तत्त्ववेत्त्यांचे शिक्षण आणि त्याचे अभ्यासक्रम रचना, शिस्त इ. विविध भागांवर विचार इ. वर ज्ञान प्राप्त होते. समाजशास्त्रीय पाया विद्यार्थी शिक्षकांना समाजाची भूमिका व त्याची राष्ट्राच्या शिक्षण प्रणालीवर व सर्वसामान्यपणे जगावर असणाऱ्या प्रेरक शक्तीबद्दल आकलन करण्यास मदत करते. तसेच तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विचारांना समावून घेतो. मानसशास्त्रीय पाया विद्यार्थी – शिक्षकांना, विद्यार्थ्यांच्या मानसिकतेबद्दल जाणीव करुन देते. ह्यामुळे विद्यार्थी – शिक्षकांना स्वत:बद्दल, विद्यार्थ्यांबद्दल व अध्ययन परिस्थितीबद्दल आकलन होते, की जेणेकरुन ते विद्यार्थ्यांना योग्य व अर्थपूर्ण शैक्षणिक अनुभुती देण्यास मदत करते.

अध्यापक शिक्षणाची अंगे :

अध्यापक शिक्षणाची विविध अंगांचा संबंध, 'कोण' (शिक्षक – अध्यापक), 'कोणाला' (विद्यार्थी – शिक्षक), 'काय' (आशय), 'कसे' (अध्यापनाच्या पद्धती) ह्याच्याशी आहे. अध्यापक शिक्षण शिक्षक अध्यापकांच्या दर्जावर अवलंबून असते. अध्यापन शास्त्रीय माहितीचा अध्यापक शिक्षणातील दर्जा आणि भविष्यातील शिक्षक घडविण्यासाठी त्याचा परिणामकारक उपयोग हा, शिक्षक – अध्यापकांची व्यावसायिक क्षमता व त्याचा अध्यापक – शिक्षण कार्यक्रमातील योग्य उपयोग ह्यावर अवलंबून असतो. म्हणजेच अध्यापक शिक्षण हे प्रथमत: शिक्षक – अध्यापकांच्या तयारीचा विचार करते.

अध्यापक – शिक्षण, विद्यार्थी शिक्षकांना योग्य / आवश्यक ज्ञान, दृष्टिकोन आणि शिक्षकी पेशामध्ये परिणामकारक कार्य करण्यासाठी आवश्यक कौशल्ये पुरविते. शिक्षकी पेशातील बारकावे जाणण्यासाठी आवश्यक संकल्पनात्मक व सैद्धांतिक बैठक, अध्यापक – शिक्षण, विद्यार्थी शिक्षकांना उपयोगी पडते. त्याचा (अध्यापक – शिक्षणाचा) विद्यार्थी -

शिक्षकांची त्यांच्या व्यवसायाशी संबंधित असलेल्यांबद्दल योग्य दृष्टिकोन तयार करणे, हा उद्देश असतो, त्यामुळे विद्यार्थी शिक्षक विविध आव्हाने जास्त योग्यपणे पेलू शकतात. सर्व कार्ये योग्य व परिणामकारकरित्या करण्यासाठी तो (अध्यापक – शिक्षणाचा कार्यक्रम) विद्यार्थी शिक्षकांना सक्षम (आवश्यक अध्ययन व वर्तन कौशल्ये) बनवितो. त्यामुळे अध्यापक शिक्षणाचा आशय महत्त्वाचा असतो.

उद्दिष्टे :

अध्यापक शिक्षणाचा दृष्टिकोन :

शाळा प्रणालीकडून येणाऱ्या मागण्यांना अध्यापक शिक्षण संवेदनशील असले पाहिजे. ह्यासाठी शिक्षकांना दुहेरी भूमिकेसाठी तयार करावे लागते;

- अध्ययन – अध्यापन संदर्भात, प्रोत्साहित करणारा, मदत करणारा, समजून घेणारा (असा शिक्षक), की जो विद्यार्थ्यांना स्वत:तले गुण ओळखायला व त्यांच्या शारीरिक व बौद्धिक क्षमतांचा पूर्णपणे उपयोग करुन घ्यायला, त्याचे चारित्र्य योग्यपणे विकसित करण्यासाठी तसेच योग्य सामाजिक व मानवी मूल्यांचा विकास करुन त्यांना जबाबदार नागरिक म्हणून कार्य करण्यास मदत करेल.
- व्यक्ती समुहातील एक क्रियाशील सदस्य, की जो शाळेचा अभ्यासक्रम सुधारण्यासाठी, समाजाच्या बदलत्या गरजा, अध्ययनार्थीच्या वैयक्तिक गरजा, भूतकाळातील अनुभव आणि त्यावर आधारित राष्ट्राच्या विकासाची उद्दिष्टे व शैक्षणिक महत्त्वाच्या गरजा ह्या संदर्भात जाणीवपूर्वक कृती करेल.

ह्या अपेक्षा असे दर्शवितात की, शिक्षकाचे कार्यक्षेत्र हे खूपच व्यापक असते आणि त्याचा त्याच्या कार्यावर खूप परिणाम होतो. ह्याचाच अर्थ, शिक्षक हा विद्यार्थ्याच्या राष्ट्राच्या व वैश्विक संदर्भात असलेल्या विविध तफावतींबद्दल आणि राष्ट्राच्या संदर्भात जी उद्दिष्टे साध्य करायची आहे म्हणजे, समानता, नि:पक्षपात, सामाजिक न्याय, उत्कृष्टता ह्याबाबतीत जबाबदार आणि संवेदनशील असायला पाहिजे.

अशा अपेक्षा पूर्ण होण्यासाठी, अध्यापक शिक्षण असे असले पाहिजे, की ज्यामुळे विद्यार्थी – शिक्षक खालील गोष्टी करु शकतील.

- विद्यार्थ्यांची काळजी घेतील आणि ज्यांना विद्यार्थ्यांबरोबर असणे आवडेल.
- सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय संदर्भात विद्यार्थ्यांना समजू शकतील.
- अध्ययनाला, वैयक्तिक अनुभवांशी जोडतील.
- अध्ययन कसे होते, ते समजून घेऊन, विद्यार्थ्यांची पातळी, अध्ययन पद्धती इ. लक्षात घेऊन, अध्यायनाला पोषक असे वातावरण तयार करतील.
- ज्ञानाच्या निर्मितीला सतत चालणारी परावर्तनशील प्रक्रिया (Reflective Thinking) समजतील.
- सतत अध्ययन करण्यास तयार असतील व सतत अध्ययन करतील.

- जे वैयक्तिक अनुभवांचा अध्ययनाशी संबंध जोडतील आणि ज्ञानाची निर्मिती ही सतत चालणारी परावर्तनशील प्रक्रिया आहे असे समजतील.
- समाजाप्रती स्वतःची जबाबदारी ओळखून चांगल्या जगाची (परिस्थितीची) निर्मिती करतील.
- उत्पादन कार्याचे महत्त्व समजून, अध्यापन प्रक्रियेत, वर्गात व वर्गाबाहेर, प्रात्यक्षिक कार्याला महत्त्व देतील.
- अभ्यासक्रमाची चौकट, धोरणे आणि आशय ह्यांचे विश्लेषण करतील.
- ज्ञानाचा पाया भक्कम असेल व भाषेवर प्रभुत्त्व असेल.

अध्यापक शिक्षणाची उद्दिष्टे म्हणूनच खालील प्रमाणे असतील :

- विद्यार्थ्यांचे (शाळेतील) निरक्षण करण्यास त्यांना समजून घेण्यास व त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी संधी देणे.
- स्वयंअध्ययन, परावर्तनशील विचार प्रक्रिया, प्राप्त ज्ञान आत्मसात करुन त्याचे योग्य संधीकरण करण्यासाठी संधी प्राप्त करु देणे, स्वयंअध्ययनाची विचार करण्याची, स्वतःचे दोष शोधण्याची व गटात काम करण्याची क्षमता निर्माण करणे.
- स्वतःला व इतरांना (स्वतःच्या श्रद्धा, गृहित गोष्टी, भावना ह्यांच्या संदर्भात) समजण्याची संधी प्राप्त करुन देणे, स्वतःबद्दल चिकित्सक असण्याची (स्वतःचे विश्लेषण करण्याची), स्वतःचे मूल्यमापन करण्याची, समायोजन साधण्याची, सामावून घेण्याची, सर्जनशील व नवीन उपक्रमांचा प्रवर्तक बनण्याची क्षमता विकसित करणे.
- ज्ञान, विशिष्ट शाखीय ज्ञान, आकलन आणि सामाजिक सत्ये समजण्यासाठी संधी उपलब्ध करणे जेणेकरुन, (शिक्षणाचा) आशयाचा संबंध समाजाशी / सामाजिक परिस्थितीशी जोडून, चिकित्सक विचार करण्याची क्षमता विकसित करु शकतील.
- अशा संधी प्राप्त करु देणे, ज्यामुळे अध्यापन शास्त्रीय निरीक्षणात्मक, योग्य टिपण्णी करणे, विश्लेषण करणे, नाट्य, कला, कथाकथन, परिवर्तनशील विचार प्रक्रिया इ. व्यावसायिक क्षमता विकसित होतील.

आपली प्रगती तपासा :

१. अध्यापक शिक्षणाची गरज विषद करा.
२. अध्यापक शिक्षणाची व्याप्ती स्पष्ट करा.
३. अध्यापक शिक्षणाची उद्दिष्टे सांगा.

_____

_____

_____

_____

_____

१.४ भारतीय संदर्भात अध्यापक शिक्षणाची बदलती रुपरेषा :

भारतातील निर्विवाद सिद्ध झालेल्या अध्ययन – अध्यापन परंपरेतील वैशिष्ट्ये ही कठीण परिस्थितीत सुद्धा तग धरुन राहिली. स्वातंत्र्योत्तर काळात अध्यापक शिक्षण वृद्धिंगत करण्यासाठी आणि बदलण्यासाठी मुख्यत्वेकरुन प्रयत्न केले गेले. प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारामुळे, शालेय शिक्षणाची, वाढ व प्रसार ह्यामुळे, शिक्षक घडविणाच्या प्रक्रियेवर खूप दबाव आलेला आहे. अध्यापक (सज्जता) शिक्षणाचे पाश्चात्य प्रतिमान आपण स्वातंत्र्य मिळविण्याच्या वेळी, १९४६ मध्ये ब्रिटनकडून घेतले, ते स्थानिक गरजा लक्षात घेऊन, संदर्भानुसार त्यात बदल करुन सुधारुन ते प्रतिक्रियाशील, गतिमान बनवून भारतीय परिस्थितीसाठी बदलण्याकरता महत्त्वपूर्ण असे प्रयत्न केले गेले आहेत. अध्यापक शिक्षणाची सद्य प्रणाली ही राष्ट्रीय, प्रांतीय आणि प्रादेशिक पातळीवरील संस्थानिहाय साधनसामग्री वापरुन ही शिक्षक सज्जता करण्याची प्रक्रिया दर्जेदार व परिणामकारक व्हावी म्हणून नोकरीपूर्व व नोकरी दरम्यानचे (प्रशिक्षण) कार्यक्रम देशभरात राबवते.

राष्ट्रिय धोरणांचे परिणाम :

स्वातंत्र्यानंतर भारताने शालेय शिक्षणात सर्वसाधारणपणे साक्षरता, आवश्यक साधन-सामग्रीचे घटक, (शिक्षणाची) सार्वत्रिक सवलत व शालेची पटसंख्या ह्यात लक्षणीय प्रगती साधलेली आहे. हल्लीच्या काही वर्षात, आधीच्या मानाने अध्यापक शिक्षणात दोन प्रमुख बदल घडलेले आहेत.

- प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकिकरणाला शासकीय मान्यता मिळाल्यामुळे शिक्षणाच्या अधिकाराचा कायदा २००८ आला आणि
- शालेय शिक्षणासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रमाची चौकट २००५.

संसदेत कायदा केला आहे आणि शिक्षणाचा अधिकार अस्तित्वात आला आहे, जेणेकरुन राज्यांना ६ – १४ ह्या वयोगटातील जवळजवळ २० कोटी मुलांना इयत्ता आठवीपर्यंतचे शिक्षण मोफत व सक्तीचे करणे बंधनकारक आहे. ह्या कायद्यान्वये शाळेच्या कार्याला काही बंधने घातली आहे, ज्यानुसार शिक्षक विद्यार्थी गुणोत्तर हे प्राथमिक पातळीवर २०० विद्यार्थी संख्येपर्यंत १:३० असले पाहिजे. ह्यामुळे प्राथमिक पातळीवरील प्रशिक्षित शिक्षकांची मागणी ही कितीतरी पटींनी वाढेल. ही मागणी पुढील काही वर्षात कशी पूर्ण करायची, ह्याचा विचार केला गेला पाहिजे. २००२ मधील सर्व शिक्षा अभियानाची सुरुवात, सध्याची आर्थिक बांधिलकी आणि प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण वाढविण्याच्या नादात, दर्जेदार शिक्षणाची मागणी पुरविण्याकरीता आवश्यक अशी शिक्षकांना योग्य रितीने तयार करण्याची गरज दुर्लक्षिली गेली आहे.

शालेय शिक्षणाचा विकास :

स्वातंत्र्यानंतरच्या काही दशकांमध्ये शालेय शिक्षणात लक्षणीय विकास झालेला आहे. सरकारी अंदाजाप्रमाणे, (विशिष्ट शैक्षणिक सांख्यिकी २००४ – २००५ मानवी संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली) ५ – १४ वयोगटातील २० कोटी मुलांपैकी ८२% मुले ही शाळेच्या

हजेरीपटावर असली, तरी प्रत्यक्षात त्यातील ५०% मुले ही ८वी इयत्ता पूर्ण करण्यापूर्वीच शाळा सोडून देतात. (मानवी संसाधन विकास मंत्रालय, वार्षिक अहवाल २००७ – ०८) प्रत्यक्षात ही परिस्थिती आणखीनच कठीण आहे. प्रांतीय, सामाजिक, आर्थिक आणि लिंगभेद ह्यातील फरक विविध आव्हाने तयार करतात. ही सत्य परिस्थिती आहे आणि त्यामुळे शिक्षणाच्या अधिकाराचा कायदा लागू करण्यात, भविष्य काळातील शिक्षकांना अधिकाधिक आव्हानांना तोंड द्यावे लागणार आहे.

शालेय प्रणालीच्या सततच्या विभाजनामुळे ६ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांच्या मूलभूत गरजा, ह्या सर्वांना सामावून घेणाऱ्या परिस्थितीत, (Inclusive Setting) पूर्ण करण्याच्या राष्ट्रीय जाहिरनाम्याला अडचणी निर्माण होतात. वाढते खाजगीकरण आणि विविध शालेय प्रणाली ह्यामुळे सर्व मुलांच्या दर्जेदार शिक्षणाच्या अधिकाराला परिणामाकडून बनवितात.

शिक्षकाची बदलती भूमिका :

शाळेची सध्याची पद्धती मुलांवर खूपच दडपण निर्माण करते. शिक्षणतज्ञांची धारणा आहे की, ज्ञान हे असे काहीतरी आहे की जे द्यायचे आहे आणि ते विद्यार्थ्याला फक्त पाठ्यपुस्तकातूनच मिळू शकेल अशा विचारांमुळेच हे दडपण निर्माण होते. ज्ञान हे विचारमग्नतेतून अध्ययन करण्याची, निरंतर विकसित होणारी अशी मानवी रचना आहे. एन्.सी.एफ्. २००५, अनुसार, शिक्षकाने मुलांचे अध्ययन सुलभ होण्यास व त्याला / तिला स्वतःचे ज्ञान स्वतः निर्माण करण्यास मदत करावी. शिक्षण म्हणजे माहिती प्रेषित करण्याची यांत्रिक कृती नाही आणि शिक्षक हे माहिती प्रसारित करणारेही नाहीत. शिक्षकांना अभ्यासक्रम संक्रमित करण्याची महत्त्वाची भूमिका बजावयाची असते.

अध्यापक शिक्षणातील आव्हाने :

अभूतपूर्व अशी गेल्या काही वर्षातील अध्यापक शिक्षण संस्थांची वाढ व विविध कार्यक्रम ह्यातून अध्यापक शिक्षणाची सद्य परिस्थितीतील वैशिष्ट्ये लक्षात येतात. शाळेतील वाढती पट संख्या आणि प्राथमिक शिक्षणाच्या विकासासाठी सुरु केलेले विविध उपक्रम – ऑपरेशन ब्लॅकबोर्ड जिल्हा पातळीवरील प्राथमिक शिक्षण कार्यक्रम, सर्वशिक्षा अभियान आणि प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण ह्यामुळे शिक्षकांची मागणी सहाजिकच वाढली. आधीचे अप्रशिक्षित अध्यापक आणि शिक्षकाची नोकरी मिळण्यासाठी नोकरीपूर्व प्रशिक्षणाची अट, ह्यामुळे अस्तित्वात असलेल्या (अध्यापक – शिक्षण) संस्थाच्या क्षमतेवर खूपच भार आला. खूप जास्त प्रमाणात आलेल्या मागणीमुळे देशातील बहुतेक भागात अध्यापक शिक्षण संस्थाच्या आकडेवारीत अभूतपूर्व अशी वाढ झाली.

२००४ मधील ३,१९९ संस्थातील ३,४८९ कार्यक्रमांसाठी २,४७,०७२ इतकी पटसंख्या ही २००८, डिसेंबरमध्ये वाढून १२,२२० संस्थातील १४,५२३ कार्यक्रमांसाठी, विविध पातळीवर १०,७३,६६१ इतकी झाली. ह्या अभूतपूर्व अशा वाढीचा भौतिक सुविधा, अध्ययन साधने आणि विद्यार्थ्यांची रुपरेषा ह्यांच्या दर्जावर खूप मोठा परिणाम झाला.

अध्यापक शिक्षणाला सर्वंकष सुधारणेची तातडीची गरज आहे. वेगवेगळ्या शालेय पातळीवरील शिक्षकांचा दर्जा, कालावधी, संरचना ह्याच्या संदर्भात त्यांची व्यावसायिक तयारी आणि सतत व्यावसायिक विकास ह्याचा एकत्रित विचार होण्याची गरज आहे.

शिक्षकी पेशातील गुंतागुंत व व्यावसायिक महत्त्व लक्षात घेता, अध्यापक शिक्षण हे विद्यापीठ पातळीवर नेऊन, त्याप्रमाणे त्याचा कालावधी व कार्यक्रमाचा काटेकोरपणा प्रमाणात वाढविणे हे क्रमप्राप्त आहे.

संशोधन आणि नवीन उपक्रम :

संशोधन – मग ते एखाद्या कार्यक्रमाचे (अभ्यासक्रमाचे) असो, अथवा एखाद्या वर्गाचे असो – त्याचे व्यवस्थित व विश्लेषणात्मक पुरावे वाढविण्याची गरज आहे, - अशी संशोधने विद्यार्थी शिक्षकांना अभ्यासण्यासाठी उपलब्ध असणे आवश्यक आहे. विद्यापीठातील विभाग व संशोधन संस्थांनी अशी संशोधने वाढविण्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर अध्यापक शिक्षणाची विविध नवीन प्रतिमाने तयार करण्याची गरज आहे. उत्कृष्टता साध्य करण्यासाठी संस्थेकडे नवी काहीतरी तयार करण्याची सृजनशीलता, कार्यक्षमता व कुशलता असणे आवश्यक आहे. म्हणूनच सद्य परिस्थितीत संशोधनाला सर्वात जास्त प्राधान्य दिले गेलेले आहे. अध्यापक शिक्षकांना लहान व मोठे संशोधन प्रकल्प घेण्यास प्रोत्साहित केले जाते.

समाविष्टित शिक्षण (Inclusive Education) :

शाळांमध्ये दोन प्रकारे (विद्यार्थ्यांना) वगळले जाते – एक – जेव्हा मुलात काही व्यंग असते आणि दुसरे सामाजिक - जी मुले सामाजिक व आर्थिक दृष्ट्या कमकुवत परिस्थितीतून आलेली असतात. शिक्षकांना त्यांच्या दुषित पूर्वग्रहातून बाहेर काढून, त्यांना अशी आव्हाने योग्य रितीने स्विकारण्यासाठी सक्षम बनविण्याची अतिशय आवश्यकता आहे.

व्यंग असलेल्या व्यक्तीसंबंधित कायदा (Persons with Disabilities Act), २००५ च्या अन्वये, व्यंग असलेल्या १८ वर्षांखालील मुलांना शिक्षण मोफत व सक्तीचे आहे. सामाजिक व आर्थिक दृष्ट्या कमकुवत घटकांना, मुख्यत्वेकरुन मागास वर्गीय, मागास जमातीय घटकांचे शिक्षण ही बरेच वर्षांपासून राष्ट्राची महत्त्वाची चिंतेची बाब आहे. मुलांची पटसंख्या व त्यांचे शिकणे, तसेच त्यांचा सहभाग हा नेहमीच मुलांपेक्षा कमी दिसून येते, अशा प्रकारचे सामाजिक वंचितीकरण शिक्षणाच्या माध्यमातून थांबविण्यासाठी, शिक्षकांची खास तयारी करुन घेणे गरजेचे आहे.

न्याय्य व आधारभूत विकासाचा दृष्टिकोन :

भावी नागरिकांचा, समाजातील सर्व स्तरांसाठी न्याय्य व आधारभूत विकासाचा दृष्टिकोन असण्यासाठी आणि सर्वांबद्दल आदर असण्यासाठी त्यांना शिक्षणातून स्त्री-पुरुष समानता, शांती प्रियता, सर्वांचे न्याय हक्क आणि (कोणत्याही) कामाबद्दल आदर व महत्त्व अशा मुल्यांची रुजवणूक होणे आवश्यक आहे. सध्याच्या अती व्यापारीकरणाच्या आणि स्पर्धात्मक जीवनशैलीत झालेल्या पर्यावरणाच्या ऱ्हासामध्ये, मुलांना त्यांचा, वस्तू वापरायच्या तऱ्हा व नैसर्गिक साधनांकडे पहाण्याचा दृष्टिकोन बदलण्यासाठी शिक्षण दिले पाहिजे.

समाजातील वाढत्या तणावामुळे मुलांच्यामध्ये आंतरिक व एकमेकांमध्ये ध्रुवीकरण व हिंसकवृत्ती वाढली आहे. त्यांच्या मनात शांतीचे मूल्य रुजवून स्वतःबद्दल व इतरांबद्दलचा आदर निर्माण करण्याचे महत्त्वाचे कार्य शिक्षणातून साधायचे आहे. राष्ट्रीय अभ्यासक्रम २००५ आणि इतर पाठ्यक्रम व साहित्य हे साधण्याचा प्रयत्न करीत आहेत.

सामाजिक ज्ञानाची शिक्षणात भूमिका :

संकल्पनांचा विकास होण्यासाठी आणि शालेय ज्ञानाचा प्रत्यक्ष आयुष्यात उपयोग होण्यासाठी, औपचारिक ज्ञानाचा संबंध सामाजिक ज्ञानाशी जोडणे आवश्यक आहे. राष्ट्रीय अभ्यासक्रमाचा ढाचा (NCF) २००५ सुद्धा स्थानिक पातळीवरील संबंधित आशयाचा अभ्यासक्रमात तसेच अध्ययन - अध्यापन पद्धतीत समावेश करण्याची शिफारस करतो.

आय् सी टी आणि ई-अध्ययन :

माहिती आणि संप्रेषण शास्त्राच्या सुरवातीपासून आणि त्याच्या प्रसारापासूनच, त्याचा शालेय अध्ययनात समावेश व्हावा अशी वाढती मागणी आहे. अध्यापक शिक्षण अशा प्रकारे बनविलेले आहे, की जेणेकरुन अध्यापक, विकासासाठी योग्य आणि विकासाला हानीकारक (ICT) माहिती आणि संप्रेषण शास्त्र कोणते हे समजू शकतील आणि त्याबाबतीत संवेदनशीलही राहतील.

त्याचबरोबर त्यांना, स्वतःच्या व्यावसायिक विकासासाठी त्यांच्यात माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान (ICT) ची क्षमता विकसित करणे गरजेचे आहे.

ही सर्व चर्चा लक्षात घेता, एन्.सी.इ.आर्.टी.ने प्रस्तुत केलेला नवीन अध्यापक शिक्षणाचा कार्यक्रम खालील प्रमाणे आहेः

- स्वयं-अध्ययनावर भर - ज्यात विद्यार्थी आजूबाजूच्या सामाजिक संदर्भातील तसेच समुदायाच्या आणि आणखीन विस्तृत म्हणजे राष्ट्राच्या विविध घडामोडींत स्वतः सहभाग घेतल्यामुळे शिकतो.
- शालेय मुलांच्या आणि विद्यार्थी-शिक्षकांच्या स्वयंअध्ययनाच्या क्षमतेवर भर देऊन योग्य शैक्षणिक कार्यक्रम बनविला जातो.
- विद्यार्थी हा अध्ययनातील कृतीशील व्यक्ती आहे, असे समजले जाते आणि त्याच्या / तिच्या क्षमता ह्या कायम नसून, त्या अनुभवातून विकसित (वृद्धिंगत) होऊ शकतात असे समजले जाते.
- शिक्षक हा विद्यार्थ्याचे अध्ययन सोपे करणारा, त्यांना मदत करणारा, प्रोत्साहित करणारा असा समजला जातो.
- ज्ञान हे स्थिर, निष्क्रिय आणि पुस्तकांपुरते मर्यादित न समजता, ते विविध प्रकारच्या अनुभवातून रचले जाते ते चर्चा करुन, मूल्यमापन करुन, स्पष्टीकरण करुन व तुलना व भेद करुन, म्हणजेच विचारांच्या आदान - प्रदानातून रचले जाते.
- अशा प्रकारच्या शैक्षणिक प्रक्रियेत सतत प्रत्याभरण देण्यावर भर दिला जातो - स्वयंमूल्यमापन, सहकाऱ्यांनी (इतर विद्यार्थी-शिक्षकांनी) केलेले मूल्यमापन, शिक्षक-प्राध्यापकांनी केलेले मूल्यमापन आणि औपचारिक मूल्यमापन.

म्हणजेच, प्रामुख्याने खालील बदल दिसून येईल :

पासून	कडे
- शिक्षक केंद्री, एकाच प्रकारचा	विद्यार्थी केंद्री, लवचिक
- शिक्षक दिशा देतात निर्णय घेतात	विद्यार्थ्याला स्वायत्तता
- शिक्षकाचे मार्गदर्शन आणि नियंत्रण	अध्ययन सोपे करुन, त्यासाठी मदत व प्रोत्साहन करणे
- अध्ययनात निष्क्रियता	अध्ययनात सक्रिय सहभाग
- शाळेच्या वर्गाच्या चार भिंतीआड शिक्षण	शाळेच्या वर्गाच्या चार भिंतीच्या पलिकडील सामाजिक संदर्भातील अध्ययन
- ज्ञान हे न बदलणारे असते आणि ते दिले जाते	ज्ञान हे विकसित आणि (सारखे) निर्मित होत असते
- एकाच विद्याशाखेशी केंद्रित	विविध विद्याशाखेय, शिक्षण केंद्रित
- नियंत्रित अनुभूती	विविध अंगी अनुभूती
- मूल्यमापन थोडक्यात, तोटक	सर्वांगी, सतत

१.५ जागतिक संदर्भात अध्यापक शिक्षणाची बदलती रुपरेषा :

अध्यापक शिक्षण हा वैश्विक व्यवसाय म्हणून नीट समजून घेण्याची गरज आहे. भविष्यातील आराखडे बांधण्यासाठी आता अस्तित्वात असलेली प्रतिमाने परिणामकारकरित्या वापरण्यासाठी, (शिक्षकी) व्यवसायाचे आज आहे, तसे वैश्विक स्वरुप जाणून घेण्याची गरज आहे.

व्यक्तीची वाढ आणि विकास ह्याला दिलेल्या महत्त्वानुसार, सद्य परिस्थितीत व्यावसायिक व प्रभावी अध्यापनाला फार महत्त्व आहे. ह्या विकासामुळे आणि उत्क्रांतीमुळे अध्यपनाचा दर्जा हा २० व्या शतकापेक्षा २१ शतकात जास्त उच्चप्रतीचा असेल. त्यामुळे, २१ शतकातील शालेय वातावरणात टिकून रहाण्यासाठी शिक्षकांना नवीन ज्ञान, कौशल्ये - सामान्य आणि विशिष्ट प्राप्त करुन घेण्याची गरज आहे.

व्यक्तीच्या व राष्ट्राच्या विकासासाठी शिक्षण हे जास्त महत्त्वाचे ठरत चाललेले आहे. जास्तीत जास्त पुरावे असे दर्शवितात की सर्व प्रकारच्या शैक्षणिक संसाधनात, शिक्षकांच्या क्षमता ह्या विद्यार्थ्यांच्या अध्ययनासाठी आणि पर्यायाने, राष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय प्रगतीसाठी सर्वात जास्त सहाय्यभूत ठरतात. (डार्लिंग - हॅमॉंड, २००६)

१) २१ व्या शतकातील वैश्विक जगात प्रगतीशील अध्यापक शिक्षण व प्रशिक्षण :

२१ व्या शतकातील वैश्विक जगातील प्रगतीशील अध्यापक शिक्षण व प्रशिक्षणासाठी, शिक्षण संस्थांनी अशा प्रकारचा कार्यक्रम तयार केला पाहिजे, जेणेकरुन भावी शिक्षक अध्ययन-

अध्यापनाबद्दलच्या विविध गोष्टी - त्यातील बारकांव्यासह सामाजिक व सांस्कृतिक संदर्भात जाणू व समजू शकतील. एवढेच नव्हे तर ही जाण / आकलन ने गुंतागुंतीच्या अशा (शालेय) वर्गाच्या संदर्भात जेथे विविध प्रकारचे विद्यार्थी असतात, तेथे प्रभावीपणे वापरु शकतील. २१ व्या शतकातील शिक्षकाला जर ह्या कार्यात यश मिळवायचे असेल तर त्यासाठी अध्यापक शिक्षण व प्रशिक्षण संस्थांना अशा प्रकारचे कार्यक्रम आखावे लागतील, जेणेकरुन नवीन तसेच अनुभवी शिक्षक ज्या परिस्थितीत शिकवितात, ते चित्रच पालटून जाईल आणि शिक्षक जास्त कार्यक्षम बनतील. हे असे दर्शविते की, अध्यापक शिक्षण-प्रशिक्षण हे पुढे नेणे गरजेचे आहे, आणि ह्यात शाळेच्या जास्त जवळ जाऊन परस्परांच्या बदलासाठी एकत्रितपणे कार्यक्रमाची आखणी करणे गरजेचे आहे. महत्त्वाचे म्हणजे, अध्यापक शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थांनी पुढाकार घेऊन शैक्षणिक धोरणे आखणाऱ्यांना आणि सामान्य जनतेला हे समजावून सांगण्याची जबाबदारी उचलली पाहिजे, की प्रभावीपणे शिकविण्यासाठी, कशा प्रकारच्या ज्ञानाची व कौशल्यांची गरज असते. तसेच, शाळेच्या संदर्भातही, शिक्षक ही ज्ञान व कौशल्ये कशी विकसित करतील व परिणामकारकरित्या वापरतील हे पहाण्याचाही जबाबदारी उचलली पाहिजे. (फुल्लन, १९९३)

२) वैश्विक अध्यापक शिक्षण-प्रशिक्षण अभ्यासक्रमाची रचना :

जगभरामध्ये देशांच्या सुधारणा आणि नवीन उपक्रम सुरु करण्याच्या पुढाकारामुळे अध्यापक शिक्षण आणि प्रशिक्षण कार्यक्रमाच्या रचनेबद्दल आणि प्रमाणपत्राच्या वर्गीकरणाबद्दल खूपच चर्चा सुरु झाली आहे. (हर्बट २००१) २१व्या शतकातील अध्यापकाच्या तयारीसाठी योग्य प्रतिमाने तयार करण्यासाठी, अध्यापनाविषयीचे पुरोगामी ज्ञान आणि जो विषय शिकवायचा, त्याचे सखोल आशय ज्ञान आवश्यक आहे. म्हणून ह्या संदर्भात, अध्यापक शिक्षण व प्रशिक्षणाचे "काय" (उद्दिष्टे) ह्यावर अभ्यासक्रमात लक्ष केंद्रित केले गेले पाहिजे.

वैश्विक अध्यापक शिक्षण-प्रशिक्षण अभ्यासक्रमांचे "काय" (उद्दिष्टे) :

शिक्षकांना आपले काम व्यावसायिक दृष्टिने पूर्ण करण्यासाठी आवश्यक अश्या आशय ज्ञानाची मांडणी विविध प्रकारे करता येते. (डार्लिंग - हॅमॉंड, २००६) अध्यापक शिक्षण-प्रशिक्षणाच्या सामाईक गाभा अभ्यासक्रमात मांडण्यासाठी आवश्यक गाभा-संकल्पना आणि कौशल्ये व्यवस्थित ठरविण्यासाठी, योग्य निवड व कार्यवाही करण्यासाठी, संरचनेची गरज आहे. अमेरिकेमध्ये अध्यापक शिक्षणाच्या राष्ट्रीय शिक्षण समितीने मान्य केलेली रचना ही २१ व्या शतकातील अध्यापक शिक्षण-प्रशिक्षण अभ्यासक्रमाला योग्य आणि बऱ्याच अध्यापनाच्या निकषात दिलेल्या ज्ञानाच्या तीन रुचीपूर्ण अशा क्षेत्रांशी निगडीत आहे. खालील आकृतीत हे दर्शविलेले आहे.

- अध्ययनार्थीचे ज्ञान, ते कसे शिकतात, दिलेल्या सामाजिक संदर्भात कसे विकसित होतात, भाषेचे ज्ञान कसे विकसित करतात.
- एखाद्या ज्ञानशाखेची गरज, विद्यार्थ्यांची गरज आणि शिक्षणाचा सामाजिक उद्देश्य लक्षात घेऊन, अभ्यासक्रमाचा आशय आणि ध्येये विषयाचा पाठ्यांश आणि शिकवायची कौशल्ये लक्षात घेऊन आणि.
- अध्यापनाबद्दलचे आकलन व अध्यापन कौशल्ये, विशिष्ट विषयाचे आशयज्ञान, विविध प्रकारच्या अध्ययनार्थींना शिकविण्यासाठी, अध्यापनशास्त्रीय आशय-विश्लेषणाचे ज्ञान - हे सर्व मूल्यमापनासाठी आणि त्यातून वर्गात योग्य फलित साधण्यासाठी.



आकृती १ : अध्यापकांना २१ व्या शतकासाठी तयार करणे

अभ्यासक्रमांमध्ये समाजाच्या कायम बदलणाऱ्या गरजा, जागतिक पातळीवरील परिस्थिती, तंत्रज्ञानाची प्रगती आणि विस्तार, पारंपारिक वर्गअध्यापनाची कल्पना बदलून तेथे, दुरस्थ-न-औपचारिक अध्ययनाची संकल्पना, ह्यांची दखल घेतली गेली पाहिजे (ॲलन आणि थॉमस, २०००; कॅन्ट्रोविस व इतर, १९८७).

अभ्यासक्रमातील आशय हा २१ व्या शतकातील वर्गांसाठी असावा. २१ व्या शतकातील वर्गात सार्वत्रिकपणे आढळणाऱ्या कठीण भाग (Hardware) आणि मृदू भाग (Software) मध्ये शिक्षकांना प्रशिक्षण दिले पाहिजे. तंत्रज्ञानातील शिक्षणात, टेलीकम्युनिकेशन, उपग्रहाचा उपयोग (Satellite Access), एकमेकांशी जोडणारे जाळे (Networking), आंतरजाल (Internet), चलचित्र (Video Conferencing) आणि

अंकात्मक घटक (Digital Component), तसेच प्रकाशतंत्र (Optical Technology) ह्याचा समावेश झाला पाहिजे. ह्या सर्व तंत्रज्ञानामुळे, २१ व्या शतकातील शिक्षकाला २१ व्या शतकातील वर्गात शिकविणे सुकर होईल आणि सक्षमतेने व परिणामकारकरित्या शिकविणे शक्य होईल.

दुसरे म्हणजे, जागतिक पातळीवर व्यवसायांत होणारा बदल. आजच्या आधुनिक जगात, इतक्या प्रकारचे व्यवसाय आहेत आणि २१ व्या शतकात तर ते कित्येक पटींनी वाढणार आहेत. अध्ययन-अध्यापनाच्या संदर्भात असणारी आव्हाने आत्मविश्वासाने हाताळ्यासाठी शिक्षकांना विविध भूमिका बजावण्याची गरज असते, ह्याचा अध्यापक शिक्षक-प्रशिक्षणातील नवीन दिशांमध्ये विचार करणे आवश्यक आहे. जर शिक्षकांना आवश्यक अशा क्षमता, ज्ञान आणि अनुभूती दिल्या, तरच आपण आपल्या विद्यार्थ्यांसाठी जगभर शिक्षणाची गुणवत्ता वाढवू शकतो. वर्गाच्या प्रगतीला अडथळा आणणारी विद्यार्थ्यांची वर्तणूक, की जेणेकरुन शिक्षकाला आपले कार्य परिणामकारकरित्या करणे अशक्य बनते व विद्यार्थी आणि शिक्षकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होतो, तेव्हा त्यावर नियंत्रण ठेवणे, ही २१व्या शतकातील शिक्षकाची श्वास, उल्लेखनीय अशी क्षमता आहे. अशा प्रकारच्या समस्या ह्या २१ व्या शतकात कितीतरी पटींनी वाढू शकतात आणि म्हणूनच, अध्यापक शिक्षण-प्रशिक्षण संस्थांनी शिक्षकांना अशा समस्यांबद्दलचे योग्य ज्ञान देणे व अशा समस्या परिणामकारकरित्या हाताळण्याची कौशल्ये विकसित करणे गरजेचे आहे.

अध्यापक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात निरंतर अध्ययन (Life-long Learning), तंत्रज्ञानचा विकास व त्याचा वापर व विद्यार्थ्यांना हितावह, असे शक्य होऊ शकतील असे विकल्प नियोजित करण्याची कौशल्ये, ह्यांचा अंतर्भाव असायला हवा. लोकशाही तत्त्वे व त्यांचा प्रत्यक्षात वापर, ह्यावर भर द्यायला हवा. लोकशाही प्रथांमुळेच शिक्षक लोकशाही-मूल्ये, कौशल्ये आणि वर्तणूकित शाळा व शाळेची भूमिका ह्याचा वैश्विक दृष्टिकोनातून विचार करु शकतील.

वैश्विक अध्यापक शिक्षण-प्रशिक्षण अभ्यासक्रमाचे "कसे"?

अध्यापक शिक्षण-प्रशिक्षण उपक्रमाची मांडणी आणि अध्यापनशास्त्र ह्यांनी 'कसे' ह्यावर मुख्यत्वेकरुन भर द्यायला हवा. अध्ययनासाठी गाभाभूत आशय ज्ञान व विस्तारित संशोधनाची पार्श्वभूमी असलेले योग्य अभ्यासक्रम निवडणे महत्त्वाचे आहे. ह्यासाठी, होऊ घातलेल्या शिक्षकांचे अनुभव लक्षात घेणे गरजेचे आहे, जेणेकरुन ते मिळविलेल्या ज्ञानाचा वर्गामध्ये कौशल्यपूर्ण उपयोग करु शकतील, विशेष करुन संशोधनाचा संबंध ते जे काही शिकवितात त्याच्या बरोबर जोडू शकतील, आणि २१ व्या शतकातील शिक्षक हे वृत्तीने शिक्षक-संशोधक बनतील. पुष्कळदा, हा, अध्यापक शिक्षण-प्रशिक्षण कार्यक्रम बनविण्यातला कठीण भाग बनतो. थोडक्यात अध्यापक शिक्षण-प्रशिक्षणामध्ये 'काय' आणि 'कसे' ह्या दोन्हीचा आंतर्भाव असावा, जेणेकरुन प्रत्यक्षात शिक्षक हे दिलेल्या, विविध अध्ययन-अध्यापन परिस्थितीत, त्यांना त्यांच्या प्रशिक्षणाच्या काळात मिळालेल्या ज्ञानाचा कौशल्यपूर्ण व परिणामकारकरित्या उपयोग करु शकतील.

लॉर्टी (१९७५) ह्यांच्या मतानुसार हे सर्व साध्य करण्यासाठी, 'अध्यापनाच्या अध्ययना'साठी काही खास आव्हानांचा विचार करायला हवा. ह्यासाठी परस्पर संबंधित अशा खालील तीन गोष्टी २१ व्या शतकातील शिक्षकांसाठी महत्वाच्या आहेतः

- अध्यापन हे स्वतःच्या, विद्यार्थी असताना मिळालेल्या अनुभवांपेक्षा वेगळे असते, हे जाणणे. ह्याला लॉर्टो निरिक्षणाचा शिकाऊ काळ असे म्हणतात. ह्याचा संबंध पारंपारिक वर्गातील विद्यार्थ्यांच्या अध्ययनाशी आहे.
- फक्त शिक्षकासारखा विचार करायला न शिकता, शिक्षकासारखे वर्तन करायला शिका. ह्याला केनेडी (१९९९) भूमिका वठविण्याची समस्या असे म्हणतात. व्यावसायिक दृष्टिकोनातून, शिक्षकाला एकाच वेळी विविध गोष्टी समजाव्या व कराव्या लागतात.
- वर्गातील दाटीवाटीचे व विविधतेचे स्वरुप समजणे, वेगवेगळी शैक्षणिक व सामाजिक ध्येये जी वेळोवेळी बदलत असतात - ती हाताळणे (जॅक्सन १९७४). थोडक्यात, २१ व्या शतकातील शिक्षकाला, अध्ययन - अध्यापनाच्या संदर्भातील अध्ययन - अध्यापनच्या बदलत्या स्वरुपामुळे तीव्र बनलेली गुंतागुंतीची समस्या हाताळायला शिकायला पाहिजे.

येथे चर्चिल्या गेलेल्या मुद्याच्या संदर्भात, ज्या प्रश्नाचे स्पष्टपणे उत्तर मिळाले पाहिजे, तो म्हणजे, "२१ व्या शतकातील शिक्षकाला भेडसावणाऱ्या अध्ययनाच्या अध्यापनाच्या समस्या - ज्या आतापर्यंत जाणवत आहेत व ज्या पुढे उद्‌भवू शकतात अशा - त्यांना सामोरे जाण्यासाठी अध्यापक शिक्षण - प्रशिक्षण कार्यक्रम, शिक्षकांना कशा प्रकारे तयार करु शकेल ?"

ऑबर्ग २००१, हर्बट २००१, ग्लिकमन २००१, बिनर २००१, मॅक कॉल २००१ ह्यांचा सात महत्त्वाच्या अध्यापक शिक्षण-प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अभ्यासाच्या निर्ष्कषावरुन असे दिसते, की वर वर त्यात फरक/भेद दिसत असला, तरीही त्यात सात गोष्टी सारख्या आहेत. त्या म्हणजे;

- चांगल्या अध्यापनासाठी अभ्यासक्रम व प्रात्यक्षिक अनुभव ह्यातून सुसंगत अध्ययन-अनुभूतींचा संच तयार करण्याचा सारखा, स्पष्ट दृष्टिकोन.
- व्यावसायिक कौशल्ये व कृती ठरविण्याचे व त्यांचे मूल्यमापन करण्याचा, सुस्पष्ट, दर्जा
- प्रात्यक्षिक, बालक व पौगंडाव्यवस्थेतील (विद्यार्थ्यांचा) विकास आणि अध्ययन, सामाजिक व सास्कृंतिक संदर्भ, अभ्यासक्रमाची रचना त्यातील सुधारणा, व नवीन पध्दती, मूल्याकंन, मूल्यमापन, विषयाचा आशय, अध्यापन शास्त्रीय ज्ञान व कौशल्ये ह्यांना सामावणारा, अभ्यासक्रमाचा मजबूत गाभा.
- विस्तृत चिकित्सक अनुभव, कमीत कमी २४ ते ३६ आठवड्यांचा पर्यवेक्षित प्रात्यक्षिक अनुभव आणि विद्यार्थी अध्यापनाच्या संधी, ह्या प्रत्येक कार्यक्रमामध्ये काळजीपूर्वक निवडल्या गेल्या आहेत. जेणेकरुन एकाचवेळी त्या सुनिरीक्षित व परस्पर संबंधित अभ्यासाकार्यातील संकल्पनांना पोषक ठरतील.

- विविध सबळ पध्दती, अध्यापक संशोधन, कृतींचे मूल्यांकन, प्रत्यक्ष कृती करताना येणाऱ्या अडचणी / जबाबदाऱ्या हाताळण्याचे मूल्यमापन, यांचा विस्तृत प्रमाणात वापर.

- विद्यार्थींना त्यांच्या मनात रुजलेल्या समजूती आणि अध्ययन व विद्यार्थी ह्याबद्दलच्या गृहित गोष्टी, तसेच आपल्यापेक्षा, इतरांना असणारे वेगळे अनुभव जाणण्याच्या स्पष्ट पध्दती.

- अध्यापनात, शालेय जीवनात आणि अध्यापक शिक्षण-प्रशिक्षणात सुधारणा घडवून आणण्यासाठी एकत्रितपणे काम करणाऱ्या विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षकांचे पक्के संबंध, सामाजिक ज्ञान व समान भरवसा. (गर्लिंग-हॅमॉंड छापखान्यात)

२१ व्या शतकातील अध्यापक शिक्षण-प्रशिक्षणाची प्रतिमाने:

(अध्यापक शिक्षणातील) नवीन दिशांना अध्यापक शिक्षणाच्या प्रतिमानांना व्यवस्थित आधारभूत मानावे लागेल. आताच्या प्रतिमानात सुधारणा व बदल ह्यांची गरज आहे, तर ज्यामुळे अध्यापकांना बदलत्या परिस्थितीशी व्यवस्थितपणे जुळवून घ्यायला मदत होईल, अशी प्रतिमाने विकसित करण्याची गरज आहे (ॲव्हलॉस १९९१, मोनॅथोको १९९५, पॉपकेविट्स १९८७, गिन्स्बर्ग १९८८, नॅगेल १९९२, अल्-सलामी १९९४, शेफर १९९०) नवीन प्रतिमानांमध्ये कृतीयुक्त अध्ययनावर व मनन-चितंनातून अध्ययनावर भर द्यायला हवा की जेणेकरुन शिक्षित अधमां ऐवजी सुशिक्षित विचारवंत तयार होतील.

१. सहभागी अध्यापक शिक्षणाची नितांत गरज आहे. ह्या प्रतिमानानुसार प्रशिक्षणार्थी शिक्षकांनी प्रशिक्षणाच्या प्रकियेत सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. कोणत्या गरजांच्या प्रशिक्षणामध्ये विचार केला गेला पाहिजे, दैनंदिन कामाच्या संदर्भातील कोणत्या अडचणी सोडविल्या गेल्या पहिजेत आणि कोणते विशिष्ट ज्ञान व कौशल्ये प्रशिक्षणातून विकसित केली गेली पाहिजेत, ह्या संदर्भातले निर्णय घेण्यात त्यांनी सहभाग घेतला पाहिजे. सहभागात्मक नमुन्यामध्ये शिक्षक हे स्वदिग्दर्शित व स्वयंअध्ययित असायला पाहिजे. प्रशिक्षणाचा प्रत्येक भाग हा योग्य परिवर्तित व अंतर्मुश्वित विचारांवर आधारित असावा. विविध गरजा, अडचणी, दर्जा आणि भूमिका ह्या त्यांनी स्पष्टपणे आखलेल्या, तपासून पाहिलेल्या व विश्लेषण केलेल्या असाव्यात. विद्यार्थ्याबरोबर काम करणाच्या प्रत्यक्ष अनुभवावर भर द्यायला हवा. शिक्षकांनी एकत्रितपणे योग्य रितीने परिक्षण करुन व त्यांच्या परिणामांच्या विचार करणे गरजेचे आहे. अशा समस्या निराकरणासाठी त्यांना त्यांच्या प्रशिक्षण देणाऱ्यांनी मदत केली पाहिजे.

अशा नवीन परिस्थितीत ज्याला "चांगला अध्यापन नमुना" म्हणता येईल, त्याची गरज आहे. शिक्षकांना खालील गोष्टी करता यायला पाहिजेत:

- स्वत:चे अनुभव लिहून, प्रसारित करणे व संशोधन करणे.
- अभ्यासक्रमात सुधारणा घडविण्यासाठी, नवीन गोष्टी सुचविण्यासाठी मध्यवर्ती आणि महत्वाची भूमिका बजाविणे.
- अध्ययनार्थींना एकमेंकाशी सहकार्य करुन काम करण्यासाठी, एकमेंकाचा कामात मदत करण्यासाठी आणि एकमेंकाचे मूल्यमापन करण्यासाठी प्रोत्साहित करणे.

- स्वतःचे काम ऑन-लाइन जाहीर करण्यास अध्ययनार्थींना मदत करणे.
- अध्ययनार्थींना त्यांच्या सोयीप्रमाणे उपयोगात आणण्यासाठी शैक्षणिक अनुभूतींचा साठा लिहून तयार करणे.
- विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी-निवडीनुसार आणि त्यांच्या क्षमतेनुसार विविध शैक्षणिक कृती पुरविणे.
- इतर अध्यापकांना देण्यासाठी, स्वतःची चांगल्या पाठ टाचणे एकत्रित करणे.
- ज्ञानाच्या सक्रिय निर्मितीसाठी व आदान-प्रदानासाठी उत्साहवर्धक अध्ययन वातावरणाची निर्मिती करणे.

२. नवीन अध्यापक शिक्षण-प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये विद्यार्थी व शिक्षक ह्यांच्यासाठी तंत्रज्ञानाच्या ताकदीचे महत्व ओळखले गेले पाहिजे. तंत्रज्ञानाची खरी ताकद / महत्व तेव्हांच उपयोगी पडेल, जेव्हा शिक्षक हे त्यात चांगले प्रशिक्षित असतील व तंत्रज्ञानाचे त्यांनी पूर्णपणे आत्मसात केलेल असेल. विद्यार्थ्यांकडून अपेक्षित आहे, अशा प्रकारचे वर्तन शिक्षक त्यांच्यापुढे ठेवू शकतील जेणेकरुन, विद्यार्थी हे शिक्षित अधम न होता सृजनशील व उत्पादनक्षम असे व्यक्ती बनतील (बर्क २०००, होन्स् ग्रुप १९८६).

३. शिक्षकांना संशोधनाचे सखोल व प्रत्यक्ष ज्ञान असण्याची आवश्यकता. अध्यापक शिक्षणात व २१ व्या शतकाच्या तयारीत, संशोधनाला अग्रक्रम द्यायला हवा. व्यावसायिक शिक्षक, सहजगत्या त्यांच्या प्रश्नांना उत्तरे व अडचणींवर उपया शोधतात, ज्यामुळे ते त्यांच्या विद्यार्थ्यांना अध्ययनात मदत करु शकतात. ते दर तासाला आशय, साहित्य, योग्य आणि संबंधित तांत्रिक-बाबी, अभ्यासक्रमाचे शास्त्रीय विश्लेषण, मुल्यांकन आणि मूल्यमापन ह्या संदर्भात हजारो निर्णय घेत असतात. ते स्वतःच्या विद्यार्थ्यांच्या गरजाबाबत दक्ष व जागरुक असतात. पण तरीसुध्दा ते निश्चित काय करणार, ते गुपितच रहाते त्यांच्या यशाची किल्ली कोणती हे गूढ आहे. शिक्षकांचे अध्ययन अध्यापन व त्यांचे विद्यार्थ्यांकडे बघण्याचे दृष्टिकोन व वर्गात वेगवेगळी (ज्ञानाची) गुपिते उलगडण्याच्या पध्दती विविध असतात. अशी गुपिते उलगडण्याची एक महत्त्वाची किल्ली म्हणजे संशोधन.

सकंल्पना संशोधन आणि त्याचे अध्यापक शिक्षण-प्रशिक्षणासाठी महत्त्वः

सकंल्पना संशोधन म्हणजे काय ते समजावून घेऊन, त्याचे उपयोजन अध्ययन-अध्यापनाच्या वातावरणात मुख्यत्वेकरुन २१ व्या शतकाच्या शालेय वातावरणाच्या संदर्भात कसे करावे, हे ठरविण्याची गरज आहे. ह्यामुळे व्यावसायिक शिक्षकाला, हे संशोधन हा (शिक्षकी) व्यवसायाचा महत्त्वाचा भाग आहे, हे कळेल. त्यासाठी संशोधनाला अर्थ, इथे खालीलप्रमाणे घेतला जाईलः

"..... स्पष्टीकरण किंवा उत्तर शोधणे किंवा आकलन करणे व परस्पर संबंध शोधण्याच्या उद्दिष्टाने केलेल्या पध्दतशीर अभ्यास, जेणेकरुन, परिस्थिती बिघडू नये किंवा सुधारावी म्हणुन कृती करता येईल" (बोआ डयुओ, २००१-४)

अध्ययन-अध्यायनाच्या वातावरणात, विविध प्रकारच्या आणि तीव्रतेच्या समस्या भरपूर प्रमाणात असतात आणि त्या २१ व्या शतकातील शाळांमध्ये चौपटींनी वाढतील. अशा प्रकारच्या

समस्या जेव्हा येतील आणि त्याने विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या प्रगतीला धोका निर्माण होईल, तेव्हा त्या समस्या दूर करण्यासाठी आणि परिस्थिती सुधारण्यासाठी चिकित्सक अभ्यास करावा लागेल.

२१ व्या शतकातील शिक्षकांना संशोधन पध्दतीमध्ये भक्कम (ज्ञानाचा) पाया देण्याची गरज: २१ व्या शतकातील शिक्षकांनी जर स्वतःला संशोधक समजून, आणि विविध पध्दती सुधारण्यासाठी संशोधनाचा वापर करायचा असेल, तर अध्यापक शिक्षण-प्रशिक्षण संस्थांनी, खालील अटींचा पूर्णपणे परिपूर्ती केली पाहिजे (बोडाडयुओ व बॅबीत्सेंग २००६).

- सर्व पातळीवरच्या शिक्षकांना - पूर्व - प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षण - त्यांच्या प्रशिक्षणांचा भाग म्हणून, मूद्देसूद असा संशोधन पध्दतीवरील सखोल अभ्यासक्रम असावा, की जो फक्त पदवी किंवा पदविका प्रमाणपत्र मिळविण्यासाठी आवश्यक अट म्हणून नसावा, तर शिक्षक दैनंदिन व्यवहारात ज्या पध्दती वापरतात, संकल्पना वापरतात त्यावर भर देतील व लक्ष केंद्रित करतील.

- शिक्षकांना, त्यांच्या विद्यार्थ्यांच्या गरजा व त्यांच्या शैक्षणिक संस्थेतील परिस्थिती ह्या संबंधातील ज्ञान, कौशल्ये व अनुभव असतात. म्हणुनच संशोधनाबद्दलचा आशय, प्रत्यक्ष ज्ञान व कौशल्ये विकसित केल्यावर, शिक्षकांनी अध्ययन-अध्यापनाच्या संदर्भातील संशोधन सुरु केले पाहिजे, कारण त्याचा त्यांच्या व्यवसायाशी महत्त्वाचा संबंध असतो.

- त्यांच्या परिस्थितीवर व व्यावसायिक म्हणून त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील प्रगतीवर त्यांच्या कार्यक्षेत्रातील संशोधनाचा काय परिणाम हाईल हे ठरविणे आणि राबविणे, ह्या बाबतचा निर्णय सर्वस्वी त्यांचा राहील.

- अध्यापनाच्या संदर्भातील शैक्षणिक संशोधने मग ती वर्गातील असोत, की शाळेच्या एकंदर वातावरण्याच्या संदर्भात असोत (भौतिक सुधारणा, संस्थानिहाय सामग्री व पध्दती, दृष्टिकोन व पध्दती) हे शिक्षकांच्या समंतीनेच परिणामकारक बनू शकतात. (युनेस्को १९७९) त्यांना जर संस्थेने सखोल प्रशिक्षण दिले, तरच हे यशस्वी रित्या साध्य करता येते.

३. वैश्विक अध्यापक संघटनेतून शिक्षकी व्यवसायाचे वैश्विकीकरण:

प्रशिक्षित अध्यापकांना अध्यापन सुरु करण्यापूर्वी त्यांची नोंदणी करण्याच्या विशिष्ट उद्देशाने, सध्या प्रत्येक देशात त्यांची स्वतःची अध्यापन संघटना आहे. प्रशिक्षित शिक्षकांनी अध्यापन सुरु करण्यापूर्वी नोंदणी करुन प्रमाणित होण्यासाठी प्रत्येक देशाच्या स्वतःच्या अशा काही अटी असतात. एकाच देशात सुध्दा, उदा. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, युनायटेड किंग्डम, शिक्षक म्हणून नोंदणी करुन घेण्यात विलंब लावला जातो. यु एस्. ए. च्या प्रत्येक राज्याची, व्यावसायिक दृष्ट्या प्रशिक्षित शिक्षकांची नोंदणी करण्याची व त्यांना प्रमाणित करण्याची अशी स्वतःची अध्यापन संघटना असते. ह्याचा चिकित्सकदृष्ट्या विचार केला तर असे जाणवते की, ह्या देशांमध्ये शिक्षकांचा तुटवडा असताना सुध्दा देशातल्या देशातही शिक्षकांच्या बदली विलंब लागला नाही, तरीही त्रासदायक होतात.

अध्यापनाला जगभर गमनशील व्यवसाय बनविण्यासाठी २१ व्या शताकात वैश्विक अध्यापन संघटनेची गरज आहे. ह्या संघटनेच्या अखत्यारित अध्यापक शिक्षण व प्रशिक्षणाच्या सर्व संस्थांनी एकत्रितपणे काम करुन अध्यापक शिक्षण प्रशिक्षणाचा समान पाया असणारा अभ्यासक्रम तयार करुन तसेच व्यावसायिक शिक्षकांना, जगभर प्रमाणित मानले जातील असे व्यावसायिक अध्यापन पश्वाने देण्याचे अधिकार असावेत. त्यामुळे शिक्षकांची एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात व एका देशातून दुसऱ्या देशातील गमनशीलता ही सोपी वा परिपूर्ती करणारी असेल.

१) अध्यापक प्रशिक्षण संस्थाकडून, प्रशिक्षणानंतर, शिक्षकांचा माग काढणारे व त्यांच्या व्यावसायिक प्रगतीच्या अभ्यासांची आवश्यकता.

२) वैश्विक शाळांच्या चालविण्यात पालक व समाजाच्या जास्त सहभागाची गरज.

तुमची प्रगती तपासून पहा.

१) भारतीय सदंर्भात अध्यापक शिक्षणातील बदल स्पष्ट करा.

२) वैश्विक दृष्टिकोनातून अध्यापक शिक्षणाच्या संदर्भातील बदल स्पष्ट करा.

१.६ सारांश

कोणत्याही देशाच्या शिक्षणाचा दर्जा, हा त्याच्या शिक्षकांवर अवलंबून असतो आणि देशाचा विकास हा शिक्षणाच्या दर्जाच्या पलिकडे होऊ शकत नाही. शिक्षकांच्या त्यांच्या प्रशिक्षणाच्या कालावधीत व त्यानंतरही, आशयाचे ज्ञान, कौशल्ये, आपले काम व्यावसायिकतेने पूर्ण करण्यासाठी आवश्यक अध्यापन पध्दती अशा प्रकारची सुयोग्य साधने दिली पाहिजेत. जर वैश्विकीकरणाची संकल्पना लक्षात घेतली तर अध्यापक आणि अध्यापन यांना, इतर व्यवसायांप्रमाणेच सखोल प्रशिक्षण, ज्ञान आणि क्षमतांची प्राप्ती आणि वैश्विक शिक्षक नोंदणी संघटनेची व्यावसायिक नोंदणी गरजेची आहे, जेणेकरुन देशांच्या सीमांच्या पलिकडे शिक्षकांची गमनशीलता सोपी होईल.

घटकाच्या अखेरचे सराव प्रश्न:

१. अध्यापक शिक्षण म्हणजे काय ? त्याचे स्वरुप व व्याप्ती स्पष्ट करा.

२. अध्यापक शिक्षण म्हणजे काय ? वैश्विक संदर्भात अध्यापक शिक्षणाचे बदलते स्वरुप स्पष्ट करा.

३. टिपा लिहा:

१) अध्यापक शिक्षणाचा त्रिकोनी पाया.

२) अध्यापक शिक्षणाचा दृष्टिकोन

❖❖❖❖

२अ

अ) स्वातंत्र्यपूर्व भारतातील अध्यापक शिक्षण

घटक रचना :

२.अ.० उद्दिष्टे
२.अ.१ प्रस्तावना
२.अ.२ स्वातंत्र्यपूर्व भारतातील अध्यापक शिक्षण
२.अ.२.१ उपनिषदीय काल
२.अ.२.२ बौद्ध काल
२.अ.२.३ मध्ययुगीन काल
२.अ.२.४ आधुनिक काल
२.अ.३ सारांश

२.अ.० उद्दिष्टे :

ह्या घटकाच्या अभ्यासानंतर विद्यार्थी खालील गोष्टी करु शकतील:

- स्वातंत्र्यपूर्व कालातील शिक्षण प्रणाली व अध्यापक सज्जतेविषयी ज्ञान मिळविणे.
- विविध समित्यांनी केलेल्या शिफारशींची समर्पकता स्पष्ट करणे.

२.अ.१ प्रस्तावना :

अध्यापन हा जगभरात सर्वात प्राचीन व सन्माननीय असा व्यवसाय आहे. अध्यापकांची भूमिका, कार्ये, क्षमता आणि अध्यापक सज्जता, ह्यात वेळोवेळी नाट्यमय बदल झालेले असले, तरीही अध्यापकांची गरज ही नेहमीच अबाधित राहिलेली आहे. बदलत्या कालानुसार, तसेच समाजाच्या बदलत्या गरजांनुसार अध्यापक सज्जतेच्या पध्दतीमध्ये बदलाची गरज भासली आहे. खालील पानांमध्ये अध्यापक शिक्षणाच्या विकासाची चर्चा केली आहे.

२.अ.२ स्वातंत्र्यपूर्व भारतातील अध्यापक शिक्षण

२.अ.२.१ उपनिषदीय काल :

वैदिक भारतात, (अध्यापकाला) गुरुला विशेष मान व दर्जा होता. त्याला समाजाने उच्च / मानाचे स्थान दिलेले होते आणि हे फक्त त्याच्या ज्ञानासाठी आणि विद्वत्तेसाठी नसून त्याच्या बोधात्मक, भावात्मक आणि क्रियात्मक अशा गुणांसाठी होते. गुरु किंवा शिक्षक हा

चांगल्या गुणांचे मूर्त स्वरुप, ज्ञानाचा झरा आणि अध्यात्माचे माहेरघर समजले जाई. शिक्षकाची निवड व सज्जता अतिशय काटेकोरपणे केली जाई.

ऋग्वेदानुसार, शिक्षकाची आधी निवड केली जाई व मग त्याला परिणामकारकरित्या शिक्षित-प्रशिक्षित केले जाई. शिक्षकाने मान्यता-प्राप्त अभ्यासक्रम पूर्ण करुन, ब्रम्हचर्येची सर्व कर्तव्ये पार पाडल्यावरच त्याला शिक्षक बनण्यास परवानगी दिली जाई. शिक्षकाने परिपूर्तीसाठी ज्ञान प्राप्त करण्याची गरज होती आणि त्यांना आदराचे आणि मानाचे स्थान होते. विद्वान असा अध्यापक वर्ग, पुढे (ब्राह्मण) जात बनल्यामुळे स्तरित झाला आणि काळाच्या ओघात त्याचे पूर्वीचे महत्त्व नष्ट झाले. पुढे ब्राह्मण जातीचे लोक अध्यापक बनले व हा त्यांचा वंशपरंपरागत व्यवसाय बनला.

मनुने असे नमुद केलेले आहे की अध्यापकाचा मुलगा, कधीकधी वडिलांना मदत म्हणून त्यांच्या जागी अध्यापनाचे काम करीत असे. अध्यापकाला कधी-कधी त्याचे वयाने मोठे असलेले व सक्षम (हुशार) विद्यार्थी त्याच्या कामात मदत करीत असत, जे विद्यार्थीप्रमुख (Monitor) असत. ही विद्यार्थी प्रमुख-प्रणाली, विद्यार्थ्यांना अध्यापकाच्या दर्जापर्यंत नेण्याची एक पद्धत होती. प्राचीन शैक्षणिक प्रणालीची ही एक देण आहे.

उपनिषदीय कालातील अध्ययन हे विद्यार्थ्यांला दिल्या गेलेल्या वैयक्तिक लक्षासाठी प्रसिद्ध आहे. शब्द 'उपनिषद' (जवळ बसणे), असे सूचित करतो की अध्यापक व अध्ययनार्थी ह्यांच्या अतिशय जवळचे असे नाते असायचे. एखाद्याला अध्ययनार्थी म्हणून स्विकारायचे की नाही, हे ठरविण्याचे स्वातंत्र्य गुरुला होते, पण एकदा अध्ययनार्थी / विद्यार्थी म्हणून स्विकारल्यावर, त्याचा विकास ही गुरुची नैतिक जबाबदारी होती. तसेच अध्ययनार्थीला / विद्यार्थ्याला ही त्याचा गुरु निवडण्याचे स्वातंत्र्य होते. ज्ञानाचे संक्रमण हे मुख्यत्वेकरुन तोंडी व्हायचे (कारण लिखाणाची कला ही नंतरच्या काळात विकसित झाली) आणि स्पष्टीकरण ही अध्ययनाच्या एक महत्त्वाच्या पद्धतींपैकी एक होती. अध्यापकांच्या पद्धती अध्ययनार्थी आत्मसात करत, स्विकारत आणि ती पिढ्यान् पिढ्या एका अध्यापकाकडून दुसऱ्या अध्यापकाकडे अशा प्रकारे दिल्या जात असत. पद्धतींचा स्वीकार करणे व त्यांची पुनरावृत्ती करणे, अशा प्रकारे पद्धती चालू राहिल्या. चांगल्या अध्यापकांनी त्यांच्या स्वतःच्या पद्धती तयार केल्या आणि दैनंदिन जीवनातील उदाहरणे देऊन, आशय विद्यार्थ्यांसाठी रुचिपूर्ण व अर्थपुर्ण बनविला. प्राचीन भारतात प्रचलित असलेल्या धार्मिक सत्याचा अर्थ जाणण्याच्या, बोललेले ऐकणे, त्याचा अर्थ समजावून घेणे, वादविवाद / चर्चा करुन त्याचे सामान्यीकरण करणे, मित्रांकडून किंवा अध्यापकांकडून त्याची पुष्टी करणे आणि त्याचे उपयोजन करणे ह्या पाच पायऱ्या होत्या.

तुमची प्रगती तपासा

१) उपनिषदीय कालातील अध्यापक सज्जतेची प्रमुख वैशिष्ट्ये कोणती ?

_____

_____

_____

२.अ.२.२ बौद्ध काल :

मठ पद्धती (Monastic system) हे बौद्ध पंथाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते आणि त्यानुसार प्रत्येक नवीन प्रवेश (अन्अनुभवी) घेणाऱ्याला गुरुच्या (उपज्ज्हाय) देखरेखीखाली व मार्गदर्शनाखाली रहावे लागत होते. अध्ययनार्थी उपज्ज्हाय काळजीपूर्वक निवडत असे व त्याला पराकाष्ठेचा आदर देत असे. उपज्ज्हायालासुद्धा त्याच्या बाजूने, नवीन आलेल्या अध्ययनार्थीची, सद्धिविहरिकांची पूर्ण जबाबदारी उचलावी लागत होती.

त्याला अध्ययनार्थींना आध्यात्मिक मदत देऊन धर्माच्या माध्यमातून, प्रश्न विचारुन, उपेदश करुन, माहिती देऊन अध्ययन करावे लागत असे. गुरुला, शिष्याची सर्वतोपरी काळजी घ्यावी लागत असे. तोंडी पाठांतराखेरीज अध्यापक (गुरु) स्पष्टीकरण, वादविवाद, चर्चा, प्रश्नोत्तरे आणि गोष्टी व उपदेशपर गोष्टींचाही उपयोग करत. विहार आणि मठ-शाळांमध्ये (Monastic schools) हेतूविद्या किंवा उद्गामी पद्धती (inductive method) च्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या विचार शक्तीला चालना दिली जात असे. तर्कशास्त्राच्या अभ्यासाने बुद्धिमत्ता तीव्र बनण्यास मदत होत असे, तसेच वक्तृत्वकला, जी फार महत्त्वाची समजली जात असे ती विकसित व्हायलाही मदत होत असे.

आपली प्रगती तपासा

१) बौद्ध कालात शिष्याच्या बुद्धिमत्ता विकासासाठी कोणत्या पद्धतींचा वापर केला जात असे ?

_____

_____

_____

_____

_____

_____

२.अ.२.३ मध्ययुगीन काल :

पवित्र कुराणामध्ये शिक्षण / अध्ययन हे कर्तव्य म्हणून सांगितलेले आहे आणि मुस्लिम देशांमध्ये शिक्षणाला महत्त्वाचे स्थान दिले गेले होते. शिक्षणाचा प्रसार लोकांत फारसा झाला नव्हता, तरीही शिक्षकांना / अध्यापकांना मानाचे स्थान होते. मुसलमान राजांनी, त्याच्या अधिपत्याखाली, भारतात शाळा (मक्टाब), महाविद्यालये (मद्रासा) आणि ग्रंथालये स्थापन केली. मक्टाब बहुधा मशिदीला जोडलेले असत आणि तेथे विद्यार्थ्यांना कुराणाचे धडे मिळत, जे त्यांना पाठांतर करुन म्हणावे लागत असत. त्याचबरोबर त्यांना वाचन, लेखन व सोपे अंकगणितही शिकविले जात असे. अध्यापनाचे माध्यम फारशी असले तरी अरबी भाषेचा अभ्यास हा बंधनकारक होता. मद्रासामधील अभ्यासक्रमात व्याकरण, वक्तृत्त्व, तर्कशास्त्र, इश्वराच्या शोधाचे शास्त्र (theology), सत्यविषयीचे ज्ञान (metaphysics), साहित्य, न्यायतत्त्व शास्त्र आणि विज्ञान.

मक्टाबमध्ये बहुधा मौलवी अध्यापनाचे कार्य करायचे पण मद्रासामध्ये विद्वान लोकांनाच नियुक्त केलेले असायचे. अध्यापक सज्जता ही मुख्यत्वेकरुन, अनुभवी शिक्षकांना वापरलेल्या पद्धतीनुसार करुन घेतली जाई. चांगले आणि अनुभवी शिक्षक, त्यांच्या पारखी नजरेने सक्षम विद्यार्थी निवडायचे आणि त्यांना स्वतःच्या अनुपस्थितीत, नवीन विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी नेमायचे. अशा प्रकारे वर्ग प्रमुखाची (Monitor) पद्धती मध्ययुगीन कालातही प्रचलित होती आणि अध्यापक सज्जतेसाठी वापरली जात होती. शिक्षकांचे स्थान वरच्या दर्जाचे होते आणि समाज व विद्यार्थी त्यांना मान देत.

घोकंपट्टी आणि पाठांतर त्यावेळी प्रचलित होते. अध्यापन पद्धती मुख्यत्वेकरुन, तोंडी होती. व्याख्यान पद्धतीचा वापर शिक्षक करीत. विद्यार्थ्यांना संदर्भग्रंथ वाचण्यास प्रोत्साहन दिले जाई. वैद्यकशास्त्रासारख्या विषयांत प्रात्यक्षिकेही घेतली जायची. धर्म, तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान आणि राजकारण ह्यासारख्या विषयांसाठी विश्लेषणात्मक आणि उद्‌गामी पद्धतीही वापरली जाई. अध्यापक प्रशिक्षणाचा खास असा कार्यक्रम नसला, तरीही अध्यापकाना त्यांची भूमिका, कार्ये आणि अध्यापनासाठी वापरावयाच्या पद्धती, ह्याची व्यवस्थित कल्पना होती.

आपली प्रगती तपासा

१) मध्ययुगीन कालात उच्च शिक्षणाची कोणती पद्धती प्रचलित होती ?

_____

_____

_____

_____

_____

_____

२.अ.२.४ आधुनिक काल :

ब्रिटिशांच्या भारतात येण्यापूर्वी, युरोपियन मिशनरींनी आधी अभ्यासकांसाठी संस्था आणि मग अध्यापक प्रशिक्षण संस्था सुरु केल्या. डॅनिश मिशनरींनी, श्रीरामपूर-कलकत्ता येथे अध्यापकांना प्रशिक्षण देण्यासाठी एक शाळा काढली. मद्रास येथे डॉ. ॲन्ड बेल ह्यांनी प्रायोगिक पद्धतीवर वर्गप्रमुख पद्धती सुरु केली, जी पुढे काही काळापुरती, अध्यापक प्रशिक्षणाचा पाया बनली. ही पद्धती इंग्लंडमध्ये वापरली जात होती आणि बेल-लँकॅस्टर पद्धती म्हणून ओळखली जात होती. श्री. कॅम्पबेल, बेल्लरीचे जिल्हाधिकारी, ह्यांनी त्यांच्या १७ ऑगस्ट १८२३ च्या अहवालात ह्या पद्धतीची, जेथे प्रगत अभ्यासक कमी प्रगत अभ्यासकांचे अध्यापन करीत अशी टिप्पणी केली आहे आणि ही पद्धती इंग्लंडमध्ये चांगल्या प्रकारे स्विकारली गेली होती.

सर मुनरोने, त्याच्या १३ डिसेंबर १८२३ च्या अहवालात अध्यापक शिक्षणाच्या सुधारणेसाठी काही विचार मांडलेले आहेत. त्याने त्यांच्या (शिक्षकांच्यां) भत्त्यात वाढ व हिंदू आणि मुसलमान शिक्षकांसाठी वेगवेगळ्या प्रकारचे अभ्यासक्रम सुचविले आहेत.

जून १८५६ साली, ब्रिटिश सरकारच्या व्यवस्थापनाखाली आणि आर्थिक सहाय्याने, मद्रास येथे पहिली अध्यापक प्रशिक्षणाची शाळा सुरु झाली. सुरुवातीला तेथे जिल्हा परिषदेच्या शाळांसाठी अध्यापक तयार केले गेले. नंतर ह्या अध्यापक प्रशिक्षण शाळाचा प्रेसिडंसी महाविद्यालयात विकास झाला. १८४७ साली, मुंबईच्या एलफिंस्टन संस्थेत व १८४९ साली कलकत्ता येथे अध्यापक प्रशिक्षणाच्या शाळा सुरु झाल्या.

वुड्सचे (सरकारी) माहितीपत्र (Wood's Despetch) १८५४ :

१९ जुलै १८५४ रोजी वुड्सचे (सरकारी) माहितीपत्र प्रसिद्ध झाले, ज्यात महत्त्वाची शैक्षणिक माहिती होती. भारतातील इंग्लिश शिक्षणाचा सर्वात महत्त्वाचा दस्तऐवजी समजला गेला. त्यात अध्यापक शिक्षणासाठी काही फार महत्त्वाचे प्रस्ताव दिले गेले. त्यात असे सुचविले गेले की, ज्यांना अध्यापनाचा कल आहे आणि जे शाळा-शिक्षकाचा व्यवसाय करण्यास तयार आहेत, त्यांना भत्ते दिले जावेत.

अध्यापक शिक्षणात बदल सुचविताना माहितीपत्राने इंग्लंडमधील प्रचलित प्रणालीचा संदर्भ दिला. त्यात असे उदयुक्त करण्यात आले की, भारतातील इलाख्यात प्रशिक्षण शाळा स्थापण्यात याव्यात. माहिती पत्रात असे सुचविले गेले की (इंग्लंडमध्ये प्रचलित आहे, त्याप्रमाणे) विद्यार्थी-शिक्षकाची पद्धती भारतात सुरु करावी आणि त्यांना बक्षीस / छात्रवृत्ती, तसेच जे ज्या शाळेशी संलग्न आहेत, अशा शाळा - शिक्षकांना थोडी रक्कम देण्यात यावी. प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्यावर त्यांना प्रशस्तीपत्रक व नोकरी दिली जावी. अशा प्रकारे, ह्या माहितीपत्राद्वारे भावी शिक्षकांसाठी पुरेश्या प्रेरक गोष्टी पुरविल्या गेल्या. वुड्सच्या माहितीपत्राबद्दल साशंक असूनही, गर्व्हनर जनरल, लॉर्ड डलहौसीने ते अंमलात आणण्याचा सल्ला दिला, जेणेकरुन बऱ्याच अध्यापक प्रशिक्षणाच्या शाळा अस्तित्त्वात आल्या.

लॉर्ड स्टॅनलींचे माहितीपत्र, १८५९ :

१८५९ मध्ये, लॉर्ड स्टॅनली, भारताचे राज्य सचिव (Secretary of state for India) ह्यांनी १८५४ च्या माहितीपत्राच्या परिणाम क्षमतेची तपासणी सुरु केली. त्यांनी जोरदारपणे असे प्रतिपादले की प्रशासनाने इंग्लंडहून शिक्षक आणणे थांबवावे आणि प्रादेशिक (भाषेतील) शाळांसाठी येथील स्थानिक शिक्षकच उपलब्ध करावेत.

भारतीय शिक्षण आयोग १८८२ :

भारतीय शिक्षण आयोग १८८२ (हंटर आयोग) ह्याने अशी शिफारस केली की अध्यापनाची मूलभूत तत्त्वे व प्रात्यक्षिके ह्यांच्यासाठी परीक्षा सुरु करावी व कोणत्याही शासकीय किंवा अनुदानित शाळेत कायम स्वरुपी शिक्षक होण्यासाठी ही परीक्षा पास होणे, हे बंधनकारक असावे. त्यांनी पदविधारकांसाठी, इतरांपेक्षा कमी कालावधीचा अभ्यासक्रम सुचविला.

अध्यापनशास्त्रीय अभ्यासक्रम जास्त महत्त्वाचा बनला. ह्यामुळे आणखीन अध्यापक प्रशिक्षण संस्था उघडल्या गेल्या आणि १८८२ पर्यंत पुरुषांसाठी ११६ व स्त्रियांसाठी १५ संस्था अस्तित्त्वात आल्या.

अशा प्रकारे १९ व्या शतकाच्या अखेरपर्यंत अध्यापक प्रशिक्षणात काही महत्त्वाच्या गोष्टी ह्या सिद्ध झाल्या होत्या. सामान्य शिक्षणा (आशया) च्या ऐवजी अध्यापनशास्त्रीय अभ्यासक्रम समाविष्ट केला गेला होता, अध्यापक प्रशिक्षणासाठी परीक्षा व प्रमाणपत्रे सुरु केली गेली होती आणि नियोजन व अध्यापनात प्रात्यक्षिकांवर भर दिला गेला होता.

भारत सरकारचा शैक्षणिक धोरणाचा ठराव, १९०४ :

हा शैक्षणिक दस्तऐवजांपैकी एक महत्त्वाचा दस्तऐवजी आहे की ज्याच्या आधारावर पुढील (भविष्यातील) शैक्षणिक प्रणालीची धोरणे ठरविली गेली. ह्यात, अध्यापक प्रशिक्षण कार्यक्रमाच्या सुधारणेसाठी काही फार महत्त्वाच्या सूचना केल्या गेल्या. त्या म्हणजे :

अ) प्रशिक्षण महाविद्यालये :

ह्या धोरणाने असे स्पष्ट केले की जर माध्यमिक शिक्षण सुधारायचे असेल तर शिक्षकांना अध्यापन कलेचे प्रशिक्षण द्यायला हवे. एकंदरीत पाच ठिकाणी - मद्रास, कुर्सेगांव, अलाहाबाद, लाहोर आणि जबलपूर अशा पाच ठिकाणी अध्यापक प्रशिक्षण महाविद्यालये होती. इंटरमिडिएटस् (+२ पातळी) किंवा पदवीधारक ह्या महाविद्यालयात प्रवेश घेऊ शकत होते.

प्रशिक्षण संस्थांचा विकास ह्या सामान्य तत्त्वांवर आधारित होता,

१) सक्षम व अनुभवी व्यक्तींची उच्च प्रशिक्षणाच्या कार्यात भरती करणे.

२) प्रशिक्षण महाविद्यालये सुसज्ज करणे.

३) प्रशिक्षण कार्यक्रमाचा कालावधी दोन वर्षांचा व पदवीधारकांसाठी एक वर्षांचा करणे. अभ्यासक्रमात अध्यापन कलेच्या मूलभूत तत्त्वांचे ज्ञान व प्रात्यक्षिक कलेसाठी काही प्रमाणात तांत्रिक ज्ञान समाविष्ट करणे.

४) अभ्यासक्रमाचे फलित स्वरुप म्हणून विद्यापीठाची पदवी किंवा पदविका देण्यात यावी.

५) तात्त्विक ज्ञान व प्रात्यक्षिक यांची एकमेंकाशी सुसंगती असावी व प्रत्येक महाविद्यालयाला संलग्न एक (सरावपाठासाठी) शाळा असावी. अशा शाळा ह्या सुसज्ज असाव्यात व तेथे चांगले प्रशिक्षित अध्यापक असावेत, की ज्यांचे उदाहरण विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरावे. तेथे चांगले ग्रंथालय व वस्तुसंग्रहालय असावे. प्रशिक्षण महाविद्यालयात व शाळेत निकटचे संबंध असावेत, की जेणेकरुन विद्यार्थी, महाविद्यालयात शिकलेल्या पध्दती राबवू शकतील. विद्यार्थी, निरिक्षक अधिकारी व प्रशिक्षण महाविद्यालयाचे अधिकारी ह्यांनी मधून मधून एकत्र येऊन प्रशिक्षण महाविद्यालयाचा परिणाम शाळेवर होईल हे पहावे.

ब) प्रशिक्षण शाळा:

धोरणात, अधिक प्रशिक्षण शाळा सुरु करण्याबद्दल, खास करुन बंगालमध्ये, शिफारस केलेली होती. अध्यापक प्रशिक्षण शाळा ह्या खासकरुन निवासीशाळा (boarding school) होत्या व तेथे प्रादेशिक भाषांमध्ये शिक्षण घेतलेले विद्यार्थी प्रशिक्षणासाठी येत व त्यांना छात्रवृत्ती दिली जाई. त्यांना इतर शिक्षणाबरोबर अध्यापन पध्दतीचे ज्ञान व अध्यापनाचा सराव दिला जाई. सरकारी धोरणाने अभ्यासक्रमासाठी कमीत कमी दोन वर्षाचा कालावधी असावा, असे सुचविले. त्यात प्रशिक्षणाचे खास करुन ग्रामीण शिक्षकांना उपयुक्त पडतील, असे अभ्यासक्रम सुचविले.

ह्यावरुन हे लक्षात येईल की ह्या धोरणात दिल्या गेलेल्या शिफारसी व प्रस्ताव ह्यांचे महत्त्व हे दूरगामी होते. काही प्रस्ताव राबविले गेले नाहीत आणि बरेचसे प्रस्ताव राबविले गेले, शिक्षक प्रशिक्षणाच्या क्षेत्रात बदलही घडून आले. विद्यापीठाने बी.टी. ही पदवी, पदवीधर शिक्षकांसाठी सुरु केली. अभ्यासक्रमाचा पुर्नविचार, सोयींमध्ये सुधारणा इ. ह्या धोरणाची फलिते होती.

भारत सरकारचा शैक्षणिक धोरणाचा ठराव, १९१३:

शैक्षणिक धोरणाच्या दुसऱ्या ठरावाने प्रणालीतील दोष दर्शविले आणि प्राथमिक शिक्षणाच्या सुधारणेसाठी बरेच उपयुक्त उपाय सुचविले. ठरावात असे सुचविले की ज्या स्तराच्या विद्यार्थ्यांना शिकवायचे त्या स्तरातूनच निवडलेला असावा आणि तो प्रादेशिक मध्यमिक परिक्षा पास व एका वर्षाचे प्रशिक्षण घेतलेला असावा. त्याच्यात असे सुचविले की, शिक्षकांसाठीच्या अभ्यासक्रमांची नियमित पुनरावृत्ती व सुधारणा व्हावी. ठरावात असे ठासून सांगितले गेले की कोणत्याही शिक्षकाला प्रमाणपत्राशिवाय शिकवायला दिले जाऊ नये आणि प्रशिक्षण महाविद्यालयातील शिक्षकांमध्ये विचारांचे नियमित आदान प्रदान व्हायला हवे, तसेच त्यांनी विविध महाविद्यालयांना भेटी द्याव्यात.

कलकत्ता विद्यापीठ आयोग, १९१७:

हा आयोग, जो सॅडलर आयोग म्हणून प्रसिध्द आहे, त्याने विद्यापीठीय शिक्षणाच्या विविध पैलूंचा अभ्यास केला आणि आपला विस्तृत अहवाल १९१९ मध्ये सादर केला. त्यात अध्यापक शिक्षणावरही विचार केला गेला आणि काही महत्त्वपूर्ण शिफारसी केल्या गेल्या. त्याने प्रशिक्षण संस्थांचा अपुरेपणा आणि त्यातून कमी प्रतीचे दिलेले प्रशिक्षण दाखवून दिले. त्याने सुचविले की प्रशिक्षण कार्यक्रमातून प्रशिक्षणार्थीना फक्त सक्षम वर्ग-शिक्षक न बनविता, चांगले प्रशासकही बनविले पाहिजे. आयोगाने, असे सुचविले की विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षणशास्त्र विभाग सुरु केल्यामुळे प्रत्येक विभाग प्राध्यापक, प्रपाठक आणि क्रित्येक मदतनीस ह्यांनी सुसज्ज होऊन, शिक्षणक्षेत्रातील पदव्युत्तर पदवी सुरु होईल. त्याने अशी शिफारस केली की शिक्षणशास्त्र हा पदवी व पदव्युत्तर पातळीवर ऐच्छिक विषय म्हणून सुरु करावा.

सॅडलर आयोगाच्या शिफारसीचा भारतातील शिक्षक-प्रशिक्षण कार्यक्रमावर हितकारक असा परिणाम झाला. म्हैसूर विद्यापीठाने १९२५ साली शिक्षणशास्त्र विभाग सुरु केला.

हरटॉग समिती, १९२९:

सॅडलर आयोगाने सुरु केलेले कार्य, हरटॉग समितीने पुढे नेले. ही समिती मुख्यत्वे करुन प्राथमिक शिक्षणासाठी असली, तरी तिने शिक्षण-प्रशिक्षणासाठी दूरगामी अशा शिफारसी केल्या. आयोगाने हे योग्यरित्या दर्शविले की शिक्षणाचे यश (दर्जा) हा शिक्षकांना मिळणारे प्रशिक्षण, त्यांचे समाजातील स्थान व दर्जा, ह्यावर अवलंबून असते. असे सुचविले गेले की ग्रामीण जीवनाशी संबंधित असलेल्या व्यक्तींचीच ग्रामीण शिक्षक म्हणून निवडावे. त्यात असेही म्हटले आहे की प्रशिक्षणाचा कालावधी खूपच कमी, अभ्यासक्रम त्रोटक आणि शिक्षक वर्ग हा अपुरी पात्रता असणारा आहे.

समितीने असे सुचविले की, प्रादेशिक भाषेतील नियतकालिके, उजळणी - अभ्यासवर्ग (Refresher course) विचार विनिमय सभा (conferences), शिक्षक मंडळाच्या सभा, ह्यामुळे शिक्षकांची आयुष्ये सुधारुन त्यांचे काम ही सुधारु शकेल. माध्यमिक शाळेच्या शिक्षकांसाठीसुध्दा, समितीने हेच सुचविले.

सॅडलर आयोगाच्या शिफारशीनुसार, १८ पैकी १३ विद्यापीठांनी शिक्षणशास्त्र विभाग सुरु केला. नवी दिल्ली येथे लेडी आयरविन महाविद्यालयाची स्थापना झाली. आंध्र विद्यापीठाने बी.एड. ची नवी पदवी १९३२ मध्ये सुरु केली. मुंबईमध्ये एम. एड. ची पदव्युत्तर पदवी १९३६ साली सुरु केली.

१९३० च्या दशकात, शिक्षणक्षेत्रात आणखीनही काही महत्त्वाचे बदल झाले. केंद्रीय शैक्षणिक सल्लागार मंडळाची पुन्हा सुरवात केली गेली. महात्मा गांधी यांनी १९३७ मध्ये सुरु केलेल्या मूलभूत शिक्षणामुळे (Basic Education), शिक्षकांना मूलभूत शिक्षणाचे प्रशिक्षण देण्यास सुरुवात झाली. १९३८ मध्ये, अलाहाबाद येथे मूलभूत प्रशिक्षण महाविद्यालय आणि वर्धा येथे विद्यामंदीर प्रशिक्षण शाळा ह्यांची स्थापना झाली.

ॲबट-वुड अहवाल :

१९३७ मध्ये मांडला गेलेला हा अहवाल, शिक्षणक्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण घटना आहे. त्यात मुख्यत्त्वेकरुन व्यावसायिक शिक्षणाच्या स्थितीचे विश्लेषण केले गेले असेल तरी त्यात अध्यापक शिक्षणासंबंधीच्या महत्त्वाच्या सूचना केल्या गेल्या आहेत. त्यानुसार प्रशिक्षणाचा कालावधी हा तीन वर्षाचा असावा, जेणेकरुन विद्यार्थी त्यांच्या सामान्य शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षणही घेऊ शकतील. तसेच जास्त अनुभवासाठी शिक्षकांसाठी उजळणी - अभ्यास वर्गाचा प्रस्तावही मांडला गेला आहे.

१९३७ मध्ये असलेली ५६.८% प्रशिक्षित अध्यापकांची संख्या ही वाढून १९४२ मध्ये ६१.३% झाली. तरी सुध्दा दर्जा सुधारण्याच्या दृष्टिने बरेच काही करण्याची आवश्यकता होती. १९४१ साठी ६१२ अध्यापक शिक्षणाच्या शाळा होत्या, त्यापैकी ३७६ पुरुषांसाठी तर २३६ स्त्रियांसाठी होत्या. ह्या शाळांमधून १ किंवा २ वर्षाचे प्रशिक्षण दिले जाई. त्यावेळी अस्तित्वात असलेली पदवीधरांसाठीची २५ प्रशिक्षण महाविद्यालये काळाची गरज भागविण्यास अपुरी होती. १९४१ साली राजस्थान येथे विद्या भवन अध्यापक महाविद्यालय व पुणे येथे टिळक

शिक्षणशास्त्र महाविद्यालय सुरु केले गेले. त्याच वर्षी मुंबई येथे विद्या-वाचस्पती (Doctorate Degree) ही पदवी सुरु करण्यात पुढाकार घेतला गेला.

सार्जंट अहवाल १९४४

१९४४ मध्ये केंद्रीय शैक्षणिक सल्लागार मंडळाने (CABE), "भारतातील युध्दोत्तर शैक्षणिक विकास" अशी शिक्षणाची योजना मांडली ही "सार्जंट योजना" म्हणून प्रसिध्द आहे. ही व्यापक व्याप्ती असलेली शैक्षणिक योजना आहे. त्यात शिक्षक-प्रशिक्षण कार्यक्रमात राबविता येतील, अशा काही सूचना केल्या गेल्या. ह्यात असे सुचविले की योग्य मुले व मुली, माध्यमिक शाळेनंतर, अध्यापन-व्यवसायासाठी घेतली जावीत, त्यांना उपयुक्त प्रशिक्षण दिले जावे, अभ्यास - उजळणी वर्गाचे नियोजन केले जावे व संशोधनाच्या सोयी पुरविल्या जाव्यात.

प्राथमिक शाळेसाठी व कनिष्ठ मूलभूत शिक्षणासाठी दोन वर्षांचा (माध्यमिक शाळेनंतर) आणि प्रगत मूलभूत शिक्षणासाठी तीन वर्षाचा अभ्यासक्रम सुचविला. माध्यमिक शाळेतील पदवी नसलेल्या शिक्षकांसाठी दोन वर्षांचे व पदवीधर शिक्षकांसाठी एक वर्षाचे प्रशिक्षण सुचविले. दोन वर्षाच्या प्रशिक्षणापैकी पहिल्या वर्षात सामान्य व व्यावसायिक विषयांचा अभ्यास करावा. तसेच, ह्याला पुरक म्हणून शाळेला भेटी, चर्चा आणि प्रशिक्षणार्थींना शिक्षणात रस वाढेल असे अनुभव द्यावेत. चांगल्या शिक्षकांना आकर्षित करण्यासाठी सुधारित वेतन-श्रेणी सुचविली गेली.

आपली प्रगती तपासा

१. वुडचे माहितीपत्र हे शिक्षणासाठी चे महत्त्वाचे कागदपत्र का मानले जाते ?

२. अध्यापक-शिक्षणाच्या संदर्भात, वुडच्या माहितीपत्रात कोणत्या शिफारशी केल्या गेल्या ?

३. "भारत सरकारचा शैक्षणिक धोरणाचा ठराव, १९०४ अजूनही लागू आहे" समर्थन करा.

४. सॅडलर आणि हरटॉग समितीच्या अहवालाचा काय परिणाम झाला ?

_____

_____

_____

_____

_____

२.अ.३ सारांश

ऋग्वेदानुसार, अध्यापकांना निवडून त्यांना परिणामकारक शिक्षण दिले जाई. उपनिषदीय कालात विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष दिले जाई. गुरुला विद्यार्थी निवडण्याची व विद्यार्थ्याना गुरु निवडण्याची मुभा होती. तोंडी स्पष्टीकरण ही शिक्षणाची महत्त्वाची पध्दती

होती. गुरुने वापरलेल्या पध्दती शिष्य निरिक्षण करुन आणि आत्मसात करुन शिक्षकांच्या पुढील पिढीकडे सुपुर्द करीत.

बौध्दकालाचे, मठपध्दती हे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते आणि प्रत्येक नवीन सध्दि विहारीकाला, दाखला झाल्यावर उपज्हायकाच्या देखरेखीखाली व मार्गदर्शनाखाली रहावे लागे. वर्गप्रमुखाची पध्दती मध्ययुगात अस्तित्वात होती आणि भावी शिक्षक घडविण्यासाठी अवलंबिली जायची. शिक्षकांचा दर्जा उच्च समजला जायचा व त्यांना समाजाकडून व त्यांच्या विद्यार्थ्याकास खूप मान मिळायचा.

आधूनिक काळावर, भारतात मुख्यत्वेकरुन ब्रिटिशांचा ठसा दिसतो. शिक्षकांच्या शिक्षण-प्रशिक्षणासाठी विविध समित्या नेमल्या गेल्या होत्या. त्यातील वुडचे माहितीपत्र, भारत सरकारचा शैक्षणिक धोरणाचा ठराव, १९०४ आणि सॅडलर व हरटॉग समिती ह्यांनी केलेल्या महत्त्वपूर्ण शिफारशी आजही लागू होतात.

स्वाध्याय:

१. वैदिक कालातील अध्यापक शिक्षणाच्या विकासाचा मागोवा घ्या.

२. मध्यमयुगातील अध्यापक शिक्षणाच्या विकासाचा मागोवा घ्या.

३. आधूनिक कालातील अध्यापक शिक्षणाच्या विकासाचा मागोवा घ्या.

४. स्वातंत्र्यपूर्व काळात अध्यापक शिक्षणाच्या संदर्भात केल्या गेलेल्या शिफारशींची समर्पकता स्पष्ट करा.

❖❖❖❖

२ब

ब)स्वातंत्र्योत्तर भारतातील अध्यापक शिक्षण

घटकांची संरचना:

२.ब.० उद्दिष्टे
२.ब.१ प्रस्तावना
२.ब.२ स्वातंत्र्योत्तर भारतातील अध्यापक शिक्षण
- २.ब.२.१ विद्यापीठ शिक्षण आयोग
- २.ब.२.२ १९५० च्या दशकातील नियोजन काल
- २.ब.२.३ माध्यमिक शिक्षण आयोग (Secondary Education)
- २.ब.२.४ १९६० च्या दशकातील नियोजन काल
- २.ब.२.५ कोठारी आयोग
- २.ब.२.६ १९७० च्या दशकातील नियोजन काल
- २.ब.२.७ १९८० च्या दशकातील नियोजन काल
- २.ब.२.८ शैक्षणिक धोरणापुढील आव्हाने

२.ब.३ सांराश

२.ब.० उद्दिष्टे :

हा घटक वाचल्यानंतर विद्यार्थ्याला

- स्वातंत्र्योत्तर कालातील शिक्षण प्रणाली व अध्यापक सज्जता, हयाचे ज्ञान प्राप्त होईल.
- नियोजन कालात केलेल्या शिफारशींच्या समर्पकतेचे आकलन होईल.

२.ब.१ प्रस्तावना:

स्वातंत्र्यानंतर घडत जाणाऱ्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीचा, राष्ट्रीय पातळीवर, अध्यापक शिक्षणावर परिणाम झाला. भारत सरकारने सामान्यपणे शैक्षणिक व खास करुन अध्यापक शिक्षणातील विशिष्ट बाबी हाताळण्यासाठी वेगवेगळ्या समित्या व आयोगांची स्थापना केली. पुष्कळसे अध्यापक हे प्रशिक्षेत नसल्याचे निदर्शनास आले आणि त्यांना प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न केला गेला. अध्यापक शिक्षणाच्या बाबतीतील मुख्य मुद्दा हा दोन्हीही, दर्जा व संख्या ह्यांच्या संदर्भात होता. १९४८ साली केंद्रीय शैक्षणिक संस्थेची (Central Institute of Education) स्थापना केली गेली व अलाहाबादच्या शासकीय प्रशिक्षण महाविद्यालयाचे केंद्रीय अध्यापन शास्त्रीय संस्थेत (Central Pedagogical Institute) विस्तार करण्यात आला.

२.ब.२ स्वातंत्र्योत्तर भारतातील अध्यापक शिक्षण:

२.ब.२.१ विद्यापीठ शिक्षण आयोग, १९४८:

स्वातंत्र्य मिळाल्यावर लगेचच, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन त्यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठ शिक्षण आयोग नियुक्त करण्यात आला. आयोगाने आपला अहवाल १९४९ मध्ये सादर केला. आयोगाने असे निर्देशनास आणून दिले की, विविध शिक्षक-प्रशिक्षण महाविद्यालयांमध्ये शिकविल्या जाणाऱ्या तात्विक विषयां (theory papers) मध्ये काही फरक नसला, तरी जी प्रात्यक्षिके केली जात होती, त्यात खूपच फरक होता. सराव पाठांची संख्या १० ते ६० इतकी बदलत होती तसेच सराव अध्ययन प्रकार आणि विद्यार्थी-अध्ययन एकमेकांपासून भिन्न होती.

आयोगाच्या असे निदर्शनास आले की प्रशिक्षण महाविद्यालयांना अत्यावश्यक गोष्टींचे मूलभूत असे ज्ञान नव्हते. शिक्षण-प्रशिक्षणाच्या सुधारणेसाठी आयोगाने असे सुचविले, की अध्यापक शिक्षकांनी (ह्या) पूर्ण अभ्यासक्रमाकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले, जेणेकरुन तात्विक ज्ञान (theory) आणि प्रात्यक्षिके ही एकमेंकाना पूरक होतील, अनुभवाचा हुषारीने वापर केला जावा, ज्यांना शाळेत शिकविण्याचा प्रत्यक्ष अनुभव आहे, अशांनाच प्रशिक्षणासाठी भरती करावी, शिक्षण शास्त्रातील अभ्यासक्रम हे लवचिक असावेत आणि स्थानिक परिस्थितीनुसार जुळवून घ्यावेत, शिक्षणशास्त्रातील प्राध्यापक आणि व्याख्यात्यांचे अभिनव/कल्पक असे कार्य हे वेगवेगळ्या विद्यापीठांमध्ये समान नियोजन नसल्यामुळे फुकट जाऊ नये.

२.ब.२.२ १९५० च्या दशकातील नियोजन काल:

१९५० मध्ये भारतातील प्रशिक्षण महाविद्यालयांची पहिली परिषद बरोडा येथे झाली व विचारांचे आदान-प्रदान झाले. परिषदेमध्ये प्रशिक्षण महाविद्यालयाचे कार्यक्रम व कार्ये हयाची चर्चा झाली.

पुढील वर्षी, म्हणजेच १९५१ साली, दुसरी अखिल भारतीय परिषद म्हैसूर येथे घेतली गेली. परिषदेत शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाबद्दल ढोबळ दृष्टिकोनातून चर्चा झाली व "प्रशिक्षणा" च्या ऐवजी "शिक्षण" हा शब्द वापरुन त्याची व्याप्ती वाढवावी असे सुचविले. त्याच वर्षी सहा आठवड्यांचा शिक्षण क्षेत्रातील उन्हाळी अभ्यासक्रम म्हैसूर येथे महाविद्यालयीन शिक्षकांसाठी घेतला गेला. (येथे) अध्यापक शिक्षणाचा सुधारित अभ्यासक्रम बनविला. खास अभ्यासाच्या नवीन क्षेत्रांचा समावेश करण्यात आला आणि प्रात्याक्षिकात सुधारणा केली गेली. अध्यापक शिक्षणावर कार्यशाळा, परिसंवाद व परिषदा जोरात घेतल्या गेल्या.

२.ब.२.३ माध्यमिक शिक्षण आयोग, १९५२:

नियोजन दशकातील एक महत्त्वाची घटना म्हणजे माध्यमिक शिक्षण आयोगाचा अहवाल. ह्यात शिक्षकांच्या अडचणी व प्रशिक्षण कार्यक्रम ह्यांचे सखोल विश्लेषण केले गेले. त्यात असे ठासून सांगितले की शिक्षणाच्या पुर्ननिर्माणात सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षक, त्याच्या वैयक्तिक दर्जा, त्याची शैक्षणिक पात्रता, त्याचे व्यावसायिक प्रशिक्षण आणि त्याचे

शाळेतील आणि समाजातील स्थान आहे. ह्या सर्व बाबींबर आयोगाने शिफारशी केल्या आणि तीन प्रकारच्या प्रशिक्षण संस्था सांगितल्या.

अ) प्राथमिक (मूलभूत) शिक्षक प्रशिक्षण, ब) माध्यमिक शिक्षक प्रशिक्षण संस्था, क) प्रशिक्षण महाविद्यालये.

आयोगाने दोन प्रकारच्या (शैक्षणिक) संस्था सुचविल्या

१) ज्यांच्याकडे शाळा सोडल्याचा दाखला (School leaving certificate) आहे.- त्यांच्यासाठी प्रशिक्षणाचा कालावधी दोन वर्षांचा असावा,

२) पदवीधर - ज्याच्यासाठी सध्या एक वर्षाचा कार्यक्रम असावा, की जो भविष्यात दोन वर्षासाठी केला जावा. पदवीधर प्रशिक्षण संस्था, ह्या मान्यताप्राप्त व विद्यापीठाशी संलग्न असाव्यात व विद्यापीठाने पदवी प्रदान करावी, तर माध्यमिक प्रशिक्षण संस्था हया वेगळ्या बोर्डाच्या अखत्यारित असाव्यात. सहशालेय कार्यक्रम, उजळणी अभ्यासवर्ग आणि एम.एड पदवीसाठीच्या संशोधनासाठी प्रशिक्षण सुचविले गेले. एम. एड च्या प्रवेशासाठी, शिक्षणक्षेत्रातल्या पदवी नंतर तीन वर्षाचा शिकविण्याचा अनुभव असावा, अशी शिफारस केली गेली.

परिसंवाद, कार्यशाळा इ. बद्दलच्या आस्थेतून विस्तार केंद्राची (Extension Centers) स्थापना झाली. १९९५ साली अखिल भारतिय माध्यमिक शिक्षण सल्लागार समितीची (All India Council for Secondary Education) स्थापना झाली. मंडळाने विस्तार केंद्राच्या मदतीने शिक्षणासाठी कार्य केले १९५७ साली अखिल भारतीय प्राथमिक शिक्षण सल्लागार समितीची (All India Council for Primary Education) स्थापना झाली.

दुसरी पंचवार्षिक योजना १९५५-५६ साली सुरु झाली आणि अशी अपेक्षा होती की ६८% शिक्षक १९६० पर्यंत प्रशिक्षित होतील. १७ कोटी रुपयांची तरतूद प्रशिक्षणाच्या सुविधा वाढविण्यासाठी केली गेली.

१९५१ साली, अखिल भारतीय माध्यमिक शिक्षण सल्लागार मंडळाने परिक्षा सुधारणा विभाग सुरु केला. १९५९ साली माध्यमिक शिक्षण विस्तार कार्यक्रमासाठी संचालक मंडळाची स्थापना झाली. त्याच वर्षी हैद्राबाद येथे इंग्रजीसाठी केंद्रीय (Central Institute of English) संस्था शिक्षकांना इंग्रजीचे प्रशिक्षण देण्यासाठी आणि त्या संशोधन करण्यासाठी स्थापन झाली.

आपली प्रगती तपासा

१) अध्यापक शिक्षणाच्या संदर्भात विद्यापीठ शिक्षण आयोग १९४८ आणि माध्यमिक शिक्षण आयोग ह्यांनी काय शिफारशी केल्या आहेत ?

_____

_____

_____

_____

२.ब.२.४ १९६० च्या दशकातील नियोजन काल:

प्राथमिक अध्यापकांच्या शिक्षणावर ऑक्टोबर १९६९ साली पहिला राष्ट्रीय परिसंवाद केला गेला. परिसंवादाचे मूलभूत शिक्षणाच्या प्रशिक्षणा संबंधिचे निष्कर्ष, अभ्यासक मंडळाच्या अहवालात सादर केले गेले. निष्कर्षातून, प्रशिक्षणाची वाईट स्थिती निदर्शनास आली.

शैक्षणिक संस्थाकडे कर्मचाऱ्यांची व सामग्रीची कमतरता दिसून आली, प्रत्येक शिक्षकाचे प्रशिक्षण झाले पाहिजे आणि राज्यशासनाने ध्येय गाठण्यासाठी विकासाच्या टप्प्यांचे नियोजन केले पाहिजे. त्यात असे सुचविले गेले की काही प्रशिक्षण संस्था, ह्या प्राथमिक अध्यापक शिक्षण योग्य मार्गाने होण्यासाठी आदर्श म्हणून निवडाव्यात. प्रशिक्षण संस्थेची सुयोग्य धारण क्षमता २०० प्रशिक्षणार्थी एवढी असावी. असेही नमूद केले गेले की प्राथमिक शालेय शिक्षकांचाही विस्तार कार्य कार्यक्रमात (extension work) समावेश केला जावा. राज्य स्तरीय शिक्षण संस्था सुरु करण्याा पुरस्कार करण्यात आला. १९६२-६३ साली प्राथमिक अध्यापक शिक्षण संस्थांमध्ये विस्तार कार्य प्रशिक्षण केंद्रे कार्यरत झाली. राज्यस्तरीय शिक्षण संस्थांची स्थापना १९६४ मध्ये झाली आणि राष्ट्रीय शिक्षण संस्थेमध्ये अध्यापक शिक्षणाचा विभाग सुरु केला गेला.

ह्याच सुमारास, १९६१ मध्ये राष्ट्रीय शेक्षणिक संशोधन व प्रशिक्षण सल्लागार मंडळाची (NCERT) ची स्थापना झाली. ह्याचा मुख्य हेतु, प्रशिक्षण, संशोधन, (पुस्तक) प्रकाशन व समन्वय ह्यातून शालेय शिक्षण सुधारणे हा होता एन. सी. ई. आर. टी ने अजमेर, भुवनेश्वर, भोपाल आणि म्हैसूर येथे चार प्रादेशिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये स्थापिली गेली.

योजना प्रकल्प समिती (Committee on plan projects) (CORP) ने १९६१ मध्ये काही विशिष्ट शैक्षणिक योजनां अभ्यासण्यासाठी एका गटाची नियुक्ती केली त्याने १९६४ साली शिक्षक प्रशिक्षणावर आपला अहवाल सादर केला. समितीचे निष्कर्ष असे होते अध्यापक प्रशिक्षण संस्थांचा शैक्षणिक वैचारिक हातभार फारच त्रोटक होता; प्रशिक्षण महाविद्यालयातील प्रयोगशाळांमध्ये पुरेश्या सुविधा आणि शैक्षणिक साहित्य नव्हते; अध्यापक प्रशिक्षण कार्यक्रमात प्रयोगांना नवनवीन उपक्रमांना काही वाव नव्हता. हे धक्कादायक असले तरी अचूक निष्कर्ष होते.

शिक्षणशास्त्रासाठी प्रगत अभ्यास केंद्र (Center for Advanced Studies in Education) युजीसी ने एम. एस. विद्यापीठ बरोडा येथे शिक्षणशास्त्र व मानसशास्त्र शाखांमध्ये स्थापित केले. १९६४ साली ७ व्या अखिल भारतीय अध्यापक महाविद्यालय संघटनेच्या परिषदेमध्ये असा प्रस्ताव मांडला गेला की प्राथमिक व माध्यमिक प्रशिक्षणातील अंतर भरुन काढण्यासाठी, सर्वंकष महाविद्यालयांची स्थापना करावी. परिषदेमध्ये राज्यस्तरीय अध्यापक शिक्षण मंडळ स्थापण्याबद्दल प्रस्ताव मांडण्यात आला.

२.ब.२.५ कोठारी आयोग १९६४-६६ :

१९६४ साली भारत सरकारने डॉ. डी. एस. कोठारी ह्यांच्या अध्यक्षतेखाली, शैक्षणिक परिस्थितीवर सल्ला देण्यासाठी शिक्षण आयोगाची स्थापना केली. आयोगाच्या असे निदर्शनास आले, की शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी शिक्षकांसाठी सुयोग्य व्यावसायिक शैक्षणिक

कार्यक्रमाची आवश्यकता आहे. आयोगाने अस्तित्वात असलेल्या प्रणालीतील उणीवा दर्शविल्या व त्यात सुधारणा कशा कराव्यात ते दर्शविले. त्यांनी असे सुचविले, की शिक्षक महाविद्यालयांचे विद्यापीठांपासूनचे, शाळांपासूनचे व शिक्षक-महाविद्यालयांपासूनचे वेगळेपण (अंतर) काढून टाकावे. हे साधण्यासाठी काय करावे, ते नमूद केले. दर्जाच्या सुधारणेसाठी आयोगाने विषय ओळख आणि सामान्य व व्यावसायिक शिक्षणाचे एकत्रित अभ्यासक्रम सुचविले. शिक्षक अध्यापकांचा दर्जा सुधारण्यासाठीचे मार्गही दर्शविले. त्याने राज्य सरकारने प्रशिक्षणाच्या सोयीमध्ये सुधारणा करण्यासाठी आराखडा बनविण्याचा सल्ला दिला.

आयोगाने अध्यापक शिक्षणातील त्रुटींचे योग्य निदान करुन, त्यावर राबविता येतील असे उपाय सुचविले. शिक्षण आयोग १९६४-६६ च्या शिफारशीनुसार अध्यापक शिक्षणात काही बदल केले गेले. अलिगढ, कुरुक्षेत्र, कानपूर आणखीन काही इतर विद्यापीठात एम. ए. शिक्षणशास्त्र ही पदवी सुरु केली गेली. अप्रशिक्षित शिक्षकांचा अनुशेष भरुन काढण्यासाठी काही विद्यापीठांमध्ये उन्हाळी शाळा आणि टपालाद्वारा शिक्षणाचे कार्यक्रम सुरु केले आणि काही राज्यामध्ये अध्यापक शिक्षणाची राज्यमंडळे (State Boards) स्थापन केली गेली. हे बदल अध्यापक शिक्षण क्षेत्रासाठी स्वागतार्ह होते आणि त्यामुळे ह्या क्षेत्रातील त्रुटी भरुन येतील अशी अपेक्षा होती.

चौथ्या पंचवार्षिक योजनेतील (१९६९-७४) नियोजन आयोगाने दर्जा सुधारण्यासाठी अध्यापक शिक्षणावर, स्त्री शिक्षिकाच्या तसेच आदिवासी समाजातील शिक्षकांच्या प्रशिक्षणावर, शास्त्र व गणिताच्या शिक्षकांना माध्यमिक पातळीचे प्रशिक्षण देण्यावर व सेवांतर्गत प्रशिक्षण आयोजित करण्यावर भर दिला. त्यात शालेय शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी एन. सी. इ. आर. टी. व एस. आय. इ. मध्ये जास्त समन्वय साधण्याचे सुचविले. त्यात अध्यापक शिक्षकांसाठी सुध्दा प्रशिक्षण कार्यक्रम सुचविले.

तुमची प्रगती तपासा

१) एन. सी. इ. आर. टी. आणि सी. ए. एस. इ (NCERT and CASE) ची स्थापना का केली गेली ?

२) अध्यापक शिक्षणाच्या संदर्भात शिक्षण आयोग १९६४-६६ च्या काय शिफारशी होत्या ?

_____

_____

_____

_____

_____

_____

२.ब.२.६ १९७० चे दशक

१९७० च्या दशकात शिक्षणाचा नवीन आकृतीबंध म्हणजेच १०+२+३ आकृतीबंध लागू करण्यावर खूप भर होता. ह्यामुळे अध्यापक शिक्षणाबाबत पुर्नविचार व सुधारणांची गरज होती. १९७३ मध्ये भारत सरकारने, एक कल्पक व ठोस पाऊल उचलले. अध्यापक शिक्षणासाठी राष्ट्रीय स्तरावरील सल्लागार म्हणून राष्ट्रीय अध्यापक शिक्षक मंडळ (NCTE) ची स्थापना केली. एन. सी. टी. इ. ने १०+२ आकृतीबंधासाठी शिक्षक तयार करण्यासाठी अभ्यासक्रमाचा ढाचा बनविला. नवीन अभ्यासक्रम हा सतत परिश्रम करायला लावणारा होता. त्यात अशी अपेक्षा केली गेली होती की शिक्षकाने वर्गात व वर्गाबाहेर नेतृत्व करायला पाहिजे, समाजात बदल घडून आणण्यासाठी, सामाजिक बदलाचे साधन बनायला पाहिजे आणि त्यातून राष्ट्रीय विकासाचे उद्दिष्ट गाठण्यास मदत केली पाहिजे. ह्या ढाच्यामध्ये अध्यापक शिक्षणाची उद्दिष्टे स्पष्ट शब्दात मांडली होती, त्याच्या समाजाशी संबंध जोडला गेला होता, समाजोपयोगी उत्पादन कार्य (SUPW) म्हणजे काय हे सांगून, त्यावर भर दिला गेला होता आणि उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षकाची भूमिका व कार्ये मांडलेली होती.

एन. सी. टी. इ. आणि यु.जी.सी. च्या सदस्यांची अध्यापक शिक्षणावर एकत्रित बैठक १९७६ साली घेतली गेली आणि त्यांनी अध्यापक शिक्षणाला एक दिशा दर्शविणाऱ्या कागदपत्राचा मसुदा तयार केला गेला. एन. सी. इ. आर. टी. ने सेवातंर्गत शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी सातत्यपूर्ण शिक्षण केंद्रामार्फत (Centres for continuing Education) एक कार्यक्रम विकसित केला.

१९७५ मध्ये, घटनेच्या ४२ व्या सुधारणेनुसार शिक्षण हे सामाईक यादीत (Concurrent list) मध्ये आणले गेले. केंद्रातील सत्तांतरामुळे शिक्षणाची जबाबदारी वाढली आणि १९८० च्या दशकात काही महत्त्वाचे बदल दृष्टिपथात आले.

तुमची प्रगती तपासा

१) राष्ट्रीय अध्यापक शिक्षक मंडळाची (NCTE) स्थापना का झाली ?

_____

_____

_____

_____

_____

२.ब.२.७ १९८० चे दशकः राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NPE) आणि कृती कार्यक्रम (Programme of Action POA)

भारत सरकारने १९८३ साली शिक्षकांसाठी दोन राष्ट्रीय आयोगांची स्थापना केली. एक शालेय पातळीवरील शिक्षकांसाठी व दुसरा उच्च शिक्षणाशी संबंधित शिक्षकांसाठी. ह्या

दोन्हीही आयोगांची व्याप्ती आणि संबंध खूप व्यापक असा होता- शिक्षकी पेशाच्या उद्दिष्टांपासून ते राष्ट्रीय शिक्षक कल्याण संस्थेपर्यंत (National foundation for Teacher's welfare). ह्या आयोगांनी समाजातील विविध स्तरावरील लोकांशी संपर्क साधून त्यांची शिक्षक समुदायाच्या सुधारणेसंबंधीची मते जाणून घेतली.

२.ब.२.८ शैक्षणिक धोरणापुढील आव्हाने:

ऑगस्ट १९८५ मध्ये भारत सरकारने "शिक्षणाची आव्हाने: धोरणात्मक दृष्टिकोन" नावाचा दस्तऐवज प्रसिध्द केला. त्यात २१ व्या शतकातील तरुणाला तयार करणारी शिक्षण प्रणाली कशी असावे ह्याचे चित्र रेखाटलेले होते. त्यात असे आवर्जून नमूद केले गेले की शिक्षण क्षेत्रासाठी शिक्षकांचे कार्य हे सर्वात महत्त्वाचे आंतरभरण (input) आहे. पण त्यात सश्वेद असे ही सांगितले आहे, की खुपसे अध्यापक शिक्षण हे असंबध्द/ अप्रासंगिक आहे, निवडीची कार्यपध्दत व भरतीची पध्दती ही अयोग्य आहे आणि व्यावसायिक क्षेत्रात, अध्यापन ही सर्वात शेवटची निवड आहे. ह्यात, हया व्यवसायात नव्याने शिरणाऱ्यांसाठी अध्यापनाची प्रवृत्ती,अध्यापक शिक्षणाची पुर्नरचना आणि सेवांतर्गत उजळणी वर्ग, ह्यावर भर दिला.

ह्या दस्तऐवजावर देशभर खूप वादविवाद व चर्चा झाल्या आणि शिक्षणतज्ञ, विचारवंत व ह्या क्षेत्रात काम करणारे ह्यांच्या सुचना भारत सरकारकडे १९८६ च्या शैक्षणिक धोरणात समाविष्ट करण्यासाठी मांडला. (NPE) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ यानुसार अध्यापक शिक्षण कार्यक्रमावर भर दिला गेला होता. प्रशिक्षण शाळांना जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांचा (DIETS) चा दर्जा दिला गेला आणि प्रशिक्षण महाविद्यालयांना अध्यापक शिक्षण महाविद्यालयाचा (CTEs) आणि शैक्षणिक प्रगत अभ्यास संस्था (Institutes of Advanced studies in education) & (IASEs) ची दर्जा दिला गेला. आय. ए. एस. इ. मध्ये संशोधन व नवीन उपक्रम सुरु करण्याची तरतूद होती.

सुधारित शैक्षणिक धोरण, १९९२ मध्ये सुध्दा अध्यापक शिक्षण संस्थांचा कार्यपध्दतीवर भर दिला.

एन. पी. ई. आणि पी. ओ. ए. १९८६ आणि १९९२ नुसार मूलभूत आवश्यक घटक व अभ्यासक्रमाचे संक्रमण ह्यात सुधारणा झाली आहे. भौतिक साधनांमधील सुधारणा व सेवांतर्गत उजळणी वर्गांवर भरपूर पैसा खर्च केला जातो. १९९८-९९ पर्यंत एकूण 45 DIETs, 76 CTEs आणि 34 IASEs होते. पण ह्या सर्वांचा अध्यापक शिक्षणावरचा दर्जा सुधारण्यासाठी झालेला परिणाम अगदी नगण्य आहे. एन. सी. टी. इ ने ह्या प्रशिक्षण संस्थांच्या अधिकृत मान्यतेसाठी काही प्रमाणे व ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. १९९८-९९ मध्ये एन सी. टी. इ. कडे आधीच अस्तित्वात असलेल्या २४२६ प्रशिक्षण संस्थांकडून मान्यतेसाठी आणि शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी अर्ज गेले. त्यापैकी ४०८ संस्थांना मान्यता व १२९४ संस्थाना तात्पुरती / सशर्त मान्यता देण्यात आली. तसेच नवीन संस्था व नवीन उपक्रम राबविण्यासाठी १३४९ अर्ज आले होते. त्यापैकी फक्त २७७ नवीन संस्था उपक्रमांना मान्यता देण्यात आली. त्याखेरीज १०३५ संस्थांना तात्पुरती / सशर्त मान्यता देण्यात आली.

तुमची प्रगती तपासा

१) शिक्षणाची आव्हानेः धोरणात्मक दृष्टिकोन (१९८५) च्या दस्तऐवजात अध्यापक शिक्षणाचे कसे चित्र रेखाटलेले आहे ?

२) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NPE) १९८६ अध्यापक शिक्षणासाठी महत्वाचा दस्तऐवज का मानला आहे ?

२.ब.३ सारांश

एम. एच. आर. डी. ने नमूद केल्या प्रमाणे (भारत सरकार वार्षिक अहवाल १९९९-२०००, पृष्ठ क्र. ८) एन. सी. टी. ई. ने कमी कालावधीत एक मोठी गोष्ट साधली म्हणजे, १९९८-९९ दरम्यान अध्यापक शिक्षक व अध्यापकांसाठी विशिष्ट विषयावरील प्रबंध, अहवाल, स्वयंअध्यापनाची सामग्री, ह्याचे प्रकाशन. ह्या प्रकाशनांच्या माध्यमातून एन. सी. टी. ई. ने अध्यापक शिक्षणातील विविध बाबीवर सर्वंकष विचार मांडला. ठामपणे सांगायचे तर एन. सी. टी. ई ने २०००-२००१ पर्यंत ६६ प्रकाशने आणि ६ CDROM प्रकाशित केली. ह्या खेरीज शिक्षकांची क्षमता वाढविण्यासाठी एन. सी. टी. ई. ने विविध परिचर्या, परिषदा, कार्यशाळा इ. चे देशाच्या विविध भागात आयोजन केले, अध्यापक शिक्षणाचा अभ्यासक्रम सुधारला, तसेच अभ्यास साहित्य विकसित केले.

शैक्षणिक कार्यक्रमांखेरीज एन.सी.टी.ई. ने पुष्कळश्या शिक्षक प्रशिक्षण संस्था स्वतःच्या अखत्यारित आणून नियमनाच्या कार्यातही यश मिळविले आहे. त्यामुळे कोर्टात बऱ्याच केसीस अडकून असल्या आणि खूप पैसे खर्च झाले तरीही अध्यापक शिक्षणाच्या व्यापारीकरणाला मोठ्या प्रमाणात आळा बसला आहे. एन.सी.टी.ई. ने एक महत्वपूर्ण निर्णय घेतला, म्हणजे माहिती आणि संप्रेषण तत्रंज्ञानाचे ज्ञान (ICT) बी. ए. अभ्यासक्रमासाठी प्रशिक्षणार्यासाठी व त्याचा अध्ययन अध्यापनातील वापर अनिवार्य करणे. (एन. सी. टी. ई. वार्षिक अहवाल २०००-२००१, पान नं.३). प्रशिक्षित व सक्षम शिक्षक व अभ्यासक शिक्षक हे उपलब्ध हार्डवेअर सुविधा वापरण्यासाठी उपलब्ध असल्याशिवाय हे सर्व करण्याचा उद्देश साध्य होणार नाही.

एक महत्त्वाचे संपादन म्हणजे यु.जी.सी तर्फे उच्च शिक्षणाचा दर्जा राखण्यासाठी व सुधारण्यासाठी राष्ट्रीं मुल्यांकन आणि प्रत्यायन परिषदे (NAAC) ची स्थापना.

अध्यापक शिक्षणाच्या विकासाचा स्वातंत्र्योत्तर कालापर्यत मागोवा काढता येतो. स्वातंत्र्यापासून महत्त्वाचा सूचना व शिफारसी केल्या गेल्या आहेत. विद्यापीठ शिक्षण आयोग, १९४८ ते २००० च्या दशकापर्यंत अध्यापक शिक्षण, त्याची वाढ व विकास ह्याला महत्त्व दिले गेले आहे. युजीसी, एन.सी.ई. आर. टी., एन.सी.टी.इ आणि नॅक (एन.ए.ए.सी) ह्यांच्या स्थापनांचा अध्यापक शिक्षणावर महत्त्वपूर्ण परिणाम झालेला आहे.

स्वाध्याय:

१. शिक्षण आयोग १९६४-६६ च्या, अध्यापक शिक्षणासाठी काय शिफारसी होत्या ?

२. युजीसी व एस. सी. टी. ई. त्यांच्या भुमिका व कार्ये स्पष्ट करा.

३. एन. पी. ई. १९८६ मध्ये अध्यापक शिक्षणावर केलेल्या शिफारसींची समर्पकता स्पष्ट करा.

४. एन. सी. टी. ई. ची २००० च्या दशकातील संपादणूक काय ?

❖❖❖❖

२क

क) युनायटेड किंग्डम (यु.के) व युनायटेड स्टेट्स् ऑफ अमेरिकेतील (यु.एस.ए.) अध्यापक शिक्षण

घटक रचना :

२. क.० उद्दिष्टे
२. क.१ प्रास्ताविक
२. क.२ यु के मधील अध्यापक शिक्षणाची उद्दिष्टे
२. क.३ ऐतिहासिक पार्श्वभूमी
२. क.४ प्रशिक्षण महाविद्यालयाचे प्रकार
२. क.५ अध्यापक शिक्षणासाठीचे अभ्यासक्रम व कार्यक्रम
२. क.६ अध्यापकांचे व त्यांच्या पात्रतांचे वर्गीकरण
२. क.७ प्रशिक्षणासाठी निवड
२. क.८ शिक्षकांसाठी व्यावसायिक अटी
२. क.९ सारांश
२. क.१० नमना प्रश्न
२. क.११ ऐतिहासिक पार्श्वभूमी
२. क.१२ यु. एस. ए. मधील अध्यापक शिक्षणाची उद्दिष्टे
२. क.१३ अध्यापक प्रशिक्षण पद्धतींचे प्रकार
२. क.१४ शिक्षणासाठी अभ्यासक्रम व कार्यक्रम
२. क.१५ उच्च शिक्षणाच्या अध्यापकांचे प्रशिक्षण
२. क.१६ सारांश

२. क.० उद्दिष्टे:

ह्या घटकाचा अभ्यास केल्यावर विद्यार्थी खालील गोष्टी करु शकतील.

- यु.के. मधील शिक्षण प्रणालीचे व अध्यापक सज्जतेचे ज्ञान प्राप्त करणे.
- प्रणाली च्या लक्षणांचे आकलन होणे.
- यु.एस.ए. मधील शिक्षण प्रणाली व अध्यापक सज्जतेचे ज्ञान प्राप्त करणे.

२. क.१ प्रास्ताविक:

भारतातील सद्य शिक्षणप्रणाली ही इंग्लंड व वेल्स येथील प्रचलित शिक्षण प्रणालीच्या धर्तीवर आधारित आहे. त्यामुळेच आपली अध्यापक शिक्षण पद्धती इंग्लिश पद्धतीप्रमाणे आहे.

इंग्लंडमध्ये शालेय शिक्षणाचा दर्जा पुरेसा उच्च आहे. पण अध्यापक शिक्षकांना तो आणखीन उंचवायचा आहे. शॅबीनस्न् समितीचा अहवाल व जेम्स अहवालात हे प्रतिबिंबित झालेले आहे.

युके, तसेच इतर देशातील अध्यापक शिक्षक हे आशय व (अध्यापन) पद्धती ह्यांचा अध्यापक शिक्षणात मेळ घालण्याच्या प्रयत्नात आहेत. विविध विकसित देशातील अध्यापक शिक्षण कार्यक्रमाच्या अभ्यासामुळे त्यांच्या प्रणालीचे आकलन होण्यास तसेच त्यातील जे काही शक्य आहे, ते येथे भारतात, समाविष्ट करण्यात मदत होईल.

इंग्लंड येथील अध्यापक शिक्षण प्रणाली ही कोणत्याही चढउतार किंवा क्रांतीचा परिणाम नसून रुढी व परंपरांच्या उत्क्रांती प्रक्रियेचा परिणाम आहे. वॉर्ड ह्यांच्या शब्दात सांगायचे तर, "येथे शिकविण्यासाठी कोणताही सामान्य परवाना नाही, कायद्यामध्ये - सार्वजनिक किंवा स्थानिक - अशी, कोणलाही शाळा सुरु करण्यापासून थांबविणारी तरतूद नाही. अध्यापक नियुक्तीचा दर्जा, त्यांची पात्रता हे एकतर परंपरेनुसार किंवा जनतेच्या मतानुसार अधिकाऱ्यांच्या दबावानुसार ठरविली जाते किंवा काहीही न ठरविता, तशीच सोडून दिली जाते."

२.क.२ युकेमधील अध्यापक शिक्षणाची उद्दिष्टे:

- अध्यापनासंबंधीची तात्त्विक, सामाजिक, मानसशास्त्रीय, अर्थशास्त्रीय सैद्धांतिक जाण करुन देणे.
- वर्गांमध्ये (विविध) अध्यापन पद्धती, तंत्रे आणि अध्यापन सामग्री बनविण्याची व ती वापरण्याची कौशल्ये व क्षमता विकसित करणे.
- वर्ग-अध्यापनात येणाऱ्या अडचणी हातळण्यासाठी कृती संशोधन करण्याची क्षमता विकसित करणे.
- राष्ट्रीय एकात्मता आणि आंतरराष्ट्रीय सामंजस्यासंबंधात योग्य दृष्टिकोन व भावना विकसित करणे.
- अध्यापक शिक्षणातील, पूर्वत्रायत्मिक, प्राथमिक, शालेय व महाविद्यालयीन शिक्षकांसाठी वेगवेगळी उद्दिष्टे पुरविणे.

आपली प्रगती तपासून पहा:

१) युके मधील अध्यापक शिक्षणाची उद्दिष्टे लिहा.

_____

_____

_____

_____

_____

२.क.३ ऐतिहासिक पार्श्वभूमी:

सुरुवातीचा कल: 'विद्यार्थी-प्रमुख' पद्धती - एकोणीसाव्या शतकाच्या सुरुवातीला युकेमध्ये कोणतीही औपचारिक अध्यापक शिक्षण प्रणाली नव्हती. ह्या संदर्भातील पहिला ढोबळ मानाने प्रयत्न 'विद्यार्थी-प्रमुख' पद्धतीतून केला गेला. ह्या पद्धतीनुसार वरच्या वर्गातील विद्यार्थी, 'विद्यार्थी-प्रमुख', ह्यांना प्रथम काही मूलभूत गोष्टी किंवा पाठांतर करण्याचे शब्द (स्पेलिंगज) शिकविली जात. त्यानंतर ते एका मोठ्या सभागृहात जमत, जेथे त्यांना विद्यार्थ्यांचा एक गट दिला जाई व स्वतः शिकलेल्या बाबी ते ह्या विद्यार्थ्यांना शिकवित. ह्या पद्धतीत अनेक त्रुटी असल्यामुळे ही पद्धती बंद करुन त्याऐवजी 'विद्यार्थी-अध्यापक पद्धती' आणली गेली.

विद्यार्थी-अध्यापक पद्धती - विद्यार्थी-प्रमुख पद्धतीवर टिका करताना श्रीयुत के. शटलवॉर्ड ह्यांनी एका नव्या व्यवस्थेचा पुरस्कार केला, ज्याला विद्यार्थी-अध्यापक पद्धती असे म्हटले आहे. ह्या व्यवस्थेनुसार 'विद्यार्थी-अध्यापक' हे जवळपास १३ वर्षे वयाचे प्राथमिक शाळेतील हुषार विद्यार्थी निवडले जात. त्यांना मुख्याध्यापकांच्या हाताखाली शिकाऊ म्हणून पाच वर्षाच्या कालावधीसाठी ठेवले जाई व स्तरीय (graded) पाठ्यक्रमावर त्यांची दर वर्षी परीक्षा घेतली जाई. जर विद्यार्थ्यांचे पाठ्यक्रम यशस्वीपणे पार पाडला, तर सरकार मुख्याध्यापकांना प्रत्येक एका विद्यार्थ्याप्रमाणे ५ पाऊँड्स, दोन विद्यार्थ्यामागे ९ पाऊँड्स व त्यानंतरच्या प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी ३ पाऊँड्स देत असे. शिकाऊ कालवधीच्या शेवटी, म्हणजे वयाच्या १८ व्या वर्षी विद्यार्थी विभागीय शिक्षेला (Departmental Exam) बसू शकत होता. यशस्वी विद्यार्थ्यांना राणीची शिष्यवृत्ती दिली जात असे, ज्यामुळे ते तीन वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी प्रशिक्षण महाविद्यालयात दाखल होऊ शकत होते. ह्या अभ्यासक्रमाच्या अखेरीस, ते "प्रमाणित अध्यापक" बनू शकत होते.

शिष्यवृत्ती मिळालेला अध्ययनार्थी (Burson) व विद्यार्थी - अध्यापक पद्धती:

ह्या पद्धतीनुसार माध्यमिक शाळेतील विद्यार्थी वयाच्या १७-१८ वर्षांपर्यंत शाळेत राहू शकत होता - शिष्यवृत्ती मिळालेला विद्यार्थी (Burson) म्हणुन - आणि त्यानंतर सरळ प्रशिक्षण महाविद्यालयात जाऊ शकत होता किंवा पर्यायाने, तो 'विद्यार्थी शिक्षक' बनुन, अर्धावेळ प्राथमिक शाळेत काम करुन, राहिलेल्या अध्या वेळात माध्यमिक शाळेत शिकू शकत होता. शिक्षकांची ही प्राथमिक प्रशिक्षणाची पद्धती, आजही थोड्याफार फरकाने चालू आहे.

आधुनिक काल

मॅकनेर समिती अहवाल (१९४४):

"शिक्षक आणि युवा नेते"(१९४४) ह्या अहवालात अध्यापक प्रशिक्षणाबाबत खालील शिफारशी केल्या गेल्या आहेत.

- **मध्यवती प्रशिक्षण सल्लागार मंडळ:** इंग्लंड व वेल्स् साठी एक मध्यवर्ती प्रशिक्षण सल्लागार मंडळ बनविले गेले व त्यांना, शिक्षण बोर्डाला (Board of Education) ला सल्ला देण्याचे काम सोपविले गेले, की जेणेकरुन ह्या अहवालात नमूद केलेली (अध्यापक-शिक्षणातील) विविध क्षेत्रे, प्रशिक्षण सेवा, इ. बोर्ड सुरु करण्यासंबंधी निर्णय घेऊ शकेल.

- **पर्याय:** खालील दोन पर्यायी योजनांपैकी एक नवीन आकृतीबंध अध्यापक प्रशिक्षणासाठी स्विकारला जाईल.

१. 'अ' पद्धतीची योजना: ह्यानुसार, प्रत्येक विद्यापी: हे प्रशिक्षणासाठी मान्यताप्राप्त असे संघटनात्मक संस्था असावी त्या संस्थेने प्रशिक्षणाच्या सुविधा, तसेच प्रमाणित शिक्षक बनण्यासाठी घेण्याच्या परिक्षांची सोय करावी.

२. 'ब' पद्धतीची योजना: ह्यात संयुक्त बोर्ड चालू राहून, त्यात विद्यापीठाचे प्रतिनिधित्व असावे, असे सुचविले होते. विद्यापीठाचे शिक्षण विभाग व संलग्न महाविद्यालयांनी एकमेकांच्या संलग्नतेचे शिक्षण बोर्ड व मध्यवर्ती प्रशिक्षण सल्लागार मंडळाचे, जोड ओळखपत्र बाळगावे.

- 'प्रशिक्षण संस्था' क्षेत्र: ह्यांनी विविध पातळीवरील प्रशिक्षणाचे अभ्यासक्रम प्रमाणित करावा.
- शिक्षण बोर्ड: क्षेत्रीय प्रशिक्षण अधिकार पत्राच्या शिफारशी व मूल्यांकन्यानुसार प्रमाणपत्रांना मान्यता द्यावी.
- 'प्रशिक्षण अधिकारी' क्षेत्र: ह्यांनी ह्यांच्या अखत्यारीतील सर्व प्रशिक्षणसंस्थाची तपासणी (Inspection) करावे.
- जाहीरनामा: विद्यार्थ्यांना, त्यांच्यावर खर्च झालेल्या पैशांची भरपाई करुन देण्यासाठी कोणत्याही खाजगी किंवा अनुदानित शांळामध्ये कमीत कमी ठरविलेल्या कालावधीसाठी काम करण्याची अट मान्य करण्याचे बंधनकारक असू नये.
- कालावधी: प्रशिक्षणाचा कालावधी तीन वर्षासाठी वाढवावा.
- मूलभूत पगाराची श्रेणी: प्राथमिक व माध्यमिक प्रशिक्षित शिक्षकांसाठी पगाराची श्रेणी लागू करावी व जास्त पात्रता व अनुभवांसाठी जास्त पगाराची तरतूद असावी.

पाठ-पुरावा: मॅक् नेर समितीच्या शिफारशींच्या पाठपुराव्यासाठी खालील अध्यापक मांडणी केली गेली:

१) क्षेत्रीय प्रशिक्षण संघटना :

विविध विद्यापीठांच्या सहकार्याने ह्यांची स्थापना केली गेली. बहुतांशी ही प्रशिक्षण केंद्रे "शिक्षणशास्त्र संस्था / (महाविद्यालये)" होत्या तर इतर "शिक्षणशास्त्र विद्यालये" होती. शिक्षणशास्त्र संस्था ह्या त्यांच्या संबंधित विद्यापीठांच्या थेट नियंत्रणाखाली होत्या तर शिक्षणशास्त्र विद्यालये शिक्षण मंत्रालयाच्या अखत्यारित कार्यरत होती. प्रशिक्षण संस्थाच्या संख्येत जलद वाढ झाल्यामुळे क्षेत्रीय प्रशिक्षण संघटनाना जास्त जबाबदारी उचलावी लागली. त्यांची कार्ये खालील प्रमाणे होती.

- विद्यापीठाचा शिक्षणशास्त्र विभाग व इतर संलग्न महाविद्यालयातील प्रशिक्षण कार्यक्रमाचे पर्यवेशक्षण.
- दर्जा राखणे.
- परीक्षा घेणे व विद्यार्थ्यांचा कार्याचे मूल्यांकन.
- यशस्वी विद्यार्थ्यांना शिक्षक पात्रता प्रमाणपत्र देण्यासाठी शिफारस करणे.

- प्रशिक्षणाच्या सुविधांमध्ये, विविध पातळीवर सुधारणा करण्यासाठी आपापल्या क्षेत्रात नियोजन करणे.
- पुढील अभ्यासासाठी सोयी उपलब्ध करुन देणे आणि व्यावसायिक अभ्यासात संशोधनासाठी प्रोत्साहन देणे.
- सेवांतर्गत शिक्षणासाठी शैक्षणिक केंद्रांची तजवीज करणे.

२) अध्यापक घडविण्यासाठी व पुरविण्यासाठी राष्ट्रीय सल्लागार मंडळ (National Advisory Council on the framing and supply of Teachers) - ह्यात क्षेत्रीय प्रशिक्षण संघटनेचे प्रतिनिधी, स्थानिक शिक्षण अधिकारी व राष्ट्रीय अध्यापक संघटनेचे प्रतिनिधी ह्यात असत.

रॉबिन्स समिती अहवाल (१९६३)

अध्यापक प्रशिक्षणाच्या संदर्भात, खालील शिफारशी केल्या गेल्या:

- मॅक नेर समितीची 'अ' पद्धतीची योजना: ही योजना राबविली गेली पाहिजे, पण असे विचार मांडले की, तर्कशुद्ध विचार केल्यास, ह्याची पुढच्या पायऱ्या अशा घेतल्या गेल्या पाहिजेत, की प्रथम महाविद्यालयातील व संस्थांतील शिक्षणशास्त्र विभाग हे एकत्रित करुन, शिक्षणशास्त्राची केंद्रे तयार केले पाहिजेत आणि प्रत्येक केंद्रातील महाविद्यालयांना एकत्रित अनुदान देऊन, त्यांचे व्यवस्थापन विद्यापीठाकडे सोपविले पाहिजे, जेणेकरुन ह्या महाविद्यालयांचे अभ्यासविषयक नियंत्रण तसेच आर्थिक नियोजनाची जबाबदारी व्यवस्थित पार पाडली जाईल.
- **राष्ट्रीय अभ्यासविषयक पुरस्कार समिती:** हा महाविद्यालयांसाठी सर्वात चांगला पर्याय नसला, तरीही ह्याची स्थापना केली गेली पाहिजे.
- **शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी अभ्यासविषयक व आर्थिक बाबी विषयी अधिकार:** हे दोन्हीही एकत्र असायला पाहिजेत आणि महाविद्यालये ही विद्यापीठांच्या शिक्षण विभागाची अविभाज्य भाग बनले पाहिजेत आणि त्यांना विद्यापीठ अनुदान समितीकडून आर्थिक सहाय्य मिळाले पाहिजे. काही मोठी महाविद्यालये, वैयक्तिकपणे विद्यापीठाचा एक भाग बनतील तर काही, त्याच्या मोठ्या विभागाला एक भाग बनतील.
- **अध्यापक प्रशिक्षण महाविद्यालये:** ही भविष्यात शिक्षणशास्त्र महाविद्यालये म्हणून ओळखली जावीत.

ह्यातील बहुतेक शिफारशी कार्यान्वित केल्या गेल्या. महाविद्यालयांचे शिक्षणशास्त्र महाविद्यालये म्हणून परत नामकरण केले गेले. 'शिक्षणशास्त्र स्नातक' (Bachelor of Education) ही पदवी सुरु केली गेली.

केंद्रीय सल्लागार मंडळ अहवाल (१९६७)

'मुले व त्यांच्या प्राथमिक शाळा' हा केंद्रीय सल्लागार मंडळाचा अहवाल १९६७ साली प्रकाशित झाला. त्यात खालील शिफारशी केल्या गेल्या.

- नव्याने प्रस्थापित 'शिक्षणशास्त्र स्नातक' पदवीधर हे प्राथमिक शाळेसाठी (अध्यापकांना) मुख्य स्त्रोत बनावेत.

- बरीच आधी व्हायला हवी होती अशी, अध्यापक प्रशिक्षण प्रणालीची सखोल चौकशी व्हायला पाहिजे.
- सर्व प्राथमिक शिक्षकांना अंकाचे व्यवस्थित ज्ञान असले पाहिजे. त्याच प्रमाणे त्यांना लिहिता वाचता यायला पाहिजे व त्यांनी त्यांची पात्रता वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.
- दिवस - महाविद्यालयांचे विस्तारित जाळे असले पाहिजे, जेणेकरुन ज्यांनी आपले खास कौशल्य दाखविले आहे. अशा प्रौढ विद्यार्थ्यांना वेळाची व कामाची योग्य तजवीज करुन, दुरच्या ठिकाणी (इतरांना मदत करण्यासाठी) ठेवावे, प्राथमिक पातळीवरील पदवीधरांची संख्या वाढवावी आणि त्यांच्या प्रशिक्षणासाठी जास्त सोयी उपलब्ध करुन द्याव्यात, कोणत्याही पदवीधराला, ज्याला प्राथमिक पातळीवर शिकविण्याची इच्छा असेल, त्याच्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण उपलब्ध असावे, शाळा व महाविद्यालयीन जवळीक साधण्यास प्रोत्साहन द्यावे.
- विद्यार्थ्यांच्या अध्यापनाचा निरिक्षणात शाळांनी महत्त्वाची भूमिका गाजवावी.
- शाळा व महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या संयुक्त नेमणूका व्हाव्यात. जेणेकरुन शाळा व महाविद्यालीय सहकार्याची भावना वाढीस लागेल.

जेम्स् अहवाल (१९७२)

उदयोन्मुख अशा सार्वत्रिक माध्यमिक शिक्षण योजनेसाठी अध्यापक - प्रशिक्षणा संबंधित शिफारशी केल्या गेल्या.

१) अध्यापक शिक्षण हे उच्च-शिक्षणाचा भाग बनले पाहिजे आणि त्याच्या प्रवेशाच्या अटी ह्या विद्यापीठांच्या अटीप्रमाणेच असल्या पाहिजेत.

२) सर्व अध्यापकांचे सर्व सामान्य शिक्षण हे वाढविले व विस्तारले पाहिजे.

३) प्रचलित तीन वर्षाचा पदविका कार्यक्रम वाढवून चार वर्षांचा शिक्षण-प्रशिक्षण पदवी कार्यक्रम बनला पाहिजे. प्रचलित चार वर्षांचा कार्यक्रम पाच वर्षाचा बनविला पाहिजे व प्रत्येक कार्यक्रमात एक वर्षाची शिकाऊ काळ हा कार्यक्रमाचा अविभाज्य घटक बनला पाहिजे.

४) अध्यापकाचे व्यावसायिक अध्ययन आयुष्यभर चालले पाहिजे.

५) अध्यापक - शिक्षण हे खालील तीन घटनाचक्रात विभागले पाहिजे.

- प्रथम पायरी - हे विद्यापीठ किंवा राष्ट्रीय अभ्यास विषयक पुरस्कार समितीने करायचे.
- द्वितीय पायरी - हा दोन वर्षांचा व्यावसायिक प्रशिक्षणाचा सामाईक कार्यक्रम असेल. पहिले वर्ष हे महाविद्यालय किंवा शिक्षणशास्त्र विभागात पूर्ण केले जाईल आणि ह्यात औपचारिक शैक्षणिक उपपत्तीपेक्षा शिक्षकाला सुरवातीला लागणाऱ्या तयारीवर भर दिला जाईल. दुसऱ्यावर्षी विद्यार्थ्यांला अधिकृत शिक्षक म्हणून ठेवले जाईल व पगार दिला जाईल.
- तृतीय पायरी - ह्याची सुरुवात प्रशिक्षणाच्या नोंदणी ने होईल. ह्यात विस्तृत असे प्रशिक्षण, अभ्यास व कार्यक्रम होतील. ह्यात प्रदीर्घ अभ्यासक्रम असतील, ज्यामुळे प्रगत पात्रता प्राप्त होईल आणि हयातून शाळेत पूर्णवेळ काम करण्यासाठी शिक्षक तयार होतील.

६) अहवालात असेही सुचविले गेले की क्षेत्रीय प्रशिक्षण संघटना रद्द करुन त्याऐवजी स्थानिक पातळीवर महाविद्यालय आणि शिक्षणशास्त्र विभाग प्रांतीय मंडळ (Regional Council for colleges and Departments of Education) आणि राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रीय अध्यापक शिक्षण व प्रशिक्षण मंडळाची (National Council for Teachers Education and Training) ची स्थापना करावी.

आपली प्रगती तपासून पहा:

१) विद्यार्थी-प्रमुख पद्धती, विद्यार्थी-अध्यापक पद्धती आणि शिष्यवृत्ती मिळालेला अध्ययनार्थी व विद्यार्थी-अध्यापक पद्धतीतील भेद स्पष्ट करा.

२) मॅक् नेर समिती (१९४४) च्या अहवालाचे महत्त्व काय ?

३) रॉबिन्स समिती अहवालाने (१९६३) अध्यापक शिक्षणास मोठा हातभार लावला, असे का समजले जाते ?

४) 'अध्यापक शिक्षणाची सद्य प्रणाली ही जेम्स् अहवालावर (१९७२) आधारित आहे,' समर्थन करा.

_____

_____

_____

_____

_____

२. क. ४ प्रशिक्षण महाविद्यालयाचे प्रकार

इंग्लंडमध्ये प्रशिक्षण महाविद्यालये दोन प्रकारची आहेत.

१) जुनी प्रशिक्षण महाविद्यालये - ही सुरुवातीला सुरु केलेली आणि खाजगी संघटनांनी ठराविक आर्थिक सहाय्य देऊन चालविलेली असली, तरी आता जवळजवळ पूर्णपणे सार्वजनिक पैशांतून चालविलेली आहेत. आणि सुरुवातीला सुरु केलेली आणि पूर्णपणे स्थानिक अधिकाऱ्यांनी दिलेल्या आर्थिक सहाय्यावर चालविलेली आहेत.

ही दोनही प्रकारची प्रशिक्षण महाविद्यालये शिक्षण मंत्रालयाकडून अर्थ सहाय्य मिळते. मंत्रालय खाजगी महाविद्यालयांचा जवळजवळ ५०% खर्च उचलते, खासकरुन सुधारणेसाठी, इमारतीचा विस्तार आणि / किंवा बदल करण्यासाठी. बाकीचा खर्च ऐच्छिक संस्था करतात.

२.क.५ अध्यापक शिक्षणाचे अभ्यासक्रम आणि कार्यक्रम :

बहुतांशी प्रशिक्षण महाविद्यालये दोन वर्षांचे कार्यक्रम राबवित असले, तरी मॅक्नेर समितीच्या शिफारशीनुसार बहुधा तीन वर्ष पर्यंत कार्यक्रम वाढविण्याची सामान्यपणे प्रथा आहे.

ह्या प्रशिक्षण महाविद्यालये अभ्यासक्रम हे शिक्षण संस्थाच्या अभ्यास मंडळाने मान्य केलेले असतात. अभ्यासक्रम हे सखोल व सर्वकष असतात आणि शिक्षकांच्या कार्यांची सर्व अंगे त्यात सामावलेली असतात. अभ्यास मंडळे अभ्यासक्रमाची ढोबळमानाने रुपरेषा बनवितात आणि त्यातील तपशील हा प्रशिक्षण महाविद्यालयेच ठरवितात. इंग्लंडमधील प्रशिक्षण महाविद्यालयातील सध्याच्या अभ्यस व प्रात्यक्षिक कार्य खालील प्रमाणे आहे.

१) अभ्यास विषयक - अभ्यासक्रमाच्या ह्या भागातून विद्यार्थ्यांना सखोल शिक्षण देण्याचा उद्देश असतो. म्हणून त्यात ठराविक शालेय विषयांबद्दलचा प्रगत अभ्यास असतो.

२) व्यावसायिक अभ्यास - ह्याचा उद्देश विद्यार्थ्यांना अध्यापनाची तात्त्विक व प्रात्यक्षिक ज्ञान देणे हा असून ह्यात १) अध्यापनाची तत्त्वे व कृती, २) आरोग्य विषयक शिक्षण, ३) शिक्षणशास्त्राचा इतिहास, ४) शैक्षणिक मानसशास्त्र, ह्याचा समावेश होतो. खालील दोन शाखांचा खास अभ्यास करण्यासाठी संधी पुरविल्या जातात - अ) अगदी लहान मुलांना शिकविण्यासाठी ब) खालील माध्यमिक शाळेतील ७-११ वयोगटातील विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी.

३) सराव अध्यापन - हा अभ्यासक्रमातील प्रात्यक्षिकाचा भाग आहे. ह्यासाठी समान कार्यक्रम तयार केलेला नसला, तरी विद्यार्थ्यांना साधारणपणे एकंदरित बारा आठवड्यासाठी प्राध्यापकांच्या देखरेखीखाली शिकवावे लागते.

अध्यापक शिक्षणात, शिक्षणाची तात्त्विक बाजू, शैक्षणिक मानसशास्त्र, बालमानसशास्त्र, अध्यापनाच्या पद्धती व तंत्रे, शिक्षणातील अडचणी व त्यावरील उपाय, शालेय संघटन व प्रशासन ह्यांचा समावेश होतो. अभ्यासक्रमात, अध्ययन-अध्यायनातील प्रात्यक्षिक कार्यापेक्षा तात्त्विक ज्ञान अधिक भर दिलेला आहे. अभ्यासक्रम खालील पायऱ्यांच्या विचार करुन बनविलेला आहे.

१) प्राथमिक शाळेतील शिक्षक
२) माध्यमिक शाळेतील शिक्षक
३) मानसिक / शारीरिक व्यंग असलेल्या मुलांचे शिक्षक आणि कला व व्यावसायिक संस्थांतील शिक्षक आणि
४) प्रगत शिक्षण देणारे शिक्षक

शारीरिक शिक्षणाचा प्रशिक्षण कार्यक्रम आणि गृहशास्त्राचा कार्यक्रम तीन वर्षाचा तर कला आणि संगीताचा कार्यक्रम हा चार वर्षांचा आहे. विद्यार्थी - शिक्षक, पुरुष किंवा स्त्री कोणीही ह्यातील कोणत्याही कार्यक्रमासाठी प्रवेश घेऊ शकतो. प्रवेशासाठी सामान्य पात्रता आहे सामान्य शैक्षणिक प्रमाणपत्र.

२. क.६ अध्यापकांचे आणि त्यांच्या पात्रतांचे वर्गीकरण :

१) प्राथमिक शाळांचे शिक्षकः सामान्य शैक्षणिक प्रमाणपत्र व वय १८ वर्षे दोन वर्षांचे प्रशिक्षण, प्रशिक्षण शाळेत उपलब्ध आहे.

२) माध्यमिक शाळांचे शिक्षक : विद्यापीठाच्या अध्यापक प्रशिक्षण विभागात एक वर्षाचा प्रशिक्षण कार्यक्रम.

३) खास विषयांचे शिक्षकः कला, संगीत, शारीरिक शिक्षण इ. च्या खास प्रशिक्षण ह्यासाठी रॉयल आर्ट्स महाविद्यालये प्रमाणपत्र मिळते.

४) प्रगत शिक्षण - ह्यासाठी त्यांचा अनुभव हेच त्यांचे प्रशिक्षण

२. क.७ प्रशिक्षणासाठी निवड :

निवड ही अध्यापक संघटनेमार्फत किंवा थेट शाळेतून होते. निवड झालेल्यामध्ये एक तृतीयांश ह्या शिक्षिका असतात. ह्यामध्ये अशा मुली असतात, की ज्यांनी शिक्षण पूर्ण केलेले आहे आणि ज्यांना औद्योगिक किंवा व्यापारी संस्थांमध्ये काम करण्याचा १ / २ वर्षांचा अनुभव आहे. शिक्षिकाची मागणी ही दिवसेंदिवस वाढत आहे. तांत्रिक विषयातील प्रशिक्षणासाठी, औद्योगिक प्रशिक्षणार्थीची निवड केली जाते, एक वर्षाच्या उमेदवारी कालानंतर कायम स्वरुपी नेमणूक केली जाते.

अध्यापक महाविद्यालय संघटना व अध्यापक प्रशिक्षण विभाग, प्रशिक्षणासाठी तयार असणाऱ्या विद्यार्थ्यांना मदतीचा हात देतात. जे शिक्षण मंत्रालयाला व विद्यार्थ्यांना मोलाचा /महत्त्वाचा सल्ला देतात. जे तरुण विद्यार्थी / विद्यार्थीनीना प्रवेश मिळविण्यासाठीही मदत करतात. उत्सुक उमेदवार जेव्हा अध्यापक संघटनेला प्रवेशासाठी अर्ज करतो, तेव्हा त्याचा योग्य विचार होऊन, त्याला कोणत्यातरी प्रशिक्षण संस्थेत दाखल करण्यासाठी संघटना प्रयत्न करते.

२.क.८ शिक्षकांसाठी व्यावसायिक अटी

बहुधा शिक्षकांची नेमणूक ही शिक्षक व व्यवस्थापन ह्यांच्यातील सेवा करारानुसार होते. अनुदानित शाळामध्ये व्यवस्थापक शिक्षकाच्या नेमणूका करतो तर स्वयंसेवी संस्थांनी चालविलेल्या शाळामध्ये संपूर्ण व्यवस्थापन समिती, नेमणुका करते. अध्यापक संघटना सेवेच्या अटी ठरविण्यास मदत करते. शिक्षण कायदा १९४४ मध्ये समाविष्ट केलेल्या बर्नहॅम समितीच्या प्रस्तावानुसार अध्यापक संघटना व एल. ई. ए. एकत्रितपणे, शिक्षकांच्या सेवेच्या अटी ठरवितात.

आपली प्रगती तपासून पहाः

१) अध्यापक शिक्षणाचे अभ्यासक्रम व कार्यक्रम, ह्यांचे थोडक्यात वर्णन करा.

_____

_____

_____

_____

२. क.९ सारांश

पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक / मूलभूत शालेय अध्यापकांचे प्रशिक्षण :

प्राथमिक शाळेतील अध्यापकांकडे पदवी व विद्यापीठ किंवा उच्चशिक्षण महाविद्यालयाने दिलेले पदव्युत्तर शैक्षणिक पदविका प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. किंवा, वैकल्पिक, बी. एड. ची पदवी व 'प्रारंभिक अध्यापक प्रशिक्षण' (ITT) पूर्ण करुन 'पात्र अध्यापक दर्जा' प्राप्त करणे आवश्यक आहे. 'प्रारंभिक अध्यापक प्रशिक्षणाचे' मुख्य प्रकार म्हणजे, एक वर्षाचे शैक्षणिक कार्यक्रमाचे पदव्युत्तर प्रमाणपत्र किंवा शिक्षणशास्त्र स्नातक (बी. एड) कार्यक्रम.

माध्यमिक अध्यापकांचे प्रशिक्षण :

माध्यमिक शाळेचा शिक्षकांकडे एक पदवी व विद्यापीठ किंवा उच्च शिक्षण महाविद्यालयाने दिलेले शैक्षणिक पदव्यत्त प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. ह्याला पर्यायी, बी.एड्. पदवी आणि प्रारंभिक अध्यापक प्रशिक्षण पूर्ण करुन, पात्र अध्यापक दर्जा असणे गरजेचे आहे. प्रारंभिक अध्यापक प्रशिक्षाचे मुख्य प्रकार म्हणजे, एक वर्षाचे शैक्षणिक पदव्युत्तर प्रमाणपत्र किंवा चार वर्षाचा बी.एड्. कार्यक्रम.

२.क.१० नमुना प्रश्न:

- यु.के. मधील अध्यापक शिक्षणाची उद्दिष्टे कोणती ?
- पूर्वी अध्यापक सज्जतेची पद्धती कोणती होती ?
- आधुनिक काळातील अध्यापक शिक्षणाची विकास झाला त्याचा मागोवा घ्या ?
- अध्यापन कार्यक्रमासाठी विद्यार्थी निवडीची पद्धती थोडक्यात सांगा.
- अध्यापक शिक्षणाचे अभ्यासक्रम आणि कार्यक्रम स्पष्ट करा.

यु.एस.ए. मधील अध्यापक शिक्षण:

२.क.११ ऐतिहासिक पार्श्वभूमी :

१९ व्या शतकाच्या सुरवातीचा, यु.एस.ए. मध्ये अध्यापक शिक्षणाची सुरुवात खाजगी संस्था अध्यापक विद्यालय व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातून झाली. ह्याचा विकास तीन विशिष्ट टप्प्यातून अभ्यासता येईल.

१) अध्यापक विद्यालय चळवळ (१८२३-१८६०)

१९ व्या शतकाच्या सुरुवातीला खाजगी संस्थांनी अध्यापक प्रशिक्षण सुरु केले. सॅम्युअल आर. हॉल, ह्यांनी १८२३ मध्ये कनकॉर्ड, वेरमॉन्ट येथे पहिली अध्यापक शाळा स्थापन केली. युरोपीय अध्यापक शिक्षण प्रणालीतून प्रेरणा घेऊन, होरेस् मन्न, एडमंड व्हिट, सायप्रर पिअर्स, चार्लस् ब्रुक व इतरांनी त्याच्या प्रयत्नांना पाठिंबा दिला. १८३४ मध्ये जेम्स् कार्टस ह्यांनी लॅनकॅस्टर, मॅसॅसेट येथे शिक्षिकांसाठी शाळा काढली. अध्यापक विद्यालय

चळवळीला जनसामान्यांकडून भरघोस प्रतिसाद मिळाला. राज्य शासनानेही अध्यापक शिक्षणाच्या क्षेत्रात प्रवेश केला पहिली शासकीय सार्वजनिक अध्यापक विद्यालय १८३९ साली लेक्सींगटन, मॅसॅच्युसेट येथे जुलै १८३९ साली स्थापन झाले. ह्यानंतर बऱ्याच इतर राज्यांत व काऊंटी शालेय अधिकारी येथे ही अशा शाळा स्थापन झाल्या. १८६० पर्यंत १९७० सार्वजनिक अध्यापक शाळा स्थापन झाल्या.

अध्यापक शाळेमधील प्रशिक्षणाचा कालावधी साधारणपणे एक वर्षाचा असे. पण काही हुशार विद्यार्थ्यांना कमी कालावधीतही हा कार्यक्रम पूर्ण करण्याची मुभा होती. ज्या उमेदवारांनी एक वर्षाचा कार्यक्रम पूर्ण केला असेल त्यांना मॅसॅच्युसेट्टसच्या जिल्हा प्राथमिक शाळेत शिकविण्यासाठी प्रमाणपत्र दिले जाई. ज्याने प्राथमिक शालेय अभ्यासक्रम पूर्ण केला असेल, त्याला प्रवेश दिला जाई. अभ्यासक्रमात खालील सहा क्षेत्रांचा अंतर्भार केला जाई.

- सामान्य विषयांचा संपूर्ण उजळणी - स्पेलिंग्ज्, वाचन, लिखाण, भूगोल आणि अंकगणित
- काही माध्यमिक शालेय अभ्यासाचे विषय - भूमिती, बीजगणित, तत्त्वज्ञान इ. पण त्यात प्राचीन भाषांना समावेश नव्हता.
- मुलांची शारीरिक, बौद्धिक, नैतिक विकास
- सामान विषय शिकविण्याच्या पद्धती व तंत्रे
- शालेय कारभार चालविण्याची कला
- सराव अध्यापन

२) अध्यापक प्रशिक्षण (१८६०-१९१०)

यादवी युद्धाच्या दरम्यान, अमेरिकेत शिक्षणाचा प्रत्येक पातळीत मोठ्या प्रमाणात विस्तार झाला. जवळजवळ १८ लाखांवर मुले किंडरगार्टन व प्राथमिक शाळांमध्ये भरती झाली होती आणि ५ ते १३ वर्षाच्या वयाच्या मुलांच्या एकूण लोकसंख्येच्या गणतीच्या जवळ हा आकडा होता. १८७० च्या १८८० च्या दशकात माध्यमिक शाळेतील भरती ही खूप प्रमाणात वाढली. १८९० नंतर तर प्रत्येक दशकात हा आकडा दुप्पट होऊ लागला. १९१० पर्यंत हा आकडा १,०००,००० च्या ही पुढे गेला होता. आता लोकांना असे वाटायला लागले की "शिक्षकांचा दर्जा म्हणजेच शाळेचा दर्जा. "शिक्षणातज्ञ हे अध्यापक विद्यालयांच्या निष्पत्ती बदल असमाधानी होते. दोन दृष्टिकोनांतून तीव्रतेने सुधारणेची गरज जाणवू लागली - १) प्रशिक्षणाच्या कालावधीत वाढ, २) अध्यापक प्रशिक्षण अभ्यासक्रमात नवचैतन्य निर्माण करुन तो जास्त सर्वकष बनविणे.

१८५७ साली इलिनॉइस अध्यापक विद्यापीठाची स्थापना ही अध्यापक प्रशिक्षणात सुधारणा करण्याच्या दृष्टिने पाऊल होते. सामान्य शाळेच्या सर्व शाखांसाठी व माध्यमिक शाळेसाठी आवश्यक शिक्षक सज्जतेसाठी ह्या प्रशिक्षणाची आखणी केलेली होती. ह्याचे पदवीधर हे शैक्षणिक पुढारी, तसेच प्राथमिक शाळा शिक्षक बनू शकत होते.

यादवी युद्धा नंतर अध्यापक प्रशिक्षण कार्यक्रमाला आणखीन गती प्राप्त झाली. कित्येक विद्यापीठांनी शिक्षणशास्त्र विभाग सुरु केले. आयोवा विद्यापीठात १८७३ साली शिक्षणशास्त्रासाठी 'प्राध्यापक पद' तयार केले गेले. १८७९ साली मिशिगन विद्यापीठात "कला

व अध्यापन शास्त्रासाठी" प्राध्यापक पद सुरु केले गेले. १९ व्या शतकाच्या अखेरपर्यंत जॉन ड्युई, स्टॅनले हॉल, याँडाईक, चार्लस ज्युड, ह्यांच्यासारख्या शिक्षणतज्ञांच्या प्रोत्साहनामुळे अध्यापक प्रशिक्षण देणाऱ्या महाविद्यालये व विद्यापीठांची संख्या २४ एवढी झाली.

३) अध्यापक शिक्षण (१९१० नंतर):

अध्यापक शिक्षणाच्या इतिहासात २० व्या शतकाची सुरुवात ही अमेरिकेत, कलाटणी बिंदू ठरला. १९१० नंतर शिक्षणशास्त्रातील पदवीधर शिक्षकांच्या लौकिकात / दर्जात खूपच भर पडली व अध्यापकांचा व्यावसायिक दर्जा सुधारण्याच्या दृष्टिने खूप प्रयत्न केले गेले. जी स्टॅनले हॉल, जे. मॅक् कीन कॅटल, एडवर्ड टिचेनेर, ह्युगो मन्स्टरबर्ग, एडवर्ड एल् याँडाइक आणि चार्लस एच. ज्युड ह्यांसारख्या आघाडीच्या शिक्षणशास्त्रज्ञांनी आणि मानसशास्त्रज्ञानी ह्याला दिशा दिली.

शतकाच्या सुरुवातीच्या वर्षांत एकमेंकाशी निगडित अशा तीन चळवळी यु.एस.ए मध्ये झाल्याः

१) शैक्षणिक मानसशास्त्रीय चळवळ.

२) बालकांच्या अभ्यासाची चळवळ.

३) शैक्षणिक मापनाची चळवळ.

ह्या तिन्ही चळवळींचा एकत्रित परिणाम म्हणून, "शैक्षणिक प्रक्रियेत शास्त्रीय दृष्टिकोना" ची सुरुवात झाली. ह्या नवीन विचारांशी परिणीती म्हणून हळूहळू अध्यापक विद्यालयांची जागा, चार वर्षे (अभ्यासक्रम असेलल्या) अध्यापक महाविद्यालयांनी घेतली. १९२० च्या अखेरपर्यंत २१८ अध्यापक महाविद्यालये होती तर अध्यापक विद्यालये जवळजवळ संपुष्टात आली होती. "अध्यापक प्रशिक्षणाची जागा" अध्यापक शिक्षणाने घेतली होती. अध्यापक प्रशिक्षणामध्ये काही अध्यापन कौशल्यांचा समावेश होता, तर अध्यापक शिक्षणामध्ये मूलभूत तत्त्वांच्या आकलनाचा आंतर्भाव होता. अध्यापक महाविद्यालयांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षक सज्जतेची जबाबदारी उचलली. त्यांनी सामान्य शिक्षणाबरोबरच व्यावसायिक प्रशिक्षणही दिले. त्यातून खालील निष्पत्ती दिसून आल्या.

१) अध्यापक प्रशिक्षण संस्थांना दर्जा प्राप्त झाला. त्यांना मुक्त कला महाविद्यालयां सारखाच दर्जा प्राप्त झाला.

२) प्रशिक्षणाचा कालावधी एक वर्षापासून वाढवून ४ वर्षे इतका केला गेला, जेणेकरुन जास्त कुशल व सज्जता असलेले शिक्षक तयार झाले.

३) अध्यापक प्रशिक्षणाची जागा, अध्यापक शिक्षणाने घेतल्यामुळे, सामान्य व व्यावसायिक असे जास्त सखोल शिक्षण देण्याची सोय झाली.

आपली प्रगती तपासून पहा:

१) १८३३ ते १९१० पर्यंतची अध्यापक प्रशिक्षण प्रणाली स्पष्ट करा.

२) यु.एस.ए. मध्ये २० व्या शतकाची सुरुवात ही अध्यापक शिक्षणाच्या इतिहासातील कलाटणी बिंदू का समजला जातो ?

२.क.१२ यु.एस.ए. मधील अध्यापक शिक्षणाची उद्दिष्टे:

१) अध्यापक शिक्षणाचा कार्यक्रम हा लोकशाही जीवनशैलीत अनुरुप असा विकसित करणे.

२) विद्यार्थी शिक्षकांच्या व्यक्तिमत्त्वाचा योग्य विकास होण्यासाठी, त्यांना मुक्त-वातावरण उपलब्ध करुन देणे.

३) अध्ययन-अध्यापन प्रक्रिये संबंधी त्यांना तात्त्विक व प्रात्यक्षिक जाणीव करुन देणे.

४) अध्यापनाचा पद्धती, तंत्रे व अध्यापन साधने ह्यांच्या संदर्भातील कौशल्ये व क्षमता विकसित करणे.

५) अध्यापक शिक्षणाचा दूरस्थ-शिक्षण कार्यक्रम विकसित करणे.

६) विद्यार्थी शिक्षकात लोकशाही प्रवृत्ती विकसित करणे.

७) अध्यापक शिक्षणाा कार्यक्रम स्थानिक गरजांनुसार करणे. यु.एस.ए. मधील प्रत्येक विद्यापीठाच्या अध्यापक शिक्षण कार्यक्रमाचा नमुना वेगळअ आहे.

प्रमुख वैशिष्ट्ये :

१) एकच राष्ट्रीय प्रणाली नाही : अमेरिकेमध्ये विविधता आणि परिवर्तनशीलता असल्यामुळे तेथे अध्यापक शिक्षणाची एकच राष्ट्रीय प्रणाली नाही. तेथे माध्यमिक शाळा, अध्यापक विद्यालये, विद्यापीठाचे शिक्षणशास्त्र विभाग, असा अगणित संस्था आहेत आणि त्या, आपापले, एकमेकांपासून संपूर्णपणे भिन्न असलेले असे अभ्यासक्रम किंवा प्रणाली राबवितात. अमेरिकन शिक्षणशास्त्रज्ञांच्या मते "ह्या कामासाठी शिक्षकाना शिकविण्याचा एक मार्ग किंवा कोणतीही एक संस्था सर्वस्वी योग्य नाही".

२) संधींची समानता -अमेरिकेतील अध्यापक शिक्षणाचा प्रणालीनुसार समाजातील विविध स्तरातील - उच्च-कनिष्ठ, श्रीमंत-गरीब, स्त्री आणि पुरुषांना समान संधी व शिक्षक घडविणाऱ्या संस्थामध्ये प्रवेशाची सुसंधी उपलब्ध असते.

३) सहकार्यात्मक उपयोजना - अध्यापक शिक्षण प्रणाली ही सहकार्यात्मक आहे - कोणत्याही एका संस्थेची किंवा अधिकारी मंडळाची मक्तेदारी नाही ती राज्यशासनाच्या संस्था, स्थानिक संस्था, अध्यापक प्रशिक्षण महाविद्यालये, विद्यापीठे व मुक्त कला महाविद्यालये यांची एकत्रित भागिदारी आहे.

४) संपूर्ण विकासासाठी शिक्षण - अमेरिकनस शिक्षण म्हणजे शारीरिक मानसिक, नैतिक, सामाजिक, बौद्धिक ह्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्व पैलूंचा सर्वांगिण विकास, असे समजतात. म्हणूनच अध्यापक प्रशिक्षणाचा कार्यक्रम हा सखोल / विस्तृत असा असतो की जेणेकरुन योग्य प्रकारची व्यक्ती आणि योग्य शिक्षक तयार होईल. शिक्षणाच्या ह्या विस्तृत संकल्पनेमुळेच "अध्यापक प्रशिक्षण" बदलून "अध्यापक शिक्षण" बनले आहे.

५) सामान्य व व्यावसायिक शिक्षणाचे एकत्रित कार्यक्रम - ह्या एकत्रित कार्यक्रमांचा उद्देश अध्यापकांचे संपूर्ण शिक्षण - एक चांगली व्यक्ती व कार्यक्षण शिक्षक बनण्यासाठी अशा अभ्यासक्रमांचा कालावधी चार किंवा पाच वर्षाचा असून संयुक्तपणे बी. ए. किंवा बि. एस.सी. पदवीबरोबर शिक्षणशास्त्रातील पदवी किंवा पदविका मिळते.

६) सेवापूर्व व सेवांगर्तत अध्यापक शिक्षण हे एकमेकांना पुरक आहे - नाण्याच्या दोनही बाजूंप्रमाणेच ही दोन्हीही महत्त्वाची आहेत. म्हणून अध्यापक शिक्षण हे अध्यापक प्रशिक्षण संस्थामधील कालावधीपुरतेच मर्यादित नसून, ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे आणि ती शिक्षकाच्या व्यावसायिक कारकिर्दभर चालू रहाते.

आपली प्रगती तपासून पहा:

१) यु.एस.ए. मधील अध्यापक शिक्षणाची उद्दिष्टे लिहा.

२) यु.एस.ए. मधील अध्यापक शिक्षण प्रणालीची खास वैशिष्ट्ये कोणती ?

_____

_____

_____

_____

_____

२.क.१३ अध्यापक प्रशिक्षण संस्थांचे प्रकार :

अमेरिकेतील अध्यापक प्रशिक्षण विद्यालये किंवा महाविद्यालये ही दोन गटात विभागली जाऊ शकतात - १) सार्वजनिक, २) खाजगी सार्वजनिक संस्थाना अर्थसहाय्य व त्यांचे नियंत्रण हे सरकारकडे असते, तर खाजगी संस्था ह्या खाजगी संघटनानी चालविलेल्या व व्यवस्थापित असतात. ह्या संस्थामधील किंमत खूप जास्त असल्यामुळे, बहुतांशी खाजगी संस्था ह्यातून बाहेर पडलेल्या आहेत. त्यामुळे बहुतेक संस्था ह्या सार्वजनिक आहेत.

व्यवस्थापन व संघटनाच्या दृष्टिकोनातून अध्यापक शिक्षणाच्या चार प्रकारच्या संस्था आहेत.

१) अध्यापक विद्यालये - अध्यापक विद्यालयाच्या चळवळीला १९ व्या शतकात जोर चढला. ह्यात मुख्यत्वेकरुन प्राथमिक शिक्षकांचे प्रशिक्षण होत असे व ह्याचा कालावधी जवळपास एक वर्षाचा असे. अभ्यासक्रम त्रोटक व खालील बाबींपुरताच मर्यादित होता.

१) भाषा, भूमिती, बीजगणित, अंकगणित, भूगोल इ. सामान्य शालेय विषयांची उजळणी.

२) विद्यार्थ्यांची मानसिक व नैतिक विकास.

३) अध्यापनाची तत्त्वे आणि पद्धती.

हल्लीच अध्यापक विद्यालयांमध्ये खूपच बदल झालेला आहे. ती जास्त प्रगमनशील बनली आहेत व प्राथमिक शाळेसाठी शिक्षकांचा प्रशिक्षण-कालावधी तीन वर्षांचा आहे. अभ्यासक्रम जास्त सर्वकष व एकत्रित बनलेला आहे. अभ्यासक्रमात विषयासंबंधीची ओळख तसेच व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते. अलिकडे बहुतेक सगळ्या अध्यापक विद्यालयांची जागा, अध्यापक महाविद्यालयांनी घेतलेली आहे.

२) अध्यापक महाविद्यालये - २० व्या शतकाच्या दुसऱ्या चतुर्थांशात (१९२५-१९५०) अध्यापक विद्यालये बदलून त्यांनी जागा जास्त प्रगत व आधुनिक अशा अध्यापक प्रशिक्षण संस्थांनी घेतली. ह्याला अध्यापक, अध्यापक शिक्षक आणि राष्ट्रीय शैक्षणिक संघटने सकट (National Educational Association) कित्येक सार्वजनिक संस्थाकडून उत्तेजन असल्यामुळे, ह्या चळवळीने जोर धरला. ही महाविद्यालये पूर्णपणे फक्त अध्यापक प्रशिक्षकाचे कार्य करीत आणि प्राथमिक व माध्यमिक शाळांसाठी ४ किंवा ५ वर्षांचे संकलित कार्यक्रम राबवीतात. ते पदवी देणाऱ्या संस्थांचे कार्य करतात. ह्यातील कितीतरी महाविद्यालये शिक्षणशास्त्रातील पदव्युत्तर अभ्यासक्रम राबवितात तर काही, अध्यापक शिक्षणातील 'विद्यावाचस्पती' (PHD in teacher education) ही पदवी ही बहाल करतात. त्यातील काही तंज्ञ अध्यापकांचे मार्गदर्शन करतात व महाविद्यालये व विद्यापीठ प्राध्यापकांसाठी ही कार्यक्रम राबवितात. विषय आशय आणि अध्यापन कला ह्यांचा पाया भक्कम करण्यासाठी सामान्य व व्यावसायिक एकत्रित कार्यक्रम, हे ह्या महाविद्यालयांचे मुख्य वैशिष्ट्य आहे.

३) शिक्षणशास्त्राचे विभाग : मोठ्या मुक्त कला महाविद्यालये व विद्यापीठे, ह्यांचे छोटे भाग म्हणून शिक्षणशास्त्र विभाग सुरु केले गेले. अध्यापन कलेत शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी, आयोवा विद्यापीठाने सर्वप्रथम 'अध्यापनशास्त्रीय विभाग' (Department of Pedagogy) हा स्वतंत्र विभाग सुरु केला. त्याच्या यशामुळे इतर कित्येक विद्यापीठे आणि मुक्त काला महाविद्यालये, प्रेरित झाली. देशभर ह्या चळवळीने जोर पकडला आणि सर्व संस्थांनी शिक्षणशास्त्र विभाग सुरु केले. ह्या विभागांचे मुख्य कार्य, भावी शिक्षकांना सर्वकष शिक्षण देणे, पुढील शिक्षणाच्या संधी पुरविणे, अध्यापनशास्त्रातील व अध्यापन पद्धतीत संशोधन करणे, हे होते.

४) शिक्षणशास्त्र शाळा व महाविद्यालये : विद्यापीठात स्थापन झालेले शिक्षणशास्त्र विभाग व मुक्त कलांची महाविद्यालये, ह्यामुळे विविध विद्यापीठात शिक्षणशास्त्र विभाग व शिक्षणशास्त्र

महाविद्यालये सुरु करण्याची नवीन लाट आली. मिशिगन विद्यापीठाने शिक्षणशास्त्रातील प्राध्यापक पदे निर्माण करण्यात पुढाकार घेतला व हे उदाहरण घेऊन आणखीन कितीतरी विद्यापीठांनी, अध्यापनशास्त्रातील तात्त्विक व प्रात्यक्षिकासंबंधी संशोधनासाठी आणि अध्यापक शिक्षणातील अडचणीसंबंधी सखोल अभ्यास करण्यासाठी त्यांचे स्वतःचे शिक्षणशास्त्र विभाग सुरु केले.

अंतर्गत स्वायत्तता, स्वतंत्र व्यवस्थापन व आर्थिक व्यवस्थापन ह्यामुळे शिक्षणशास्त्र विद्यालये व महाविद्यालये लोकप्रिय झाली. ते स्वतःचे अंदाजपत्रक नियंत्रित करीत व यशस्वी उमेदवाराला पदवी बहाल करीत. त्यांनी अध्यापक शिक्षणाचा जास्त सखोल कार्यक्रम तयार केला आणि भावी शिक्षकांच्या व्यावसायिक प्रशिक्षणाला नवीन दिशा दिली. त्यांनी १९ व्या शतकात उपलब्ध नसलेले अतिशय सुयोग्य / संबंधित असे शिक्षणशास्त्रातील साहित्य निर्माण केले.

आपली प्रगती तपासून पहाः

१) यु.एस.ए. मध्ये प्रचलित विविध अध्यापक शिक्षण प्रणाली कोणत्या आहेत ?

_____

_____

_____

_____

_____

२.क.१४ अभ्यासक्रम आणि अभ्यासाचे कार्यक्रम :

अध्यापक महाविद्यालये, तसेच शिक्षणशास्त्र महाविद्यालये ह्यात राबविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाचा मुख्य हेतु हा भावी शिक्षकांना परिपूर्ण, सर्वंकष शिक्षण देणे हा आहे. विषयात (आशयात) तसेच अध्यापनाच्या कलेत सखोल पाया बनविण्याच्या दृष्टिने सामान्य व व्यावसायिक कार्यक्रमांचे एकत्रिकरण करणे हे त्यांचे कार्य आहे. बहुतेक संस्थामध्ये अध्यापक प्रशिक्षणाचे कार्यक्रम तीन ते पाच वर्षाचे आहेत. अमेरिकेतील प्रत्येक अध्यापक प्रशिक्षण कार्यक्रमात खालील तीन मूलभूत घटकांचा अंतर्भाव असतो.

१) सामान्य शिक्षण
२) व्यावसायिक शिक्षण आणि
३) विशिष्ट क्षेत्रातील खास प्राविण्य.

१) सामान्य शिक्षण - बहुतेक सर्व संस्था भावी शिक्षकांना कमीत कमी दोन वर्षे सामान्य शिक्षण शिकवितात, जेणे करुन सद्य परिस्थितीत ते स्वतःसाठी योग्य स्थान बनवू शकतील. अमेरिकन शिक्षण मंडळाच्या अध्यापक शिक्षण मंडळाच्या शब्दात, "भावी शिक्षकांच्या शिक्षणातून ज्ञान, कौशल्ये, दृष्टिकोन व आवड विकसित झाली पाहिजेत की जी समकालीन इतर

व्यवसायिकांच्या गरजा व जबाबदाऱ्यांशी मूलभूतरित्या संबंधित असावीत.” अशा प्रकारच्या शिक्षणाचे उद्दिष्ट हे मिश्र समाजातील, इतर व्यावसायिकांना सांस्कृतिक सामाजिक व शैक्षणिक पार्श्वभूमी देणे हे आहे. ह्याच्या आशयात मानवतावाद, सामाजिक अभ्यास आणि शास्त्र ह्यांची ओळख करुन देणारे अभ्यासक्रम असतात. कधी कधी वेगवेगळ्या विषयांची ओळख करुन देणारे अभ्यासक्रमही असतात आणि ते संप्रेषण कौशल्ये विकसित करण्यावर भर देतात.

२) व्यावसायिक शिक्षण - शिक्षक प्रशिक्षणांतर्गत व्यावसायिक कौशल्ये व तंत्रे शिकविणे हा ह्याचा उद्देश असतो. ह्याचे दोन भाग असतातः तात्त्विक बाजू व सराव अध्यापन.

अ) तात्त्विक बाजूः अध्यापनशास्त्राच्या चार वर्षाच्या कार्यक्रमात तात्त्विक बाजूची पहिल्या किंवा दुसऱ्या वर्षात ओळख करुन दिली जाते व ती कार्यक्रमाच्या अखेरपर्यंत चालते. ह्या संदर्भातील अभ्यासक्रमातील विषय व त्यासाठी दिला गेलेला सत्रातील वेळ खालील प्रमाणे आहे.

पाठ्यक्रम	तास
निरिक्षण व वाचन	२
शैक्षणिक मानसशास्त्र	३
अमेरिकन सार्वत्रिक शिक्षण	३
अध्यापन पद्धती	३
शाळअ व समाज ह्यातील संबंध	२
शैक्षणिक तत्त्वज्ञानाची ओळख	३
विद्यार्थी अध्यापन व खास पद्धती (Special method)	१०
शिक्षणशास्त्र व मानसशास्त्रातील वैकल्पिक विषय	२ ते ४
एकूण	**२८ ते ३०**

ब) सराव अध्यापन - ह्याला विद्यार्थी अध्यापन असेही म्हणतात. सराव अध्यापन हे व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या उत्तरार्धात, विद्यार्थी शिक्षक विद्यापीठाच्या प्रायोगिक शाळेत किंवा नेहमीच्या सार्वजनिक शाळांमध्ये करतात. ह्यात पाठांचे निरिक्षण, पाठाबद्दलची चिकित्सक चर्चा आणि नंतर महाविद्यालय किंवा विद्यापीठाशी संलग्न असलेल्या निष्णात पर्यवेक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्यक्ष वर्गात शिकविणे, ह्याचा अंतर्भाव असतो.

वैद्यकीय महाविद्यालयांच्या “विद्यार्थी सेवा कालाच्या” धर्तीवर, सराव अध्यापनालाही “अध्यापनातील विद्यार्थी सेवा” असे म्हटले जाते. ह्यात, विद्यार्थी-शिक्षक हे सहकार्य करणाऱ्या शाळांतील वरीष्ठ शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सतत आठ ते नऊ आठवडे कार्य करतील असे समजले जाते. विद्यार्थी सेवा कालाचा संपूर्ण कार्यक्रम हा महाविद्यालयातील अधिव्याख्याता (पर्यवेक्षक) हा शाळेतील वरीष्ठ शिक्षकांच्या (समीक्षक शिक्षक) विचारविनिमयाने विद्यार्थी शिक्षकांबरोबर आखून पार पडतो.

३) विशिष्ट विषयातील खास प्राविण्य - अमेरिनसना असे विशेष वाटते की विद्यार्थी शिक्षकाला विषय शिकवायचा आहे. त्यात प्राविण्य हे सर्वात महत्त्वाचे आहे. विषयात स्वतःला प्राविण्य असल्या शिवाय, तो आपल्या विद्यार्थ्यांना पूर्ण व योग्य ज्ञान देऊ शकत नाही. म्हणून विद्यार्थी-शिक्षकांना आपल्या आवडीच्या (एक किंवा एकापेक्षा जास्त) विषयात प्राविण्य मिळविणे आवश्यक असते. खूपशा संस्थातील अलिकडिल प्रथा अशी आहे, की पूरक क्षेत्रात किंवा विषयात, उदा. सामाजिक शास्त्रे, भाषा, सामान्य विज्ञान इ. चा शालेय अभ्यासक्रमाशी सुसंवाद साधणे.

२.क.१५ उच्च शिक्षणातील शिक्षकांचे प्रशिक्षण

राज्यीय माध्यमिक शिक्षण उपरात शिक्षकांच्या गरजेबद्दलचे राज्याचे नियम बदलतात. पण राज्यीय शिक्षक हे राज्य शासनाचे कर्मचारी समजले जात नाहीत आणि त्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक दर्जा, गरज. तसेच त्यांची भरती व पदोन्नती ठरविण्याची जबाबदारी ही विशिष्ट संस्थेची, विभागाची किंवा शाळेची असते. राज्यातील कायदा, सार्वजनिक संस्थासाठी सुद्धा, फक्त एवढ्यापुरताच सिमित असतो की जेणे करुन हे बघितले जाते की संस्था, नियुक्तीच्या वेळी काही भेदभाव करत नाहीत किंवा इतर सेवा विनिमय किंवा कार्मिक कायद्यांचे अतिक्रमण करत नाहीत. संस्था जे दर्जे ठरविले ते, शिक्षकांनी किती दर्जापर्यंत शिकवावे ह्याबद्दलची अपेक्षा, शिकविण्याचा विषय किंवा क्षेत्र, संशोधनाची आवश्यकता आहे का, व्यावसायिक प्रमाणपत्र किंवा पात्रता आवश्यक आहेत का, स्थान पूर्णवेळाचे आहे की अर्धवेळाचे आणि पूर्वानुभव (कार्यानुभव) ह्यावर अवलंबून असतात. अधिकृत (मूल्यांकित) संस्था सुद्धा, ज्यांच्या अखत्यारित येतात अशा स्थानीय मूल्यांकन संघटनेने ठरविलेल्या शिक्षकांचा दर्जा तसेच विशिष्ट क्षेत्रातील कार्यक्रमाच्या मूल्यांकनाचा संघटनेने ठरविलेला दर्जा पाळते. उच्च शिक्षणातील शिक्षकांकडे त्यांच्या खास विषय शिकविण्यासाठी आवश्यक नैपुण्य व पात्रता असणे, तसेच गरजेप्रमाणे संशोधन व सल्ला देण्याची क्षमता असणे आवश्यक समजले जाते. सामान्यतः विषयातील विद्याबाचस्पती ही पदवी (PHD) किंवा त्याच्या सारखीच पदवी, किंवा व्यावसायिक व वैद्यकीय विषयातील शिक्षकांसाठी योग्य व्यावसायिक पात्रता आणि यशस्वी व्यवसाय व उपयोजित संशोधन आवश्यक असते.

आपली प्रगती तपासून पहा:

१. यु.एस.ए. मधील अध्यापक शिक्षणाच्या अभ्यासक्रमाची महत्त्वाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२. यु.एस.ए. मध्ये उच्च शिक्षणातील शिक्षकांसाठी प्रशिक्षणाच्या गरजा काय आहेत ?

_____

_____

_____

_____

_____

_____

२. क.१६ सारांश

पूर्व-प्राथमिक आणि प्राथमिक /मूलभूत शालेय शिक्षकांचे प्रशिक्षण:

बालकांचे सुरुवातीचे शिक्षण (नर्सरी, किंडरगार्टन व शालापूर्व) तसेच प्राथमिक शिक्षण ह्यासाठीच्या शिक्षकांच्या शिक्षणाच्या व प्रमाणपत्राच्या गरजा राज्य शासन ठरविते व अध्यापक शिक्षणात प्रवेश घेण्यासाठी विषयातील विविध परीक्षा तसेच प्रमाणपत्र मिळविण्यापूर्वीचे अध्यापक शिक्षण आवश्यक असते. प्रत्येक राज्याचे नियम वेगळे असले तरीही संघराज्याच्या 'कोणीही बालक मागे रहाता कामा नये' ह्या नियमानुसार उच्च शिक्षण विभुषित शिक्षकांच्या आवश्यकते बद्दलची एकसूत्रता प्रेरित झालेलली आहे. पदवी पूर्वीच्या पातळीला सांगितलेला अभ्यासक्रम प्रवेश मिळण्यासाठी पूर्ण करणे, तसेच पर्यवेक्षित प्रात्यक्षिक व परिक्षा पास होणे गरजेचे आहे. पूर्व व्यावसायिक पदवीपूर्व अभ्यासक्रम हा मूल्यांकित केलेल्या संस्थेतून करण्याची अट जवळजवळ सर्वच राज्यात आहे. प्राथमिक प्रमाणपत्र हे पहिल्या पदवीच्या आधारावर मिळाले तरीही प्रगत प्रमाणपत्रासाठी बहुतेक राज्यात, अनुभव व जास्त शिक्षणाची गरज असते व बहुतेक शिक्षक ह्या पातळीपर्यंत पदव्युत्तर पदवी प्राप्त करतात. मान्यताप्राप्तता चालू रहाण्यासाठी निरंतर व्यावसायिक शिक्षणाची गरज असते.

माध्यमिक शालेय शिक्षकांचे प्रशिक्षण:

मूलभूत प्रमाणपत्र पूर्व अटी माध्यमिक शाळेतील शिक्षकांसाठी, प्राथमिक शाळेतील शिक्षकांप्रमाणेच असतात. मुख्य फरक असा असतो की, माध्यमिक शाळेतील शिक्षक हे एक किंवा जास्त शैक्षणिक विषयात व व्यावसायिक विषयात तज्ञ असल्याचे प्रमाणपत्र दिले जाते व त्यांना आपली सर्व कारकिर्द, ह्या विषयांवर केंद्रित करावी लागते, तर प्राथमिक शिक्षक- मुख्यतः खालच्या वर्गांचे हे प्राथमिक पातळीवरचा संपूर्ण अभ्यासक्रम शिकविण्यासाठी प्रमाणित असतात किंवा स्तरित उच्च प्राथमिक शाळेत शिकविण्यासाठी विशिष्ट प्राविण्य प्राप्त असतात. सर्व राज्य शिक्षकांना विषयाच्या प्राविण्यानुसार किंवा पातळीनुसार प्रमाणित करतात. खास शिक्षणाचे शिक्षका (Special Education Teachers) बहुतेक राज्यांमध्ये पदवीपूर्व व पदवी पातळीवर विशेष कार्यक्रमाद्वारे वेगळ्या प्रकारे प्रमाणित केले जातात. त्यांना विशिष्ट शिक्षणानुसार उदा. बहिऱ्यांसाठीचे शिक्षण, अंधांसाठीचे शिक्षण, तसेच किती पातळीपर्यंतच्या व्यंगासाठी त्यांचे प्रशिक्षण झाले आहे, त्यानुसार प्रमाणित केले जातात. जरी खास शिक्षणाची किमान शैक्षणिक पात्रता, ही खास शिक्षणातील किंवा संलग्न विषयातील उदा.विकासनात्मक मानसशास्त्र (developmental psychology) पहिली पदवी असली, तरीही बहुतेक शिक्षक पदव्युत्तर पात्रता (master degree) मिळवितात. थसेच खूपसे शिक्षक 'शिक्षण विशेषज्ञ' (Education Specialist) ही पदवी प्राप्त करतात. यु.एस् च्या बहुतेक राज्यांमध्ये खास शिक्षकेत्तर कर्मचारीही प्रमाणित असावे लागतात. ह्यात शाळा व्यवस्थापक, मार्गदर्शक, शालेय आरोग्य कर्मचारी (मानसशास्त्रज्ञ, परीचारिका), ग्रंथपाल, पर्यवेक्षक शिक्षक व अभ्यासक्रम तज्ञांचा समावेश होतो.

उच्च शिक्षण शिक्षकांचे प्रशिक्षण : सार्वजनिक, माध्यमिक शिक्षणा नंतरच्या शिक्षकांबद्दलचे नियम राज्याप्रमाणे बदलतात. पण राज्यीय शिक्षके हे सरकारी कर्मचारी समजले जात नाहीत. आणि त्यांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, शिक्षकांच्या स्थानांबद्दलची गरज, भरती व पदोन्नती हे विशिष्ट संस्था, विभाग किंवा शाळेची असते. राज्यातील कायदा, सार्वत्रिक

संस्थासाठी सुद्धा, संस्था नियुक्तीच्या वेळी काही भेदभाव करीत नाहीना किंवा सेवाविनिमय किंवा कार्मिक कायद्यांचे अतिक्रमण करीत नाहीना हे पहाण्यापुरताच मर्यादित असतो संस्थांचे दर्जे ठरविते ते, शिक्षकांनी किती दर्ज्यापर्यंत शिकविणे अपेक्षित आहे, व्यावसायिक प्रमाणपत्र किंवा पात्रता आवश्यक आहे का, स्थान पूर्णवेळेचे आहे की अर्धवेळेचे आणि पूर्व कार्यनुभव ह्यावर अवलंबून असते. मूल्यांकिता संस्था सुद्धा, स्थानीय मूल्याकन संघटनेने ठरविलेल्या शिक्षकांचा दर्जा, विशिष्ट कार्यक्रमांबद्दलचा मूल्यांकन दर्जा पाळते. उच्च शिक्षणातील शिक्षकांकडे खास विषय शिकविण्यासाठी आवश्यक नैपुण्य व पात्रता असणे, तसेच गरजेप्रमाणे संशोधन व सल्ला देण्याची क्षमता असणे आवश्यक समजले जाते. सामान्यतः विषयातील विद्याबाचस्पती ही पदवी (PHD) किंवा त्याच्या तोलाची पदवी, किंवा व्यावसायिक किंवा वैद्यकीय विषयातील शिक्षकांसाठी योग्य व्यावसायिक पात्रता आणि यशस्वी व्यवसाय व उपयोजित संशोधन आवश्यक असते.

घटका अखेरचा अभ्यास:

१. युएसए मध्ये १८२३ ते १९१० ह्या कालावधीतील अध्यापक सज्जतेची पद्धती कोणती होती ?

२. १९१० नंतरची अध्यापक सज्जतेची प्रणाली स्पष्ट करा.

३. युएसए मधील अध्यापक शिक्षणाची उद्दिष्टे कोणती ?

४. अमेरिकेतील अध्यापक प्रशिक्षण कार्यक्रमाचे मूलभूत भाग स्पष्ट करा.

❖❖❖❖

२ड

(ड) चीन आणि दक्षिण आफ्रिकेतील अध्यापक शिक्षण

घटक रचना :

२. ड.० उद्दिष्टे

२. ड.१ प्रस्तावना

२. ड.२ चीन मधील अध्यापक शिक्षण

- २. ड.२.१ सेवापूर्व अध्यापक शिक्षण
- २. ड.२.२ प्राथमिक आणि माध्यमिक शालेय शिक्षकांसाठी सेवापूर्व अध्यापक शिक्षण
- २. ड.२.३ सेवांतर्गत शिक्षण

२. ड.३ उच्च शिक्षणातील शिक्षक

२. ड.४ दक्षिण आफ्रिकेतील अध्यापक शिक्षण

- २. ड.४.१ अध्यापकांचे प्रारंभिक व्यावसायिक शिक्षण
- २. ड.४.२ निरंतर व्यावसायिक प्रशिक्षण व विकास

२. ड.५ अध्यापक शिक्षण प्रणाली व्यवस्थापनाच्या संस्था

२. ड.६ सारांश

२. ड.० उद्दिष्टे

हा घटक अभ्यासल्यावर विद्यार्थी

- चीन मधील अध्यापक शिक्षण प्रणालीचे ज्ञान प्राप्त करतील
- दक्षिण आफ्रिकेमधील अध्यापक शिक्षण प्रणालीचे ज्ञान प्राप्त करतील
- चीन व द. आफ्रिकेमधील अध्यापक शिक्षण प्रणालीची तुलना करु शकतील.

२. ड.१. प्रस्तावना

अध्यापक शिक्षण हा चीनी समाजवादी शिक्षण प्रणालीचा महत्त्वाचा भाग आहे. चीनी जनता प्रजातंत्राच्या (People's Republic China) स्थापनेनंतरच्या गेल्या ५० वर्षांच्या विकासात सरकारने विविध पातळीवर अध्यापक शिक्षणाला खूप काळजीपूर्वक महत्त्व दिले आहे. विविध प्रकारच्या व वेगवेगळ्या पातळींवरील मूलभूत शिणणाच्या गरजा भागविल्या जातील अशा

प्रकारची अध्यापक शिक्षण प्रणाली चीनने स्थापित केलेली आहे. चीनच्या विशिष्ट परिस्थितीला स्त्री प्रणाली योग्य आहे आणि तेथे शिक्षक-प्रशिक्षणाच्या स्वतंत्र संस्था आहेत.

१९८५ साली सरकारने १० सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून घोषित केला जो कोणत्याही व्यवसायासाठी साजरा होणारा पहिला दिवस आहे. ह्यातून शिक्षकांचा सामाजिक दर्जा व रहाणीमान सुधारण्यासाठी सरकारने केलेला प्रयत्न जाणवितात.

सरकारने अध्यापनाचा दर्जा सुधारण्यासाठी सरकारने अध्यापक शिक्षणाचा राष्ट्रीय आंतरजाल कार्यक्रम (Nationwide Program of Network for Education of Teachers) सुरु केला आहे. ह्याचा उद्देश, शैक्षणिक माहितीतून, अध्यापक शिक्षण आंतरजालातून आयुष्यभर शिक्षणाची सोय व सेवा, दूरदर्शन उपग्रह आंतरजाल व इंटरनेट ह्यांच्या माध्यमातून अध्यापक शिक्षणाचे आधुनिकीकरण करणे व प्राथमिक व माध्यमिक शालेय शिक्षकांचा अध्यापनाचा दर्जा विस्तृत, उच्च दर्जाचा व अती-कार्यक्षम अशा प्रशिक्षणातून व निरंतर शिक्षणातून सुधारणे असा आहे.

२. ड.२ चीनमधील अध्यापक शिक्षण :

चीन मधील अध्यापक शिक्षण दोन भागांनी बनते - सेवापूर्व शिक्षण व सेवांतर्गत शिक्षण.

२. ड.२.१ सेवापूर्व अध्यापक सिक्षण:

- चार वर्षे अध्यापक प्रशिक्षण संस्था, ह्यात सामान्य विद्यापीठे व महाविद्यालयांचा समावेश आहे. (उच्च व खालच्या माध्यमिक शाळेतील शिक्षक)
- तीन वर्षांची अध्यापक प्रशिक्षण महाविद्यालये (प्राथमिक शाळेतील शिक्षक)
- माध्यमिक शिक्षक प्रशिक्षण शाळा (किंडरगार्टन व खास शिक्षण संस्थांसाठी शिक्षक)

सेवांतर्गत शिक्षण (प्राथमिक व माध्यमिक शाळांसाठी शिक्षक)

टपाल शिक्षण कार्यक्रम, राज शाळा, उपग्रह दूरदर्शन शिक्षण आणि स्वयंअध्यायित अध्ययनार्थीसाठी परीक्षा.

खास शिक्षक-प्रशिक्षण शाळांची १९९८ मधील सांख्यिकी :

	शाळा	पटसंख्या	नवीन विद्यार्थी	पदवीधर	शिक्षक
अध्यापन विद्यापीठे व महाविद्यालये	२२९	६९३६००	२५११००	१९६८००	७६६००
माध्यमिक शिक्षक प्रशिक्षण विद्यालये	८७५	९२११००	३१९३००	३०५८०००	६३४०
शैक्षणिक संस्था	१९०	२१२००	८२२००	६६२००	१८७००
सेवांतर्गत शिक्षक प्रशिक्षण विद्यालये	२०८७	३७१०००	१२१६००	१६८२००	४६३००

राज्य मंडळाने १२ डिसेंबर १९९५ रोजी शिक्षक पात्रतेसंबंधी कायदा जाहिर केला, ज्यानुसार शिक्षक भरतीचा दर्जा काटेकोरपणे नियंक्षित केला गेला आणि नोकरी घेण्यापूर्वी शिक्षकी प्रमाणपत्र आवश्यक बनले. समाजातील सुक्षम व्यक्ती आणि इतर खास विषयांचे पदवीधर ही शिकविण्यासाठी भरती केले जाऊ शकले.

२. ड.२.२ प्राथमिक आणि माध्यमिक शाळा शिक्षकांचे सेवापूर्व प्रशिक्षण :

सामान्य उच्च अध्यापक शिक्षण (General Higher Teachers Education)

चीन मध्ये सामान्य उच्च अध्यापक शिक्षण मुख्यतः माध्यमिक शाळा शिक्षकांसाठी असते. १९९८ मध्ये चीनमध्ये ६९०,००० पटसंख्या असलेल्या २२९ सामान्य उच्च शिक्षणसंस्था होत्या.

माध्यमिक शाळा शिक्षकांचे प्रशिक्षण

- अध्यापन विद्यापीठै, शिक्षक प्रशिक्षण संस्था आणि शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालये वरिष्ठ माध्यमिक शालेय शिक्षण पूर्ण केलेल्यांना प्रवेश देतात.
- ४ वर्षाचा कार्यक्रम : वरिष्ठ माध्यमिक शालेय शिक्षक
- २/३ वर्षांचा कार्यक्रम : कनिष्ठ माध्यमिक शाळा
- वैशिष्ट्ये : अध्यापनशास्त्र, शालेय-पूर्व शिक्षण, खास / विशेष शिक्षण, मानसशास्त्र, शैक्षणिक तंत्रज्ञान, चीनी-भाषा, साहित्य, विचारसरणी व राज्यशास्त्रीय शिक्षण, इतिहास, इंग्रजी, रशियन, जपानी भाषा, गणित व उपयोजित गणित, संगणकशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, भूगोल, संगीत, कला आणि शारीरिक शिक्षण.
- पदव्यूत्तर कार्यक्रम आणि माध्यमिक शालेय शिक्षकांसाठी सेवांतर्गत प्रशिक्षण

नियमित माध्यमिक अध्यापक शिक्षण :

प्राथमिक शाळा, किंडरगार्टन आणि खास / विशेष शिक्षणासाठी शिक्षक प्रशिक्षण.

- कनिष्ठ माध्यमिक शालेय शिक्षण पूर्ण केलेल्यांना प्रवेश
- कार्यक्रमाचा कालावधी : ३ ते ४ वर्षे
- ४ विभागात असलेला कार्यक्रम :
- अनिवार्य अभ्यासक्रम
- वैकल्पिक अभ्यासक्रम
- सराव अध्यापन
- सहशालेय कार्यक्रम

अनिवार्य अभ्यासक्रम : (चिनी) विचारसरणी व राज्यशास्त्रीय शिक्षण, चिनी भाषा (ज्यात प्राथमिक शाळेत चिनी भाषा शिकविण्याच्या पद्धतीचा आंतरभाव असतो), गणित (पद्धतीसह),

भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, इतिहास, भूगोल, मानसशास्त्र, प्राथमिक शाळेसाठी अध्यापनशास्त्र, मूलभूत हक् - श्राव्य शिक्षण, शारीरिक शिक्षण, संगीत, कला, क्रर्मिका कौशल्ये (Laboring skills), संगणक मूलभूत शिक्षण.

वैकल्पिक अभ्यासक्रम : व्यावसायिक आणि तांत्रिक विषय.

सराव अध्यापन :

- प्राथमिक शाळांना भेटी
- शैक्षणिक सर्वेक्षण
- अध्यापन उमेदवारी काल (Teaching probation)
- प्रायोगिक अध्यापन

सहशालेय कार्यक्रम : व्याख्याने, विद्यार्थ्यांचा शास्त्र आणि तंत्रज्ञान, कला आणि खेळ ह्या शाखांचे शिक्षण मिळण्यासाठी खास आवड गटांचे नियोजन आणि सामाजिक सर्वेक्षण.

माध्यमिक खास शिक्षक प्रशिक्षण शाळा

खास शिक्षणासाठी प्राथमिक शाळांसाठी अध्यापक शिक्षण

- तीन खास शिक्षक : बहिऱ्यांसाठी, आंधळ्यांसाठी आणि मतीमंदांसाठी.
- कनिष्ठ माध्यमिक शाळा पूर्ण केलेल्यासाठी प्रवेश.
- कार्यक्रमाचा कालावधी : ३ ते ४ वर्षे
- चार विभागात असलेला कार्यक्रम :
- अनिवार्य अभ्यासक्रम
- वैकल्पिक अभ्यासक्रम
- सराव अध्यापन
- सहशालेय कार्यक्रम

अनिवार्य अभ्यासक्रम :

सार्वजनिक व खास सक्तीचा अभ्यासक्रम, अशी विभागणी केलेली आहे.

सार्वजनिक सक्तीचा अभ्यास : (चिनी) विचारसरणी व राज्यशास्त्रीय शिक्षण, चिनी, गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, इतिहास, भूगोल, मूलभूत मानसशास्त्र, शारीरिक शिक्षण, संगीत, कला, मूलभूत अध्यापनशास्त्र, खास अध्ययनची ओळख आणि कार्मिक कौशल्ये.

खास अनिवार्य अभ्यासक्रम :

- मानस शास्त्र
- अध्यापन शास्त्र
- (अध्यापन) पद्धती आणि
- विकृती / व्यंग थांबविण्यासाठी आणि तपासण्यासाठीचे इतर कार्यक्रम

वैकल्पिक अभ्यासक्रम

विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा कक्षा रुंदावण्यासाठी त्यांची आवड व विशेष कौशल्ये विकसित करण्यासाठी बनविलेला आहे.

- सराव अध्यापन
- भेटी
- उमेदवारी काल
- खास / विशेष शिक्षणाचा शिक्षकांना कार्यक्रमांचे नियोजन करण्यास मदत करणे.
- शैक्षणिक सर्वेक्षण
- विद्यार्थ्यांचे स्वयंशिक्षण

सहशालेय कार्यक्रम :

व्याख्याने, विद्यार्थ्यांना शास्त्र आणि तंत्रज्ञान, कला आणि खेळ ह्या शाखांचे शिक्षण मिळण्यासाठी खास आवड गटांचे नियोजन आणि सामाजिक सर्वेक्षण.

आपली प्रगती तपासून पहा :

१) माध्यमिक शालेय शिक्षकांचे सेवापूर्व प्रशिक्षण कोठे होते आणि त्यात कोणत्या खास बाबी उपलब्ध असतात ?

_____

_____

_____

_____

२. ड.२.३ सेवांतर्गत शिक्षण :

राज्याच्या नियमाप्रमाणे, स्थानिक सरकारे अध्यापक प्रमाणितता प्रणाली राबवितात आणि मोठ्या प्रमाणात शाळेच्या मुख्याध्यापकांसाठी, शालेय व्यवस्थापनाचा दर्जा सुधारण्यासाठी सेवांतर्गत प्रशिक्षणाचा पुरस्कार करतात.

पात्र शिक्षकांचा तुटवड्यावर तोडगा काढण्यासाठी राज्य सिक्षण समितीने १९८५ साली असा हुकुमनामा काढला की, वरिष्ठ माध्यमिक शाळेचे शिक्षक हे व्यावसायिक संस्थेतून दोन वर्षाचे प्रशिक्षण घेतलेले पदवीधर असले पाहिजेत आणि प्राथमिक शाळा शिक्षक हे माध्यमिक शालेय शिक्षण पूर्ण केलेले असले पाहिजेत. शिक्षकांचा दर्जा उंचावण्यासाठी समितीने सेवांतर्गत पूर्णवेळ व अर्धवेळ प्रशिक्षण कार्यक्रम सुरु केले, (अर्धवेळ कार्यक्रमांची किंमत कमी असल्याने, ते जास्त पसंत केले गेले). प्राथमिक शाळा आणि बालवाडीच्या सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमात एकंदर वेळाच्या ८४% वेळ विषय अध्यापनाला, ६% वेळ अध्यापनशास्त्राला व मानसशास्त्राला आणि १०% वेळ अध्यापन पद्धतींना दिला जातो. प्राथमिक शालेय शिक्षकांसाठी सेवांतर्गत

प्रशिक्षण असे आखलेले होते की ज्यामुळे त्यांची पातळी माध्यमिक अभ्यासानंतरच्या दोन वर्षांच्या स्तरावर येईल, जेणेकरुन बहुतेक सर्व प्राथमिक शाळेचे शिक्षक १९९० पर्यंत पात्र होतील. माध्यमिक शालेय सेवांतर्गत शिक्षक-प्रशिक्षण कार्यक्रम हा एकसंघ प्रतिमानावर आधारित, स्थानिक परिस्थितीनुरुप आणि मोकळ्या वेळेत करता येण्यासारखा होता. ह्या अभ्यासक्रमापैकी ९५% विषय अध्यापन, २ ते ३%, अध्यापनशास्त्र व मानसशास्त्र आणि २ ते ३% अध्यापन पद्धती, असा विभागलेला होता. वेगवेगळ्या उपक्रमांसाठी आणि स्थानिक कार्यालयात काम करणाऱ्या तांत्रिक व व्यावसायिक शिक्षकांसाठी मात्र एवढ्या मोठ्या प्रमाणात सेवांतर्गत प्रयत्न झाले नाहीत.

सेवांतर्गत शिक्षण हे पदवी व पदवी नसलेले शिक्षण, असे विभागलेले आहे.

- पदवी-शिक्षण हे फक्त त्यांच्याकडे योग्य शैक्षणिक पात्रता नाही, अशा सेवांतर्गत शिक्षकांची पात्रता सुधारण्यासाठीच नसून शैक्षणिकदृष्ट्या पात्र सेवांतर्गत शिक्षकांचा दर्जा उंचावण्यासाठीही आहे.
- पदवी नसलेले शिक्षण हे प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांसाठी निरंतर शिक्षण आहे.

ह्याचे दोन भागात विभाजन केलेले आहे :

- नवीन शिक्षकांचे सेवाकालातील प्रशिक्षण
- इतर शिक्षकांचे प्रशिक्षणानंतरचे शिक्षण

सेवाकाल प्रशिक्षण : हे शिक्षणासाठी व विद्यार्थ्यांसाठी कळकळ निर्माण करण्यासाठी, शैक्षणिक नियम आणि अध्यापनाची रुपरेषा, पाठ्यपुस्तकाबद्दलचे समान कायदे, व्यावसायिक आचारसंहिता इ. ची माहिती देण्यासाठी असते.

प्रशिक्षणानंतर : हे व्यावसायिक जबाबदाऱ्या, शैक्षणिक पात्रता, वरिष्ठ पदाच्या गरजेप्रमाणे असते.

सेवांतर्गत शिक्षण हे शिक्षकांना त्यांचे काम योग्य रितीने पार पाडून, बढतीच्या संधी निर्माण करायला मदत करते.

तुमची प्रगती तपासून पहा :

१) सेवांतर्गत अध्यापक शिक्षणाचा कार्यक्रमांचे प्रकार कोणते आणि त्यांचे महत्त्व काय ?

_____

_____

_____

_____

_____

_____

२. ड.३ उच्च शिक्षणातील शिक्षक

सध्या, उच्च अध्ययानात ९.५% प्राध्यापक व ३०% सहाय्यक प्राध्यापक आहेत. ह्यात मुख्यतः तरुण व मध्यमवयीन शिक्षक आहेत - ७३% प्राध्यापक हे ४५ पेक्षा कमी वयाचे आहेत, तर ४६% ३५ पेक्षा कमी वयाचे आहेत. उच्च शिक्षणातील बहुतेक शिक्षक हे शास्त्रीय संशोधन, नवनवीन (ज्ञानाचा) शोध आणि शास्त्र-तंत्रज्ञानातील आहेत.

चिनी विज्ञान संस्थेतील (Chinese Academy of Science) शैक्षणिक सदस्यांपैकी ४०.७% (२८०) हे उच्च शिक्षण विभागातील आहेत, तर चिनी अभियांत्रिकी संस्थेसाठी (Chinese Academy of Engineering) हा आकडा ३५.३% (२३४) एवढा आहे.

तुमची प्रगती तपासून पहा:

१) उच्च शिक्षणातील शिक्षकांच्या 'अध्यापक शिक्षणाची' स्थिती काय आहे ?

_____

_____

_____

_____

_____

२. ड.४ दक्षिण आफ्रिकेतील अध्यापक शिक्षण :

२००३ मध्ये अध्यापक शिक्षणासाठी मंत्रीमंडळीय समितीची स्थापना केली गेली आणि त्यांनी विस्तृत असा अभ्यास करुन २००५ मध्ये मंत्र्यांना आपला अहवाल सादर केला. समितीने ज्यांचा अध्यापक शिक्षणाशी संबंध आहे. अशा सर्व महत्त्वाच्या संबंधितांशी सल्लामसलत केली ह्यात द. आफ्रिका अध्यापक मंडळ, द. आफ्रिका शैक्षणिक पात्रता अधिकारी (SAQA), इ.टि.डी.पी. - एस. इ. टी. ए. राष्ट्रीय शिक्षक संघटना, द. आफ्रिका उच्च शिक्षण, एज्यकेशन डीन्स् फोरम आणि अध्यापक शिक्षणासाठी काम करणाऱ्या अशासकीय संघटना इ. चा समावेश होता. ह्यानंतरच द. आफ्रिकेतील अध्यापक शिक्षणाबद्दलचे धोरण ठरविले गेले.

द. आफ्रिकेतील अध्यापक शिक्षणाचे धोरण अशा प्रकारे थांबविले गेले आहे, की जेणे करुन अध्यापक समुदाय २१ व्या शतकातील लोकशाही द. आफ्रिकेच्या गरजा पूर्ण करु शकेल. अध्यापकांना त्यांची आवश्यक व महत्वाची कार्ये करण्यास तयार करणे, व्यावसायिक क्षमता व कार्यक्षमता सतत वाढविण्यासाठी सज्ज करणे आणि द. आफ्रिकेतील जनतेच्या मनातील शिक्षकांबद्दलच्या आदर वाढविणे ही ह्या धोरणाची उद्दिष्टे आहेत.

ह्या धोरणानुसार अध्यापक शिक्षण हे दोन पुरक अशा उप-घटकांचे बनलेले आहे.

- शिक्षकांसाठी प्रारंभिक व्यावसायिक शिक्षण (IPET)
- निरंतर अध्यापक व्यावसायिक विकास (CPTD)

२. ड.४.१ अध्यापकांचे प्रारंभिक व्यावसायिक शिक्षण (IPET) शैक्षणिक पात्रतेचा मार्ग

उच्च शिक्षण-शैक्षणिक पात्रतेचा आराखडा :

सर्व प्रारंभिक अध्यापक शिक्षण ही उच्च शिक्षणाची जबाबदारी आहे, अध्यापक शिक्षणासाठी शैक्षणिक पात्रता हा उच्चशिक्षण कायदा १९९७ नुसार, राज्याच्या धोरणाशी संबंधित हो धोरण "उच्च शिक्षण शैक्षणिक पात्रता रचना"(HEQF) मध्ये सांगितलेले आहे आणि उच्च शिक्षण शैक्षणिक पात्रतेचा राष्ट्रीय शैक्षणिक पात्रता रचनेशी (NQF) जोडण्याचा आधार बनते.

मान्यताप्राप्त अध्यापन शैक्षणिक पात्रता:

शिक्षणशास्त्र स्नातक (बी. ए.) पदवी चार वर्षांची बी. एड. पदवी ज्यात एक वर्ष पूर्ण वेळ, शाळेत प्रत्यक्ष अध्यापन अनुभव हा कोणत्याही क्षेत्रात, विषयात आणि पातळीवर अध्यापन करु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रमाणित पात्रता आहे. फक्त एकच प्रमाणित पात्रता असण्याचे समर्थन असे की, शैक्षणिक आणि अध्यापनशास्त्रीय ज्ञानाची गरज ही सर्व अध्ययन क्षेत्राच्या, विषयाचा, पातळीच्या शिक्षकांसाठी सारखीच असते. बी. एड. हे अध्यापकांच्या प्रारंभिक व्यावसायिक शिक्षणाची (IPET) प्रमाणित पात्रता आहे आणि त्यासाठी विविध मार्ग आहेत.

शिक्षणशास्त्रातील प्रगत पदविका (ADE) अध्यापन करु इच्छितात, असे योग्य पदवीधारक ही पदविका करु शकतात.

पदविका पर्याय : नवीन तीन वर्षांची अध्यापन पदविका सुरु करण्यात आलेली आहे. संस्था निहाय भेदाच्या संदर्भात, विद्यापीठातून ही पदविका करता येते. पण ते प्रमाणित शिक्षक होण्यापूर्वी, त्यांना चौथे वर्ष पूर्ण करणे गरजेचे असते. ही (पदविका) प्रत्यक्ष किंवा दुरस्थ पद्धतीने असू शकते. ज्या विद्यार्थ्यांना प्रवेशाची, पदवीची अट पूर्ण करता येत नाही, तसेच ज्यांना उपजिविकेसाठी अर्थार्जनाची गरज आहे. अशा विद्यार्थ्यांना ही पदविका आकर्षित करु शकते.

मंत्रालयाला हे जाणविले आहे, अध्यापनातील शैक्षणिक पात्रतेसाठी, इतर मार्ग पुरविणे आवश्यक आहे आणि जर बी. एड. च्या पदवीवरुन भरती करण्याची मोहिम अपुरी पडली तर पदविकेच्या मार्गाचा विचार करता येतो.

अध्यापकांसाठी खालील प्रमाणित दर्जा दिलेला आहे. ज्यामुळे कल्पक व लवचिक कार्यक्रम आराखडा शक्य होतो.

- आयोजक कार्यक्रम आणि संस्थेची मुल्ये विकसित करतात, जेणेकरुन अध्यापक विस्तारित व्यावसायिक व निरंतर अध्ययनार्थी बनतात.
- कार्यक्रम अशा प्रकारे दिले जातात की जेणे करुन अध्यापक त्यासाठी हजर राहू शकतील.

- अभ्यासक्रमात लवचिकता येईल अशा प्रकारे अभ्यासाची साधने विकसित केली जातात व वापरली जातात.
- स्वाध्याय अशा प्रकारे बनविले जातात, की जेणेकरुन दिलेल्या संदर्भात समस्या निराकरणाला वाव मिळेल.

दुरस्थ शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना नोकरी करुन शिकणे शक्य होते व खूप विद्यार्थ्यांना ते स्वस्त पडते. आय. सी. टी. मुळे अध्यापक शिक्षण कार्यक्रमांपर्यंत पोहोचणे सुकर होते, अध्ययनार्थीची प्रेरणा वाढते. संप्रेषण जलद होते आणि अध्ययनासाठी उपलब्ध साहित्य समृद्ध बनते. जशी सर्व विद्यापीठांना दूरस्थ कार्यक्रमांसाठी बोलाविले गेले, तरी जे व्यावसायिक व व्यवस्थापन दृष्ट्या असा कार्यक्रम तयार करण्यास व राबविण्यास सक्षम आहेत, अशांनाच परवानगी दिली जाते.

अशा प्रकारे बी. एड. ची पदवी ही विद्यापीठातील पूर्णवेळ कार्यक्रम, अर्धवेळ कार्यक्रम किंवा दूरस्थ पद्धतीने दिली जाते.

द. आफ्रिकेतील शिक्षण- मंत्रालयाने अध्यापक शिक्षणासाठी खालील मार्ग ठरविलेले आहेत.

- विद्यापीठाने दिलेली चार वर्षांची बी. एड. पदवी ही आय.पी.इ.टी. दर्ज्यानुसार सर्वात जास्त योग्य पात्रता आहे.
- पहिल्या प्रमाणित पदवीनंतर एक वर्षाची पदव्युत्तर पदविका.
- मुल्यांकित संस्थामधून तीन वर्षांचा पदविकेची सुरुवात
- योग्य आर्थिक सहाय्याने रुपांतरित कार्यक्रम चालविणे की जेणेकरुन सुयोग्य अशा नोकरी करणाऱ्या शिक्षकांना नवीन अध्ययन क्षेत्रे, विषय किंवा पातळी हाताळायला मिळतील.
- राष्ट्रीय शिक्षणशास्त्र व्यावसायिक पदविका (NPDE) आणि प्रगत शिक्षणशास्त्र प्रमाणपत्र (ACE) ह्यांचा भविष्यातील उपयोग गरज आणि त्याचे मूल्य ह्या आधारावर पडताळून पाहाणे.

आपली प्रगती तपासून पहा:

१) द. आफ्रिकेत अध्यापनासाठी आवश्यक प्रचलित शैक्षणिक पात्रता काय आहेत? त्या कशा प्राप्त केल्या जाऊ शकतात?

_____

_____

_____

_____

_____

२. ड.४.११ निरंतर व्यावसायिक प्रशिक्षण आणि विकास

संकल्पनात्मक आणि अध्यापनशास्त्रीय गरजा

परिणामकारक अध्यापनासाठी, दोन्हीही संकल्पनात्मक व आशयज्ञान आणि अध्यापन शास्त्रीयज्ञान तसेच शिक्षकाची, पद्धतीवर विचार करण्याची आणि अध्ययनार्थीच्या अध्यापनाबद्दलच्या स्वतःच्या अनुभवातून शिकण्याची तयारी व क्षमता गरजेच्या आहेत.

सर्व शिक्षकांना, नवीन अभ्यासक्रम शिकविण्यासाठी स्वतःच्या क्षमता वाठविण्याची गरज आहे. पण शैक्षणिक पात्रता वाठविण्याची गरज आहे असे नाही. बहुतेकांना विषयाचा ज्ञानाचा पाया, अध्यापनशास्त्रीय आशय ज्ञान आणि अध्यापन कौशल्ये सुधारण्याची गरज असते. एका मोठ्या गटाला आरोग्य व शारीरिक शिक्षणाच्या एच. आय. व्ही. आणि एडस साठी आधार देणे, विविधता व्यवस्थापन, वर्गव्यवस्थापन आणि शिस्त, इ. बाबतीत खास कौशल्ये विकसित करण्याची गरज असते. पुष्कळांच्या बाबतीत त्यांचा उत्साह आणि बांधिलकी पल्लवित करण्याची गरज असते.

सेवांतर्गत शिक्षणअत, खूप वेळा, पगारवाढीतून खूपशा प्रमाणात बक्षिस मिळाले तरी शैक्षणिक पात्रतेचा वर्ग अध्यायनावर फारशा परिणाम होत नसे. सेवांतर्गत शिक्षण हे तुकड्या - तुकड्यात व सुसूत्र नसल्यामुळे त्याचा परिणाम फारच मर्यादित असतो.

निरंतर व्यावसायिक शिक्षक विकास प्रणाली (CPTD)

निरंतर व्यावसायिक शिक्षक विकास प्रणालीमुळे:

- अशी हमी देता येईल की शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी सध्या घेतले जाणारे प्रयत्न हे जास्त परिणामकारक रित्या व थेट, अध्यापनाला दर्जा सुधारण्यास मदत करतील.
- अध्यापनाचा व्यावसायिक दर्ज्यावर भर देतील व त्याचे प्रबलन करतील.
- व्यावसायिक विकासाच्या (PD) कोणत्या कृती त्यांच्या व्यावसायिक वाढीला मदत करतील, ह्याबद्दल शिक्षकांना स्पष्ट मार्गदर्शन दिले जाईल.
- मान्यता प्राप्त नसलेल्या कार्यक्रमांपासून शिक्षकांना दूर ठेवणे.
- शिक्षकांच्या व्यावसायिक विकासाला मदत करतील असे कार्यक्रम वाढविणे.

ह्या प्रणालीनुसार, द. आफ्रिकन अध्यापक मंडळ हे एक वैधानिक मंडळ आहे आणि सी.पी.टी.डी. च्या नियोजनाची व व्यवस्थापनाची सर्व जबाबदारी पूर्णपणे त्याचीच आहे. पीडी ही विविध व्यवसायिक क्षेत्रांमध्ये प्रचलित, व्यवसायिकांनी वापरलेली आंतरराष्ट्रीय पद्धती आहे. त्यातून त्यांच्या सदस्यांची निरंतर व्यावसायिक वाढ बघितली जाते. असे अपेक्षित आहे की, प्रत्येक शिक्षकाने, स्वतःच्या गरजेनुसार आणि द. आफ्रिकन अध्यापक मंडळाची (SACE) मान्यता प्राप्त असे कार्यक्रम निवडून पीडी गुण मिळवावेत अशी अपेक्षा आहे.

मार्गदर्शनाचा मुख्य हेतु असा आहे की त्यामुळे शिक्षक बाह्य संस्थांवर अवलंबून न रहाता, स्वतःच्या व्यवसायिक विकासासाठी जबाबदार रहातील.

व्यवसायिक विकास (PD) कृती चार प्रकारात विभाजित आहेत.

- शाळेने आयोजित कार्यक्रम
- नोकरी देणाऱ्याने आयोजित कार्यक्रम
- शैक्षणिक पात्रतेसाठी आयोजित कार्यक्रम
- अशासकीय संस्था, शिक्षक संघटना, सामाजिक आणि धर्मानुसार आणि खाजगी संस्थांनी चालविलेले इतर कार्यक्रम

काही सी.पी.टी.डी चे कार्यक्रम सक्तीचे असतात व काही स्वतः निवडायचे असतात. सक्तीचे कार्यक्रम, राष्ट्रीय राज्यीय, प्रांतीय किंवा शालेय पातळीवर असू शकतात व त्यासाठी संबंधित शैक्षणिक विभाग पैसे भरतो. स्वतः निवडलेल्या कार्यक्रमांचे पैसे शिक्षकाला स्वतःच भरायचे असले, तरी काही महत्त्वाच्या अभ्यास क्षेत्रांसाठी प्रांतीय तिजोरीतून पैसे भरले जाऊ शकतात.

आपली शैक्षणिक पात्रता वाढविण्यासाठी जे शिक्षक अभ्यासक्रम व्यवस्थितपणे पूर्ण करतात त्यांना पीडी गुण मिळतात.

दोन चुका टाळणे आवश्यक आहे :

अ) पीडी गुण मिळविण्याच्या नादात शिक्षकांनी आपली मुख्य जबाबदारी दुर्लक्ष करता कमा नये.

ब) कामाच्या बोजाखाली दबलेल्या शिक्षकांवर आणखीन प्रशासनाचा बोजा वाढविता कामा नये.

बक्षिसे आणि निर्बंध :

द. आफ्रिकेतील अध्यापकांना अध्यापन करण्यासाठी पीडी गुण आणि एस.ए.सी.ई.ची नोंदणी आवश्यक आहे. नोंदणी हे अध्यापनासाठी प्रमाणपत्र आहे. अध्यापन व्यवसायातील सीपीटीडी प्रणालीमुळे बक्षिसे व निर्बंध घालणे आवश्यक आहे. जे शिक्षक तीन वर्षांच्या कालावधीच्या दोन सलग भागांमध्ये कमीत कमी आवश्यक पीडी गुण मिळवू शकत नाहीत, त्यांना एस.ए.सी.इ. कडे परत नोंदणीसाठी अर्ज करावा लागतो.

सी.पी.टी.डी. प्रणालीचे व्यवस्थापन :

अध्यापन व्यवसायासाठी एस.ए.सी.ई. हि राष्ट्रीय पातळीवरची संस्था असल्यामुळे हया प्रणालीचे व्यवस्थापनासाठी जबाबदार आहे, पण ही अनेक छोट्या प्रणांलीची संयुक्त जबाबदारी आहे. प्रातीय शिक्षणशास्त्र विभाग जिल्हा कार्यालये, शालेय व्यवस्थापन संघ आणि शिक्षक संघटना ह्या सर्व शिक्षकांना सीपीटीडी मध्ये भाग घेण्यास प्रोत्साहित करतात. एस.ए.सी.इ. च्या निकषांप्रमाणे व मार्गदर्शनाप्रमाणे उच्च दर्जाचे कार्यक्रम आखण्याची व राबविण्याची जबाबदारी सर्व स्तरांतील आयोजकांची असते. एस.ए.सी.इ. ने नेमलेले दर्जा रक्षक, आयोजकांच्या

कार्यक्रमांची उपयुक्तता आणि दर्जा ठरवून शिक्षकांना मदत करतात. शिक्षण विभाग एस.ए.सी.इ. च्या मदतीने सीपीटीडी कार्यक्रम चालू ठेवण्यासाठी आवश्यक स्त्रोत व संरचना ठरवितात.

आपली प्रगती तपासून पहा :

१) निरंतर व्यावसायिक शिक्षक विकास (सी.पी.टी.डी) प्रणालीची जबाबदारी काय ?

_____

_____

_____

_____

_____

२. ड.५ अध्यापक शिक्षण प्रणाली व्यवस्थापनाच्या संस्था

अध्यापक शिक्षणात पुष्कळश्या संघटना व संस्थांचा सहभाग असतो. मंत्रालयाला, त्या प्रत्येकाची प्रणालीतील जबाबदारीची, तसेच त्यांच्यात परस्पर समन्वय साधण्याची गरज जाणविते, नाहीतर त्यांच्यात छेदन होऊ शकते, त्या परस्परांवर अवलंबून तरी असू शकतात.

दक्षिण आफ्रिकन अध्यापक संघटना (एस.ए.सी.इ):

साऊथ आफ्रिकन Council for Teachers ही व्यावसायिक संघटना असून त्याचे उद्दिष्ट अध्यापन व्यवसायाचा दर्जा उंचावून, शिक्षकांचा व त्यांच्या व्यावसायिक वृत्तीचा विकास हे आहे. एस.ए.सी.इ. ची स्थापना २००० साली, एस.ए.सी.इ. कायद्यानुसार (कायदा ३१, २०००) झाली.

संघटनेची कार्ये :

- शिक्षक नोंदणी
- शिक्षकांच्या व्यावसायिक विकासाची वाढ
- मूल्यात्मक आणि व्यावसायिक दर्जा ठरविणे आणि सांभाळणे.

कोठेही नोकरी घेण्यापूर्वी एस.ए.सी.इ. कडे शिक्षकांनी नोंदणी करणे गरजेचे असते. संघटनेने प्रवेशाच्या अटी ह्या अर्जदाराच्या व्यवसायिक योग्यता पाहून तीव्र बनविलेल्या आहेत.

संघटना असंख्य कार्यक्रमातून शिक्षकांना विकास साधते आणि अध्यापन व्यवसायाचा दर्जा उंचविण्याचा प्रयत्न करते. ह्यात प्रोफेशनल डेव्हलपमेंट पोर्टफोलियो प्रॉजेक्ट आहे की ज्याचा मुख्य उद्देश शिक्षकांना त्यांच्या कार्याबद्दल विचार करण्यास आणि स्वतःच्या व्यावसायिक विकासाची जबाबदारी उचलण्यास प्रोत्साहित करणे, अध्यापक शिक्षण आणि संशोधनाचा विकास करणे, निरंतर व्यावसायिक अध्यापक विकास प्रणाली (CPTD) ची स्थापना करणे शिक्षकांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी जागतिक शिक्षकदिन साजरा करणे.

मूल्य कार्यातून हे पाहिले जाते की अध्यापक एस.ए.सी.इ. चे व्यावसायिक मूल्य निर्वंध पाळतात.

शिक्षण विभाग आणि द. आफ्रिकन अध्यापक संघटना (एस.ए.सी.इ.) अध्यापक शिक्षण प्रणालीमध्ये फार महत्त्वांची जबाबदारी उचलतात. त्यांची भूमिका फार महत्वपूर्ण आहे. एकत्रितपणे ते अध्यापक शिक्षण प्रणालीची वैधानिक जबाबदारी उचलतात. म्हणूनच त्यांचे परस्पर संबंध फार महत्वाचे व समजूतीचे असणे आवश्यक आहे. विकसनशील राज्य असल्यामुळे शिक्षण विभागाला शिक्षणातून परिवर्तन घडवून आणणे गरजेचे आहे. शिक्षण विभागाला शैक्षणिक धोरण ठरविणे, नियोजन करणे, देखरेख करणे आणि आर्थिक सहाय्य देणे ह्या जबाबदाऱ्या असतात. सर्वांना दर्जेदार शिक्षण देण्याचे उद्दिष्ट साधण्यासाठी शिक्षण विभागाला शिक्षकांना व्यावसायिक विकासाच्या संधी उपलब्ध करुन देणे गरजेचे असते. ह्या संदर्भात शिक्षण विभाग विविध संस्था व शिक्षण प्रणालीशी संबंधितांबरोबर एकत्रितपणे काम करते.

शिक्षकांना नोकरी मुखत्वेकरुन शिक्षण विभागाकडे मिळत असल्यामुळे, शिक्षकांच्या नोकरीच्या अटी कामाच्या अटी, भविष्यातील संधी इ. चा योग्य दर्जा राखणे आणि द. आफ्रिकेतील लोकांसाठी (अध्यापन) हा एक आवडीचा व्यवसाय बनेल हे पहाण्याची जबाबदारी ही विभागाचीच आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक मूल्यमापन आणि विकास गट:

शिक्षण विभाग, शाळांच्या आणि अध्यापकांच्या कार्यासाठी जबाबदार असतात. ह्यासाठीच राष्ट्रीय शैक्षणिक मूल्यमापन आणि विकास गट (NEED) स्थापन केला. संपूर्ण शाळा मूल्यमापन धोरण आणि शिक्षकांच्या मूल्यमापनासाठी एकत्रित दर्जा व्यवस्थापन प्रणाली (Whole School Evaluation Policy and Integrated Quality Management System) हया दोघांच्या नियंत्रण प्रक्रियेसाठी, सिक्षण विभागाच्या जवळच ह्याची स्थापना केली गेली.

संबंधित विभागांशी चर्चा करुन (शिक्षण) मंत्री शिशुवर्ग, प्रौढ मूलभूत शिक्षण व प्रशिक्षण, श्वार्स (गरजांसाठी) शिक्षण, प्रगत शिक्षण आणि महाविद्यालय व्याख्याता प्रशिक्षणासाठी आवश्यक विविध व्यावसायिक शिक्षण आणि पात्रता ठरवितात.

आपली प्रगती तपासून पहा :

१) निरंतर व्यावसायिक अध्यापक विकासाशी (सी.पी.टी.डी.) संबंधित कोणकोणत्या संस्था आहेत ?

_____

_____

_____

_____

_____

२. ड.६ सारांश :

द. आफ्रिकेत, अध्यापक शिक्षण धोरणाचे पुरक अशा दोन उप-प्रणाली आहेत. प्रारंभिक व्यावसायिक अध्यापक शिक्षण (IPET) आणि निरंतर व्यावसायिक अध्यापक विकास (CPTD) मान्यताप्राप्त शैक्षणिक पात्रता बी. एड. पदवी प्रगत शैक्षणिक पदविका (ADE) आणि पदविका अध्यापकांची प्रमाणे व दर्जा असा असतो की ज्यामुळे कार्यक्रमाचा आराखडा कल्पक आणि लवचिक बनवितो.

संकल्पना व आशयज्ञान आणि अध्यापनशास्त्र ज्ञान परिणामकारक अध्यापनासाठी आवश्यक आहे. सर्व शिक्षकांना नवीन अभ्यासक्रम शिकविण्यासाठी शैक्षणिक पात्रतेपेक्षा कौशल्ये वाढविण्याची गरज आहे. म्हणूनच निरंतर व्यावसायिक अध्यापक विकास प्रणालीची (CPTD) गरज आहे. प्रत्येक शिक्षकाने व्यावसायिक विकासाचे (PD) गुण मिळविण्यासाठी त्यांच्या गरजेप्रमाणे आणि (एस.ए.सी.इ.) चे मान्यताप्राप्त असे कार्यक्रम निवडणे आवश्यक आहे.

अध्यापक शिक्षणासाठी खूपशा संस्था व संघटना कार्य करीत असतात. एस.ए.सी.इ. आणि शिक्षण विभागाला मंत्रालयाची मान्यता आहे. अध्यापक शिक्षण प्रणालीच्या वैधानिक जबाबदाऱ्या हे दोघेही पार पाडतात.

स्वाध्याय :

१. चीन चे सरकार अध्यापक शिक्षणाला एवढे महत्त्व का देते ?

२. चीन मधील अध्यापक शिक्षणाच्या प्रकारचे वर्णन करा.

३. सेवापूर्व व सेवांतर्गत शिक्षणाची योग्यता स्पष्ट करा.

४. द. आफ्रिकेत प्रचलित अध्यापक शैक्षणिक पात्रता काय आहे ? ती कशी प्राप्त होऊ शकते ?

५. निरंतर व्यावसायिक अध्यापक विकास प्रणालीचे (सी.पी.टी.डी.) महत्त्व स्पष्ट करा.

६. एस.ए.सी.इ. आणि शिक्षण विभागाची भूमिका व कार्ये काय ?

❖❖❖❖

३

अध्यापक शिक्षणाच्या संस्था

घटक रचना :

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ राज्य स्तरावरील अध्यापक शिक्षण संस्था

- ३.२.१ राज्य स्तरावरील शिक्षण संस्था (एस.आय.ई.)
- ३.२.२ राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एस.सी.ई.आर.टी.)
- ३.२.३ राज्य अध्यापक शिक्षण मंडळ (एस.बी.टी.ई.)
- ३.२.४ विद्यापीठातील शिक्षण विभाग (यु.डी.टी.ई.)

३.३ राष्ट्रीय स्तरावरील अध्यापक शिक्षण संस्था

- ३.३.१ विद्यापीठ अनुदान आयोग (यु.जी.सी.)
- ३.३.२ शैक्षणिक नियोजन आणि प्रशासनाच्या राष्ट्रीय संस्था (एन.यु.ई.पी.ए.)
- ३.३.३ राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद (एन.सी.टी.ई.)
- ३.३.४ राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एन.सी.ई.आर.टी.)

३.४ आंतरराष्ट्रीय स्तरावरील अध्यापक शिक्षण संस्था

- ३.४.१ संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक, सांस्कृतिक संघटना (युनेस्को)

३.५ सारांश

३.० उद्दिष्टे :-

हे घटक वाचल्यानंतर तुम्ही खालील गोष्टी सांगू शकाल.

- राज्य, राष्ट्र व आंतरराष्ट्रीय स्तरावरील अध्यापक शिक्षण कार्यक्रमाच्या विविध संस्था.
- राज्य, राष्ट्र व आंतरराष्ट्रीय स्तरावरील अध्यापक शिक्षण कार्यक्रमाची भूमिका व कार्ये.

३.१ प्रस्तावना :-

ज्ञानाच्या विस्तारामुळे शिक्षणाचा भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभरात प्रसार झालेला आहे. या बदलांमुळे आपल्या सामाजिक गरजाही बदललेल्या आहेत. शिक्षणातील नवप्रवाहांना सामोरे जाण्याकरिता शिक्षकांनी प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे. अशा प्रकारचे प्रशिक्षण विविध संस्था अनेक पातळीवर देण्याचे कार्य करीत असतात. या घटकामध्ये आपण राज्य, राष्ट्र आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध संस्थांची कार्ये व भूमिका याची चर्चा करणार आहोत.

३.२ राज्य स्तरावरील अध्यापक शिक्षण संस्था :-

शिक्षणाची आणि शैक्षणिक संस्थांची गुणवत्ता वाढविण्याकरिता व शैक्षणिक पद्धती अद्ययावत ठेवण्याकरिता प्रत्येक राज्यातील शै. संस्था, परिषदा व संघटनांमार्फत अनेक नवनवीन शैक्षणिक संशोधन करणे व त्याचा प्रसार करणे गरजेचे आहे. या घटकात आपण खालील राज्य स्तरावरील संस्थांची भूमिका व कार्ये याची चर्चा करणार आहोत.

राज्य शिक्षण संस्था (SIE)
राज्य शैक्षणिक संस्था (SCERT)
राज्य अध्यापक शिक्षण मंडळ (SBTE)

३.२.१ राज्य शिक्षण संस्था (SIE) :-

शिक्षणात गुणवत्ता आणण्यासाठी प्रशिक्षण देणे, शैक्षणिक साधनांची निर्मिती करणे आणि मूल्यमापन करणे यांची आवश्यकता असते. यासाठीच महाराष्ट्र राज्याने 'राज्य शिक्षण संस्थेची' स्थापना केली. सुरुवातीला 'राज्य शिक्षण संस्था' ही प्राथमिक शिक्षणाची देखभाल करीत होती. नंतर या संस्थेची व्याप्ती पूर्व प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च-माध्यमिक शिक्षणापर्यंत पोहोचली. १९८४ मध्ये या संस्थेला राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेप्रमाणे (NCERT) घटनात्मकदृष्ट्या स्थान प्राप्त झाले व या संस्थेचे नाव 'महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद' (MSCERT) असे झाले.

३.२.२ राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT) :-

राज्य परिषद ही राज्याची शिखर संस्था आहे. महाराष्ट्रात इ.स.१९६४-६५ साली या संस्थेची राज्य शैक्षणिक संस्था (SIE) म्हणून स्थापना झाली. इ.स.१९८४ साली या संस्थेचे महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (MSCERT) असे नामकरण झाले.

शालेय शिक्षणाचा गुणात्मक विकास करण्यासाठी ही संस्था अध्यापकांचे शिक्षण, संशोधन आणि मूल्यमापनाची जबाबदारी घेते.

उद्दिष्टे :-

या संस्थेची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

★ विविध प्रकारच्या शैक्षणिक संशोधनाद्वारे शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे.
★ अध्यापक शिक्षणात सुधारणा करणे.
★ शैक्षणिक संस्थाचा गुणात्मक दर्जा वाढविणे.
★ शैक्षणिक पद्धती अद्ययावत ठेवणे.
★ शिक्षणातील नाविण्यतेच्या प्रसारास उत्तेजन देणे.

रचना :-

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे (MSCERT) चे मुख्य कार्यालय 'पुणे' येथे आहे. ही संस्था म्हणजे शिक्षणाचा एक शैक्षणिक विभाग आहे. शिक्षण संचालक हे या संस्थेचे प्रमुख असून अनेक विभागांची देखभाल द्वितीय श्रेणीतील राजपत्रित अधिकारी घेत असतात. तसेच राज्याच्या शिक्षण मंत्र्याच्या अध्यक्षतेखाली या संस्थेच्या सल्लागार समितीचे कार्य चालते.

भूमिका व कार्ये :-

ही संस्था प्रामुख्याने,

★ नियोजन
★ व्यवस्थापन
★ संशोधन
★ मूल्यमापन आणि
★ प्रशिक्षण

यांचा गुणात्मक विकास करण्यासाठी कार्य करते.

या संस्थेची कार्ये खालीलप्रमाणे आहेत.

★ शालेय शिक्षण, निरंतर शिक्षण, अनौपचारिक शिक्षण व विशेष शिक्षणात सुधारणा घडवून आणणे.
★ पूर्व-प्राथमिक ते उच्च माध्यमिक शिक्षणाशी संबंधीत असलेल्या तपासणी अधिकाऱ्यांना सेवांतर्गत प्रशिक्षण देणे.
★ अध्यापक शिक्षण संस्थाना विस्तार सेवा उपलब्ध करुन देणे व त्याचे समन्वय करणे.
★ शैक्षणिक संस्थांसाठी शैक्षणिक साधने तयार करणे.
★ आशययुक्त अध्यापनासंबंधी संशोधने व नवीन शोध घेण्यासंबंधी शिक्षकांना प्रेरणा देणे.

MSCERT ची कार्ये खालील विभागांमार्फत होतात.

★ अध्यापक शिक्षण विभाग
★ विस्तार सेवा केंद्र
★ संशोधन विभाग
★ मूल्यमापन विभाग
★ अभ्यासक्रम निर्मिती विभाग
★ लोकसंख्या शिक्षण विभाग
★ प्रसिद्धी विभाग

३.२.३ राज्य अध्यापक शिक्षण मंडळ (SBTE) :-

सर्वप्रथम इ.स.१९६६ साली कोठारी आयोगाने राज्य अध्यापक शिक्षण मंडळाची स्थापना करण्याची शिफारस केली. या मंडळाचे मुख्य कार्य हे राज्य मंडळाकडून चालविल्या जाणाऱ्या अध्यापक शिक्षणाचा विकास करणे हे होते. राज्यमंडळाची स्थापना इ.स.१९६७ मध्यप्रदेशात झाली आणि त्यानंतर इ.स. १९७३ साली महाराष्ट्र, जम्मू आणि काश्मीर, आणि तामिळनाडू येथे करण्यात आली. राज्याच्या शिक्षणमंत्र्यांकडून राज्य अध्यापक शिक्षण मंडळ (SBTE) हे सर्व राज्यात स्थापन करावे असे NCERT ला सूचविण्यात आले.

कार्ये :-

★ अध्यापक शिक्षण संस्थांचा दर्जा ठरविणे.
★ अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तक, राज्याच्या अध्यापक शिक्षणात सुधारणा व बदल घडवून आणणे.
★ अध्यापक शिक्षण संस्थांमधून मार्गदर्शनाची सोय आयोजित करणे.
★ अध्यापक शिक्षण संस्थांच्या मान्यतेकरिता निकषांचे विकसन करणे.
★ अध्यापक शिक्षणांच्या प्रवेश आणि विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापकांच्या कार्यक्षमतेचे मूल्यमापन याबाबतच्या निकषांचे विकसन करणे.
★ अध्यापक शिक्षणाच्या गुणात्मक व संख्यात्मक विकासासाठी नियोजन करणे.
★ शिक्षणाचा अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तक आणि परीक्षा पद्धतीत बदल व सुधारणा करण्यासाठी विद्यापीठे आणि राज्य संस्थांना मार्गदर्शन करणे.
★ संलग्नतेकरिता / सदस्यत्वाकरिता अध्यापक शिक्षण संस्थेची शैक्षणिक आणि भौतिक स्थिती निश्चित करणे / ठरविणे.
★ विद्यापीठातील विभाग आणि इतर प्रशिक्षण संस्था यांच्या सहकार्याच्या जाणिवेत विकास घडवून आणणे.
★ अध्यापक शिक्षणाकरिता वेगवेगळ्या स्तरावर आर्थिक मदत व विविध सुविधा पुरविणे.
★ राज्य शिक्षक प्रशिक्षणार्थीच्या विकासांकरिता सूचना देणे.

३.२.४ विद्यापीठातील शिक्षण (UDTE) :-

सध्या शिक्षण हे एक अभ्यासाचे स्वतंत्र क्षेत्र आहे असे समजले जाते. विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) विद्यापीठातील शिक्षण विभागाला अनुदान पुरवते. शिक्षकांच्या विकासाकरिता त्यांना उच्च दर्जाच्या प्रशिक्षणाची आवश्यकता असते. शिक्षण विभागाकडून शैक्षणिक प्रशासन आणि अभ्यासक्रम तज्ज्ञांच्याद्वारे शिक्षण प्रक्रियेचा व परीक्षा पद्धतीचा विकास करण्यात येतो. विद्यापीठ शिक्षण विभागातर्फे एम.एड्. बी.एड्. आणि एम्. फिलचे वर्ग चालविण्यात येतात त्याचबरोबर शिक्षणातील पीएच.डी.साठी व डी.लिट.पदवीसाठी संशोधनाचे कार्य करण्यात येते. इ.स.१९१७ साली पहिला शिक्षण विभाग कलकत्ता विद्यापीठात सुरु करण्यात आला. सद्यस्थितीत एम.एड्.आणि पीएच.डी. करिता भारतातील सर्व विद्यापीठात शिक्षण विभाग आहेत.

कार्ये :-

- पदवीत्तर अभ्यास आणि संशोधन कार्याचा विकास करणे.
- शालेय शिक्षकांसाठी प्रशिक्षण आयोजित करणे.
- अध्यापक शिक्षण आणि संशोधन कार्याच्या विकासासाठी भरीव कार्यक्रमांची तरतूद करणे.
- पदवीत्तर शिक्षकांसाठी काही कार्यक्रम सुरु करणे व त्यानचे संघटन करणे.
- अध्यापक शिक्षणात मोठ्या प्रयोगशाळा, अनुदेशन साधने, नवनवीन अध्यापन पद्धती व सराव यांचा विकास घडवून आणणे.
- इतर विभागाच्या गरजा पूर्ण होऊ शकतील अशा स्वरुपाचे आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम व संशोधन अभ्यासास उत्तेजन देणे.
- संशोधकांना शिक्षणाच्या विद्याशाखेत सहभागी होण्यासाठी विस्तारित व्याख्याने व कार्यक्रमांचे आयोजन करणे.
- अध्यापक शिक्षणाचा स्तर अद्ययावत ठेवण्यासाठी नवीन अध्यापन पद्धती व तंत्रविज्ञानासंबंधीची जाणीव करुन देणे.
- शिक्षणातील प्रात्यक्षिक कार्य व तात्त्विक भागाचे मूल्यमापन करण्यासाठी परिणामकारक प्रक्रिया विकसित करणे.

आर्थिक ध्येय, विविध घटकांचे एकात्मिकरण प्रयत्नातील एकनिष्ठता, विविध संस्थांच्या गरजा ध्यानात घेऊन, त्याना आदर्शत्वाकडे नेण्यासाठी त्याच्या भ्रष्टाचारी आणि स्फोटक प्रवृत्तीत बदल घडवून आणण्यासाठी राज्य स्तरावर एका भक्कम शैक्षणिक आणि प्रशासकीय यंत्रणेची आवश्यकता आहे.

प्रत्येक राज्यात स्वतंत्रपणे विद्यापीठीय अध्यापक शिक्षण असणे अत्यावश्यक आहे. संपूर्ण राज्यातील महाविद्यालये पदवी व पदवीत्तर स्तरावरील शिक्षक स्वयंपूर्ण तसेच संलग्नीत असणे अत्यंत आवश्यक आहे.

तुमची प्रगती तपासा :-

१) अध्यापक शिक्षणाच्या राज्य स्तरावरील संस्थांची कार्ये स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

_____

३.३ अध्यापक शिक्षण कार्यक्रमाच्या राष्ट्रीय स्तरावरील संस्था :-

३.३.१ विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) :-

विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना २८ डिसेंबर १९५३ साली न्यू दिल्ली येथे झाली. इ.स.१९५६ साली विद्यापीठ अनुदान आयोगाला भारत शासनाकडून स्वतंत्र दर्जा प्राप्त झाला.

कार्ये :-

- विद्यापीठे आणि महाविद्यालयांची गरज ध्यानात घेऊन त्यांना आर्थिक साहाय्य करते.
- विद्यापीठे आणि त्यांची अवस्था चांगली ठेवण्यासाठी आर्थिक साधनांचा विस्तार करते.
- विद्यापीठाला अनुदान देण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाला मार्गदर्शन पुरविते.
- राज्यात नवीन विद्यापीठ स्थापण्यास पाच वर्षांकरिता अनुदान पुरविते.
- विद्यापीठात नवीन विभाग सुरु करण्याकरिता किंवा शैक्षणिक कार्यक्रम करण्याकरिता पाच वर्षे अनुदान देते. परंतू त्यासाठी राज्याची संमती आवश्यक असते.
- आर्थिक मदत देऊन उच्च स्तरावरील संशोधन कार्य आणि शैक्षणिक कार्य करण्यास प्रेरणा देते.
- उच्च शिक्षण विद्यापीठातील नवीन कार्यक्रम आणि महाविद्यालयांना अनुदान देते.
- विद्यापीठातील आणि महाविद्यालयातील प्राध्यापकांना प्रकल्प कार्याकरिता शिष्यवृत्ती पुरविते.

अध्यापक शिक्षण समित्या :-

- शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी अध्यापक शिक्षण समित्यांची निर्मिती करण्यात येते. त्या समितीत सात सभासदांचा दोन वर्षांकरिता समावेश करण्यात येतो.
- अध्यापक शिक्षणात नवीन उपक्रम आणि संशोधन कार्याच्या जाणिवेसाठी प्रेरणा देते.
- संशोधन आणि अध्यापना कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी राष्ट्रीय शिष्यवृत्ती आणि शिक्षक शिष्यवृत्तीस अनुदान व मान्यता देते.
- विद्यापीठातील प्राध्यापकांना आंतरराष्ट्रीय सभा व चर्चासत्रास हजर राहण्याकरिता विद्यापीठ अनुदान आयोग प्रवासासाठी अनुदान देते.
- कार्यक्रमातील अंतर्गत बदलाकरिता व व्याख्याने देण्याकरिता विद्यापीठांमधून निमंत्रित प्राध्यापकांची नेमणूक करण्यात येते.
- विद्यापीठ आणि महाविद्यालयातील प्राध्यापकांकरिता राहण्यासंबंधीच्या सवलती पुरवते.
- पोस्ट पीएच.डी. कार्यासाठी संशोधन मदतनिसची नेमणूक करते.

संशोधन :-

- विद्यापीठातील प्राध्यापकांना त्याचे स्वतःचे संशोधन करण्याकरिता यु.जी.सी. भरीव अनुदान देते. इ.स.१९५३-५४ मध्ये, शिक्षण मंत्रालयाने एक योजना सुरु केली. या योजनेअंतर्गत महाविद्यालयातील आणि शिक्षण विभागातील प्राध्यापकांनी निवडलेल्या समस्येवर संशोधन कार्य करण्याकरिता व केंद्र मंत्रालयातून मान्यता दिल्यानंतर त्यांना त्यासाठी अनुदान देण्यात येते.
- संशोधनाकरिता सुविधा पुरविणे हा या योजनेचा मुख्य हेतू आहे. बहुतेक वेळा निधीची दुर्मिळता दिसून येते. प्रकल्प पूर्ण करण्याकरिता काही साधने पुरविण्यात येतात. प्रशिक्षण महाविद्यालयाचे कर्मचारी, संशोधक, सहाय्यक, यांच्याकरिता आर्थिक सवलती देण्यात येतात.

प्रगतिशील अभ्यास केंद्र (CASE) :-

★ भारतातील अध्यापन आणि संशोधनाचा दर्जा सुधारण्याकरिता यु.जी.सी.ने ज्ञानाच्या विविध शाखेत CASE ची स्थापना केलेली आहे. शिक्षणातील अध्यापन आणि संशोधनाचा दर्जा उंचावण्याच्या हेतूने बडोदा येथील शिक्षण विभाग आणि मानसशास्त्र विभागाची निवड करण्यात आलेली आहे. हे विभाग सर्व भारताचा शैक्षणिक पाया ध्यानात घेऊन कार्य करतात.

३.३.२ शैक्षणिक नियोजन आणि प्रशासनाच्या राष्ट्रीय संस्था (NUEPA / NIPEA):-

कार्ये :-

शैक्षणिक नियोजन आणि प्रशासन ही एक राष्ट्रीय उच्च संघटना म्हणून तिची कार्ये खालीलप्रमाणे आहेत.

- सेवांतर्गत कार्यक्रमांमधून शैक्षणिक प्रशासनाची क्षमता आणि पुरेसे ज्ञान विकसित करण्यासाठी शैक्षणिक नियोजन नियोजन आणि प्रशासनाचे प्रशिक्षण देणे.
- राज्य स्तर आणि स्थानिक पातळीवर शैक्षणिक नियोजन आणि प्रशासनाची कार्यक्षमता उंचावण्यासाठी प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देणे.
- शैक्षणिक नियोजन आणि प्रशासनाच्या क्षेत्रांतील एकात्मिक शिक्षण आणि संशोधन कार्याचे समन्वय करणे.
- चर्चासत्रे आणि कृतीसत्रे आयोजित करुन शैक्षणिक नियोजन आणि प्रशासनातील समस्या सोडविण्यासाठी शिक्षकांना उत्तेजन देणे.
- नियोजन आणि प्रशासनाच्या क्षेत्रातील नवीन विकास आणि नवीन उपक्रमासाठी विस्तार कार्यक्रमाची आखणी करणे.

- विकासांचे आकलन आणि विकसित देशातील नवोपक्रम समजून घेण्यासाठी इतर देशांशी संबंध प्रस्थापित करणे.
- नियोजन आणि प्रशासनाच्या क्षेत्रांत राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर मार्गदर्शन करणे.
- विस्तार कार्यक्रमांतर्गत शैक्षणिक नियोजन आणि प्रशासनावरील नियतकालिक व इतर पुस्तके प्रकाशित करणे.
- आपली शिक्षण पद्धती आणि शैक्षणिक समस्या सोडविण्यासाठी इतर देशातील शैक्षणिक नियोजन आणि प्रशासनाचा आढावा घेणे.
- या क्षेत्रात नवीन विकास व जाणीव जागृतीसाठी शैक्षणिक प्रशासकांसाठी उजळणी वर्ग घेणे.
- शैक्षणिक संशोधन अहवाल प्रकाशित करणे. प्रत्यक्ष कृती आणि तात्त्विक बाजू यांचा समन्वय साधण्यासाठी प्रकाशन विभागाची स्थापना करणे.
- प्रकाशित झालेले निष्कर्ष व चर्चा यावर आधारित चर्चासत्रे व कृतीसत्रे आयोजित करणे.
- विशेष क्षेत्रातील ज्या शाळा व महाविद्यालये संगणक, शैक्षणिक तंत्रविज्ञान, कला यासारखे मूलभूत शिक्षण देतात त्यांच्यासाठी प्रशिक्षणाची व्यवस्था करणे.

भाषिक संस्था :-

★ केंद्रीय हिंदी संस्थान.
★ सेंट्रल इन्स्टिटट्युट ऑफ इंग्लिश हैद्राबाद.
★ सेंट्रल इन्स्टिटट्युट ऑफ इंडियन लँग्वेज, म्हैसूर.

या ठिकाणी भाषेचे प्रशिक्षण देण्यात येते.

३.३.३ राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद (NCTE) :-

अध्यापक शिक्षण कार्यक्रम हा नाविन्य नसलेला, ताठर आणि वास्तव्यापासून दूर असा आहे. अशी चिकित्सा कोठारी आयोग अहवाल (१९६४-६६) मध्ये केलेली आहे. म्हणून, अध्यापक शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषदेची स्थापना करण्याचे ठरविण्यात आले. इ.स.१९७२च्या सप्टेंबरमध्ये शिक्षण केंद्रीय सल्लागार समितीने (CABE) सदर प्रस्ताव सादर केला. सदर प्रस्तावाला पाचव्या राष्ट्रीय नियोजनाने पाठींबा दर्शविला. त्यानंतर कायद्यानुसार २१ मे १९७३ रोजी भारतीय शिक्षण मंत्रालयाने NCTE ची स्थापना केली. इ.स.१९९३ पासून NCTE ला स्वतंत्र घटनात्मक दर्जा प्राप्त झाला.

उद्दिष्टे :-

★ अध्यापक शिक्षणाच्या नियोजित आणि समन्वयात्मक विकासासाठी कार्य करणे.
★ अध्यापक प्रशिक्षकांचा दर्जा आणि कार्यात सुधारणा घडवून आणणे.

कार्ये :-

१९९३ च्या घटनेनुसार NCTE खालीलप्रमाणे कार्य करते.

- अध्यापक शिक्षणाचे विविध पैलू आणि प्रकाशित निष्पत्ती संबंधी सर्वेक्षण आणि अभ्यास करणे.
- केंद्र आणि राज्य सरकार विद्यापीठ अनुदान आयोग आणि इतर संस्थांना अध्यापक शिक्षणासंबंधी नियोजन व कार्यक्रम यासंबंधी शिफारशी करणे.
- देशातील अध्यापक शिक्षण आणि त्याच्या विकासकार्याची जबाबदारी घेणे व समन्वय करणे.
- विविध स्तरावर अध्यापक प्रशिक्षक म्हणून काम करणाऱ्या उमेदवारासाठी कमीत कमी पात्रता ठरविणे त्यासाठी मार्गदर्शक नियम तयार करणे.
- एखाद्या विशिष्ट विभागाकरिता किंवा अध्यापक शिक्षणातील प्रशिक्षण, प्रवेशासंबंधीचे निकष इ.साठी नियमावली विकसित करणे.
- अध्यापक शिक्षणाअंतर्गत येणारे नवीन अभ्यासक्रम व कार्यक्रमाचे मार्गदर्शक नियम तयार करणे तसेच आवश्यक बाबीची निश्चिती करणे.
- अध्यापक शिक्षणांतर्गत नवीन अभ्यास केंद्र सुरु करण्यासंबंधीचे नियम व आवश्यक बाबी या संबंधी नियमावली तयार करणे.
- अध्यापक शिक्षण कार्यक्रमासंबंधी सर्वसामान्य मार्गदर्शक नियम विकसित करणे.
- अध्यापक शिक्षण (सेवापूर्ण प्रशिक्षण / सेवांतर्गत प्रशिक्षण) शिक्षकांसाठीच्या अभ्यासक्रमाचे मूल्यमापन आढावा घेऊन काळानुरुप अभ्यासक्रमातील करण्याचे बदल इ. बाबतीत केंद्र शासनाला सल्ला देणे.
- राज्य शासनाच्या संबंधीत असणाऱ्या कोणत्याही विषयाच्या बाबतीत सल्ला देणे. राज्य सरकारने दिलेल्या अध्यापक शिक्षणाच्या प्रगतिच्या नियोजनाचा आढावा घेणे.
- अध्यापक शिक्षणाचा योग्य दर्जा राखण्यासाठी शासनाला मार्गदर्शन करणे.
- अध्यापक शिक्षण संस्थाना मान्यता देणे.
- अध्यापक शिक्षणाचा दर्जा राखण्यासाठी नियम तयार करणे.
- नवोपक्रम आणि संशोधन अभ्यासास प्रेरणा देणे व त्यांचे संघटन करणे (मासिक / वार्षिक).
- अध्यापक शिक्षण कार्यक्रमाचे पर्यवेक्षण करणे व आर्थिक मदत देणे.
- भारतातील शिक्षक विकासाच्या कार्यक्रमाची जबाबदारी पार पाडणे.
- सद्यस्थितीच्या विकासानुरुप व बदलानुसार सेवांतर्गत शिक्षकांकरिता उजळणी कार्यक्रम तयार करणे.

खालील समितीच्याद्वारे NCTE कार्य करते.

- पूर्व प्राथमिक, प्राथमिक अध्यापक शिक्षण समिती.
- उच्च माध्यमिक अध्यापक शिक्षण समिती.
- विशेष शिक्षण अध्यापक शिक्षण समिती.
- सेवांतर्गत अध्यापक शिक्षण समिती.

NCTE ची कार्ये खालील बाबींशी संबंधित आहेत.

- संशोधन-विस्तार सेवा
- विकासात्मक कार्यक्रम
- प्रशिक्षण
- मूल्यमापन

३.३.४ (NCERT) राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद :-

प्रस्तावना :-

ज्ञानाचा प्रस्फोट झाल्यामुळे शिक्षणाचा प्रसार भारतातच नव्हे तर पूर्ण जगात झाला आहे. या बदलांमुळे समाजांच्या गरजाही बदलत चालल्या आहेत. शिक्षणातील नवीन बदलाला सामोरे जाण्यासाठी शिक्षकांच्या प्रशिक्षणाची गरज आहे. अशा प्रशिक्षणाची गरज NCERT आणि NCTE या संस्थांकडून भागविली जाते.

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT) :-

स्थापना :-

भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने ची स्थापना सन १९६१ मध्ये केली. ही एक स्वायत्त संस्था असून ती शिक्षण मंत्रालयाचा एक शैक्षणिक भाग म्हणून कार्य करते. शिक्षण क्षेत्रातील धोरणांची रचना आणि अंमलबजावणी करण्याकरिता शिक्षण मंत्रालयाला मदत करते. शैक्षणिक संशोधन करण्यासाठी विद्यार्थी-शिक्षक आणि शिक्षक-प्रशिक्षकांना ही संस्था प्रोत्साहन देते. वरील मुख्य उद्दिष्टे पूर्ण करण्याच्या उद्देशाने दिल्ली येथे शिक्षणाची राष्ट्रीय संस्था (NIE) व शिक्षणाची चार विभागीय महाविद्यालये अजमेर भोपाळ, भुबनेश्वर आणि म्हैसूर येथे स्थापन केली. ही संस्था राज्यातील विद्यापीठे आणि संस्था यांच्या सहकार्याने काम करते तसेच शालेय शिक्षणाच्या उद्दिष्टांचा पाठपुरावा करते. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांशी जवळचे संबंध प्रस्थापित करते. या संस्थेकडून केलेल्या संशोधनाचे निष्कर्ष सर्व सामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी पुस्तकांचे व नियतकालिकांचे प्रकाशन केले जाते.

उद्दिष्टे :-

- शिक्षणाच्या विविध दृष्टिकोनात संशोधनांचे संघटन व सामर्थ्य वाढविणे.
- उच्च स्तरावर सेवापूर्ण आणि सेवाअंतर्गत प्रशिक्षणाची सोय करणे.
- उद्दिष्टे प्राप्तीसाठी आवश्यक पाठ्यपुस्तके नियतकालिके आणि इतर साहित्याचे प्रकाशन करणे.
- राज्य शासनाच्या सहकार्याने शैक्षणिक संस्थांमधून विस्तार केंद्राचे संघटन करणे तसेच नवीन पद्धती व तंत्रज्ञानासंबंधी संस्थांना सवलती देणे.
- शंशोधन आणि उच्च प्रशिक्षणाचा विकास करणे व शैक्षणिक प्रशासक आणि अध्यापकांकरिता नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ एज्युकेशनची स्थापना करुन त्याची व्यवस्था पाहणे.
- मोठ्या प्रमाणावर मार्गदर्शन आणि समुपदेशनाची सेवा पुरविणे.

अ) NCERT ची भूमिका :-

NCERT ची महत्त्वाची कार्ये खालीलप्रमाणे आहेत.

- NIE च्या प्रशासनाची देखभाल करणे / व प्रादेशिक शिक्षण महाविद्यालयाची देखभाल करणे.
- शालेय शिक्षणात सुधारणा करण्यासाठी सर्व शाखांमधून संशोधन कार्याचे समन्वय करणे.
- शिक्षकांकरिता सेवापूर्ण व सेवाअंतर्गत शैक्षणिक कार्यक्रमांचे संघटन करणे.
- विद्यार्थ्यांकरिता अभ्यास साहित्य व विषयांशी संबंधित शिक्षक हस्तपुस्तिका तयार करणे व प्रकाशित करणे.
- विज्ञान, तंत्रज्ञान आणि सामाजिक शास्त्रे या विषयामधून शिष्यवृत्ती व पारितोषिके देण्याकरिता बुद्धिमान विद्यार्थ्यांचा शोध घेणे.
- शालेय शिक्षणात सुधारणा करण्याकरिता शिक्षण मंत्रालयाने (आता HRD) दिलेल्या कामाची जबाबदारी घेणे.

खालील संस्था कशाप्रकारे कार्य करते याची माहिती करुन घेणे आवश्यक आहे.

- नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ एज्युकेशन (NIE) NCERT ची उद्दिष्टे परिपूर्ण करण्याच्या उद्देशाने NIE ची कार्ये ९ विभाग, ७ घटक आणि २ कक्षांद्वारे चालते. त्याची माहिती खालीलप्रमाणे :

NIE चे विभाग :-

- शैक्षणिक विभाग
- निर्मिती विभाग
- गणित शिक्षण विभाग
- पाठ्यपुस्तक विभाग

- अध्यापक शिक्षण विभाग
- शैक्षणिक मानसशास्त्र प्रकाशन विभाग
- शैक्षणिक मानसशास्त्र प्रयोगशाळा विभाग
- पाठ्य पुस्तकांचा विभाग

NIE चे गट :-

- राष्ट्रीय प्रज्ञाशोध अभ्यासक्रम गट
- सर्वेक्षण आणि माहिती प्रक्रिया गट
- धोरण, नियोजन आणि मूल्यमापन गट
- ग्रंथालय आणि दस्तऐवज गट
- शिक्षणाचा व्यावसायिक गट
- परीक्षा सुधार गट
- परीक्षा संशोधन गट

NIE चे कक्ष :-

- प्राथमिक कक्ष
- नियतकालिक कक्ष

ब) शैक्षणिक तंत्रविज्ञानाची केंद्रीय संस्था (CIET) (Central Institute of Educational Technology) :-

CIET ची कार्ये खालीलप्रमाणे आहेत.

★ शिक्षणाच्या प्रसारामध्ये शैक्षणिक तंत्रविज्ञानाचा उपयोग करण्यास उत्तेजन देणे.
★ शालेय नभोवाणी आणि शैक्षणिक दूरदर्शनशी संबंधित प्रशिक्षण कार्यक्रमाचे संघटन करणे.
★ शैक्षणिक तंत्रविज्ञानावर आधारित अध्ययन साधनाची निर्मिती करणे.

प्रादेशिक शिक्षण संस्था (RIE) (Regional Institute of Education) :-

- देशाच्या विविध भागात एक नमुना संस्था म्हणून NCERT ची ने या शिक्षण संस्थेची स्थापना केली.
- त्याचबरोबर अध्यापक शिक्षण कार्यक्रम (बी.एड्.चा ४ वर्षाचा एकात्मिक अभ्यासक्रम) सेवांतर्गत प्रशिक्षण, विस्तार सेवा आणि संशोधनाशी संबंधित असलेला हा कार्यक्रम महाविद्यालयाला जोडण्यात आला आहे.
- चार वर्षाच्या बी.एड्. अभ्यासक्रमात शिक्षणाचा व्यावसायिक विषयी दृष्टिकोन समोर ठेऊन अभियांत्रिकी वैद्यकिय विद्याशाखेप्रमाणे बी.एड्.चे विद्यार्थी सुद्धा आशय आणि अध्यापन पद्धतीचे एकाचवेळी प्रशिक्षण घेतील.

- हे प्रशिक्षण बी.एस.सी., बी.एड्. (विज्ञान) बी.ए.बी.एड्. (भाषा) पदवीसाठी देण्यात येते.
- ही महाविद्यालये एक वर्षाचा बी.एड. अभ्यासक्रम विशेषतः विज्ञान, कृषी, वाणिज्य आणि भाषा मध्ये आयोजित करतात.
- ते एम.एड. अभ्यासक्रम सुद्धा चालू करु शकतात.
- ही महाविद्यालये अजमेर, भोपाळ, भुबनेश्वर आणि म्हैसूर येथे असून ती देशातील सर्वोत्कृष्ट प्रादेशिक केंद्रे आहेत.

भारतीय शिक्षणात NCERT ची भूमिका :-

- NCERT संशोधन, विकास, प्रशिक्षण, विस्तार सेवा अभ्यास साहित्याचे प्रकाशन आणि मूल्यमापनासंबंधी विविध कार्यक्रमाचे संघटन व आयोजन करते.
- शालेय शिक्षणात गुणात्मक सुधारणा करणे हे या संस्थेचे ध्येय आहे.
- संख्यात्मक वाढीपेक्षा शालेय शिक्षणाचा गुणात्मक विकास करणे हा संस्थेचा हेतू आहे.
- आपल्या शिक्षणाचा संबंध राष्ट्रीय उद्दिष्टांशी व सामाजिक गरजांशी असावा. यासाठी ही संस्था काम करते.
- शिक्षकांच्या संशोधन प्रकल्पांना, NIE NCERT मध्ये आयोजित केलेल्या संशोधनांना आर्थिक मदत दिली जाते.
- शालेय शिक्षक आणि शिक्षक प्रशिक्षकांच्या व्यवसायात वाढ होण्यासाठी ही संस्था उन्हाळी प्रशिक्षण कार्यक्रमाचे संघटन करते. या उपक्रमांमधून शिक्षणात गुणात्मक सुधारणा व्हावी अशी या संस्थेची धारणा आहे.

तुमची प्रगती तपासा :-

१) अध्यापक शिक्षणाच्या राष्ट्रीय संस्थांच्या कार्याची चर्चा करा.

_____

_____

_____

_____

३.४ आंतरराष्ट्रीय स्तरावरील संस्था :-

३.४.१ UNESCO युनेस्को :-

राष्ट्रांची प्रगती / कल्याण हे तेथील उच्च शिक्षण पद्धती व संस्था यांच्या गुणवत्तेशी जोडलेली असते. (उच्च शिक्षणावरील जागतिक परिषद जून २००३).

उच्च शिक्षणाची जबाबदारी संयुक्त राष्ट्रांवर असल्याकारणाने नवीन उपक्रम आणि विकास, पुराव्यांवर आधारित धोरणांचा विकास करण्याचे कार्य तसेच गरीबीचे उच्चाटन आणि हजारो विकासात्मक ध्येये, प्राप्त करण्याची जबाबदारी युनोस्कोचीच आहे.

तरुणांना उच्च शिक्षणाची संधी संस्थांना नवोपक्रम करण्यासाठी उत्तेजन देणे, उच्च शिक्षणापासून वंचित असलेल्या गटावर शिक्षणाचा सहज परिणाम होईल अशा प्रकारचे शिक्षण देणे आवश्यक आहे.

उच्च शिक्षण दूरवर पोहोचविणे, गतिशीलता आणि पात्रतेची ओळख, शिक्षणाचा खालावलेल्या दर्जा इ. पासून संरक्षण करण्यासाठी विद्यार्थ्यांना साधने पुरुविणे, उच्च शिक्षणाची गुणवत्ता राखण्यासाठी ही संस्था विशेष लक्ष देते.

युनेस्को गुणवत्तापूर्ण शिक्षणाला प्राधान्य देते त्यासाठी संशोधन करण्यासाठी संस्थांचे सामर्थ्य वाढविते व सर्वत्र ज्ञानाचा प्रसार करते.

अध्यापक शिक्षण :-

★ शिक्षकांचे जागतिक नेतृत्त्व
★ त्यांचा दर्जा / गुणवत्ता
★ त्यांचे व्यावसायिक प्रशिक्षण
★ त्यांचे व्यवस्थापन, प्रशासन आणि धोरणात्मक विषय
★ युनेस्को / ILO शिक्षकांचा दर्जा आणि त्याची कार्यपद्धती यासंबंधी शिफारशी करते.
★ द टिचर ट्रेनिंग इनिशिएटिव्ह फॉर सब सहारा अफ्रिका (TTISSA) ही अफ्रिकेच्या संदर्भात पुढाकार घेऊन कार्य करते.

ही अफ्रिकेच्या संदर्भात पुढाकार घेऊन कार्य करते.

युनेस्को शिक्षक प्रशिक्षणासाठी काय करते (भूमिका आणि कार्ये) :-

★ शिक्षकांचा व्यावसायिक दर्जा सुधारण्यासाठी त्यांना युनेस्को प्रशिक्षण देते.

युनेस्को आणि शिक्षक :-

गुणवत्तापूर्ण शिक्षणात चांगल्या शिक्षकांना महत्त्वाचे स्थान आहे. प्रत्येक मुलांची क्षमता व शिकण्याची इच्छा लक्षात घेऊन मानवी पाया भक्कम करुन त्यांचा विकास करण्यात शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. 'सर्वांसाठी शिक्षण' हे शिक्षकांशिवाय शक्य नाही.

शिक्षक : उद्याची आशा निर्माण करतात :-

- युनेस्कोच्या कार्यात शिक्षक केंद्रस्थानी आहेत. दररोज ६० दशलक्षापेक्षा अधिक शिक्षक एक अब्ज मुलांची काळजी घेतात व त्याच्या आत्म्यावर व मनावर सुसंस्कार करतात.

शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी शांतता आणि ऐक्य निर्माण करण्यासाठी शिक्षकांची अत्यंत गरज आहे. उद्याचे नेतृत्त्व करणाऱ्या मुलांसाठी शिक्षक कार्य करतात.

- परंतू परिणामकारक शिक्षक होण्याकरिता ते चांगले प्रशिक्षित असले पाहिजेत. प्रेरणा व चांगल्या कार्याचे वातावरण मिळाले पाहिजे. प्रेरणा व चांगल्या कार्याचे वातावरण मिळाले पाहिजे. त्यांची जीवनशैली उंचावण्यासाठी चांगले वेतन असणे आवश्यक आहे. शिक्षकांच्या व्यावसायिक सामाजिक नैतिक, दर्जाची बांधणी करण्याकरिता युनोस्कोने १९६६ आणि १९९७ मध्ये शिक्षकांचा दर्जा व शिक्षणासंबंधी शिफारशी केलेल्या आहेत.
- सध्या जगात शिक्षकांची संख्या फारच अपूरी आहे. शिक्षकांची निर्मिती, गळती व त्यांचा व्यावसायिक दर्जा उंचावण्यासाठी 'युनेस्को' राष्ट्रीय आयोगांना मदत करते. शिक्षकांची भरती करण्यासाठी शासनावर दबाव आणते.

युनेस्को आणि अध्यापक शिक्षण :-

- शिक्षक प्रशिक्षण आणि राष्ट्रीय विकासाच्या ध्येयातील शैक्षणिक धोरण यावर भर देणे.
- अध्यापक शिक्षणातील दूर व मुक्त अध्ययन, इ-लर्निंग आणि माहिती तंत्रज्ञान व संगणकाचा उपयोग या संदर्भातील धोरणांना मान्यता देणे व फैलाव करणे.
- जगातील शिक्षकांच्या प्रशिक्षणात आणि दर्जात सुधारणा घडवून आणणे.
- HIV / AIDS आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील जीवन कौशल्य या संबंधी आंतरराष्ट्रीय दर्जात एकनिष्ठता आणणे.
- चांगले पाठ व देशातील शिक्षकांसंबंधी चांगल्या गोष्टी सर्वसामान्य शिक्षकांपर्यंत पोहचविणे व माहितीची देवाणघेवाण करणे.
- व्यावसायिकदृष्ट्या प्रशिक्षित झालेल्या शिक्षकांचा विकास करुन त्याच्याकडून मानवी संबंध, उद्याच्या जगाची नवीन पिढी तयार करण्यासाठी प्रेरणा देणे.

सर्वांसाठी शिक्षण संपादन करण्याकरिता शिक्षक प्रशिक्षण (EFA) :-

- प्रशिक्षित शिक्षकांचा तीव्र तुटवडा हे एक फार मोठे आव्हान EFA समोर आहे. जर EFA ने २०१५ पर्यंत हे आव्हान प्राप्त केले तर जगात १५ ते ३० दशलक्ष शिक्षकांची गरज भासेल. सब सहरान अफ्रिकेत हे ध्येय साध्य करण्याकरिता फक्त प्राथमिक शिक्षणात २०१५ पर्यंत ४ दशलक्ष शिक्षकांची गरज आहे. अनौपचारिक शिक्षण, साक्षरता प्रशिक्षण त्याचबरोबर शिक्षकांचे सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी अधिक शिक्षकांची गरज भासणार आहे.
- अध्यापक शिक्षण हे पूर्णपणे गुणात्मक शिक्षणाशी संबंधित आहे आणि त्याचा अभ्यासक्रम बदलाशी जवळचा संबंध आहे. अध्ययन निष्पत्तीत सुधारणा आणि शालेय वातावरण निकोप राखण्यासाठी अध्यापक शिक्षण महत्त्वाचे ठरते. चार वर्षाच्या अखेरीस प्रत्येक देश राष्ट्रीय शिक्षणातील सर्वसमावेशक अध्यापक शिक्षण योजनेत एकात्मता आणण्यासाठी अध्यापक शिक्षण प्रशिक्षणात गुणात्मक सुधारणा करणे, शिक्षकांचा तुटवडा आणि शिक्षकांचा दर्जा निश्चित करणे, आणि आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर HIV प्रतिबंधासंबंधी धोरण ठरविणे याबाबतीत युनेस्कोच्या कार्याची ओळख करुन घेणे आवश्यक आहे.

युनेस्कोची शिक्षक प्रशिक्षण कृती :-

- गतिमान राष्ट्रीय माहितीची योजना अंगोला, झांबिया आणि नायगर येथे पूर्ण झालेली आहे. व बुरुंदी येथे कार्य चालू आहे.
- सुरुवातीला पहिल्या विकास टप्प्यात १७ देशात पूर्ण वेळ तज्ज्ञांची नेमूणक करणे.
- अध्यापक शिक्षणाची राज्य व राष्ट्रातील सर्वसमावेशक आणि एकात्मिक माहिती गोळा करणे.
- देशातील शिक्षकांची कमतरता लक्षात घेऊन व माहितीचे विश्लेषण करुन प्रशिक्षित शिक्षक, व्यावसायिक शिक्षकांची संख्या वाढविणे व धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी मदत करणे.
- शासन आणि नियोजन व 'सर्वांसाठी शिक्षण' ही योजना राबविणारे शिक्षक यांच्यातील सल्लामसलतीस उत्तेजन देणे.
- चांगल्या शिक्षकांची विभागणी व वाटणीचे धोरण ठरविणे.
- EFA धोरण आणि चांगल्या शिक्षकांच्या धोरण व कृतीचा फैलाव करण्यासाठी व संबंधित संशोधन करण्यासाठी मार्गदर्शन करणे.
- सुधारित धोरणे ठरविणे, संस्थात्मक सामर्थ्यात सुधारणा करणे, शिक्षकांच्या गुणात सुधारणा घडवून आणणे शिक्षकांची अपूरी संख्या असली तरी त्यावर मात करुन २०१५ पर्यंत शिक्षण सर्वांसाठी ही योजना पूर्ण करण्याचा हेतूने युनेस्को शिक्षकांना प्रशिक्षण देते.
- युनेस्कोच्या अध्यापक शिक्षणाचे UNITWIN / UNESCO कार्यक्रम अगोदरच अनेक प्रदेशात चांगल्या प्रकारे स्थिरावत झालेले आहेत. युनेस्कोच्या अधिकाराची स्थापना इस्ट चालना नॉर्मल युनिर्व्हसिटी, शांघाय, PR चायना येथे केली आहे. संशोधन, प्रशिक्षणाची माहिती, अध्यापक शिक्षण व प्रशिक्षणाची माहिती गोळा करणे आणि शैक्षणिक संशोधन इ. बाबतीत एक वाक्यता आणणे हा या स्थापनेमागील हेतू आहे. उच्च स्तरावरील आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधने, आणि इस्ट चायना विद्यापीठातील अध्यापक वर्ग व चिन, दक्षिणपूर्व आशिया प्रदेशातील इतर संस्था यांच्यामध्ये समन्वय आणणे असा याचा अर्थ होतो.

तुमची प्रगती तपासा १ :-

युनेस्को एक आंतरराष्ट्रीय संस्था म्हणून त्याच्या भूमिकेची व कार्याची चर्चा करा.

_____

_____

_____

_____

_____

३.५ सारांश :-

या घटकात आपण राज्य, राष्ट्र व आंतरराष्ट्रीय स्तरावरील शिक्षणासंबंधी SIE, SCERT, NCERT, NCTE, UGC आणि UNESCO च्या कार्याची चर्चा केलेली आहे. परंतू हे नियोजन वास्तवात आणण्यासाठी तुमची भूमिका व कार्य महत्त्वाचे आहे.

घटकावरील प्रश्न :-

१) अध्यापक शिक्षणाच्या विकासासंबंधी MSCERT चे कार्य स्पष्ट करा.
२) राष्ट्रीय स्तरावरील विविध संस्थांची नावे सांगा.
अध्यापक शिक्षणासंबंधी NCTE ची भूमिका स्पष्ट करा.
३) टीपा लिहा.
४) अ) UGC
ब) UNESCO

❖❖❖❖

४

पूर्वप्राथमिक आणि प्राथमिक स्तरावरील अध्यापक शिक्षण

घटक रचना :

४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ पूर्वप्राथमिक स्तरावरील अध्यापक शिक्षणाची उद्दिष्टे

४.३ प्राथमिक स्तरावरील अध्यापक शिक्षणाची उद्दिष्टे

४.४ एन.सी.टी.ई. ने शिफारस केलेली पूर्वप्राथमिक आणि प्राथमिक स्तरावरील अध्यापक शिक्षणक्रमाची रचना

४.५ पूर्वप्राथमिक स्तरावरील अध्यापक शिक्षणाकरिता राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा

४.५.१ प्राथमिक स्तरावरील अध्यापक शिक्षणाचा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा

४.६ सारांश

४.० उद्दिष्टे :

- शिक्षणाच्या विविध स्तरावरील अध्यापक शिक्षणाच्या उद्दिष्टांचे महत्त्व
- बालसंगोपन शिक्षण स्तरावरील अध्यापक शिक्षणाची उद्दिष्टे
- प्राथमिक स्तरावरील अध्यापक शिक्षणाची उद्दिष्टे
- माध्यमिक स्तरावरील अध्यापक शिक्षणाची उद्दिष्टे
- उच्च माध्यमिक शालेय स्तरावरील अध्यापक शिक्षणाची उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना :

भारताने तीन स्तरावर विभागलेली दहा वर्षाची सर्वसामान्य शालेय प्रणाली स्वीकारलेली आहे. पूर्वप्राथमिक शिक्षण, प्राथमिक शिक्षण आणि माध्यमिक शिक्षण. त्यानंतरच्या दोन वर्षात उच्च माध्यमिक स्तरावर विषय केंद्री आणि विद्याशाखीय दृष्टीकोनाची तरतूद केलेली आहे. शालेय शिक्षणाच्या सर्व स्तरावर विद्यार्थ्यांच्या पक्वतेनुसार व त्यांच्या मानसिक तयारीनुसार वेगवेगळ्या अध्यापक शिक्षण अभ्यासक्रमाची आवश्यकता आहे.

४.२ पूर्व-प्राथमिक स्तरावरील अध्यापक शिक्षणाची उद्दिष्टे :

पूर्व - प्राथमिक स्तरावरील अध्यापक शिक्षण :

पूर्व-प्राथमिक पायरी ही औपचारिक शिक्षणाकरिता नाही. या स्तरावर साक्षरतेचा विचार करु नये. मुलांची प्राथमिक शिक्षणाकरिता तयारी या स्तरावर करुन घ्यावी. या

स्तरावरील अध्ययनाची वैशिष्टे म्हणजे. गट कार्य, खेळातून अध्ययन तंत्रे, भाषा व नंबर गेमस्, आणि मुलांमध्ये सामाजिकरणाची आणि पर्यावरणाची जाणीव करुन देण्यासाठी काही कृती सुचविलेल्या आहेत. त्याद्वारे मुलांची शारीरिक, मानसिक व भावनिक पक्वता निर्माण होण्यास मदत होते.

जीवन कौशल्ये आणि चांगल्या सवयी, एकत्र राहण्याची गरज इ. दृष्टीकोनाचा विकास घडवून आणण्यासाठी मुलांची खूप काळजी घेणे गरजेचे आहे. आनंदी आणि आरोग्यसंपन्न बालपण म्हणजे विविध प्रकारच्या मुख्य कृतींवर भर देणे होय.

पूर्व-प्राथमिक स्तरावरील अध्यापक शिक्षणाची विशेष उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

- व्यक्तिगत आणि गट कृतीद्वारे मुलांच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक, भावनिक सौंदर्यात्मक भाषिक विकासासाठी शिक्षकांची तयारी करणे.
- शिक्षकांना बालमानशास्त्राविषयींचे ज्ञान, मानवाचा उगम व संस्कृतीचा पाया, समाजशास्त्र, भारतीय वारसा आणि बालकांची परिस्थिती विषयी ज्ञान देणे.
- शिक्षक ज्या क्षेत्रात काम करतात. त्या संबंधित संस्थांशी सहकार्य व समन्वय प्रस्थापित करण्याची क्षमता विकसित करणे.
- मुलांकरिता शैक्षणिक खेळ व पूरक कृतींचे आयोजन करण्याची क्षमता विकसित करणे.
- निसर्गाचा अभ्यास करण्यासाठी क्षेत्रिय भेटी आयोजित करुन त्याद्वारे मुलांना निरीक्षण करण्याचे प्रशिक्षण देणे.
- मुलांच्या संवेदना व कारक विकासावर अधिक भर देण्यासाठी कमी किंमतीची विविध प्रकारची साधने तयार करणे, निवड करणे व त्याचा प्रत्यक्ष उपयोग करण्यास प्रोत्साहन देणे.
- मुलांमध्ये स्वसंकल्पना, स्वत:बद्दलचा आदर, स्वत:बद्दलचे मत, सापत्नभावाची जाणीव व कृतज्ञता विकसित करण्यासाठी शिक्षकांना प्रेरणा देणे.
- मुलांमध्ये पर्यावरणाविषयीची जाणीव विकसित करण्यास प्रोत्साहन देणे.
- चांगले जीवन जगण्याची कला रुजविण्यास प्रोत्साहन देणे.

४.३ प्राथमिक स्तरावरील अध्यापक शिक्षणाची उद्दिष्टे :

प्राथमिक स्तरा वरील अध्यापक शिक्षण :

राष्ट्रीय विकासामध्ये ज्याचे महत्त्वपूर्ण योगदान आहे त्या शिक्षण प्रणालीत प्राथमिक शिक्षणाचा महत्त्वाचा वाटा आहे. मुख्यत: पूर्व-प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मुलांना प्राथमिक वर्गात दाखल केले जाते. समाजातील सुशिक्षित, सामान्य व दुर्लक्षित / दडपलेल्या अशा विविध कुटुंबातील मुलांना प्राथमिक विभागात प्रवेश दिला जातो येथे नागरिकत्त्वाची जोपासना, मूल्यांची रुजवणूक, योग्य वर्तनाचा विकास आणि जीवन कौशल्यांची जोपासना करण्यात येते. या स्तरावर मिळविलेल्या विविध गुणांचा उपयोग संपूर्ण जीवनभर होत असतो.

प्राथमिक स्तरावरील अध्यापक शिक्षणाची उद्दिष्टे :

- शिक्षकांना प्राथमिक शिक्षणाचे स्वरुप, समस्या आणि विषय यांची जाणीव करुन देणे.
- शिक्षण घेत असलेल्या मुलांचे स्वरुप व पक्वता आणि त्यांचा विविध अंगाने होणारा विकास याचे आकलन करुन घेण्यास प्रवृत्त करणे.
- शाळा व अध्यापनासाठी गतिशील समाजातील साधन म्हणून त्याची व्यवस्था करण्यास प्रेरणा देणे.
- नवीन शिक्षण व समाजाचा दृष्टिकोन, अनुदेशनाचे आयोजन, विषयाची एकात्मता, त्याचे स्वरुप व हेतू यांची जाणीव करुन घेण्यास विद्यार्थी-शिक्षकांना प्रेरणांना देणे.
- जीवनातील समस्या सोडविण्याचा व समजून घेण्याचा विशाल दृष्टिकोन विकसित करणे.
- पर्यावरणाचे रक्षण करण्याची जाणीव निर्माण करणे.
- समाजाच्या गरजेनुसार विशिष्ट आणि नेहमीच्या अध्ययन प्रणालीचा समावेश असलेली विद्यार्थी केंद्रित अध्यापन पद्धती विकसित करण्याची शिक्षकांना प्रेरणा देणे.
- जीवनभर अध्ययनाची क्षमता व आवड, त्यांच्या क्षेत्रातील अद्ययावत झालेल्या विकासाची जाणीव आणि गरजेनुसार व्यवहार कौशल्य प्राप्त करण्यास प्रोत्साहन देणे.
- माहिती तंत्रज्ञानाचे फायदे व त्याचा वर्गातील उपयोग समजून घेण्यात मदत करणे.
- सर्वसामान्य शालेय प्रणालीनुसार शारीरिक, योगासंबंधी व आरोग्यविषयीचे प्राथमिक ज्ञान देणे.
- अद्ययावत रचनात्मक अध्यापन शास्त्र आणि मूल्यमापन तंत्रे याची माहिती करुन घेणे.
- मूल्यशिक्षण, जीवन कौशल्याविषयीचे शिक्षण, कार्यशिक्षण आणि रुपातील समाजापासून दूर असलेले व दुर्लक्षित असलेल्यांची जाणीव निर्माण करण्याची प्रेरणा देणे.

तुमची प्रगती तपासा :

१) प्राथमिक शिक्षण स्तरावर मुलांच्या विकासासाठी महत्त्वाची क्षेत्रे कोणती आहेत ?

२) ज्यांना बालसंगोपन आणि शिक्षणाची गरज आहे अशा मुलांना तुम्ही कसे वेगळे कराल ?

_____

_____

_____

_____

_____

_____

_____

४.४ एन.सी.टी.ई.ने शिफारस केलेली पूर्व-प्राथमिक व प्राथमिक स्तरावरील अध्यापक शिक्षणाची रचना :

पूर्व-प्राथमिक अध्यापक शिक्षण क्रमासाठी शर्ती आणि नियम :

१. हेतू :

४ ते ६ या वयोगटातील मुलांना शिकविण्याकरिता पूर्व-प्राथमिक शिक्षकांना तयार करण्यासाठी हा अभ्यासक्रम आहे. मुलांचे शालेय पूर्व शिक्षण करण्याकरिता निवडक शिक्षक या अभ्यासक्रमातून तयार होतील. प्राथमिक शिक्षणाशी अद्याप पूर्व-प्राथमिक शिक्षणाचा संबंध जोडलेला नाही. खाजगी स्वरूपात हे वर्ग चालविण्यात येतात. वयोगट ४ ते ८ वर्षापर्यंतच्या मुलांना शिकविण्यासाठी बालसंगोपन प्रशिक्षण म्हणून या शिक्षणक्रमाला मान्यता मिळणे गरजेचे आहे.

२. कालावधी आणि विद्यार्थी संख्या :

अ) अभ्यासक्रमाचा कालावधी एक वर्षाचा असेत.
ब) ५० विद्यार्थ्यांसाठी सर्व अत्यावश्यक भौतिक व शैक्षणिक सुविधा आणि तज्ज्ञ अध्यापक वर्ग असणे आवश्यक आहे.

३. पत्रता :

अ) माध्यमिक परीक्षा (इ. १० वी) किंवा तत्सम
ब) प्रवेश साधारणतः पात्र परीक्षेच्या गुणांवर आधारित किंवा राज्य शासनाच्या धोरणानुसार घेण्यात येणाऱ्या प्रवेश परीक्षेवर आधारित
क) राज्य शासनाच्या नियमांनुसार एस.सी. / एस.टी. / ओबीसी / अपंग / महिला इ. ना राखीव जागा ठेवण्यांत येतील.

४. अभ्यासक्रम आणि अध्यापक वर्गाची आवश्यकता :

अ) प्रवेशाचा व परीक्षेचा कालावधी वगळून एकूण अध्यापनाचे कमीत कमी १५० दिवस असावेत. जवळच्या पूर्व-प्राथमिक शाळेत प्रत्येक विद्यार्थी-शिक्षकाने ३० दिवसाची आंतरवासिता पूर्ण केली पाहिजे. बालसंगोपन अभ्यास केंद्रामध्ये जाऊन विद्यार्थी-शिक्षकाने बालकांशी आंतरक्रिया घडवून आणावी तसेच मुलांबरोबर काही कार्यक्रम करावेत.

ब) अभ्यासक्रमाचा भर विविध अध्यापनपद्धतीवर असावा. उदा. भूमिकाकरण, खेळ, प्रश्नोत्तर, वस्तू तयार करणे, प्रकल्प कार्य, बालमेळावा इ. त्यामुळे आनंदमय वातावरणात शिक्षकांना प्रशिक्षण मिळेल व वयोगट ४-६ मधील मुलांना शालेय शिक्षणाविषयी आकर्षण वाटू लागेल.

क) ५० विद्यार्थ्यांच्या एका गटासाठी / तुकडीसाठी विभागप्रमुख / मुख्याध्यापक, दोन पुर्णवेळ शिक्षण आणि दोन अर्धवेळ शिक्षक असतील. विद्यार्थ्यांच्या वाढीव संख्येनुसार शिक्षकांची संख्यासुद्धा वाढेल.

ड) सहशालेय उपक्रमांतर्गता शारीरिक शिक्षण, कला, कार्यानुभव, संगीत, इ. कृती घेण्यासाठी अर्धवेळ शिक्षकाची नेमणूक करावी.

५. अध्यापकांची शैक्षणिक पात्रता :

अ) मुख्याध्यापक / विभाग प्रमुख / प्राचार्य :

१) शिक्षकांच्या पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता

२) प्राथमिक अध्यापक शिक्षण / पूर्व-प्राथमिक अध्यापक संख्येत कमीत कमी ५ वर्षे अध्यापनाचा अनुभव

ब) अध्यापक : पदवी बरोबर बी.एड्. / बी.एड्. (बालसंगोपन) व चांगल्या शैक्षणिक नोंदी असाव्यात.

किंवा

बालसंगोपन / शालेयपूर्व डिप्लोमासह पदवीधर / प्राथमिक शिक्षणाचा डिप्लोमा.

क) शारीरिक शिक्षकाची पात्रता : राज्य शासनाने निश्चित केल्याप्रमाणे कला, कार्यानुभव इ.

६. व्यवस्थापकीय कर्मचारी :

माध्यमिक शाळेकरिता राज्य शासनाने निश्चित केलेल्या नियमांनुसार / शर्तीनुसार व्यवस्थापकीय कर्मचारी व सेवक यांची नियुक्ती करण्यात येईल.

७. भौतिक सुविधा :

अ) विद्यार्थी संख्येनुसार आवश्यक वर्ग खोल्या, मुख्याध्यापक / प्राचार्यासाठी / शिक्षक व कार्यालयासाठी स्टोअर रुम, इ. खोल्या संस्थेत असाव्यात. प्रत्येक विद्यार्थ्यास १० चौरस फुट याप्रमाणे जागा असावी.

ब) वर्गाबाहेर व वर्गात घेण्यांत येणाऱ्या खेळांसाठी पुरेशी जागा असावी.

क) व्यवस्थापनाने / संस्थेने अर्ज करते वेळी संस्थेकडे पुरेशी जागा / व इमारत असावी.

शासनाची जागा जास्त काळासाठी भाडे पट्टीवर घेतली तर शासनाच्या नियमानुसार त्याचा विचार केला जाईल.

कायम स्वरुपाच्या इमारतीचे बांधकाम इमारतीचे बांधकाम अर्धवट असेल तर तीन वर्षाकरिता तात्पुरत्या जागेत संस्थेचे कार्य चालू ठेवता येईल तीन वर्षे पूर्ण झाल्यानंतर संस्था कायमस्वरुपी जागेत हालवणे अत्यावश्यक आहे.

८. संस्थेकडून मिळणाऱ्या सवलती / सोयी :

एका मोठ्या खोलीमध्ये पुस्तके / मासिके, जर्नल, दृक-श्राव्य साधने, शैक्षणिक साधने, खेळाचे साहित्य, संगणक इ. साहित्याचा समावेश असलेले अध्ययन साहित्य केंद्र असावे.

९. सेवक वर्गाच्या शर्ती आणि अटी :

अ) राज्य शासनाच्या धोरणानुसार निवड समितीकडून कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात यावी.

ब) सर्व नेमणूका पूर्णवेळ व नियमित करण्यात याव्यात.

क) योग्य उमेदवार उपलब्ध होईपर्यंत संस्था तात्पुरत्या स्वरुपात कर्मचाऱ्यांची नेमणूक करु शकते.

ड) अर्धवेळ शिक्षकाची किंवा इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक शासनाच्या नियमानुसारच कराव्यात.

इ) शासनाचे वेळोवेळी निश्चित केलेल्या नियमानुसारच शैक्षणिक व इतर कर्मचारी (अर्धवेळ कर्मचाऱ्यांसह) यांचे वेतन देणे अत्यावश्यक आहे.

फ) पेन्शन, ग्रॅच्युटी, प्रॉव्हिडंट फंड इ. बाबतीत संस्थेच्या व्यवस्थापनाने कायदेशीररित्या तक्रारींचे निवारण करावे.

ग) शासनाच्या धोरणानुसार निवृत्तीचे वय निश्चित करावे. ते ६५ वर्षापेक्षा अधिक असू नये.

१०. व्यवस्थापन :

अ) सोसायटी / ट्रस्ट कडून चालविण्यात येणाऱ्या खाजगी संस्थेची कायद्यानुसार संबंधित अधिकाऱ्याकडून नोंदणी करुन घेणे आवश्यक आहे.

ब) राज्य शासनाने निश्चित केल्याप्रमाणेच ट्यूशन फी व इतर फी आकारण्यात यावी.

क) विनाअनुदानित संस्थेच्या बाबतीत देणगी निधी रु. ५ लाख व कर्मचाऱ्यांच्या तीन वेतना एवढा राखीव निधी संयुक्तरित्या व्यवस्थापनाचा अधिकृत प्रतिनिधी व विभागीय समितीच्या अधिकारी यांच्या नावे ठेवण्यात यावा.

११. सदस्यत्त्व (Affiliation) :

राज्य शासनाच्या आराखड्यानुसार तपासणी मंडळाकडून तपासणी आयोजित करण्यात यावी.

प्राथमिक शिक्षक शिक्षणक्रमाकरिता शर्ती व दर्जा :

१) हेतू :

प्राथमिक शिक्षक शिक्षणक्रम म्हणजे प्राथमिक शाळांकरिता प्रशिक्षित करण्यात येणाऱ्या शिक्षकांचा शिक्षणक्रम (प्राथमिक आणि उच्च प्राथमिक)

२) कालावधी व विद्यार्थी संख्या :

अ) प्राथमिक शिक्षक शिक्षणक्रमाचा कालावधी २ वर्षाचा असतो.

ब) अभ्यासक्रम उपयुक्त भौतिक व शैक्षणिक सुविधा आणि अध्यापक कर्मचारी ध्यानात घेऊन प्रत्येकवर्षी ५० विद्यार्थ्यांना एका तुकडीत प्रवेश देता येतो.

३) आवश्यक पात्रता :

अ) उच्च माध्यमिक परीक्षेत उमेदवाराने कमीत कमी ४५% गुण मिळविलेले असावेत किंवा तत्सम पात्रता असावी.

ब) राज्य शासनाच्या धोरणानुसार पात्र परीक्षेत मिळालेल्या गुणांवर आधारित किंवा राज्य शासनाने आयोजित केलेल्या प्रवेश परीक्षेच्या आधारे प्रवेश देण्यात येतील.

क) संबंधित राज्य शासनाच्या नियमांनुसार एस.सी. / एस.टी. / ओबीसी / अपंग / स्त्रिया इ. ना राखीव जागा ठेवण्यात येतील.

४) अभ्यासक्रम आणि अध्यापक वर्गाची आवश्यकता :

अ) प्रवेश, परीक्षा, इ. कालावधी वगळून वर्षभरात कमीत कमी १५० अध्यापनाचे दिवस असावेत. प्रत्येक प्रशिक्षणार्थीने जवळपासच्या प्राथमिक शाळेत कमीत कमी ३० दिवसांची आंतरवासित) पूर्ण करणे आवश्यक आहे. (सराव पाठ व कौशल्य विकासासह)

ब) पायाभूत विषयांच्या अध्यापनाशिवाय, प्राथमिक आणि उच्च प्राथमिक अभ्यासक्रमातील प्रांतिक भाषा / मातृभाषा, इंग्रजी, गणित, विज्ञान आणि सामाजिक शास्त्रे इ. विषय अध्यापन पद्धती म्हणून निवडण्याची व्यवस्था असावी.

क) ५० विद्यार्थी किंवा त्यापेक्षा कमी विद्यार्थ्यांच्या एका गटाकरिता (एकूण विद्यार्थी संख्या १०० किंवा त्यापेक्षा कमी दोन वर्षाच्या अभ्यासक्रमाकरिता) प्राचार्य / विभाग प्रमुख आणि कमीत कमी ५ व्याख्यात्यांची पूर्णवेळ अध्यापक म्हणून नियुक्ती करण्यात यावी. गुणोत्तराप्रमाणे विद्यार्थ्यांच्या वाढीव संख्येनुसार पूर्ण वेळ अध्यापकांची संख्या वाढवावी.

ड) अध्यापन पद्धती व पायाभूत अभ्यासक्रमानुसार तज्ज्ञ अध्यापकांची नेमणूक करण्यात यावी.

इ) शारीरिक शिक्षण, कला, कार्यानुभव, संगीत, माहिती तंत्रविज्ञान साक्षरता इ. विषयांकरिता अर्धवेळ शिक्षकांची नेमणूक करण्यात यावी.

५) अध्यापकांची शैक्षणिक पात्रता :

अ) प्राचार्य / विभागप्रमुख :

i) शैक्षणिक व व्यवसायिक पात्रता ही व्याख्याता पदासाठी आवश्यक असलेल्या पात्रतेनुसार असावी.

ii) प्राथमिक अध्यापक शिक्षण संस्थेत कमीत कमी ५ वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असावा.

ब) व्याख्याता :

i) चांगल्या शैक्षणिक नोंदीसह एम.एड./एम.ए. (शिक्षणशास्त्र) ५५ टक्के गुण, प्राथमिक शिक्षणातील विशेष अर्हता धारकांना प्राधान्य

ii) चांगल्या शैक्षणिक नोंदीसही शालेय विषयातील ५५% गुणांसह पदव्योत्तर पदवी आणि प्राथमिक शिक्षणातील पदवी (बी.एल.एड.) किंवा प्राथमिक शिक्षणातील विशेष अर्हतेसह बी.एड्. आणि मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेत अध्यापनाचा ५ वर्षाचा अनुभव.

iii) एस.सी./एस.टी. संवर्गातील उमेदवारांना पदव्योत्तर स्तरावर प्राप्त केलेल्या गुणांमध्ये ५% सिथिलता देण्यात आली आहे. ५५% ऐवजी ५०%

iv) शारीरिक शिक्षण, कला, कार्यानुभव, माहिती तंत्रज्ञान, साक्षरता इ. अध्यापकांची शैक्षणिक पात्रता ही महाराष्ट्र शासनाने नमूद केल्याप्रमाणे असेल.

६) प्रशासकीय कर्मचारी :

संबंधित राज्य सरकारने विहित केल्यानुसार प्रशासकीय कर्मचारी व इतर कर्मचाऱ्यांची शैक्षणिक पात्रता असेल.

७) भौतिक सुविधा :

अ) योग्य प्रमाणात वर्गखोल्यांची संख्या, सभागृह, प्रयोगशाळा, विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार शैक्षणिक कृती आयोजित करण्यासाठी मोकळी जागा, प्राचार्यांची खोली व अध्यापकांसाठी वेगळी खोली, तसेच प्रशासकीय कार्यालय, सेवक वर्गासाठी खोली व स्टेअर रुम इ. ची व्यवस्था असणे आवश्यक आहे.

प्रत्येक विद्यार्थ्यांना १० चौरस फुटांपेक्षा कमी जागा असता कामा नये.

ब) ग्रंथालयात क्रमिक पुस्तके, संबंधित अभ्यासक्रमावर आधारित संदर्भ ग्रंथ, शैक्षणिक विश्वकोश, इयर बुक, सी.डी.रोमस् नियतकालिके व प्राथमिक स्तरावरील आवश्यक पुस्तके व साहित्य यांचा सामावेश असलेले सुसज्ज ग्रंथालय असावे.

क) क्रिडांगण व खेळांचे साहित्य यांची सुविधा असावी. महानगर / उंच प्रदेशातील शाळांची मैदाने ही सलग्नीत शाळेत वापरता येतील तसेच योगासने, शाळेतील इतर खेळ घेण्याची ही व्यवस्था करता येईल.

ड) व्यवस्थापनाने / संस्थेने अर्ज करतेवेळी वरील सर्व व्यवस्थेसाठी स्वतःच्या मालकीची पुरेशी जागा / सर्व अडथळ्यांपासून मुक्त असलेली स्वतःची इमारत संस्थेकडे असावी. राज्यशासन नियमांनुसार शैक्षणिक कार्यासाठी शासनाची जागा दीर्घ काळासाठी भाडेतत्त्वावर घेता येईल. कायमस्वरुपी इमारतीचे बांधकाम अर्धवट असल्यास संस्था जास्तीत जास्त ३ वर्षानंतर स्वतःच्या नवीन इमारतीत स्थलांतर करणे आवश्यक आहे.

८) अ) मानसशास्त्र व विज्ञान विभाग, कार्यशाळाशी संबंधी असलेली एक बहुउद्देशीय शैक्षणिक प्रयोगशाळा असावी.

i) प्राथमिक शाळेच्या अभ्यासक्रमावर विज्ञानाची साधने, आवश्यक रसायने यांची उपलब्धता असावी.

ii) मानसशास्त्र विभागामध्ये प्रयोग करण्यासाठी खालील चाचण्या असाव्यात. संवेदना, बुद्धिमत्ता, (शाब्दिक व अशाब्दिक कसोट्या) अभिवृत्ती, व्यक्तिमत्त्व आणि अभिरुची शोधिकासह प्रक्षेपण चाचण्यांचा समावेश असावा, पियाजे व ब्रुनरचे साधे प्रयोग करण्याची व्यवस्था प्रयोगशाळेत असावी.

ब) भाषा अध्ययनासाठी हार्डवेअर व सॉफ्टवेअर साधनांचा समावेश असावा.

क) शैक्षणिक तंत्रवज्ञान प्रयोगशाळेत माहिती तंत्रविज्ञानाच्या साक्षरतेसाठी हार्डवेअर व सॉफ्टवेअर साधने असावी.

९) कर्मचाऱ्यांच्या सेवा शर्ती :

अ) केंद्र / राज्य शासनाच्या धोरणांनुसार निवड मंडळाकडून कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात यावी.

ब) सर्व नेमणूक पूर्णवेळ व नियमित असाव्यात.

क) शासकीय संस्था / शासकीय अनुदानित संस्थेत जर योग्य उमेदवार मिळाले नाहीत तर संबंधित शासकीय अधिकाऱ्यांकडून हंगामी तत्त्वावर किंवा कंत्राट पद्धतीने नेमणूक करता येते.

ड) शासनाच्या नियमानुसारच अर्धवेळ शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक करता येते.

इ) संस्थेतील शैक्षणिक व इतर कर्मचारी (अर्धवेळ कर्मचाऱ्यांसह) यांचे वेतन संबंधित राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमांनुसार करण्यात येईल.

फ) संस्थेच्या व्यवस्थापनाने कर्मचाऱ्यांची पेन्शन, ग्रॅच्युटी, प्रॉव्हिडंट फंड इ. बाबतीतील तक्रारी सोडवाव्यात.

ग) कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीचे वय शासनाच्या धोरणानुसार ठरविण्यात यावे. जास्तीत जास्त वयाच्या ६५ वर्षांपर्यंतच नोकरी करता येईल.

१०) आर्थिक व्यवस्थापन :

अ) राज्य शासनाने निश्चित केल्या प्रमाणेच शिक्षण शुल्क व इतर शुल्क आकारता येईल.

ब) विनाअनुदानित संस्थेच्या बाबतीत, ५ लाख रुपये देणगी निधी म्हणून संस्थेच्या व्यवस्थापन समितीतील अधिकृत सदस्य व प्रादेशिक समितीचा अधिकारी यांच्या नावे ठेवावा तसेच कर्मचाऱ्यांच्या तीन महिण्याच्या वेतनाएवढी रक्कम राखीव निधी म्हणून ठेवण्यात यावी.

११) पात्रतेतील शिथीलता / अभ्यासक्रमाचा कालावधी :

काही राज्यात प्राथमिक शिक्षक शिक्षण अभ्यसक्रमाचा कालावधी फक्त एक वर्षाचा आहे आणि या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी शैक्षणिक पात्रता १० वी पास अशी आहे. अशा राज्यांनी शैक्षणिक वर्ष २००४-०५ च्या शेवटपर्यंत कालावधी वाढविलेला त्यामुळे NCTE च्या अटी आणि दर्जानुसार या अभ्यासक्रमाची अट पूर्ण होणार होती. मध्यंतरी या अभ्यासक्रमाचा कालावधी कमी करण्यास मान्यता मिळाली त्यानुसार कालावधी एक वर्षापेक्षा कमी असू नये असे ठरविण्यात आले. दहावी परीक्षेत ५०% पेक्षा कमी गुण असू नयेत. या अभ्यासक्रमाच्या संदर्भात राज्याकडून देण्यात येणारे प्रमाणपत्र हे राज्यभरात कोठेही नोकरी मिळविण्यासाठी विश्वसनीय ठरते. या अभ्यासक्रमाचा कालावधी, व प्रवेशासंबंधीच्या अटी या NCTE कायदा १९९३ नुसार सध्या अस्तित्त्वात आहेत.

इ.स. १९७८ मध्ये NCTE ने शिक्षकांच्या समस्या व त्याच्या सूचना मिळवून शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी ४ प्रादेशिक संघाची स्थापना केली. प्रत्येक संघामध्ये खालील सदस्यांचा समावेश केला.

- प्रादेशिक शिक्षण महाविद्यालयातील प्राचार्य (अध्यक्ष)
- अध्यापक शिक्षणाच्या विभागातील एक सदस्य (NCERT)
- राज्याच्या विविध प्रांतातील ५ सदस्य

परिस्थितीतील बदल ध्यानात घेऊन NCTE ने अध्यापक शिक्षण अभ्यासक्रम आराखडा तयार केला. शिक्षक प्रशिक्षणासाठी प्रत्येक स्तरानुसार नमुना आराखडा सूचविण्यात आला. आपण प्राथमिक स्तरासाठी सूचविलेला नमुना आराखडा पाहुया.

NCTE नमूना - I (1978) :

प्राथमिक स्तरावरील अध्यापक शिक्षण नमूना एकूण तीन क्षेत्रात विभागलेला आहे. (अ), (ब), (क) आणि वेळेनुसार टक्केवारी, क्षेत्रानुसार आणि संबंधित अभ्यासक्रमानुसार भारांश देण्यात आलेला आहे. प्राथमिक स्तरासाठीचा नमुना खालीलप्रमाणे :

अ) अध्यापनशास्त्रीय सैद्धांतिक भाग (२०%)

I) शिक्षक आणि उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण

II) बालमानसशास्त्र

III) तत्त्वे / प्राथमिक शिक्षणाच्या समस्या

ब) समाजाबरोबर कार्य (२०%)

IV) क्रमांक (I), (VIII), (IX), (X) आणि (XI) शी संबंधित कार्य

क) आशययुक्त अध्यापन, सराव पाठ अध्यापन / प्रात्यक्षिक कार्य (६०%)

V) गाभाभूत अध्यापन कार्यक्रम (१०%)

विशेष प्रशिक्षण कार्यक्रम (VI to XI)

VI) भाषा (१०%)

VII) गणित (५%)

VIII) पर्यावरण शिक्षण - I (५%)

IX) पर्यावरण शिक्षण - II (५%)

X) कार्यानुभव / कला (१०%)

XI) आरोग्य / शारीरिक शिक्षण आणि नवनिर्मिती उपक्रम (५%)

XII) संबंधित प्रात्यक्षिक कार्य (१०%)

दहावीनंतर या अभ्यासक्रमाचा कालावधी एकूण ४ ते ६ सत्राचा असेल. नमुना - I नुसार NCERT, SCERT व विविध विद्यापीठाच्या बोर्ड ऑफ स्टडीज कडून चर्चासत्रे आयोजित करण्यात येतील. या अभ्यासक्रम आराखड्याचे ओळख अद्यापपर्यंत फक्त थोड्याच विद्यापीठांना झालेली आहे. त्यामुळे अध्यापक शिक्षणात फारशी सुधारणा दिसून येत नाही. त्यानंतर १९८६ च्या शैक्षणिक धोरण व कृती कार्यक्रमानुसार अध्यापक शिक्षणात पुनर्रचना सुचविण्यात आली.

कारण अध्यापक शिक्षणाची गुणवत्ता सुधारली तरच माध्यमिक शिक्षणाची गुणवत्ता सुधारेल.

शालेय शिक्षणाकरिता राष्ट्रीय अभ्यासक्रमानुसार (१९८८) विद्यार्थी केंद्रित शिक्षणावर भर देण्यात आला.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NPE १९८६) व राष्ट्रीय आयोगाची (१९८३-८५) मार्गदर्शक तत्त्वे ध्यानात घेता NCERT ने खालील दोन कार्य गट उभारले.

- अध्यापक शिक्षणाच्या पूर्व सेवेचे पुनर्निर्मितीकरण, आधुनिकीकरण.
- अध्यापक शिक्षण अभ्यासक्रमाचे विषय, निरीक्षणे व सूचनांचा विचार करुन NCTE ने सुधारणात्मक नमुना (१९७८) मध्ये तयार केला. यावरुन NCTE ने NCTE नुमना - II (१९८८) मध्ये तयार केला.

NCTE - नमुना - II (१९८८)

या नमुन्यानुसार प्राथमिक स्तरावर सेवापूर्व अध्यापक शिक्षण अभ्यासक्रम सूचित केला असून प्रवेशासाठी पात्रता इयत्ता १२ (१०+२) व कालावधी २ वर्षाचा आहे. अभ्यासक्रमातील घटक टक्केवारीनुसार खालीलप्रमाणे :

अ) पायाभूत अभ्यासक्रम (२०%)

I) उदयोन्मुख भारतातील शिक्षण (तत्त्वज्ञान आणि सामाजिक - सांस्कृतिक ओळख)

II) प्राथमिक अभ्यास : अध्ययन प्रक्रिया, समायोजन (१०%) (शैक्षणिक मानसशास्त्र)

ब) स्तरानुसार विशेष अभ्यास (३०%)

III) प्राथमिक शिक्षण आणि शिक्षकाची कार्ये (५%)

IV) भाषा अध्यापन (संबंधीत एका भाषेची निवड) (५%)

V) गणित अध्यापन (५%)

VI) पर्यावरण शिक्षण अध्यापन (इ. १ ते ५ वी संबंधी) (५%)

VII) आरोग्य आणि शारीरिक शिक्षण (५%)

VIII) कलाशिक्षण, कार्यानुभव (५%)

क) अधिक विशेष विषय (१०%)

IX) विज्ञान अध्यापन आणि सामाजिक शास्त्र अध्यापन / शालेय पूर्व शिक्षण (५%)

X) यांपैकी कोणत्याही एका विषयाची निवड (प्रौढ शिक्षण / अनौपचारिक शिक्षण / (५%) (सामाजिक शिक्षण / जमातीचे शिक्षण / बहुजनवर्गीय शिक्षण / लोकसंख्या शिक्षण / विशेष शिक्षण / शैक्षणिक तंत्रज्ञान)

ड) प्रात्यक्षिक कार्य / क्षेत्रीय कार्य

XI) प्रात्यक्षिक कार्य (२०%)

XII) शिक्षणातील आंतरवासियता (प्राथमिक, उच्च माध्यमिक आणि (२०%) शालेय पूर्व प्रणाली)

अशाप्रकारे NCTE नमुना II (१९८८) मध्ये चार क्षेत्रे (अ, ब, क, ड) आणि त्याचे नऊ अभ्यासक्रमाचे घटक येतात. सैद्धांतिक घटकांना ६०% भारांश तर प्रात्यक्षिक घटकांना ४०% भारांश दिलेला आहे. NCTE नुमना - I (१९७८) ची तुलना करता नमुना - II मध्ये प्राथमिक स्तरावर प्रात्यक्षिक विभागास अधिक भारांश दिलेला आहे.

४.५ पूर्व-प्राथमिक स्तरावरील अध्यापक शिक्षणांकरिता राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा :

बालपणीचे शिक्षण हे प्राथमिक शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी मुलांना मदत करते. त्याचा शैक्षणिक संबंध मुलांना नाव दाखल करण्यास, स्मरणशक्ती वाढविण्यास आणि प्रयोगाद्वारे व क्षेत्रीय अनुभवाद्वारे शिकण्यास मदत करते. प्राथमिक शिक्षराचा दर्जा उंचावण्यासाठी शिक्षण आयोगाने (१९६४-६६) राज्य संस्थेबरोबरच पूर्व प्राथमिक शिक्षण विकासकेंद्र प्रत्येक जिल्ह्यात स्थापन केले आहे. राज्य शिक्षण संस्था आणि राज्य स्तरावरील केंद्रे पूर्व-प्राथमिक शाळांची गुणात्मक वाढ करण्यासाठी जबाबदारी घेतील. तसेच १९८६ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि १९९२ च्या कृती कार्यक्रमातून पुन्हा त्याच कल्पनाना पुनरुज्जीवन दिले. त्यात असे सूचविण्यात आले की, बालसंगोपन आणि शिक्षण अभ्यासक्रमाद्वारे मानवी संसाधनाचा विकास करता येणे शक्य आहे. प्राथमिक शिक्षणासाठी व काम करणाऱ्या महिलांसाठी विशेषतः समाजातील वंचित विभागासाठी हा अभ्यासक्रम उपयुक्त आहे. NCFSE 2000 ने दोन वर्षाच्या बालसंगोपन व शिक्षण अभ्यासक्रमासाला (वयोगट ३ ते ६) विशेष महत्त्व दिले आहे. या स्तरावर आनंददायी शिक्षण, अवबोध आणि सहभाग महत्त्वाचा असतो. मुलांमध्ये सामाजिकीकरण व पर्यावरण विषय जाणीव निर्माण करण्यासाठी गट कार्य, खेळण्याची तंत्रे, भाषिक खेळ, अंक खेळ, रंगविषयक खेळ उपयुक्त ठरतात. विषयांच्या औपचारिक शिक्षणाद्वारे आणि औपचारिक मूल्यमापनाद्वारे होणारी मुलांची प्रगती पूर्णपणे टाळायला हवी. देशभरातील सर्व मुलांना बालसंगोपन शिक्षण उपलब्ध करुन दिले पाहिजे.

बालसंगोपन आणि शिक्षण ही शिक्षणाची पहिली पायरी आहे असे दहाव्या पंचवार्षिक योजनेत सूचित केले आहे. बालसंगोपन आणि शिक्षण अभ्यासक्रमाचा (ECCE) पुरस्कर्ता, (Integrated Child Development Service) एकत्रित मुलांचा विकास सेवा (ICDS) योजना ही आहे. यामध्ये १५८ लक्ष मुलांचा (त्यामध्ये ३ ते ६ वयोगटातील १७.८ लक्ष मुलांची संख्या आहे) समावेश होतो. ३५ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशात सुमारे ५.२० लक्ष अंगणवाड्याद्वारे शिक्षणाचे कार्य चालते. बालसंगोपन आणि शिक्षण किंवा शालेय पूर्व शिक्षण हे ICDS (Integrated Child Development Service) योजनेतील सहा प्रभागांपैकी एक आहे आणि हे सर्वात कमकुवत राहिले आहे.

पूर्व-प्राथमिक शिक्षण संकल्पनेपेक्षा बालसंगोपन आणि शिक्षण अभ्यासक्रम (ECCE) अधिक समावेशक आहे. बालसंगोपन आणि शिक्षण अभ्यासक्रमातच ICDS, अंगणवाड्या, बालवाड्या, कष्टकरी मुलांचे शिक्षण व संगोपन, बालसंगोपन केंद्रे आणि पूर्व-प्राथमिक शाळांचा समावेश होतो. प्रत्येक राज्यांमध्ये प्राथमिक शाळांच्या तुलनेत पूर्व प्राथमिक शाळांची संख्या अतिशय अल्प असून त्यापैकी बऱ्याच शाळा विनाअनुदानित आहेत. देशातील बालसंगोपन आणि शिक्षण अभ्यासक्रमांच्या (ECCE) सवलतीत वाढ करणे गरजेचे आहे. त्याद्वारेच मुलांचे आरोग, मानसिकता, समाजशीलता, पौष्टिक आहार आणि शैक्षणिक विकास शक्य आहे. घटनेच्या (८६ वी दुरुस्ती) कायदा २००२ कलम २१ (अ) नुसार वयोगट ६ ते १४ मधील मुलांना शिक्षणाचा मूलभूत अधिकार दिला आहे. याच्याही पलीकडे या कायद्यातील कलम ४५ नुसार राज्यातील सर्व मुलांना सहा वर्षे पूर्ण होईपर्यंत बालसंगोपन आणि शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करावा. या कायद्यानुसार देशात पूर्व-प्राथमिक शिक्षणाचा विस्तार मोठ्या प्रमाणात होऊ शकेल.

या पुढील वर्षात बालसंगोपन आणि शिक्षणाची (ECCE) खूप मागणी वाढेल आणि म्हणूनच पूर्व-प्राथमिक शिक्षक शिक्षणाच्या गुणवत्तेवर लक्ष देणे आवश्यक आहे.

पूर्व-प्राथमिक शिक्षण : महत्त्वाची गरज :

NCFSE - 2000 या स्तरावर विषयांचे औपचारिक अध्यापनाला महत्त्व कमी असून खेळातून शिक्षण यावर भर देण्यात आला आहे. यामुळे मुलांचा आनंददायी सहभाग वाढेल व लहान मुलांच्या मज्जासंस्थेची वाढ पुरेशी न झाल्यामुळे त्यांच्यावर होणारा अभ्यासाचा ताण कमी होईल. आंतरक्रियात्मक अभ्यास पद्धतीवर भर देऊन बोली भाषेतून अध्ययन करता येईल. या अभ्यासक्रमाद्वारे औपचारिक शिक्षणाशिवाय ओळखण्याचे कौशल्य, जोड्या जुळवणे, चित्रे काढणे, इ. कौशल्ये विकसित करण्यासाठी मोठ्या प्रमाणात संधी प्राप्त होईल. आंतरक्रियेतून मुलांमध्ये सामाजिकीकरणाचे कौशल्य रुजविणे या वयात शक्य होते. या स्तरावरील मुलांमध्ये मुले व निसर्ग आणि मुले व मुले यांच्या आंतरक्रियेतून सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करता येतो. मुलांना अध्ययनासाठी तयार करताना त्यांच्यामध्ये आनंद अवबोध, व सहभाग निर्माण करणे गरजेचे आहे.

उद्दिष्टे :

पूर्व-प्राथमिक अध्यापक शिक्षणाची सर्वसामान्य उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

- विद्यार्थी - शिक्षकांना पूर्व-प्राथमिक शिक्षणाची ध्येये, आशय, व पद्धती तसेच तात्विक, सामाजिक स्वरुप माहित करुन घेण्यास प्रेरणा देणे.
- विद्यार्थी शिक्षकांना पूर्व-प्राथमिक मुलांच्या वयाचा शारीरिक, सामाजिक, भावनिक, बौद्धिक, सौंदर्यात्मक भाषिक, सांस्कृतिक इ. दृष्टिकोनातून सखोल अभ्यास करण्यास प्रवृत्त करणे.
- विद्यार्थी शिक्षकांमध्ये मुलांबद्दल प्रेम, संवेदना, आशा आकांक्षा, आणि एकात्मतेबद्दल आदर इ. भावना रुजविणे.
- विद्यार्थी-शिक्षकांमध्ये मुलांच्या सर्वांगीण विकासाकरिता खेळ व इतर कृती आयोजित करण्यासाठी विविध क्षमता, कृती व आवश्यक कौशल्यांचा विकास करणे.
- मुलांची स्व-संकल्पना, सर्जनशीलता व शोधकवृत्ती वाढीस लावण्यासाठी विद्यार्थी शिक्षकांना विविध कृतीकेंद्रित व विद्यार्थी केंद्रित कार्यक्रमाचे आकलन करण्यात मदत करणे.
- मुलांच्या विशेष गरजांनुसार अध्यापन पद्धती व साधने निवडण्यासाठी विद्यार्थी शिक्षकाची तयारी करणे.
- विद्यार्थी शिक्षकांमध्ये पूर्व-प्राथमिक शाळांची, गतिशीलता, संघटन, नियोजन आणि व्यवस्थापन कौशल्य विकसित करणे.
- विद्यार्थी शिक्षकांमध्ये पूर्व-प्राथमिक शिक्षणाचा विकास करण्यासाठी अभिवृत्ती, जवळीक आणि स्थानिक पालकांचे सहकार्य मिळविण्याचे कौशल्य विकसित करणे.

- विद्यार्थी-शिक्षकांमधील मूल्ये नैसर्गिकरित्या मुलांमध्ये संक्रमित होतील असा विकास घडवून आणणे.
- विद्यार्थी शिक्षकांना मुलांच्या मनात पर्यावरणाविषयी प्रेम व आदर निर्माण करण्याची प्रेरणा देणे.
- मुलांचे जीवन आरोग्यदायी होण्याकरिता आणि त्यासंबंधीची माहिती प्राप्त करण्यासाठी विद्यार्थी-शिक्षकांना चालना देणे.
- स्थानिक साधने व प्राप्त माहितीचा उपयोग करण्यासाठी विद्यार्थी शिक्षकांची तयारी करणे.

सेवापूर्व अध्यापक शिक्षणाचे महत्त्व :

वरील उद्दिष्टातूनच सेवापूर्व शिक्षणाचे महत्त्व अभ्यासावयाच मिळते.

अभ्यासक्रम आशय आणि परस्पर संबंध :

पूर्व-प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रमाचीरचना करताना मुलांचा सर्वांगीण विकास, संपूर्ण वाढ आणि विकास, त्याचबरोबर त्यांच्या मज्जासंस्थेचा समन्वय, स्व-अभिव्यक्ती, निरीक्षण कौशल्य, आरोग्य, सवयींची जडणघडण इ. गोष्टी ध्यानात घेतलेल्या आहेत. मुलांना मुक्तपणे खेळावे त्याचबरोबर शैक्षणिक खेळणी, कोडी, लहान गटातील कारक कौशल्ये, साधे व्यायाम इ. गोष्टी केंद्रभूत ठेवून अभ्यासक्रमाची रचना केलेली आहे. स्नायू व हातापायांच्या हालचाली; स्व कौशल्ये डोळे व हातांचा समन्वय, चित्रे काढणे, रंगकाम, मातीच्या वस्तू तयार करणे, संगीत, गाणी व नृत्य, भाषिक कौशल्ये, मौखिक कौशल्ये, श्रवण व संभाषण, अंक ओळख, अंक संकल्पना, निसर्गाचा अभ्यास, रोपटी, झाडे, किटक आणि प्राणी, दृक क्षेत्र (रंगकाम, हस्तकाम, मातकाम) कला सादर करणे (संगीत, नृत्य इ.) मुलांच्या गरजेनुसार सर्व गोष्टींचा समावेश अभ्यासक्रमात केला आहे.

पूर्व-प्राथमिक शिक्षक अभ्यासक्रमात ६ वर्षापर्यंतच्या मुलांचा शारीरिक, बौद्धिक, सामाजिक, भावनिक, भाषिक आणि सौंदर्यात्मक विकास इ. बाबतीत कृती कार्यक्रमात लवचिकता ठेवण्यात आली आहे. तसेच साधन गतीशीलता आणि सौंदर्यात्मक विकास इ. बाबतीत कृती कार्यक्रमात लवचिकता ठेवण्यात आली आहे. तसेच साधन गतिशीलता आणि व्यवस्थापन, सामाजिक साधनांचा उपयोग, समाजाचा सहभाग, इ. चा समावेश केला आहे. पालकांशी संबंध दृढ करणे, त्याचे सहकार्य होणे व त्याचा संबंध ECCE व ICDS कार्याशी, DIETs व इतर संस्थांशी जोडणे, शिक्षक अभ्यासक्रमातून विद्यार्थी-शिक्षकांचा विकास घडवून आणला पाहिजे, त्यांच्यामध्ये स्थानिक पर्यावरणविषयक जाणीव आणि निसर्ग इ. द्वारे आंनददायी अध्ययनासाठी त्यांच्यामध्ये मूल्ये व कौशल्ये रुजविणे गरजेचे आहे.

पूर्व-प्राथमिक शिक्षण हे औपचारिक शिक्षण देण्याचे व त्याची ओळख करुन देण्याची पायरी नाही. म्हणून या स्तरावली विद्यार्थी-शिक्षकांनी अतिशय संवेदनशील रहावे. लहान मुलांच्या गरजा, त्यांचा विकास, याचे आकलन करुन घेणे आवश्यक आहे. शिक्षक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात या स्तरावर साक्षरता कार्यक्रमाची जाणीव, समाज गतिशीलता, राष्ट्रीय आणि स्थानिक चालीरीती, जत्रा आणि सण-उत्सव, समाजाची जिवनशैली समजून घेणे गरजेचे आहे.

त्याचबरोबर पर्यावरणावर परिणाम करणारे घटक, प्रदुषण, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक स्थळाचे महत्त्व व जाणीव, त्याची शैक्षणिक वैशिष्ट्ये, आणि त्याच्या विकासात्मक कार्यासंबंधी धोरणे व कार्यक्रमांचा अभ्यास. तसेच विविध अध्यापनशास्त्रीय संबंधीत अभ्यास, विद्यार्थी एक ज्ञान रचनाकार, असून मुलांच्या विविध लक्षी अष्टपैलू बुद्धिमत्तेचा विकास घडवून आणण्यासाठी विद्यार्थी-शिक्षकाने सतत संवेदनशील राहिले पाहिजे.

अभ्यासक्रमातील व्यवहार, विद्यार्थी-केंद्रित, कृती-केंद्रित खेळातून शिक्षण तसेच मौखिक अनुदेशन आणि प्रयोग दिग्दर्शनाऐवजी आनंददायी दृष्टिकोनावर आधारित आहे. भूमिकाकरण, बाहुलीचे खेळ, गोष्ट सांगणे, अभिरुपता अनुभव, नाट्यीकरण, आणि सर्जनात्मक विचार यांचा समावेश करण्यात आला आहे. सहभागात्मक आणि आंतरक्रियात्मक कृतीला महत्त्वाचे स्थान दिले आहे. कृतीतूनच विद्यार्थी योग्य भाषा व संभाषण कौशल्य, स्व-अभिव्यक्ती, सामाजिक कौशल्ये, कारक कौशल्ये व दृक कौशल्य यांचा विकास घडवून आणतील.

पूर्व-प्राथमिक केंद्राकडून कार्य परिणामकारक होण्याकरिता, अध्ययन साधन केंद्राचा स्थापना करण्याकरिता अध्यापक शिक्षण संस्था अद्यावत / घडविणे आवश्यक आहे. अशा केंद्रामधून ३ ते ६ वयोगटातील मुलांकरिता योग्य खेळणी व खेळाचे साहित्य, असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर चित्रांची पुस्तके, खेळ, दृक-श्राव्य साधने, टीव्ही, व्ही.सी.आर., संगणक, टेपरेकॉर्डर, स्लाईड प्रोजेक्टर, श्राव्य आणि दृकश्राव्य टेप, नमुने, तक्ते, चित्रे व प्राणी, किटक, पक्षी, झाडे, फुले, फळे, पालेभाज्य इ. चित्रे असणाऱ्या स्लाईडस् असाव्यात.

सराव पाठ पूर्व-प्राथमिक शाळा, अंगणवाडी, बालवाडीत घेण्यात यावेत. घेतलेल्या पाठांची संख्या किती तासांच्या संख्येऐवजी सराव पाठात पूर्ण दिवसभराच्या कृती व नियोजन याचे व्यवस्थापन करण्यासाठी विद्यार्थी-शिक्षकांना प्रेरणा द्यावी. वेळेचे व्यवस्थापन एकत्रित खेळातून शिक्षण, लहान गटातील कृती, याद्वारे प्रत्येक मुलांचा सहभाग असतो आणि त्यातून विद्यार्थी शिक्षकानेही अध्ययन करावे अशी अपेक्षा आहे. सराव पाठाचा कालावधी हा वास्तव, अनुभवावर आधारित, व्यावसायिक दृष्टिकोन प्राप्त होईपर्यंत विद्यार्थी-शिक्षकांच्या प्रगतीवर भर इ. गोष्टीवर आधारित असावे.

विद्यार्थी-शिक्षकांच्या प्रात्यक्षिक कार्यात खालील गोष्टींचा समावेश असावा.

पूर्व-प्राथमिक अध्यापक शिक्षणासाठी प्रात्यक्षिक कार्य :

- मुलांकडऊन वस्तूंची मांडणी, आकार, वजन, लांबी, रंग, इ. नुसार करुन घेण्यासाठी वस्तुंची साठवण / तयारी करणे.
- कल्पनेतून व एकमेकाच्या संबंधातून साध्या वस्तू तयार करणे.
- गोष्टींच्या (कोडीयुक्त) तक्त्याची जुळणी करणे.
- मुलांना मृदू-कठीण, खरबरीत-गुळगुळीत, पातळ-जाड इ. संकल्पनांचे आकलन होण्यासाठी वस्तूंचा संग्रह करणे.
- मुलांमध्ये मूल्यांची रुजवणूक करण्यासाठी १५ ते २० गोष्टींचा संग्रह / लेखन आणि त्यांचे कथन.

- लोकप्रिय खेळांचा आराखडा
- सभोवतालच्या वेगवेगळ्या वस्तूतील साम्य / फरक ओळखण्यासाठी उदा. पक्षी, प्राणी इ. मुलांना मदत करणे.
- गटात गाणे म्हणून दाखविण्याची कृती.
- संचित नोंदीच्या रुपाने मुलांचा व्यक्तीगत अभ्यास, त्यांची निरीक्षणे, विकासासंबंधी नोंदी, इ.
- क्षेत्रिय भेटीचे आयोजन करणे.

स्थानिक गरजेनुसार यापेक्षाही अधिक कृती यादीत समाविष्ट करता येतील.

मूल्यमापन :

मुलांना केलेल्या कृतींचे आकलन, नियोजन, आनंददायी कृती इ. गोष्टी ध्यानात घेऊन पूर्व-प्राथमिक शिक्षणात मूल्यमापन केले जाते.

एकूण मूल्यमापन यंत्रणेमध्ये वृत्तीतील बदल व मूल्ये यांचा समावेश होतो. सैद्धांतिक भाग, सराव पाठ व क्षेत्रिय अनुभवांचे स्वतंत्रपणे वेगळे मूल्यमापन केले जाते. सराव पाठांचे मूल्यमापन करण्याची सहकारी शिक्षक व शिक्षक प्रशिक्षकांची जबाबदारी असते. यासाठी श्रेणी पद्धती अधिक उपयुक्त ठरते. नियोजन, संघटन, व्यवस्थापन, कृतींची अंमलबजावणी, कामातील नावीन्य क्षमता, खेळातून शिक्षण, विद्यार्थी सहभाग, संप्रेषण कौशल्य, त्यांची व्यक्तिगत मार्गदर्शन करण्याची क्षमता, गटातील मुलांचे नेतृत्त्व, इ. गोष्टीचा समावेश मूल्यमापन करताना करणे आवश्यक आहे. विशेष शिक्षण देण्याची आवश्यकता असणारी मुले ओळखता येणे, अध्ययन अकार्यक्षम मुले, उपचारात्मक कृतींचे नियोजन आणि आयोजन, आपत्ती व्यवस्थापन कौशल्य इ. चा मूल्यमापनात समावेश करणे गरजेचे आहे. विद्यार्थी शिक्षकाची माहिती गुणात्मक व संख्यात्मक स्वरुपात प्राप्त केली पाहिजे, स्तर, पदनिश्चयन श्रेणी व सहकाऱ्याकडून मूल्यमापन करणे अधिक उपयुक्त ठरते. मूल्यमापनासंबंधीचे संपूर्ण कार्य हे सहभागात्मक, कौशल्यांवर आधारित व वास्तव असावे.

४.५.१ प्राथमिक स्तरावरील अध्यापक शिक्षणाचा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा :

प्राथमिक शिक्षण हे संपूर्ण शिक्षण प्रणालीचा पाया आहे. त्याचा राष्ट्र उभारणीतील सहभाग आणि वाढ व विकासाची प्रक्रिया सर्वांना परिचित आहे. NCFSC – 2000 ही संस्था प्राथमिक स्तरावरील शालेय अभ्यासक्रम समृद्ध करण्यासाठी प्रयत्न करते. त्यासाठी आधुनिक दृष्टिकोनाचा स्वीकार, अनावश्यक आणि अनाकलनीय साधनांचे ओझे कमी करणे इ. गोष्टी केल्या जातात. प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यासाठी मूल्यमापन व नवीन आंतरक्रियात्मक दृष्टीकोनाची शिफारस करण्यात आली. या स्तरावर कार्य करणारे शिक्षक NCFSE – 2000 च्या नवीन क्षेत्रात मार्गदर्शन करु शकतात. त्याचबरोबर प्राथमिक स्तरावर अध्यापनातून अध्यापनशास्त्रीय तत्त्वांचा अवलंब करु शकतात. सर्व स्तरावरील शालेय शिक्षणाद्वारे शिक्षक अध्ययनकृती आनंददायी करण्याचा प्रयत्न करतील, असे असले तरी प्राथमिक स्तरावरील अध्ययन प्रक्रिया कृती-केंद्रित, सहभागात्मक व आनंददायी करण्यासाठी

शिक्षकांवर मोठी जबाबदारी पडली आहे. या पातळीवर शिक्षकांची तयारी करुन घेण्याकरिता NCFSC – 2000 ने शिफारस केली आहे.

प्राथमिक शालेय शिक्षण : मुख्य गरज :

प्राथमिक स्तरावरील NCFSE – 2000 च्या मुख्य वैशिष्ट्यांमध्ये ताण आणि चिंता यातून मुक्तता, इतरांमधील मातृभाषेतून शिक्षण, अध्ययनार्थ्यांच्या परिस्थितीशी केंद्रीभूत, प्रात्यक्षिक कौशल्यांचा विकास आणि सकारात्मक वृत्ती मुल्ये यांचा समावेश होतो. याशिवाय मानवी हक्क आणि नागरिकाची मूलभूत कर्तव्ये आणि शिफारस केलेल्या संबंधित कृती, प्रकल्प कार्य, इ. चा अभ्यासक्रमाचा एकात्मिक भाग म्हणून समावेश होतो. उच्च अध्ययन पातळीवर भर देते.

इयत्ता १ ली आणि २ री च्या अभ्यासक्रमात खालील विषयांचा समावेश करण्याची शिफारस करण्यात आली आहे. एक भाषा – मातृभाषा / प्रांतिक भाषा, गणित आणि आरोग्यदायी व उत्पादनक्षम जीवनाची कला (आर्ट ऑफ हेल्दी ॲन्ड प्रॉडक्टिव्ह लिव्हिंग) (AHPL). इयत्ता ३ ते ५ वीच्या अभ्यासक्रमात इयत्ता १ ली व २ री साठी शिफारस केलेल्या तीन विभागामध्ये एक आर्थिक विषय म्हणून पर्यावरण शिक्षणाचा समावेश केला आहे. इयत्ता ६ वी ते ८ वी (उच्च प्राथमिक स्तर) च्या अभ्यासक्रमात (अ) तीन भाषा – मातृभाषा, इतर आधुनिक भारतीय भाषा व इंग्रजी, (ब) गणित, (क) विज्ञान आणि तंत्रज्ञान, (ड) सामाजिक शास्त्र, (इ) कार्यानुभव, (फ) कलाशिक्षण (फाईनआर्ट) आणि (ग) आरोग्य आणि शारीरिक शिक्षण (गेम, स्पोटर्स् योगा, एन.सी.सी. व स्काऊट आणि गाईडस्)

अध्ययनार्थ्यांच्या आवश्यकतेनुसार NCFSE – 2000 ने अध्ययनाचे ओझे कमी करण्याची शिफारस केली आहे. आणि प्राथमिक स्तरावरील अभ्यासाची सर्वसामान्य पद्धत ही आशयानुसार व अध्ययन पद्धतीनुसार लवचिक आशयानुसार व अध्ययन पद्धतीनुसार लवचिक असावी असे सूचविले. पर्यावरण शिक्षणाचे औपचारिक अध्यापन इयत्ता ३ री पासून सुरु करावे त्यात नैसर्गिक तसेच सामाजिक पर्यावरणाचा एकात्मिकपणे समावेश असावा. 'आर्ट ऑफ हेल्दी आणि प्रॉटक्टिव्ह लिव्हिंग' या नवीन अभ्यासक्रमात इ. १ ली ते ५ वी मधील विषयातील भागांची एकात्मता असावी त्यात कलाशिक्षण, कार्यशिक्षण आणि आरोग्य व शारीरिक शिक्षणाचा समावेश असावा. याद्वारे फक्त यांत्रिक कौशल्यांचाच विकास होणार नाही तर अध्ययनकर्त्यांचा सर्वांगीण होण्यासाठी बोधात्मक, भावात्मक आणि अध्यात्मिक व्यक्तिमत्त्वाचा विकास होण्यास मदत होईल. तसेच मूल्यांची रुजवणूक झाल्यामुळे कामाची प्रतिष्ठा, सौंदर्याबद्दल संवेदनशीलता आणि आरोग्यपूर्ण जीवन जगण्याच्या कौशल्यांकडे पाहण्याची सकारात्मक सामाजिक वृत्ती वाढीस लागेल.

उद्दिष्टे :

या स्तरावरील अध्यापक शिक्षणाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे :

- विद्यार्थी-शिक्षकांना प्राथमिक शिक्षणासंबंधी तात्विक, मानसशास्त्रीय व समाजशास्त्रीय तत्त्वांचे उदा. अध्ययनकर्त्याचे आकलन, शिक्षकाची भूमिका आणि अध्यापन-अध्ययन प्रक्रिया इ. चे आकलन होण्यास मदत करणे.

- विद्यार्थी-शिक्षकांमध्ये पर्यावरण अभ्यासाचे एकात्मिक अध्यापन, एकात्मिक सामाजिक शास्त्रे व एकात्मिक विज्ञान आणि तंत्रज्ञान इ. चे अध्यापन कौशल्ये विकसित करणे.
- विद्यार्थी-शिक्षकामध्ये भाषेचे परिणामकारक व सर्जनात्मक अध्यापन करण्यासाठी भाषिक कौशल्ये-श्रवण व संभाषण कौशल्यांचा विकास घडवून आणणे.
- विद्यार्थी शिक्षकांना बाहुलीचा खेळ, खेळ, क्रिडा शारीरिक व इतर तत्सम कृतींचे नियोजन व संघटन करण्यास प्रेरणा देणे.
- विद्यार्थी शिक्षकांना संपूर्ण अभ्यासक्रमाद्वारे वर्गात व वर्गाबाहेर मूल्यांचे एकात्मिकरण करण्यास प्रेरणा देणे.
- विद्यार्थी शिक्षकांना जीवनभर अध्ययनार्थी होण्यासाठी व कसे शिकायचे याची कौशल्ये अध्ययनार्थीमध्ये विकसित करण्याची प्रेरणा देणे.
- विद्यार्थी शिक्षकांना माहिती तंत्रविज्ञानाचे आकलन व त्याचा उपयोग करण्याची क्षमता प्राप्त करण्यासाठी प्रेरणा देणे.
- विद्यार्थी शिक्षकांमध्ये अध्ययनार्थीच्या सामाजिक, व्यक्ती अंतर्गत आणि भावनिक समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करणे.
- विद्यार्थी शिक्षकांमध्ये शालेय कार्यक्रमाची क्षमता उंचावण्यासाठी पालक व समाज यांचा एकमेकांतील संबंध जोडण्याची प्रेरणा देणे.
- विद्यार्थी शिक्षकांना कृती संशोधन प्रकल्पाचे आयोजन करण्यास प्रेरणा देणे.
- विद्यार्थी शिक्षकांना विशेष गरजा असणाऱ्या मुलांना अध्यापन करण्याकरिता अध्यापन पद्धती व साधने यांची माहिती मिळविण्यास मदत करणे.
- शिक्षणापासून वंचित व मागास विद्यार्थ्यांकडे विशेष लक्ष देण्यासाठी विद्यार्थी शिक्षकांचा विकास करणे.
- विद्यार्थी शिक्षकांमध्ये UEE मध्ये परिणामकारक योगदान देण्याचे कौशल्य विकसित करणे.
- विद्यार्थी शिक्षकांना मुलांच्या इच्छेनुसार नैसर्गिक पर्यावरणाची तात्काळ ओळख व त्याविषयी प्रेम आणि आदर रुजविण्याची प्रेरणा देणे.
- विद्यार्थी शिक्षकांमध्ये आरोग्य आणि आरोग्यशास्त्रविषयक माहिती विकसित करणे.
- विद्यार्थी शिक्षकांमध्ये सातत्यपूर्ण, संकलित आणि निदानात्मक मूल्यमापन व उपचारात्मक अध्यापनाचे आयोजन करण्याचे कौशल्य विकसित करणे.

सेवा-पूर्व अध्यापक शिक्षणाचे महत्त्व :

सेवा-पूर्व अध्यापक शिक्षणाचे महत्त्व वरील काही उद्दिष्टांमध्ये दिलेले आहे.

अभ्यासक्रम आशय आणि व्यवहार :

UEE च्या तयारीसाठी अध्यापक शिक्षणात विद्यार्थ्यांच्या ग्रामीण परिस्थितीचा विचार करायला हवा. त्याचबरोबर मुली, एस.सी. / एस.टी., काम करणारी मुले, शिक्षणापासून वंचित

असलेली शहरी मुले, व्यंग, बिकट परिस्थितीत राहणारी मुले, स्थलांतरित, गरीब कुटुंबातील मुले, समाजातील मागास गट, अल्पसंख्यांक इ. चा विचार करणे आवश्यक आहे.

अभ्यासक्रमाचे ओझे कमी करण्यासाठी, आनंददायी परिस्थितीत योग्य अध्ययन अनुभवाचे आयोजन, त्यासंबंधी योग्य परिस्थितीची निर्मिती करुन, विद्यार्थ्यांचा विकास करण्यासाठी आणि आवश्यक मूल्यांचे ग्रहण करण्यासाठी विद्यार्थी शिक्षकाने संवेदनशील राहिले पाहिजे.

या स्तरावरील अध्यापक शिक्षण अभ्यासक्रमात विषय आधारभूत माहिती द्यायला हवी. गणिताचे अध्यापन – अध्ययन हे अध्ययनार्थ्यांच्या भोवतालच्या परिस्थितीनुसार केल्यामुळे प्राप्त परिस्थितीशी एकात्मता साधता येते. पर्यावरणातील विशेष साधनांचा वापर करुन विविध कृतींद्वारे सांस्कृतिक व पर्यावरण शिक्षणावर लक्ष द्यायला हवे. विद्यार्थी-शिक्षकाने विद्यार्थ्यांचा सामाजिक, भावनिक व सांस्कृतिक पैलूंचा विकास करण्यासाठी अध्ययन अनुभव दिले पाहिजेत. वास्तवाची जाणीव आणि पर्यावरणात घडून येणारे सामाजिक किंवा वैज्ञानिक घटनांशी संबंध जोडायला हवा. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या निरीक्षणात तसेच, वर्गीकरण, तुलना, तर्कशुद्ध विचारात भर पडेल, असे उपक्रम वर्गात व वर्गाबाहेर आयोजित करता येतील. अध्यापन-अध्ययनाच्या या एकात्मिक दृष्टिकोनामुळे ठरविलेली उद्दिष्टे यशस्वीरित्या प्राप्त करता येतील. प्राथमिक स्तरावरील अध्ययनाचे महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे आरोग्यदायी व उत्पादनक्षम जीवन जगण्याची कला त्यामुळे मुलांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी मदत होईल. अध्यापक शिक्षण अभ्यासक्रमात कृतींवर भर असावा, जिज्ञासा जागृती करण्यासाठी आवश्यक त्या घटकांचा सराव, कल्पना, सहकारात्मक जीवन व सामाजिक कार्य करण्यासाठी सकारात्मक विचार व वृत्ती रुचविण्याचा प्रयत्न करायला हवा.

उच्च प्राथमिक स्तरावरील महत्त्वाचा बदल म्हणजे विज्ञान आणि सामाजिक शास्त्रांचे अध्यापन होय. यातील प्रत्येक विषय एकात्मिक विषय म्हणून शिकविला जातो. या एकात्मिक विषयांचे अध्यापन करण्यासाठी अध्यापक शिक्षण अभ्यासक्रमातून विशेष लक्ष देण्याची व उद्‌बोधनाची आवश्यकता आहे. नवीन शालेय अभ्यासक्रमात भारताचा सांस्कृतिक वारसा आणि त्याची समृद्ध परंपरा, त्याचे योगदान सामाजिक, आर्थिक आणि इतर संबंधित क्षेत्रात असून त्यासंबंधी विद्यार्थी, शिक्षकांना योग्य जाणीव करुन देणे आवश्यक आहे. विज्ञान आणि तंत्रविज्ञान या नवीन अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थी शिक्षकांना त्यासंबंधी योग्य उद्‌बोधन केले पाहिजे त्यामुळे त्या विषयाचे आवडीने अध्ययन करु शकतील. त्याचप्रमाणे, शैक्षणिक मानसशास्त्र, भाषा शिक्षणात नवीन बदल झाल्यामुळे त्याचे आवश्यक ते उद्‌बोधन विद्यार्थी-शिक्षकांना दिले पाहिजे.

संकल्पना निर्मितीवर भर आणि विज्ञान आणि तंत्रविज्ञानाच्या ज्ञानाच्या उपयोजनाचे कौशल्य, योग्य त्या कौशल्यांचा विकास करण्यासाठी त्याचे होणारे फायदे ध्यानात घेऊन विद्यार्थी शिक्षकांना सुद्धा त्याचा एक भाग समजायला हवे. वास्तव परिस्थितीत विद्यार्थ्यांमध्ये इच्छित कौशल्य विकसित करण्यासाठी या ज्ञानाचा उपयोग होईल.

नवीन शालेय अभ्यासक्रम आराखडा खालील घटकांना महत्त्व देतो. विशेष गरजांसाठी शिक्षण, समाजातील सामाजिक, आर्थिक परिस्थितीतील वंचित घटकांना शिक्षण त्यामध्ये

स्त्रिया, ग्रामीण व गरीब विद्यार्थी, जमाती, अल्पसंख्यांक, व्यंग इ. यांचा समावेश होतो. विद्यार्थ्यांची सामाजिक आर्थिक व धार्मिक पार्श्वभूमि लक्षात घेऊन अध्यापक शिक्षण अभ्यासक्रमातून हा भेदभाव कमी करण्यासाठी व सर्वांना समान संधी प्राप्त करुन देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

शिक्षणाचा आशय भारतीय विचार व अनुभवात खोलवर रुजवला गेला पाहिजे त्यासाठी बाहेरील कल्पनांना सतत वाव दिला पाहिजे. ही एक काळाची गरज आहे. आपल्या भारताच्या विशाल संस्कृतीची ओळख भूतकाळ व वर्तमान काळाच्या अनुभवतून सर्वांपर्यंत पोहचवली पाहिजे. त्यासाठी अध्यापनशास्त्रीय विश्लेषण, आकलनातील स्पष्टता आणि विविध क्षेत्रात भारतीयांनी संपादित केलेल्या ज्ञानाचे योगदान, इ. वर विशेष भर देणे आवश्यक आहे. त्यामुळे अगदी प्राथमिक स्तरापासून विद्यार्थी-शिक्षकांना अध्ययनार्थीमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची जाणीव विकसित करण्यास मदत होईल.

NCFSC – 2000 ने ठळकपणे असे नमूद केले आहे की, मानवी मूल्ये ही शिक्षणाच्या सर्व स्तरावरील सर्व विषयाच्या अभ्यासक्रमाचा एकात्मिक भाग आहे. म्हणून ही मूल्ये, उदा. मानवी हक्क, नागरिकांची मूलभूत कर्तव्ये दररोजच्या अध्यापनातून व शाळेच्या इतर कृतीतून मुलांमध्ये योग्य पद्धतीने बिंबवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अध्यापक शिक्षणासाठी ही एक महत्त्वाची बाब आहे. विद्यार्थ्यांमध्ये मूल्यांची रुजवणूक करण्यासाठी शिक्षकाला विविध भूमिका कराव्या लागतात. प्रत्येक शिक्षक मूल्यांबद्दल विचार करु शकत असल्यामुळे विद्यार्थी-शिक्षकाला मूल्यशिक्षणाविषयी ओळख करुन देणे आवश्यक आहे. तसेच शालेय विद्यार्थ्यांमध्ये मूल्यांची रुजवणूक करण्यासाठी विविध पद्धतींचा विकास केला पाहिजे.

प्राथमिक स्तरावरील शालेय अभ्यासक्रम आराखड्यात किमान अध्ययन क्षमता (MLL) प्रकर्षाने दिसून येते. विद्यार्थ्यांनी जे अध्ययनातून प्राप्त केले त्याची निष्पत्ती पाहिली जाते. ठरविलेल्या ध्येयानुसार विद्यार्थी व शिक्षकांकडून कार्य झाले की नाही ते किमान अध्ययन क्षमतेवरुन (MLL) ठरविले जाते. अध्ययनकर्त्यांच्या अध्ययन क्षमता उंचावण्यासाठी अध्यापक शिक्षण अभ्यासक्रमातून विद्यार्थी शिक्षकांना किमान अध्ययन क्षमतेची ओळख करुन देणे आवश्यक आहे. त्यामुळे शालेय अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांच्या किमान अध्ययन क्षमतेसाठी विद्यार्थ्यांच्या कोणत्या क्षमता विकसित करायच्या याची जाणीव विद्यार्थी शिक्षकांना होते.

शालेय प्रक्रियेचा ICT हा एक अविभाज्य भाग आहे. त्याचा अध्यापन शैलीवरच नाही तर अध्ययन शैलीवरही प्रभाव पडतो. ICT मुळे शिक्षक केंद्रित अध्ययनाचे स्वयं अध्ययनात रुपांतर होत आहे.

अध्यापक शिक्षणाचे व्यवहार अनेक घटकांवर आधारलेले आहेत. विद्यार्थी शिक्षकांची व शिक्षक प्रशिक्षण यांची शैक्षणिक पार्श्वभूमी, अध्यापन विषयाचे स्वरुप, अध्यापन विषयाचे तत्त्वज्ञान, घेण्यात येणारे प्रात्यक्षिक कार्य, शिक्षणासाठी आणि विद्यार्थ्यांच्या वैशिष्ट्यांसाठी समाजातील उपलब्ध साधने, इ. सैद्धांतिक व प्रात्यक्षिक भाग तसेच सामाजिक घटकांची मदत यांच्यात एकात्मता साधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शाळेचे कार्य परिणामकारकपणे चालण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. शाळेचे कार्य परिणामकारकपणे चालण्यासाठी विद्यार्थी शिक्षकाने समाजातील विविध घटकांचा उपयोग करुन घेण्याची क्षमता विकसित घटकांचा उपयोग करुन

घेण्याची क्षमता विकसित केली पाहिजे. व्याख्यान पद्धतीवरील भर कमी करुन कृतीवर आधारित आणि सहभागात्मक पद्धतींचा अवलंब अधिक प्रमाणात केला पाहिजे. अध्यापक शिक्षणात प्रात्यक्षिके, प्रकल्प, क्षेत्रीय कार्यावर अधिक भर दिला पाहिजे. शाळेतील व समाजातील अनुभवाद्वारे विद्यार्थी शिक्षकांनी शालेय विद्यार्थ्यांमध्ये विविध मूल्ये रुजवली पाहिजेत. अभ्यासक्रमाचा एक माग म्हणून कृती संशोधने, गट चर्चा, स्वयं अध्ययन कृती इ. कार्य आयोजित करण्यास विद्यार्थी-शिक्षकांना प्रवृत्त केले पाहिजे. निष्पत्तीयुक्त कृतींवर भर दिला पाहिजे. अध्ययनार्थ्यांच्या स्तरावर विद्यार्थी-शिक्षकाने समायोजन करण्याचे कौशल्य अंगीकारले पाहिजे. लहान मुलांबरोबर कार्य करावयाचे असल्यामुळे रागीट स्वभावावरील समायोजन साधने आवश्यक आहे. अभ्यासाच्या विविध विषयातील पायाभूत कौशल्यांवर प्राविण्य मिळविण्यासाठी आणि आरोग्यदायी व उत्पादनक्षम जीवन जगण्याची कला प्राप्त करण्यासाठी नियमित निदान व वेळोवेळी उपचार करण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे.

४.६ सारांश :

एन.सी.टी.ई. मॉडेल (१९७८ आणि १९८८) मध्ये अध्यापक शिक्षण अभ्यासक्रमाचे आयोजन कसे करावे (प्राथमिक स्तर) ते सांगितले आहे. तसेच विद्यापीठ स्तरावर अध्यापक शिक्षण / अभ्यासक्रम आराखड्याचे मार्गदर्शन प्रत्येक विभागानुसार भारांश देऊन केलेले आहे.

घटकावरील प्रश्न :

१) NCTE मॉडेल-I मध्ये प्राथमिक स्तरावरील अध्यापक शिक्षण अभ्यासक्रमात विभागानुसार दिलेले भारांश सांगा.
२) NCTE मॉडेल-II (१९८८) नुसार प्राथमिक स्तरावरील अध्यापक शिक्षण अभ्यासक्रमाचे वर्णन करा.
३) माध्यमिक अध्यापकांसाठी वरील अभ्यासक्रमात सुधारणात्मक उपाय सूचवा.

प्रत्याभरण :

प्रश्न उद्रारे / आधारभूत वाचन
(१) ४.२.१ वाचा.
(२) ४.२.२ वाचा.
(३) ४.२.१ व ४.२.२ वाचा.

संदर्भ :

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५,
राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद.

❖❖❖❖

५

माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावरील अध्यापक शिक्षण

घटक रचना :

५.० उद्दिष्टे

५.१ प्रस्तावना

५.२ एन.सी.टी.ई. ने शिफारस केलेली माध्यमिक स्तरावरील अध्यापक शिक्षण कार्यक्रमाची उद्दिष्टे

५.३ एन.सी.टी.ई. ने शिफारस केलेली उच्च माध्यमिक स्तरावरील अध्यापक शिक्षण कार्यक्रमाची उद्दिष्टे

५.४ एन.सी.टी.ई. ने शिफारस केलेली उच्च माध्यमिक स्तरावरील अध्यापक शिक्षण कार्यक्रमाची उद्दिष्टे

५.५ एन.सी.टी.ई. ने शिफारस केलेली उच्च माध्यमिक स्तरावरील अध्यापक शिक्षण कार्यक्रमाची रचना

५.६ एन.सी.टी.ई. ने शिफारस केलेला माध्यमिक स्तरावरील अध्यापक शिक्षणाकरिता राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा

५.७ एन.सी.टी.ई. ने शिफारस केलेला उच्च माध्यमिक स्तरावरील अध्यापक शिक्षण कार्यक्रमाकरिता राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा

५.८ माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची भूमिका आणि क्षमता

५.९ उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची भूमिका आणि क्षमता.

५.१० सारांश

५.० उद्दिष्टे :

हा घटक वाचल्यानंतर तुम्ही खालील गोष्टींची माहिती मिळवू शकाल.

- NCTE ने शिफारस केलेली माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावरील अध्यापक शिक्षण कार्यक्रमाच्या उद्दिष्टांची यादी.
- NCTE ने शिफारस केलेली माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावरील अध्यापक शिक्षण कार्यक्रमाच्या रचनेची चर्चा.
- NCTE ने शिफारस केलेला माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील अध्यापक शिक्षण कार्यक्रमाच्या राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याचे स्पष्टीकरण.
- माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या अत्यावश्यक भूमिकेची व क्षमतेची चर्चा.

५.१ प्रस्तावना :

राष्ट्रीय विकासाच्या संदर्भात भारतातील शिक्षणाची भूमिका ही हल्लीच्या काळात चिकित्सक होत चालली आहे. शिक्षणाचे ध्येय हे राष्ट्रीय विकासाचे ध्येय असले पाहिजे. याचा अर्थ म्हणजेच मानवी संसाधनाचा विकास करणे होय. शिक्षणाच्या योग्य कार्यक्रमाच्याद्वारे मानवी संसाधनाचा विकास करणे शक्य आहे.

समाज बदलण्याचा एक मार्ग म्हणून शिक्षकाने समाजात बदल घडवून आणण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. त्यामुळे राष्ट्रीय विकास घडवून आणण्यास मदत होईल. शिक्षणात यशस्वीरित्या नवीन सुधारणा घडवून आणण्यासाठी शिक्षणाची भूमिका शिक्षकाच्या गुणवत्तेवर अवलंबून असते तर शिक्षकाची गुणवत्ता ही त्याला मिळणाऱ्या प्रशिक्षणावर अवलंबून असते.

५.२ NCTE ने शिफारस केलेली माध्यमिक स्तरावरील अध्यापक शिक्षण कार्यक्रमाची उद्दिष्टे :

- प्राथमिक शिक्षणाचे सातत्य टिकवून ठेवणे, विविधलक्षी शिक्षणक्रमाच्या अभ्यासासाठी आणि उच्च माध्यमिक स्तरावरील योग्य विषयाची निवड करण्यासाठी विद्यार्थ्यांची तयारी करणे.
- भावी शिक्षकांमध्ये अध्यापनाचा ज्ञानशाखीय दृष्टिकोन विकसित करणे आणि अशा प्रकारच्या अभ्यासात विद्यार्थ्यांची रुची वाढविणे.
- मुक्त, खाजगी, जागतिक मुक्त व्यापार, जागतिक आरोग्य संघटना इ. चे शिक्षणातील महत्त्व आणि त्याच्या वाईट परिणामांविषयी आकलन होण्यास प्रोत्साहन देणे.
- माहिती तंत्रविज्ञानाचा उपयोग, फायदे, तोटे व सुरक्षिततेसंबंधी प्रशिक्षण देणे.
- शिक्षणाच्या योग्य दृष्टीकोनाद्वारे गरीब आणि श्रीमंत शाळांमधील शैक्षणिक आणि सांस्कृतिक दरी कमी करणे.
- भावी शिक्षकांमध्ये भारतीय संस्कृतीबद्दल प्रेम, जागतिक सहभाग आणि राष्ट्रीय अभिमान व ओळख याची जाणीव विकसित करण्यास प्रेरणा देणे.
- शिक्षक ज्या विषयाचे अध्यापन करतात त्याची अध्यापन क्षमता, विषयाचे सादरीकरण कौशल्य, माहिती तंत्रज्ञानाबरोबर योग्य शैक्षणिक साधनांचा वापर, पुरक शैक्षणिक कृतीचे आयोजन व समाजाचे सहकार्य मिळविण्यास प्रोत्साहन देणे.
- विद्यार्थ्यांमध्ये फक्त विषयांच्या स्वरुपाचे आकलनच नाही तर विषयातील संघटन व एकात्मतेचे ज्ञान मिळविण्याचे सामर्थ्य निर्माण करते.
- व्यक्तिमत्त्वाचा विकास, मूल्यांची रुजवणूक, नागरिकत्वाची जाणीव आणि देशभक्तीची भावना विकसित करण्यासाठी तयारी करणे.
- पर्यावरणाचे रक्षण करणे, जीवसृष्टीचा समतोल राखण्यासंबंधी जाणिव निर्माण करणे.

- परिस्थितीच्या गरजेनुसार ज्ञान मिळविणे, ज्ञानाची रचना करणे, त्यावर प्रक्रिया करणे आणि ज्ञानाचा उपयोग करणे यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करणे.
- अभ्यासक्रमातील मुख्य गाभा आणि त्यासंबंधीच्या योग्य घडामोडी व मूल्यमापनाची कला प्राप्त करण्यास मदत करणे.
- योगसाधना, आरोग्य, शारीरिक, सौंदर्यात्मक आणि इतर समावेशक शैक्षणिक कृतींशी एकात्मता साधण्यासाठी प्रोत्साहन देणे.
- जीवन कौशल्याचे शिक्षण, एच.आय.व्ही. एड्स् प्रतिबंधात्मक शिक्षण, चांगले आरोग्य, इ. संबंधी, भावी शिक्षक व विद्यार्थी याना चित्रफितीच्याद्वारे माहिती प्राप्त करुन घेण्यास प्रोत्साहित करणे.
- शिक्षणाचा गुणात्मक दर्जा उंचावण्यासाठी कृती सशोधनाद्वारे समाजातील समस्या व संस्कृतीचा विकास करण्यासाठी संस्कृतीशास्त्राची ओळख करुन घेण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्यांमध्ये विकसित करणे.
- विद्यार्थ्यांमध्ये शाळा व समान यांच्यातील संबंध आनंददायी व आरोग्यदायी करुन जीवनभर अध्ययन करण्यासाठी आवड निर्माण करणे.
- भारताच्या विविधतेतून एकात्मतेची वैशिष्ट्ये आणि ती एकात्मता बळकट करण्यासाठी अभ्यासक्रमाच्या विकसनाची माहिती करुन घेणे.

सध्याचा, त्याचप्रमाणे नवीन परिस्थितीचा विचार करता, स्थानिक ते जागतिक पातळीवर सुसंवाद साधण्यासाठी आणखी काही उद्दिष्टांची रचना करता येईल.

५.३ NCTE ने शिफारस केलेली उच्च माध्यमिक स्तरावरील अध्यापक शिक्षणाची उद्दिष्टे (शैक्षणिक प्रवाह) :-

- शिक्षकांमध्ये शैक्षणिक प्रवाह आणि आकलन त्याचे स्वरुप, हेतू व तत्त्वज्ञान याचे सापेक्ष प्रमाणात विकसन करणे.
- शिक्षक अध्यापन करीत असलेल्या विषयाचे तत्त्वज्ञान अध्ययन-अध्यापनाचा हेतू, निती इ. विषयी जाणीव निर्माण करणे.
- शिक्षक अध्यापन करीत असलेल्या विषयातील सखोल अध्यापनशास्त्रीय विश्लेषण व आकलन आणि त्याचा पुढील शिक्षणाशी असलेला संबंध दृढ करण्याची क्षमता विकसित करणे.
- विद्यार्थ्यासाठी शिक्षणाची योग्य सुविधा निर्माण करण्याकरिता व त्यांच्या वैशिष्ट्यांचे आकलन करुन घेण्याकरिता शिक्षकांना समर्थ बनविणे.

- स्वयं अध्ययन, संदर्भ कौशल्यांचा विकास, गट अध्ययनाचे आकलन, चिकित्सक विचार, संकल्पना, स्वतःचे स्वयं मूल्यमापन आणि आय.सी.टी. समूह माध्यमांद्वारे ज्ञान / माहिती मिळविणे या बाबतीत अध्ययनकर्त्याला मार्गदर्शन करण्यासाठी व समर्थ बनविण्यासाठी प्रेरणा देणे.
- अमूर्त आणि गुंतागुंतीच्या कल्पना व साध्या संकल्पना इ. चे संप्रेषण करण्याची क्षमता विकसित करणे.
- उद्दिष्टांचे आकलन, परस्पर संबंध, मूल्यमापन तंत्रे आणि विविध क्षेत्रातील अभ्यासक्रम आराखडा याची माहिती मिळविण्यास मदत करणे.
- विद्यार्थी-शिक्षक प्रांतिक विशेषांचे आकलन व त्याचे शैक्षणिक महत्त्व आणि राष्ट्रीय जिवनाच्या मुख्य प्रवाहातील त्याचा सहसंबंध प्रस्थापित करण्यास व योग्य उत्तर शोधण्यास प्रेरणा देणे.
- शिक्षकांमध्ये देशभक्तीची भावना, राष्ट्रीय जाणीव, सामाजिक मिलाफ, जातीय ऐक्य, आणि आंतरराष्ट्रीय बंधुत्त्व विकसित करणे.
- गरजांभूत व संस्कृतीविशेष शास्त्र विकसित करण्यास शिक्षकांना प्रेरणा देणे.
- राष्ट्रीय समस्या पर्यावरण विषय समस्या आणि भारतीय संस्कृतीचे गुणविशेष इ. ची जाणीव करुन देणे.
- विद्यार्थ्यांना एच.आई.व्ही. / एड्स् इ. ची माहिती, प्रतिबंधात्मक शिक्षण, आरोग्यदायी जीवनात येणाऱ्या असंख्य समस्यांचे आकलन करुन घेण्याची वृत्ती, जीवन कौशल्यांचा विकास, कलंक आणि योग्यायोग्य भेद करण्याची कुवत याची माहिती करुन घेण्यास प्रोत्साहन देणे.

उच्च माध्यमिक स्तरावरील अध्यापक शिक्षणाची उद्दिष्ट्ये (व्यावसायिक प्रवाह) :

विद्यार्थी शिक्षकांच्या खालीत क्षमता व ध्येये विकसित करण्यासाठी अध्यापक शिक्षण कार्यक्रमात व्यावसायिक विषयांची समावेश केला आहे.

- स्पर्धात्मक व मुक्त व्यापारी अर्थव्यवस्थेत यशस्वी होण्यासाठी समृद्ध असे व्यावसायिक शिक्षण देणे.
- यश संपादनासाठी पारंपारिक व्यवसायाचे स्वरुप बदलून आधुनिकतेकडे नेणे.
- बाजारीकरण, बाजारसर्वेक्षण, विक्रेता आणि जाहिरातीचे कौशल्य मिळविण्यास प्रेरणा देणे.
- उच्च आणि चांगले व्यावसायिक कौशल्ये आणि विद्यार्थी व शिक्षकांमधील समग्र क्षमता वाढीस लावण्यास उत्तेजन देणे.
- स्वयंरोजगाराकरिता अभ्यासक्रमाचा आराखडा क्षमता विकसित करणे.
- संकुचित विशेषतः आणि शैक्षणिक कमकुवतपणा निर्माण होऊ नये म्हणून काळजी घेणे.
- विद्यार्थ्यांना कामाची नितीमता आणि प्रतिष्ठा व कार्य संस्कृती रुजविण्यास प्रेरणा देणे.

५.४ व ५.५ एन.सी.टी.ई. ने शिफारस केलेली माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावरील अध्यापक शिक्षण कार्यक्रमाची रचना

अभ्यासक्रमाच्या रचनेस व आराखड्यास अंतिम रुप देताना एन.सी.टी.ई.ने दोन निकषांचा आधार घेतला. उदा. शिक्षकांसाठी एका स्तरावरुन दुसऱ्या स्तरावर, एका अभ्यासक्रमातून दुसऱ्या अभ्यासक्रमात आणि सेवापूर्व ते सेवा अंतर्गत गतिमानता व एकात्मिक लवचिकता निर्माण करण्यात आली.

एकात्मता म्हणजे एका संपूर्ण कार्यक्रमातील सैद्धांतिक भागाच्या सर्व घटकांची एकात्मता होय. प्रत्येक स्तर तीन मुख्य भागापासून बनलेला आहे.

१) अध्यापनशास्त्रीय सैद्धांतिक भाग
२) समाजाबरोबर कार्य
३) आशययुक्त अध्यापन व अध्यापनाचा सराव

अध्यापन शास्त्रामध्ये विषय व विषयांचा स्तर ध्यानात घेऊन शिक्षकांची कौशल्य विकसित करण्यासाठी पेपरमधील महत्त्वाच्या भागांवर भर दिला जातो.

विशिष्ट हेतूने प्राप्त माहितीचा प्रत्यक्ष परिस्थितीत उपयोग करण्यासाठी सामाजिक कार्याचा समावेश केला आहे. माध्यमिक स्तरावर ३ भागात दिलेला भारांश खालीलप्रमाणे :

अध्यापनशास्त्र - २०%

समाज कार्य - २०%

आशययुक्त अध्यापन - ६०%

उच्च माध्यमिक स्तरावर दिलेला भारांश

अध्यापनशास्त्र - ३०%

समाजकार्य - २०%

आशययुक्त अध्यापन - ५०%

माध्यमिक स्तरावर प्रवेश मिळविण्याकरिता शालेय पातळीवरील तीन विषय पदवीस्तरावर अभ्यासले पाहिजेत व कमीत कमी द्वितीय श्रेणी मिळविली पाहिजे. उच्च माध्यमिक स्तरावर प्रवेशासाठी एक किंवा दोन विषय घेऊन पदवीत्तर पदवी व ५५% गुण प्राप्त केलेले असावेत. व्यावसायिक व शैक्षणिक असे दोन प्रकारचे अभ्यासक्रम तयार करण्यात आलेले आहेत.

'शैक्षणिक' अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :

★ विविधअंगी लोकशाही आणि विशिष्ट आशय युक्त
★ विशिष्ट विषयानुसार रचना
★ ध्येय निश्चितीसाठी समृद्ध आणि समग्र अभ्यासक्रम

★ **अत्यावश्यक व ऐच्छिक विषयांचे गट**
★ अमूर्त आणि सर्जनात्मक विचारावर भर आणि गुंतागुंतीच्या कल्पना व कठीण संकल्पनांच्या आधारे उच्च मानसिक कार्य
★ उच्च शिक्षणाच्या दृष्टिकोनातून दिलेला भर.

'व्यावसायिक' अभ्यासक्रम :

★ नोकरी केंद्रभूत
★ पायाभूत कौशल्य
★ उपयुक्त
★ प्रात्यक्षिक
★ आर्थिक मूल्य समृद्धी
★ हस्तकौशल्य
★ रोजगार किंवा स्वयं रोजगार केंद्री
★ ठराविक स्वरुप
★ आर्थिकदृष्ट्या सर्वसामान्य कामगारांना योग्य

५.६ माध्यमिक स्तरावरील अध्यापक शिक्षण कार्यक्रमाकरीता राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा :

कालावधी १ वर्ष

	क्षेत्र	अभ्यासक्रम शालेय अध्यापक शिक्षणाकरिता अभ्यासक्रम आराखडा
अ	सैद्धांतिक	– भारतातील आवश्यक माध्यमिक शिक्षण व प्रदेशासंबंधीची तत्त्वे, दर्जा, समस्या व चर्चेचे विषय – उदयोन्मुख भारतीय समाज : (एकता, विविधता व प्रांतीय विशेषत:) आणि माध्यमिक शिक्षण – माध्यमिक शिक्षणाचे तत्त्वज्ञान : भारतीय आणि पाश्चात्य (फक्त नवीन विचार प्रवाह व शैक्षणिक महत्त्व). – शिक्षकाचे समाजशास्त्र आणि सांस्कृतिक उदय : (एकता - विविधता आणि प्रांतिक संस्कृतीचा अभ्यास)

		– माध्यमिक शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांचे अध्ययन मानसशास्त्र व प्रेरणा (प्रादेशिक आणि गट विशेष) – माध्यमिक शालेय स्तरावरील अभ्यासक्रम आणि अनुदेशन रचना. – पर्यावरण शिक्षण – कृती संशोधन आणि नवोपक्रम शांततेसाठी शिक्षण आणि सामाजिक ऐक्य – आरोग्य, आरोग्यशास्त्र आणि शारीरिक शिक्षण मूल्यमापन आणि मापन – सुरक्षितता आणि अपत्ती व्यवस्थापन – व्यवस्थापन आणि नियोजनाचा अर्थ – मार्गदर्शन आणि समुपदेशन, आय.सी.टी. आणि त्याचा माध्यमिक शिक्षणात उपयोग – समावेशक शिक्षण – प्रादेशिक गरजेनुसार इतर.
ब	प्रात्यक्षिक कार्य	– माध्यमिक शाळेत एक आठवड्याची आंतरवासियता – दोन विषयाचे अध्यापन व शाळेतील सामाईक विषयाचे विश्लेषण किंवा विद्यापीठाने निश्चित केल्याप्रमाणे. (कमीत कमी ३० पाठ) – संप्रेषण कौशल्ये – पर्यावरणाचे संरक्षण – सजिवप्रणाली - रचना व कार्ये – लागवड आणि पाण्याचा साठा – कार्यानुभव – शाळाचे सौंदर्य – खेळ आणि क्रिडांचे आयोजन – ग्रंथालयीन कार्याचे आयोजन – पर्यटन व सहलींचे आयोजन – क्षेत्रीय कार्याचे आयोजन – शारीरिक शिक्षण – समाज कार्य / आंतरक्रिया – विद्यार्थ्याची स्वच्छतः – कृती संशोधनाची अंमलबजावणी, व्यक्ती अभ्यास क्षेत्रीय कार्य – क्षमतांचे मापन करण्यासाठी चाचणी तयार करणे – उत्तर सूचीचे मूल्यमापन

		– न्यायासंबंधीचे कार्य व त्याचे मूल्यमापन – नकाशा, तक्ते, आकृत्या तयार करणे. – आयत्यावेळचे विषय आणि किंमतीशिवाय शैक्षणिक साधने. – शैक्षणिक खेळ – निदानात्मक चाचण्या आणि उपचारात्मक अध्यापन – कृतींवर आधारित गरजेनुसार इतर काही.

५.७ उच्च माध्यमिक स्तरावरील अध्यापक शिक्षण कार्यक्रमाचा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा :

कालावधी १ वर्ष

	क्षेत्र	**अभ्यासक्रम** **उच्च माध्यमिक शालेय स्तरावरील अध्यापकांकरिता अभ्यासक्रम आराखडा (शैक्षणिक प्रवाह)**
अ	सैद्धांतिक	– उदयोन्मुख भारतीय समाज (भारतीय वारसा, त्याची एकता, विविधता, धार्मिक विशेषतः, आधुनिकीकरण, उच्च आधुनिक विचार, (भारतीय संस्कृती, जागतिकीकरण, ज्ञान, अर्थव्यवस्था, भर आणि ज्ञानधिष्ठित समाज इ. वर विशेष भर) – अध्यापन आणि अध्ययनाचे मानसशास्त्र – शिक्षणाचे तत्त्वज्ञान (भारतीय आणि पाश्चात्त्य मूलभूत जीवनपद्धती संबंधी) – समाजशास्त्र आणि सांस्कृतिक मानवी जीवन – उच्च माध्यमिक शिक्षणाची तत्त्वे, दर्जा, समस्या, चर्चेचे विषय आणि आव्हाने. – शिक्षणशास्त्रीय पृथक्करण आणि अध्यापनाची तंत्रे. (दोन विषय, एक उच्च पातळीवरील ('अ' दर्जा) आणि दूसरा इतर सामान्य पातळीवरील ('ओ' दर्जा) – आय.सी.टी. आणि त्याची समन्वय – पर्यावरण शिक्षण – आरोग्य, आरोग्यशास्त्र आणि शारीरिक शिक्षण – पौंगाडावस्थेचे शिक्षण – सुरक्षितेविषयी शिक्षण आणि सामाजिक ऐक्य – व्यवस्थापन, नियोजनआणि शिक्षणाचा आर्थिक विचार – अभ्यासक्रमावर आधारित गरजेनुसार इतर

ब	वैकल्पिक	– अध्यापन (दोन विषयाचे अध्यापनशास्त्रीय विश्लेषण : एक प्रगत आणि दुसरा सामान्य) – गृहविज्ञानाचे अध्यापनशास्त्रीय विश्लेषण – विदेशी भाषेचे अध्यापन शास्त्रीय विश्लेषण – मातृभाषा आणि प्रांतीय भाषेचे अध्यापनशास्त्रीय विलेषण – विषयाच्या अभ्यासावर आधारित गरजेनुसार इतर
क	विशेष एक	– भारतीय शिक्षणाचा इतिहास – पाश्चात्य शिक्षणाचा इतिहास – तुलनात्मक शिक्षण – शैक्षणिक तंत्रविज्ञान – दडपल्या गेलेल्याचे शिक्षण – स्त्री शिक्षण – ग्रामीण आणि शहरी शिक्षण – आव्हानात्मक मुलांचे शिक्षण – समावेशक शिक्षण – लोकसंख्या शिक्षण – शिक्षणाच्या समस्या – दूर शिक्षण आणि मुक्त अध्ययन प्रणाली – क्रमिक पुस्तकांचे मूल्यमापन आणि संदर्भ साधने व त्यतांचे निवड – आवश्यक आणि वैकल्पीक मध्ये जे घेतलेले नाहीत असे इतर विषय.
ड	प्रात्यक्षिक कार्ये	– उच्च माध्यमिक शाळेत एक आठवड्याची आंतरवाशियता – 'अ' स्तरावरील विषयाचे ४० पाठ व 'ओ' स्तरावरील विषयाचे २० पाठ अध्यापन कार्य – उच्च आणि सामान्य स्तरावरील विषयाचे अध्यापनशास्त्रीय विश्लेषण – समाज सर्वेक्षण आणि अहवालाचे सादरीकरण – कृती संशोधन, क्षेत्रीय कार्य, व्यक्ती अभ्यास, प्रत्येकी एक. – पर्यावरणाचे संरक्षण – लागवड,पाण्याची साठवणूक आणि गवताळ भूमिचा विकास. – सामाजिक खेळातील आणि सण इ. मध्ये सहभाग – खेळांचे आणि क्रिडांचे आयोजन

		– शिक्षणाशी पुरक अशा कृतींचे आयोजन – प्रमुख व सामान्य विषयातून न्यायाधिष्ठित कार्य आणि त्याचे मूल्यांकन – मातीचे व्यवस्थापन आणि खते – शाळांचे सौंदर्य आणि बगिचा – भिंतीवरील लेखन – सभागृहातील भाषण आणि चर्चा – शारीरिक शिक्षण शाळा आणि विद्यार्थ्यांची आरोग्यदायी स्वच्छतेला प्रोत्साहन – कार्याचे आणि सर्व प्रकारच्या क्षमतांच्या मूल्यमापनाची चाचणी तयार करणे. – विद्यार्थ्यांच्या उत्तर पत्रिकेचे मूल्यमापन – नकाशा, तक्ते, आकृत्या इ. तयार करणे. – समाजोपयोगी आणि उत्पादित कार्य (SUPW) – नवीन पद्धती आणि अध्यापन – शैक्षणिक नोंदीची देखभाल – गरजांवर आधारित इतर कृती

उच्च माध्यमिक अध्यापक शिक्षणाकरिता व्यावसायिक अभ्यासक्रमाची रचना (व्यावसायिक विचार प्रवाह)

कालावधी १ वर्ष

	क्षेत्र	**अभ्यासक्रम** **उच्च माध्यमिक अध्यापक शिक्षणासाठी अभ्यासक्रम आराखडा (व्यावसायिक विचार प्रवाह)**
अ	सैद्धांतिक	अभ्यासक्रम – उदयोन्मुख भारतीय समाज (विज्ञान, तंत्रज्ञान, विद्युत, व्यापार, उद्योग आणि अर्थ, वाणिज्य इ. महत्त्व) – तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, सांस्कृतिक जीवनशास्त्र, आणि त्यांचा व्यावसायिक शिक्षणाशी संबंध. – व्यावसायिक आणि औद्योगिक मानसशास्त्र. – आर्थिक आणि व्यावसायिक भूगोल – उद्योजकीय आणि व्यवस्थापन – शांततामय शिक्षण आणि सामाजिक ऐक्य – आर्थिक साधनांचा अर्थ आणि कच्चा माल व यंत्रसामुग्री

		– बाजारीकरण, विक्रेता, जाहिरातीकरण आणि बाजारी सर्वेक्षण. – किंमत निश्चिती, नफा, विमा इ. – प्राथमिक कामगार कायदा, कामगार कल्याण आणि कामगारांच्या समस्या. – व्यावसायिक शिक्षणाचा दर्जा, समस्या, चर्चेचे विषय आणि आव्हाने. – व्यापार किंवा व्यवसायाचे सैद्धांतिक ज्ञान – पर्यावरण शिक्षण – मूल्यमापन – आय.सी.टी. – इतर प्रांतिक विषय.
ब	विशेषीकरण	– सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिक – एक किंवा दोन – फॅशन डिझाईन – कॅटरींग आणि कुकिंग – शिवणकाम व विणकाम – हॉटेल मॅनेजमेंट – कातकाम आणि विणकाम – गालिचा विणकाम – सुतारकाम – लोहारकाम – मातकाम – अन्न व फळांची साठवणूक – मोटारगाडी यांत्रिक – यंत्रे आणि इंजिन ची दुरुस्ती – वायरमन – ड्रिलिंग – आकाशवाणी आणि दूरदर्शन – ट्रॅक्टर मेकॅनिक – मातीचे काम / पेंटींग – वॉल हँगर / पेटींग – इंटिरियर डेकोरेटर – टाय मेकिंग – पेंटिंग

		– जाहिराती – कॉम्प्युटर हार्डवेअर – इतर व्यावसायिक कार्ये
क	प्रात्यक्षिक	– एक सत्र उमेदवारी – कार्यशाळा तंत्रे – प्रात्यक्षिक हिशोब – अध्यापन आणि अध्ययनाकरिता व्यावसायिक शाळांमध्ये आंतरवासियता, आय.टी.आय., आय.आय.टी., ई. – विक्रेता म्हणून आंतरवासियता – बाजाराचे सर्वेक्षम आणि अहवाल – सामाजिक मागणीचे सर्वेक्षण आणि उत्पादनाचा पुरवठा. – समाजाच्या गरजंचे मूल्यांकन – मालांची वाहतूक आणि त्याचे व्यवस्थापन – कच्च्या मालाची खरेदी – टॅक्स रजिर्स्टची देखभाल आणि वेतन पद्धत – पर्यावरणाचे रक्षण – पाणी आणि उर्जेची साठवणूक – आपत्ती व्यवस्थापन आणि सुरक्षिततेचे शिक्षण – गरजांवर आधारित इतर कृती

५.८ माध्यमिक स्तरावरील शिक्षकाची भूमिका व क्षमता :

माध्यमिक स्तरावर शिक्षणातून दृढीकरण घडवून आणण्यात येते आणि विद्यार्थ्यांना पुढील जीवनासाठी तयार (सिद्ध) केले जाते.

नेतृत्त्वाचा विकास, लोकशाही, नागरिकत्त्व, स्वयंसाध्य कौशल्य आणि सामाजिक कौशल्य, राजकीय क्षमता आणि सामाजिक मूल्ये विकसित करणे हे माध्यमिक शिक्षणाचे ध्येय आहे.

माध्यमिक शिक्षकाच्या विविध भूमिका खालीलप्रमाणे :

१) व्यवस्थापक :

विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक अभिरुची निर्माण करुन एका विषयाचा इतर विषयाशी समन्वय साधून शिक्षक एक व्यवस्थापक म्हणून मानवी साधनसंपत्तीचा विकास करत असतात.

२) सुकरक (facilitater) :

★ विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाकडे लक्ष देतो.
★ अमूर्त आणि संकल्पनात्मक क्षमता विकसित करतो.
★ स्मरणापेक्षा आकलन / विश्लेषणावर भर देतो.
★ अध्ययनासाठी माहितीचे संघटन करतो.
★ मूल्ये आणि वृत्तीचे कार्ये समाजात योग्य पद्धतीने होण्यासाठी मदत करतो.
★ चिकित्सात्मक विचार आणि वैज्ञानिक दृष्टीकोनाचा विकास घडवून आणतो.

३) मूल्यमापनकर्ता :

★ अध्ययन विकासावर देखभाल व नियंत्रण
★ मूल्यमापनाची भूमिका प्रत्यक्ष अध्यापनाशी कशी संबंधित आहे याची जाणीव

४) मार्गदर्शक आणि समुपदेशक :

★ विकासांच्या अवस्थांचे मार्गदर्शन देतो. उदा. पौगांडावस्थेतील जलद होणाऱ्या शारीरिक वाढीविषयी, भावनिक बदलाविषयी.
★ निवडलेल्या व्यवसायाविषयी मार्गदर्शन. उदा. व्यावसायिक / तांत्रिक इ.
★ कामाकडे पाहण्याची निकोप वृत्ती विकसित करतो.
★ नमुना म्हणून भूमिका करतो.

क्षमतांची आवश्यकता :

१) व्यक्तिगत :
★ शारीरिक व आरोग्यपूर्ण
★ कृतीशील व उत्साही
★ भावनिक स्थिरता
★ स्वतःची जाणीव
★ समाजशील व मैत्रिशील वर्तन
★ बुद्धिमान - अध्यापनाविषयी प्रेम
★ तत्त्वे आणि मूल्ये असावीत.

२) व्यावसायिक :
★ विषयाचे सखोल आणि अद्ययावत ज्ञान
★ योग्य अध्यापन कौशल्ये
★ नवनवीन अध्यापन पद्धती शोधण्याची क्षमता

३) सामाजिक :-

★ व्यक्तीगत आणि आंतरव्यक्तिगत कौशल्यांचा विकास
★ चिकित्सा करण्यासाठी सदैव तयार
★ संस्थेचे ध्येय संपादन करण्यासाठी तत्पर
★ सहकारी आणि समन्वयाने कार्य करणारा
★ नेतृत्त्व गुण असणारा
★ सहानुभूती व मित्रत्त्वाचे वातावरण विकसित करणारा

५.९ उच्च माध्यमिक स्तरावरील अध्यापकाची भूमिका आणि आवश्यक क्षमता :

भूमिका : शिक्षकाच्या विविध भूमिका खालीलप्रमाणे :

१) व्यवस्थापक :

शिक्षक मानवी संसाधनाचे व्यवस्थापन करतात. उदा. विद्यार्थी तसेच साधने, उपकरणे, सोई इ. शिक्षकांचा जेव्हा विद्यार्थ्यांची संबंध येतो तेव्हा ते ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी विचारांची देवाणघेवाण करतात, संबंध दाखवितात, अपयशाला तोंड देण्यासाठी समर्थ बनवितात.

२) सुकरक :

★ निर्णय घेणे, समस्या निराकरण, चिकित्सक विचार इ. जीवनावश्यक कौशल्यांचा विकास.
★ जलद गतीने वाढणाऱ्या ज्ञानाच्या प्रस्फोटावर मात
★ विषय तज्ज्ञतेचा (नैपुण्यतेचा) विकास
★ एक प्रेरक

३) मूल्यमापन कर्ता :

विद्यार्थ्यांचे (सतत व समग्र) मूल्यमापनाबरोबर कार्यक्रम, अभ्यासक्रम साहित्य आणि स्वत:चेही मूल्यमापन करतात.

४) मार्गदर्शक आणि समुपदेशक :

★ मित्र, गोपनियता राखणारा सल्लागार
★ विरुद्ध लिंगी व्यक्तीबरोबर येणाऱ्या समस्या
★ समाजातील इतर विस्तारित कामे

क्षमता :

१) व्यक्तीगत :

★ स्व-संकल्पनेचा धनात्मक विकास
★ भावनिकदृष्ट्या स्थिर
★ शारीरिक दृष्ट्या तंदरुस्त
★ स्वयं प्रेरक
★ वाचनातील विशाल अभिरुची

२) व्यावसायिक :

★ संशोधनात्मक विचार
★ सादरीकरणाचे कौशल्य (संप्रेषण, सादर करण्याची यंत्रणा, अभिरुपता आणि अध्यापनाचे कौशल्य)
★ शिस्तं राखण्यासंबंधीच क्षमता
★ मूल्यमापनाची तंत्रे हाताळण्याची क्षमता
★ प्रत्याभरण घेण्याची क्षमता

५.१० सारांश :

या घटकामध्ये आपण माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावरील अध्यापक शिक्षणाचा अभ्यासक्रम आराखडा, उद्दिष्टे, रचना इ. ची चर्चा केली. त्याचबरोबर माध्यमिक व उच्च माध्यमिक अध्यापकाची भूमिका व अत्यावश्यक क्षमता याचाही अभ्यास केला.

घटकावरी प्रश्न / स्वाध्याय :

१) माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील अध्यापक शिक्षण कार्यक्रमाच्या उद्दिष्टांची तुलना करा.

२) अध्यापक शिक्षण कार्यक्रमाच्या अभ्यासक्रम आराखड्याची चर्चा करा.
   अ) माध्यमिक स्तर
   ब) उच्च माध्यमिक स्तर (शैक्षणिक प्रवाह)

३) शिक्षकाची भूमिका व अंगी असलेल्या आवश्यक क्षमतांची चर्चा करा.
   अ) माध्यमिक स्तर
   ब) उच्च माध्यमिक स्तर

❖❖❖❖

६

पदवी स्तरावरील अध्यापक शिक्षणक्रम

घटकांची रचना :

६.० उद्दिष्टे
६.१ प्रस्तावना
६.२ उच्च शिक्षणात अध्यापकांच्या निर्मितीसाठी अध्यापक शिक्षणाची गरज
६.३ पदवी स्तरावरील अध्यापक शिक्षणाची उद्दिष्टे
६.४ पदवी स्तरावरील अध्यापक शिक्षणक्रमाची रचना
६.५ पदवी स्तरावर अध्यापक शिक्षणक्रमासाठी अभ्यासक्रम
६.६ पदवी स्तरावरील शिक्षकाची भूमिका आणि आवश्यक क्षमता.
६.७ सारांश

६.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्ही खालील गोष्टी करु शकाल.

- उच्च स्तरावरील अध्यापक शिक्षणाचे महत्त्व व त्याचे विश्लेषण.
- पदवी स्तरावरील अध्यापक शिक्षणाची गरज व त्याचे स्पष्टीकरण.

६.१ प्रस्तावना :

शिक्षण म्हणजे ज्ञान व माहितीचे विविध अध्यापन पद्धती व प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे होणारे प्रक्षेपण होय. अध्ययनाची गुणवत्ता मुख्यतः प्रत्येक अध्ययनकर्त्यांच्या क्षमतेवर व उपलब्ध संधीवर अवलंबून असते. तसेच उच्च स्तरावरील गुणवत्तापूर्व शिक्षणाचे प्रक्षेपण हे विविध ग्राहकांवर अवलंबून असू शकते.

जेव्हा आपण उच्च शिक्षणातील गुणवत्तेविषयी बोलतो तेव्हा आपल्याला विद्यार्थी शिक्षक आणि समाज यांचे होणारे समाधान लक्षात येते. आपल्याला आणखी एक गोष्ट ध्यानात येते ती म्हणजे जेव्हा आपण शाळा व महाविद्यालयातील नवीन पिढीची सामाजिक, बौद्धिक क्षमता, वैशिष्ट्ये व जबाबदारी, उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेसंबंधी शिक्षण आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार असे लक्षात येते की, अध्यापक शिक्षणाची आवश्यकता ही त्याची गुणवत्तेशिवाय असून, अध्यापक शिक्षणाचा ही त्याची गुणवत्तेशिवाय असून, अध्यापक शिक्षणाचा दर्जा सर्व बाजूनी खलावत चालला आहे.

पदवी शिक्षण हे एक जीवनभर शिक्षण प्रणालीचा घटनात्मक भाग आहे. माध्यमिक शिक्षणाची निष्पत्ती हे त्याचे अंतरगमन आसून उच्च शिक्षणाची गुणात्मक निष्पत्ती ही पूर्णपणे त्याच्या गुणवत्तेर अवलंबून असते. अध्यापक शिक्षणातूनच जागतिक कार्यप्रणाली तसेच औचारिक व अनौपचारिक शिक्षण प्राली उदयास आली.

जागतिक बाजारीकरणाचे स्वरुप, उत्पादनात नवीन ज्ञानाचा उपयोग, समान कार्याच्या बदलत्या स्वरुपामुळे अध्यापन व्यवसायात होणारे बदल व आवश्यकता, मानवाच्या सर्व बाजूंनी होणारी माहिती व संप्रेषण तंत्रविज्ञानाची ओळख यामुळे जग झपाट्याने बदलत चालले आहे. अध्यापक शिक्षण संस्थेत त्यामुळे अध्ययनाची नवीन संकल्पना स्पष्ट झाली. शिक्षक आणि विद्यार्थी यांची समोरासमोरील आंतरक्रिया आता राहिलेली नाही. अभ्यासक्रम रचनेचा पारंपारिक दृष्टिकोन हा आवश्यक त्या कौशल्यांवर व व्यवसायांवर आधारित होता परंतू बदलत्या काळामुळे अभ्यासक्रम हा अधिक लवचिक, गुंतागुंतीचा आणि गतिमान बनत चालला आहे. पदवी स्तरावरील अभ्यासक्रम राज्य व राष्ट्रीय स्तरापर्यंत पोहचणारा असा असला पाहिजे. एम.एस्. विद्यापीठ बडोदा येथे उच्च शिक्षणावर झालेल्या संशोधनातून असे सूचविण्यात आले आहे की, पदवी स्तरावरील अध्यापकांच्या प्रशिक्षणासाठी DHE असावे की जे यापूर्वी स्थगित झालेले होते ते पुन्हा चालू करण्यात यावे. पदवी स्तरावरील अध्यापक शिक्षणाच्या बाबतीत अशी गोष्ट ध्यानात येते की कोणत्याही तयारीशिवाय, अध्यापनशास्त्रीय ज्ञानाशिवाय आणि शैक्षणिक मानसशास्त्रीय माहितीशिवाय त्यांना पदवी स्तरावर अध्यापक म्हणून प्रवेश मिळतो. शैक्षणिक क्षेत्रात नावीन्य नसलेली विचारप्रक्रिया चालत असलेली दिसून येते, विद्यापीठीय अध्यापकांकडून व्याख्यान पद्धतीने, चूका व शिका या अध्यापन पद्धतीने भूमिका पार पाडली जाते. आधुनिक ज्ञान, अध्ययन-अध्यापनातील नवीन संकल्पना, प्रगत कौशल्ये व त्याचा उपयोग दैनंदिन अध्यापनात करणे आवश्यक आहे.

विषय ज्ञानाच्या पुनरउजळणीमुळे विषयातील मूलभूत संकल्पना स्पष्ट होतात व त्याचा उपयोग महाविद्यालयीन पाठ्यक्रम रचनेसाठी व क्रमिक पुस्तके आणि आधार साहित्य करण्यासाठी अध्यापकांना होतो. अभ्यासक्रमाची पुनर्रचना करताना कामाचे दिवस आणि वाढीव काम याचा विचार करुन केल्यास त्यावरील भार कमी होईल.

विद्यापीठातील अध्यापक शिक्षणासाठी प्रायोगिक तत्त्वावरील एकात्मिक अभ्यासक्रमाच्या दृष्टिकोनाबाबतीत शिक्षण विभागाने प्रयत्न केले पाहिजेत. असे अभ्यासक्रम इतर संस्थेत आयोजित करु नयेत कारण शिक्षण अभ्यासक्रमातील आवश्यक घटकाच्या गुणवत्तेवर त्याचा परिणाम होतो.

पदवी स्तरावरील अध्यापकांना आवश्यक असणारे प्रशिक्षण देण्याच्या बाबतीत सध्याची शिक्षण प्रणाली अपयशी ठरली आहे. अध्यापक शिक्षणाच्या विविध घटकांमध्ये समन्वय साधणे गरजेचे आहे. त्यामुळे व्यावसायिक शिक्षणातील त्रूटी कमी करता येतील व त्याचा उपयोग सेवांतर्गत प्रशिक्षणात तसेच व्यावसायिक शिक्षणाचा विकास करण्यासाठी होईल.

व्यावसायिक शिक्षणाच्या विकासासाठी चांगल्या सहसंबंधाची व योग्य साधनांची अत्यंत आवश्यकता आहे. पदवी स्तरावरील अध्यापक शिक्षणाची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी विद्यापीठ व संस्था स्तरावर प्रशासन व व्यवस्थापनाचा नवीन दृष्टिकोन आवश्यक आहे.

त्याचबरोबर अध्यापकांचे कौशल्य वाढविण्यासाठी त्यांनी संशोधन करण्याची व सहकारात्मक कार्य करण्याची गरज आहे. त्यामुळे ज्ञान व विशाल माहिती प्राप्त होण्यास मदत होईल.

अध्यापक शिक्षण कार्यक्रमात बदल घडवून आणण्यासाठी काही कालावधीची गरज आहे. विद्यापीठ आणि महाविद्यालयीन स्तरावर राबविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमातून व शिक्षणप्रणालीतून पदवी स्तरावरील अध्यापकांची कौशल्य व क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

६.२ उच्च शिक्षणात अध्यापकांच्या निर्मितीसाठी अध्यापक शिक्षणाची गरज :

अध्ययन कृतीमध्ये विद्यार्थी आज अधिकच स्वतंत्र व स्वायत्त झालेले दिसून येतात. पदवी स्तरावरील दूर आणि मुक्त अध्ययनातील झालेल्या विस्तारामुळे वर्गातील चार भिंतीच्या आतमध्ये अधिक वेळ खर्च करण्याची गरज कमी झालेली आहे. आता प्रश्न उभा राहतो की, पदवी स्तरावरील नवीन अध्ययन परिस्थिती हाताळण्यासाठी व्यावसायिक शिक्षक प्रशिक्षकांकडून कोणत्या अपेक्षा आहेत ?

असे लक्षात येते की, पदवी स्तरावरील अध्यापक शिक्षण कार्यक्रमात फारच थोड्या अध्यापकांनी NCTE १९७८ च्या शिक्षण आराखड्याशिवाय कार्य केलेले आहे. प्रत्यक्षात महाविद्यालयातील किंवा विद्यापीठातील उच्च शिक्षणासाठी अध्यापक शिक्षणाच्या पदवीची आवश्यकता नसते. सध्या विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावर सेवापूर्व प्रशिक्षण फारच कमी प्रमाणात मिळते. असे असले तरी सत्तरच्या मध्यापर्यंत नवनवीन अभ्यासक्रम विकसन करण्याचे कार्य जवळजवळ थांबले होते पण नंतर या कार्याला महत्त्व प्राप्त झाले. अगदी सुरुवातीला मास्टर ऑफ कॉलेज टिचिंग (M.C.T.) हा अभ्यासक्रम १९७५ पूर्वी कालीकत विद्यापीठात सुरु करण्यात आला. काही वर्षानंतर हा अभ्यासक्रम बंद पडला व नंतर महाविद्यालयीन अध्यापकांसाठी १९७८ मध्ये केरळ येथे एम्. फिल हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला. मास्टर ऑफ हायर एज्युकेशन (MHED) हा कोर्स अन्नामरलाई विद्यापीठात सुरु केल्यानंतर सेवांतर्गत शिक्षणाचे ही महत्त्व कमी झाले. काही वर्षानंतर शिक्षकांच्या क्षमतांचा विकास करण्यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रदेशात इतर अध्यापक शिक्षण प्रणाली सुरु झाल्यानंतर MHED ची मागणी कमी झाली.

अशाप्रकारे उच्च स्तरावरील अध्यापक शिक्षण कार्यक्रमात सुधारणा, सर्जनशीलता, नाविन्यता घडवून आणण्यासाठी समन्वयात्मक कृतींची आवश्यकता आहे.

कृती :

१) 'पदवी स्तरावरील अध्यापक शिक्षण कार्यक्रमाची सद्यस्थितीत आवश्यकता' याबाबत चर्चेचे आयोजन करा.

२) सर्वसाधारणतः असे म्हटले जाते की, 'अध्यापक शिक्षण कार्यक्रम म्हणजे शिक्षणाची एक वेगळी पायरी आहे.' तर अशा प्रकारचे वेगळेपण तुम्ही कसे दूर कराल ?
या विषयावर आधारित पेपर वाचन सत्र आयोजित करा.

आपण पदवी स्तरावरील अध्यापक शिक्षण कार्यक्रमाचे महत्त्व व त्याच्या गुणवत्तेसंबंधी चर्चा केली. यावरुन असे लक्षात येते की गुणवत्तेशिवाय शिक्षणाचा दर्जा सुधारु शकत नाही. यासंबंधी अन्नमली, केरळ आणि इतर ठिकाणच्या विद्यापीठातून अध्यापक शिक्षण प्रशिक्षणाची सुरुवात केली व काही काळानंतर ते प्रशिक्षण बंद झाले.

एकात्मिक अभ्यासक्रम व व्यावसायिक अभ्यासक्रमाची सध्या गरज आहे. त्याचा अध्यापक शिक्षणात समन्वय साधने गरजेचे आहे. दैनंदिन जीवनात संस्कृतीची व संशोधनाची आवश्यकता शिक्षक प्रशिक्षकांना करुन दिली पाहिजे. अध्यापक शिक्षण कार्यक्रमातून नाविन्यता, सर्जनशीलता, व उत्पादनशीलता आणणे आवश्यक आहे.

विमर्षी चिकित्सेसाठी प्रश्न :

अ) अध्यापक शिक्षणात शिक्षकांचे प्रशिक्षण अध्यापक शिक्षणाच्या प्रचलित प्रणालीनुसार कसे फायदेशीर ठरते ?

ब) महाविद्यालयीन अध्यापकांकरिता पदवी स्तरावर अध्यापक शिक्षण कार्यक्रमाची आवश्यकता आहे असे तुम्हाला वाटते का ? तुमच्या या दृष्टिकोनाचे समर्थन करा.

६.३ पदवी स्तरावरील अध्यापक शिक्षण कार्यक्रमाची उद्दिष्टे :

नवीन जगाचा विचार करता विस्तारीत झालेल्या ज्ञानामुळे शिक्षकाची भूमिका अधिक विशेष व महत्त्वाची झाली आहे. येणाऱ्या अध्यापन समाजात त्याच्या व्यवसायात वाढ झाली पाहिजे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय गरजांनुसार उद्दिष्ट्ये प्रतिबिंबित होत असतील तर भारतीय समाजाच्या दृष्टिकोनातून व आंतरराष्ट्रीय स्पर्धेचा विचार करता सध्याच्या कार्यात अधिक एकात्मता आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

आपल्याला माहित आहे की, आजपर्यंत आपण अध्यापक शिक्षणाचा स्वतंत्रपणे कार्यक्रम राबवित होतो. सध्या अध्यापक शिक्षणाच्या उद्दिष्टात एकवाक्यता येणासाठी अध्यापक शिक्षणात गुणवत्ता आणण्यासाठी, दिशा देण्यासाठी, शिक्षणाच्या एका प्रणालीतून दुसऱ्या प्रणालीत जाण्यासाठी एका स्वतंत्र मंडळाकडून कार्य पाहिले जाते. पदवी स्तरावरील अध्यापक शिक्षणाची उद्दिष्टे कोणती आहेत ? शिक्षकांनी कोणत्या गोष्टींचे आत्मनिरीक्षण केल्यानंतर ही उद्दिष्टे संपादन करता येतील त्यासाठी किती कालावधी लागेल ? याचा विचार करणे गरजेचे आहे.

अध्ययन निष्पत्ती :

या घटकाचा शेवटी तुम्ही

१) पदवी स्तरावरील अध्यापक शिक्षणाची महत्त्वाची उद्दिष्टे स्पष्ट करु शकाल.

२) पदवी स्तरावरील अध्यापक शिक्षणाच्या उद्दिष्टांबद्दलची जाणीव निर्माण करु शकाल.

अध्यापक शिक्षण कार्यक्रमाची उद्दिष्टे :

★ अध्यापक शिक्षण कार्यक्रमाद्वारे अध्यापकांची अभ्यासक्रम विकसनासाठी अध्यापन व्यवहार व मूल्यमापनासाठी आवश्यक क्षमता व कौशल्य विकसित करणे.

★ अध्यापकांनी संशोधन सादरीकरण व विमर्षी विचारांचा सराव करण्यासाठी प्रेरणा देणे.

★ आधुनिक आणि योग्य अध्ययनकेंद्री अध्यापन व मापन पद्धतींचा उपयोग करण्यास समर्थ बनविणे.

★ विद्याशाखीय अध्यापन अध्ययन कौशल्य, व आंतरविद्याशाखीय वैज्ञानिक दृष्टी विकसित करण्यास अध्यापकांना प्रेरणा देणे.

★ अध्यापकांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नेटवर्क मध्ये सक्रिय सहभाग घेण्यासाठी प्रेरणा देणे.

★ अध्यापकांना विद्यार्थ्यांमध्ये अमूर्त सर्जन व चिकित्सक विचार निर्माण करण्यासाठी प्रेरणा देणे.

★ अनुदेशनाचा दर्जा उंचावण्यासाठी माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाचा उपयोग करुन व्यावसायिक प्रशिक्षणांच्या क्षमतेत वाढ करणे.

★ जीवनभर अध्ययनासाठी आणि अध्ययनार्थी व अध्यापक यांना उदयोन्मुख भूमिकांसाठी संगणक आणि त्यासंबंधीत तंत्रविज्ञान साधनांची ओळख करुन देणे.

★ शिक्षणाची आधुनिक कार्यप्रणाली क्रियाशील बनविण्यासाठी विद्यार्थ्यांना उच्च आणि स्वतंत्र अभ्यासाचे कौशल्य व ग्रंथालय, प्रयोगशाळेच्या आयोजनासंबंधी कौशल्य प्राप्त करण्यास प्रेरणा देणे.

★ अध्यापक प्रशिक्षकांना गरजांवर आधारित व विशिष्ट अध्यापन शास्त्रासंबंधी योग्य माहिती मिळविण्याची प्रेरणा देणे.

★ स्वयंरोजगारासाठी विद्यार्थ्यांना प्रवृत्त करण्यासाठी अध्यापकांमध्ये सामर्थ्य निर्माण करणे.

★ उच्च क्षमतेच्या अध्ययनातून व्यावसायिक कौशल्यांचा एका क्षेत्रातून दुसऱ्या क्षेत्रात वापर करण्यास विद्यार्थ्यांमध्ये मर्मदृष्टी विकसित करणे.

★ अध्यापकांना राष्ट्रीय समस्या, पर्यावरणाचा ऱ्हास आणि भारतीय सांस्कृतिक वैशिष्ट्यांची जाणीव करुन घेण्याची प्रेरणा देणे.

★ स्वत:विषयीचा विश्वास व आत्मविश्वास विकसित करण्यास प्रेरणा देणे.

★ समस्या निराकरण आणि संशोधनावर आधारित कृतींचे कौशल्य विकसित करणे व रुजविणे.

★ मानवी संबंध दृढ करण्यासाठी व अध्ययन प्रक्रिया परिणामकारक होण्यासाठी मनोसामाजिक कौशल्यांचा विकास करणे.

★ व्यावसायिक विषयांच्या अध्यापनात शैक्षणिक तंत्रविज्ञानाचा वापर करुन योग्य अध्ययन अनुभव देण्याचे कौशल्य विकसित करणे.

★ शैक्षणिक व व्यावसायिक विषयांचे अध्यापन करण्यासाठी बोधात्मक व कारक कौशल्यांचा विकास करणे.

कृती :

१) माध्यमिक शिक्षण आणि पदवी स्तरावरील अध्यापक शिक्षण कार्यक्रमाच्या उद्दिष्टांची तुलना करा. त्यातील साम्य व भेद विषद करा.

(सुमारे १५० शब्दांमध्ये उत्तर असावे)

२) NCTE चे संचालक होण्याची जर तुम्हाला संधी मिळाली तर तुम्ही व्यावसायिक शिक्षणाच्या उद्दिष्टांची कशी मांडणी कराल ?

(सुमारे २०० शब्दांमध्ये उत्तर असावे)

आतापर्यंत आपण पदवी स्तरावरील विविध उद्दिष्टांची चर्चा केली. त्याचबरोबर व्यावसायिक शिक्षणाचीही उद्दिष्टे विचारात घेतली. त्यामध्ये क्षमतांचा विकास, अभ्यासक्रमासंबंधीची व्यवहारिक कौशल्ये, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास, संगणकासंबंधी तंत्रविज्ञानाची ओळख, जीवनभर शिक्षणासाठी संशाधने इ. उद्दिष्टांना महत्त्व दिले. त्याचबरोबर, ग्रंथालय आणि प्रयोगशाळांचे महत्त्व तसेच गरजांवर आधारित व संस्कृती विशेषांची अध्यापन शास्त्रीय ओळख करुन घेतली.

चिकित्सक विमर्षासाठी प्रश्न :

★ उच्च शिक्षरात अध्यापन करण्यासाठी अनुभवी शिक्षक अधिक परिपक्व असतो यासंबंधी तुमचे मत लिहा. जर उत्तर होय असेल तर तुमच्या दृष्टीकोनातून पदवी स्तरावर कोणती विशेष उद्दिष्टे असावीत याबाबत समर्थन करा.

६.४ पदवी स्तरावरील अध्यापक शिक्षण कार्यक्रमाची रचना :

प्रस्तावना :

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या विकासामुळे सध्याच्या जगात अध्यापनाची रचना व नमुने उठून दिसतात. शिक्षण प्रणालीच्या विविध रचना राज्य स्तरापासून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय उद्दिष्टांवर आधारित आहेत. शिक्षण प्रणालीच्या तीन स्तरांमध्ये प्राथमिक शिक्षण, माध्यमिक आणि उच्च शिक्षणाचा समावेश होतो. शिक्षण प्रणालीच्या विविध स्तरावरील अभ्यासक्रम हा वेगवेगळा असून त्यात संपूर्ण भारतीय शिक्षणाचा समावेश केलेला आहे. त्यात दोन दृष्टीकोन दिसून येतात. एक म्हणजे शालेय शिक्षण व दुसरा व्यावसायिक शिक्षण या स्तरांवर कार्यात्मक अध्यापक शिक्षण कार्यक्रमाचा विकास घडवून आणण्याची व त्याकडे लक्ष देण्याची अत्यंत तातडीची आवश्यकता आहे.

इतर देशांशी संपर्क करण्याच्या उद्देशाने पदवी स्तरावरील शिक्षण कार्यक्रमाच्या प्रचलित विविध रचना बदलण्याची नितांत गरज आहे.

अध्ययन निष्पत्ती :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हाला खाली गोष्टी ध्यानात येतील.

१) अध्यापक शिक्षण कार्यक्रमाची रचना व माध्यमिक शिक्षणाची रचना यातील फरक.
२) अध्यापक शिक्षण कार्यक्रमातील विविध अभ्यासक्रमांना द्यावयाचे प्राधान्य.

पदवी स्तरावरील अध्यापक शिक्षण कार्यक्रमाची रचना आणि संस्था :

या संदर्भात अध्यापक शिक्षण कार्यक्रमाचा आराखड्याची NCTE ने १९७८ मध्ये शिफारस केल्यानंतर कार्यात्मक अध्यापक शिक्षण कार्यक्रम उच्च माध्यमिक व पदवी स्तरावर त्याची रचना करण्यात आली. महाविद्यालयीन +२ स्तरावर अध्यापक शिक्षण कार्यक्रमाच्या तीन रचना आराखड्यात सूचविण्यात आलेल्या होत्या.

रचना - I :

माध्यमिक अध्यापक शिक्षण कार्यक्रमात फेरफार करुन शैक्षणिक प्रवाहात उच्च पदव्युत्तर अध्यापक तयार करणे.

★ अध्यापनशास्त्रावर अधिक महत्त्व देणे.
★ फक्त एकाच विषयाला विशेष स्थान.

रचना - II :

+ २ स्तरावर व्यावसायिक प्रवाहाकरिता सूचवल्याप्रमाणे
★ रचना - I मधील सर्व घटक
★ व्यावसायिक प्रवाहांकरिता प्रशिक्षणार्थी
★ कार्यानुभव कार्यक्रम

रचना - III :

अध्यापन शास्त्रीय सैद्धांतिक भागाला महत्त्व आणि महाविद्यालयीन शिक्षकांना अध्यापन करण्यासाठी सर्वसामान्य पद्धती.

कालावधी ⟷ पदवी स्तरावरील अध्यापक शिक्षणाची रचना - एक सत्र म्हणजेच समावेशक अध्यापक शिक्षणाच्या घटकांची तार्किक व्यवस्था.

★ अध्यापन कौशल्ये
★ व्यक्तीगत आणि सामाजिक विकासासाठी उद्दिष्टांची रचना
★ अध्यापन संस्कृतीची निर्मिती करणे.

अध्यापक शिक्षण रचनेच्या पायऱ्या :

M.Ed.	ज्यांनी L.T. किंवा B.Ed. ⟷ १ वर्ष पूर्ण वेळ त्यांच्या करिता अध्यापक शिक्षण
M.Phil.	ज्यांनी उच्च स्तरावर ⟷ १८ महिन्यांचा M.Ed. शिक्षणक्रम पूर्ण केला आहे.
Ph.D.	डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी संशोधनासंबंधी दृष्टीकोन
M.A. शिक्षणशास्त्र	उच्च शिक्षणासंबंधी अभ्यासक्रम, संशोधन पद्धती (२ वर्षे) दूर आणि मुक्त अध्ययन औपचारिक प्रणाली शिक्षण विभाग / विद्यापीठ
B.Ed.	कॉनव्हेंशनल प्रणाली - १ वर्ष मुक्त आणि दूर अध्ययन - २ वर्षे

अभ्यासक्रम / विषय :

★ शैक्षणिक समाजशास्त्र / तंत्रज्ञान
★ शैक्षणिक मानसशास्त्र
★ शालेय व्यवस्थापन / शैक्षणिक मूल्यमापन
★ माहिती संप्रेषण तंत्रज्ञान



→ पर्यावरण शिक्षण
→ आंतरराष्ट्रीय शिक्षण
→ भाषा / सामाजिकशास्त्र
→ विज्ञान आणि गणित
→ अर्थशास्त्र आणि वाणिज्य

M.Ed. → सैद्धांतिक भाग → शोध निबंध
शिक्षणाची अध्यापन पद्धती
इतर शैक्षणिक क्षेत्रातील संशोधन समस्या
संशोधन प्रात्यक्षिक कार्य

६ प्रश्नपत्र :

तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, प्रगत मानसशास्त्र
अध्यापक शिक्षण व्यवस्थापन
शैक्षणिक मार्गदर्शन आणि समुपदेशन
शैक्षणिक तंत्रविज्ञान

क्षेत्र	एम.एड्.	एम्. फिल
अ) अध्यापनशास्त्रीय सैद्धांतिक भाग	१) पायाभूत अभ्यास २०%	एम.एड.साठी आवश्यक नाही परंतू इतरांसाठी आवश्यक संशोधन अभ्यास २०%
	२) संशोधन अभ्यास २०%	
	३) सैद्धांतिक अभ्यास ६०%	
	४) कार्य केंद्रीभूत अभ्यास ६०%	
	५) कोणतेही दोन क्षेत्रे (विशेष विषयातील)	

३) अध्यापक शिक्षण कार्यक्रमासंबंधी आंतरविद्याशाखीय चार वर्षाचा एकात्मिक शिक्षणक्रम :

B.Sc. (Ed.) M.A. (Ed.)
B.A. (Ed.) M.Sc. (Ed.)
M.A. (Education) २ वर्षे (मुक्त आणि दूर अध्ययन)
MATE मास्टर ऑफ अर्टस् इन टिचर एज्यूकेशन (श्रीलंका)

★ पदवी स्तरावरील अध्यापक शिक्षणाच्या अभ्यासक्रमाची रचना करण्यासाठी विश्लेषणात्मक घटक
★ अध्यापक शिक्षणासाठी अभ्यासक्रमाचा सैद्धांतिक व प्रात्यक्षिक भागाचे महत्त्व
★ अभ्यासक्रम रचनेसाठी इतर आवश्यक घटक सुचवू शकाल.

गरजेवर आधारित अभ्यासक्रम :

आपल्या देशातील अध्यापक शिक्षण अभ्यासक्रमाचा मुख्य हेतू म्हणजे विविध शालेय स्तरावर शिक्षकांची निर्मिती करणे होय. उच्च शिक्षणासाठी शिक्षकांची निर्मिती या संकल्पनेला फारशी चालना मिळालेली नाही. आदर्श अध्यापक शिक्षणाच्या अभ्यासक्रम हा अध्यापकासंबंधी आवश्यक व्यावसायिक क्षमता करावयाची भूमिका व सवयी, वृत्ती, मूल्ये इ. घटकांपेक्षा वेगळा असावा. शाळेच्या अभ्यासक्रमाबाबत सर्वसामान्य तक्रारी म्हणजे अभ्यासांचा अधिक भार. अभ्यासक्रम साधन निर्मीच्या प्रक्रियेत बऱ्याच वेळी शिक्षकांना सहभागी करुन घेतले जात नाही त्यामुळे अभ्यासक्रमाचे स्वरुप ताठर असलेले दिसून येते.

गुणवत्तापूर्ण अभ्यासक्रम :

गुणवत्तापूर्ण अभ्यासक्रमात कमीत कमी प्रयत्नात उद्दिष्ट व त्याची जाणीव याचे आकलन होते. अध्यापक शिक्षणाच्या संदर्भात गुणवत्तापूर्ण अभ्यासक्रमाद्वारे दिलेल्या वेळेत शिक्षकाची व्यावसायिक क्षमता विकसित झाली पाहिजे. गुणवत्तापूर्ण अभ्यासक्रम हा गुणवत्तापूर्ण विकास दर्शवितो. उच्च स्तरावरील प्रचलित अभ्यासक्रम हा बहुतांश अकार्यात्मक असतो. तो पुनर्रचित असावा. उच्च स्तरावरील मंडळामार्फत, NCERT, NCET अभ्यासक्रम तयार करण्यात येतो तो अधिक लोकशाहीयुक्त कसा होईल याकडे लक्ष दिले पाहिजे. हा अभ्यासक्रम तयार करण्यासाठी मानसशास्त्रज्ञ, विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती, समाजसेवक इ. ची मदत घेणे आवश्यक आहे.

- ★ अभ्यासक्रमाचा अंतिम मसुदा हा त्या विषयातील सखोल अभ्यास असणाऱ्या विषय शिक्षकाकडून घ्यावा आंतरविद्याशाखीय घटकांचा अभ्यासक्रमात आवश्यक तेथे समन्वय साधण्यात यावा.
- ★ शैक्षणिक कृतीतून महाविद्यालयात योग्य वातावरणाची निर्मिती झाली पाहिजे. अध्यापकाचे कार्य हे प्रेरणादायी ठरले पाहिजे.
- ★ अभ्यासक्रमाच्या घटकात विज्ञान व तंत्रज्ञान बरोबरच स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय परिस्थितीची ओळख विविध विषयांतून केली पाहिजे.
- ★ ग्रामीण व शहरी लोकांच्या गरजेवर आधारित अभ्यासक्रमाची रचना केली जावी.
- ★ अभ्यासक्रमाची तयारी करताना व्यवस्थापक व कारखानदारांचाही समन्वय साधणे गरजेचे आहे. तुम्ही जे अध्ययन केले त्याचा भविष्यात कसा उपयोग होईल याची ओळख अभ्यासक्रमात करुन देणे आवश्यक आहे.



अध्यापक शिक्षण : अभ्यासक्रम :

भाषा	विज्ञान	गणित
ICT (ET)	शिक्षण	क्षेत्रिय कार्य
व्यावसायिक अभ्यासक्रम	सामान्य शिक्षण	अभ्यासक्रमाचा आराखडा
शैक्षणिक व्यवस्थापन	संशोधन प्रकल्प	सहसंबंधित अभ्यासक्रम

अ) अध्यापनशास्त्रीय सैद्धांतिक भाग
ब) समाजातील कार्य
क) आशययुक्त अध्यापन



एकात्मिक कार्यक्रमाचा आशय :



अभ्यासक्रम आराखडा :

★ उच्च शिक्षणातील समस्या आणि विषय
★ संशोधन पद्धती
★ विषयाची अध्यापन पद्धती +२ स्तरावर

★ माहिती आणि संप्रेषण तंत्रविज्ञान
★ शिक्षणाचे व्यवस्थापन
★ नियोजन आणि त्यासंबंधी विषय
★ शिक्षणातील नवोपक्रम / नावीन्यता
★ शारीरिक शिक्षण
★ पर्यावरण शिक्षण, संगणक शिक्षण

प्रात्यक्षिक कार्य

- ★ प्रत्येक विषयासाठी प्रकल्प कार्य (संशोधनावर आधारित)
- ★ अनुदेशन तंत्रविज्ञानाचा उपयोग व तयारी
- ★ ग्रंथालय आणि प्रयोगशाळा कार्य

- ★ सत्र आणि प्रात्यक्षिक कार्य
- ★ क्षेत्रीय कार्य
- ★ समस्यानिराकरण दृष्टीकोन

कृती संशोधन

व्यावसायिक प्रवाह :

सैद्धांतिक	प्रात्यक्षिक घटक
★ व्यवस्थापन ★ प्रकल्पांची निर्मिती ★ संगणक शिक्षण ★ विपणन आणि जाहिराती ★ उद्योजक / संघटनात्मक वर्तन	★ संगणकाबरोबर कार्य ★ व्यावसायिक शिक्षणासंबंधी प्रकल्प ★ प्रकल्पाची आखणी व अंमलबजावणी

कामाचे संघटन प्रशिक्षण कार्यशाळा / सराव

पदवी स्तरावरील संशोधनावर आधारित अभ्यासक्रम :

संशोधनाच्या आधारे उच्च स्तरावरील अध्ययनार्थ्यांच्या गरजा विचारात घेऊन अभ्यासक्रमाची रचना केली पाहिजे. संशोधनातील अत्यावश्यक घटक दोन पातळीवर आयोजित केले पाहिजे.



कृती संशोधन :

कृती संशोधनाचा अनेक बाजूंनी विचार करण्यात येतो. शिक्षकांना येणाऱ्या समस्येचे प्रात्यक्षिक उत्तर याद्वारे शोधायचे असते. विशेष शिक्षण, सामान्य / समावेशक शिक्षणातही असे संशोधन करता येते.

व्यक्ती अभ्यास :

★ अध्यापक शिक्षण कार्यक्रमात खोलवर पाहिल्यास अनेक समस्या दिसून येतात.
★ अध्यापन अध्ययन प्रक्रिया परिणामकारक होण्यासाठी विविध दृष्टिकोनांच्या परिणामकारकतेचा अभ्यास केला जातो.

प्रायोगिक :

वर्णनात्मक संशोधन पद्धती :

ICT आधारभूत अभ्यासक्रमाचे आयोजन व भूमिका :

पदवी स्तरावरील अभ्यासक्रमातील माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञाची एकात्मता ही एक विशाल कल्पना आहे. इ-शिक्षणाच्या युगात इ-बिझनेस व इ-प्रशासन हे सायबरनेटीक समाजाचे घटक आहेत. अभ्यासक्रमातील ICT चे ज्ञान ठळकपणे मांडायला हवे.



टेलिव्हिजन टेलिकॉन्फ्रसिंग, रेडिओ कौंन्सलिंग व्हिडिओ कौंन्सलिंग संगणक साहाय्यित अनुदेशन, हार्डवेअर व सॉफ्टवेअरचा उपयोग इ. गोष्टी संगणक. तंत्रविज्ञानामध्ये आवश्यक आहेत. सध्याच्या शिक्षण प्रणालीत पॉवर पॉईंटचा उपयोग हे सर्वसामान्यातील झालेला मोठा बदल होय.

कृती :

१) पदवी स्तरावरील अध्यापक शिक्षणाच्या प्रचलित अभ्यासक्रमाची माध्यमिक शिक्षणाशी असलेले साम्य व फरक यांची तुलना करा.

(सुमारे १५० शब्दात)

२) अभ्यासक्रमातील अनेक अध्यापन पद्धती तुम्हाला तुमच्या सहकार्यापेक्षा अधिक सर्जनशील कशा वाटतात याची थोडक्यात यादी तयार करा.

(सुमारे २०० शब्दात)

पदवी स्तरावरील अभ्यासक्रम आराखड्यात आपण अभ्यासक्रमाचे विविध आराखडे, अभ्यासले. अभ्यासक्रम हा सर्वसामान्याच्या हितापासून ते जागतिक पातळीपर्यंत गरजांनुरुप असावा. अध्यापन शिक्षण अभ्यासक्रमात, अध्यापनशास्त्रीय सैद्धांतिक भागाचा व तंत्रज्ञानाचा तसेच संशोधनावर आधारित, आशययुक्त अध्यापन पद्धतींचा समावेश असावा. कोणत्याही अभ्यासक्रमात सैद्धांतिक भाग व प्रात्यक्षिक भाग हे दोन घटक समाविष्ट असावेत.

चिकित्सक विमर्षासाठी प्रश्न :

१) आपल्या देशातील पदवी शिक्षणाच्या संदर्भात लपलेल्या अभ्यासक्रमाची व्याख्या कशी कराल ?

२) पदवी स्तरावरील पाठ्यक्रमातील सुधारणेकरिता महाविद्यालयीन अभ्यासक्रमाचे महत्त्वाचे उपयोग कोणते ?

३) 'महाविद्यालयीन स्तरावरील अभ्यासक्रमाच्या रचनेसाठी अध्यापकांना सहभागी करुन घेणे आवश्यक आहे.' या विधानाचे समर्थन करा.

६.६ पदवी स्तरावरील शिक्षकांची भूमिका व आवश्यक क्षमता :

गुणवत्ता व व्यावसायिक विकासाच्या चांगल्या कार्याबद्दल जेव्हा आपण बोलत असतो. तेव्हा व्यवसायाच्या विविध गुंतागुंतीच्या बाबी व त्याचे आकलन करीत असतो. व्यावसायिक विकासामुळे, कार्याचे समाधान होते. तसेच उच्च स्तरावरील स्वनिश्चितेसाठी मदत होते. अध्यापक आणि पदवी स्तरावरील अध्यापन हे कला आणि विज्ञानाच्या अध्यापनासाठी अधिक जोखमीचे आहे. प्रत्येक अध्यापकाने स्वतःची व्यावसायिक कार्यक्षमता व अद्ययावत ज्ञान ठेवणे आवश्यक आहे. तसेच व्यावसायिक गरज पूर्ण करण्यासाठी सेवांतर्गत शिक्षणाची आवश्यकता आहे.

शिक्षक विविध पर्यायांचा वापर करुन ज्ञान व व्यावसायिक कौशल्य अद्ययावत ठेऊ शकतो. त्यापैकी

★ विद्यापीठाने पुरविलेल्या संशोधनासंबंधीच्या योजना
★ संस्थात्मक आंतरक्रिया आणि नावाजलेल्या संस्थेतील कार्यात सहभाग
★ इंटरनेटद्वारे अद्ययावत माहिती व विकास
★ व्यावसायिक संघटनांशी असलेले सभासदत्त्व
★ राज्य स्तरावरील औपचारिक, सेवांतर्गत शैक्षणिक कार्यक्रमातील सहभाग. इ. चा समावेश होतो.

अध्ययन निष्पत्ती :

या घटकाचे तुम्ही अध्ययन केल्यानंतर तुम्हाला पुढील गोष्टी ध्यानात येतील.

★ आपल्या देशातील अध्यापक प्रशिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठीच्या प्रचलित कार्यक्रमाचे चिकित्सक विश्लेषण.
★ क्षमताधिष्ठित व स्पर्धात्मक अध्यापक प्रशिक्षक होण्यासाठी विविध कौशल्यांची आवश्यकता
★ सेवांतर्गत शिक्षण कार्यक्रमातील व्यावसायिक संघटनांची अत्यावश्यक वैशिष्ट्यांचे स्पष्टीकरण.

अध्यापक शिक्षणाची क्षमता व भूमिका :



गुणवत्तेचा-क्षमतेचा विकास कसा कराल :

पदवी स्तरावरील अध्यापकाने समुपदेशक, मार्गदर्शक व मानवतावादी दृष्टिकोन ठेवून अभ्यास सवयींमध्ये स्वतःला गुंतवून ठेवावे.

स्वयंअभ्यास आणि स्वयंसुधारणा :

व्यावसायिक वाढ संपादन करण्यासाठी हे एक सर्वात परिणामकारक साधन आहे. प्रत्येकाला आपल्या आवडीनुसा वाचन व अध्ययन करण्याचे स्वातंत्र्य आहे. त्यामुळे व्यावसायिक गरजेनुसार आपल्या आवडीच्या क्षेत्रातील अद्ययावत विकास व प्रकाशने याची माहिती होते. अध्ययन म्हणजे माहितीचा साठा असून ती माहिती UNESCO च्या शैक्षणिक प्रकाशनातून प्राप्त करता येते. काही विशिष्ट दर्जाची प्रकाशने आहेत. त्यापैकी, रिसर्च जर्नल, मॅनेजमेंट ऑफ एज्युकेशन टिचिंग मेथॉडॉलोजिज, इ. चे नेहमी वाचन केले पाहिजे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अद्यायावत बदलांची माहिती ध्यानात ठेवली पाहिजे. अशाप्रकारे स्वयंअध्ययनातून स्वतःचा विकास होतो, ज्ञान अद्ययावत राहते. इतरांपेक्षा व्यावसायिक कौशल्यात वाढ होते व स्वयं अभ्यासाची सवय लागते.

सेवांतर्गत शिक्षण आणि प्रशिक्षण :

या क्षेत्रात शिक्षक सेवंतर्गत शिक्षण प्रशिक्षण घेण्याची पराकाष्ठा करीत असतात. यामध्ये नेहमीच्या सवयीने, किंवा सेवांतर्गत शिक्षण कार्यक्रमातील शिक्षण घेण्यासाठी यांत्रिकतेने सहभाग घेतला जातो. उलटपक्षी सेवांतर्गत प्रशिक्षण ही एक मोठी गुंतवणूक आहे की, जी आपण वेगवेगळ्या रुपाने ती परत देत असतो.

प्रशिक्षण गरजेचे मापन :

सेवांतर्गत कार्यक्रमाची परिणामकारकता ही प्रशिक्षण आशयाची योग्यता, प्रशिक्षणार्थींची गुणवत्ता, आवश्यक सहकार्याची उपलब्धता व उपयुक्तता, निवडलेल्या अभ्यास घटकानुसार साधने, इ. घटकावर अवलंबून असते. निवडलेला गट व प्रशिक्षणासाठीची उद्दिष्टे ही आशयशी संबंधित असावी. जर आशय योग्य असला तर त्याचा उपयोग अध्यापक शिक्षणातील कठीण समस्या व अध्यापन सराव करण्यासाठी झाला पाहिजे. आशय आवडीचा असला पाहिजे व त्यानुसार कृती संशोधनाच्या आधारे किंवा वर्णनात्मक वैज्ञानिक संशोधनाच्या आधारे क्षेत्र विकसित केले पाहिजे. प्रशिक्षणाचे मापन खाली माहितीसाठी केले जाते.

तज्ज्ञांकडून तज्ज्ञांचे मत / सेवांतर्गत कार्यक्रमात संशोधनाचे आयोजन करण्यासाठी, शिक्षकांच्या सादरीकरणाची मोठ्या प्रमाणात चर्चा होऊन त्यांच्या क्षेत्रातील विषयांची ओळख होते.

प्रशिक्षण अभ्यासक्रमाची तयारी :

सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अभ्यासक्रमाची तयारी करीत असताना अभ्यास विषयातील आशय आणि त्याच्या अध्यापनशास्त्रीय तत्त्वानुसार योग्य प्रात्यक्षिक कार्याचा

समावेश करणे आवश्यक आहे. प्रत्येक महत्त्वाचत्या घटकांना दूरशिक्षण, आयटी, कोणती उद्दिष्टे संपादन करायची, पद्धती, अनुदेशनात्मक नमुने इ. ची जोड दिली पाहिजे. त्यामुळे स्वयंअभ्यास सवयीचा विकास होऊ शकेल.

प्रशिक्षणाचे आयोजन :

साधन व्यक्तीने उद्दिष्टे, आशय व प्रशिक्षणाच्या पद्धतीची ओळख करुन दिली पाहिजे. जे अभ्यास साहित्य वाटण्यात येते त्याचा उपयोग स्वतःसाठी व संदर्भ म्हणून झाला पाहिजे. भौतिक सुविधा योग्य पद्धतीने केलेल्या असाव्यात.

प्रशिक्षणाचे मूल्यांकन :

प्रशिक्षणाच्या गुणात्मक मूल्यांकनाकरिता अनेक वेगवेगळी तंत्रे उपयोगात आणली जातात. त्यापैकी, तज्ज्ञांकडून मूल्यमापन अभ्यासक्रमाची गुणवत्ता, वेगवेगळ्या सत्रातील होणारी आंतरक्रिया याद्वारे मूल्यांकन केले जाते. याचा उपयोग नवीन कार्यक्रमाचा आराखडा तयार करण्यासाठी केला जातो.

अभ्यास भेट :

शिक्षकांच्या मानसिकतेचे क्षेत्र विशाल करण्यासाठी संस्थांना भेटी दिल्या जातात. त्यापैकी NIEP / NCERT / RTE या संस्थामधील प्रगत अभ्यासक्रमाची माहिती शिक्षकांना मिळू शकते. तज्ज्ञांबरोबरच्या चर्चेतून शिक्षक प्रशिक्षकांच्या नवीन कल्पना विकसित होण्यास मदत होते.

स्टडीसर्कल आणि बुक क्लब :

शिक्षक प्रशिक्षकांची व्यावसायिक क्षमता अद्ययावत ठेवण्यासाठी स्टडीसर्कल व बुक क्लबचे सभासद होणे आवश्यक आहे. नवीन विकास, संशोधने, चर्चेचे विषय, आणि अध्यापक शिक्षणातील समस्या याद्वारे आकलन होण्यास मदत होते.

चर्चासत्र सादरीकरण :

शिक्षक प्रशिक्षक संस्थेने चर्चासत्र सादरीकरणासाठी प्रोत्साहन व प्रेरणा दिली पाहिजे. सहविचाराच्या संस्थांना सहभागासाठी पाचारण करण्यात येते. जर शिक्षक प्रशिक्षकाने आयोजित केलेले संशोधनं यावर आधारित चर्चासत्राचा विषय असेल तर प्रत्येक शिक्षक प्रशिक्षकाला सहभागी होण्याची व सादरीकरणाची संधी प्राप्त होते.

परिषदा / चर्चासत्रे :

शिक्षक प्रशिक्षकाने स्वतःच्या क्षमता वृद्धिंगत करण्यासाठी परिषदा व चर्चासत्रांमध्ये सहभाग व पेपर सादरीकरण केले पाहिजे. शिक्षणातील व इतर शिखर मंडळाकडून परिषदा व चर्चासत्रे आयोजित केली जातात. अध्यापक प्रशिक्षक संस्थांकडून व इतर संस्थांच्या मदतीने परिषदा व चर्चासत्रे आयोजित केली गेली पाहिजेत. त्यामुळे नवीन कल्पनांची देवाणघेवाण होते.

NCTE (1998) ने सूचविल्याप्रमाणे शिक्षकाच्या क्षमता विकसित झाल्या पाहिजेत.

- पाठ्यांशासंबंधीत आशय
- अध्यापन अध्ययन साधने
- संकल्पनात्मक शैक्षणिक कृती
- व्यवस्थापन, मूल्यमापन, पालकांबरोबर कार्य
- समाजातील कार्य

जेव्हा शिक्षक इतरांशी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करतात तेव्हा शिक्षकांमध्ये व्यक्तीगत व्यावसायिक विकसित करण्यासाठी क्षमता व आत्मविश्वास निर्माण होणे गरजेचे आहे.

★ स्व-विचार, विद्यार्थ्यांविषयी व्यापक दृष्टिकोन आणि विषयाच्या ज्ञानावर अधिक भर
★ गटचर्चेवर भर, एखाद्या व्याख्यानावर सहयोगी चर्चा.
★ विश्लेषणाद्वारे गुणवत्तेत वाढ

स्वॉट (SWOT), आंतरक्रिया, माहिती प्रणाली, गुणात्मक हस्त पुस्तिका.

संशोधन हे एक महत्त्वाचे व आवश्यक असे क्षेत्र आहे. त्याद्वारे शिक्षक-प्रक्षिक कृती संशोधन, समस्या निराकरण इतर संबंधित प्रकल्प कार्य करु शकतो.

कृती :

१) 'प्रशिक्षणाच्या प्राथमिक मूल्यांकनासाठी शिक्षक प्रशिक्षकांने सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमावर भर द्यावा' या विधानाचे तुम्ही कसे समर्थन कराल ?

(सुमारे १५० शब्दांत उत्तर लिहा)

२) 'उजळणी वर्गास (Refresher Course), हजर राहिल्यानंतरचा तुमचा दृष्टिकोन व तुमचे मत.' या विषयी माहिती लिहा.

विद्याशाखीय सहकाऱ्यांना उजळणी वर्गास हजर राहण्यासाठी तुम्ही कशी शिफारस कराल, तुम्ही त्यांचे मत कसे वळवू शकाल ?

६.७ सारांश :

या घटकामध्ये आपण शिक्षक प्रशिक्षकाच्या व्यावसायिक विकासाविषयी चर्चा केली. सैद्धांतिक व प्रात्यक्षिक ज्ञान वाढविण्यासाठी याचा निश्चितच उपयोग होईल. शिक्षक प्रशिक्षकाने स्वतःच्या क्षमता व स्पर्धात्मक कौशल्य विकसित करण्यासाठी, आशय ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी, अध्यापनशास्त्रीय विविध दृष्टिकोन समजून घेण्यासाठी, पदवी स्तरावरील

अध्यापक प्रशिक्षकाने स्वतःची भूमिका धनात्मक व रचनात्मक कौशल्यांशी निगडीत अशी ठेवली पाहिजे, स्वतःच्या व्यवसायाशी बांधिलकी, सखोल अध्ययन करण्याची सवय, सेवांतर्गत प्रशिक्षणास हजर राहून तसेच कार्यशाळा व चर्चासत्रात स्वतःची कौशल्ये व कृतीचे सादरीकरण करण्याची सवय लावून घेतली पाहिजे.

चिकित्सक विमर्षनासाठी प्रश्न :

१) पदवी स्तरावर ICT संबंधी अध्यापन करण्यासाठी तुम्ही कोणकोणत्या गोष्टी ध्यानात घ्याल ?

२) संशोधन कृतीच्या वेगवेगळ्या पद्धती वापरुन संशोधन करण्यासाठी तुम्ही विद्यार्थ्यांमध्ये आवड व प्रेरणा कशी निर्माण कराल ?

❖❖❖❖

७अ

शिक्षक प्रशिक्षणातील महत्वाचे मुद्दे व समस्या

घटक रचना :

७.अ.० उद्दिष्ट्ये

७.अ.१ प्रस्तावना

७.अ.२ शिक्षक प्रशिक्षणातील मुद्दे

७.अ.३ शिक्षक प्रशिक्षणातील समस्या

७.अ.४ शिक्षक प्रशिक्षणाची स्थिती सुधारण्यासाठीचे प्रस्ताव (सूचना)

७.अ.५ शिक्षक प्रशिक्षणातील दर्जा राखणे

- ७.अ.५.१ शिक्षक प्रशिक्षणार्थीसाठीची प्रवेश धोरणे व कार्यपद्धती
- ७.अ.५.२ शिक्षक प्रशिक्षकाची निवड

७.अ.६ शिक्षक प्रशिक्षकाच्या नोकरीसाठीच्या अटी

- ७.अ.६.१ नोकरीसंबंधीच्या अटी, नियम, कालावधी

७.अ.७ शिक्षक प्रशिक्षणाचे गुणवत्ता व्यवस्थापन

- ७.अ.७.१ गुणवत्तेची संकल्पना
- ७.अ.७.२ गुणवत्तेची वैशिष्ट्ये
- ७.अ.७.३ गुणवत्तेचे सिद्धांत (तत्त्वे)
- ७.अ.७.४ शिक्षणातील गुणवत्ता
- ७.अ.७.५ शिक्षक प्रशिक्षणातील गुणवत्ता व्यवस्थापन

७.अ.८ सारांश

७.अ.० उद्दिष्ट्ये :

हा घटक वाचल्यानंतर, तुम्ही

- शिक्षक प्रशिक्षणातील मुद्दे व समस्या जाणू शकाल.
- शिक्षक प्रशिक्षणातील कार्यपद्धतीबद्दल व प्रवेश धोरणाबद्दल सांगू शकाल.
- शिक्षक प्रशिक्षकाच्या सेवा प्रवेशाबद्दल समजावू शकाल.
- शिक्षक प्रशिक्षकाच्या सेवा अटीं लक्षात येऊ शकतील.

- नोकरीचा कालावधी व अटी स्पष्ट करु शकाल.
- गुणवत्तेची व्याख्या सांगू शकाल.
- शिक्षक प्रशिक्षणाच्या गुणवत्ता व्यवस्थापनाबद्दल चर्चा करु शकाल.

७.अ.१ प्रस्तावना :

शिक्षक प्रशिक्षण प्रणालीत अडथळा निर्माण करणाऱ्या अनेक समस्या व मुद्दे आहेत. शिक्षकाची निर्मिती ही सरकारपासून, मंत्री, नियामक मंडळ, शाळा व शिक्षक स्वतः या सर्व पातळ्यांवर चर्चेचा विषय आहे.

७.अ.२ शिक्षक प्रशिक्षणातील मुद्दे :

शिक्षक प्रशिक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे :

- शिक्षक प्रशिक्षक महाविद्यालयांचा विस्तार
- शिक्षक प्रशिक्षक महाविद्यालयाचे विलगीकरण
- प्रादेशिक असमतोल
- शिक्षक प्रशिक्षणातील वैकल्पिक पद्धती
- शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाची कालमर्यादा
- परिक्षा प्रणाली

आता पुढे शिक्षक प्रशिक्षणाच्या गुणवत्तेशी निगडीत मुद्दे आले आहेत.

- अभ्यासक्रम
- वैयक्तीक व सामाजिक कौशल्य
- क्षमता
- विषयाचे ज्ञान
- ICT कौशल्य
- संदर्भीय / अन्वयार्थ संवेदनशीलता
- विश्व जगताकरिता नवीन अध्यापनशास्त्र

७.अ.३ शिक्षक प्रशिक्षणातील समस्या :

१) अनेकविध शिक्षक प्रशिक्षण संस्थामधील एकवाक्यतेचा अभाव

२) शिक्षक प्रशिक्षक महाविद्यालयीन साधनांचा निकृष्ट दर्जा

३) शैक्षणिक महाविद्यालयाची दुर्बल अर्थिक स्थिती

४) अकार्यक्षम शिक्षक प्रशिक्षक, ज्याची निष्पत्ती ही अभ्यासकांच्या तुटवड्यात होते.

५) मानवी व भौतिक या दोन्ही साधन विस्ताराबाबत व्यवस्थापन मंडळाची नकारात्मक प्रवृत्ती

६) उत्कृष्ट संस्थांना एकसारखे वागवण्याचे सरकारचे समरुप शैक्षणिक धोरण

७) प्रवेश देण्यासाठी अनुचित उमेदवारांची (शिक्षक प्रशिक्षणार्थीची) निवड

८) शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमातील अध्यापनाचे पारंपारिक अभ्यासक्रम व अध्यापन पद्धती

९) शिक्षक कार्यक्रमाचा अपुरा कालावधी

१०) शिक्षक प्रशिक्षणाची आकस्मित व अनुचित रचना

११) अनियोजित आणि अपुऱ्या अशा सहशालेय कृती

१२) व्यक्तीनिष्ठ मूल्यामापन नमुना

१३) अपुरे व अयोग्य पद्धतीने चालवलेले सराव अध्यापन

१४) प्रत्याभरण तंत्राचा अभाव

१५) शिक्षक प्रशिक्षणाची उदिष्ट्ये न समजणे

१६) माध्यमिक शिक्षक प्रशिक्षणाचा उच्च शिक्षणाशी संबंध नसणे

१७) व्यवसायाप्रती निष्ठेचा अभाव

१८) व्यवसाय विषयक अवबाधांचा अभाव

७.अ.४ शिक्षक प्रशिक्षणाची स्थिती सुधारण्याबाबत सूचना :

शिक्षक प्रशिक्षणाची स्थिती सुधारण्याबाबत काही सूचना पुढीलप्रमाणे :

१) उच्च शिक्षण व तांत्रिक शिक्षणाप्रमाणेच शिक्षक प्रशिक्षण हे केंद्र सरकारची जबाबदारी असावी.

२) अभ्यासक्रम कालावधी आणि कार्यक्रमांच्या वेळा यांच्या बाबतीत खात्रीलायक एकवाक्यता ही सर्व शिक्षक – प्रशिक्षण संस्थामध्ये असणे जरुरीचे आहे.

३) चालू कलांनुसार (trends) गती राखण्यासाठी अभ्यासक्रमाचा सातत्याने विस्तार व्हावा.

४) सरकारने संस्थेच्या आर्थिक गरजांकडे लक्ष ठेवावे.

५) शिक्षक प्रशिक्षक हे उच्चविद्याविभूषित व अनुभवी असावेत. त्यांचे भाषेवर प्रभुत्व असावे.

६) ICT च्या वापरामध्ये शिक्षक प्रशिक्षकांना प्रशिक्षित करावे.

७) शिक्षक प्रशिक्षणाच्या खाजगीकरणावर नियंत्रण ठेवले पाहिजे.

८) कमी दर्जाच्या संस्था ह्या सुधारल्या अथवा बंद केल्या पाहिजेत.

९) सदस्यत्वाबाबतच्या अटी कडक केल्या पाहिजेत.

१०) NCTE कडून नियमित व कठोर तपासणी ही नियमित तत्वावर झाली पाहिजे.

११) निवड प्रक्रियेत सुधारणा व्हायलाच पाहिजे आणि गुण व सामाईक निवड चाचणी (CET) मुलाखती, गटचर्चा यांचा समावेश केला गेला पाहिजे.

१२) शिक्षक प्रशिक्षणाचा कालावधी दोन वर्षांपर्यंत वाढवला पाहिजे.

१३) सराव शिक्षणावर प्रभुत्व मिळेपर्यंत तसेच उचित प्रत्याभरण मिळेपर्यंत भर दिला गेला पाहिजे.

१४) छात्रसेवकाला पुरेसा कालावधी (सहा महिने) दिला गेला पाहिजे आणि शाळेच्या पूर्ण कामकाजाची माहिती ही विद्यार्थी शिक्षकांना दिली गेली पाहिजे.

१५) शिक्षक प्रशिक्षणातील मूल्यमापन हे वस्तुनिष्ठ, विश्वसनिय तसेच स्विकारण्याजोगे असावे.

१६) शिक्षक विद्यार्थी यांचे गुणोत्तर आदर्शानुसार १:८ एवढे असावे.

१७) अभ्यासक्रमात विविध प्रकारच्या सहशालेय कार्यक्रमात (अभ्यासानुवर्ती)चा समावेश असावा.

१८) चालू परंपरेस धरुन शिक्षक - प्रशिक्षकांचा व्यावसायिक विकास व्हावा.

१९) शिक्षक प्रशिक्षकांसाठी उजाळा वर्गाचे (Refreshner Course) वारंवार आयोजन करायला पाहिजे.

२०) शिक्षक प्रशिक्षणातील संशोधनास प्रेरणा दिली पाहिजे.

२१) शैक्षणिक दिवसांचा आकडा २३० दिवस प्रतीवर्षी एवढा वाढवावा.

७.अ.५ शिक्षक प्रशिक्षणातील दर्जा राखणे :

विद्यार्थी शिक्षक व शिक्षक प्रशिक्षक हे शिक्षक प्रशिक्षणातील दोन महत्वाचे खेळाडू आहेत. यशस्वी शिक्षक, (जे देशभरातील लाखो लोकांच्या शिक्षणाकरता जबाबदार आहेत) ते तयार करण्यासाठी दोघांजी निवड फार महत्वाची आहे. त्यांना म्हणून ह्या मुद्यांना तपशिलात समोरे जाण्याची आवश्यकता आहे.

७.अ.५.१ विद्यार्थी – शिक्षकांसाठीची प्रवेश धोरणे व कार्यपद्धती :

स्नातक पातळीवर ५०% आवश्यक गुण आणि प्रवेश परिक्षा (CET)

उमेदवाराने स्नातक (पदवी) पातळीवर कमीत कमी २ शालेय विषयांचे अध्ययन केलेले असावे. भावी शिक्षक त्याच्या Specialization च्या विषयाचे फक्त ५०% ज्ञान असणे ही फारच दुदैवाची गोष्ट आहे. संकल्पना जी कदाचित उमेदवाराने स्वतः अभ्यासली नसेल अथवा त्यांना स्वतःला समजली नसेल ती दुसऱ्याला शिकवणे कस शक्य आहे, अशा शिक्षकांचे आशय ज्ञान हे कमकुवत राहिल. जर B.Ed. Course चा कालावधी वाढवला तरच B.Ed. पातळीवर विषय प्रभुत्वाची भर घालणे हे योग्य ठरेल. उच्च माध्यमिक शिक्षणानंतर चार वर्षांचा एकत्रित / एकात्मीत B.A. B.Ed. / B.Sc. B.Ed. / B.Com B.Ed करणे हाच हे करण्याचा योग्य मार्ग आहे.

सामाईक प्रवेशपरिक्षा (CET) ही खरतर उमेदवाराची शिक्षणाप्रती अभिरुची तसेच शिकवण्याची अभिवृत्ती तपासत नाही. मुलाखत, गटचर्चा, निबंधलेखन हे उमेदवारांची तयारी तसेच त्याचे अभिवृत्ती व संप्रेषण कोशल्य समजायला मदत करतात.

७.अ.५.२ शिक्षक प्रशिक्षकाचा सेवाप्रवेश (नेमणुका) :

NCTE च्या नियमांमध्ये सांगितल्याप्रमाणे शिक्षकाच्या हुद्द्यासाठीची पात्रता खालीलप्रमाणे :

१) प्राचार्य / प्रमुख (बहुविधशाखा असलेल्या संस्थेत)

अ) शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता ही प्राध्यापकाच्या पदासाठी निर्धारित केल्याप्रमाणे.

ब) आणि शिक्षण क्षेत्रात पी. एच्. डी,

क) दहा वर्षाचा अध्यापन अनुभव त्यापैकी कमीत कमी ५ वर्षाचा अध्यापन अनुभव हा माध्यमिक शिक्षक अध्यापकीय संस्थेतील असावा.

ड) अकॅडमीक परफॉरमन्स इंडिकेटर (API) मध्ये संकेतित केल्याप्रमाणे किमान गुण जे यु.जी.सी.ने विकसित केलेल्या परफॉरमन्स बेस्ड अप्रायझल सिस्टिमवर आधारित असेल व ती अनिवार्य आवश्यकता असेल.

२) सहाय्यक प्राध्यापक

अ) पायाभूत पाठ्यक्रम

i) ५०% गुणांसोबत विज्ञान / Humanities / कलाशाखेची अभिस्नातक पदवी

ii) ५५% गुण अथवा समतुल्य ग्रेडसोबत एम्. एड्.

iii) अजुन कुठलीही दुसरी अट जी युजीसी ने निर्धारित केलेल्या सर्वसाधारण नियमांत समाविष्टित नेट / स्लेट / सेट मध्ये उत्तीर्ण होण्याव्यतिरिक्त या व्यवस्थेत अनिवार्य असावी.

iv) अकॅडमीक परफॉमन्स इंडिकेटर (API) मध्ये संकेतित केल्याप्रमाणे किमान गुण जे यु.जी.सी.ने विकसित केलेल्या परफॉरमन्स बेस्ड अप्रायझल सिस्टिमवर आधारित असेल व ती अनिवार्य आवश्यकता असेल.

किंवा

i) ५५% गुण अथवा समतुल्य ग्रेडसोबत शिक्षण शास्त्रात एम्. ए.

ii) कमीत कमी ५५% गुणांसह बी. एड्.

iii) नेट / स्लेट / सेट मध्ये उत्तीर्ण होण्यासहीत दुसऱ्या अटी ज्या यु.जी.सी.ने सामान्य नियमांत निर्धारित केल्या आहेत त्या या निर्धारित नियमांत अनिवार्य केल्या जातील.

iv) अकॅडमीक परफॉरमन्स इंडिकेटर (API) मध्ये संकेतित केल्याप्रमाणे किमान गुण जे यु.जी.सी.ने विकसित केलेल्या परफॉरमन्स बेस्ड अप्रायझल सिस्टिमवर आधारित असेल व ती अनिवार्य आवश्यकता असेल.

ब) अध्यापन पद्धतीशास्त्र पाठ्यक्रम

i) मुख्य विषयात ५०% गुणांसोबत अधिस्नातक पदवी

ii) ५५% गुण अथवा समतुल्य ग्रेडसोबत एम्. एड्. पदवी

iii) नेट / स्लेट / सेट मध्ये उत्तीर्ण होण्यासहीत दुसऱ्या अटी ज्या यु.जी.सी.ने सामान्य नियमांत निर्धारित केल्या आहेत त्या या निर्धारित नियमात अनिवार्य केल्या जातील.

iv) अकॅडमीक परफॉरमन्स इंडिकेटर (API) मध्ये संकेतित केल्याप्रमाणे किमान गुण जे यु.जी.सी.ने विकसित केलेल्या परफॉरमन्स बेस्ड अप्रायझल सिस्टिमवर आधारित असेल व ती अनिवार्य आवश्यकता असेल.

एम्. एड्. स्तरावर ५५% गुण मिळवल्यावर आणि अधिस्नातक स्तरावर ५०% गुण मिळवून अथवा बी. एड्. आणि शिक्षण क्षेत्रातील एम्. ए. मध्ये ५५% गुण मिळवून आणि नेट / सेट परिक्षा उत्तीर्ण झाल्यावर शिक्षक प्रशिक्षक शिक्षणशास्त्र महाविद्यालयात अर्ज करण्यास पात्र होतो. ह्यानंतर एक मुलाखत होते. मुलाखतीतील यश हे नियुक्तीसाठीचा पाया तयार करते. काही संस्था नेट / सेट पात्रता नसलेल्या शिक्षक प्रशिक्षकांची नियुक्ती करतात, त्यायोगे कमी पगार देतात.

एम्. एड् पाठ्यक्रमाची पात्रता :

अ) प्राध्यापक / मुख्य

i) कला / Humanities / विज्ञान / वाणिज्य आणि एम्. एड्. मध्ये प्रत्येकी कमीत कमी ५५% गुण मिळवून अधिस्नातक पदवी किंवा प्रत्येकी ५५% गुणांसकट एम्. ए. (शिक्षण) व बी. एड्.

ii) शिक्षण क्षेत्रात पी. एच्. डी. आणि

iii) विद्यापीठाच्या शिक्षण विभागात किंवा शिक्षण महाविद्यालयात कमीत कमी १० वर्षांचा अध्यापन अनुभव ज्यातील कमीत कमी ५ वर्षांचा अनुभव हा एम्. एड स्तरावरील त्यांच्या विशेष प्राविण्याच्या विषयात प्रकाशित कामासह असावा.

iv) अकॅडमीक परफॉरमन्स इंडिकेटर (API) मध्ये संकेतित केल्याप्रमाणे किमान गुण जे यु.जी.सी.ने विकसित केलेल्या परफॉरमन्स बेस्ड अप्रायझल सिस्टिमवर आधारित असेल व ती अनिवार्य आवश्यकता असेल.

ब) सहयोगी प्राध्यापक

i) कला / Humanities / विज्ञान / वाणिज्य आणि एम्. एड्. मध्ये प्रत्येकी कमीत कमी ५५% गुण मिळवून अधिस्नातक पदवी किंवा प्रत्येकी ५५% गुणांसकट एम्. ए. (शिक्षण) व बी. एड्.

ii) शिक्षण क्षेत्रात पी. एच्. डी. आणि

iii) विद्यापीठाच्या शिक्षण विभागात किंवा शिक्षण महाविद्यालयात कमीत कमी ५ वर्षांचा अध्यापन अनुभव ज्यातील कमीत कमी ३ वर्षांचा अनुभव हा एम्. एड स्तरावरील त्यांच्या विशेष प्राविण्याच्या विषयात प्रकाशित कामासह असावा.

iv) अकॅडमीक परफॉरमन्स इंडिकेटर (API) मध्ये संकेतित केल्याप्रमाणे किमान गुण जे यु.जी.सी.ने विकसित केलेल्या परफॉरमन्स बेस्ड अप्रायझल सिस्टिमवर आधारित असेल व ती अनिवार्य आवश्यकता असेल.

क) सहाय्यक प्राध्यापक

i) कला / Humanities / विज्ञान / वाणिज्य आणि एम्. एड्. मध्ये प्रत्येकी कमीत कमी ५५% गुण मिळवून अधिस्नातक पदवी किंवा प्रत्येकी ५५% गुणांसह एम्. ए. (शिक्षण) व बी. एड्.

ii) नेट, / स्लेट / सेट मध्ये उत्तीर्ण होण्यासहीत दुसऱ्या अटी ज्या यु.जी.सी.ने निर्धारित केल्या आहेत त्या या निर्धारित नियमांत अनिवार्य केल्या जातील.

iii) अकॅडमीक परफॉरमन्स इंडिकेटर (API) मध्ये संकेतित केल्याप्रमाणे किमान गुण जे यु.जी.सी.ने विकसित केलेल्या परफॉरमन्स बेस्ड अप्रायझल सिस्टिमवर आधारित असेल व ती अनिवार्य आवश्यकता असेल.

पुन्हा एकदा एम्. एड्. स्तरावर ५५% गुण मिळवल्यावर आणि अधिस्नातक स्तरावर ५०% गुण मिळवून अथवा बी. एड्. आणि शिक्षण क्षेत्रातील एम्. ए मध्ये ५५% गुण मिळवून आणि नेट / सेट परिक्षा उत्तीर्ण झाल्यावर शिक्षक प्रशिक्षक महाविद्यालयाच्या शिक्षण विभागात अर्ज करण्यास पात्र होतो. ह्या नंतर एक मुलाखत होते. मुलाखतीतील यश हे नियुक्तीसाठीचा पाया तयार करते.

अश्या खूप समस्या व मुद्दे आहेत ज्यांना शिक्षक प्रशिक्षण प्रणाली सामोरी गेली आहे. त्यांच्याकडे बघण्याचा सखोल दृष्टीकोन आणि सुचविलेल्या उपायांबरोबर प्रयोग करण्यासंबंधीचे गंभीर विचार हे कदाचित प्रणालीत बदल घडवून आणण्यास मदत करु शकतात.

तुमची प्रगती तपासा :

१) बी. एड्. कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांच्या निवडी संबंधीची सविस्तर प्रक्रिया सुचवा.

२) बी. एड्. व एम्. एड्. स्तरावरील शिक्षक प्रशिक्षकासाठीची योग्य पात्रता सांगा. शिक्षक प्रशिक्षक प्रणाली अधिक कठोर कशी करता येऊ शकेल ?

_____

_____

_____

_____

_____

७.अ.६ शिक्षक प्रशिक्षकाच्या नोकरीसाठीच्या अटी :

मुलांच्या शिक्षणाच्या क्षेत्रातील शिक्षकाच्या भूमिकेसंबंधीच्या अपेक्षा खूप जास्त आहेत. त्यामुळे शिक्षक शिक्षण प्रणालीपासून जास्त अपेक्षा वाढतात. विनाअनुदानीत शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षक प्रशिक्षकांना अनुदानीत शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षक प्रशिक्षकापेक्षा अधिक प्रतिकुल परिस्थितींना सामोरे जावे लागते. कमी पगार, भत्ते व वेतनाचा अभाव कामाचे वाढीव तास, नोकरीतील असुरक्षितता ह्यासारख्या व्यवस्थापनाकडून होणाऱ्या पिळवणूकीच्या घटना बऱ्याच असतात. खाजगी संस्थांच्या कामाचे नियंत्रण करण्यासाठी सरकारने प्रयत्न केले आहेत पण नुसत्या कायद्याचे अस्तित्व म्हणजे शिक्षक शोषणाविरुद्धची पुरेशी हमी नव्हे, म्हणून शिक्षक प्रशिक्षकाच्या निवड प्रक्रिया, परिवीक्षा काळ, पदोन्नती, नोकरीची सुरक्षितता, भत्ते आणि वेतन सुट्ट्या आणि व्यावसायिक या गोष्टीची काळजी घेतली गेली पाहिजे.

७.अ.६.१ नोकरीसंबंधीच्या अटी व कालावधी :

नॅशनल कौन्सिल फॉर टिचर्स एज्युकेशन नुसार शिक्षण अधिस्नातक (M.Ed.) पदवी, शिक्षक प्रशिक्षकांच्या सेवेच्या अटी व कालावधीकडे जाणाऱ्या शिक्षण अधिस्नातक कार्यक्रमाचे मानदंड व दर्जा खालीलप्रमाणे :

अ) यु.जी.सी. / संलग्न महाविद्यालयाच्या धोरणांप्रमाणे स्थापिलेल्या निवड समितीच्या शिफारसींच्या आधारे नियुक्ती केली जावी.

ब) सर्व नियुक्त्या ह्या पूर्ण वेळ व नियमित तत्वांवर केल्या जाव्यात.

क) सहाय्यकाची नियुक्ती ही यु.जी.सी. / संबंधित महाविद्यालयाच्या मानदंडानुसार केली जावी.

ड) शैक्षणिक (Academic) व संस्थेतील इतर कर्मचारी वर्ग (अर्धवेळ कर्मचारी वर्ग धरुन) यांना यु.जी.सी. / संबंधीत विद्यालयाच्या अनुसार असे वेतन अश्या पगाराच्या श्रेणीत वेळच्या वेळी payee च्या खात्यात चेकच्या माध्यमाने अथवा सल्लानुसार कर्मचाऱ्याच्या बँकेच्या खात्यात भरला जावा.

इ) संस्थेच्या व्यवस्थापनाने त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या निवृत्तीवेतन, तोषदान, भविष्यनिधी इ. संबंधीच्या वैधानिक कर्तव्यातून त्यांची मुक्तता करावी.

फ) SC / ST / OBC व इतर वर्गवारीचे आरक्षण हे केंद्रसरकार / राज्यसरकार यांच्या नियमांप्रमाणे असावे.

ग) कर्मचारी वर्गाचे सेवानिवृत्तीचे वय हे संबंधित सरकारच्या धोरणांवरुन ठरवावे.

शिक्षण क्षेत्रात व शिक्षक प्रशिक्षकांच्या स्थितीत पारदर्शकता आणण्यासाठी यु.जी.सी. द्वारा निर्धारित केलेल्या खालील पैलुंचे पालन केले गेले पाहिजे.

निवड प्रक्रिया :

एकुणच निवड प्रक्रिया ही पारदर्शक, वस्तूनिष्ठ आणि विश्वसनीय असायला हवी. अर्जदाराच्या गुण व Credentials पृथ्थःकरणांची पद्धत ही वेगवेगळ्या प्रस्तूत आयामात अर्जदाराने केलेल्या प्रदर्शनाला महत्त्व देऊन आणि यु.जी.सी.ने पुरविलेल्या शैक्षणिक कामगिरी सूचक (Academic Performance Indicators - API) वर आधारित अशा Scoring System Performance मधील तिच्या / त्याच्या प्रदर्शनावर आधारित असावी.

प्रणाली अधिक विश्वसनिय बनवण्यासाठी विद्यापीठांना वर्ग स्थितीतील परिसंवाद वा व्याख्यान किंवा मुलाखतीच्या स्तरावर अध्यापन व संशोधनात नव्या तंत्रज्ञान वापरण्याच्या क्षमतेवर चर्चा या माध्यमातून कदाचित आकलन करु शकते.

जिथे कुठे निवड समिती नियमांत विहीत केली आहे तिथे सरळ भर्ती व Career Advancement Scheme (CAS) च्या खाली पदोन्नती या दोन्ही प्रक्रियांचे पालन केले जाऊ शकते. सहयोगी अध्यापक / CAS च्या अंतर्गत सहाय्यक पदासाठी निवड समितीत यु.जी.सी. पर्यवेक्षक, शिक्षक व शिक्षकेतर वर्गाच्या महाविद्यालय व विद्यापीठातील सरळ भरतीच्या समित्यांच्या सर्व भागांत निःपक्षपणा सुनिश्चित करण्यासाठी अनुसुचित जाती / जमाती / इतर मागास वर्गीय / अल्पसंख्यांक / महिला / विकलांग या श्रेणीतील एक विद्यानिष्ठ व्यक्ती उपस्थित असावी.

पगाराची श्रेणी, पद आणि पदोन्नती :

CAS च्या पदाधिकाऱ्याखाली आणि नवनियोजित सहाय्यक अध्यापक / सहयोजी अध्यापक / अध्यापक

वेतनवृद्धी : प्रस्तुत पे बँड आणि AGP मध्ये पे बँड च्या स्तरावर जसे लागू पडेल तशी प्रत्येक वार्षिक वेतनवृद्धि पगाराच्या ३% समतुल्य इतकी असावी.

भत्ते : सुट्टी प्रवास भत्ता, विशेष भरपाई भत्ता, मुलांचा शिक्षण भत्ता, वाहतुक भत्ता, घरभाडे भत्ता, प्रतिनियुक्ती भत्ता, प्रवासभत्ता, महागाई भत्ता, क्षेत्र आधारित विशेष भरपाई भत्ता इ. या सारखे भत्ते शिक्षकांना जसे लागू पडतील तसे दिले गेले पाहिजेत.

कर्तव्य रजा (Duty Leave), अभ्यास रजा (Study Leave), विश्रांती रजा (Sabbatical Leave)

१) Duty Leave एका शैक्षणिक वर्षात जास्तीत जास्त ३० दिवसांची पगारी रजा पुढील कारणांसाठी मंजूर होऊ शकते.

   अ) विद्यापीठातर्फे किंवा विद्यापीठाच्या परवानगीने मेळावे, परिसंवाद आणि परिषदा यातील सहभागासाठी.

   ब) संस्थेच्या किंवा विद्यापीठाच्या आमंत्रणावरुन त्या विद्यापीठात किंवा संस्थेत व्याख्यान देण्यासाठी.

क) विद्यापीठाकडून भारतीय अथवा विदेशी विद्यापीठात दुसरी कुठली शाखा, संस्था किंवा संघटनेत प्रतिनियुक्ती झाल्यास काम करण्यासाठी.

ड) शिष्ट मंडळातील सहभागासाठी किंवा भारत सरकार, राज्य सरकार, यु.जी.सी., Sister University किंवा इतर कुठल्याही शैक्षणिक मंडळाने नेमलेल्या समितीत काम करण्यासाठी आणि

इ) विद्यापीठाने दिलेले दुसरे कुठलेही कर्तव्य पार पाडण्यासाठी जर शिक्षकास शिष्यवृत्ती किंवा मानधन किंवा सामान्य खर्चाच्या रकमेपेक्षा अधिक इतर कुठलेही वित्तीय सहाय्य मिळत असेल तर त्यास सुट्टी पूर्ण वेतनावर दिली जाऊ शकते.

२) अभ्यास सुट्टी ही सतत सेवेच्या कमीत कमी २ वर्षांनंतर मंजूर होऊ शकते. ही सुट्टी अभ्यासाच्या एखाद्या विशिष्ट शाखेच्या अथवा विद्यापीठातील तिच्या / त्याच्या कामाशी सरळ संबंध असणाऱ्या संशोधनाचा अथवा विद्यापीठ संस्थेच्या विविध पैलु आणि शिक्षण पद्धती यांच्या विशेष अभ्यासाचा पाठपुरावा करण्यासाठी दिली जाऊ शकते. नोकरीत असताना संबंधीत विषयात पी.एच्.डी.ची पदवी मिळवण्यासाठी पूर्ण पगारी रजा मंजूर होण्यासंबंधी प्रवेश झाल्यानंतर कमीत कमी दोन वर्षे किंवा संबंधित विद्यापीठाच्या विधित नमूद केल्याप्रमाणे परिविक्षा कालाची वर्षे घालावी लागतात. हे करताना महाविद्यालये व विद्यापीठातील शिक्षक व इतर कर्मचाऱ्यासाठीच्या रिक्तपदांची उपलब्धता लक्षात घेतली पाहिजे, जेणेकरुन पी.एच्.डी. अथवा उच्च शिक्षणाशिवाय नोकरीत प्रवेश करणाऱ्या शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांना कारकीर्दीच्या नंतरच्या टप्प्यापेक्षा लवकारात लवकर संबंधीत विषयात ही पात्रता मिळवण्यासाठी प्रोत्साहीत करता येऊ शकते.

३) Sabbatical Leave ही विद्यापीठाच्या स्थायिक, पूर्णवेळ अध्यापकांस ज्यांनी आपल्या सेवेची सात वर्षे ही प्रपाठक / सहयोगी अध्यापक किंवा फक्त प्राविण्य वाढविण्याच्या उद्दिष्टाने आणि विद्यापीठ व उच्च शिक्षण संस्थाच्या उपयोगीतेसाठी कुठला अभ्यास अथवा संशोधन अथवा इतर शैक्षणिक बाबींचा पाठपुरावा करत पूर्ण केली असतील, त्यांना मंजूर होते. सुट्टीचा काळ हा एका वेळी एक वर्षापेक्षा अधिक व पूर्ण कारकिर्दीत दोन वर्षांपेक्षा अधिक नसावा. अध्यापकाने जर अभ्यास सुट्टीचा फायदा घेतला असेल तर तो Sabbatical सुट्टीसाठी अर्ज करु शकत नाही. Sabbatical सुट्टीच्या दरम्यान उचित तारखेस अध्यापकास वेतनवृद्धी सकट पूर्ण पगार व भत्ते दिले जातात. जर अध्यापक तिची / त्याची सुट्टी संपताच विद्यापीठात रुजू झाला तर निवृत्ती वेतन / अंशदायी भविष्यनिधी इ. कारणास्तव सुट्टीचा काळ हा नोकरीच्या काळातच धरला जातो.

Research Promotion Grant :

यु.जी.सी. किंवा संबंधित निधी पुरवठा संस्था (केंद्र /राज्य सरकार) समाजशास्त्र मानवता व भाषा यांसाठी ३ लाख तर विज्ञान व तंत्रज्ञानाच्या शाखांसाठी ६ लाख एवढे सुरुवाती अनुदान पुरवतात. हे अनुदान विद्यापीठांमार्फत शिक्षक व गैर व्यावसायिक शैक्षणिक (शिक्षक वृंद) यांना भरतीनंतर लगेचच संशोधन स्विकारण्यासाठी दिले जाते जेणेकरुन नवनियुक्त व्यक्तीस प्रमुख प्रायोजिक संशोधन प्रस्ताव तयार करणे / संबंधीत विभाग / शाळा / विद्यापीठासाठी अनुदान मिळवणे सुलभ जाते.

पी.एच्.डी. / एम्. फिल व इतर उच्च पात्रतेसाठी प्रोत्साहन :

प्रवेश स्तरावर सहाय्यक अध्यापक म्हणून भरती झालेल्या व्यक्तीस ज्यांना यु.जी.सी.द्वारा निर्धारित प्रवेश, नोंदणी, पाठ्यक्रम आणि बाह्यमूल्यांकन या प्रक्रियांना पूर्ण करुन संबंधित विषयात पी.एच्.डी. बहाल झालेली आहे त्यांना पाच गैर जटिल अग्रिम वेतनवृद्धी ग्राह्य / उपादेय आहेत सहाय्यक प्राध्यापक पदाच्या सेवा भरतीच्या वेळी एम्. फील पदवीधारक दोन गैर जटिल अग्रिम वेतनवृद्धीचे हकदार असतील. शिक्षक ज्यांनी त्यांची पी.एच्.डी. पदवी ही नोकरी करत असताना मिळवली आहे ते ३ गैर जटिल वेतनवृद्धीचे हकदार असतील, पण त्यासाठी त्यांनी पी.एच्.डी. ही त्यांच्या नोकरीच्या संबंधीत विषयात पूर्ण केली असावी तसेच ती यु.जी.सी.ने निर्धारित केलेल्या नाव नोंदणी, पाठ्यक्रमाचे काम व मूल्यांकन या प्रक्रियांना अनुसरुन विद्यापीठाने बहाल केलेली असावी. सेवेत असताना ज्या अध्यापकांनी एम्.फील पदवी अथवा व्यावसायिक पाठ्यक्रमात अधिस्नातक पदवी मान्यताप्राप्त संबंधीत संविधानिक बोर्ड / प्रशासकीय मंडळातून मिळवली असेल ते एक अग्रिम वेतनवृद्धीचे हकदार असतील.

प्रशासनाने व्यक्तिगत संस्थाच्या कार्याच्या अनुशासनासाठी प्रयत्न केले आहेत पण कायद्याचे फक्त अस्तित्व हेच अध्यापकांच्या शोषणाविरुद्ध पुरेशी हमी नसल्याने निवड प्रक्रिया, परिविक्षा काळ, बढती, नोकरीची हमी, भत्ते व पगार, सुट्ट्या आणि शिक्षक प्रशिक्षकाची व्यावसायिक सुधारणा या बाबींची काळजी घेणे गरजेचे आहे. यु.जी.सी.ने सर्व बाबी संकेतिक केल्या आहेत. त्या शुद्ध मनाने पाळल्या जाणे आणि त्यामुळे संतुष्ट शिक्षक निर्माण होणे हे अत्यंत महत्वाचे आहे.

तुमची प्रगती तपासा :

१. कुठल्या परिस्थितीत duty leave रजेचा लाभ घेतला जाऊ शकतो ?

_____

_____

_____

_____

_____

२. शिक्षकाने स्वतःच्या व्यावसायिक सुधारणेसाठी काम करावे म्हणून देण्यात येणाऱ्या प्रोत्साहनाचे विश्लेषण करा.

_____

_____

_____

_____

_____

७अ.७ शिक्षक प्रशिक्षणाचे गुणवत्ता व्यवस्थापन :

डॉ. डी. टिम्मर च्या मते "गुणवत्ता ही मनाची स्थिती आहे. श्रेष्ठतेचा केलेला कठोर पाठलाग, तसेच तुम्ही काय करता, कसं करता आणि किती लवकर करता यावर कधीच संतुष्ट न होणे, तिथे नेहमीच सुधारणेला वाव असतो. सर्व गोष्टी नेहमीच अधिक चांगल्या प्रकारे करता येतात. गुणवत्ता ही आपल्या आत्म्याचा भाग असली पाहिजे." गुणवत्तेचे विविध लोकांकडून विविध प्रकारे आकलन केले जाते. गुणवत्ता ही दुसऱ्याने बहाल करता येण्याजोगी गोष्ट नाही, ती मिळविण्यासाठी व टिकवून ठेवण्यासाठी घेतलेल्या अथक प्रयत्नांची फलश्रुती आहे. जर हेतू साध्य होत नसेल तर, उत्पादनाची गुणवत्ता ही एखाद्यासाठी चांगली तर दुसऱ्यांसाठी बिनकामाची ठरु शकते.

७अ.७.१ गुणवत्तेचा सिद्धांत (संकल्पना) :

गुणवत्तेचा संदर्भ हा मुलभूत व आवश्यक स्वरुप, घटकाचे विवेचन अथवा उत्पादनाची वैशिष्ट्ये, सेवा, संघटना किंवा वस्तू यांच्याशी असतो. एखादी विशिष्ट सेवा किंवा उत्पादन विकत घ्यायचे का नाही हे या घटकांकडे पाहून ग्राहक ठरवतात.

बेनिस (१९९३) च्या मते "बऱ्याचदा गुणवत्ता ही अजिबात मोजली जात नाही तर तीला अंतर्ज्ञानाने दाद दिली जाते. एखाद्याने गुणवत्तेला दिलेला प्रतिसाद म्हणजे आपल्या जीवनातील जाणीवा, अवबोध जे जीवनातील अर्थाचा अनुभव, सुंदरता आणि मूल्य यांच्याशी संलगीत जोडलेले असते."

गुणवत्ता ही अनेक व्यवस्थापन तज्ञांनी निरुपित केली आहे. 'श्रेष्ठतेचा अंश' हा शब्दकोशात गुणवत्तेचा दिलेला अर्थ आहे. ज्युसन म्हणतात. गुणवत्ता ही 'हेतूची योग्यता' आहे म्हणजेच जर एखादी गोष्ट एखाद्या व्यक्तीची निकड पूर्ण करु शकली तरच ती चांगल्या गुणवत्तेची मानता येईल. डेमिंगचा असा अभिप्राय आहे की "गुणवत्ता ही एक सकारात्मक संकल्पना आहे. उत्पादन अथवा सेवा जी कुणाला मदत करते आणि चांगल्या मागणी उपभोग चालू ठेवते ती चांगली गुणवत्ता." Crosby च्या प्रमाणे, एखादी वस्तू अथवा सेवा ही जर गरजेशी तंतोतंत जुळत असेल तर ती चांगल्या गुणवत्तेची मानली जाते. Seymour असे मत मांडतो की, "अविरत सुधारणा म्हणजेच गुणवत्ता".

गुणवत्ता व श्रेष्ठता हे वरचेवर समानार्थी शब्द म्हणून वापरले जातात. ह्या अर्थी की, जेव्हा अनुभव येतो तेव्हा हे दोन्ही शब्द एकाच प्रकारचा प्रतिसाद देतात. गार्डनर (१९६१) श्रेष्ठतेवर लिहिलेल्या प्राथमिक स्वरुपाच्या पुस्तकात हा मुद्दा उपस्थित करतो की, 'श्रेष्ठपणाचे अनेक प्रकार आहेत – शैक्षणिक, व्यावसायिक, कलात्मक (Athletic) इ. काही श्रेष्ठतेचे प्रकार हे शिक्षणाच्या माध्यमाने जोपासले जातात, तर काही जात नाहीत. काही प्रकारची श्रेष्ठता ही ऐहिक यशाच्या मार्गावर नेते, तर काही नेत नाहीत. काही प्रकारच्या श्रेष्ठपणात घडण्याचा समावेश असतो तर काहींमध्ये अस्तित्वाचा समावेश होतो. मग ती तुलना दुसऱ्यांशी केलेली तुलना असू शकते किंवा स्वतःशी, श्रेष्ठता कृती दर्शवते (जी सहजच होत नाही) आणि त्यासाठी मानवी इच्छाशक्तीच्या अभ्यासाची गरज असते. हे श्रेष्ठतेचा पाठपुरावा व गुणवत्तेचा शोध असे

वारंवार वापरात येणारे वाक्प्रचार समजावून सांगतात. कनिष्ठ गुणवत्ता असू शकते पण कनिष्ठ श्रेष्ठता असू शकत नाही.

आजकालच्या काही दिवसांत काही विषय जसे गुणवत्ता, संस्कृती, ज्ञान, व्यवस्थापनाचे महत्त्व आणि उच्च गुणवत्तेचा पुरस्कार करण्यात व संपादन करण्यात नेतृत्वाचा वाटा हे अधिक महत्त्वपूर्ण झाले आहेत. विचारप्रणालीसारखे विषय हे गुणवत्तेत अधिक समग्र दृष्टिकोन आणत आहेत. जेणेकरुन लोक प्रक्रिया व उत्पादन यांचा गुणवत्ता व्यवस्थापनेतील स्वतंत्र कारक असा विचार न करता त्यांना एकत्रित मानले जाईल. गुणवत्तेच्या विचारांचा प्रभाव हा अपारंपारिक उपाययोजना म्हणजेच रचना, अतिथ्यासारखी सेवा क्षेत्र, परिवहन आणि अगदी शिक्षणक्षेत्रावर सुद्धा झालेला आहे.

ग्राहक ओळखतात की गुणवत्ता ही उत्पादन आणि सेवा यांची महत्त्वपूर्ण विशेषता आहे. विक्रेते जाणतात की गुणवत्ता, त्यांचे उत्पादन व त्यांच्या प्रतिस्पर्ध्याचे उत्पादन यातील महत्त्वाचे अंतर ठरु शकते. हे शिक्षण क्षेत्रास लागू केल्यास, शिक्षणाचे ग्राहक, विद्यार्थी, पालक व भविष्यात नोकरी देणारे, प्रणालीच्या उत्पादनाचे म्हणजेच गुणवान विद्यार्थांचे महत्त्व जाणतात. या अर्थाने विविध शिक्षण उत्तक पाठ्यक्रम पुरवले पाहिजेत आणि विद्यार्थी व भविष्यात नोकरी देणाऱ्यांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी प्रशिक्षण दिले पाहिजे आणि इतर प्रतिस्पर्धी संस्थापेक्षा अधिक उत्तम संधी उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. या चर्चेतून गुणवत्तेची काही वैशिष्ट्ये ओळखणे आहे.

७अ.७.२ गुणवत्तेची वैशिष्ट्ये :

- गुणवत्ता ही आकलनाचा विषय आहे, युक्तिवादाचा नाही हे आकलन आहे जे उत्पादन, सेवा अथवा संस्थेच्या बाहेर राहते. Peter Drucker (१९९०) म्हणतात, “संस्थेचे फळ हे कायम संस्थेच्या बाहेर असते आतमध्ये फक्त किंमत असते. संतुष्ट ग्राहक हे व्यवसायाचे फलित आहे. बरा झालेला रोगी हा रुग्णालयाचे फलित आहे आणि शिक्षण संस्थेचे फलित हे विद्यार्थी आहे ज्याच्याकडे काहितरी मौल्यवान आहे जे तो दहा वर्षानंतरही वापरु शकतो.”
- गुणवत्ता ही तुलनात्मक असते, निरंकुश नसते. हा दर्जाचा विषय आहे. तात्विकदृट्या तेथे कमाल किंवा किमान मर्यादा नसतात. गुणवत्ता सुधारणा म्हणजे उत्कृष्टपणाचा पाठपुरावा करणारी अशी विनागंतव्यांची (थांब्याची) यात्रा असते. दुसऱ्या किंवा अन्य मार्गाने थोडीबहुत योग्यता प्राप्त केली जाईल असे काही येथे अपेक्षित नसते.
- गुणवत्ता ही व्यक्तिनिष्ठ असते, गुणवत्तेची पारख करण्यासाठी वापरलेले मोजदंड जे अनुभव, मूल्य व संस्कृती यावर आधारीत असतात ते तत्वतः व्यक्तीव्यक्तींमध्ये भिन्न असू शकतात.
- गुणवत्ता ही संदर्भासंबंधी कल्पना आहे. गुणवत्तेचे दर्शक हे संस्थेनुरुप असतात. रोजगाराचा उच्च दर हा व्यावसायिक, तांत्रिक, व्यावसायिक शिक्षण कार्यक्रमांचा वैध दर्शक आहे. पण हे माणुसकी व ललितकला शिक्षणासंदर्भात मानता येणार नाही. प्रत्येक संस्थेचे एक ध्येय (mission) आहे. हे काय आहे, ह्याचे अस्तित्व का आहे आणि ह्याची प्राथमिक कर्तव्य काय आहेत याची स्पष्ट समज संस्थेला असते. हे

mission सर्व कार्य व उपक्रम सूचित करतात. प्रदर्शन व गुणवत्तेचे मूल्यांकन हे फक्त mission व संस्थांच्या संदर्भातच मान्य आहेत.

- गुणवत्ता अनुमान सिद्धतेने मापली जाऊ शकते. हुषारी, प्रेरणा, प्रवृत्ती व शैक्षणिक निष्पत्तीप्रमाणे गुणवत्तेचे दर्शक प्रस्तापित केले आहेत जे मापनाच्या मूलाधाराप्रमाणे उपयोगी पडतात.
- गुणवत्ता ही सुलभ असते. गुणवता ही कुणी दुसऱ्याने बहाल केलेली गोष्ट नाही. ती निरंतरपणे केलेल्या प्रयत्नाच्या पराकाष्ठेच्या फलस्वरूप संपादली व अभंग राखली जाते.
- गुणवत्ता ही प्रणाली व तिच्या विभागांस लागू पडते. गुणवत्ता ही प्रणालीच्या प्रत्येक घटकास लागू पडते. उदा. आदान – प्रक्रिया - उत्पादन
  (input) - (process) - (output)

७अ.७.३ गुणवत्तेची तत्त्वे :

गुणवत्ता व्यवस्थापना हे अशा व्यवस्थापन तत्त्वांचा स्विकार करु शकते, कामगिरी सुधारणेसाठी त्यांच्या संघटनांना मार्गदर्शन करणाऱ्या वरिष्ठ व्यवस्थापनाने वापरले जाऊ शकते. ही तत्त्वे पुढीलप्रमाणे :

- ग्राहक केंद्री
- नेतृत्त्व गुण
- लोकांचा सहभाग
- प्रक्रियेचा दृष्टिकोन
- व्यवस्थापनाकडे प्रणालीचा दृष्टिकोन
- निरंतर प्रगती
- निर्णय घेण्यासाठीचा तथ्यात्मक दृष्टिकोन
- एकमेकांना लाभप्रद वितरक संबंध

स्वत:ची प्रगती तपासा :-

१) गुणवत्तेची व्याख्या लिहा. गुणवत्तेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

२) शिक्षणाला गुणवत्तेचे तत्त्व लावा.

_____

_____

_____

_____

_____

७अ.७.४ शिक्षणातील गुणवत्ता :

२१ व्या शतकातील नविन सामाजिक सत्याच्या संदर्भात गुणवत्ता हे शिक्षणाचे निरुपणाचे तत्त्व बनले आहे. 'येणाऱ्या समाजास' माहिती संप्रेषण क्रांती, ज्ञान अर्थव्यवस्था आणि वैश्विकीकरण मोठ्या प्रमाणावर प्रभावित करत आहे.

विकसनशील देशासमोर परवडण्याजोगे गुणवत्ता शिक्षण मोठ्या संख्येत कसे पुरवावे ? हा प्राथमिक चिंतेचा विषय आहे.

गुणवत्ता शिक्षणाला जेवढी सामाजिक रुपाने सुसंबद्ध करते तेवढीच ती व्यक्तीसाठी व्यक्तीगत रुपाने अपरिहार्य असते. या अर्थाने गुणवत्ता हे शिक्षणाचे निरुपित तत्त्व बनते. या संदर्भात गुणवत्ता व उत्कृष्टता हे शिक्षक प्रशिक्षणासहित सर्व उच्च शिक्षण संस्थांची दृष्टी व्हायला हवी. गुणवत्ता व उत्कृष्टतेची प्राप्ती हे उच्च शिक्षण संस्थांसमोरील मोठे आव्हान आहे.

७अ.७.५ शिक्षक प्रशिक्षणात गुणवत्ता व्यवस्थापन :

शिक्षक प्रशिक्षण क्षेत्रास उपयोजन, गुणवत्ता ही शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाचे फलित स्वरुप शिक्षकाने समग्रपणे संपादलेल्या सुविधा व विशेषता दर्शवते. शाळा, विद्यार्थी, पालक आणि समाज यांच्यातील अपेक्षा पूर्ण केल्या तर ते हे दर्शवतात की, योग्य शिक्षक हे शिक्षक प्रशिक्षण संस्थांमधून तयार केले गेले आहेत. आणि जर शिक्षक स्वतःमध्ये सतत सुधारणा करत असतील तर शिक्षण क्षेत्रात मूल्य संवर्धन होत आहे. (Feigenbaam - 1951) असे शिक्षक हे समाजाच्या गरजांची पूर्तता करत राहतील. शिक्षकांच्या प्रयोगासाठी गुणवत्ता प्रशिक्षण संस्थेत शैक्षणिक परिणाम व अनुभव यांची सुदृढता असते. (Juran and Gryna 1988). गुणवत्ता शिक्षक प्रशिक्षण संस्थेत शिक्षकाच्या शैक्षणिक प्रक्रियेतील दोष टाळला जाईल. (Crosby 1979).

कुठल्याही शैक्षणिक संस्थेत तीन अंगे सांभाळावी लागतात. शैक्षणिक, कारभारविषयक, अर्थविषयक या व्यतिरिक्त तेथे मानवी व भौतिक संसाधनांचाही त्यांच्या सर्वोत्कृष्ट पातळीवर सांभाळ करावा लागतो. दुसऱ्या शब्दांत शिक्षक प्रशिक्षण प्रणालीत आदान प्रक्रिया – उत्पादनाचे व्यवस्थापन हे अत्यंत महत्त्वपूर्ण असते. जर प्रत्येक घटक ही चांगल्या गुणवत्तेचा असेल तर अंतिम उत्पादन म्हणजेच शिक्षक हा ग्राहकाच्या गरजांची पूर्तता करण्याच्या रुपात मानला जाईल.

शिक्षक प्रशिक्षणातील गुणवत्ता ही त्या संस्थेतून शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षणार्थीच्या शैक्षणिककारकतेवरुन ठरते. गुणवंत शिक्षकाची शैक्षणिककारकता ही त्याने संपादित केलेल्या शिक्षण आणि प्रशिक्षणातून दर्शविले जाते. अध्यापक हे त्यांच्या विषयातील तथ्य, आकृती, सिद्धांत याबद्दल पूर्ण माहिती व ज्ञान बाळगतात. ते सुसंस्कृत असतात आणि प्रेमळ, सृजनशील व नैतिकतेने पूर्ण असे व्यक्तिमत्त्व बाळगतात. मोकळेपणा हा सुसंस्कृतपणाच्या पुढची एक पायरी आहे ज्यात शिक्षक ही एक व्यक्ती असते जी धर्म, जात, पंथ, लिंग, भाषाभिन्नता आणि भौगोलिक सत्ता, सामाजिक चालीरिती, सांस्कृतिक दंतकथा आणि प्रतिमा यांच्या माहित असलेल्या कृत्रिम मर्यादांच्यावर पोहोचते व आपल्या विद्यार्थ्यांना निकोपपणे वागवते. शेवटी, अध्यापकांनी त्यांच्यात आधीपासून असलेल्या क्षमतेचा उच्चबिंदू मिळवावा. तरीपण जर शैक्षणिक संस्थेने सामान्यपणे खालीलप्रश्नांची उत्तरे दिली तर ते गुणवत्ता मिळवण्यात यशस्वी होतील.

१) आपण कुठले महत्त्वाचे परिणाम संपादले ?
२) आपण आपल्या stake holders च्या गरजा किती व्यवस्थितपणे पूर्ण केल्या ?
३) आपल्या शैक्षणिक प्रक्रियेचे समर्पण / सादरीकरण कितपत चांगले आहे ?
४) आपले व्यवस्थापन कितपत चांगले आहे ?
५) आपले नेतृत्त्व कितपत चांगले आहे ?
६) आपली सुधारण्यासाठीची क्षमता केवढी आहे ?

शिक्षक प्रशिक्षणासाठीचे गुणवत्ता निर्देशक (नॅक) :

- अभ्यासक्रम योजना आणि नियोजन
- अभ्यासक्रम देवघेव व मूल्यमापन
- संशोधन, सुधारणा व विस्तार
- पायाभूत घटक व शैक्षणिक संसाधने
- विद्यार्थी समर्थन व प्रगती
- संघटन व व्यवस्थापन

गुणवत्ता ही उत्पादन, सेवा, संघटना वा संस्था यांची मूलभूत व अत्यावश्यक वैशिष्ट्ये, विवेचनाचे घटक व वैशिष्ट्ये यांना दर्शवते. गुणवत्ता ही धारणेची गोष्ट आहे, ती तुलनात्मक, व्यक्तिनिष्ठ, सुलभ, अनुमानिकतेने मापित आणि प्रणाली व तिच्या भागांस लागू अशी असते. विकसनशील देशात परवडणाऱ्या किंमतीत मोठ्या संख्येने गुणवत्ता शिक्षण पुरविणे ही एक मुख्य चिंता आहे. जर शाळा, विद्यार्थी, पालक व समाजाच्या अपेक्षा पूर्ण झाल्या तर ते हे दर्शवते की गुणवत्ता शिक्षण देण्यासाठी शिक्षक प्रशिक्षक संस्थाकडून शिक्षकांचा योग्य प्रकार तयार केला गेला आहे. शैक्षणिक, कारभारविषयक आणि अर्थविषयक तसेच मानवी व भौतिक संसाधनांचे या अंगांचे व्यवस्थापन करावे लागते. दुसऱ्या शब्दात शिक्षक प्रशिक्षण प्रणालीची कच्चा माल (input) – प्रक्रिया (Process) – उत्पादन (Product) यांचे व्यवस्थापन ही पराकाष्ठेची गरज आहे.

आपली प्रगती तपासा :

१) तुमच्या संस्थेची सुधारण्याची आवश्यकता असलेली काही अंगे शोधा. ती अंगे सुधारण्यासाठी गुणवत्ता व्यवस्थापनाची तत्त्वे लावा. (लागू करा)

२) शिक्षक प्रशिक्षणासाठीचे गुणवत्तादर्शक विस्ताराने / तपशीलात सांगा.

३) गुणवान अध्यापकांचे दर्शक कोणते ?

७अ.८ सारांश :

या पाठात आपण शिक्षक प्रशिक्षणाच्या काही समस्या व मुद्दे (वाद) यांवर चर्चा केली आहे. आपण या परिस्थितीत कशी सुधारणा करावी यावरही चर्चा केली. शिक्षक प्रशिक्षणाचा दर्जा राखणे हे योग्य प्रवेश प्रक्रिया व शिक्षक प्रशिक्षकांच्या योग्य निवडीवर शक्य आहे. आपण नॅकने दिलेल्या गुणवत्ता दर्शकांना अनुसरुन शिक्षक प्रशिक्षणात गुणवत्ता व्यवस्थापन राखण करु शकतो.

संदर्भ :

1) Norms and Standards for Bachelor of Education and Master of Education UGC / NCTE website. Accessed in 2008.

2) University Grant Commission (1990) Towards New Educational Management New Delhi UGC.

3) NCTE Website.

4) UGC Website.

5) Paul H. Selden (December 1998), "Sales Process Engineering : An Emerging Quality Application." Quality Progress : 59-63.

6) Mukhopadhya M. (2007) Quality Management of Schools, New Delhi, NIEPA

7) Menon Mohan, K. Rama, T.K.S. Lakshmi and Vasant D. Bhat (Edrs) (2007) Quality Indicators for Teacher Education.

   Bangalore, National Assessment and Accreditation Council (NAAC), India and the Commonwealth of Learning (COL), Canada.

8) Thareja P (2008), "Total Quality Organization Thru' People, Each one is Capable", FOUNDRY, VOL. XX No. 4 July/Aug 2008.

9) http://unstats.un.org/unsd/dnss/QAF comments/Object%20Oriented%20Quality%2Management.pdf.

10) Web: http://ww.naacindia.org and http://www.col.org.

11) Wikipedia accessed in June 2010.

❖❖❖❖

७ब

शिक्षण प्रशिक्षणातील खाजगीकीकरण, जागतिकीकरण आणि स्वायत्तता

घटक रचना :

७ब.० उद्दिष्टे

७ब.१ प्रस्तावना

७ब.२ खाजगीकीकरण

- ७ब.२.१ खाजगीकीकरणाची संकल्पना
- ७ब.२.२ शिक्षण आणि खाजगीकीकरण
- ७ब.२.३ खाजगीकीकरणाची आवश्यकता
- ७ब.२.४ खाजगीकीकरणाचे फायदे
- ७ब.२.५ खाजगीकीकरणातील भय

७ब.३ जागतिकीकरण

- ७ब.३.१ जागतिकीकरणाची संकल्पना
- ७ब.३.२ जागतिकीकरणाची लक्षणे
- ७ब.३.३ जागतिक शिक्षण
- ७ब.३.४ विश्वजगतासाठी शिक्षक आणि शिक्षक प्रशिक्षणाचे व्यावसायिकीकरण

७ब.४ शिक्षक प्रशिक्षणातील स्वायत्तता

- ७ब.४.१ स्वायत्ततेची संकल्पना
- ७ब.४.२ शिक्षणातील स्वायत्तता
- ७ब.४.३ स्वायत्ततेची गरज
- ७ब.४.४ स्वायत्ततेचे प्रकार
- ७ब.४.५ स्वायत्तसंस्थां समोरील आव्हाने
- ७ब.४.६ स्वायत्ततेस उपकारक घटक
- ७ब.४.७ संस्थाना स्वायत्ततेकरीता आलेल्या अडचणी
- ७ब.४.८ स्वायत्ततेबाबत साशंकता / भय

७ब.५ सारांश

७ब.० उद्दिष्टे :

ह्या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

- खाजगीकीकरण, जागतिकीकरणाचा आणि स्वायत्ततेचा अर्थ सांगता येईल.
- स्वायत्ततेची संकल्पना स्पष्ट होण्यास मदत होईल.
- स्वायत्ततेची गरज आणि स्वायत्त संस्थांपुढील आव्हाने स्पष्ट करता येतील.
- शिक्षक प्रशिक्षिणासंदर्भातील खाजगीकीकरण, जागतिकीकरण आणि स्वायत्ता या संकल्पना स्पष्ट होतील.

७ब.१ प्रस्तावना :

स्वातंत्र्याच्यावेळी भारताने स्वतःला समाजवादी लोकशाही राज्य म्हणून घोषित केले होते. जनविभागाच्या पुढाकाराने (Public Sector) सर्वांसाठी विकास कार्य हाती घेऊन भारतास विकासाच्या दिशेने नेण्याचा प्रयत्न केला गेला. पण Public Sector ला असमाधानाकडे नेणाऱ्या समाजवादी अर्थव्यवस्थेच्या भ्रमनिरासाची १९८० साल साक्ष ठरते. शिक्षणास सुद्धा जनतेची अमानत मानले गेले आणि इतर Public Enterprises प्रमाणे शासनाने संस्थाच्या उभारणी करुन शिक्षण मोठ्याप्रमाणात लोकांपर्यंत पोहचविले. काळाच्या ओघात या संस्था अकार्यक्षम बनु लागल्या.

राज्यमालकी Enterprises च्या अकार्यक्षम कार्यपद्धतीचे परिणामस्वरुप खाजगीकीकरणाचे वारे भारतासह जगभर पसरु लागले. आर्थिक सुधारणांसाठी वेगळ्याच गोष्टींची गरज असताना खाजगीकरणाची कल्पना ही सर्व समस्यांवरील रामबाण उपाय ठरली. भारत सुद्धा या परिणामांपासून वेगळा राहिला नाही, आणि खाजगीकीकरणाच्या वाऱ्याचा शिक्षणक्षेत्रावरही प्रभाव पडला.

७ब.२ खाजगीकीकरण :

७ब.२.१ खाजगीकीकरणाची संकल्पना :

खाजगीकीकरण हे विस्तृत प्रमाणातील कल्पनांना सूचित करते. खाजगीकीकरणाची ओळख ही खाजगी मालकी, व्यवस्थापन आणि संघटनांवरील नियंत्रण या स्वरुपात लागू होते. शासनाचे अल्प नियंत्रण असल्याने खाजगीकीकरणाचा अंनियंत्रित असा अर्थ ध्वनित केला जातो. हे Private Sector ची वाढ आणि Public Sector मधील घट दर्शविते. याचा दूसरा अर्थ असा होतो की, Public Sector साठीचे राखीव क्षेत्र हे Private Sector साठी खुले असू शकते. खाजगीकिकरणच्या दिशेने होणारा बदल हा शासनाची भूमिका घटवितो आणि खाजगी, सहकारी व स्थानिक शासनाच्या भूमिकेत वाढ करतो. बदलाची क्षेत्रे ही प्रमुख्याने निर्णय घेणे, पैशाची जबाबदारी आणि व्यवस्थापन ही असतात.

७ब.२.२ शिक्षण आणि खाजगीकिकरण :

शिक्षण क्षेत्रासंदर्भात विचार करताना खाजगीकीकरणाकडे Public Sector च्या विस्तृत सुधारणांचा एक भाग म्हणून पाहिले जाते. शिक्षण हे खाजगी आणि सामाजिक अशा दोन्ही स्वरुपाची गुंतवणूक आहे आणि म्हणूनच विद्यार्थी, त्याचे कुटुंब, त्याचे मालक, समुदायासह असलेला समाज आणि राज्यासह दोहोंची जबाबदारी महत्त्वाची ठरते. निर्णय घेणे, पैशाची जबाबदारी, व्यवस्थापन आणि उच्च प्रतीचा संबंधित अभ्यासक्रम ही शिक्षण विभागाच्या बदलाची प्रमुख क्षेत्रे आहेत.

खाजगीकीकरणाचे व्यवस्थापन हे संपूर्णतः सरकारी हस्तक्षेपाशिवाय खाजगीक्षेत्राद्वारे केले जाते. अशा संस्था स्वतःचा अर्थनिधी मोठे शुल्क आकारुन तसेच अन्य मोठ्या स्त्रोताद्वारे जमा करतात. जे पैसा मोजतात त्यांचे आम्ही काही देणे लागत नाही अशा तत्त्वज्ञानावर या संस्था टिकून (अस्तित्त्वात) आहेत.

भारतात अलिकडच्या दशकात उच्च शिक्षणाचे खाजगीकीकरण हे विविध रुपात आणि अनेक प्रकारात उदयास येत आहे.

१) शासनाच्या उच्च शिक्षण संस्थातील खाजगीकीकरण हे शासन संस्थेत सुरु केलेल्या आर्थिक लाभ प्राप्त करुन देणाऱ्या अभ्यासक्रमाच्या स्वरुपात जागा घेतात.
२) शासनाच्या खाजगी अनुदानित संस्थेचे खाजगी स्वअर्थसबळ संस्थेत रुपांतर होते.
३) स्वयं अर्थसबळ अशा खाजगी संस्थाना मान्यता देऊन किंवा मान्यता न देता त्यांचा विस्तार करण्यास समंती दिली जाते, ज्यांना व्यापारी खाजगी शिक्षण संस्था म्हणून संबोधले जाते.

तुमची प्रगती तपासून पहा :-

१) खाजगीकीकरण म्हणजे काय ?

२) उच्च शिक्षणाचे खाजगीकीकरण स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

७ब.२.३ उच्च शिक्षणाच्या खाजगीकीकरणास जबाबदार घटक (खाजगीकीकरणाची गरज) :-

१) **स्पर्धात्मक कार्यक्षमतेची गरज :-** खाजगीकीकरणाच्या समर्थनाचा मुख्य भर हा अधिक स्पर्धात्मक आर्थिक वातावरणास उत्तेजन देणाऱ्या कार्यक्षमतेच्या धर्तीवरचा आहे. Public Sector Enterprises ची कार्यपद्धती ही अकार्यक्षम ठरली जात आहे. त्यामुळे साधनांच्या आणि कामाच्या वाटपा संदर्भातील खाजगी मालमत्ता आणि नियंत्रण हे अधिकच कार्यक्षम असल्याचा विश्वास वाढत चालला आहे.

२) **लोकसंख्येतील वाढ :-** भारताची लोकसंख्या ही जवळपास १०७ करोड पर्यंत जाऊन पोहचली आहे. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागविण्यासाठी खाजगी संस्थांची गरज भासू लागली आहे. देशातील युवा पिढीच्या उच्च शिक्षणाच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी उच्च शिक्षणाचे खाजगीकीकरण होणे गरजेचे आहे.

३) **सरकारवरील आर्थिक बोजा :-** भारतातील उच्च शिक्षण हे आर्थिक ताणाखाली आहे. राज्य / केंद्र सरकार हे Public Enterprises चा आर्थिक भार अधिक काळ पेलू शकणार नाही. भारतात शिक्षणावर केला जाणारा खर्च हा GDP च्या ३.५% पेक्षा अधिक नाही. केंद्राने सुद्धा हा दर कमित कमी ६% इतका असावा असे मान्य केले आहे. आंतरराष्ट्रीय स्तराच्या तुलनेत ही प्रतिकूलता दर्शवित आहे, विशेषतः साऊथ आफ्रिकेसारख्या देशाशी तुलना करताना तर हा फरक लक्षात येतोय कारण साऊथ अफ्रिका ही आपल्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ८% गुंतवणूक ही शिक्षणावर करते. त्यामुळे येथे ज्यायोगे खाजगी साधनसुविधा गतिमान होतील अशा प्रकारच्या धोरणांचे विकसन होणे गरजेचे आहे.

४) **शिक्षण एक आर्थिक लाभ :-** शिक्षण ही केवळ सामाजिक सेवा न राहता ते एक आवश्यक असे आर्थिक आदान (Input) ठरत आहे. शिक्षणातील गुंतवणूक ही मानव संसाधन विकासाच्या योगदानास जबाबदार घटक मानली जाते. या प्रयत्नांमध्ये खाजगी पुढाकार हा Private Sector ला माहिती उद्योगाचा (Knowledge Industry) सर्वाधिक फायदा करुन देण्यास मदत करते.

५) **गुणवत्तेच्या शोधार्थ :-** मानवी तसेच भौतिक संसाधनाच्या संपादनासाठी खाजगी संस्थाना फार मोठ्या प्रक्रियेची आवश्यकता नसते. चांगल्या दर्जाची साधनसुविधा उपलब्ध करणे; फर्निचर, इमारत, अनेकविध प्रकारच्या प्रयोगशाळा इ. साधनाच्या खरेदी आणि देखभाली सारख्या बाबी असोत किंवा शिक्षकांच्या मागणीनुरुप त्यांना मानधन देऊ करणारा अर्हताप्राप्त शिक्षकवृदांचा लाभ मिळवून देणे यासारख्या बाबींच्या पूर्ततेसाठी खाजकीकीकरणाची गरज आहे.

६) **शालेय शिक्षणात झपाट्याने होणारी वाढ :-** वाढती शाळांची संख्या ही स्वाभाविकताच उच्च शिक्षणाची मागणी करतात, जी मागणी पुरविण्यास शासन असमर्थ असते, आणि म्हणूनच उच्च शिक्षणाचे खाजगीकीकरण होणे ही काळाची गरज ठरत आहे.

७) **कौशल्यपूर्ण मनुष्यबळ गरजेची पूर्तता :-** Public Sector ला फार कमी प्रमाणात स्वतंत्रता लाभल्याने त्यांचे स्वयंकर्तृत्त्व फार कमी जाणवते. देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने उपयुक्त असे विषय असणारे आधुनिक व प्रगत कोर्सेस सुरु करण्यास खाजगी संस्थांना स्वातंत्र असते. काळाची गरज आणि बाजारातील मागण्यांची पूर्तता करण्यासाठी खाजगीकीकरण गरजेचे आहे.

८) **भ्रष्टाचारास आळा :-** शासकीय विभागातील भ्रष्टाचारास नियंत्रित ठेवण्यासाठी खाजगीकीकरण होणे खूप गरजेचे आहे. भ्रष्टाचार काही प्रमाणात थांबवून, शिस्त आणण्याच्या कामी खाजगीकीकरण उपयुक्त ठरु शकते. फलस्वरुप आपण उपयुक्ततेच्या क्षमतेची आशा करु शकतो.

९) **अधिक स्वायत्ततेची इच्छा :-** उच्च शिक्षणाचे खाजगीकीकरण हे संस्थांना स्वायत्तता पुरवेल आणि त्यामुळे त्या सरकारावर फार कमी प्रमाणात अवलंबून राहतील. आर्थिक, नियोजनात्मक आणि संघटनात्मक विभागातील राजकीय हस्तक्षेप नष्ट होईल.

१०) माहितीवर आधारित आर्थिक व्यवस्थेसाठी आवश्यक समन्वयन (Synergy) सद्यस्थितीत U.G.C., उच्च अध्ययनाच्या शैक्षणिक संस्था, कारखाने, R&D संस्था, फडिंग संस्था यांमध्ये आंतरक्रिया होणे गरजेचे आहे. हे केवळ (Synergy) समन्वयन प्रक्रियेद्वारे साध्य करणे शक्य आहे. ज्यामध्ये वरील सर्व संस्था ह्या विविध कार्यक्रमांत भागीदार राहतील. परस्परांच्या कार्याची उद्दिष्टे, ध्येये आणि vision पर्यंत पोहचण्याच्या कामी परस्पर सहकार्य राहील. हे केवळ खाजगी सहभागाद्वारेच साध्य करणे शक्य होईल.

११) **तंत्रविज्ञानात्मक विकास :-** Micropchips, robots, lasers, जैविक क्षेत्र, संप्रेषण, संगणकीय तंत्रविज्ञान आणि TV Satelite मधील वाढ यासारखी तंत्रविज्ञानात्मक विकासाची बलस्थान ही माहिती क्षेत्रातील क्रांतीने घडून आलेले आहे. मर्यादित साधन सुविधेमुळे मागण्या पूर्ण करु शकत नाहीत, यासाठी खाजगीक्षेत्रांनी तंत्रविज्ञानातील मनुष्यबळास प्रशिक्षण देण्याचे काम हाती घेतले पाहिजे आणि बाजारातील मागण्यास प्रतिसाद दिला पाहिजे.

१२) शिक्षणाच्या भोक्त्यांशी (recipients) असलेली सर्वाधिक जबाबदारी वर्षानुवर्षे शिक्षणास मोफत जनसेवा म्हणून गृहित धरले जात असल्याने शिक्षणाचे अवमूल्यन होत आहे. शिक्षणाच्या खाजगीकीकरणात जेथे भोक्ता पूर्ण रक्कम मोजतो तेव्हा सहाजिकच येथे मोठी जबाबदारी येऊन पडते. परिणामतः विद्यार्थ्यांनी केलेली उच्च क्षमतेची व गुणवत्तेची मागणी ही रास्तच ठरते.

तुमची प्रगती तपासा

१) **उच्च शिक्षणाच्या खाजगीकीकरणास जबाबदार घटक कोणते?**

_____

_____

_____

_____

_____

७ब.२.४ खाजगीकीकरणाचे फायदे :-

खाजगीकीकरणाने खालील बाबीत वाढ होईल.

- शैक्षणिक संस्थाचे विकेंद्रीकरण आणि debureacratizodion
- शैक्षणिक सुधारणांमध्ये पुढाकार
- अध्यापन आणि मूल्यमापनातील नाविन्यता

- तत्पर सेवा आणि मोठ्या प्रमाणावर अभ्यासक्रम निवडीच्या व विषय निवडीच्या विद्यार्थ्यांना सोयी उपलब्ध करुन दिल्या आहेत.
- स्पर्धा
- गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि प्रशिक्षण
- जागतिक, राष्ट्रीय आणि स्थानिक गरजांनुसार अभ्यासक्रमास आकार देणे
- सर्व प्रक्रियांच्या साधनसुविधाच्या पारदर्शकतेची उपलब्धता आणि तिची योग्य देखभाल
- उदारमतवादीकरण खाजगीकीकरण आणि जागतिकीकरणा संदर्भातील देशाच्या गरजांची पूर्तता
- मानवी आणि भौतिक साधन सुविधांची योग्य मार्गाने उपयुक्तता (वापर)

७ब.२.५ खाजगीकीकरणातील भय :-

शिक्षणाच्या खाजगीकीकरणाने

- गरीबांवर त्याचा वाईट परिणाम होईल.
- न्याय, विविधता आणि खुलेपणा यांना क्षीणपणा येईल.
- समानता, चांगुलपणा आणि जबाबदारपणा या सर्व मुद्द्यांकडे कोणी लक्ष देणार नाही.
- वाढत्या फी मुळे चांगल्या शिक्षणापासून वंचित राहावे लागेल.
- जबाबदारी (दायित्त्व) च्या समस्या उद्‌भवतील.
- नागरी आणि लोकशाही मूल्य पुढे सरकली जाणार नाहीत.
- कर्मचारी कपात आणि नोकरी स्थैर्याबाबतची भिती
- खर्चाची बचत ही खर्च कपातीस पुढे नेते.
- मालकाद्वारे एकत्रित निधीचा गैरवापर होऊ शकतो.
- कुटुंब सदस्य आणि मित्र परिवारांच्या बाबतीत पक्षपात केला जाईल.
- त्या पासून मिळणारे लाभ सिद्ध करणे अवघड जाते.

तुमची प्रगती तपासा

१) उच्च शिक्षणाच्या खाजगीकीकरणाचे फायदे कोणते आहेत ?
२) उच्च शिक्षणाच्या खाजगीकीकरणाचे भय का आहे ?

_____

_____

_____

_____

_____

खाजगीकीकरणाच्या अर्थामध्येच बहुदा अनिश्चिता असल्याने त्यावर शासनाचे अल्प नियंत्रण राहते. खाजगी संस्था त्यांचा स्वतःचा निधी हा भरमसाठ फी, वापरावरील शुल्क आणि अन्य साधनांच्या पूर्ण वापराद्वारे एकत्रित केला जातो. उच्च शिक्षणास अर्थसाह्य प्राप्त करुन देण्याबाबतची सरकारची असमर्थता दूर करण्यासाठी आणि युवा पिढीस कार्यक्षम व प्रभावी शिक्षण पुरविण्यासाठी खाजगीकीकरणाची गरज उद्‌भवत आहे. येथे खाजगीकीकरणाचे असंख्य फायदे असले तरी त्याच वेळी खाजगीकीकरणाबाबतची असलेली संभाव्य भिती ही खाजगीकीकरणाच्या स्थितीस तोट्याकडे नेत आहे.

७ब.३ जागतिकीकरण

विसाव्या शतकाच्या अंतिम दशकाने जागतिक स्तरावरील सामाजिक, राजकीय, आणि आर्थिक संक्रमणे पाहिली आहे. विकासाबरोबरच झपाट्याने होणाऱ्या माहिती आणि तंत्रविज्ञान क्षेत्रातील प्रगती स्वरुपाचा आणि तिच्या आघाताचा परिणामकारक प्रभाव जगभरातील सर्व राष्ट्रांवर, समाजांवर आणि संस्कृतीवर झालेला दिसून येत आहे. या सर्वांमुळे जागतिकीकरणाचा वेग वाढला आहे.

७ब.३.१ जागतिकीकरणाची संकल्पना :-

आजकाल जागतिकीकरणाबद्दल बरेचसे बोलले जाते आणि ती अशी एक अभूतपूर्व घटना होत चालली आहे की जिचा विशेष परिणाम हा सामान्य स्वरुपात समाजावर आणि विशिष्ट स्वरुपात विविध राष्ट्रांवर होत आहे. जागतिकीकरण हे आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक पद्धतींचे एकात्मीकरण आहे आणि आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक पद्धतींचे एकात्मीकरण आहे आणि आर्थिक विकास, भरभराट आणि लोकशाही स्वातंत्र्यासाठी ह्याचा कल जगभर पसरत आहे. हे आर्थिक उदारमतवादीकरणासाठी जागतिक अर्थव्यवस्थेत स्वतंत्र व मुक्त बाजारपेठ धोरणांचा पाठपुरावा करते, याचा मुख्य हेतू म्हणजे अशा एक समान विश्व समुदायाची आवश्यकता पटविणे जेथे कोणताही सामाजिक गुंता अस्तित्त्वात राहणार नाही व तेथे केवळ सामाजिक आणि सांस्कृतिक एकात्मीकरणास आमंत्रित केले जाईल.

जागतिकीकरण हे अशा प्रकारचे आर्थिक आणि राजकीय रचनेचे खाजगीकीकरण आणि बाजारीकरण लादते की ज्यायोगे राज्याच्या तळागाळातील सर्व कृतींवर नियंत्रण ठेवणाऱ्या क्षमतांवर मर्यादा पडते आणि सहाजिकच वस्तू सेवांचा मुक्त विनिमय आणि गुंतवणूक यांच्या संयोगातून जागतिकीकरण उदयास येते.

जागतिकीकरण ही अशा प्रकारची प्रवृत्ती आहे ज्यात कोणतीही वस्तू, कृती आणि तंत्रविज्ञानास खूप खोलवर जाऊन अशा रितीने आत्मसात करणे की जे भूगोल, धर्म, लिंग आणि आवड यासारख्या लादलेल्या निकषांच्या कोणत्याही सरहद्दी पार करुन वाढेल. काहीही किंवा कोणीही असला तरी त्यावर जगभराचा प्रभाव पडतोच. जागतिकीकरण हे राष्ट्र, राज्य किंवा देशाच्या सीमा या सर्व मर्यादा ओलांडून संबंध प्रस्थापित करण्याच्या शोधार्थ आहे.

ऐतिहासिक दृष्ट्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेची मुळे ही फार मागे म्हणजे मध्ययुगातील आंतरराष्ट्रीय व्यापारात दडलेली दिसून येतात. १९व्या शतकाच्या मध्यावर

दृष्टीक्षेप टाकता आपणास दिसून येते ती वसाहतींच्या शोषणातून उदयास आलेली औद्योगिक क्रांती. २०व्या शतका दरम्यान होत असलेल्या आंतरराष्ट्रीय विनिमय प्रक्रियेच्या सातत्यपूर्ण आधुनिकीकरणाबरोबरच आंतरराष्ट्रीय कराराद्वारे त्याच्या शाखोपशाखा विस्तारल्या गेल्या. उदा. उद्योग आणि जकात विषयक सर्वसामान्य कराराने (GATT) समाजाच्या वाढत्या जागतिकीकरणास शांती आणि सुव्यवस्था प्राप्त करुन दिली.

असे असले तरी मागील काही वर्षात हा कल वाढत जात आहे. या वाढत्या कलाची वैशिष्ट्ये तीन आवश्यक घटकाद्वारे स्पष्ट होतात.

१) जगभर पसरत जाणारा आर्थिक कलाचा अवाका
२) तंत्रविज्ञानातील नाविन्यतेत होणारी वाढ; विशेषतः संप्रेषण आणि दळणवळण क्षेत्रातील वाढ
३) जनता आणि राष्ट्रातील परस्वरावलंबन समकालीन सामाजिक सिद्धांतकार आणि विश्लेषक David Harvey (१९८९-१९९९), Giddens (१९९०), Held, McGraw, Gold Blatt आणि Perraton (१९९९) यांनी सुद्धा जागतिकीकरणाची सांगड ही तीन घटकांशी घातली.

- Detritorization :- जी लोकांमधील अशा कृतींची शक्यता वाढविते ज्यायोगे सामाजिक आणि आर्थिक कृतीसाठी भौगोलिक आंतरही किरकोळ बाब ठरते. E-Commerce आणि दूरदर्शन हे लोकांना कोठेही राहून व्यापार करण्याची संमती देते तसेच दुष्काळ, महापूर, आग आणि अपघात यांचे परिणामही लोक पाहु शकतात.
- आंतरिक जुळवण (Interconnectedness) :- आंतरजालाद्वारे (Internet) सायबरच्या माध्यमातून होणाऱ्या विचारांच्या देवाणघेवाणीमधून दूरच्या घटना, दबाव आणि विचार यांचा स्थानिक आणि प्रादेशिक प्रयत्नांवर होणारा परिणाम पाहता येतो. आंतरिक जुळवण ही मानवतेसाठीच्या भावना सुद्धा निर्माण करते.
- वेग आणि गती :- सामाजिक आणि आर्थिक कार्यातील वेग आणि गती ही दळणवळण, संप्रेषण आणि माहिती तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रसारामुळे झाली आहे. ज्यामुळे भौगोलिक, प्रादेशिक तसेच आर्थिक आणि सामाजिक या सर्व मर्यादा अंधुक केल्या आहेत. लोकांच्या, माहितीच्या, भांडवलाच्या आणि वस्तूंच्या चळवळीचा वेग आश्चर्यकारक आहे.

जागतिकीकरण, प्रमाणीकरण आणि वैविध्यतेच्या परिणाम स्वरुप दोन प्रकारच्या विसंगती निर्माण झाल्या आहे. खाण्याच्या पद्धती, कपडे, जीवनशैली, संप्रेषण, भाषिक संभाव्यता यांचे प्रमाणीकरण हे समाजाच्या जीवन स्थितीत समानता निर्माण करते. दुसऱ्या बाजूस पाहता जागतिक वारस्याच्या विविध घटकांना चालना देणाऱ्या संधीद्वारे समाजाच्या अनेकविध पैलूंचे जतन करण्यासाठी वैविध्यता ही प्रयत्नांची पराकाष्ठा करते. येथे लोकांमध्ये त्यांच्या सांस्कृतिक ओळखीचे जतन, समर्थन आणि रक्षण करण्याची तीव्र इच्छा असल्याने ते एकवाक्यतेस प्रतिकूल उत्तेजन देतात.

७ब.३.२ जागतिकीकरणाची लक्षणे :-

- बहुराष्ट्रीय कंपनी संघटना आणि Transnational कंपन्यांची वाढ
- आंतरराष्ट्रीय श्रमविभागणी

- शासनकेंद्रीत योजनांपेक्षा बाजारांना दिले जाणारे उत्तेजन
- Off Share Finance आणि दूरसंचरण (Telecommunication) मधील वाढीमुळे बँका शेअरबाजार, कंपन्या आणि संघटना ह्या एकाच जागतिक साखळीने जोडल्या गेल्या आहेत.
- लोकांचे कामाच्या शोधार्थ देशांतर्गत आणि देशबाह्य होणारे स्थलांतर
- सॅटेलाईटद्वारे संपर्क साधनात झालेली वाढ ही कोणताही कार्यक्रम खात्रीपूर्वक राष्ट्राच्या सीमा ओलांडून सर्व जगभर जाऊन पसरले जात आहे.
- राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरांवरील अशासकीय संघटनांमधील वाढ (NGOs)

७ब.३.३ जागतिक / वैश्विक शिक्षण :-

जागतिक संवेदनांचा (Global Perspective) विकास करुन तरुणांना जगातील बहुविध संस्कृतीचे आकलन करुन देऊन जगात शांती आणि सुसंवाद राखण्यास सचेतन करणे हा जागतिकीकरण आणि वैश्विक शिक्षणाचा हेतू आहे. जागतिक घडामोडी, मुद्दे, वाद आणि लोकांचे परस्परावलंबन याची जाणीव सामान्य जनतेस तसेच युवा गटास असावी.

जागतिक संवेदना म्हणजे इतरांच्या भागीदारी आणि सहकार्याने वैयक्तिक किंवा सामान्य हितासाठी उपलब्ध साधनसुविधांच्या वापरास संमती देणे. अशा प्रकारची इतरांविषयीची सहानुभूती जसे, भावनांची समज आणि देवाणघेवाण, विचारांचे, भावनांचे व माहितीचे प्रकटीकरण तसेच आदानप्रदान करण्याची संप्रेषण क्षमता आणि लोक, गट, समाज किंवा राष्ट्रामधील मतभेद या सारखे संघर्षात्मक गुंते हे तडजोडीचा समाधानकारक मार्ग शोधून सोडविणे.

७ब.३.४ विश्व जगतासाठी शिक्षक आणि शिक्षण प्रशिक्षणाची व्यावसायिकता :-

शिक्षकी पेशासमोर अनेक प्रकारची आव्हाने आहेत. प्रथमतः शिक्षकांनी नवी कौशल्य, तंत्रे, पद्धती आणि मागण्या ह्या शीघ्रतेने आत्मसात करणे. दुसरे म्हणजे नव्या जबाबदाऱ्यांच्या स्वीकाराची मानसिक तयार करणे हे तेव्हाच घडेल जेव्हा शिक्षकांत व्यावसायिकता येईल.

स्पर्धात्मक मागण्या असलेला असा हा शिक्षकीपेशा आहे. शिक्षकांना अधिक मागणी असूनही जगभरात ज्यांच्याकडे उचित शिक्षण, प्रशिक्षण आणि इच्छा आहे अशांना हा पेशा आकर्षित करु शकत नाही. त्यासाठी पुढील पायऱ्यांद्वारे शिक्षक आणि या पेशांच्या व्यावसायिकतेस मदतच होईल.

- शिक्षकांच्या कार्याचे अवमूल्यन होता कामा नये.
- चांगले वेतन
- कामाच्या योग्य अटी
- लवचिक कामच्या वेळा.

- बहूजिनसी शिक्षकांच्या गरजांच्या पूर्ततेसाठी वैयक्तिक प्रशिक्षण देऊन एकजिनसी विद्यार्थ्यांचे समाधान करणे.
- अध्यापनाच्या नवनवीन पद्धतीच्या वापरायचे, समुपदेशनाचे सातत्यपूर्ण प्रशिक्षण, अभ्यासपूरक मागण्यांची जुळवणी, संगणकिकृत माहितीचा शोध आणि तिचा अन्वयार्थ लावणे.
- वर्गव्यवस्थापन, अध्यापन शैली, कामाची जागा तेथील फर्निचर रचना या सर्व बाबतींची शिक्षकास स्वयत्तता हवी.
- जगभरात वापरणे शक्य असलेली कौशल्ये व त्यांच्या वास्तविकतेचे प्रमाणीकरण शिक्षकाने आत्मसात करावे.

नव्या दमाचे शिक्षक तयार करण्यासाठी शिक्षक प्रशिक्षण प्रक्रियेत बदल घडणे जरुरीचे आहे आणि शिक्षण प्रक्रियेस सामोरे जावे लागणाऱ्या सर्व नव्या आव्हानांचा स्विकार करणे आवश्यक आहे.

वैश्विक शिक्षक निर्मितीची तयारी ही पद्धतशीररित्या घडवून आणलेल्या बदलाने शक्य आहे. हे सर्व भौतिक सुविधा, सोयी, निवडी, नेमणूका, मानव संसाधन, कौशल्य जतन, नवे तंत्रविज्ञान आत्मसात करणे त्याचे प्रशिक्षण घेणे, अभ्यासक्रमाचा स्तर उंचविणे अशा सर्व भौतिक सुविधांच्या स्वरुपात असू शकते.

आर्थिक विकास, सुबत्ता आणि लोकशाही स्वातंत्र्यासाठी जगापलीकडे जाऊन आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक पद्धती आणि रिती यांचे झालेले एकात्मीकरण म्हणजे जागतिकीकरण होय. ते आर्थिक उदारतेसाठी जगातील अर्थकारणात उदार अथवा मुक्त बाजाराच्या धोरणांचा पाठपुरावा करते. जागतिकीकरणाच्या वाढत्या कलांची लक्षणे तीन आवश्यक घटकाद्वारे स्पष्ट होतील. ती म्हणजे जगभर पसरलेल्या आर्थिक हालचाली, आदान प्रदान आणि दळणवळण क्षेत्राच्या तांत्रिक नाविन्यतेत झालेली वाढ आणि लोक आणि राष्ट्रांमधील परस्परावलंबन. Deterritorization, interconnectedness (आंतरजुळवणूकता) आणि वेग व गती या तीन घटकाच्या सहयोगाने जागतिकीकरण जोडले आहे. प्रमाणकीकरण आणि वैविध्यता अशा दोन विसंगत घटनांच्या स्वरुपात सुद्धा आपणास जागतिकीकरणाचे स्वरुप पहावयास मिळते.

तुमची प्रगती तपासा :

१) जागतिकीकरणाची संकल्पना स्पष्ट करा. त्याची महत्त्वाची लक्षणे कोणती ?
२) जागतिक मागण्यांच्या पूर्ततेसाठी शिक्षकांच्या व्यावसायिकतेस शिक्षक प्रशिक्षण कशाप्रकारे मदत करते ?

_____

_____

_____

_____

७ब.४ शिक्षण प्रशिक्षणातील स्वायत्तता :

भारतातील उच्च शिक्षण पद्धती ही जगातील सर्वात मोठ्या अशा शिक्षण पद्धतींपैकी एक आहे; आणि तिचा सातत्याने विस्तार होत आहे. ज्याचे व्यवस्थापन करणे अशक्य आहे अशा असंख्य संलग्नित महाविद्यालयाचे ओझे बऱ्याचशी नामांकीत विद्यापीठे आणि महाविद्यालये आपली पूर्वीची प्रतिष्ठा घालवून बसले आहे. सामाजिक-आर्थिक दबावाच्या वातावरणामुळे आणि जगभरात शिक्षण प्रक्रियेच्या दृष्टिकोनात होणाऱ्या बदलामुळे वरीलपैकी काही ठराविकच हे त्यांचा दर्जा आणि नावलौकिक राखू शकले नाही.

उच्च शिक्षणात वैविध्यपूर्ण कार्यक्रम, त्यांची रचना, सर्वांपर्यंत पोहचणारा अभ्यासक्रम, माहिती आणि संदेशवहनाच्या नव्या तंत्राचा वापर या सर्वांत लवचिकता आणणे हे Vision यु. जी. सी. च्या दहाव्या योजनेत निर्देशित केले आहेत. यासाठी सर्व महाविद्यालये आणि विद्यापीठांना आपली क्षमता, सामर्थ्य सिद्ध करण्याच्या दृष्टीने सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच त्यांना अध्यापनातील उत्कृष्टतेसह उच्च प्रतिच्या शैक्षणिक आणि व्यवस्थापकीय संशोधनासाठी आणि आर्थिक स्वायत्तता प्राप्त करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आले होते. त्यामागील विचार असा होता की, संलग्नीत विद्यापीठांची संबंधीत महाविद्यायले त्यांना शैक्षणिक व कार्यात्मक स्वातंत्र्याबरोबरच चांगली कामगिरी सुद्धा करुन दाखवतील.

शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात अलिकडेच 'स्वायत्ततेच्या' प्रश्नाकडे जाणीवपूर्वक लक्ष पुरविले जात आहे. आणि म्हणूनच स्वायत्ततेस शिक्षणाच्या गुणवत्ता विकसनाचे महत्त्वाचे साधन मानले जाते. ही संकल्पना यशस्वीरित्या कार्यान्वित होण्यासाठी आवश्यकता आहे ती शिक्षण प्रक्रियेतील विद्यार्थी, शिक्षक, व्यवस्थापक यांच्या इच्छाशक्तीची आणि त्यांच्या प्रामाणिक सहभागाची व त्याचबरोबर छाननी व तपासणीच्या कामात खुलेपणा ठेवण्याची वर (विद्यापीठ अनुदान आयोग) किंवा राज्य संस्थावर अवलंबून असणाऱ्यांना सुद्धा गतिशील राहण्यासाठी काही आर्थिक स्वायत्ततेची गरज असते.

७ब.४.१ स्वायत्ततेची संकल्पना :-

स्वायत्तता ही अशा प्रकारची मानसिक वृत्ती आहे जिची बरोबरी तार्कीक बुद्धीमत्ता, स्वतंत्र विचारधारा, एकाचा निर्धार किंवा त्याच्या डोक्यातून बाहेर पडलेल्या विचारांशी समान अशी वृत्ती आहे. एखाद्याने अनेकविध पर्यायातून मुक्तपणे स्वतंत्ररित्या निर्णय घेणे आणि स्वतःच्या विचारधारेतून स्व कृती आणि वृत्तींवर नियंत्रण ठेवणे, अशा रितीने स्वायत्ततेची निर्मिती झाली आहे.

व्युत्पत्तीशास्त्रानुसार स्वायत्ततेची दोन लक्षणे आहेत ती म्हणजे 'autos' स्वतःचे स्वरुप आणि 'nomos' म्हणजे प्रमाणके आणि नियम, दोन्हींचे एकत्रीकरण करुन 'autonomy' शब्द तयार होतो व त्याचा अर्थ होतो स्वं नियमने, स्वशासक आणि जबाबदारी यांचा स्वतःनेच केलेला स्विकार. स्वायत्ततेने 'स्वनिर्देशन' या कल्पनेचा परिचय तर करुन दिलाच आहे त्याचबरोबर स्वंयशासित व्यक्ती ही मान्यता दिलेल्या नियमाचे आणि तत्त्वांचे स्वतःस पालन करते. खऱ्या अर्थाने स्वायत्तता म्हणजे व्यक्तीस अन्य कोणत्याही प्रकारच्या बाह्य नियंत्रणशिवाय त्याचे किंवा तिचे स्वतःच केलेले मार्गदर्शन आणि नियंत्रणा संबंधितचे स्वातंत्र्य.

स्वायत्तता किंवा स्वातंत्र हे दायित्त्व / जबाबदारी ने जोडले गेले आहे. स्वायत्तता म्हणजे लाभधारक आणि समाजाप्रतीचे दायित्त्व / जबाबदारी होय. आणि म्हणूनच लाभधारकांच्या गरजा, सामाजिक गरजा आणि संस्थात्मक स्वायत्तता यांमध्ये योग्य संतुलन राखणे महत्त्वाचे ठरते.

७ब.४.२ शिक्षणातील स्वायत्तता :-

शिक्षणातील स्वायत्ततेची संकल्पना ही अशा रितीचा रचनात्मक उपाय आहे जो अध्ययन प्रक्रियेत सुधारणा आणि बळकटी आणण्याच्या दृष्टीने समर्थक वातावरण पुरविते. स्वायत्ततेमध्ये अशा प्रकारचे कृतीचे मुक्त स्वातंत्र असते की ज्यायोगे संस्था स्वतःचे असे नियम बनवु शकतात. शिक्षणाच्या क्षेत्रात स्वातंत्र्याची भावना प्रत्येक शैक्षणिक घटकात झिरपली जाते आणि शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये अध्ययनाच्या ध्यासासाठी आवश्यक गुंतवणूक निर्माण करते. त्यामुळे महाविद्यालयातील विविध विभागातील शिक्षक वर्ग हे कार्यात्मक दृष्ट्या ज्या ४ मूलभूत प्रश्नांशी संबंधित असतील ते म्हणजे काय शिकवायचे ? कसे शिकवायचे ? कोणास शिकवायचे आणि मूल्यांकन कसे करायचे ?

शिक्षणात स्वायत्ततेचा संबंध हा खर्चाचे अंदाजपत्रक, नियुक्त्या, विद्यार्थी प्रवेशसंख्या, अभ्यासक्रम, प्रदान करावयाच्या पदव्या, अध्यापन आणि संशोधनाचा दर्जा इ. गोष्टींनी जोडला जातो. स्वायत्ततेमुळे अध्ययन-अध्यापन प्रक्रिया सुधारणेस व बळकटीस समर्थ असे वातावरण पुरविले जाते. विकेंद्रीत व्यवस्थापन संस्कृती ही त्याच वातावरणात स्वायत्ततेस उत्तेजन देऊ शकते, असे असूनही आर्थिक स्वायत्ते शिवाय कोणत्याही संस्थेस प्रभावी संस्थात्मक आणि शैक्षणिक स्वायत्तता लाभलेली नाही.

तुमची प्रगती तपासून पहा :-

१) स्वायत्ततेची संकल्पना स्पष्ट करा.
२) शिक्षणातील स्वायत्तता म्हणजे काय ?

_____

_____

_____

_____

_____

७ब.४.३ स्वायत्ततेची गरज :-

सध्या भारतातील काही विद्यापीठे अधिक व्यापक होत असून त्यांच्याशी संलग्नीत महाविद्यालयांची संख्या वाढत आहे. विद्यापीठाचे स्वतःचेच पदव्युत्तर अभ्यासक्रम, अध्यापन आणि संशोधन कार्य करणे दिवसेदिवस कठीण होत आहे. महाविद्यालयांची व्यवस्था पाहणे, अनेकविध परीक्षांचे आयोजन करणे, निकाल आणि प्रमाणपत्रके घोषित करणे हे सर्व अवाक्या बाह्य होत आहे.

दुसरीकडे महाविद्यालयांस स्वातंत्र्याअभावी त्यांच्या स्वतःच्या विकासाच्या कामात मर्यादा जाणवतात. अनेक प्रकारच्या नियंत्रणामुळे त्यांच्या विकास कार्यात अडथळे निर्माण होतात असे त्यांना वाटते.

पुढे असे लक्षात आले की, महाविद्यालयाची चांगली कामगिरी वा निष्क्रीयता, सुयोग्य व्यवस्थापन किंवा ढसाळ कारभार, नियमितपणा वा अनियमितपणा अशा सर्व बाबी विचारात न घेता सर्वांना एक समान नियम लागू केले. त्यामुळे जी महाविद्यालये चांगली कामगिरी करीत होते त्यांनाही त्याच समान मूल्यमापनास सामोरे जावे लागले.

शिक्षकाचे शैक्षणिक स्वातंत्रही याने प्रभावित होत आहे. शहरातील विविध विभागात राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गरजा आणि अपेक्षा विचारात न घेता विद्यापीठ मंडळ हे अभ्यासक्रम ठरविणे, तो राबविणे तसेच त्याचे मूल्यमापन करणे या सारखी कामे करते. शिक्षक वर्गातसुद्धा मोजक्याच गरजांच्या पलिकडे जाऊन काही अधिक देण्याची प्रेरणा नसल्याने केवळ विद्यापीठाने नेमून दिलेल्या कार्याची पूर्तता करण्यात ते गुंतलेले असतात.

७ब.४.४ स्वायत्ततेचे प्रकार :-

मूलतः स्वायत्ततेचे दोन प्रकार किंवा दोन स्तर आहेत.

१) वैयक्तिक स्तरावरील स्वायत्तता (वैयक्तिक स्वायत्तता)

२) संस्थात्मक स्तरावरील स्वायत्तता (संस्थात्मक स्वायत्तता)

वैयक्तिक स्वायत्तता :- या स्वायत्ततेत विद्यार्थ्यांना ज्ञानाचा पाठपुरावा करण्यासाठी आणि शैक्षणिकतेस दिल्या गेलेल्या स्वायत्ततेचा अंतर्भाव केलेला असतो. शिक्षकांना (शैक्षणिक) अध्ययनासाठीचे आणि अध्यापनाचे स्वातंत्र दिलेले असते जसे की, विविध पद्धती किंवा अध्यापन शैलीचा विकास करुन नाविन्यता आणण्याचे कार्यात्मक स्वातंत्र दिलेले असते.

सातत्यपूर्ण आदानाद्वारे (inputs) आणि प्रत्याभरणातून ज्ञान संपादन क्षमता विकसित केल्याने शिक्षकाच्या भूमिकेत बदल घडून येत आहे. याद्वारेच स्वयं निर्देशित अध्यापन आणि स्वयं निर्देशित अध्ययनासाठीचे व्यावसायिक स्वांतत्र लागू होते. विद्यार्थ्यांना त्यांच्या विकासास अनुरुप, आवडीचा आणि त्यांना तो अभ्यास पेलवण्याची क्षमता व कुवत असेल अशा प्रकारच्या कोर्सची निवड करण्याचे स्वातंत्र विद्यार्थांस दिले जाते.

संस्थात्मक स्वायत्तता :- ही विद्यापीठे आणि महाविद्यालयांना कार्यात्मक स्वातंत्र प्रदान करते. यात विद्यापीठे आणि महाविद्यालयांना स्वतःची धोरणे निश्चित करण्याचे आणि कार्यक्रम राबविण्याचे स्वातंत्र्य असते. विद्यापीठ म्हणजे शिक्षक, विद्यार्थी आणि संशोधकांचा असा समुदाय आहे जो ज्ञानाच्या आदानप्रदानासाठी आणि प्रयोगशीलतेसाठी वचनबद्ध असतो. विद्यापीठाची स्वायत्तता ही विद्यापीठाच्या stakeholders च्या नियंत्रणाखाली चालते. कोणत्याही बाह्य सरकारी नोकरशाही, राजकीय पंक्षाच्या हस्तक्षेपाशिवाय चालते. प्रवेशप्रक्रिया, अभ्यासक्रम, अध्ययन, अध्यापन, परीक्षा, नियुक्त्या आणि विद्यापीठाच्या नियंत्रणकक्षेत येणारे विषय ह्या सर्वांचा कार्यभार पाहण्याचे काम प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थी यांनी मिळून करणे म्हणजे महाविद्यालयीन स्वायत्तता होय. स्वायत्तता ही विद्यापीठाच्या किंवा एका महाविद्यालयाच्या अथवा एखाद्या शिक्षकाच्या विभागाची स्वायत्तता सुद्धा असू शकते.

१) व्यवस्थापकीय स्वायत्तता :- शैक्षणिक तसेच बिगर शैक्षणिक कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करणे, परीक्षकांची नेमणूक आणि विद्यार्थी प्रवेश या सर्व गोष्टींशी संबंधित स्वायत्तता या प्रकारात मोडते.

२) शैक्षणिक स्वायत्तता :- ही पुढील चार प्रश्नांची उत्तरे देते अ) काय शिकवायचे ? ब) कसे शिकवायचे ? क) कोणास शिकवायचे ? ड) मूल्यमापन कसे करायचे ? प्रत्येक संस्थेची स्वतःची Board of studies, Academic Council /Management Council असते.

३) आर्थिक स्वायत्तता :- विविध प्रकारच्या Endowmends, consulation, courses, जागेचा वापर इ. साठी आकारलेल्या शुल्क स्वरुपातील निधीद्वारे पैसे जमा केले जातात. ह्या पैश्याच्या खर्चाचे व विनियोगाचे संपूर्ण स्वातंत्र त्या संस्थेस असते.

विद्यापीठ आणि महाविद्यालयासाठीच्या स्वतंत्रतेसाठी दोन टोकांचा अंदाज स्वायत्तता घेते. विशेषतः संलग्नीत प्रणाली साठीचा. एक म्हणजे स्वायत्तता ही लाखो विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे आयोजन व त्याची प्रमाणपत्रे तयार करण्याच्या ओझ्यापासून मुक्त ठेवते. या सर्व प्रक्रियेत विद्यापीठांची त्यांच्या अध्यापन अध्ययन, संशोधन कार्य तसेच उच्च शिक्षणातील शैक्षणिक आणि व्यवस्थापकीय नेतृत्त्व देण्याच्या कार्यापासून सुटका होत नाही. स्वायत्त पद्धतीत मापन, मूल्यमापन श्रेणी देणे आणि प्रमाणित करण्याची प्रक्रिया आणि कार्यक्रम रुपरेखा आखण्याचे, त्याची कागदपत्रे ठेवण्याचे काम असते. विद्यापीठे या जबाबदारीतून मुक्त होऊन हे काम स्वायत्त महाविद्यालयावर सोपवितांत. दुसरे असे की, स्वायत्तता ही महाविद्यालयांना सुद्धा विद्यापीठाच्या बेसुमार, बारिकसारिक तापदायक नियंत्रणापासून मुक्त ठेवते आणि त्यांना स्वतःचे कोर्सेस, अभ्यास, परीक्षा व्यवस्थापन आणि एकंदरीतच विद्यापीठाच्या सर्व पर्यवेक्षण आणि नियंत्रणाच्या कामासाठी त्यांच्या स्वतःच्या कृतीयोजना आखण्याचे पूर्ण स्वातंत्र प्रदान करते.

मूळ तत्त्व हेच आहे की, जेव्हां एखादी व्यक्ती वा गट हा मुक्त किंवा स्वायत्त असतो, तेव्हां तो नियंत्रणाखाली असलेल्या व्यक्ती वा गटापेक्षा अधिक सक्षम असतो. अर्थातच कोणीतरी एक हा त्या कृतीस जबाबदार किंवा दायीत्त्वदार असतो. परंतू येथे व्यक्ति किंवा गटाच्या दररोजच्या कार्यात कोणतीही ढवळाढवळ केली जात नाही.

तुमची प्रगती तपासून पहा :-

१) स्वायत्ततेच्या प्रकाराचे वर्णन करा.
२) स्वायत्तता [लवचिक, (स्वतंत्र)] liberating का आहे ?

_____

_____

_____

_____

_____

७ब.४.५ स्वायत्त संस्थापुढील आव्हाने :-

- स्वायत्त संस्था चालविणे हे आव्हानात्मक व समस्यात्मक आहे.
- संपादनावर संस्थेचे अस्तित्त्व अवलंबून असते. हे नेमके मुक्त आर्थिक बाजाराप्रमेणे आहे. जेथे नियंत्रित अर्थकारणापेक्षा अधिकची उत्पादनक्षमता असते.
- विद्यार्थ्यांना प्राप्त झालेल्या रोजगार संधी आणि त्यांच्यात निर्माण झालेली रोजगार क्षमता ही संस्थांच्या संपादनास साह्यभूत ठरतात.
- स्वायत्त संस्थांना स्वतःची धोरण कार्यान्वितता असावी लागते.
- त्यांनी घोषित केलेली उद्दिष्टे आणि त्यांची प्रत्यक्ष कामगिरी यात मेळ असावा लागतो.
- व्यावसायिकरणाद्वारे शिक्षकांमध्ये गुणात्मक सुधारणा घडवून आणणारे खात्रीलायक समन्वयन असावे लागते.
- स्वायत्त संस्थांना उत्कृष्टतेप्रत जाण्यासाठी उचलावी लागणारी पावले ही पुढीलप्रमाणे :
  - पाठ्यक्रम आणि अभ्यासक्रमात नाविन्यता आणणे.
  - अध्यापन कालाद्वारे मोठ्या प्रमाणात साध्य साधता येणे.
  - शिक्षकात आणि वर्गात उत्तम प्रकारची नियमितता ठेवणे.
  - उद्दिष्ट तपासणीच्या कार्याचे वरचेवर किंवा योजनापूर्वक आयोजन करणे.
  - शिक्षकांच्या शैक्षणिक स्वातंत्र्यास स्वेच्छापूर्ण पाठिंबा देणे.

७ब.४.६ स्वायत्ततेस उपकारक घटक :-

एखाद्या संस्थेस स्वायत्तता प्राप्त होण्यासाठी सामाजिक आणि राजकीय मार्ग, राष्ट्रीय सर्वानुमत आणि नवी कार्यनिती असणे महत्त्वाचे असते. या ठिकाणी कोणत्याही प्रकारच्या राजकीय आणि नोकरशाहीचा हस्तक्षेप असता कामा नये, त्यासाठी कार्यात्मक स्वातंत्र देणे जरुरी असते राज्याच्या खाजगीकामाचा आढावा घेण्यासाठी सरकार / UGC ने तज्ज्ञ समितीची नेमणूक करणे आवश्यक असते. स्वायत्त संस्थांना प्रत्याभरण देणाऱ्या monitoring cell वर विद्यापीठ पदाधिकाऱ्याची नियुक्ती केली जावी. बाह्य परीक्षण आणि मूल्यांकनाद्वारे वरचेवर घेतल्या जाणाऱ्या आढाव्यावर नजर ठेवल्यास ते संस्था सुधारणेच्या कामी मदतगार ठरू शकेल.

स्वायत्तता मिळविण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या संस्थांना स्वायत्ततेच्या उद्दिष्टांची आणि शैक्षणिक वाढीच्या हेतू संदर्भाची स्पष्टता असावी. त्यांनी भौतिक साधनांच्या सोयी-सुविधामध्ये सुधारणा करणे अत्यावश्यक असते. या ठिकाणी चांगल्या प्रतिच्या कामगिरीची आवश्यकता असते. प्रत्येक स्वायत्त संस्था / महाविद्यालयांना स्वतःची अशी Board of Studies, Governing Council आणि शैक्षणिक समित्या असाव्यात. व्यवस्थापन मंडळाचे वर्चस्व कमी असावे आणि प्राचार्यांना पूर्ण कार्यात्मक स्वातंत्र असावे. व्यवस्थापकीय मंडळात विद्याशाखेतील सदस्य तसेच शिक्षणतज्ज्ञांचा समावेश करावा.

संपूर्ण लक्ष हे सुधारित उच्च दर्जाचे कोर्स, शैक्षणिक साधन निर्मिती कार्यशाळा आणि परीक्षा यांची पुर्नरचना करण्याकडे केंद्रित करायला हवे. अभ्यासक्रम आणि नवीन कोर्सेस हे

विद्यार्थ्यांच्या आणि समाजाच्या दृष्टिकोनावर आधारित असावेत. तेथे रोजगारक्षम व्यवसाय शिक्षण असले पाहिजे.

पालक, विद्यार्थी, शिक्षक हे स्वायत्त संस्थेच्या दर्जानुसार शिक्षित व्हावेत. स्वायत्ततेचा दृष्टीकोन स्पष्ट करणाऱ्या उद्‌बोधन वर्गाचे आयोजन केले जावे.

संघटनात्मक व शैक्षणिक बदलासाठी शिक्षक मानसिक दृष्ट्या तयार असले पाहिजे. त्यासाठी लागणारे अधिकचे प्रयत्न व जबाबदाऱ्या त्यांनी स्विकारल्या पाहिजेत. शिक्षकांना मानाचा दर्जा असला पाहिजे. जे शिक्षक कार्यक्षम निष्ठावंत आहेत त्यांना नवीन अभ्यासक्रमाबाबत संशोधन करण्यासाठी, अध्यापनासाठी, उत्कृष्टतेचा पाठपुरावा करणे, शिक्षकांची आदलाबदल (Exchange) या सर्व कामासाठी प्रवृत्त करणे व या कार्यात गती आणण्यास त्यांना साह्य करणे.

तुमची प्रगती तपासून पहा :-

१) स्वायत्तता स्विकारण्यामध्ये कोणती आव्हाने आहेत ?
२) स्वायत्त संस्थासाठी कोणते घटक जबाबदार आहेत ?

_____

_____

_____

_____

_____

७ब.४.७ संस्थांना स्वायत्तेकरिता आलेल्या अडचणी :-

- **आर्थिकदृष्ट्या पूर्ण स्वायत्तता नसते :-** कारण UGC मार्फत संस्थाना निधी उपलब्ध करुन दिला जातो. म्हणूनच शासनाची / विद्यापीठाची, UGC ची मान्यता घेऊन खर्च करावा लागतो. याशिवाय अंदाजपत्रक तयार करणारी समिती ही निधी खर्चाचे प्रमाणपत्र, जमा खर्चाचे हिशेब तपासणे ही कामे एकच समिती पाहत असल्याने त्यास आणखी विलंब होतो.

- **पूर्ण शैक्षणिक स्वातंत्र्य नाही :-** विद्यापीठ-शासन, विद्यापीठीय महाविद्यालये, विद्यापीठ संलग्नता यामध्ये असणारे संबंध हे यामागील कारण आहे. येथे काय शिकवावे, कसे शिकवावे आणि कसे मूल्यमापन करावे याबाबतचे स्वातंत्र नसते. येथे बदलणाऱ्या अभ्यासक्रमाचे भय, कामाचे तास फुकट जाणे, परीक्षा कालावधी लांबणे, चुकीची माहिती देणे आणि पात्रता नसतानाही सर्वस्वी बदल करणे, याबाबतीत नियम करणे आवश्यक आहे.

- **पूर्ण प्रशासकीय स्वातंत्र नसणे :-** कारण जर सरकार किंवा UGC आर्थिक मदत करत असेल तर राज्यशासकीय योजनांची कशाप्रकारे व्यवस्था करणे, त्यावर वरच्या स्तरापासून संपूर्णतः अमंल कसा ठेवावा हे सांगण्यासाठी शासन / UGC प्रतिनिधी नेमते.

७ब.४.८ स्वायत्ततेबाबत साशंकता / भय :-

UGC फार कमी प्रमाणात स्वायत्तता देते आणि ही स्वायत्तता घेणारे फार कमी आहेत. या कारणामुळे उन्नतीसुद्धा कमी आहे. चांगल्या महाविद्यालयावरील प्रशासकीय यंत्रणेचा अंमल सोडण्यास राज्यसरकार तयार नाही. अनेकविध विद्यापीठे अशी आहेत जी नवीन योजना आंमलात आणण्यास तयार नाहीत. शिक्षक नवीन जबाबदाऱ्या अतिरिक्त कामाचा बोजा स्विकारायला तयार नाहीत. त्यांना कोणताही धोका न पत्करता कामाचा दर्जासुद्धा सांभाळायचा आहे. नकारात्मक अनुभव आणि कटु भावना यामुळे ते नाखुष आहेत, व्यवस्थापक मंडळाची मजबूती व मनमानी वाढेल असा विचार ते करतात. मुख्यत्वेकरुन येथे असे गृहीत धरले गेले आहे की, आर्थिक बाबतीतील व्यवस्थापक समितीचे गैरव्यवहार तपासायचा कोणताही मार्गच नाही.

स्वायत्तेबाबत स्पष्टता नसल्याने अशासकीय संस्थांमध्ये गोंधळ आहे. येथे साधनसुविधांची कमतरता आहे. स्वायत्ततेसाठी देशीसंस्था उपलब्ध नाहीत. केवळ विदेशी आदर्श आणि सिद्धांत उपलब्ध नाहीत. केवळ विदेशी आदर्श आणि सिद्धांत उपलब्ध आहे, जे भारतीय स्थितीत योग्य रित्या कार्य करु शकतील किंवा करु शकणारही नाही. शेवटी स्वायत्ततेबद्दलचा सामाजिक दृष्टीकोन हाच राहतो की, लोकांना काय फक्त पदवी वर विद्यापीठाची मोहरच तर लागते.

ही सर्व साशंकता (भय) हे स्वायत्ततेबद्दल असणाऱ्या अज्ञानामुळे आणि अपुऱ्या माहितीमुळे निर्माण झाले आहे. योजनेची साधक-बाधकता (बरे-वाईट) आणि त्याचे अध्यापन, अध्ययनाची गुणवत्ता, शिक्षक, विद्यार्थी आणि महाविद्यालय प्रशासक यांच्यावरील प्रभावाबाबतचे पूर्ण आकलन झालेले नसते. याचबरोबर परीक्षा आणि प्रवेश यातील गैरव्यवहाराची भिती सुद्धा आहेच.

स्वायत्त महाविद्यालये गैरव्यवहारास प्रोत्साहन देतील व त्यामुळे अप्रामाणिकपणा वाढेल. प्रवेश आणि मूल्यांकनावेळी महाविद्यालयांकडून स्वायत्ततेचा अनुचित वापर होईल ज्याने भ्रष्टाचारास पाठबळ मिळेल. शिक्षक आणि विद्यार्थी यांची फसवणूक होईल आणि प्रशासक आपल्या अधिकाराचा उपयोग मर्जीनुसार शिक्षकांवर कारवाई करण्यासाठी करतील. त्याचा शिक्षकांच्या सेवा नियमांवर, नोकरीच्या शाश्वतीवर, कामाच्या विभागणीवर परिणाम होईल.

तुमची प्रगती तपासा

१) स्वायत्ततेच्या स्विकारासंदर्भात येणाऱ्या कमीत कमी पाच साशंकता सांगा.

_____

_____

_____

_____

_____

उच्च शिक्षण संस्थांची स्वायत्ततेची कल्पना म्हणजे उचित दिशेने उचलेले पाऊल असेल असे मानले जाते. शैक्षणिक स्वायत्तता ही खर्चाचे अंदाजपत्र, नियुक्त्या, विद्यार्थी संख्या, अभ्यासक्रम, प्रदान करावयाच्या पदव्या, अध्यापन आणि संशोधन दर्जा या घटकांशी संबंधित असते. अध्ययन-अध्यापन प्रक्रियेस बळकटी आणण्यास व त्यात सुधारणा करण्यासाठी पूरक असे वातावरण स्वायत्तता पुरविते. स्वायत्तता ही वैयक्तिक तसेच संस्थात्मक स्तरावरील असू शकते ज्यात शैक्षणिक, व्यवस्थापकीय आणि आर्थिक अशा तीन प्रकारच्या स्वायत्ततेचा अंतर्भाव असतो. असे असले तरीही स्वायत्त संस्था समोर अनेक आव्हाने आहेत आणि बऱ्याच जणांना स्वायत्ततेच्या क्षमतेविषयी आणि परिणामकतेविषयी साशंकता (भिती) आहेच.

७ब.५ सारांश :

आपण या घटकात खाजगीकीकरण, त्याची गरज, फायदे आणि चिंता (भय), जागतिकीकरण, त्याची लक्षणे तसेच विश्वजगतासाठी शिक्षक आणि शिक्षक-प्रशिक्षणास कशाप्रकारे व्यावसायाधिष्ठ बनवावे याबाबत चर्चा केली. याचबरोबर आपण, स्वायत्तता, त्याची गरज आणि स्वायत्त संस्था समोरील आव्हाने, त्याचा शिक्षक प्रशिक्षण क्षेत्रातील वापर याचबरोबर त्याच्या गैरवापराचे विश्लेषण केले जावे आणि शिक्षण प्रशिक्षणात प्रभावी विकास होण्याच्या दृष्टीने काळजी घेणे कसे आवश्यक आहे या सर्वांवर चर्चा केली.

घटक समाप्ती सराव :-

१) उच्च शिक्षणातील खाजगीकीकरणाची संकल्पना स्पष्ट करा. शिक्षणात खाजगीकीकरणाची आवश्यकता का आहे ?

२) खाजगीकीकरणाच्या चांगल्या व वाईट या दोन्ही बाजूंची (Pros & Cons) चर्चा करा.

३) स्वायत्ततेची संकल्पना काय आहे ? विद्यापीठाकडून स्वायत्तता प्राप्त करण्यासाठी शैक्षणिक संस्थांना कोणत्या आव्हानांना सामोरे जावे लागते ?

४) संलग्नीत महाविद्यालयांना स्वायत्तता कशा प्रकारे मदत करु शकते ?

Suggested References :

1. Powar, K.B. and Johar, K.L.: Private Initiatives in Higher Education.

2. Tilak, J.B.G.: “The Challenging Concerns in Economics of Indian Education in Perspectives in Education Vol. 17, 2001.

1. Hallak, Jacques “Globalization and its Impact on Education.” In Mebrahtu. T Crossley. M. Johnson, D, (2000). Globalization Educational Transformation and Societies in Transition (U.K.: Symposium Books).

2. Harvey, David (1996) Justice, Nature, and the Geography of Difference (Oxford, UK: Blackwell).

3. Held, David, McGrew, Anthony, Goldblatt, David, and Perraton, Jonathan (1999), Global Transformations: Politics, Economics and Culture (Stanford: Stanford university Press)

4. Scholte, Jan Art (19960 “Beyond the Buzzword: Towards a Critical Theory of Globalization,” in Eleonore Kofman and Gillians Young (ed) Globalization: Theory and Practice (London: Pinter).

5. Tomlinson, John (1999), Globalization and Culture (Cambridge, UK: Polity Press)

6. Global Transformations website (maintained by David Held, Political Science, London School of Economics, and Anthony McGrew, International Relations, Southampton University)

7. The Globalization Website, maintained by Frank Lechner (Emory University)

8. http://www.bavside.sd63.bc.ca/home/rcoulson/globaled/perspec tive. html (accessed on 27.08.2004)

9. Palamattan V.P. : Autonomy: A Structural Innovation in Higher Education in AIU University News 2

10. Kapur, J.N. in AIU University News 2 p 131.

❖❖❖❖

८अ

शिक्षक प्रशिक्षणावरील उपक्रमशील पद्धती

घटक रचना :

८अ.० उद्दिष्ट्ये
८अ.१ प्रस्तावना
८अ.२ सहयोगी आणि सहभागी शिक्षक प्रशिक्षण
८अ.३ रचनात्मक आणि परावर्तीत शिक्षक प्रशिक्षण
८अ.४ सारांश

८अ.० उद्दिष्ट्ये :

घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हाला शक्य होईल.

- सहयोगी अध्ययन सुस्पष्ट करणे.
- सहयोगी शिक्षक प्रशिक्षणाचे घटक स्पष्ट करणे.
- सहयोगी / सहभागी गटाचा वैशिष्ट्ये विशद करणे.
- रचनात्मकवाद स्पष्ट करणे.
- रचनात्मक दृष्टीकोनाच्या ५E' चे वर्णन करणे.
- परावर्तित (Reflective) अध्यापनाची संकल्पना स्पष्ट करणे.
- परावर्तित (Reflective) शिक्षक प्रशिक्षणाचे मानक / निकष स्पष्ट करणे.
- परावर्तित (Reflective) शिक्षक प्रशिक्षणाच्या दृष्टीकोनावर चर्चा करणे.

८अ.१ प्रस्तावना :

शैक्षणिक समस्यांना निश्चित उत्तरे नसतात. कोणताही शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम शिक्षकाला समोर येणाऱ्या परिस्थितीला सामोरे जाण्यास तयार करत नाही. शिक्षक स्वतः उपलब्ध अनेक पर्यायापैकी योग्य अंतिम निर्णय घेतात. हे निर्णय योग्य किंवा अयोग्य असू शकतात. म्हणून शिक्षकाने घेतलेल्या निर्णयाचे सतत पूर्नमूल्यांकन करणे आवश्यक आहे. हे शिक्षक प्रशिक्षणातील सहभागी आणि परावर्तित पद्धतीद्वारे साध्य करता येईल. शिक्षक प्रशिक्षणातील सहयोगी अध्ययनाद्वारे भावी शिक्षकामध्ये सामाजिक आंतरक्रिया (संबंधाची) मूल्ये रुजवता येतील. परावर्तन शिक्षकाची योग्य आणि अर्थपूर्ण निर्णय घेण्याची क्षमता वाढवते. त्यामुळे ती अधिकृत निर्णय घेण्याची क्षमता वाढवते. त्यामुळे तो अधिकृत निर्णय घेणारा बनतो.

८अ.२ सहयोगी आणि सहभागी शिक्षक प्रशिक्षण :

सहयोगी अध्ययन म्हणजे काय?

सहयोगी किंवा सहभागी अध्ययन ही सांघिक प्रक्रिया आहे ज्यामध्ये सहमत झालेले ध्येय मिळविण्यासाठी सदस्य एकमेकांना पाठिंबा देतात आणि एकमेकांवर विसंबून राहतात. जीवनात आवश्यक असणारे संघ विकसित करण्याचे कौशल्य निर्माण करण्यासाठी वर्ग हे उत्तम उदाहरण आहे.

सहकारी अध्ययन ही यशस्वी अध्यापन पद्धती आहे ज्यामध्ये लहान गटातील विविध क्षमता पातळी असणारे विद्यार्थी विषयातील आकलन सुधारण्यासाठी विविध अध्ययन कृती वापरतात. गटातील प्रत्येक सभासद हा जे शिकविले आहे. त्याचे अध्ययन करणे तसेच सहकाऱ्याना शिकविण्यास मदत करणे यास जबाबदार असतात, ज्यामुळे कामगिरी केल्याची वातावरण निर्मिती होते. गटातील सदस्यांना यशस्वीपणे आकलन होईपर्यंत विद्यार्थी नेमून दिलेल्या कामगिरीवर काम करतात आणि पूर्ण करतात.

सहयोगी / सहभागी अध्ययन आंतरक्रियात्मक आहे जसे गट सदस्य, विद्यार्थी शिक्षक:

- समान ध्येय स्थापन करणे व सहभागी करणे.
- समस्या, प्रश्न, दृष्टीकोन आणि उपाय याविषयी त्याचे / तिचे आकलनाचे योगदान.
- इतरांचे प्रश्न दृष्टीकोन आणि उपाय समजण्यासाठी काम करणे व प्रतिसाद देणे.
- इतरांना बोलण्यासाठी आणि सहभागी करण्यासाठी प्रोत्साहन देणे आणि त्यांचे योगदान विचारात घेणे.
- तो / ती इतरांना जबाबदार आहे. आणि इतर त्याला / तिला जबाबदार आहे.
- तो / ती इतरांवर अवलंबून आहे आणि इतर त्याच्यावर / तिच्यावर अवलंबून आहे.

सहकारी अध्ययनाचे घटक :

स्पर्धात्मक आणि वैयक्तिक प्रयत्नापेक्षा अधिक उपयुक्ततेची हमी देणारे घटक / अटी या पुढीलप्रमाणे :

१) सकारात्मक परस्परअवलंबत्व
   १) गट यशस्वी होण्यासाठी गटातील प्रत्येक सदस्याचे प्रयत्न आवश्यक आणि अनिवार्य आहेत.
   २) त्याची / तिची स्त्रोत भूमिका / आणि कठीण काम जबाबदाऱ्यामुळे एकत्रित प्रयत्नांमध्ये गटातील प्रत्येक सदस्याचे विशिष्ट योगदान असते.

२) प्रत्यक्ष देवाण-घेवाण (संपर्क) / आंतरक्रिया
   - समस्या कशी सोडवावी याचे मौखिक स्पष्टीकरण.

- एखाद्याची माहिती दुसऱ्याला शिकवणे.
- आकलनाची तपासणी करणे.
- अध्यापन केलेल्या संकल्पनाची चर्चा करणे.
- पूर्व अध्ययन आणि वर्तमान यांचा संबंध जोडणे.

३) वैयक्तिक आणि संघ (गट) जबाबदाऱ्या / दायित्त्व

- गटाचा आकार लहान ठेवणे : गटाची जेवढा आकार लहान तेवढ्या वैयक्तिक जबाबदाऱ्या जास्त.
- प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक परीक्षा देणे.
- विद्यार्थ्याचे यादृच्छिक पद्धतीने तोंडी (मौखिक) परीक्षा घेण्यासाठी शिक्षकासमोर (गटाच्या उपस्थितीत किंवा संपूर्ण वर्गासमोर) गटाचे कार्य प्रस्तुत करण्यासाठी एका विद्यार्थ्याला बोलावणे.
- प्रत्येक गटाचे निरीक्षण करणे आणि गटाच्या कार्यात प्रत्येक सदस्याचे योगदानाची वारंवारता याची नोंद करणे.
- प्रत्येक गटातील एका विद्यार्थ्याला तपासणीसाची भूमिका देणे.
- तपासणीस इतर गटातील सभासदांना गटाच्या उत्तरामागील युक्तीवाद आणि तार्किकता यांचे स्पष्टीकरण विचारतो.
- विद्यार्थ्याने जे अध्यापन केले आहे ते इतरांना शिकवणे.

४) आंतरवैयक्तिक आणि लहान-गट कौशल्य

- सामाजिक कौशल्ये शिकवली पाहिजेत.
- नेतृत्त्व
- निर्णय घेण्याची क्षमता
- विश्वास वाढवणे
- संप्रेषण
- मतभेदांचे व्यवस्थापन करण्याचे कौशल्य

५) गट प्रक्रिया

- ध्येय कशाप्रकारे संपादन (मिळवता) येतील आणि परिणामकारक कामातील संबंध टिकवून ठेवणे याबाबत गटातील सदस्य चर्चा करतात.
- सदस्याच्या कृती उपयुक्त आहे की नाही याबाबत वर्णन करणे.
- कोणती वर्तणूक चालू ठेवावी किंवा बदलावी याबाबत निर्णय घेणे.

चांगला सहयोगी / सहभागी अध्ययन गट कसा तयार होतो?

- गटाच्या कृतीची सुरुवात प्रशिक्षण आणि गट प्रक्रियेचे आकलन यापासून सुरु होते. मार्गदर्शक चर्चेला प्रोत्साहन देऊन आणि पर्याय सुचवून सुरुवात करतो; परंतु ज्यांना

एकत्र काम करण्यात अडचण आहे. अशांवर किंवा गटावर उपायाची / निरसनाची सक्ती करत नाही.

- एका गटात ३ ते ५ लोक असतात. मोठा गट असल्याने प्रत्येकाचा समावेश करणे महत्त्वाचे ठरते.
- शिक्षक गट तयार करतात. स्वतः तयार केलेल्या गटापेक्षा हे गट अधिक चांगले काम करतात.
- विविध कौशल्य पातळी, पार्श्वभूमी, अनुभव.
- प्रत्येक व्यक्ती गटाला ताकद बळकटपणा आणते.
- गटातील प्रत्येक व्यक्ती ही त्याच्या / तिच्या शक्तीचा सहभाग तसेच इतरांच्या शक्ती. स्त्रोताचे आकलन होण्यास मदत करण्यास जबाबदार असतो.
- गटातील इतर सदस्यांसोबत एखाद्या सदस्याची गैरसोय होत असेल किंवा समाधानी नसेल तर त्याला प्रोत्साहित करणे आणि कृतीशील सहभाग होण्यास शक्ती (आधार) देणे.
- विविध दृष्टीकोन आणि अनुभवाचा अध्ययनावर सकारात्मक परिणाम होतो. ज्यामुळे समस्या निराकरणासाठी पर्याय उपलब्ध होतात. विचारात घेतलेल्या माहितीची विविधता वाढवणे.

⇒ गटाने सुस्पष्ट केलेल्या आणि आकलन केलेल्या ध्येयाबाबत प्रत्येक सभासदाचे समर्पणः-

- एखादा सभासद योगदान करत आहे की नाही हे पारखण्यासाठी गुणवत्ता श्रेणीचे गुप्तपणे न्याहाळणे हा चांगला मार्ग आहे.
- सर्व उपाय करुन झाल्यावर असहयोगी आणि असहभागी सभासदाला काढून टाकण्याचा अधिकार गटाला असतो. (त्या व्यक्तीला नंतर तिला सामावून घेणारा दुसरा गट शोधावा लागतो.)
- जर एखाद्या सभासदाला इतरांच्या थोड्या सहकार्याने स्वतः जास्त काम करत आहोत असे वाटत असेल तर ती व्यक्ती गट सोडू शकते. (अशी व्यक्तीला त्यांचे / तिचे योगदान सामावून घेणारा दुसरा गट सहजरित्या मिळवतो.)

⇒ प्रत्येक सदस्याने सुस्पष्ट केलेली आणि मान्य केलेली तत्त्वे आणि जबाबदाऱ्या यात पुढील बाबींचा समावेश होतो.

- सभेत वेळेवर उपस्थित आणि तयार राहण्यास बांधील असणे.
- वैयक्तिक टिका करणे टाळून प्रमुख मुद्द्यावर लक्ष केंद्रित करणे आणि मतभेदावर चर्चा करणे.
- काम वेळेत पूर्ण करण्याच्या जबाबदारीत सहभाग घेणे.
- ज्या गोष्टीचा अल्प अनुभव आहे किंवा कामाची, अपुरी तयारी आहे किंवा इतर चांगले करतील असे वाटेल अशा प्रकारची कठीण कामे करावी लागतील. आव्हाने स्वीकारा. परंतु तुम्हाला कोणाची मदत, प्रशिक्षण मार्गदर्शकाची आवश्यकता सांगा किंवा त्या कामाला त्याग करा आणि दुसरे काम घेऊ शकता.

सहकारी अध्ययनातील काही कृती :

१) जुळणी (Jigsaw) :

पाच विद्यार्थ्यांचा गट प्रस्थापित होतो. गटातील प्रत्येक सदस्याला विशिष्ट साधन अभ्यासण्यासाठी देतात. व नंतर ते इतर गटातील सदस्यांना शिकविण्यास सांगतात. विद्यार्थ्यांना अध्ययनात मदत करण्यासाठी महत्त्वाचे काय आहे आणि कसे शिकवावे यासाठी. संपूर्ण वर्गात समान उप-घटकांवर काम करणारे विद्यार्थी एकत्र येतात. सराव केल्यानंतर हे कुशल गट पुन्हा मूळ गटात पुनर्घटीत होतात आणि हे विद्यार्थी एकमेकांना शिकवतात.

२) विचार करा - जोडी - सहभागिता :

यामध्ये सहकारी संरचनेच्या तीन पायऱ्यांचा समावेश होतो. पहिल्या पायरीमध्ये विद्यार्थी मार्गदर्शकाने दिलेल्या प्रश्नावर शांतपणे विचार करतो. दुसऱ्या पायरीमध्ये विद्यार्थी जोडी तयार करतात आणि विचारांची देवाण-घेवाण करतात. तिसऱ्या पायरीमध्ये प्रतिसादांची इतर जोड्याशी, गटाशी किंवा संपूर्ण गटाशी सहभागीता करतात.

३) तीन - पायऱ्या मुलाखत :

गटातील प्रत्येक सदस्य इतर सदस्याला साथीदार म्हणून निवडतो. पहिल्या पायरीमध्ये सदस्य आपल्या साथीदाराला स्पष्टीकरण प्रश्न विचारुन मुलाखत घेतो. दुसऱ्या पायरीमध्ये साथीदाराची भूमिकेची अदलाबदल होते. तिसऱ्या पायरीमध्ये सदस्य आपल्या साथीदाराच्या प्रतिसादाची गटासोबत सहभागिता करतो.

४) Round Robin Brainstorming :

वर्ग चार लहान गटात विभागला जातो (४ ते ६) ज्यामध्ये एक व्यक्ती नोंद करणारा म्हणून निवडला जातो. अनेक उत्तरे असणारा प्रश्न दिला जातो. आणि या उत्तरांवर विचार करण्यासाठी विद्यार्थ्यांना वेळ दिला जातो. विचारवेळानंतर Round Robin पद्धतीने सदस्य प्रतिसादाचा एकमेकांशी सहभागिता करतात. नोंद करणारा गटातील सदस्यांच्या उद्गारांची नोंद करतो. नोंद करणाऱ्याच्या पुढील व्यक्तीपासून सुरुवात होते आणि जसे बोलावले जाते. त्याप्रमाणे क्रमाने गटातील प्रत्येक व्यक्ती उत्तर देते.

५) तीन - मिनिट पुनर्विचार :

तासिकेत किंवा चर्चेत कोणत्याही वेळेला शिक्षक थांबतात आणि जे काही सांगितले आहे त्याबाबत पुनर्विचार करण्यास ३ मिनिट वेळ देतात. स्पष्टीकरणाचे प्रश्न विचारतात किंवा प्रश्नांची उत्तरे देतात.

६) (Numbered Heads Together) जोडीने डोकी एकत्र :

चार विद्यार्थ्यांचा गट प्रस्थापित केला जातो. प्रत्येक सदस्याला १, २, ३, ४ असे अंक दिले जातात. गटाला प्रश्न विचारले जातात. प्रश्नांच्या उत्तरासाठी गट एकत्र काम करतो जेणेकरुन सर्वजण प्रश्नांची तोंडी उत्तरे देतील. शिक्षक अंकाचे उच्चारण करतात (दोन आणि प्रत्येक (२) उत्तर देण्यासाठी सांगितले जाते.)

७) (Team pair solo) गट - जोडी - एकल :

विद्यार्थी प्रथम गट म्हणून, नंतर साथीदाराबरोबर व शेवटी स्वतः समस्या सोडवतात. विद्यार्थ्यांनी ज्या समस्या प्रथम क्षमतेबाहेरच्या होत्या. त्यांना हाताळणे व यशस्वी होण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी हा तयार केले आहे. हे चिंतन अध्यापनाच्या साधारण संकल्पनेवर आधारित आहे. विद्यार्थी एकट्याने काम करण्यापेक्षा मदतीने (चिंतनाने) अधिक कामे करु शकतो. समस्येवर काम करण्यास परवानगी दिली असता. ते स्वतः (एकट्याने) काम करु शकत नाही. (प्रथम गटासोबत, नंतर साथीदारासोबत आणि विद्यार्थी प्रगती करतात ज्यावेळी ते एकटे काम करु शकतात जे काम सुरुवातीला ते मदतीने करत होते.)

८) Circle the sage :

विशेष ज्ञान (माहिती) असलेल्या विद्यार्थ्याचे इतरांशी सहभागिता करण्यासाठी शिक्षक प्रथम वर्गाचे सर्वेक्षण करतात. उदा. शिक्षक विचारतात. गणिताचे कठीण स्वाध्याय प्रश्न सोडवण्यास कोणाला शक्य येईल? मेक्सिकोला कोणी भेट दिली आहे का? (disppire salting of road) रासायनिक अभिक्रिया कोणाला माहित आहे? असे विद्यार्थी उभे राहतात आणि पूर्ण वर्गात जातात.

हे विद्यार्थी त्यांना माहीत असलेले ज्ञान स्पष्ट करतात जर इतर वर्गमित्र ऐकतात. प्रश्न विचारतात. टिपणे काढतात. सर्व विद्यार्थी पुन्हा आपल्या गटात येतात. प्रत्येक जण जे अध्ययन केले आहे. त्याचे स्पष्टीकरण करतो. प्रत्येक जण वेगवेगळ्या sage गेल्यामुळे टिपणांची तुलना करतात. जर त्यांच्यात काही मतभेद असतील तर ते गट म्हणून उभे राहतात. शेवटी मतभेद सांगितले जातात आणि सोडवले जातात.

९) साथीदार :

चार व्यक्तीच्या गटात वर्ग विभागला जातो. साथीदार वर्गाच्या एका बाजूला जातात. अर्ध्या गटाला इतर अर्ध्या गटाला शिकविण्यासाठी प्राविण्य मिळवण्यास सांगितले जाते. साथीदार समान मुद्द्यावर / विषयावर काम करणाऱ्या इतर साथीदाराशी चर्चा विचार विनिमय करु शकतात. गट पुन्हा एका साथीदार इतर वर्गमित्रांना शिकवितात. व प्रश्न विचारतात. गट आपण कसे अध्ययन केले, शिकवले किंवा ही प्रक्रिया कशी सुधारु शकतो. यावर पुर्नविचार करतो.

सहकारी अध्ययन का वापरावे?

- विद्यार्थ्यांच्या अध्ययनास आणि शैक्षणिक कामगिरीत प्रोत्साहन देते.
- विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती वाढवते.
- अध्ययन अनुभवाद्वारे विद्यार्थ्यांचे समाधान वाढवणे.
- विद्यार्थ्यांना मौखिक संप्रेषण वाढवण्यास मदत करणे.
- विद्यार्थ्यांत सामाजिक कौशल्ये विकसित करणे.
- विद्यार्थ्यात स्व-प्रतिष्ठा वाढवणे.
- सकारात्मक स्पर्धा संबंध वाढवण्यास मदत करणे.

तुमची प्रगती तपासून पहा :

१) सहकारी अध्ययनाचे घटक विषद करा.
२) असे कोणते पैलू आहेत (घटक) जे सहकार्य अध्ययन संघास उपयुक्त ठरतील ?
३) सहकारी अध्ययनाचे उपयोग सांगा.

_____

_____

_____

_____

_____

८अ.३ रचनात्मक आणि परावर्तित शिक्षक प्रशिक्षण :

परावर्तित शिक्षक प्रशिक्षण :

मागील १० वर्षात शिक्षक प्रशिक्षणात परावर्तन आणि चिकित्सक परावर्तन या संकल्पना विश्लेषणात अधिक प्रमाणात वापरत आहेत. परंतु हे स्पष्ट आहे की, या संकल्पनांमध्ये बहुधा सुस्पष्टता नाहीत. आणि विविध संकल्पना आणि पद्धतीत या कमी प्रमाणात अंतर्भूत केल्या जातात.

परावर्तन ही नैसर्गिक प्रक्रिया आहे जी भूतकाळाच्या चिंतनावर आधारित भविष्यातील कृती आणि वर्तमानातील वागणूक विकसित आणि प्रोत्साहित करते. परावर्तन चालू प्रक्रियेतील गंभीर परीक्षण, आणि सुधारित पद्धती, वैयक्तिक अध्यापनशास्त्रीय समाजशास्त्रीय (सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक, अर्थशास्त्रीय समावेश) आणि शाळा वर्ग यांच्याशी संलग्न असलेले नैतिक घटना संदर्भ आणि शिक्षकांच्या अनेकविध भूमिका यांचा संदर्भ देते. (Knowales, Cole, preswood 1994)

प्रशिक्षकांनी आणि संशोधकांनी परावर्तन संकल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. Dewey (१९३३) च्या मते, परावर्तन हे शिक्षणाचे ध्येय आहे व इतरांच्या मते, सेवापूर्व शिक्षकांचे शिक्षण अधिक परिणाकारी होण्यास मदत करते. परावर्तिततेवर शिक्षक प्रशिक्षणात परावर्तिततेचे बहुतेक अर्थ Dewey (1933) कडून घेतले आहेत. त्याच्या मते परावर्तिततेत सामान्य परिणामांना आधार देणारी निरंतर आणि काळजीपूर्वक विचारात घेतलेली मते किंवा पद्धती कृती यांचा समावेश होतो. Dewey सूचीत करतात की, परावर्तित विचारसरणीत प्रक्रिया आणि आशय या दोन वेगळ्या घटकांचा समावेश होतो. शिक्षकाबद्दल आणि परावर्तित विचार समजून घेण्यासाठी परावर्तित विचारसरणीची प्रक्रिया आणि आशय या बरोबर विचारात घेणे आवश्यक आहे.

परावर्तनाचे प्रक्रिया घटक शिक्षकाने कसे निर्णय घ्यावे यावर जोर देतात. आशय विचार करायला लावणाऱ्या गोष्टीवर भर देतात. (ज्यावेळी ते परावर्तन करतात. त्यावेळी शिक्षक किंवा भावी शिक्षक कोणत्या प्रकारचे ज्ञान मिळवतात) आशयामध्ये मुलांचे आकलन ज्यामध्ये त्यांचा दृष्टीकोन आणि विकासाच्या पातळ्याचा समावेश यांचा अंतर्भाव असतो. शिक्षकाने योग्य अध्यापन पद्धत शिक्षकाची प्रतिमा, व्यावसायिक संबंध व पाठिंबा, शाळावरील समाजाचा प्रभाव विचारात घेतला पाहिजे. त्यांना विविध शैक्षणिक वातावरण, मूल्यमापन आणि वैयक्तिक संबंध याचे ज्ञान हवे. तसेच मुले, पालक, क्षेत्र याच्याशी नैतिक बांधिलकी हवी.

Kemmis (1999) यांनी परावर्तनाच्या स्वरुपासंबंधात ५ विधाने केली आहे. जी परावर्तित शिक्षक प्रशिक्षणास काय आवश्यक करते हे सुस्पष्ट करते. तसेच परावर्तित शिक्षक प्रशिक्षण हाताळण्यास कठीण व पद्धतीत वापरण्यास अवघड मूल्यमापनास कमी आहे असे दर्शविते.

१) परावर्तन हे जैवकीय किंवा मानसशास्त्रीय दृष्ट्या सुनिश्चित नाही किंवा तो शुद्ध विचार नाही. परावर्तन कृतीची दिशा दर्शवते. तसेच सत्य ऐतिहासिक परिस्थितीतील विचार व कृतींचा संबंध दर्शविते.

२) परावर्तन बुद्धीचे व्यक्तिगत कार्य नसून एक प्रकारचा मार्ग किंवा परिकल्पना आहे हे सामाजिक संबंधाला पूर्व समज आणि आकार देतो.

३) परावर्तन हे (Regards) संबंधित मूल्याप्रमाणे मूल्य नसलेली किंवा उदासीन नसतात. ते मानवी सामाजिक सांस्कृतिक, राजकीय (Interest) (अभिव्यक्ती) स्पष्ट करतात व व्यक्त करतात.

४) परावर्तन सामाजिक पद्धतीबाबत विलग किंवा निष्क्रिय नाही तसेच सामाजिकरित्या स्विकारलेल्या मूल्यांची व्याप्ती नाही. ते कृतीने निर्माण करतात किंवा सामाजिक पद्धतीचे प्रायोगिक तत्त्वप्रणालीत रुपांतरण करतात.

५) परावर्तन ही तांत्रिक प्रक्रिया नाही तसेच नवीन कल्पनांची बांधणी करण्यासाठी शुद्ध कृतीशील बजावणी (वापर) नाही, ही एक पद्धत आहे जी संप्रेषणातील सहभाग व सामाजिक कृतीतील निर्णय घेण्याद्वारे समाज जीवनाची पूनर्बांधणी करण्याची क्षमता व्यक्त करते.

ही विधाने पुराणमतवादी क्षमतेतील बदल आणि वैयक्तिक व सामाजिक पातळीवरील परावर्तनाचे महत्त्व सांगणारे बदल अधोरेखित करतात.

परावर्तित शिक्षक प्रशिक्षणाची गृहीतके पुढीलप्रमाणे :

१) परावर्तनाची दिशा, ध्येय, उद्दिष्टे, आणि व्याप्ती ठरविणे, फलितार्थ, व चिकित्सक परावर्तित शिक्षकांना प्रोत्साहन देणे हे मूल्याधिष्ठित ध्येय आहे.

२) चिकित्सक परावर्तनात चिकित्सक कारणे चिकित्सक स्व-परावर्तन, चिकित्सक परावर्तन. चिकित्सक कृतीचा समावेश होतो.

३) अध्यापनातील दृष्टीकोनाचे संशोधानातील अध्यापनशास्त्रीय ध्येय व परिस्थितीजन्य निर्बंध यांना mediation (ध्यानधारणा) द्वारे चिकित्सक परावर्तन शिक्षकाची स्वायत्तता प्रोत्साहित करावी. ज्याद्वारे शैक्षणिक घटनेच्या संदर्भावरील प्रश्न विचारणा व समजण्यासाठी, बदलासाठी तपासणी करावी.

४) चिकित्सक परावर्तनाने शालेय शिक्षणाचे स्वरुप व ध्येय समजावे आणि त्याची सामाजिक रुपांतरणातील भूमिका सांगावी.

परावर्तित शिक्षक प्रशिक्षणातील प्रमाण :

शिक्षक प्रशिक्षणातील परावर्तित पद्धतीची प्रमाणे ६ गटात विभागली आहेत. १) गृहीतके २) ध्येय ३) काम / कामगिरी ४) आशय ५) महत्त्व आणि ६) व्याख्यान हे विभाग शिक्षक विकास पद्धतीतील चिकित्सक नियम आणि शिक्षक विकास कार्यक्रमाच्या नियोजनासाठी महत्त्वाचे आहे.

गृहीतके :

सर्व शिक्षक विकास पद्धती या शिक्षक प्रशिक्षणाचे स्वरुप आणि शालेय अध्यापन यावरील गृहीतकांवर आधारित आहे. अशा पद्धतींच्या विश्लेषणासाठी गृहीतकांचा विचार करणे आवश्यक असते.

परावर्तित दृष्टकोनाच्या गृहीतकावर शिक्षक विकास पद्धती कितपत रचलेल्या आहेत? Donald Schon, Kenneth Zeichner आणि John Smyth यांनी रचलेली गृहीतके पुढीलप्रमाणे : शिक्षक प्रशिक्षण ही वैयक्तिक व सामाजिक रुपांतरण प्रक्रिया आहे, पद्धती सिद्धांत निर्माण करतात, चांगला शिक्षक परावर्तनाचा उपासक असतो. स्वायत्त शिक्षक स्वायत्त अध्ययनकर्ता विकसित करतो.

ध्येय : शिक्षक विकास पद्धतीची समज ही पद्धतीच्या विश्लेषणाचे फलित आहे. परावर्तन शिक्षक प्रशिक्षणाचा प्रमुख उद्दिष्ट विद्यार्थी शिक्षकाला स्वायत्ततेसाठी अध्यापनाकडे प्रोत्साहित करण्यास बल देणे आहे.

➢ शिक्षक विकास पद्धती विद्यार्थी शिक्षकाला स्वायत्त अध्यापनशास्त्रात एकत्र काम करताना रुपांतरणास बल देण्यास कितपत प्रोत्साहित करते. या ध्येयायातील मूलभूत ज्ञान क्षमता, दृष्टीकोन पुढीलप्रमाणे आशय ज्ञान, अध्यापनशास्त्रीय ज्ञान, कलाकृती, कृतीक्षमता,

स्व-नियंत्रणक्षमता, संप्रेषण क्षमता, वाटाघाटी करणे, संस्थेच्या आणि सामाजिक सांस्कृतिक घटनासंदर्भात चिकित्सक मत

कामगिरी : शिक्षक विकास कामाचे स्वरुप, शिक्षक प्रशिक्षणाची गुणवत्ता निश्चित करणे या क्षेत्रात पुढील गोष्टींचा समावेश होतो.

पारदर्शकता : शिक्षक विकास कामे त्याची गृहीतके आणि ध्येय पायऱ्या, मागण्या, मूल्यक्षमता, मर्यादा आणि मूल्यमापनासंदर्भात कितपत स्पष्ट आहे ? कामातील पारदर्शकता, सावधता वाढवणे आणि पद्धती संदर्भात चिकित्सक दृष्टीकोन वृद्धींगत करणे हे शिक्षक प्रशिक्षक (Educator) किंवा कामाच्या सूचना (बाह्य स्पष्टपणा) द्वारे प्रोत्साहित करतात किंवा विद्यार्थी शिक्षकांच्या परावर्तन कामाद्वारे सहभागी स्पष्टपणा संपादित करता येते.

उपपत्ती : पद्धती एकात्मता : शिक्षक विकास कामे खाजगी व सार्वजनिक उपपत्ती आणि पद्धतीच्या एकत्रीकरणात कितपत लक्ष देतात ? एकत्रीकरण विद्यार्थी शिक्षकाची कृतीशीलता अनुभव ज्ञान आणि / किंवा प्रात्यक्षिक प्रयोग दर्शविते. प्रयोग प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असतात.

अप्रत्यक्ष संशोधनात शिकविण्याऐवजी शिकविण्यासाठी तयार करण्याच्या कामाचा समावेश होतो. संप्रेषण विकास म्हणजे काम, शिक्षण साधनाच्या निर्माणाचे विश्लेषण ध्रानी मुद्रीतपणाचे निरीक्षण) प्रत्यक्ष संशोधनाच्या शाळांवर आधारित असते. प्रत्यक्ष शिक्षणातील सर्व कामांचा यात अंतर्भाव होतो. अध्यापन शास्त्र कृतीचे नियोजन, विकास, नियंत्रण आणि विश्लेषण दोन्ही प्रकारच्या संशोधनाने स्वायत्त अध्यापनशास्त्राला प्रोत्साहन द्यावे.

सुसंगती : शिक्षक विकास कामे, ध्येय आणि प्रक्रिया यातील अनुरुपता आणि त्यांच्यातील वेगळ्या पायऱ्यातील अनुरुपता कितपत दाखवते. आंतर सुसंगती कामातील अर्थपूर्णता, हेतूपूर्वकता आणि प्रभाव वाढवते. सुसंगतीचा अभाव शिक्षणक्रमाची विश्वासहर्ता आणि विद्यार्थी शिक्षकाचे समर्पण यावर परिणाम करते.

संस्था (संघटना) : शिक्षक विकास पद्धतीचे महत्त्व, गृहीतक, ध्येय, आशय व्यवस्थापनाचे स्त्रोत, जागा, वेळ कितपत आहे ?

आशय : शिक्षक विकास पद्धतीचा आशय व्यावसायिक परिवर्तन आणि कृतीक्षेत्र अधोरेखित करते. हे त्यांचा सुसंबद्धपणा आणि विकास प्रक्रिया पारखण्यासाठी महत्त्वाचे आहे.

सुसंबद्धपणा : शिक्षक विकास कार्यक्रम हा विद्यार्थी शिक्षकाचे विचारात घेतलेले पूर्वज्ञान, अपेक्षा, रुची, गरज, अर्थपूर्णता, अभ्यासातील (माहितीचा) पूर्व / आताचा विकास, गृहीतकाची प्रस्थापित आव्हानातील योगदान आणि अध्यापनशास्त्राच्या स्वायत्तेसाठी विकासाच्या पद्धतीशी कितपत संबंधित आहे.

विकास प्रक्रिया : शिक्षक विकास पद्धतीचा आशय, विद्यार्थी शिक्षकाच्या उपपत्ती आणि पद्धतीच्या विस्तारासाठी कितपत प्रोत्साहन देते ?

महत्त्व (भूमिका) : गृहीतके आणि ध्येय जी विकास पद्धतीला दिशा देतात त्या संदर्भात विद्यार्थी शिक्षकाची भूमिका बदलते. परावर्तितता, आंतरव्यक्तिनिष्ठता, वाटघाटी, नियम हा परावर्तित परा:भिमुख दृष्टीकोनातील भूमिकेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

परावर्तिता : शिक्षक विकास पद्धत कोणत्या प्रकारच्या परावर्तनास प्रोत्साहित करते. शालेय अध्यापनशास्त्राची कोणती दृष्टी प्रोत्साहन देते? शिक्षकाच्या भूमिकेच्या व्याख्येसाठी परावर्तिता हा पाया असावा. तांत्रिक पातळीवर कृती सुधारण्यासाठी (मी काय करावे? मी माझ्या कृतीत कशी सुधारणा करावी? परावर्तन सुदुर उद्दिष्ट संपादन करण्याचे ध्येय असते. प्रात्यक्षिक पातळीवर परावर्तनाचा भर गृहीतकाचे विश्लेषण (predeposition) मूल्य आणि शिक्षक पद्धतीचे निकाल (मी माझ्या कृती कशा स्पष्ट कराव्या? माझ्या कृतीचा इतरावर काय परिणाम असेल.) यावर असतो. चिकित्सक बंधमुक्त (emancipatory) पातळीवर परावर्तनास शिक्षक पद्धतीच्या नैतिक, सामाजिक, राजकीय परिमाणांचा समावेश होतो. या पातळीवर परावर्तनात शिक्षक प्रशिक्षण प्रक्रियेतील (metacognition) दिशादर्शक तपासाच्या दृष्टीकोनाचा समावेश होतो.

या सर्व तीन पातळ्या अध्यापनशास्त्रातील स्वायत्ततेच्या विकासाला प्रोत्साहित करण्यासाठी महत्त्वाचे आहे.

आंतरव्यक्तिनिष्ठता : शिक्षक प्रशिक्षण पद्धत विद्यार्थी शिक्षकाच्या आंतरक्रिया इतरांशी कितपत एकत्र करते? व्यावसायिक ज्ञानाची रचना करणे ही वैयक्तिक व सामाजिक प्रक्रिया आहे. ज्यामध्ये शैक्षणिक पद्धतीतील वर्णन, विवेचन, प्रतिकार, पुनर्रचना याचा समावेश होतो. याचा अर्थ अर्थपूर्ण आंतरक्रियेद्वारे भूमिका पुन्हा स्पष्ट केल्या जातात. ज्या वैयक्तिक व एकत्रित समर्पणाला प्रोत्साहित करतात.

वाटाघाटी : शिक्षक विकास पद्धती वाटाघाटाच्या किती संधी निर्माण करतात? वाटाघाटीत विद्यार्थी शिक्षकाच्या स्वायत्ततेच्या विविध श्रेणीचा समावेश होतो. परंतु पूर्वनिश्चित उत्पत्तीचा वापर न करता शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम कल्पित करणे आवश्यक असते.

नियम : शिक्षक प्रशिक्षण पद्धती विकास प्रक्रियेच्या वैयक्तिक व सहकारी नियमांना कितपत समर्थ बनवते? शिक्षक शिक्षणाची स्वायत्तता वाढवण्यासाठी घटना संदर्भाचे अध्ययन आणि स्वयं-अध्ययनातील चिकित्सक सहभागाचे पर्यवेक्षण आवश्यक असते.

व्याख्यान (discourse) : परावर्तन शिक्षक प्रशिक्षणाची गृहीतके व ध्येय ही विद्यार्थी शिक्षक व शिक्षक प्रशिक्षकाच्या व्याख्यानाचे फलित आहे. विशेषत: गुणात्मक संप्रेषणात ज्याच्या गुणात्मक विकास प्रक्रियेवर लोकशाही श्रेणी आणि (Relvence) संदर्भात अधिक प्रभाव असतो.

संप्रेषण : शिक्षक प्रशिक्षण पद्धती केंद्रीत व भावदर्शी संप्रेषण कितपत एकत्रित करते.

परावर्तित शिक्षक शिक्षणाची गरज :-

शिक्षण क्षेत्रात व्यावसायिकरण हा महत्त्वाचा मुद्दा आहे. एखाद्याच्या स्वतःच्या कामावरील परावर्तन हे व्यावसायिक होण्याचा महत्त्वाचा घटक आहे (Schon 1983) आणि हे शिक्षण क्षेत्रात गरजेचे आहे. शिक्षकाने त्याच्या मान्यता, गृहीतके अध्यापनाच्या व अध्ययनाची पक्षपाती वृत्तीचे परीक्षण केले पाहिजे आणि त्या मान्यताचा वर्ग प्रक्रियेतील प्रभाव निश्चित केला पाहिजे.

- (Pre-Service) सेवापूर्व शिक्षकाने अध्यापनात वापरण्यात येणाऱ्या सांस्कृतिक baggage चे मूल्यमापन व त्याच्या सुयोग्यतेचे परीक्षण केले पाहिजे.
- अध्यापन ही बहुधा अनिश्चित, गतीशील व गुंतागुंतीची प्रक्रिया आहे म्हणून शिक्षकाने त्याच्या सुयोग्य ध्येय, अध्यापन पद्धत व विद्यार्थी अध्ययनाबाबत स्थिर निर्णय घेतला पाहिजे.
- सद्यस्थितीतील शाळा आणि समाज या दोहोंच्या अनुरुपतेस प्रोत्साहनप्वर संमतीबाबतच्या शिक्षण प्रशिक्षणाच्या दृष्टीकोनासंदर्भात अलिकडच्या काळात शिक्षण प्रशिक्षणात केलेल्या संशोधनात काळजी व्यक्त केली आहे. (O'Loughlin, 1992). हा अभ्यास अजूनही एक गोष्ट निदर्शनास आणून देतो की बऱ्याचदा अशा उपयोगशील संवेदनाचा स्विकार केला जातो. ज्यात शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रम हा अधोरेखित शैक्षणिक, सामाजिक, नैतिक पैलूंपासून वेगळा होतो व त्यामुळे काही महत्त्वपूर्ण शैक्षणिक हेतूपेक्षा तांत्रिक घटक हेच स्वयंभू ठरतात. अध्यापन पद्धतीचे सातत्यपूर्ण पूनर्मूल्यांकन शिक्षकांना त्याच्या अध्यापन व अध्ययनासंबंधित गृहीतकांबाबत प्रश्न विचारण्यास मान्यता देतात आणि अध्यापनाची शाळातील निष्क्रिय भूमिका बनण्यापासून रोखतात.

परावर्तन पद्धतीचे दृष्टीकोन :

शिक्षक प्रशिक्षणातील परावर्तन किंवा तपास-दर्शक दृष्टीकोनाचा वापर हा गुणात्मक तपास ओळखण्यावर अवलंबून आहे, ज्याच्या शोधातून आणि पूर्वनिर्धारित इच्छित शेवट अपेक्षित असतो. परावर्तन पद्धतीचा दृष्टीकोन ठरविण्यासाठी पुढील तत्त्वे विचारात घेण्याची गरज आहे.

a) विद्यार्थी शिक्षकाच्या विकासात त्याची वैयक्तिक शैली व अध्यापन तत्त्वज्ञान ज्यात नैतिक परिमाणाचा समावेश होतो याचा विचार करणे.

b) आधारभूत वातावरणातील अध्यापनातील शोध व सुधारण्यासाठी संशोधन कृती किंवा तपासाधीन दृष्टीकोनाचा वापर करणे.

c) शाळेच्या अडचणीचे स्वरुप ओळखणे ज्यामध्ये वर्ग आणि अभ्यासक्रमाचा निर्णय घेणे यांचा समावेश होतो.

d) अध्यापनातील घटना संदर्भ आणि विविध शालेय विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी क्षमता आणि गुणवैशिष्ट्याबाबत भावनिकता.

e) आवर्तनाची रचना करण्याचा प्रयत्न करणे ज्यामध्ये Practicum कृतीची तयारी जे घडले आहे त्या माहितीचे संकलन, त्याच्यावरील परावर्तन शक्य असेल तितकी (जर... नंतर) सुधारणा यांचा अंतर्भाव होतो.

f) आज्ञावलीचा प्रभाव आणि उत्पादितांचे पुरावे पुरविण्यासाठी काळजीपूर्वक प्रयत्नाने आज्ञावली / संच फलितार्थाचे नियंत्रण चालू ठेवणे.

g) सर्व शक्य (Repertoire) कौशल्य तयार करण्यास Journaling नोंदणीसाठी प्रोत्साहित करण्यासाठी विचार करण्यासाठी स्वतःच मूल्यमापनासाठी नियमित समवयस्कांशी संवाद करण्यासाठी, कर्मचारी शिक्षकांनी मुद्द्याच्या स्पष्टीकरणासाठी आणि मूल्यांच्या दृष्टकोनासाठी सूक्ष्म अध्यापनासारख्या तंत्राचा वापर करणे.

Van Manen याने परावर्तिततेच्या ३ पायऱ्या सांगितल्या आहेत. तांत्रिक, व्यावसायिक आणि चिकित्सक तिसरी आणि शेवटची पायरी म्हणजे चिकित्सक पायरी. शैक्षणिक पद्धतीतील व्याख्यानाचा भाग असणारी न्याय व समानता अशा तात्विक आणि नैतिक गोष्टी विचारात घेतल्या जातात. (Pre-service) सेवापूर्व शिक्षक प्रशिक्षणाने तिसऱ्या पायरचे ध्येय ठेवले पाहीजे. जरी ते मिळवण्यास अवघड असले तरी, परावर्तनाची दिशा दाखविणारे ४ प्रकारचे लेखन सांगितले आहे. वर्णनात्मक लेखन वर्णनात्मक परावर्तन, संभाषणात्मक परावर्तन, चिकित्सक परावर्तन, मुख्यतः पहिले परावर्तन नसून ते फक्त साहित्य व घटनांच्या नोंदी ठेवते. दुसरे वर्णनात्मक, वैयक्तिक निर्णय आणि विद्यार्थी साहित्य वाचन याच्या कारणांचा पाया पुरविण्याचा प्रयत्न करते. तिसरा प्रकार संभाषणात्मक हे एक प्रकारचे एखाद्याचे व्याख्यान, शक्य कारणाचे समन्वेषण असते. चौथे चिकित्सक म्हणजे निर्णयाचे कारण देणे किंवा ज्या ऐतिहासिक सामाजिक राजकीय घटना संदर्भ घटना मोठ्या प्रमाणात विचारात घेतल्या जातात.

Sparks - Langer यांनी अध्यापन आणि शिक्षक शिक्षणाचे तीन वेगळे मार्ग सांगितले आहे जे Van Mannen र्तन पातळ्या वर्णनात्मक, संभाषणात्मक, चिकित्सक यांच्याशी निगडीत असू शकतात. Cognitive दृष्टीकोन शिक्षकाचा अभ्यास, माहितीचे पृथक्करण आणि निर्णय घेण्याचा वापर करतो. कथाकथन (Harative) दृष्टीकोनात शिक्षक स्वतःच्या गोष्टी, प्रश्नाची रचना naturalistic (प्राकृतिक) चौकशी आणि व्यक्ति अभ्यास याद्वारे सांगतो.

चिकित्सक दृष्टीकोनात शिक्षकाने तात्विक व नैतिक कारणाचा वापर, सामाजिक आणि राजकीय घटना संदर्भ विचारात घेणे आवश्यक असते.

परावर्तन पद्धतीला प्रोत्साहन देण्यास मदत करणारे ३ दृष्टीकोन स्वयं आणि समवयस्क मूल्यनिर्धारण, समस्या आधारित अध्ययन आणि वैयक्तिक विकास नियोजन

⇒ स्वतःचे आणि समवयस्काचे मूल्यमापन :

परावर्तन पद्धतीच्या समर्थनासाठी स्वतःचे आणि समवयस्काचे मूल्यमापनाचा वापर होऊ शकतो कारण त्यात विद्यार्थ्याला स्वतःच्या अध्यापनाविषयी विचारांचा अंतर्भाव केला

जातो. Boud याने स्वतःचे आणि समवयस्काचे मूल्यमापन स्थापनाचे कार्य केले आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांची गुणवत्ता पातळी आणि / किंवा प्रमाण ओळखणे ज्याचे त्याच्या कार्यात आणि निर्णयात उपयोजन करतात. Boud नुसार स्वतःच्या मूल्यमापनात दोन पायऱ्या आहेत. a) (अध्ययन कत्यार्च आकलन) गुणवत्ता पातळी आणि प्रमाण ओळखणे b) या मानकावरुन (against) स्वतःचे निर्णय घेणे.

⇒ स्वयं मूलयमापनाचा अध्ययनाचया आणि मूल्यमापनाचे उत्पादित प्रक्रियेला प्रोत्साहित करण्यास उपयोग होऊ शकतो. स्वयं मूल्यमापनाचा अनौपचारिक पद्धतीने विद्यार्थ्यांना त्यांच्या कामाबद्दल, त्यांच्या विषयाच्या ज्ञानाबद्दल विचार करण्यासाठी उपयोग करु शकतो. समवयस्काचे मूल्यमापन परावर्तन पद्धतीला आधार देणारे (यंत्र) आहे कारण ते कर्मचारी आणि विद्यार्थ्यामधील अध्यापन आणि अध्ययन यातील संभाषण आणि सहभागी विवेचन यावर भर देतात. (Stetani 1998) विद्यार्थी एकमेकांपासून शिकतात आणि समवयस्कांनी दिलेल्या प्रतिसादाचे स्वतःचे अध्ययनाचे ज्ञान मिळविण्यासाठी उपयोग करतात. समवयस्कांच्या मूल्यमापनाचा दृष्टीकोन वापरल्यामुळे विद्यार्थी समवयस्कांच्या कामाबद्दल गुणात्मक विधाने करण्यास प्रोत्साहित होतात. (स्वतःचे आणि समवयस्कांचे मूल्यमापनाचा महत्त्वाचा उपयोग हा की, प्रत्येक नविन गटातील विद्यार्थ्यांना आपण कसे शिकतो? हे शोधण्याची समान संधी मिळते. शिक्षकांना प्रक्रिया कार्यक्षम बनवण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांना प्रतिसाद देण्याचा मोह होतो परंतु जर ही प्रक्रिया परावर्तनास आधार देत असेल तर विद्यार्थ्यांनी त्यांना काय माहित आहे काय नाही याचा शोध घेण्याची व स्वतःचे संबंध बनविण्याची गरज आहे.

समस्या आधारित अध्ययन :-

अनेक ज्ञान शाखात विद्यार्थ्यांना सत्य समस्यामध्ये गुंतवण्यासाठी समस्या आधारित अध्ययनाचा वापर होतो. पारंपारिक अध्यापनापेक्षा वेगळे PBL ची सुरुवात समस्येपासून होते आणि त्यात विद्यार्थ्याचे संशोधन निवड, विश्लेषण आणि माहितीचे उपयोजन आणि सिद्धांत याचा वापर करुन त्यांचे निराकरण करणे आवश्यक असते. परिस्थितीचे व्यवस्थापन किंवा सोडविण्यासाठी विद्यार्थी गटात किंवा संघात काम करतात परंतु त्यांच्यापासून पूर्वनिश्चित योग्य उत्तरे मिळवावी असा आग्रह नसतो. विद्यार्थ्यांना गुंतागुंतीच्या समस्यात गुंतवणे आणि त्या परिस्थितीला प्रभावीपणे व्यवस्थापनासाठी कोणती माहिती आवश्यक आहे आणि कोणते कौशल्य विकसित करावे लागेल हे ठरवणे अपेक्षित असते. (Savin – Baden 2000)

समस्या आधारित अध्ययनाची गुणवैशिष्ट्ये :

- चेतक साहित्याचा वापर करुन विद्यार्थ्यांना महत्त्वाचे समस्या प्रश्न किंवा मुद्दे याबाबत चर्चा करण्यास मदत करणे.
- ही व्यावसायिक पद्धत किंवा जीवनातील सत्य परिस्थितीची बतावणी करणारी समस्या असे प्रस्तुत करणे.
- दिलेली समस्या सोडवण्यासाठी विद्यार्थ्यांनी सुस्पष्टपणा शिकणे. मदतीच्या प्रयत्नासाठी चिकित्सक विचार करण्यास प्रोत्साहन देणे किंवा मर्यादित स्त्रोत पुरवणे.

- विद्यार्थी मार्गदर्शक (विषयतज्ञ असणे गरजेचे नाही) ज्याला समस्येचे चांगले ज्ञान आहे आणि जो संघ अध्यापन प्रक्रियेला चालना देणारा असेल. त्याच्या मदतीने गटात सहभागीपणे काम करतात. माहितीचे वर्गात किंवा वर्गाबाहेर समन्वेषण करतात.
- विद्यार्थी स्वतःच्या अध्ययनाच्या गरजा ओळखतात आणि उपलब्ध स्त्रोतांचा सुयोग्य वापर करतात.
- मूळ समस्येवर नवीन ज्ञानाचे पुर्नउपयोजन करणे आणि प्रक्रियेचे उपयोजन करणे (Boud & Feletti 1997 : 4)
- खऱ्या किंवा अभिरुप परिस्थितीवर विद्यार्थ्यांनी काम करण्याचा फायदा हा की खऱ्या समस्यावर सोपे उपाय नसतात परंतु स्त्रोत, पद्धती, किमती, तुलना व विश्लेषण आवश्यक असते. PBL चा हेतू हा आहे की विद्यार्थी, मार्गदर्शक, समवयस्क (काही वेळा बाहेरील Parties) यांच्यातील संभाषणाला चालना देणे जे प्रत्येकाला तिला / त्याच्या अध्ययन अनुभवण्यास मदत करणे.
- PBL परावर्तनाचा प्रमाणिक अनुभव किंवा घटना संदर्भ देतो. पारंपारिक समस्या निराकरणाच्या पद्धतीहून वेगळा जिथे विद्यार्थ्याला सुयोग्य स्त्रोताची दिशा दाखवली जाते. PBL विद्यार्थ्यांना स्वतःहून विचार करण्यास आणि पूर्व अनुभवाचे रूपांतर नवीन रचनेत प्रवृत्त करण्यास भाग पाडते. परावर्तन आणि अध्ययनाची प्रक्रिया, अंतिम अहवाल किंवा सादरीकरण आणि आवश्यक असल्यास मूल्य निर्धारणासाठी स्पष्टपणे वापरु शकतो. समवयस्काचे मूल्यमापन किंवा PBL वापरण्याचा फायदा असा की कायद्याचे विद्यार्थी समस्येवर एकत्रितपणे काम करु शकतात.

Mac Farlane (1998) सूचना :

परावर्तन पद्धतीच्या प्रतीकृतीमध्ये क्षमतेच्या संकल्पनेसाठी विद्यार्थ्याचे प्रभावीपणे इतराशी काम करायला शिकणे तसेच स्वतःहून शिकणे आवश्यक असते. गटकार्य स्वयं परावर्तन तसेच अध्ययन प्रक्रियेची जाणीव वाढवण्यास प्रवृत्त करते. व्यक्ती गटात गृहीत धरली जाते आणि विशेषतः जर गटाला स्वतःच्या यशस्वीतः किंवा काम करण्यातील कमजोरीचे विश्लेषण करण्यास प्रोत्साहीत करते.

- **वैयक्तिक विकास नियोजन आणि Portfolios :**

वैयक्तिक विकास नियोजन २० वर्षात अनेक वेषात अस्तित्त्वात आहे. ही व्यक्तीने स्विकारलेली स्वयं अध्ययकावर सादरीकरण आणि / किंवा संपादन आणि वैयक्तिक, शैक्षणिक आणि व्यवसाय विकासाचे नियोजन यावर परावर्तन करणारी संरचित आणि आधारप्रक्रिया आहे. शैक्षणिक हेतू असा की, विद्यार्थ्यांना स्वतःच्या विकासासाठी, विचार आणि नियोजनासाठी संरचना पुरवणे . PDP कडे अध्ययन आणि परावर्तनाचे पुरावे देणारी प्रक्रिया म्हणून पाहू शकतो. Portfolios आणि संपादनाच्या नोंदी या PDP प्रक्रिया सादर करण्याची सामान्य रुपे आहेत. PDP चा उपयोग असा की व्यक्तीला त्याच्या क्षमतेचे संपूर्ण रेखाटन पुरविणे. यात बहुधा तीन भाग आहेत (कौशल्याची पडताळा सूची (Check list) किंवा मिळवलेले सामर्थ्य, मिळविल्याचे पुरावे, कौशल्य कसे विकसित केले याचे परावर्तन भाग) PDP प्रमाणपत्रापेक्षा अधिक माहिती देतात आणि विद्यार्थ्यांना अध्ययनाच्या विचारप्रक्रियेत गुंतवतात.

PDP विद्यार्थी शिक्षकाला मदत करेल :

- स्व-मार्गदर्शक, आत्मविश्वासी, स्वतंत्र्य, प्रभावशाली अध्ययनकर्ता बनणे.
- ते कसे अध्ययन करतात हे समजणे आणि त्याच्या अध्ययनाचा मोठ्या प्रमाणावर घटना संदर्भाशी संबंध लावणे.
- व्यावसायिक व्यवस्थापन आणि अभ्यासाची सामान्य कौशल्य सुधारणे.
- वैयक्तिक ध्येय स्पष्ट करणे आणि संपादनासाठी प्रक्रियेचे मूल्यमापन करणे.
- जीवनात अध्ययनाबाबत सकारात्मक दृष्टीकोन प्रोत्साहित करणे.

Portfolio हा विद्यार्थ्यांनी परावर्तित लेखन वापरणे आणि त्यांना परावर्तनाचे पुरावे पुरविण्याची कल्पनाची ओळख देण्यास उपयुक्त मार्ग आहे. PDP हा विद्यार्थ्यांना काय माहित आहे, काय माहित नाही आणि त्याच्यातील ज्ञानाची पोकळी भरण्यासाठी कोणते कौशल्य विकसित करावे, जेणेकरुन त्याची व्यावसायिक सुधारणाची समज याबद्दल विचार करण्यास प्रवृत्त करण्याचा मार्ग आहे.

⇒ **परावर्तित शिक्षक शिक्षणाचे फायदे**

परावर्तित शिक्षक शिक्षण

- शिक्षकाने अध्यापनाचे विश्लेषण, चर्चा, मूल्यमापन, स्वतःची पद्धत बदलणे, विश्लेषणात्मक दृष्टीकोन स्विकारणे त्यासाठी सक्षम करणे.
- शिक्षकांना ज्यात सामाजिक व राजकीय घटनासंदर्भात काम केले आहे त्याची समज जाणीव करुन देणे. शिक्षकाचे अध्यापन हे ज्या सामाजिक आणि राजकीय परिस्थितीत घडते आहे त्या संदर्भातील शिक्षकाच्या कामगिरीविषयक कृतज्ञता व त्याच्या विश्लेषणात्मक बाबींचाही समावेश होतो हे मान्य करण्यास मदत करणे.
- शिक्षकांना वर्ग पद्धतीमध्ये सूचित तात्विक आणि नैतिक मूल्याचे महत्त्व ओळखणे, ज्यामध्ये चांगल्या अध्यापनाचे समजाचे चिकित्सक परीक्षणाचा समावेश करण्यास सक्षम करणे.
- शिक्षकांना स्वतःच्या व्यवसायिक विकासासाठी मोठ्या जबाबदाऱ्या स्विकारण्यासाठी आणि व्यवसायिक स्वायत्ता संपादन करण्यास प्रोत्साहन देणे.
- शिक्षकाच्या शैक्षणिक पद्धतीतील सिद्धातांचे विकसन आणि वर्ग कार्यासाठी तत्त्वांचे विकसन आणि आकलनाला चालना देणे.
- शिक्षकांना भविष्यातील शिक्षणावर योग्य दिशा देण्यास, प्रभाव पाडण्यास आणि निर्णय घेण्यात जास्त कृतीयुक्त सहभाग घेण्यास भर देणे.

★ **परावर्तन शिक्षक प्रशिक्षण पुढील विकासास मदत करते.**

- समस्या निराकरण आणि चिकित्सक परावर्तन कौशल्य
- संप्रेषण कौशल्य
- बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता
- संघात काम करण्याची पात्रता
- Networking चे कौशल्य

- संप्रेषण तंत्रज्ञान वापरणे व उपयोजनाची क्षमता
- विविध अध्ययन गरजा सांगण्याच्या क्षमतेची जाणीव
- शैक्षणिक वातावरण बदलण्याची जाणीव आणि तरुण लोकांनी असे वातावरण प्रभावीपणे हाताळण्यास सक्षम असण्याची जाणीव

★ रचनात्मक शिक्षक प्रशिक्षण

रचनात्मकवाद हा आपल्याला आकलन किंवा ज्ञान कसे होते याचा तांत्रिक दृष्टीकोन आहे.

व्याख्या : रचनात्मकवाद हे अध्ययनाचे तत्त्वज्ञान आहे जे आपल्या अनुभवाचे परावर्तन. ज्या जगात राहतो त्याबाबतचे रचलेले आपले आकलन या आधारावर तयार केलेले आहे. प्रत्येकजण आपल्या अनुभवाची अनुभूती घेण्यासाठी स्वतः नियम आणि बौद्धिक प्रतिकृती निर्माण करतो. म्हणून अध्ययन ही नवीन अनुभवांच्या मदतीने आपली बौद्धिक प्रतिकृती समजून घेण्याची साधी प्रक्रिया आहे.

★ या तत्त्वज्ञानाची तीन प्रमुख विधाने पुढीलप्रमाणे :

१) आकलन हे आपली वातावरणाशी आंतरक्रिया आहे. ही रचनात्मकवादाची मूळ संकल्पना आहे. आपण जे समजतो ते आशयाचे कार्य, घटना संदर्भ अध्ययन कर्त्याची कृती आणि अध्ययनकर्त्याचे ध्येय असते. 'Cognition' हे वैयक्तिक नसून संपूर्ण घटना संदर्भाचा भाग आहे याचाच अर्थ Cognition हे विभागलेले असते.

२) मतभेद (Cognitive) हे अध्ययनाची चेतना आहे आणि ते अध्ययनाचे स्वरुप आणि गट निश्चित करते. अध्ययन कर्त्याचे puzzlement ही चेतना आणि अध्ययनाचे आयोजक आहे.

३) आकलन सामाजिक वाटाघाटी आणि वैयक्तिक आकलनाच्या सफलक्षमतेचे मूल्यमापन यातून प्रकट होते.

★ रचनात्मकवादाची काही मार्गदर्शक तत्त्वे :

१) अध्ययन म्हणजे अर्थाचा शोध - म्हणून अध्ययनाची सुरुवात विद्यार्थ्यांनी भोवतालच्या मुद्द्याच्या अर्थाची रचना कृतीयुक्त प्रयत्नापासून होते. अर्थासाठी संपूर्ण आणि अंशतः आकलनाची गरज असते आणि भागाचे आकलन हा संपूर्ण घटना संदर्भाबाबत असावे. म्हणून अध्ययन प्रक्रिया मुख्यत्त्वे संकल्पना वर लक्ष केंद्रीत करते. वेगळ्या तथ्यावर नाही.

२) अध्ययन ही कृतीशील प्रक्रिया आहे ज्यामध्ये अध्ययनकर्ता विचारशक्तीचे आदान (माहिती) वापरुन त्यापासून अर्थ तयार करतो. या कल्पनेच्या पारंपारिक सूत्रबद्ध मांडणीत कृतीशील अध्ययनकर्त्याची परिभाषते (Dewey भाग) जी अध्ययनकर्त्याने काहीतरी करण्याच्या गरजेवर भर असतो याचा अंतर्भाव होतो. हे अध्ययन ज्ञानाचा निष्क्रिय स्विकार नसून जे बाहेर अस्तित्त्वात असते पण अध्ययनात अध्ययनकर्त्याची जगाशी गुंतवणूक यात समाविष्ट असते.

३) (लोकांचे अध्ययन प्रकृतीनुरुप अध्ययन होणे) अध्ययनात या अर्थाची रचना आणि अर्थाच्या मांडणीची रचना करणे याचा अंतर्भाव असतो. उदा. जर आपण कालगणना

विद्येत ऐतिहासिक घटनाच्या मालिकाचा अर्थ शिकत असलो तर त्याबरोबर आपण कालगणन विद्येचा अर्थ शिकत असतो. आपण रचना केलेला प्रत्येक अर्थ आपल्याला दुसऱ्यांना अर्थाची संवेदना देण्यास चांगला बनवतो जो त्या समान प्रकाराला अनुरुप असतो.

४) अर्थाच्या रचनेची अवघड कृती ही बौद्धिक असते ती मनात घडते. शारीरिक कृती Hand on कृतीची अध्ययनासाठी आवश्यकता असते. विशेषतः लहान मुलासाठी हे पुरेसे नसते. आपल्या मन आणि हात गुंतविण्यासाठी कृती पुरविण्याची आवश्यकता असते.

(Dewey नुसार ही परावर्तित कृती आहे.)

५) अध्ययनात भाषेचा अंतर्भाव होतो जी भाषा आपण वापरतो. अनुभव सिद्ध पातळीवर संशोधकानी नोंद केली आहे की लोक असे शिकतात तसे आपसात वार्ता करतात. सामान्य पातळीवर मतभेदांचे संकलन असते हे Vygotsky याने जास्त भर देऊन मांडले आहे. त्यात भाषा आणि अध्ययन एकमेकात विणले आहे.

६) अध्ययन ही सामाजिक प्रक्रिया आहे. आपले अध्ययन हे आपले इतर व्यक्तीशी संबंध आपले शिक्षक, आपले समवयस्य, आपले कुटुंब तसेच औपचारिक मान्यता ज्यात आपल्या आधीचे लोक आणि आपल्या नंतरचे लोक दर्शवतात. यांच्याशी दृढपणे संलग्न असतात. जर आपण या तत्त्वांना टाळण्यापेक्षा ओळखले तर आपण आपल्या शिक्षण प्रयत्नात अधिक यशस्वी असतो. Dewey नुसार पारंपारिक शिक्षण अध्ययनकर्त्याला सामाजिक आंतरक्रियापासून वेगळे करते आणि शिक्षणाला अध्ययनकर्ता आणि अध्ययनाचे उद्दिष्ट, साहित्य यांच्यात One on One एकाशी एक संबंध दाखविते त्याउलट Dewey नुसार पुरोगामी शिक्षण अध्ययनाचे सामाजिक पैलू ओळखतात. आणि संभाषण, इतरासोबत आंतरक्रिया आणि अध्ययन ज्ञानाचे उपयोजन अध्ययनाचा अविभाज्य पैलू आहे यांचा वापर करतात.

७) अध्ययन हे संदर्भाधिन असते : आपण कोणत्या वेगवेगळ्या घटना किंवा सिद्धांताचे अध्ययन हे अमूर्त पातळीवर किंवा जीवनातील इतर घटकांपासून दूर राहून करीत नाही, तर आपले अध्ययन हे आपल्याला ज्ञात असलेल्या गोष्टी, आपला ज्यावर विश्वास आहे अशा बाबी आणि आपले पूर्व अंदाज व आपले भय यातील संबंधाद्वारे होत असते. अध्ययन हे कृतीशील आणि सामाजिक असते या सिद्धांत विचाराचा मुद्दा खऱ्या अर्थाने परावर्तनाद्वारे स्पष्ट होतो. आपण अध्ययनास आपल्या जीवनापासून अलग ठेवूच शकत नाही.

८) एखाद्याला अध्ययनासाठी ज्ञानाची गरज असते. पूर्व ज्ञानावर आधारित विकसित केलेल्या संरचना शिवाय नवीन ज्ञान आत्मसात करणे शक्य नाही. जितके जास्त आपल्याला ज्ञान तेवढे आपण अध्ययन करतो. त्यामुळे अध्यापनाचा कोणताही प्रयत्न अध्ययन कर्त्याशी संबंधित असावा आणि अध्ययन कर्त्याच्या पूर्व ज्ञानावर आधारित विषयाशी संबंधित मार्ग पुरवावा.

९) अध्ययनाला वेळ लागतो. अध्ययन हे तत्क्षणिक नाही. अर्थपूर्ण अध्ययनासाठी आपल्याला कल्पनांना पुर्नभेट, त्याचे चिंतन, त्यांचा प्रयत्न त्याच्याशी खेळ, त्यांना वापरणे आवश्यक आहे. तुम्ही जे शिकला आहात त्यावर परावर्तन केले तर तुम्हाला कळेल की, ते नियमित प्रकटीकरण आणि विचाराचे उत्पादित आहे. सखोल समजासाठी व तयारीसाठी लागणारा मोठा कालखंड विशद करता येतो.

१०) अध्ययनात प्रोत्साहन प्रमुख घटक आहे. ते फक्त प्रोत्साहित अध्ययनाला मदत करते तसेच अध्ययनासाठी आवश्यक आहे. इथे विशद केलेली कल्पना विस्तारित केली आहे. ज्यात ज्ञानाच्या वापराचे आकलनाचे मार्ग अंतर्भूत केले आहे. जोपर्यंत आपल्याला (का चे कारण) माहित नसेल तो पर्यंत आपण आपल्यातील ज्ञानाचा वापर अंतर्भूत करणार नाही.

रचनात्मकवादाची ५E प्रतिकृती :

५E ही अध्ययनातील रचनात्मक पद्धतीवर आधारित सूचनात्मक प्रतिकृती आहे. ज्याच्याप्रमाणे अध्ययनकर्ता स्वतःच्या जून्या कल्पनावर नवीन कल्पना रचतात किंवा तयार करतात. ५E ही सर्व वयाच्या विद्यार्थ्यांबरोबर ज्यात प्रौढांचा समावेश होतो वापरु शकतो.

प्रत्येक ५E अध्ययनाच्या अवस्थेचे वर्णन करतो आणि प्रत्येक अवस्थेची सुरुवात 'E' अक्षराने होते. लक्ष वेधणे, समन्वेषण करणे, स्पष्ट करणे, तपशीलवार सांगणे आणि मूल्यमापन करणे. ५E विद्यार्थी आणि शिक्षकांना समान कृतीचा अनुभव घेण्यास, पूर्व ज्ञान आणि अनुभव बांधण्यास आणि वापरण्यास, अर्थ लावण्यास, संकल्पनाच्या आकलनाचे निरंतर मूल्यांकन करण्यास मान्यता देते.

१) **Engage (गुंतवणे) :** ५E च्या या अवस्थेत प्रक्रिया चालू होते. विद्यार्थी साधनांशी भेटतात. प्रश्न निश्चिती करतात. त्याच्या कामगिरीची पूर्वतयारी बनवतात. नवीन पद्धत अज्ञातापासून संबंध तयार करतात आणि सुसंबद्धपणा ओळखतात. गुंतवणे प्रक्रियेत पुढील गोष्टी कराव्या.
   १) पूर्व आणि आताच्या अध्ययन अनुभवांचा संबंध तयार करणे.
   २) अपेक्षित कृती करणे आणि विद्यार्थ्याच्या चालू कृतीवरील अध्ययनाच्या उत्पादनावर विचारावर लक्ष केंद्रीत करणे. विद्यार्थी अध्ययनातील संकल्पना प्रक्रिया आणि कौशल्यात बौद्धिकरित्या गुंतले पाहिजेत.

२) **Explore (समन्वेषण) :** ५E ची ही अवस्था विद्यार्थ्यांना अनुभवांचा सामान्य पाया पुरवते. विद्यार्थी साधनांशी प्रत्यक्षपणे समरसतात. चौकशी प्रक्रिया चालू करते. गटकार्य ज्ञानाचा पाया बांधण्यास, सहभागी करण्यास वापरतात. ते संकल्पना प्रक्रिया आणि कौशल्य ओळखतात व विकासित करतात. या अवस्थेमध्ये विद्यार्थी कृतीने त्याच्या वातावरणाचे समन्वेषण करतात व साधने बदलतात.

३) **Explain (स्पष्टीकरण) :** ५E ची ही अवस्था त्यांनी समन्वेषण केलेले शोध प्रक्रिया, संकल्पना स्पष्ट करण्यास मदत करतात. त्यांना संकल्पनाच्या ज्ञानाचे शाब्दिकीकरण किंवा नवीन कौशल्य वर्तणूकीचे सादरीकरण करण्याची संधी असते ही अवस्था शिक्षकाने औपचारिक शब्दांची ओळख, व्याख्या आणि संकल्पना, प्रक्रिया, कौशल्य किंवा वर्तणूकीचे स्पष्टीकरण करण्याची संधी पुरवतात.

४) **Elaborate (विवेचन) :** ५E ची ही अवस्था विद्यार्थ्यांचे संकल्पनाचे आकलन वाढवते आणि त्यांना कौशल्य आणि वर्तणूक वापरण्याची संधी देते. नवीन अनुभवाद्वारे अध्ययनकर्ता, मोठ्या संकल्पनेबाबत सखोल आणि विस्तृत आकलन विकसित करतो.

आवडीच्या क्षेत्राबाबत अधिक माहिती मिळवतो आणि कौशल्यात सुधारणा करतो ते आपले अध्ययन इतर परिस्थितीवर उपयोजित करतात, जी नवीन तपासाला मार्गदर्शक ठरते.

५) **Evaluate (मूल्यमापन) :** ५E ची ही अवस्था अध्ययनकर्त्याला त्याच्या आकलनाचे व क्षमतेचे मूल्यमापन करण्यास प्रोत्साहित करते आणि शिक्षकाना विद्यार्थ्यांच्या संकल्पनेच्या आकलनाचे आणि कौशल्य विकसनाचे मूल्यमापन करण्यास सांगते. यात (Rabricks) पडताळा सूची, शिक्षक मुलाखती Portfolios, समस्या आधारित अध्ययनाचे उत्पादित आणि अंतभूत मूल्यमापनाचा वापर होतो. निकालाचा वापर मूल्यमापनासाठी आणि सूचनात्मक गरजा सुधारण्यासाठी होतो.

★ **रचनात्मक वर्गाची वैशिष्टे :**

विद्यार्थ्यांची स्वायत्तता आणि उपक्रमशीलता स्विकारणे आणि प्रोत्साहित करणे, शिक्षक विद्यार्थ्यांना त्याच्या कल्पनांचा आदर करुन आणि स्वतःच्या विचारांना प्रोत्साहन देऊन विद्यार्थ्यांना त्यांची स्वतःची बौद्धीक ओळख संपादन करण्यास मदत करतात. विद्यार्थी जे प्रश्न आणि मुद्दे तयार करतात आणि नंतर त्यांचे विश्लेषण करुन उत्तरे मिळवून स्वयं अध्ययनाची जबाबदारी घेतात आणि समस्या सोडवणारे बनतात.

- शिक्षक मुक्त बद्ध प्रश्न विचारतात आणि प्रतिसादासाठी वेळ देतात. परावर्तित विचार वेळ घेतात आणि बहुधा ते इतरांच्या कल्पना आणि विधानांवर तयार होतात. ज्या प्रकारे शिक्षक प्रश्न विचारतात आणि विद्यार्थी प्रतिसाद देतात त्याप्रमाणे विद्यार्थी चौकशीच्या यशस्वीतेची संरचना होते.
- उच्च पातळीच्या विचारसरणीला प्रोत्साहन दिले जाते. रचनात्मक वादी शिक्षक विद्यार्थ्यांना साध्या वास्तविकांवर आधारित प्रतिसादाच्या पलीकडे पाहण्यासाठी आव्हान देतात. तो विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पनांचे विश्लेषण करुन, पाककथन, न्याय देणाऱ्या, पाठिंबा देणाऱ्या संकल्पनाचा सारांश सांगण्यास व संबंध लावण्यास प्रेरित करतात.
- विद्यार्थ्यांना शिक्षक आणि इतरांबरोबर संभाषणात गुंतवणे. सामाजिक व्याख्याने विद्यार्थ्यांना त्याचे विचार बदलण्यास किंवा बळकट करण्यास मदत करतात. जर त्यांना त्यांनी विचार केलेल्या आणि ऐकलेल्या कल्पनांचे सादरीकरण करण्याची संधी मिळाली तर विद्यार्थी त्यांना जे आकलन झाले त्यावर वैयक्तिक ज्ञानाचा पाया तयार करु शकतात. जेव्हा त्यांना स्वतःच्या कल्पना व्यक्त करण्यास पुरेसे योग्य वाटेल तेव्हा वर्गात अर्थपूर्ण संभाषण होईल.
- विद्यार्थ्यांना सिद्धांताना आव्हान देणाऱ्या अनुभवात गुंतवणे आणि चर्चा करण्यास प्रेरित करणे. जेव्हा विद्यार्थ्यांना भाकित करण्याची परवानगी मिळते तेव्हा विद्यार्थी बहुधा नैसर्गिक दृश्य घटना बाबत विविध सिद्धांत निर्माण कातात. रचनात्मकवादी शिक्षक विद्यार्थ्यांना अनुभवावरील गट चर्चाद्वारे त्याच्या सिद्धांताची पडताळणी करण्यास पुरेशी संधी देतात.
- वर्ग कच्ची माहिती, प्राथमिक स्त्रोत, कौशल्य असणारी भौतिक आणि आंतरक्रिया करणारी साधने यांचा वापर करतात.

रचनात्मकवादी दृष्टकोन विद्यार्थ्यांना सत्य जगातील शक्यतांचा अंतर्भाव करतात आणि नंतर त्यांना दृश्यघटना एकत्रित बांधणारा सारांश निर्माण करण्यास मदत करते.

रचनात्मकवादी वर्गात अध्यापन हे...

रचले जाते :

विद्यार्थी हे ज्ञान कोरता येणाऱ्या कोऱ्या पाट्या नसतात. ते आधीच तयार केलेल्या ज्ञान, कल्पना आणि आकलनाद्वारे अध्ययन परिस्थितीत येतात. हे पूर्वज्ञान निर्माण होणाऱ्या नवीन ज्ञानासाठी कच्चा माल असतो.

कृती :

विद्यार्थी हा त्याच्या / तिच्यासाठी नवीन आकलन निर्माण करणारी व्यक्ती असते. शिक्षक मार्गदर्शन नियंत्रण आणि सूचना देतात. परंतू विद्यार्थ्यांना अनुभव घेण्यास, प्रश्न विचारण्यास, काम नसणाऱ्या गोष्टी हाताळण्यास परवानगी देतात. अध्ययन कृतीमध्ये विद्यार्थ्याच्या पूर्ण सहभागाची (Hand on प्रयोग) आवश्यकता असते. अध्ययन प्रक्रियेत विद्यार्थ्याने त्याच्या कृतीबद्दल परावर्तन, बोलणे हा महत्त्वाचा भाग आहे. विद्यार्थी त्याचे स्वतःचे ध्येय आणि मूल्यमापनाचे अर्थ तयार करतात.

परावर्तन :

विद्यार्थी स्वतःची अध्ययन प्रक्रिया नियंत्रित करतात आणि स्वतःच्या अनुभवावर परावर्तनाद्वारे मार्गक्रमण करतात. ही प्रक्रिया त्यांना त्याच्या स्वयं अध्ययनात निष्णात बनवते. शिक्षक वैयक्तिक अथवा गट चर्चाद्वारे विद्यार्थ्यांना त्याच्या प्रक्रियावर प्रश्न विचारण्यास आणि परावर्तनास योग्य परिस्थिती निर्माण करतात. शिक्षकाने विद्यार्थ्यांना त्याच्या / तिच्या पूर्वज्ञान आणि पूर्वानुभवावर परावर्तन करणाऱ्या कृती निर्माण करायला हव्यात. जे अध्ययन केले आहे आणि ते कसे केले आहे याबाबत बोलणेही अत्यंत महत्त्वाचे आहे.

सहभागी :

रचनात्मकवादी वर्ग विद्यार्थ्याच्या सहभागावर मुख्यतः अवलंबून असतो. अध्ययनात सहभागाचे योगदान का असते याची अनेक कारणे आहेत रचनात्मकवादामध्ये याचा वापर करण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे विद्यार्थी स्वतःहून अध्ययनाबाबत अध्ययन कतात. त्यांच्या समवयस्काकडून अध्ययन करतात. जेव्हा विद्यार्थी एकत्रितपणे त्यांच्या अध्ययन प्रक्रियेवर पुर्नविचार व परावर्तन करतात तेव्हा ते एकमेकापासून तंत्र आणि पद्धती घेऊ शकतात.

चौकशी आधारित :

रचनात्मकवादी वर्गात प्रश्न सोडवणे ही महत्त्वाची कृती आहे. विद्यार्थी प्रश्न विचारण्यास, मुद्द्याच्या तपासासाठी चौकशी पद्धतीचा वापर करतात. आणि उपाय व उत्तरे शोधण्यास वेगवेगळ्या स्त्रोताचा वापर करतात. विद्यार्थी मुद्द्यांचे जसे समन्वेषण करतात तसे ते निष्कर्ष काढतात समन्वेषण जसे चालू राहते तसे ते त्या निष्कर्षावर परत येतात. प्रश्नांचे समन्वेषण अधिक प्रश्नाकडे नेतात.

मूल्यमापन :

विद्यार्थ्यांना कल्पना असतात ज्या नंतर त्यांना कळते की नवीन अनुभवांना स्पष्टीकरणासाठी, अवैध, सदोष किंवा अपुरे पडतात या कल्पना ज्ञानाच्या साकल्यातील तात्पुरत्या पायऱ्या असतात. उदा. मुलाला जोपर्यंत सदाहरित वनांना भेट देत नाही तोपर्यंत सर्व झाडे पडण्याच्या वेळी पाने गाळतात असे वाटते. रचनात्मकवादी अध्यापनात विद्यार्थ्यांच्या चालू समजाचा आणि रचनांचा समावेश केला जातो.

जेव्हा नवीन माहितीचा अंश मिळतो तेव्हा काय होते? रचनात्मकवादी प्रतिकृतीनुसार विद्यार्थी ही माहिती त्याच्या / तिच्या पूर्व ज्ञानाबरोबर आणि आकलनाबरोबर तुलना करतो.

पुढील तीन पैकी एक गोष्ट होऊ शकते.

१) ही नवीन माहिती त्याच्या पूर्वज्ञानाशी चांगल्याप्रकारे जुळते (हे पूर्वज्ञानाशी Consonant) म्हणून विद्यार्थी याचा त्याच्या / तिच्या आकलनात समावेश करतात. यासाठी थोडे काम करावे लागते. परंतु (कोड्याप्रमाणे सुयोग्य जुळणारे) शोध घ्यावा लागतो.

२) माहिती पूर्व ज्ञानाशी जुळत नाही (dissonant) नवीन माहितीशी सुयोग्य जुळण्यासाठी विद्यार्थी त्याचे / तिचे पूर्व आकलन बदलते. हे कठीण काम असू शकते.

३) माहिती पूर्व ज्ञानाशी जुळत नाही आणि दुर्लक्षित केली जाते विद्यार्थ्यांनी न घेतलेल्या माहितीच्या भागाचा अस्विकार केला जातो किंवा विद्यार्थ्यांच्या आकलनाच्या विकासापर्यंत आणि जुळवण्यापर्यंत त्या तशा अवतीभवती राहतात.

पांरपारिक वर्ग आणि रचनात्मकवादी वर्ग यातील फरकांचा सारांश पुढीलप्रमाणे :

पारंपारिक वर्ग	रचनात्मकवादी वर्ग
१. अभ्यासक्रमाची सुरुवात संपूर्णाच्या काही भागाकडून होते. मूलभूत कौशल्यावर भर दिला जातो.	१. अभ्यासक्रम मोठ्या संकल्पनावर भर देऊन संपूर्णापासून सुरुवात होतो. सहभागीत भागाकडे विस्तारीत होतो.
२. निश्चित केलेल्या अभ्यासक्रमाशी अनुयायित्त्व असणे महत्त्वाचे असते.	२. विद्यार्थ्यांच्या प्रश्नाचा पाठपुराव केला जातो आणि आवडीला महत्त्व दिले जाते.
३. साधने मुख्यतः पाठ्यपुस्तक आणि व्यवसाय आहे.	३. साधनामध्ये साधनाचे प्राथमिक स्त्रोत आणि कौशल्य असणाऱ्या साधनांचा समावेश होतो.
४. अध्ययन पुनरावृत्तीवर आधारित आहे.	४. अध्ययन हे विद्यार्थ्यांना माहित असलेल्या आधारित आंतरक्रिया आहे.
५. शिक्षक विद्यार्थ्यांना माहिती देतात विद्यार्थी ज्ञानाचे ग्रहणकर्ता असतात.	५. शिक्षक विद्यार्थ्याशी त्याचे ज्ञानाची रचना करण्यास मदत करण्यासाठी संभाषण करतात.

६. शिक्षकाची भूमिका मार्गदर्शकाची असते जी चे मूळ मान्यतामध्ये असते.	६. शिक्षकाची भूमिका आंतरक्रियाची असते जिचे मुळ वाटाघाटीत असते.
७. मूल्यमापन योग्य उत्तर व परीक्षाद्वारे होते.	७. मूल्यमापनात विद्यार्थी कार्य, निरीक्षणे, दृष्टीकोन आणि परीक्षा यांचा समावेश होतो. प्रक्रिया ही उत्पादिताएवढी महत्त्वाची आहे.
८. ज्ञान हे अमूर्ताप्रमाणे असते.	८. ज्ञान अनुभवाप्रमाणे सतत बदलणारे गतिशील असते.

★ **शिक्षक शिक्षणातील रचनात्मकवादी आराखडा :**

रचनात्मकवादी शिक्षक शिक्षण दोन महत्त्वाच्या पद्धतीवर परावर्तन करते - विकसनशील आणि सामाजिक पुनर्रचनावादी पद्धती [Canella आणि Reiff (1994)]. पारंपारिक विकासात्मक पद्धतीतून नंतर सामान्यतः Paigetain प्रकाराद्वारे रचनात्मकदृष्ट्या विद्यार्थ्यांना कसे शिकवावे यावर कार्यक्रमाचा प्रभाव दिसून येतो. तो सामान्यतः चौकशी, शोध किंवा स्व-परीक्षणाच्या पूरक संधी शिवाय सिद्धांत किंवा पद्धतीत मोठ्या प्रत्यक्ष सूचना ही वैशिष्ट्य आहे. हा दृष्टीकोन सहज नियमात्मक होऊ शकतो. सामाजिक रचनात्मकवादी पारंपारिक प्रकारच्या कार्यक्रमाचा प्रभाव हा शिक्षक प्रशिक्षणार्थीच्या स्वतःच्या ज्ञानास अभिवृत्तीस पुनर्रचित करण्यास मदत करते. आकलन प्रक्रिया कशा रीतीने विकसित होत आहे, त्याचे कृती आणि वर्तनावर होणारे परिणाम तपासून पाहणे, पर्यायी संकल्पनांचा विचार करणे आणि त्या अध्यापनासाठी उपयुक्त असल्याचा पूर्वपक्ष धरणे. ज्ञानाचा औपचारिक मार्गावरील संरचित परावर्तन आणि चिकित्सक विश्लेषण आणि नित्याचा प्रायोगिक अनुभव एकत्र केला जातो.

Richardson ने रचनात्मकवादी आरेखनाच्या तयारीत शिक्षक आणि शिक्षक educator च्या दृष्टीकोनावर परिणाम करणारे दोन घटक सांगितले आहेत.

★ अध्ययनात आणि वैयक्तिक Cognitive विकसनात सामाजिक व्याप्ती चिकित्सक घटक म्हणून मान्य करणे.

– विशिष्ट आशय, विषय घटक किंवा तत्त्वे, काही विषय असे गणित हे इतर विषयापेक्षा नियम, सुत्रे, प्रक्रियाद्वारे बांधलेले असतात. हे शिक्षकांमध्ये योग्य उत्तरे असणाऱ्या समस्या आणि कामे अधिक आवडत असतात. साहित्यासारखे विषयात आणि लेखनात विद्यार्थ्याचे संकल्पना आणि संकल्पनाचे विवेचन आणि रचना शिक्षकाद्वारे कमी प्रोत्साहित केल्या जातात.

★ **आव्हान :**

रचनात्मकवादात शिक्षक आणि शिक्षक प्रशिक्षक यांना अध्ययन सिद्धांताचे रुपांतरण अध्यापन सिद्धांतात करण्याचे जबरदस्त कामाचे आव्हान देते. (Mackinon आणि Scarft seattor 1997) जे शिक्षकाला काय माहित असण्याची गरज आहे आणि काय करण्याची क्षमता आहे याबद्दल प्रश्न उपस्थित करते. शिक्षक प्रशिक्षक educators साठी इतर

कामामध्ये या कामात अध्यापनातील विविध तत्त्व-विशिष्ट गरजाची मान्यता आणि शिक्षक शिक्षणातील शिक्षणक्रम आणि practicum मधील रचनात्मकवादी पद्धतीची, प्रतिकृतीची गरज यात समन्वय साधणे याचा अंतर्भाव होतो.

Richardson (1997) अध्यापन आराखड्यातील मर्यादांची नोंद सांगतात की, योग्य उत्तर देण्यावर विद्यार्थ्याचे आकलनाचे मूल्यांकन केले जाते. विद्यार्थ्याचे ज्ञान चमत्कारिक (विचित्र) होते. संकल्पनेसाठी ३० वेगवेगळे विद्यार्थी ३० वेगवेगळ्या आकलन किंवा विवेचन करु शकतात. त्यातील सर्व समानतेने सुयोग्य असू शकत नाही. रचनात्मक वादातील दृष्टीकोनाचे अयोग्य उपयोजन अध्यापन शैलीच्या त्यागाला कारणीभूत होऊ शकतात. (Mackinon आणि Scarft seattor 1997)

काही लेखक शिक्षक प्रशिक्षक रचनात्मकवादी प्रतिकृतीच्या दृष्टीकोनाचे महत्त्व उदाहरण म्हणून देतात की, विद्यार्थ्यांना आंतरविद्याशाखीय (Interdisciplinary) समन्वेषण, सहभागी कृती, अध्ययन अनुभवासाठी क्षेत्र आधारित संधी, परावर्तन आणि स्वयं परीक्षणात गुंतवणे. (Kaufman 1996, Kroll & Lobosky 1996) जर भविष्यात शिक्षक शाळांमध्ये या पद्धती राबविण्यास सक्षम झाले तर.

- रचनात्मक ज्ञानाशाखामधील अध्यापनशास्त्र व पद्धतीतून सांस्कृतिक समाजसंबंध संपादनासाठी (Martin 1994) आणि (Vadeboncoeur 1997) रचनात्मकवादाच्या विविध अन्वयर्थांच्या मूळाशी असलेल्या सांस्कृतिक गृहितकांची पुनर्रचना, तपासणीसाठी शिक्षक प्रशिक्षकांना आग्रह करतात. त्यामुळे उपपत्ती (सिद्धांत) चा विकास आणि कार्यवाहीवर सामाजिक आस्थांचा प्रभाव कशाप्रकारे पडतो. यावर प्रकाश टाकतात. अशा प्रकारची छाननी न केल्यास त्या रचनात्मक वर्गात सामाजिक विषमता आणि ऐतिहासिक दबावाच्या स्वरुपात कायम स्वरुपी स्थिर होतील. त्या वैयक्तिक विकासावर निर्बंध घालतील त्यासाठी विधायक मार्गाने त्यांचे उच्चाटन करुन किंवा त्यात सुधारणा घडवून आणल्यास त्या विकास कार्यास बळकटी आणतील.
- प्रशिक्षकांना Educators यांना सामोरे जावे लागणारे अंतिम अहवाल म्हणजे रचनात्मकवादा संदर्भातील अनपेक्षित अडचणी जसे या अध्यापन व अध्ययनातील फरक सफल सैद्धांतिक आराखडे आहेत. हे ज्ञान आणि आकलन कसे तयार होतात याबाबत विचार करण्याचा एक मार्ग आहे. परंतू हा फक्त एकमेव मार्ग नाही. भावी शिक्षकांना विविध दृष्टीकोन आणि चिकित्सक संधीसाठी आवश्यक तारतम्याच्या विकासासाठी आणि सुयोग्य निवडीसाठी आणि निवडीच्या कौशल्य उपयोजनासाठी उघड करणे.

रचनात्मकवादाचे फायदे :

१) विद्यार्थ्याचा निष्क्रिय श्रोत्याऐवजी कृतीयुक्त समावेश केला तर ते अधिक शिकतात व अध्ययनाचा आनंद घेतात.

२) शिक्षण जेव्हा पाठांतरणाएवजी विचारसरणी आणि आकलनावर भर दिल्यावर अधिक चांगले काम करते. रचनात्मकवाद विचार व आकलन कसे करावे याच्या अध्ययनावर भर देते.

३) रचनात्मकवादी अध्ययन हे रुपांतरणीय आहे. रचनात्मकवादी वर्गात विद्यार्थी नियोजित तत्त्वे निर्माण करतात जी ते इतर अध्ययन पद्धतीसाठी वापरु शकतात.

४) अध्ययन हे विद्यार्थी प्रश्न आणि समन्वेषण यावर आधारित असते आणि बहुधा विद्यार्थ्यांना मूल्यमापन आराखड्यात (hand in) रचनात्मकवादात विद्यार्थ्यांना ते जे शिकतात त्याची मालकी देतो. रचनात्मकवादी मूल्यमापन विद्यार्थ्यांना उपक्रमशील आणि कलात्मक प्रतिनिधीत्व, भौतिक प्रतिकृती, अहवाल, संशोधन, journals यातील उपक्रमशीलता आणि वैयक्तिक गुंतवणूक यात अडकवते. सर्जनशील सहजप्रवृत्तीत गुंतवणे जे विद्यार्थ्याचे ज्ञान विविध पद्धतीने व्यक्त करण्याची क्षमता विकसित करते. विद्यार्थ्यांना सत्य आयुष्यात नवीन ज्ञान ठेवण्यास आणि बदलण्यास आवडते.

५) सत्य जगातील प्रमाणित घटना संदर्भात अध्ययन कृतीचा पाया ठेवून रचनात्मकवाद विद्यार्थ्यांना चेतना देते व गुंतवते. रचनात्मकवादी वर्गात विद्यार्थी गोष्टीवर प्रश्न विचारण्यास शिकतो आणि त्याचे नैसर्गिक जिज्ञासेचे उपयोजन जगावर करतो.

६) रचनात्मकवाद सामाजिक आणि संप्रेषण कौशल्याला वर्ग वातावरण निर्माण करुन प्रेरित करते जे सहकार्य आणि कल्पनाच्या आदान प्रदानावर भर देते. विद्यार्थ्याने त्याच्या कल्पना सुस्पष्ट शब्दात मांडण्यास शिकायला हवे. तसेच संघ कार्यात सहभागीता करुन कामात प्रभावीपणे करायला हवे. विद्यार्थ्याने इतरांबरोबर वाटाघाटी करण्यास तसेच त्याचे, समाजाने मान्य करणाऱ्या योगदानाचे मूल्यमापन करण्यास स्वतःच्या कल्पनांचे आदान प्रदान करावे हे सत्य जगात यशस्वीतेसाठी आवश्यक आहे कारण ते वेगवेगळ्या अनुभवांना नेहमी सामोरे जाणार असतात ज्यांना त्यांना सहकार्य करावे लागेल आणि इतरांच्या कल्पनाप्रमाणे चालावे लागेल.

तुमची प्रगती तपासा :

१) परावर्तित शिक्षक शिक्षणाचा अर्थ स्पष्ट करा.
२) परावर्तित शिक्षक शिक्षणाची गरज यावर चर्चा करा.
३) परावर्तित शिक्षक शिक्षणाचे नियम स्पष्ट करा.
४) परावर्तित शिक्षक शिक्षणाच्या दृष्टीकोनावर चर्चा करा.
५) परावर्तित शिक्षक शिक्षणाचे उपयोग काय ?
६) रचनात्मकवादी शिक्षक शिक्षणाची संकल्पना स्पष्ट करा.
७) रचनात्मकवादाच्या मार्गदर्शक तत्त्वावर चर्चा करा.
८) रचनात्मकवादाची ५E प्रतिकृती स्पष्ट करा.
९) रचनात्मकवादी वर्गाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
१०) रचनात्मकवादी शिक्षक शिक्षणाचे उपयोग काय ?

_____

_____

_____

_____

_____

_____

८अ.४ सारांश (Let us sum up) :

शिक्षक प्रशिक्षणाला सिद्धांत आणि पद्धतीमध्ये विभागलेल्या मोठ्या आव्हानांना तोंड द्यावे लागते. सध्याच्या शैक्षणिक व्याख्यानात गुणवंत शिक्षकाचा विकसन पद्धतीवर अधिक भर देण्यात आला आहे. शिक्षकांच्या (सबलीकरण) बळकटीसाठी सहभागी आणि परावर्तित भर देण्यात आला आहे. ह्या घटकात जे शिक्षक विकास पद्धतीना अर्थपूर्ण व पवित्र बनवणाऱ्या या दृष्टीकोनावर विवेचन केले आहे.

References :

1. Cannella, G. S., and Reiff, J. C. (1994). Individual constructivist teacher education: Teachers as empowered learners. Teacher Education Quarterly 21(3), 27-38. EJ 498 429.
2. DeJong, L., and Groomes, F. (1996). A constructivist teacher education program that incorporates community service to prepare students to work with children living in poverty. Action in Teacher Education 18(2), 86-95. EJ 536 849.
3. Fischetti, J., Dittmer, A., and Kyle, D. W. (1996). Shifting paradigms: Emerging issues for educational policy and practice. Teacher Educator 31(3), 189-201. EJ 525 345.
4. Kaufman, D. (1996). Constructivist-based experiential learning in teacher education. Action in Teacher Education 18(2), 40-49. EJ 536 845.
5. Kroll, L. R., and LaBosky, V. K. (1996). Practicing what we preach: Constructivism in a teacher education program. Action In Teacher Education 18(2), 63-72. EJ 536 947.
6. MacKinnon, A., and Scarff-Seatter, C. (1997). Constructivism: Contradictions and confusion in teacher education. In V. Richardson (Ed.), Constructivist Teacher Education: Building New Understandings (pp.38-55). Washington, DC: Falmer Press.
7. Martin, R. J. (1994). Multicultural social reconstructionist education: Design for diversity in teacher education. TEACHER EDUCATION QUARTERLY 21(3), 77-89. EJ 492 141.
8. Myers, C. B. (1996, April). Beyond Pdss: Schools As Professional Learning Communities. A Proposal Based On An Analysis Of Pds Efforts Of The 1990's. Paper presented at the annual meeting of the American Educational Research Association, New York. ED 400 227.
9. Oldfather, P., Bonds, S., and Bray, T. (1994). Drawing the circle: Collaborative mind mapping as a process for developing a constructivist teacher education program. Teacher Education Quarterly 21(3), 5-13. EJ 492 137.

10. O'Loughlin, M. (1995). Daring the imagination: Unlocking voices of dissent and possibility in teaching. Theory into Practice 24(2), 107-116. EJ 512 860.

11. Richardson, V. (1997). Constructivist teaching and teacher education: Theory and practice. In V. Richardson (Ed.), Constructivist Teacher Education: Building New Understandings (pp. 3-14). Washington, DC: Falmer Press.

12. Teets, S. T., and Starnes, B. A. (1996). Foxfire: Constructivism for teachers and learners. Action In Teacher Education 18(2), 31-39. EJ 536 844.

13. Vadeboncoeur, J. (1997). Child development and the purpose of education: A historical context for constructivism in teacher education. In V. Richardson (Ed.), Constructivist Teacher Education: Building New Understandings (pp. 15-37). Washington, DC: Falmer Press.

14. Wolffe, R. J., and McMullen, D. W. (1996). The constructivist connection: Linking theory, best practice, and technology. Journal of Computing In Teacher Education 12(2), 25-28. EJ 526 775.

❖❖❖❖

८ब

शिक्षक प्रशिक्षणावरील नाविन्यपूर्ण उपक्रम

(भाग - २)

घटक रुपरेखा :

८ब.० उद्दिष्ट्ये
८ब.१ १) प्रस्तावना
८ब.२ २) ई शिक्षक प्रशिक्षण
८ब.३ ३) मूल्याधिष्ठीत शिक्षक प्रशिक्षण
८ब.४ ४) सारांश

८ब.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासातून तुम्ही करु शकता -

१) ई शिक्षक प्रशिक्षणपद्धतीतील शिक्षक प्रशिक्षकाची भूमिका स्पष्ट करणे.

२) ई शिक्षक शिक्षणपद्धतीची छात्र अध्यापक व छात्र प्रशिक्षकावर होणारी निष्पत्ती चर्चा / होणाऱ्या परिणामांची चर्चा.

३) मूल्याधिष्ठीत शिक्षणपद्धतीत मूल्य स्पष्टीकरण करणारा दृष्टिकोन निर्माण करणे.

४) मूल्याधिष्ठीत शिक्षण पद्धतीतील नवतंत्र अनुभवाच्या वापराचा तपशील तयार करणे.

८ब.१ १) प्रस्तावना :

अध्ययन व अध्यापन संभाषण आता बदलले आहे. सर्व शैक्षणिक पातळींवर 'ज्ञानात्मक समाज' संकल्पनेतून शिक्षण प्रक्रियेतील नवीन भूमिकेची व्युप्ती झाली आहे. माहितीसंदर्भ आणि / किंवा ज्ञानात्मक समाज व अध्ययन कौशल्य संबंधी, एक नवीन चौकट सेवापूर्व आणि सेवांतर्गत शिक्षक शिक्षण पद्धतीत स्पष्ट करणे गरजेचे आहे. सध्याची अध्ययन तंत्रविज्ञान, विकास पातळी एकत्र काम करण्याचा करार, माहिती मिळविण्याची संधी, आशयाशी आंतरक्रिया आणि व्यक्तिगत अधिकारांची तरतूद करते.

संप्रेषण तंत्रविज्ञानातील वेगवान बदल शिक्षकांना पारंपारिक वर्गकृतीपासून ऑनलाईन वर्ग किंवा ऑनलाईन कृतीकडे वळण्यास समर्थ करीत आहेत.

८ब.२ २) ई शिक्षक प्रशिक्षण :

ई शिक्षक प्रशिक्षणाची संकल्पना आणि वैशिष्ट्ये :

जगभरातील शिक्षण प्रणाली ही जे विद्यार्थी भविष्यकालीन ज्ञानात्मक समाजासाठी ज्ञान व कौशल्य आत्मसात करीत आहेत. त्यांच्या माहिती आणि संप्रेषण तंत्रविज्ञान (Jimoyiannis & Komis, 2007) शिकविण्यावर भर देत आहे. (ICT). ई शिक्षक प्रशिक्षण सेवापूर्व कालावधीत ई अध्ययन आणि त्यांच्या भविष्यकालीन वर्गामध्ये संगणकाच्या उपयोगाचा / वापराचा सकारात्मक दृष्टीकोन विकसित करेल.

ई शिक्षक प्रशिक्षण ही ICT विकासानुसार योजित प्रक्रिया व कृती, ई-अध्ययनाची वैशिष्ट्ये व प्रतिमाने, औपचारीक संप्रेषणाची मूलभूत तत्त्वे, ई-अध्ययनाची मुलभूत तत्त्वे, स्पर्धात्मक पाया असणाऱ्या शिक्षणप्रणालीची मूलभूत तत्त्वे इत्यादींची अनुदेशन प्रणाली आहे.

ई अध्यापन अध्ययन अनुभूतींच्या आराखड्यात रचनात्मक तत्त्वांचा स्वीकार करते. सहकार्य अध्ययनाचा संबोध ही ई. शिक्षकांच्या रुपरेखेच्या विकासासाठी मूलभूत रचना आहे.

ई अध्ययन अभ्यासक्रमाचे वेगवेगळे प्रकार आहेत (Milosevic etal, 2009) ते खालीलप्रमाणे :

- ई-अध्ययन कृतीमधील ऑनलाईन व्यावसायिक अध्ययन करणारा समुदाय.

पदवीधर विद्यार्थी – कार्यरत शिक्षक अध्ययन कृती मालिकेत सहभाग घेतात. इतर विद्यार्थी आणि शिक्षकांच्या कल्पनाची देवाण-घेवाण, web वर आधारित तंत्रज्ञान, असंकुचित चर्चा, शालेय कृतीमध्ये सहभाग (पाठ अंमलबजावणी, स्वाध्याय प्रक्रिया इ.) यांचा वापर या प्रकारात केला जातो.

- ई अध्ययन कार्यक्रमात प्रक्षेपित स्वरुपाचे, व्याख्यान पुनरावलोकन, वर्ग सादरीकरण, इतर ऑनलाईन साहित्य यांचा उपयोग केला जातो. या प्रकारात वेगवेगळ्या साईटस्, चित्रित परिषदेद्वारे आंतरक्रिया, ऑनलाईन संदेश पाठविणे, चित्रित परिषदेवर आधारित दृष्टीकोन हा अभ्यासक्रमाचा महत्त्वाचा भाग असतो.
- **वैयक्तिक, स्वनिर्मित माहिती व कृतीप्रक्रिया :** ऑनलाईन अध्ययन कृतीची मालिका ई-शिक्षक व सहभागी शिक्षक यांच्यामध्ये घडते, जे या अभ्यासक्रमात अध्ययनकर्ता असतात. यात काही आंतरक्रिया व्यतिरिक्त स्वअध्ययनाच्या प्रकारांचा समावेश होतो. कांही आंतरक्रिया मार्गदर्शकाशी, सूचकाशी ऑनलाईन चर्चेने, ई मेलने, skype ने होतात.
- **संमिश्र अध्यापन प्रतिमाने :** ह्या प्रकारात संकलनात्मक onsite बैठक, वर्गभेटी, समोरासमोर कृतीसत्र, खाजगी शिक्षण आणि सल्लात्मक कार्यक्रम, लहान अभ्यासगट यांचा उपयोग केला जातो.

- ई अध्ययन मोठ्या प्रमाणात असणाऱ्या वेगवेगळ्या परिस्थितीतील आणि त्वरित संबंधाशिवाय असलेल्या संप्रेषणावर आधारलेले आहे.

E-Tutors :

शिक्षक गतीमान समाजाची शैक्षणिक ध्येये समजण्यासाठी महत्त्वाची भूमिका निभावतात. शैक्षणिक प्रयासाच्या यशात शिक्षकाची गुणवत्ता खूप महत्त्वाची आहे. शिक्षक कार्यक्षमतेत खालील तीन महत्त्वाच्या मूलभूत व्यावसायिक तत्त्वांचा समावेश होतो.

१) शैक्षणिक कार्यक्षमता :

शैक्षणिक व्यावसायिक भूमिका जाणवण्यासाठी ज्ञानात्मक प्रणाली कौशल्ये, कर्तृत्वता, प्रेरणात्मक रचना / मांडणीची आवश्यकता.

२) क्रमन्वित कार्यक्षमता किंवा अभ्यासक्रम आशयासंबंधित कार्यक्षमता :

ज्ञानाची पद्धती, अभ्यासक्रम आशयातून प्राप्त कौशल्य आणि विकसित कृतीद्वारे विद्यार्थ्यांना ज्ञान आणि कौशल्ये शिकविणे.

३) संप्रेषण कार्यक्षमता :

संप्रेषणाची ध्येये व अध्यापन, सामाजिक आंतरक्रिया समजण्यासाठी ज्ञानप्रणाली कौशल्य क्षमता आणि प्रेरणादायी रचनेची आवश्यकता असते.

अपेक्षित शिक्षण बाह्योत्पत्ती मिळविण्यासाठी शिक्षक, माहिती आणि संप्रेषण तंत्रविज्ञानाचा वापर करु शकतो. ई-अध्यापन कार्यक्षमतेचा शिक्षकांची व्यावसायिक कार्यक्षमता वाढविण्यासाठी उपयोग होईल.



शिक्षक कार्यक्षमतेची रचना (Bjekic etal, 2008)

ई-अध्यापन कार्यक्षमता हे शिक्षणशास्त्र तंत्रज्ञान, वैयक्तिक किंवा संघटनात्मक घटक जे प्रभावी ई-अध्ययनासाठी आणि ई-अध्यापन सादरीकरण व पूर्ततेसाठी आवश्यक आहे.

शिक्षकांच्या ICT कार्यक्षमतेचे तीन पैलू आहेत (Awotersal 2008).

१) शिक्षकांना ICT चा वापर करुन कोणत्या अध्ययनकृतींचा वापर अध्यापनात करायचा ते माहित असते (ICT जाणीव)

२) शिक्षकाला हार्डवेअर, सॉफ्टवेअरचा उपयोग करण्यासाठीचे आवश्यक ते कौशल्य असते (ICT सहजता)

३) शिक्षकाला ICT अध्यापनशास्त्र व शिक्षणशास्त्रातील घटकांचे ज्ञान असते (ICT दृष्टीकरण व सराव)

शिक्षक हा ई-अध्यापन प्रक्रियेतील उद्‌गाता किंवा ई-अध्ययन व ई-अध्यापन प्रतिमाने वापरणारा या दोन्ही अवस्थेत असू शकतो. शिक्षकाला त्याच्या अध्यापनाशी निगडीत सखोल अनुमानाविषयी, अध्ययन प्रक्रियेविषयी, त्याच्या मूलभूत अध्यापक भूमिकेविषयी, पुर्नविचार करणे आवश्यक आहे. शिक्षक कृती ई-अध्ययन रुपरेखेनुसार दोन मुख्य कर्तव्यात विभागली जाते. विद्यार्थ्यांना आशय पुरविणे आणि विद्यार्थी व ई-tutor यांच्यातील संप्रेषणास पाठिंबा देणे. म्हणून या ई शिक्षक अध्यापकांना, ई अध्ययनाच्या वेगवेगळ्या प्रकारांचे संघटन आणि ई-अध्यापनाची रुपरेखा आखता आली पाहिजे.

अध्ययन रुपरेखा आणि ई अध्यापनाची रुपरेखा यांची काही प्रतिमाने खालीलप्रमाणे :

- वेब आधारित ई-अध्ययन रुपरेखा
- वर्गाधिष्ठित ई-अध्ययन रुपरेखा
- ऑनलाईन वर्ग ई-अध्ययन रुपरेखा
- इंटरनेट आधारित ई-अध्ययन रुपरेखा
- प्रवाहित माध्यम तंत्रज्ञान ई-अध्ययन रुपरेखा (streaming media technology)
- उच्च माध्यम वर्गातील ई-अध्ययन रुपरेखा (hypermedia classroom)
- परंपरागत वर्ग अध्ययन आणि ई-अध्ययन यांचे एकत्रीकरणावर आधारित इ अध्ययनाची रुपरेखा (senarios) आहे.

ई-Tutor ना ई-अध्ययना प्रक्रियेत खूप व्यावसायिक भूमिका असतात. Brigitte Denis etal.(2004) यांनी ई-अध्ययनातील ई-Tutor च्या काही केंद्रित व काही गौण भूमिकेची वर्णन केले आहे ते खालीलप्रमाणे :

अनु. क्र.	केंद्रीय भूमिका	E-Tutor ची कृती व वर्तन E-Tutor
१)	आशय मदतनीस	विषयतज्ज्ञ म्हणून काही वेळा मध्यस्थी काही वेळा अभ्यासक्रमातील संबोधांचा अर्थ लावणारा आणि मार्गदर्शन करणारा.
२)	बुद्धीवादी विचारसरणीच्या पलीकडे जाऊन मदत करणारा	अध्ययन कृतीचे परावर्तन आणि बाह्येत्पत्ती अध्यापन कौशल्य विकासासाठी आधार.
३)	प्रक्रिया मदतनीस	अध्ययनकर्त्याचे अध्ययन तंत्र, वेळेच्या नियोजनात मदत.
४)	सल्लागार (समुपदेशक)	धर्मोपदेशक संबंधी पाठिंब्यासाठी सांस्थिक आधार प्रणालीचे प्रवेशद्वार.
५)	मूल्यमापन करणारा (आकारात्मक व संख्यात्मक)	नेमून दिलेल्या कामाच्या संपादन व प्रगती, स्वाध्याय विकास याविषयी प्रत्याभरण देणे काही वेळा तो / ती परीक्षक सुद्धा असतो.
६)	तंत्रविज्ञानक	मार्गदर्शक तंत्रज्ञानासह मूल आधार आणि अध्ययनासाठी साधने
७)	साधने पुरविणारा	अध्ययन आधार ओळखणे आणि निश्चित करणे, विकास करणे, साधने पुरविण्याचे मार्ग निर्माण करणे.

अनु. क्र.	गौण भूमिका	E-Tutor ची कृती व वर्तन E-Tutor
१)	संघटक आणि व्यवस्थापक कर्ता	अभ्यासक्रम व्यवस्थापनाच्या नोंदी ठेवणे आणि नावनोंदणी तपासण्यास आधार देणे.
२)	रचनाकार	कधीकधी अभ्यासक्रम रचना किंवा अभ्यासक्रम प्रतिमाने, अध्यापनशास्त्रीय पाठ, दिलेले काम यासाठी मदत करण्यास मध्यस्थी.
३)	सहअध्यायी	यथार्थपणे मित्र शेवटपर्यंतचा अभ्यासक्रमात अध्ययन कर्त्याचा सहभाग आणि त्याच्यासह अध्ययन कार्य करणारा.
४)	संशोधक	परावर्तित व्यावसायिक आणि कृती संशोधक जो तो / ती ई-Tutor अनुभवावर कृती करतो.

ICT ने आधार दिलेल्या वेगवेगळ्या शिकविण्याच्या परिस्थितीमध्ये Gilly Salman (2007) यांनी संयमाच्या महतीला महत्त्व दिले आहे. (महत्त्वावर जोर दिला आहे.)

अशाप्रकारे E-moderators ची एका शिक्षकाप्रमाणे ई-अध्ययन शिक्षणात भूमिका असते. ई-अध्यापन शिक्षणाचा अभ्यासक्रमात वेगवेगळ्या शिक्षकासाठीच्या ई-भूमिका असतात, आणि त्या प्रामुख्याने ई-उद्‌गाता, ई-रचनाकार, ई-मदतनीस, ई-Tutor, ई-Moderator, ई-अध्यापक यांच्यावर केंद्रित असाव्यात.

ई-अध्यापनासाठी ई-भूमिकाच्या पृथ:क्करणाची गरज आहे. ई-शिक्षण वातावरणामधील शिक्षकांना ई-अध्ययन व ई-अध्यापनाविषयी पूरेसे ज्ञान मिळविणे आवश्यक आहे.

ई-शिक्षक प्रशिक्षणाची निष्पत्ती :

ई-शिक्षक प्रशिक्षणातून विकसित झालेल्या कार्यक्षमता खालीलप्रमाणे :

१) सामान्य कार्यक्षमता :

- ज्ञानप्रणाली, व्यावसायिक आणि वैज्ञानिक उपागमाचे संशोधन, संकट निराकरण, लेखन कौशल्य आणि व्यावसायिक व वैज्ञानिक पत्रिका सादर करण्याचे कौशल्य, स्वायत्तता संशोधन आणि स्वविश्वास यांचे कर्तृत्त्व आणि कौशल्य.
- कामातील व संशोधन प्रक्रियेतील सांघिक कार्यक्षमता आणि प्रभावी संप्रेषण कौशल्य.
- निरंतर शिक्षण आणि अंतर्गत शाखीय उपागम interdisciplinary विकासासाठी गुणवत्ताधारी व्यक्ती.
- व्यावसायिक आणि वैज्ञानिक नितीतत्त्वासह व्यावसायिक कृती.

२) विशिष्ट विषय क्षमता :

- शैक्षणिक प्रक्रिया आणि तंत्रविज्ञान प्रणालीची गुंतागुंतीची तात्त्विक ज्ञानप्रणाली.
- सध्य पद्धतीचा विकास तसेच अध्ययन अध्यापनाचे प्रकार निवड, उपयोजित संशोधन, मूल्यमापन नवोपक्रम यासाठीची आवश्यक गुणवत्ता.
- अध्ययन आणि अध्यापन प्रक्रियेचे, नियोजन आणि व्यवस्थापनाचे अध्ययन स्थितीच्या सादरीकरणाचे कौशल्य.
- ई अभ्यासक्रमातील ई-शिक्षणाचे विशिष्ट पैलू रचना, प्रक्रिया, निर्मिती, उपयोजन, प्रसार, मूल्यमापन आणि व्यवस्थापन यांचे विशिष्ट ज्ञान असणे.
- संमिश्र सिद्धांतांचा वापर आणि अन्वयार्थ लावून त्याच्या प्रात्यक्षिक ज्ञानाचे ऑनलाईनवरील प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सादरीकरणाचे ज्ञान असणे.

छात्र अध्यापक आणि शिक्षक प्रशिक्षक करु शकतात.

- प्रक्रिया, ई अध्यापनाचा विस्तार व ई-अध्ययन आणि ई-अध्यापन यांच्याविषयीचे केलेले स्पष्टीकरण.
- संशोधनानुसार अध्ययनाची मुख्य तत्त्वे ही प्रसारमाध्यमे आंतरक्रिया पृथ:क्करण, त्याच बरोबर एकाच वेळी घडून येणारे (प्रत्यक्ष) किंवा एकाच वेळी घडून न येणारे (अप्रत्यक्ष) ई-अध्ययन व ई-अध्यापन संप्रेषण यावर आधारित आहे.
- उचित तंत्रविज्ञान आणि साधनांची प्रभावी निर्मिती यांची वेगवेगळ्या ई-अध्यापन समस्या निरसनासाठी निवड आणि वापर करणे.
- हार्डवेअर, सॉफ्टवेअर आणि संप्रेषण ई-अध्ययन आंतररचना यांची कार्ये समजून घेणे.
- ई-अध्ययन विकसन व आकलनाच्या प्रक्रियेत बहुमाध्यम सॉफ्टवेअर साधने, व्हिडीओ कॉन्फरन्स उपाय निर्माण करुन ते लागू करणे.
- ई-अध्ययन प्रक्रियेचा आराखडा, विकास आणि जाणीवा ह्या व्यक्तीच्या गटाच्या किंवा प्रणालीच्या विशिष्ट शैक्षणिक गरजांवर आधारित आहे.
- औपचारिक, अनौपचारिक आणि सामाजिक अध्ययन चौकटीत राहून मूल्यांकन योजना विकास, ई-मूल्यांकन तंत्र संपादनाची संकलित माहिती व विद्यार्थ्यांच्या कामगिरीचा अन्वयार्थ लावणे.
- ई-प्रशिक्षक, ई-व्यवस्थापक, ई-व्यवस्थापक कर्ता, एखाद्या स्वयं-अध्ययनाचे व्यवस्थापन यांच्या सर्व भूमिकांचे पृथक्करण करणे. त्यात सुधारणा घडविणे आणि व्यावसायिक विकासासाठी योजना आखणे.
- ई-शैक्षणिक समस्यांचे पुनर्निरसन आणि ई-अध्ययन व ई-अध्यापन प्रक्रियेत बदल घडवून आणणे.

Kleiman (2004) ई अध्ययन, नवीन अध्यापक तयार करणे, कृतीशील अध्यापकांसाठी उच्च गुणवत्ता आणि ताबडतोब उपलब्ध असलेल्या व्यावसायिक संधीचा विकास आणि अध्यापन व्यवसाय अधिक आकर्षक बनविणे (उदा. ऑनलाईन साधने पुरविणे, आणि नवीन सहकारी आणि मदतनीसांशी संबंध जोडणे), अध्यापक नेमणूक आणि धारक समस्यांवर मदत करणे या प्रत्येक आव्हांनासाठी योगदान देऊ शकते.

८ब.३ ३) मूल्याधिष्ठीत शिक्षक प्रशिक्षण :-

प्रस्तावना :

मूल्ये ही शिक्षण प्रक्रियेतील पूर्णांक आहेत. ते भरीस भर नाहीत सर्व शिक्षण हे मूल्यशिक्षण आहे. निरुपयोगी किंवा उदासीन शिक्षण हा मूल्य आणि शिक्षण यांच्या अर्थाच्या भाषेत विरोधाभास आहे. शिक्षण ही एखाद्या व्यक्तीच्या चांगल्या जीवनाच्या संबोधानुसार एखाद्याच्या विचार, भावना आणि कृतीनुसार इष्ट बदल घडवून आणणारी प्रक्रिया आहे. या अर्थी शिक्षण अटळपणे मूल्य प्रक्षेपणाचा समावेश करते.

शिक्षणाची ध्येये - व्यक्तिमत्त्व विकास, ज्ञाननिश्चिती, संस्कृती जतन, चारित्र्य प्रशिक्षण होय, जी आपल्या मूल्य पसंती निवेदनापेक्षा अधिक नाहीत. ती समजण्यासाठी आपण अभ्यासक्रम, इष्ट ज्ञानाचे नियोजन पूर्वक संकलन कौशल्य, प्रवृत्ती आणि मूल्ये जी आपण तरुण पिढीला संक्रमित करु इच्छितो यांची रचना करतो. आणि आपण हे अध्ययनकर्त्याचे स्वातंत्र्य आणि स्वायत्तता भंग न करणाऱ्या मार्गाने करतो. दुसऱ्या भाषेत शिक्षण त्याची ध्येये अभ्यासक्रम आणि पद्धती यांसाठी मूल्याशी अविभक्तपणे जोडलेले आहे.

शिक्षणाच्या मूल्य पूर्वाभिमुख स्थितीज्ञानाच्या मागणीसाठी (अध्यापक शिक्षण) म्हणूनच वैशिष्ट्यांची समोरासमोर आंतर सुधारणा, आशय आणि शालेय शिक्षण व अध्यापनाची प्रक्रिया यांचा विचार करणे आवश्यक आहे.

मूल्यशिक्षण देणे याचा अर्थ काय?

मूल्यशिक्षण ही शिक्षणाची एक प्रक्रिया आहे म्हणजेच ती एक प्रभावी अध्ययनाची प्रक्रिया आहे. अध्ययन ही एक शोषणाची निष्क्रिय प्रक्रिया नाही. तिच्यात विचार परावर्तन, प्रश्न विचारणे, भावना कृती, काळजी, अनुभव यांचा समावेश होतो. मूल्यशिक्षण यानुसार आग्रही मत, कळकळीचा उपदेश, प्रसार यांच्या हुकूमशील मतारोपणाची प्रक्रिया नाही तसेच ते अध्ययन कर्त्याच्या शैक्षणिक उपागमाच्या पूर्वनिश्चित योग्य मूल्यांचे सरळ अपरिमीत स्वरुपही नाही. ध्येय म्हणजे जी काही मूल्ये द्यायची आहेत त्या अनुरुपतेला पाठिंबा देणे आणि पूर्वापार आलेल्या मुल्यांचे अंधानुकरण करणे नाही तर चिकित्सक आणि परावर्तित विचार, तर्कसुद्ध निवड आणि अध्ययन कर्त्याचे स्वायतत्ता संदर्भात जबाबदार वर्तणूक यांना उत्तेजन देणे, जेव्हा आपण मूल्यशिक्षण देतो तेव्हा आपण अध्ययनकर्त्याला अशा परिस्त्रिथतीत ठेवतो ज्या कारणमीमांसा देणे, प्रश्न विचारणे, परावर्तन करणे, काळजी घेणे, संबंधाची भावना वाटणे, कृती करणे यासाठी सक्षम बनवतात. याचा हेतू मूल्य परिस्थितीत चर्चा आणि परावर्तनास चालना देणे आणि प्रतिसाद निर्माण करणे आहे.

मूल्यशिक्षण हे काहीतरी बनण्यासाठीचे शिक्षण आहे. ते व्यक्तीच्या संपूर्ण बौद्धिक, सामाजिक, भावनिक, नैतिक, नितीक आणि अस्तिक व्यक्तिमत्त्व विकासाशी निगडीत आहे. त्यात चांगल्या, योग्य सुंदर भावनिकता, जीवनाच्या उच्च आदर्शांनुसार योग्य मूल्य निवडण्याची क्षमता, ते विचार व कृतीतून अंगीकृत करणे आणि अनुभवणे यांच्या विकासाचा समावेश होतो. अशी प्रक्रिया सर्व मानवी कार्यक्षमता जाणून घेणे, अनुभवणे आणि कृती करणे यांचे नाट्य आहे. अध्ययनकर्त्यास योग्य व चांगल्याची माहिती असण्यास समर्थ असावे तसेच काळजी घेणे, योग्य भावनेची जाणीव, योग्य गोष्टी करण्याची इच्छाशक्ती असावी, व यांचा संबंध वचन व कृती करण्यासाठी समर्थ असावे.

दुसऱ्या शब्दात मूल्यशिक्षण देणे म्हणजे तर्कसुद्ध, चिकित्सक, विचार विकास करणे, भावनाशिक्षण देणे, कल्पनाशक्ती सुसंस्कृत करणे, इच्छाशक्ती दृढ करणे आणि अध्ययन कर्त्यास चारित्र्य प्रशिक्षण देणे.

सामान्यपणे मूल्यशिक्षणाचा विभिन्न प्रकारे अध्ययन आणि कृती, शारीरिक आरोग्य प्रशिक्षण, मानसिक आरोग्य, शिष्टाचार आणि पद्धती, सुयोग्य सामाजिक वर्तणूक, नागरी हक्क आणि कर्तव्यापासून आस्थेच्या आणि धार्मिक प्रशिक्षणापर्यंत संदर्भ दिला जातो.

काही वेळा मूल्यशिक्षण हे सामान्यतः सुयोग्य वर्तणूक आणि सवयींचा विकास करणारा असा प्रकार असतो ज्यामध्ये मूल्ये आणि सवयी वृद्धींगत करणे समाविष्ट होते. या संकल्पनेच्या अगदी विरोधात असे सांगितले जाते की, मूल्यशिक्षण हा त्याचा संबंधित असा घटक आहे जो दुर्लक्षित करु नये. मूल्य शिक्षणाचे महत्त्वाचे ध्येय हे आहे की, अर्थपूर्ण कारणमीमांसावर नैतिक निर्णय घेण्याची क्षमता विकसित करणे व त्याची विचारपूर्वक जोपासना करणे.

काही निष्कर्षानुसार शालेय समाज जीवनातून बालकांचा नैतिक विकास आपोआप होतो. बालक गटाच्या सदस्यांप्रमाणे गटाची वृत्ती, मूल्ये आणि सामान्य वर्तणुकीचे अनुकरण करते तसेच गटाच्या रीतीनुसार स्वतःला घडविण्याचा निरंतर प्रयत्न करते. मूल्यशिक्षण ही प्रक्रिया अशा परिस्थितीत समायोजन साधण्याच्या कमी विद्यार्थ्यांस मदत करते. अशा प्रकारचा दृष्टीकोन हा शाळेच्या सामाजिक जीवनाच्या संदर्भावर आधारित असला तरी असे अध्ययन हे मूल्यशिक्षणाचा भाग होऊ शकत नाही. काय आहे या पेक्षा काय असले पाहिजे आणि काय केले गेले पाहिजे. यासारख्या गोष्टींना नैतिकतच्या दृष्टीने फारसे महत्त्व दिले जात नाही.

मूल्यशिक्षणाच्या आणखी एका दृष्टीकोनातून पाहता हे अनुभव आणि भावनांचे ज्ञान देणारा आवश्यक असा एक प्रकार आहे. हे अंतःकरणापासूनचे प्रशिक्षण (training of the heart) आहे, यात योग्य अनुभव आणि भावनांच्या विकासाचा अंतर्भाव होतो. यामध्ये ज्ञानात्मक क्षमता, ज्या प्रशिक्षणाद्वारे दिल्या जातात त्यांचा समावेश होत नाही. काव्याप्रमाणे हे अध्यापनापेक्षा आत्मसात करणे आवश्यक ठरते. मुख्यत्त्वे हे योग्य वातावरण निर्मिती करणे, अनुसरणे आणि निसर्गाशी संवाद साधने किंवा स्वतःला आपल्या आदर्शाचे अनुकरण करणे यातून अध्ययन करणे या संबंधीचे शिक्षण आहे परंतू अशा दृष्टीकोनाचे पुढील विधानाद्वारे खंडनही होते ते म्हणजे चांगल्या / आदर्श व्यक्तींच्या अनुकरण वा अनुसरणाने काही कोणती मूल्ये प्रदान होत नाहीत. नैतिकता ही एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे होणारे परावर्तन नाही. नैतिक विकसनात नैतिक विचारसरणी ही सुसंगत निवडीची कृती सांगणारी वैशिष्टपूर्ण अशी वेगळी विचारधारा आहे. नैतिकता धारक व्यक्ती ही उचित कारणांसाठी उचित कार्य करणारी अशी योग्य व्यक्ती असते.

शिक्षकाला प्रशिक्षण का आणि कशासाठी द्यावे?

हा प्रश्न मूल्य शिक्षणाच्या हेतूवरील पूर्व चर्चांच्या संदर्भात विचारात घेतला पाहिजे. अध्ययन कर्त्यामध्ये नैतिक व अस्थिक भावना जागवावयाचा हेतू हा आहे की, त्याच्यात मूल्य जाणिवेची पातळी वाढविणे, मुक्त आणि चिकित्सक विचार करण्यास प्रवृत्त करणे, सुसंगत घटना आणि कृतींचा निर्णय घेण्याची क्षमता विकसित करणे आणि मोठ्या चांगल्या गोष्टींबद्दलच्या दृढविश्वासाबरोबर धैर्याने कृतीची निवड करणे व त्यानुसार कृती करणे, त्यानुसार शिक्षकाला जीवनातील मूल्याचे परिस्थिती संदर्भात अध्ययन चेतनादायी, उदयुक्त करणारी माहिती आणि जाणीव करुन देणारा प्रातिनिधिक स्वरुपाचे कार्य करणारे प्रशिक्षण द्यावे. अध्ययन कर्त्याचा चर्चा, संभाषण आणि प्रात्यक्षिक कृतीत प्रत्यक्ष समावेश करवून शिक्षकाने त्यांना मानवी कृती व घटनावर विचार व त्याचे परावर्तन करण्यास भाग पाडावे. शिक्षकाने विद्यार्थ्यांना कलाकृती

निसर्गातील सौंदर्य, मानवी नातेसंबंध आणि मूल्य कृतीचे महत्त्व उलगडावे आणि त्याचा नैतिक जाणिवेचे विकसन करावे. प्रशिक्षण संस्थांमधील संस्थात्मक प्रक्रियेत शिक्षकाला ठोस परिस्थिती आणि संधी पुरविणे, क्षमता विकसित करण्यास आणि अध्ययनातील प्राप्त सुयोग्य अनुभवांमध्ये कृतीयुक्ततेचा समावेश करण्यास मदत करतात.

शाळेचा सुसंगत, स्वाभाविक कल आणि स्वभावधर्म हा मूल्य शिक्षणाचा प्रभावी स्त्रोत म्हणून कार्य करतो. विद्यार्थी शालेय वातावरणात राहून किंवा त्याच्या संपर्कात येऊन मूल्य आणि आदर्शाबाबत जाणीव प्राप्त करतात. अशी वातावरण निर्मिती शिक्षक किंवा विद्यार्थ्यांद्वारे एका रात्रीत होत नाही, त्यासाठी शिक्षक, पालक, समाज, नेते आणि विद्यार्थी यांच्या शिक्षणासंदर्भात निरंतर व एकत्रित प्रयत्नांची गरज आहे. आपल्याला अपेक्षित असलेल्या शाळांची निर्मिती करण्यात शिक्षकाची प्रमुख भूमिका आहे. त्यांनी शाळेतील उच्च आदर्श आणि मूल्यांच्या विकसनासाठी उपयुक्त अशा प्रेम, विश्वास, सहकार्य आणि संरक्षणात्मक वातावरण निर्मितीस मदत करावी. शिक्षक प्रशिक्षण अनुभव व एकंदरीतच शिक्षकास या आदर्शाच्या प्राप्तीसाठी प्रोत्साहित करण्यास मार्गदर्शन करतात.

मूल्यशिक्षण ही कृतीची कक्षा (sphere) नसून ती शिक्षकांच्या अध्यापन, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, त्यांच्याशी आंतरक्रिया, अभ्यासानुवर्ती कार्यक्रम आणि अशा तत्सम व्यावसायिक कृतीहून भिन्न असतात. अध्यापनाचे प्रत्यक्ष स्वरुप हे शिक्षकांवर काही बंधने व जबाबदाऱ्या लादते. प्रामुख्याने अध्यापन हे अध्ययन घडवून आणण्याची कृती आहे. अध्ययन कर्ता व ज्ञान ही शिक्षकाची प्राथमिक बंधने आहे, व बंधने अपरीहार्य अशीच आहे. ही बंधने शिक्षकास, अध्ययनकर्त्यास व्यक्ती तसेच अध्ययन कर्ता म्हणून समजण्यावर भर देतात. पूर्व संदर्भानुसार शिक्षकाने विद्यार्थ्यांवर प्रेम करावे आणि त्याच्या वाढ व विकासात स्वाभाविक आवड ठेवावी. विद्यार्थ्यांना अध्ययनास प्रवृत्त करण्यासाठी, शिक्षकास जर विद्यार्थ्यांच्या अध्ययनपद्धतीचे आकलन झाल्यास तो त्यांचे अध्ययन सुधारण्यासाठी स्वतःच्या अध्यापन शास्त्रीय कौशल्यात त्यानुरुप आवश्यक ते बदल करेल. त्यांच्या जवळ ज्ञानसंपादन, ज्ञानविषयक प्रेम, माहिती मिळविण्याची इच्छा, अद्ययावत ज्ञानासाठी सातत्यपूर्ण अध्ययनाची प्रामाणिक इच्छा, मानवता आणि अज्ञानतेचा प्रमाणिक स्विकार करणारी अशी बुद्धीची आणि ह्रदयाची योग्य गुणवत्ता असावी. त्यांच्याकडे अशा सामाजिक तत्त्वज्ञानाची आवश्यकता असते जे सामाजिक न्याय आणि मानवाधिकाराशी संबंधित असून सामाजिक संवेदना हे त्याचे वैशिष्ट आहे. शिक्षक व्यवसायाची नैतिकता आणि उच्च दर्जानुरुप त्यांनी आपली व्यावसायिक निष्ठा बाळगणे आवश्यक ठरते. शिक्षकांच्या प्रशिक्षणाद्वारे प्रशिक्षणार्थींना व्यावसायिक संहिता व तिचे महत्त्व यांच्या अनुभवाचे नमुने पुरविणे जरुरी असते, तसेच प्रशिक्षण संस्थांमधील शिक्षक आणि शिक्षक प्रशिक्षकांच्या प्रामाणिकतेच्या पालनाची खात्री असावी.

मूल्याधिष्ठीत शिक्षक-प्रशिक्षणाचे दृष्टीकोन :

अलिकडच्या काळात सेवा-पूर्व आणि सेवांतर्गत प्रशिक्षणात शिक्षकांना प्रशिक्षित करण्यासाठी व त्यांचे उद्‌बोधन करण्यासाठी मूल्यशिक्षण कार्यक्रमाचे विविध प्रकारे आयोजन केले जात आहे. एका योजनेअंतर्गत मान्यताप्राप्त 'प्रमुख संस्था' ३-४ आठवड्यांचा आवासिय उपक्रम शिक्षकांसाठी राबवतात. शिक्षक प्रशिक्षकांसाठी सुद्धा अल्प कालावधीच्या उपक्रमांचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमांचे स्वरुप व घटक यांची काही निरीक्षणे खाली नोंदवली आहेत.

ह्या कार्यक्रमासाठी मूल्याधिष्ठित शिक्षक प्रशिक्षण शिक्षकांसाठी मूल्यशिक्षण यासारखी नावे देण्यात आलेली आहेत. मनोविकास पद्धती, प्रार्थना योग, ध्यानधारणा आणि तणावापासून मुक्ती ह्यांच्या वापराने होणाऱ्या व्यक्तीच्या वैयक्तिक विकासावर त्यांचे लक्ष असते. तसेच विविध मूल्यविषयक उदा. वैज्ञानिक अभिरुची, पर्यावरण यांचाही यामध्ये समावेश होतो. संदेश हा व्याख्याने, खुलासा, आशीर्वचन व आग्रहपूर्वक सांगणे याद्वारे पोहोचवला जातो. घरच्या सारखे वातावरण हे कार्यक्रम स्वरुपास वृद्धींगत करते. ह्या कार्यक्रमाची मुख्य उद्दिष्टे ही व्यक्तीस आयुष्य शांततेने, आत्मिक विशुद्धतेने व आध्यात्मिक उन्नतीने व्यतीत करण्यास उदयुक्त करु शकते. या लेखामध्ये प्रतिपादन केल्याप्रमाणे जरी हे कार्यक्रम मूल्यशिक्षणाच्या तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने स्वतःच्या पद्धतीने प्रशिक्षणार्थीचा विकास करण्यास हातभार लावत असले तरी, ते मूल्यशिक्षण प्रशिक्षणाचे आवश्यक घटक म्हणून अपयशी ठरतात. सर्वप्रथम हा वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम (जो त्याच्या आशयावरुन ठरविला जातो) शिक्षक व प्रशिक्षक यांना वेगवेगळे मानतो, व हे कार्यक्रम त्या दोघांना व्यावसायिक दृष्ट्या निभावयाच्या भूमिकेतून त्यांकडे पाहत नाही. ते शिक्षक व प्रशिक्षकाचे मूल्यशिक्षणाचे कार्य दुर्लक्षित करुन आध्यात्माच्या शोधात असलेल्या व्यक्तीप्रमाणे वागतात. हे खरे आहे की, ह्या दोन्ही गोष्टी संबंधित आहेत पण मूल्यप्रशिक्षणाच्या क्षेत्रात, एक शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमात मूल्य प्रशिक्षकाप्रमाणे असलेल्या शिक्षक प्रशिक्षकाची भूमिका व कार्याचा प्राथमिक संबंध असायला हवा. प्रशिक्षणार्थींची आकलनशक्ती, कौशल्य व अभिरूची व यांना वृद्धींगत करण्याचे ध्येय समोर ठेवणे अपेक्षित आहे, जेणेकरुन ते त्यांना मूल्यशिक्षकाप्रमाणे त्यांची कार्ये करण्यास सुसज्ज करतील.

याखेरीज त्यांच्याकडून अध्ययन अनुभव जे एखाद्याला विचार, परावर्तन, अनुभव, प्रश्न, टिका, काळजी, न्याय आणि कृती करण्यास प्रभाव पाडतात आणि ज्या वैयक्तिक शांती, निःशब्दता आणि आनंद, एक प्रकारचे बौद्धिक उपशमक यांच्या सूचना नाही हा मूल्यशिक्षणाचा सारांश निसटतो. जर आपण शिक्षकाकडून शाळेतील मूलांना असे अध्ययन अनुभव पुरविण्याचे कार्य करण्याची अपेक्षा केली तर ते शिक्षकाच्या प्रशिक्षकांनी (शिक्षक educator) सुद्धा त्यांच्या प्रशिक्षणार्थींना असे समाज अनुभव पुरविण्यास बंधनकारक असू शकते. शिक्षक आणि शिक्षक प्रशिक्षकांना व्याख्यान आणि उपदेशाद्वारे प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न हा प्रभावी मूल्याचे शिक्षक बनविण्यास फार काळासाठी उपयुक्त ठरणार नाही.

शिक्षक आणि शिक्षक प्रशिक्षकांनी निश्चित वास्तविकता ज्यात त्यांना कार्यरत राहायचे आहे यांच्या संदर्भात मूल्य प्रशिक्षक म्हणून तयार व्हायला हवे. या शालेय शिक्षण आणि शिक्षक प्रशिक्षण अवस्था, पाठ्यक्रम आणि त्याच्या व्यवहाराच्या (लेखी नोंदी) पद्धती, शाळेने अनुसरलेली ध्येय आणि मूल्य आणि त्यांची शैक्षणिक उद्दिष्टांशी अनुरुपता, शिक्षक आणि शिक्षक प्रशिक्षकांची अपेक्षित भूमिका, वास्तविकता आणि शाळेचे आणि प्रशिक्षण संस्थेचे वातावरण आणि व्यवस्थापन, प्रशासनाची प्रक्रिया आणि असलेल्या शाळा व प्रशिक्षण संस्थांना त्यांच्या अनुरुप बनविणाऱ्या इतर घटकांचा समूदाय असू शकतात. इथे महत्त्वाचा मुद्दा हा की, सर्व समिती आणि आयोग यांनी मूल्य शिक्षणाला शैक्षणिक आणि सामाजिक परिस्थितीच्या विश्लेषणावर आधारित राष्ट्रीय ध्येयाच्या निश्चित घटना संदर्भात विचारात घेतले आहे. मुद्दा हा आहे की, मूल्यशिक्षणातील शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम शाळा आणि शिक्षक प्रशिक्षणातील वास्तविकतामध्ये न्याय, समानता, अनुकंपा, सहकार्य आणि मानवी हक्क अशा मूल्यांवर भर देऊन रुजवले पाहिजेत.

मूल्य शिक्षणातील पद्धती आणि तंत्रे या अनेक आणि वैविध्यपूर्ण आहे ज्यांची निवड निवडलेली मूल्ये. या मूल्यांच्या विकसनाचे स्त्रोत आणि इतर अनेक मर्यादित घटक यावर अवलंबून आहे. संपूर्ण पाठ्यक्रम मूल्य शिक्षणाचा महत्त्वाचा स्त्रोत म्हणून कार्य करतात. लोकशाहीवादी पद्धती आणि कृती (कार्यक्रम) जबाबदार असले तरी मूल्यशिक्षणासाठी विद्यार्थी स्वयं-शासन प्रभावीपणे योगदान करते. म्हणून मूल्य शिक्षणावर प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, अनुषांगिक पद्धतीचा प्रभाव पडतो. ही मूल्ये सूचित किंवा छुप्या (hidden) आणि नियोजित पाठ्यक्रमाद्वारे पारेषित होतात.

मूल्य शिक्षणाची संपूर्ण प्रक्रिया ही सर्व समावेशक आणि क्लिष्ट आहे. ज्यात अनेक प्रकारच्या आणि विविध अध्ययन अनुभूतींचा समावेश होतो. हे अनुभव एका स्त्रोताद्वारे किंवा शिक्षकाने वेगवेगळ्या अध्ययन संसाधनाकडून वैयक्तिकरित्या किंवा एकत्रितरित्या अध्ययन प्रकारातून घेतले तरी सर्व प्रकारचे अध्ययन अनुभवाचा पुरवठा करु शकत नाही. या मुद्द्यावर भर दिला आहे. या विश्लेषण आणि आकलन पार्श्वभूमीबरोबर पुढील पद्धती आणि तंत्र सुचवता येतील :

१) वर्ग अध्ययन आणि कृती पद्धती/दृष्टीकोन
२) प्रात्यक्षिक कृती पद्धत
३) सामाजिकीकरण तंत्र आणि कृती
४) अनुषांगिक अध्ययन पद्धत (Incidental Learning Method)

१) वर्ग अध्ययन कृती पद्धती :

मूल्यशिक्षणाचा मूळ हेतू अध्ययन कर्त्यात नैतिक स्वायत्तत्ता विकसित करणे आणि वर्ग शाळेच्या कृती मूल्यांच्या आशयाबद्दल संवेदनशीलता विकसित करणे हा आहे. पद्धती आणि कृतींचे अध्ययन कर्त्यावर मतारोपण करणाऱ्या प्रयत्नापासून मुक्त असाव्यात. विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या अनुभव आणि कृतींना सामोरे जाऊन मूल्य निर्णयक्षमता आणि internalization संपादित करु शकतो. यामध्ये वाचन श्रवण, चर्चा, कथाकथन, शिक्षकाद्वारे कल्पनांचे सादरीकरण व इतर पद्धतींचा समावेश होतो. या पद्धती मूल्यशिक्षणाच्या पुढीलपैकी कोणत्याही एका स्त्रोताबरोबर वापरावे. १) आत्मचरित्र २) कथा ३) निबंध, लेख, उच्च प्रतीचा नमुना, वर्तमानपत्रातील उतारा ४) तात्पर्यकथा, म्हणी, अवतरण, कविता ५) नैतिक / तात्विक द्विधा मनस्थिती, ६) वर्गघटना, किस्से मतभेद ज्या स्त्रोतांचा अध्ययनकर्त्याला वेगवेगळ्या मूल्याची कारणमीमांसा, विचार करण्यासाठी समावेश करण्यासाठी, होऊ शकतो. वर्गशिक्षक या स्त्रोतांचा वापर करुन कृती योजना / पाठ नियोजन करु शकतात. येथे चर्चा केलेल्या विषयाची उदाहरणे देऊ शकतात.

अ) जीवन चरित्र : जीवनचरित्र म्हणजे प्रसिद्ध व्यक्तिमत्त्वाच्या जीवन इतिहासाचे लिखित दस्तावेज जीवन चरित्रे शास्त्रज्ञ समाजसुधारक, अध्यात्मिक गुरु अशा व्यक्तिमत्त्वाची ओळख करुन देतात. शास्त्रज्ञ समाजसुधारक, अध्यात्मिक गुरु अशा व्यक्तिंची जीवन चरित्रे असतात. जीवन / चरित्रकाराच्या रेखाटण्याप्रमाणे, त्यांचे जीवन, विचार, कृती त्यांच्या जीवनाला आकार देणारी स्फुर्ती यांचा परिचय करुन देतात. यांचा वापर मूल्यशिक्षणात करण्यासाठी त्याचे अशा रीतीने संक्षिप्त करावे की, ज्यात प्रसिद्ध व्यक्तीची नितीमानता आणि जीवन विकास अधोरेखित होईल, सुप्त स्वरुपातील मूल्य असणाऱ्या घटना एकत्रित व पुनर्रचना करुन रेखाटनाद्वारे संपूर्ण आत्मचरित्र पुन्हा सांगता येईल.

ब) कथा : विविध वयोगटातील विद्यार्थ्यांना निरनिराळ्या प्रकारच्या कथा आकर्षित करतात. या कथा शिक्षकांनी किंवा विद्यार्थ्यांनी स्वतः सांगितलेल्या असतात. ज्यांच्यावर नंतर चर्चा, प्रश्नविचारणा आणि विश्लेषण केले जाते. शिक्षकाने अध्ययनकर्त्याच्या पातळीनुसार विकासासाठी सुयोग्य अशी कथा निवडण्यावर भर दिला पाहिजे. साध्या आणि छोट्या गोष्टी जशा परिकथा, दंतकथा या प्राथमिक पातळीच्या मुलांसाठी चांगल्या असतात. विविध प्रकारच्या मूल्यांची जाणीव निर्माण करण्यासाठी कथांचा उपयोग होऊ शकतो. नितीकथा आणि परीकथांचा वापर दया, जैविक गोष्टींबद्दल प्रेम, पर्यावरणीय जाणीव आणि धैर्य अशा मूल्यांच्या विकासासाठी होऊ शकतो. [कथा कथनात अंतर्भूत पायऱ्या उदाहरणासहित appendix II मध्ये दिल्या आहेत.]

क) निबंधातील उतारा, लेख, नमुना आणि वर्तमानपत्रे : मूल्यविषयक अकल्पित लेखन जसे निबंध, लेख, वर्तमानपत्र अहवाल मूल्यशिक्षणासाठी वापरता येतील. हे पुस्तक आणि वार्तापत्रात आलेले सामाजिक आणि राजकीय मुद्द्यासंदर्भात पांडीत्यपूर्ण लेख असू शकतात. विद्यार्थ्यांना निवडलेल्या मूल्यांच्या संदर्भात विविध स्त्रोतापासून लेख किंवा लेखन संकलित करण्यास सांगू शकतात. आणि त्यावर लेख लिहिण्यास प्रोत्साहित करु शकतात. शिक्षक अध्ययनकर्त्याला विचार करण्यास प्रवृत्त करणारे प्रश्न तयार करतात आणि मूल्यासंदर्भात अनेक मुद्द्यांवर परावर्तन करतात.
[प्रसिद्ध कार्याद्वारे दिलेली उदाहरणे (appedix) परिशिष्ट III मध्ये दिलेले आहे.]

ड) तात्विक / नैतिक द्विधा मनस्थितीवर चर्चा : तात्विक आणि नैतिक द्विधा मनस्थितीचा वापर मूल्यशिक्षणात सूचनात्मक पद्धत म्हणून होऊ शकतो. ते अध्ययन कर्त्याचा विचार करण्यास कारणमीमांसा करण्यास, नैतिक निर्णय घेण्यास आणि नैतिक द्विधा मनस्थितीत विचारात घेतलेल्या मुद्द्यांवर निर्णयाप्रत येण्यासाठी प्रभावी परिस्थिती निर्माण करतात. या द्विधा मनस्थिती पर्यावरणाचे जतन, वैज्ञानिक मनोवस्था, सामाजिक न्याय आणि समता अशा मुद्द्यावर होऊ शकतात. शिक्षक सर्व महत्त्वाच्या पायऱ्यांचा समावेश असणारा मार्गदर्शक असा पाठ तयार करतात किंवा द्विधा मनस्थितीवर चर्चेची सुरुवात करतात. नैतिक निर्णय क्षमतेच्या विकासासाठी, द्विधा मनस्थितीची क्षमतांच्या दृष्टीकोनानुसार, नैतिक द्विधा मनस्थितीचा वापर मूल्य निर्णय आणि नैतिक विकसनाचा अभ्यास करण्यासाठी संशोधनात महत्त्वाचे साधन म्हणून होतो. निवडलेल्या द्विधा मनस्थितीवर शिक्षक मुद्द्यातील pros & cons (उचित आणि अनुचितवर) चर्चा सुरु करु शकतात. विद्यार्थ्याला मुद्द्याचे कारण देऊन प्रतिसाद द्यायला सांगतात. तिथे विद्यार्थी प्रमुख असू शकतो जो चर्चा प्रक्रियेतील नोंदी / नियमन करतो.
[नैतिक द्विधा मनस्थिती व उदाहरणे appendix IV मध्ये दिली आहे.]

२) प्रात्यक्षिक कृती पद्धती / दृष्टीकोन :

मूल्यशिक्षण हे cognitive percept (ज्ञानात्मक अवबोधा) नुसार गरजेचे असले तरीही पुरेसे नाही. विद्यार्थीनी स्वतःला आयुष्या संदर्भातील प्रात्यक्षिक आणि दैनंदिन कृती ज्या जीवनातील तत्त्वे आणि मूल्यांच्या उपयोजनाला चेतना देतात त्यात गुंतविले पाहिजे. प्रात्यक्षिक दृष्टीकोनाचा (अर्थ) सारांश हा की अध्ययन कर्त्याला प्रात्यक्षिकासाठी पुरेशी संधी पुरविणे आणि त्यांनी समजलेल्या, आकलन केलेल्या तत्त्व आणि मूल्याप्रमाणे जीवन जगणे. Rubric

प्रात्यक्षिक कृती अंतर्गत वेगवेगळ्या कृतींचे आयोजन करु शकतो. व्यावहारिकदृष्ट्या शालेय पाठ्यक्रमातील सर्व विषय उपक्रम किंवा प्रात्यक्षिक कामांकडे भर देतात. हे आराखडे मूल्यशिक्षणाला अनुसरून तयार करु शकतो. मूल्यशिक्षणाच्या अर्थपूर्ण उपक्रमात खालील थोड्या किंवा सर्व कृतीच्या संयोगाचा अंतर्भाव होऊ शकतो.

अ) सामाजिक आणि नैतिक मूल्ये दैनंदिन परिस्थितीतील उदाहरणे महान व्यक्तिच्या सांगण्यातील उतार, विद्यार्थ्यात मूल्य निर्णय विकसित करणाऱ्या घटना आणि समस्या नाटके, संभाषणे, साध्या कविता (काव्य वाचन) आणि जगातील धर्माचे धर्मग्रंथ, जे महान व्यक्तीच्या आत्मचरित्राप्रमाणे आशयाचा मोठा भाग होऊ शकतात.

ब) वैयक्तिक मैत्रीपूर्ण, सामाजिक मूल्ये वर्गात शिकविली पाहिजेत आणि विद्यार्थ्यांबरोबर त्यांची पूर्णपणे चर्चा केली पाहिजे.

क) मूल्यशिक्षणात आत्मचरित्र, धर्मग्रंथ, म्हणी, स्त्रोत, महान व्यक्तींच्या उक्ती यापासून ते चालू सामाजिक आणि राजकीय घटना, धर्म आणि पुराणातील कथा, नैतिक द्विधा मनस्थिती आणि शालेय उपक्रम अशा विविध अध्ययन स्त्रोतांचा वापर करु शकतो.

ड) विद्यार्थ्यांमध्ये स्वयं शिस्तीच्या विकासासाठी (Yoga) योगा आणि इतर कृतीचा अंतर्भाव करु शकतो.

इ) संघ कृती जशा परिसर स्वच्छता, झोपडपट्ट्याना भेट, इस्पितळाना भेट, विविध मान्यतांच्या प्रार्थना स्थळांना भेट जे मूल्य शिक्षणात आशयाचा भाग होऊ शकतात. अध्यात्मिक गुरुंचे जीवनावरील व्याख्याने, स्वयं त्याग, एकत्रित आनंद, सत्याबद्दल प्रेम, महान गुरु, जीवनातील ज्या मूल्यासाठी जगले अशी मूल्ये बाहेर आणू शकतात.

फ) व्यक्तिमत्त्व विकास Retreats आयोजित करु शकतात जे विद्यार्थ्यांमध्ये स्वयंनियंत्रण, वक्तशीरपणा इतराच्या मान्यतांबाबत आदर, काळजी, सहभागी सहकार्य आणि शांततेचे मूल्य (आत्मशांती) विकसनाला मदत करु शकतात.

ग) प्रार्थना, चिंतन आणि श्रमदान हे मूल्य शिक्षणातील आशयाचा भाग होऊ शकतात. हे विद्यार्थ्यांना आत्म संयमन आणि वैचारिक बदलांची जोपासना आणि श्रमप्रतिष्ठा या गुणात्मक विकासासाठी मदत करु शकतात.

ह) जयंती म्हणजेच महान राजकीय आणि अध्यात्मिक व्यक्तीचे जन्मदिवसाचे निरीक्षण आणि पात्र विकासनासाठी तरुण संस्थाचे आयोजन विद्यार्थ्यात मूल्य वृद्धींगत करण्यास फार काळ उपयोगी होतात.

मूल्य संदर्भात प्रात्यक्षिक कृतीचे आयोजन शाळेसमोर प्रत्यक्ष कृतीयुक्त समस्या निर्माण करतात. वर नमूद केलेल्या कृतीचे नियोजन व आयोजन करण्यासाठी काळजी घेतली पाहिजे.

३) Contrived घटना / सामाजिक तंत्र दृष्टीकोन :

मूल्यशिक्षणात वेगवेगळ्या group oriented (गटावर आधारित) तंत्राचा वापर करु शकतो. सामाजिक तंत्रात अध्ययनकर्ता कृती आणि अनुभवात भाग घेतो. जे सामाजिकी-करणाच्या घटकाचे कार्य आणि समस्या चांगल्या पद्धतीने प्रस्तुत करतात. अध्ययनकर्ता जो अनुभव घेतो. तो सत्य परिस्थितीला सामोरा गेलेल्या प्रत्यक्ष अनुभवासारखे नसतात किंवा

cognitive क्षेत्रातील case [अभ्यास] प्रमाणे पूर्णपणे अप्रत्यक्ष आणि कल्पना स्वरुप नसतात. ते खऱ्या सामाजिक अनुभवाचे सामान्यरुप असतात आणि जेव्हा सत्य हे काल्पनिक आणि प्रतिबंधक असतात तेव्हा गरजेचे आणि उपयोगी असतात. यामध्ये सामाजिक भूमिका अभिनय करणे आणि प्रतिकृती करणे यांचा समावेश होतो.

सामाजिक अनुभवांचे प्रभावीपणे नियोजन विद्यार्थ्यांच्या योग्य विकसनासाठी आणि सामाजिक भूमिकाभिनय करण्याबद्दलच्या आकलनाला प्रोत्साहित करण्यासाठी होते. विविध सामाजिक परिस्थितीतील मुले काही भूमिकाची कल्पना करु शकतात. इतरांच्या अपेक्षा आणि स्वतःची ओळख यातील परस्परावलंबनाचे आकलन प्रत्येकास होण्यासाठी, सामाजिक भूमिकाभिनयात अध्ययनकर्त्यास भूमिकेच्या वर्तन स्वरुपाचे आणि नियमांचे आकलन होण्यासाठी योग्यरित्या मार्गदर्शन करणे जरुरी असते. भूमिकाभिनय कृती सत्य जीवनातील अनुभव आणि विद्यार्थ्यांचे वय पातळीप्रमाणे आयोजित केली पाहिजे.

आदर्श विद्यार्थी, शिक्षक, पालक, देशभक्तांची भूमिका स्वेच्छेने घेणे अपेक्षित असते. भूमिकाभिनयात नकारात्मक संवेदना निरुत्साही करत अभिरुपतेच्या कृतींमध्ये अध्ययनकर्ता सत्य परिस्थितीप्रमाणे वागतात आणि परिस्थितीतील घटना आणि वैशिष्ट्यांचे चित्रण करतात. Modeling करणे हे असे एक तंत्र आहे ज्यामध्ये व्यक्तीची गुणवत्ता आणि अनुकरणीय मूल्ये विचारात घेणे अपेक्षित असते. अध्ययनकर्त्यासमोर प्रातिनिधीक स्वरुपात सादर होतात जी खालील मूल्य शिक्षणाच्या हेतूंमध्ये समाविष्ट विविध सामाजिक तंत्राच्या शीर्षकाखाली नमूद केलेल्या विविध कृतींचे मार्गदर्शन करते.

अ) नाट्यीकरणासाठी पारंपारिक व आधुनिक लोकनृत्य अशा दोन्ही प्रकारच्या मूल्य संकल्पनेवर आधारित नाट्य स्वरुपात तयार करणे.
ब) धर्मग्रंथ आणि त्या ग्रंथातील वेगवेगळ्या भूमिका घेऊन त्यांचा नाट्य रुपात सराव करण्याची संधी प्राप्त करुन देणे.
क) आदर्श व्यक्ती आणि गटांच्या नमुना सादरीकरणासाठीचे विषय पुढील प्रमाणे :
   १) लैंगिक असमानता
   २) स्त्रियांच्या भूमिका आणि शिक्षणा संबंधित समस्या
   ३) प्राणी आणि मानवाची काळजी
   ४) पर्यावरण संरक्षणा संबंधित समस्या
   ५) हवा, पाणी प्रदूषणाचे दुष्परिणाम

वर नमूद केलेल्या विशिष्ट समस्याबाबत चर्चाद्वारे प्रश्नविचारणा आणि जाणीवेच्या विकासासाठी प्रतिमा तयार करणे.

Contrived घटनाच्या वापरात पुढील अवस्था अंगिकारल्या जातात.

- **उद्बोधन :** या अवस्थेत सहभागीला तंत्राचे तपशीलवार वर्णन आणि त्याचा हेतू दिला जातो. हे वर्गात तयारी करण्यासाठी केले जाते.
- **सहभागी सूचना :** या अवस्थेत सहभागी त्याच्याकडून अपेक्षित सादरीकरणाबाबत सूचना दिल्या जातात.

– **सहभागी सादरीकरण :** या अवस्थेत सहभागी घटनेला अनुसरुन सादरीकरण व कृती करतो.

– **सहभागी debriefing:** इथे शिक्षक मार्गदर्शक सत्य जीवनातील घटना संदर्भात प्रश्न विचारतात ज्यांचा रोख अध्ययनाकडे करतात.

४) घटनात्मक अध्ययन पद्धती :

घटना ही व्यक्ती किंवा गटाच्या आयुष्यातील एक भाग किंवा अनुभव असू शकतो. घटनात्मक दृष्टीकोनाला त्याच्या दृष्टीने खुप चांगला मुद्दा आहे. जो मूल्य शिक्षणाच्या हेतूसाठी वर्गात किंवा वर्गाबाहेर वापरु शकतो. यामध्ये घटनाच्या पूर्व नियोजित किंवा अचानक निदर्शनास आलेल्या संघाच्या किंवा व्यक्तीच्या चूक किंवा बरोबर कृती ओळखणे आणि त्या संदर्भात repranding किंवा फलदायी काळजी करणे. हा दृष्टीकोन मानसिकदृष्ट्या प्रभावी आहे जसे लोखंड उष्ण असताना त्यावर आघात करणे. मुलांच्या दैनंदिन जीवनातील अनुभवाभोवतालच्या भाग किंवा घटना ह्या मुलांना त्यांच्याशी ओळख आणि त्याच्यातील विचारशक्ती, आणि भावना ओळखण्यास मदत करतात. मानवी समस्याच्या योग्य दृष्टीकोनासाठी घटनांच्या नोंदी व्यवस्थित हव्यात आणि चर्चा करायला हव्यात.

मुलांमध्ये आणि तरुणामध्ये मुल्यांच्या विकसनासाठी सुयोग्य अध्यापन पद्धती तयार करण्याचे काही प्रयत्न केले गेलेत.

Douglas Supreka (1976) नुसार मूल्य शिक्षणात वेगवेगळे दृष्टीकोन जे पुढे विस्तृतपणे सांगितले आहे.

१) Evocation दृष्टीकोन : विद्यार्थ्यांना विचार आणि काचकूच शिवाय उत्स्फूर्तपणे विसंगत निवड करण्यास प्रोत्साहित केले जाते. हे विद्यार्थ्याला जास्तीत जास्त स्वातंत्र्याचे वातावरण देते आणि उत्स्फूर्त करणारी स्थिती पुरवते ज्यामुळे उत्स्फूर्त प्रतिक्रिया मिळविता येईल. उदा. मुलांचा उपासमारीच्या चित्रावरील प्रतिसाद.

२) Inculcation दृष्टीकोन (मनावरील ठसा): विद्यार्थ्यांना विशिष्ट अपेक्षित मूल्याप्रमाणे वागण्यास जोर दिला जातो. मूल्याच्या वृद्धीकरणासाठी शिक्षकाद्वारे सकारात्मक आणि नकारात्मक प्रबलनास मनावरील ठसा मदत करतो. हे शिक्षकांच्या नैसर्गिक कृती व प्रतिसादाद्वारे केले जाऊ शकते. या वेळी उल्लेखीत पद्धती अयशस्वी झाली आहे.

३) जागृती दृष्टीकोन : हा दृष्टीकोन विद्यार्थ्यांना स्वयं मूल्याची जाणीव व ओळखण्यासाठी मदत करतात. विद्यार्थ्यांना त्यांच्या अनुभवाची सहभागिता करण्यास प्रोत्साहन दिले जाते. शिक्षक वाचन, फिल्म, भूमिकाभिनय, लहान गट चर्चा आणि अभिरुपता याद्वारे मूल्याधिष्ठीत स्थिती किंवा द्विधा मनस्थिती, प्रस्तुत करतात. विद्यार्थी विचार, भावना, समज स्वतःची आणि इतरांची वर्तणूक यावरुन मूल्यासंदर्भात अनुमान काढण्याच्या प्रक्रियेत गुंततात.

४) नैतिक तात्विक दृष्टीकोन : या दृष्टीकोनात कोटलबर्गच्या नैतिक विकसनातील सहा पातळ्यांचा सिद्धांत सामान्यपणे आराखडा म्हणून वापरला जातो. शिक्षक अध्ययन अनुभव तयार करतात. जे नैतिक विकासाला चालना देतात. हे अनुभव कोहलबर्गच्या 'भूमिका घेणे' या सामान्य वर्गात येतात. Empathy हा भूमिका घेण्यामधला चिकित्सक घटक आहे. स्वतःला त्या पात्रात ठेवून आणि निर्णय घेण्याची प्रक्रिया अनुभवल्याने विद्यार्थी त्या नैतिक निर्णयाला सामान्य दृष्टीकोनापेक्षा अधिक मोठ्या आराखड्याप्रमाणे पाहतो. यामध्ये विद्यार्थ्याने द्विधा मनस्थितीवर चर्चा करण्याचा समावेश होतो. अशा प्रकारे चर्चा आणि परावर्तनाद्वारे विद्यार्थी सर्वमतावर तडजोडीऐवजी मूल्यांची स्थिती व्यक्ती करण्यास प्रोत्साहित होतात.

५) विश्लेषण दृष्टीकोन : संघाला किंवा व्यक्तीला सामाजिक मूल्य समस्येचा अभ्यास करण्यास प्रोत्साहित केले जाते. त्यांना मूल्य प्रश्नांचे स्पष्टीकरण आणि मूल्य ओळखण्यास सांगितले जाते. त्यांना सत्य आणि purported (दावा), सत्याचे पुरावे निश्चित करणे आणि मूल्यनिर्णयाप्रत येणे, सदृश्य cases उपयोजन करणे, निर्णयामधील मूल्यांच्या तत्त्वांचे inferring (अनुमान) आणि परीक्षण करण्यास प्रोत्साहित करणे.

६) मूल्य स्पष्टीकरण दृष्टीकोन : हे विद्यार्थ्यांना सुसंगत विचार आणि भावनात्मक जाणीव व्यक्तीच्या वर्तणूकीचे प्रकारांबद्दल, सुसंगत विचार आणि भावनात्मक जाणीव आणि वर्गीकरण व मुल्यांचे वास्तविकपणा यासाठी वापरण्यास मदत करतात. हा दृष्टीकोन Raths etal (1966) आणि Simon etal यांनी सांगितला आहे. ज्यामध्ये विद्यार्थ्यांना त्यांचे स्वयं-मूल्यमापन प्रतिक्रिया कार्य पत्रिका ज्यात चित्र काढणे, प्रश्न विचारणे आणि कृतीचा समावेश होतो, यांचे टाचण करण्यास सांगतात.

मुल्यांचा स्पष्टीकरणात्मक दृष्टीकोन :

मूल्यशिक्षणाच्या वेगवेगळ्या मार्गापैकी सर्वसामान्य चर्चीत आणि जास्तीत जास्त प्रभावी मार्ग म्हणजे मूल्यांचा स्पष्टीकरणात्मक दृष्टीकोन हा Raths, Harmin आणि Simon यांनी त्यांच्या 'मूल्य आणि शिक्षण' या पुस्तकात स्वीकारला आहे. Raths नुसार वैविध्यपूर्ण मतभेदीक मूल्ये स्वतःहून प्रत्येक व्यक्ती पुढे सादर होतात. या मतभेदीक मूल्यांच्या एकत्रीकरणात प्रत्येक व्यक्ती ही मूल्यांबाबत गोंधळलेली आढळून येते. जी मुलं मूल्यांबाबत गोंधळ अनुभवतात ती बहुदा आढळून येते. जी मुलं मुल्यांबाबत गोंधळ अनुभवतात ती बहुदा स्वभाववैचित्र्य, वर्तणूक प्रकार – विसंगतता, भरकटलेली, अति सारखेपणा, अति कलह आणि जुनाट वर्तन आणि वारंवारता, यातून ओळखता येतात.

Raths हा जो मूल्य स्पष्टीकरणाचा निर्माता आहे त्याचे असे मानणे आहे की, विद्यार्थ्यांना मूल्य गोंधळात स्वतः विचार करण्याचा प्रयत्न करणे व जीवनातील गोंधळात स्वयंमार्गदर्शनसाठी अधिक सक्षम बनविण्यास उत्तेजन देणे. Mronil Harmin (Rath बरोबरचा सहलेखक) याच्या असे लक्षात आले की Rath चा दृष्टीकोन हा Dewey's च्या सुचनावर आधारित असून त्याचे परावर्तन जीवनातील अनुभवांवर होते. हे परावर्तन मूल्यांच्या स्पष्टतेसाठी मदत करते. Harmin चे पुढील विधान मूल्य स्पष्टीकरणाच्या उद्दिष्टांचा सारांश पुरवतात.

मूल्ये स्पष्टीकरणाची प्रक्रिया विद्यार्थ्यांनी वापरलेल्या विशिष्ट प्रकारच्या भाषा ज्यापासून शिक्षक मूल्य निर्माण झाल्याचा सुयोग्य निष्कर्ष काढतात, याच्या आधारे व्याख्या करु शकतो. हा दृष्टीकोन मूल्यसंबंधित तत्त्वावर (जे आपण एकमेकांच्या मुल्यांचे योग्यतेचे मत करु नये.) आधारित असतो आणि जे आपण त्या मुल्यांचा वैयक्तिकरीत्या अर्थपूर्ण म्हणजेच मुल्ये जी आपल्याला अधिक सहेतूक उत्पादक, सामाजिक जाणीव आणि चांगले चिकित्सक विचार करणारे बनवतात. यामध्ये वर्गीकरण करण्याचा प्रयत्न करतो.

मूल्य स्पष्टीकरणानुसार मूल्ये ही तीन प्रक्रियांवर आधारित असतात.

१) निवडणे
२) किंमत ठरवणे
३) कृती करणे

यानुसार मूल्य म्हणजे जेव्हा पुढील सात तरतुदीचे समाधान होऊन त्याचा निष्कर्ष होय.

१) निवडणे :

- मुक्तपणे
- पर्यायापासून (विकल्पापासून)
- विचार करुन गृहीत धरलेल्या प्रत्येक विकल्पांच्या परिणामानंतर

२) किंमत ठरवणे :

- निवडीचा आनंद घेणे, काळजी घेणे.
- निवड स्वखुषीने लोकांत निश्चितपणे सांगणे.

३) कृती करणे :

- निवडीबरोबर काहीतरी कृती करणे.
- जीवनातील काही पद्धतीत पुन्हा पुन्हा

या प्रक्रिया एकत्रितपणे मूल्यांची व्याख्या सांगतात. सातही तरतुदींचे समाधान केल्याशिवाय त्याला मूल्य म्हणता येत नाही. मूल्य स्पष्टीकरणात आधारभूत तंत्र म्हणजे 'स्पष्टीकरण प्रतिसाद'. स्पष्टीकरण प्रतिसाद म्हणजे (Raths et al 1966) विद्यार्थ्यांचा प्रतिसादाचा मार्ग त्याचा परिणाम त्याने विचारात घेतलेल्यापैकी त्याने काय निवडले, त्याने कशाची किंमत केली आणि किंवा त्याने काय केले हे होय. ते त्याला त्याचे विचार आणि वर्तणूक याच्या स्पष्टीकरणासाठी प्रोत्साहित करतात म्हणून मूल्याच्या स्पष्टीकरणासाठी त्याला ते त्याबद्दल विचार करण्यास प्रोत्साहित करतात.

मूल्य स्पष्टीकरणाचा रोगनिवारक प्रक्रिया म्हणून वापर करताना त्यात ग्राहकाला तीन अवस्थाद्वारे मार्गदर्शन करण्याचा समावेश होतो. या तीन अवस्था पुढीलप्रमाणे :

१) शोध / जाणीव अवस्था :

ग्राहकाला तो / ती स्वीकार करेल अशी प्राथमिक मूल्ये ओळखण्यास प्रोत्साहन देतात. मूल्य प्राथमिक असल्याचे निश्चितीकरण होते जेव्हा ग्राहकाला विश्वास होतो की ते काय चांगले किंवा काळजी करण्यासाठी पात्र आहे हे निश्चितपणे सांगते. या अवस्थेमध्ये संबंधित विकास प्रक्रियेद्वारे ग्राहक विशिष्ट मूल्ये स्वीकारण्यास सुरुवात करतो. ग्राहकाने कृतीतील मूल्यांच्या आकलनासाठी ज्ञानात्मक विकास केला पाहिजे. चांगल्या मूल्याच्या संकल्पनानंतर त्याचा भावनात्मकरित्या समावेश करु शकतो.

२) मूल्य प्रतिपादन करणे / सुधारण्याची अवस्था :

प्रक्रियेत या अवस्थेत मूल्ये भावनिक क्षेत्र आणि मानसिक रचनेपेक्षा जास्त गतिमानतेने विचारात घेतली पाहिजेत. मूल्ये ही बौद्धिक नियम, प्रतिमाने, आध्यात्मिक तत्त्वे, नैतिक तत्त्वे, किंवा स्वत:साठी इच्छित मार्गदर्शन, इतरांना सूचक, कुटुंब, संप्रदाय, समाज आणि जग यापेक्षा अधिक आहे. परीक्षण केलेली मूल्ये ही व्यक्तिमत्त्व प्रणालीतील काहीतरी नवीनकिंवा जे राहून गेलेले आहे अशा अंतर्गत संघर्षावर केंद्रित होते.

जेव्हा व्यक्ति एखाद्या मूल्याचे प्रतिपादन किंवा सुधारणा करते तेव्हा तिला / त्याला पूर्व अनुभव परीक्षण करण्यास प्रवृत्त केलेच पाहिजे. या प्रक्रियेत १) इतरांची त्या व्यक्तिशी असलेली वागणूक २) त्या व्यक्तीची इतरांशी असणारी वागणूक ३) सामाजिक आंतरक्रियेचा अर्थ काय होतो. ४) मूल्य – ध्येय, सुख आणि संधी यांच्याशी कसे निगडीत आहे यांचा समावेश होतो.

३) स्वीकार :

विशिष्ट मूल्ये ज्यांचे परीक्षण झाले आहे. त्यांचा ग्राहकांना जगाच्या किंवा जीवनशैलीच्या दृष्टीने मध्यवर्ती म्हणून संदर्भ दिला जातो. ग्राहक दैनंदिन आंतरक्रियेतून मूल्याचा निश्चित अविर्भावासाठी संदर्भ घेऊ शकतो. विशिष्ट मुल्ये ज्यांचा स्वीकार झाला आहे, ही विशिष्ट मुल्ये व्यक्तीच्या वैयक्तिक श्रेणीबंधात आदर्श व कल्पना यांच्यातील स्पष्ट विख्यात दर्जा या स्वरुपात व्यक्त केली जातील.

विशिष्ट मूल्य स्पष्टीकरणाची तंत्रे पुढीलप्रमाणे :

- Y तक्ता – विद्यार्थी Y ने नियोजित अशा तीन विभागात प्रामुख्याने मूल्ये कशी दिसतात, कशी असतात, कशी वाटतात त्यांच्या अनुक्रमानुसार यादी करुन मूल्ये प्रतिपादन करणाऱ्या कृतींची यादी विकसित करु शकतो.
- SWOT पृथक्करण – विद्यार्थी काही विशिष्ट मुद्द्यासंदर्भात सामर्थ्य कमकुवतपणा, संधी आणि धोके ओळखतो.
- क्रम लावणे – विद्यार्थ्यांना एका विशिष्ट मुद्द्यासंदर्भात विधानांची यादी दिली जाते आणि त्यांना त्यांच्या विधानातील मुल्य महत्त्वानुसार योग्य क्रम लावण्यास सांगितला जातो.

- PMI - विद्यार्थ्यानी निवडलेल्या मुद्द्यांच्या संदर्भात घेतलेल्या प्रश्नांची सकारात्मक (+), नकारात्मक (-) आणि आवडीच्या (आवडणे) दृष्टीकोनांची यादी केली पाहिजे. व त्यायोगे स्वतःची मूल्ये स्पष्ट करावी.
- निष्पत्ती तक्ता – विद्यार्थी त्या व्यक्तीच्या किंवा गटाने विचारात घेतलेल्या मूल्यावर आधारित निष्कर्ष कृती निष्पत्तींची नोंद करतो.

तक्ता वर्णनात्मक व्यवस्थापकांच्या शाखांचे स्वरुप समजून केलेला असतो.

UNESCO APIED - शिक्षणावर परिणामकारक विकास अहवालात चारित्र्य घडवण्याच्या कृतीमध्ये शिक्षक ज्या मूल्यांचा वापर करु शकतो. अशा पुढील दृष्टीकोनांचा उल्लेख आहे.

१) **कथन करणे :** ही मूल्य विकसनाची प्रक्रिया आहे जी विद्यार्थ्यास परिस्थितीच्या कथाकथनाद्वारे मूल्यभारीत परिस्थितीचे स्पष्ट चित्रण करण्यास सक्षम बनवते.

२) **वृद्धीगंतता :** व्यक्तीच्या स्व मूल्य प्रणालीत प्रमाणित नमुने स्थानबद्ध करणे आणि त्याविषयी हळूहळू मनात भरविणाऱ्या दृष्टीकोनाशी जुळविणे.

३) **लक्षपूर्वक वाचन :** अध्ययनकर्त्याने जे मूल्य स्वीकारले आहे त्यानुसार वर्तन करण्याकडे मन वळविण्याची प्रक्रिया आहे.

४) **अनुसरण :** हे तंत्र आहे ज्यात विशिष्ट व्यक्तीचे इच्छित सारांश / अध्ययन कार्यात प्रतिकृती म्हणून सादर केलेली मूल्ये यांचे आकलन करणे.

५) **भूमिका अभिनय :** अपकाराचा धोका न घेता दुसऱ्या व्यक्तिच्या भूमिकेचा अभिनेत्याच्या वास्तव भावनांतून अभिनय करणे.

६) **अभिरुपता :** तंत्र ज्यात अध्ययनकर्त्यास पाठासाठी एवादी विशिष्ट परिस्थिती आहे असे समजण्यास सांगून आणि त्यात तो प्रसंग त्या व्यक्तीच्या व्यक्तीमत्त्वाची हुबेहुब भूमिका वठविण्यास सांगणे.

७) **संकट निरसन :** एक दृष्टीकोन ज्यात विद्यार्थ्यांपुढे एखादा पेचप्रसंग सादर करुन त्यांना त्यावर कोणती मते द्याल हे विचारले जाते.

८) **परिस्थिती, कथा, चित्रे, इ. चे चर्चा करणे :** हे तंत्र विद्यार्थ्यांना पाठाविषयी सखोल स्पष्टीकरण आणि चर्चा करण्यास सांगते.

९) **थोर व्यक्तिंची जीवनचरित्रे अभ्यासणे :** हा दृष्टीकोन आहे जो थोर व्यक्तींच्या जीवनाचा विषयभाग म्हणून वापर करुन त्यांचे चांगली गरज व त्यांचे स्पर्धात्मक परिस्थितीत योग्य विचार काढून घेणे.

१०) नैतिक विवेचन : एखाद्याच्या सामाजिक अनुभवातून (उदा. नैतिक कारणमीमांसा व पृथक्करण) कृतीयुक्त रचना आणि पुनर्रचनेचा नैतिकतेच्या संवेदनासंबंधावर काम करण्याची प्रक्रिया.

११) मूल्य स्पष्टीकरण : मूल्य स्पष्टीकरण हे अध्ययनकर्त्यास केंद्रीत करुन मूल्यविकास करण्याचे तंत्र आहे. ते मुख्यत्त्वे जेव्हा मूल्य पेचप्रसंगाना धैर्याने तोंड द्यायचे असते तेव्हा विद्यार्थ्यांचे जे समज असतात त्या समजानुसार त्यांचे वर्तन आणि निर्णय घेण्याची क्षमता यावर अवलंबून असते.

तुमची प्रगती अभ्यासूया :

१) ई-शिक्षक शिक्षण म्हणजे काय ?
२) ई-शिक्षक शिक्षणाची तंत्रे स्पष्ट करा.
३) ई-शिक्षक प्रशिक्षणाच्या निष्पत्ती सांगा.
४) मूल्याधिष्ठीत शिक्षणात मूल्य स्पष्टीकरणाचे दृष्टीकोन स्पष्ट करा.
५) शिक्षक मूल्याधिष्ठीत शिक्षणासाठी नवे अनुभव / तंत्राचे कसे उपयोजन करु शकतो ?

८ब.४ सारांश :

शिक्षक सज्जता अभ्यासक्रम गुणात्मक शिक्षक निर्माण करण्याहेतू समाजातील बदल विचारात घेण्याची आवश्यकता आहे. शिक्षक सज्जतेतील नवे तंत्र म्हणून ई-शिक्षक आणि मुल्याधिष्ठीत शिक्षक यावर हा घटक केंद्रित केला आहे. खूप वेगवेगळी तंत्रे आणि त्यातील दृष्टीकोन आणि त्याच्या निष्पत्ती यावर प्रकाश टाकते. ही दोन नवतंत्रे शिक्षक शिक्षणात सध्य समाज गरजेनुसार शिक्षक घडवू शकतात. शिक्षण मूल्ये सुधारण्याचे सखोल ज्ञान पुरवून सेवापूर्व व सेवांतर्गत अध्यापकांना सहकार्य करणे हे शिक्षकांसाठी आव्हान आहे कारण हा एकसंघ शिक्षक प्रतिमानांस आव्हान देणारे वेगवेगळ्या पद्धतींच्या शास्त्रांचा दृष्टीकोन आहे. शिक्षकाला वरवर पाहता पाठात आत्मीयतेने, दृष्टीकोन कसे एकत्रित करना येतील आणि ते रचनात्मक अध्ययन व अध्यापनाच्या प्रतिमान समावेशात अंतर्भूत कसे करता येतील हे सुद्धा माहीत असावे.

References :

1. Awouters, V., Jans, R., Jans S., (2008). E-Learning Competencies for teachers in Secondary and Higher Education, Conferencia International e-learning, Zaragoza, April 2004, retrieved May 2, 2010 from
2. http://edict/documenten/Paper_Zaragoza_Valere_Awouters. pdf.
3. Beckett, E.C., Marques-Chisholm, I., Wetzel, K. (2003). Preparing Technology competent Teachers, Technological Horizons in Education Journal ONLINE, Retrieved April 30, 2010, from
4. http://www.thejournal.com/magazine
5. Hall, B. (1973) Values Clarification as a Learning Process: a guidebook. New York: Paulist Press.
6. Harmin, M. and Simon S. (1973), Values, Readings in Values Clarification, ed. Simon S. and Kirschenbaum H. (Minneapolis, MN: Winston Press)
7. Harmin, M. (1979), A Review of Values Clarification, The Phi Kappa Phi Journal, 69: 23, Winter.
8. Krneta, R., Bjekic, D,. Milosevic, D. (2007). Competencies of e-teaching in the system of Teachers' competence, ETAI 2007, September, Ohrid- Macedonia, Book of Abstracts, 29. Retrieved on April 30, 2010, from
9. http://www.etf.ukim.edu.mk:/SCM_CO21A06/conference/E3-2.pdf
10. Raths, L., Harmin, M. and Simon S. (1966), Values and Teaching (Columbus, OH: Charles E. Merrill)
11. The Role of e-Tutor, Retrieved April 30, 2010, from,
12. http://www.unesco.org/en/competency-standards-teachers.

Websites :

- http://www.tojet.net/articles/9122.pdf
- http://www.allacademic.com//meta/p_mla_apa_research_citation /0/3/6/2/6/pages36268/p36268-4.php

❖❖❖❖

९

अध्यापक शिक्षणातील संशोधन

घटक रचना :

९.० उद्दिष्टे

९.१ प्रास्तविक

९.२ अध्यापक शिक्षणातील संशोधनाचे स्वरुप व हेतु

९.३ अध्यापक शिक्षणातील संशोधनाची व्याप्ती

९.४ अध्यापक शिक्षणातील संशोधनक्षेत्रे

९.४.१ अध्यापक शिक्षणातील संशोधन समस्या

९.५ अध्यापक शिक्षणातील संशोधन प्रवाह

९.६ अध्यापक शिक्षणातील जालीकरण व सहप्रयोगीकरण

९.७ अध्यापक शिक्षणातील संशोधनाचा ध्वन्यर्थ

९.८ सारांश

९.९ स्वाध्याय

९.० उद्दिष्टे

हा घटक अभ्यासल्यावर तुम्हाला खालील बाबींची जाणीव होईल -

- अध्यापक शिक्षणातील संशोधनाचा हेतु
- अशा संशोधनाची व्याप्ती
- अध्यापक शिक्षणातील संशोधन समस्या
- अध्यापक शिक्षणातील संशोधन प्रवाह
- अध्यापक शिक्षणातील जातीकरणाचे महत्त्व

९.१ प्रास्ताविक

शैक्षणिक व्यवहार सुधारण्यासाठी विकसित केलेल्या नवज्ञानाचा उपयोग जे करते त्यास शैक्षणिक संशोधन म्हणतात. ही बाब अध्यापक शिक्षणालाही लागू पडते. संबंधित साहित्याचा आढाव्याद्वारे संशोधनाचे शैक्षणिक ज्ञानास लाभलेल्या योगदानाचे दर्शन घडते. तथापि शैक्षणिक व्यवहारावर संकलित संशोधन निष्कर्षांचा कितपत परिणाम होते हे ठरवणे कठीण आहे. जेव्हा संशोधित ज्ञान हे शैक्षणिक धोरण ठरवणाऱ्यांचे लक्ष वेधून घेते, तेव्हा ते अशा ज्ञानास एक माहितीस्त्रोत म्हणून वापरता वा एखाद्या अप्रिय निर्णयाचे समर्थन करण्यास ते

वापरतात वा अर्थस्त्रोत कमी करण्यासाठी वा प्रचलित श्रध्दांना धक्का देणाऱ्या संशोधन निष्कर्षांना वगळण्यासाठी वापरतात.

असे असून सुध्दा, सामान्यतः शैक्षणिक संशोधन व विशेषतः अध्यापक शिक्षणातील संशोधन सातत्याने वाढत आहे व ज्ञानशाखेत भर टाकत आहे.

९.२ अध्यापकशिक्षणातील संशोधनाचे स्वरुप व हेतु

अध्यापकशिक्षणातील संशोधनाचे दोन मुख्य हेतु आहेत –

अ) शैक्षणिक तत्व समजण्यासाठी ब) ते बदलण्यासाठी

संशोधन हे बदलांना आवश्यक अशी भूमी तयार करते

आपली प्रगती तपासून घ्याः

१. अध्यापनशिक्षणातील संशोधनाचे प्रमुख हेतू कोणते ?

२. 'अध्यापक शिक्षण' ह्या क्षेत्रातील संशोधन हे 'शैक्षणिक बाब' समजण्यास कशी मदत करेल ?

३. अध्यापकशिक्षणातील संशोधन हे शैक्षणिक बाबीमध्ये रुपांतर घडवण्यात कशी मदत करते ?

९.३ अध्यापकशिक्षणातील संशोधनाची व्याप्ती

अध्यापक शिक्षणसंस्थेच्या अनेक उपसंस्था आहेत. त्यांच्यामध्ये सतत आंतरक्रिया घडते. आगमके, प्रक्रिया, निर्गमके हे सदर संस्थेचे घटक हे संशोधनात उपयोगी पडतात.

अध्यापक शिक्षक व विद्यार्थी शिक्षकांची वैशिष्ट्ये, अध्यापकशिक्षणाची ध्येये व साधनसामुग्री यांचा आगमकांमध्ये समावेश होतो.

आंतरक्रियामध्ये अध्यापन व मूल्यमापन ह्या कौशल्यांना अनुरुप अध्ययन अनुभवांचा समावेश होतो. विद्यार्थी, विद्यार्थी शिक्षक व अध्यापक शिक्षक यांच्यातील वर्गांतर क्रियांचा प्रक्रियामध्ये समावेश होतो.

निर्गमकांमध्ये त्वरित व विलंबित फलिंताचा समावेश होतो. तात्विक ज्ञानप्राप्ती, अपेक्षित कौशल्ये व अभिवृत्ती यांचे संपादन यांचा समावेश त्वरित निर्गमकांमध्ये होतो. तात्विक ज्ञानाची / कौशल्यांची / अभिवृत्तींची धारणा व अध्यापक परिणामकारकतेचे विकसन यांचा विलंबित निर्गमकांमध्ये होतो.

एखादे **शैक्षणिक तत्त्व समजण्यासाठी**, ते तात्विक चौकटीत बसले पाहिजे. त्यामुळे त्या तत्त्वाची संकल्पना स्पष्ट, नियंत्रित व ओळखण्यास मदत होते. उदा. 'अध्यापन' स्पष्ट करण्यासाठी , अध्यापननिगडित गोष्टींच्या संकल्पनाचौकट समजून घ्यावी लागते. म्हणजेच अध्यापन संबंधित चलांचे स्वरुप व त्यांचे परस्परसंबंध स्पष्ट करता आले पाहिजे. त्या तत्वाच्या सर्वंकष आकलनाचा अंदाज करता आला पाहिजे. चलांच्या आंतरसंबंधाची संकल्पना डोळयासमोर आली पाहिजे. यात सिद्धांतांची पडताळणीचा समावेश होणार नाही. अध्यापकशिक्षणाशी संबंधित पूर्वानुमान-प्रक्रिया-फलित ह्या पध्दती सुघटित अशी चौकट लागू पडते. व्यक्तिमत्वविषयक चलांचा पूर्वानुमान चलांमध्ये समावेश होतो. प्रक्रियाचले ही अभ्यासक्रम व्यवहार / अध्यापनाशी संबंधित असतात. फलितचल हे चाचणीमधील विद्यार्थ्यांचे संपादन दाखवते. अध्यापकशिक्षणामध्ये चलांमधील संबंध स्पष्ट करणे महत्वाचे आहे. चलांमध्ये संबंध असणे ही एक गोष्ट, तर त्यांच्यातील संबंध स्पष्ट करता येणे ही दुसरी गोष्ट. अशा तऱ्हेने अशा संबंधावर कोणत्या प्रेरणा प्रभाव टाकतात हे माहित असणे आवश्यक आहे आणि त्याचवेळी त्या संबंधामागील अदृश्य प्रक्रिया समजून घेणे जरुरीचे आहे. अध्यापकशिक्षणातील कार्यरत चलांच्या संबंधजालातील चले नियंत्रिक करणे गरजेचे आहे. चलांची गतिमानता स्वतंत्ररित्या अभ्यासणे खूप कठीण आहे. उदा. मानसिक बैठक, व्यक्तिमत्व, भाषेचा अखलितपणा, संप्रेषणकौशल्ये, प्राप्त प्रशिक्षण, अनुभव, प्रेरणा, इयत्ता, आशय, वर्गस्थिती अशा कैक घटकांवर प्रशिक्षणार्थी अध्यापकाची सरावपाठातील कृती अवलंबून असू शकते. नवीन प्रशिक्षणपद्धतीचा प्रशिक्षणार्थ्यांच्या अध्यापनकृतीवर, सरावावर कितपत परिणाम होतो याचा अभ्यास संशोधकाला करण्याची इच्छा असते. त्याला उपरोक्त चले नियंत्रित करणे शक्य असते. अन्यथा प्रशिक्षणाच्या परिणामकारकतेविषयी तंतोतंत निष्कर्ष काढणे शक्य होणार नाही. प्रायोगिकरित्या वा संख्याशास्त्राने आंतरिक चलांचा प्रभाव नियंत्रित केला पाहिजे. स्वतंत्र (स्वाश्रयी) चलाचा परतंत्र (आश्रयी) चलावर होणार परिणाम, त्यात होणारे बदल, संशोधकाला दूरदृष्टीद्वारे ओळखता आले पाहिजे.

शैक्षणिक तत्वात / बाबीत रुपांतर घडवणे म्हणजे सुधारणा म्हणून त्यातील बदलांना अपेक्षित रुप देणे. अध्यापक शिक्षणातील प्रचलित प्रथा असमाधानकारक असल्यास अध्यापकशिक्षणाचा रचनेबरोबर प्रक्रियेतही बदल होणे गरजेचे आहे. संशोधनाधारित बदल हे दृढ परिणामकारक असल्याने वर्णनात्मक सर्वेक्षण, प्रायोगिक अभ्यास, विकासात्मक अभ्यास, संबंधात्मक अभ्यास ह्या मुख्य संशोधनपद्धती होत. वर्गव्यवहार सुधारण्यासाठी अध्यापक-

शिक्षक हे कृतिसंशोधनाचा देखील वापर करतात. अध्यापकशिक्षणविषयक माहिती संपादन व सदर शिक्षणाची वैशिष्ट्ये वर्णन करण्यासाठी वर्णनात्मक सर्वेक्षण करतात. अध्यापननीती व प्रशिक्षण कार्यक्रमांची परिणामकारकता अभ्यासण्यासाठी प्रायोगिक अभ्यास करतात. जर अ = आगमक (प्रक्रियेत भाग घेणारे घटक), ब = प्रक्रिया, क = निर्गमक (प्रक्रियेचे फलित) असल्यास, (अ) आणि (ब), (ब) आणि (क), (क) आणि (अ) यांच्यातील संबधात्मक अभ्यास करता येतो. विशिष्ट कालावधीसाठी, अध्यापकशिक्षणातील घटकांची स्थिती वा त्यांतील ऐतिहासिक बदल अभ्यासण्यासाठी विकासात्मक अभ्यास केला जातो. ह्यामुळे अध्यापकशिक्षणाचा भिन्न अंगांचे पद्धतशीर दर्शन घडते.

९.४ अध्यापकशिक्षणातील संशोधनक्षेत्रे

अध्यापकशिक्षणविषयक चलांची भलीमोठी पंगत बसलेली दिसते. उदा. निवडपद्धती, निवडीसाठी चाचणीसंच, निवडनिकषानुसार त्यांचे साफल्य जोखणे. विद्यार्थी शिक्षकांचे / अध्यापक शिक्षकांचे व्यक्तिमत्व, भिन्न प्रशिक्षणप्रकार, प्राथमिक / माध्यमिक स्तरीय अध्यापकशिक्षण. काही संशोधने एकांगी वाटतात विशिष्ट वर्गीकरण पद्धतीमुळै चलांचा गुच्छ ओळखता येतो. अशा गुच्छालाच 'संशोधनक्षेत्र' म्हणतात.

१९६०-७० दरम्यान, अध्यापकशिक्षणातील संशोधने ५ क्षेत्रात विभागलेली आढळतात. उदा. निवडीचे निकष, क्षमता, शिक्षक वैशिष्ट्ये, शिक्षकांचे सेवापूर्व व सेवांतर्गत प्रशिक्षण, कार्यभार, व्यावसायिक अपेक्षा, शिक्षकांच्या अडचणी, भारतीय अध्यापकशिक्षणातील कार्यपद्धती, शिक्षकाचे व्यक्तिमत्व. १९७०-८० दरम्यान, संदर्भ, पूर्वानुमाने, प्रक्रिय, फलिते अशा गटांमध्ये संशोधनक्षेत्रे विभागली गेली. विद्यार्थीशिक्षकाची वैशिष्ट्ये, संस्थात्मक वैशिष्ट्ये, यांचा संदर्भचलांमध्ये समावेश होतो. प्रचलित अनुभव, शैक्षणिक गुणवत्ता, क्षमता, व्यक्तिमत्वघटक, बुद्धिमत्ता ही विद्यार्थीशिक्षकाची वैशिष्ट्ये आहेत. अध्यापकशिक्षणसंस्था, प्रशासकीय यंत्रणा, वर्गवातावरण, अभ्यासक्रमचौकट यांचा संस्थात्मक वैशिष्ट्यांमध्ये समावेश होतो.

अध्यापकशिक्षकांचे आकारात्मक अनुभव, त्यांचे शिक्षण / प्रशिक्षण, प्रेरणा, क्षमता, व्यक्तिमत्व घटक, बुद्धिमत्ता, अध्यापन व प्रशिक्षण कौशल्ये अशा अध्यापकशिक्षकांच्या वैशिष्ट्यांचा पूर्वानुमानचलांमध्ये समावेश होतो.

वर्गांतरक्रिया, वर्गव्यवहार, अध्ययनास प्रवृत्त करणाऱ्या मध्यस्थ प्रक्रिया अशा चलांना प्रक्रियाचलांमध्ये समावेश होतो. लक्ष देणे, सराव, कार्याचा पाठपुरावा, कृतिशील अध्ययनवेळ,विद्यार्थीशिक्षकांची अध्ययनकार्यातील सहभाग ही ह्याचप्रकारची चले आहेत. वर्गातील अध्यापकवर्तन, अध्यापकाचे निरीक्षणवर्तन ही चले देखील ह्याच प्रकारात मोडतात.

अध्यापक शिक्षणाची फलितांवर आधारित चले दोन प्रकारची आहेत - विद्यार्थीशिक्षकाचे संपादन, अभिवृत्ती व कौशल्ये ही त्वरित फलिते पहिल्या प्रकारची आहेत. व्यावसायिक कौशल्ये, अध्यापनयश, अध्यापनपरिणामकारकता ही दीर्घकालिन फलिते दुसऱ्या प्रकारची आहेत.

आपली प्रगती तपासा -

१. संदर्भ, पूर्वानुमान, प्रक्रिया व फलित चले ह्या चलांबाबतीत अध्यापकशिक्षणातील गरज स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

_____

९.४.१ अध्यापकशिक्षणातील संशोधनाला भेडसावणाऱ्या समस्या :

गुणात्मक सुधारणेसाठी अध्यापकशिक्षणात संशोधन घडणे गरजेचे आहे. आंतरिक व बाह्यात्कारी अशा दोन्ही प्रकारच्या आढळणाऱ्या अध्यापकशिक्षणातील संशोधनसमस्या खालीलप्रमाणे आहेत -

- **गुणवान व्यक्तीचा अभाव :** किमान क्षमता, कौशल्ये यांची संशोधकांकडे कमतरता आढळते. ती मिळवणे ही जाणीवपूर्वक प्रक्रिया आहे. गुणवत्ते व्यतिरिक्त अध्यापकशिक्षणाचे तत्वज्ञान, शास्त्रीय पृच्छाविषयक कौशल्ये, विश्लेषण, अन्वयार्थ व निर्णय घेण्याची क्षमता संशोधकांकडे हवीत.

- **प्रेरणेची कमतरता:** संशोधकाकडे गुणवत्ता व संशोधनविषयक कल नसतो तेव्हा प्रेरणेची कमतरता जाणवते. त्याला धीर देवून त्याच्या क्षमतांचा वापर करण्यास योग्य उत्तेजन दिले जात नाही.

- **सोयीसुविधांची कमतरता :** पुष्कळदा संशोधन प्रवृत्त करणाऱ्या आवश्यक बाबींची कमतरता जाणवते. उदा. योग्य नियोजनासाठी, न्यासाच्या विश्लेषणासाठी संख्याशास्त्रीयपद्धती, फलितांचे उचित वृतांतलेखन याविषयी तज्ञसल्ल्याचा अभाव. उपकरणे, सामुग्री यांच्या कमतरतेमुळे संशोधनात अडथळे येत असतात.

- **वित्तविषयक समस्या :** आर्थिक कमतरतेमुळे संशोधन कमी झालेले आहे. युजीसी, एमसीइआरटी, आयसीएस्एस्आर् सारख्या संस्थादेखील अर्थसहाय्य करण्यास अयशस्वी ठरतात.

- **हेतुशून्यता :** हेतुशून्यता म्हणजे चलांमध्ये अर्थपूर्ण संबंधाचा अभाव. गृहित व परिकल्पनेसाठी संशोधन हे पूर्वसंशोधनावर आधारलेले असावे. तरच त्या ज्ञानशाखेत टप्पावार वृद्धी होईल. कैक संशोधनाची एखाद्या बाबीचे सुस्पष्ट आकलन होण्यासाठी,

अशा संशोधनांमध्ये योग्य दुवा साधला जाणे महत्त्वाचे आहे. यामुळै संशोधनांची पुनरावृत्ती टळेल आणि संबंधित सर्व बाबी / चले यांची दखल योग्य तऱ्हेने घेतली जाईल. त्यामुळे अंदाज करणे कठीण होईल व अध्यापकशिक्षणातील प्रचलित संशोधनाहून ते काहीसे वेगळे होईल. त्यामुळे वैयक्तिक परिकल्पनांची चाचणी करणे शक्य होईल. परिणामी ज्ञानवृद्धी ही संथ वा शून्य होईल. म्हणून संशोधनाचे दीर्घकालीन नियोजन हवे.

- **सहमतीची कमतरता :** संशोधकांच्या सहभागामुळे, शिक्षणक्षेत्रात भिन्न दृष्टिकोन व अग्रकम आढळतात. एका समान तात्विक हेतूसाठी, विशिष्ट कालावधीत संशोधन करण्यासाठी विचारांची सहमती संशोधकाला मदत करते.

- **वृत्तांताची कमतरता :** अध्यापकशिक्षणातील काही क्षेत्रांकडे दुर्लक्ष झालेले आढळते. ठराविक कालावधीत काही क्षेत्रांना संशोधनाच्या दृष्टीने महत्त्व लाभते. उदा. अध्यापकवर्तन, सूक्ष्मअध्यापन, चाचणी तयार करणे या प्रत्येक बाबतीत कैक संशोधने झाली आहेत. संतुलित व एकसमान प्रगतीसाठी तात्विक / विषयनिष्ठ संशोधन होणे गरजेचे आहे.

आपली प्रगती तपासा

१. 'अध्यापकशिक्षणात संशोधन' करताना येणाऱ्या समस्या कोणत्या ?

_____

_____

_____

_____

_____

९.५ अध्यापकशिक्षणातील संशोधनप्रवाह :

संख्यात्मक झेप : १९५६ साली, बानर्जी यांनी अध्यापकशिक्षणात प्रथम संशोधन केले. त्यानंतर १९७३ पर्यंत झालेल्या पहिल्या सर्वेक्षणात ४५ संशोधने झाल्याची नोंद झाली. दुसऱ्या सर्वेक्षणात १९७८ पर्यंत ६५ संशोधने झाली. त्यानंतर १९८३ पर्यंत ११६ संशोधने झाली. यावरुन अध्यापकशिक्षणाकडे लोक आता आकर्षित होत आहेत असे आढळते. नमुनागटांची, तयार साधनांची व तज्ञांची सहज उपलब्धता ही ह्या आकर्षणाची कारणे ठरली आहेत.

अध्यापनाची रचनाबद्धता :

'व्याख्यान' ह्या पारंपारिक पद्धतीने आपले अध्यापन भारलेले आहे. वास्तविक ती एकमार्गी आंतरक्रिया आहे. क्रमान्वित अध्ययन, प्रतिमानाधिष्ठित अध्यापन, संरचित व्याख्यान

ह्यासारख्या संरचित पद्धतींकडे आपण व्याख्यान पद्धतीकडून वळलो आहोत. अध्यापकशिक्षण स्तरावर अध्यापन ही एक पद्धतशीर उपक्रम करणे हा ह्या संशोधनाचा हेतू आहे. तसेच त्यासाठी अध्यापननीती तयार करणे हे देखील एक लक्ष्य असेल.

उद्दिष्टांचा मोठ्या प्रमाणावर समावेश :

अधिकाधिक उद्दिष्टे, समाविष्ट होण्याच्या दृष्टिने संशोधनात प्रयत्न झालेले आढळतात. 'वर्गाध्यापनाची गतिमानता समजणे' हे उद्दिष्ट मिळवण्यासाठी व पाठाचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्यासाठी वर्गांतरक्रिया विश्लेषणाचा उपयोग हा अशा प्रयत्नांपैकी एक आहे. अध्यापन कौशल्ये विकसित करण्यासाठी 'सूक्ष्म अध्यापन' उपयोगी पडते. तात्विक ज्ञान परिणामकारकरित्या आत्मसात करण्यासाठी क्रमान्वित अध्ययन वापरतात. सामाजिक आंतरक्रिया कौशल्ये व बोधात्मक कौशल्ये विकसित करण्यासाठी 'चर्चापद्धत' ही उपयोगी पडते. उपयोजन व निर्णय घेणे ही कौशल्ये / क्षमता ही विकसित करण्यासाठी 'अभिरुपता' तंत्र उपयुक्त ठरते. अशा तऱ्हेने संशोधनाच्या भिन्न क्षेत्रे / उपक्षेत्रांमध्ये संशोधन होऊन अध्यापनशिक्षणअची उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न झालेला आढळतो.

पर्यायी प्रतिमाने :

'हर्बार्ट-प्रतिमान', फ्लॅन्डरचे आंतरक्रिया प्रतिमान, सूक्ष्मअध्यापन ह्यांवर आतापर्यंत संशोधने झाली. संकल्पनाप्राप्ती, पृच्छाप्रशिक्षण, अग्रत संघटन आदि वर्तन प्रतिमानांवर अलिकडे संशोधने झाली.

संदर्भ, पूर्वानुमान, प्रक्रिया व फलित आदि चले, अध्यापनशैली, अध्ययनशैली, अध्यापकवैशिष्ट्ये, विद्यार्थीवैशिष्ट्ये, शिक्षणाचे व्यवस्थापन, शैक्षणिक तंत्रविज्ञान ही क्षेत्रे अध्यापकशिक्षणातील संशोधनास आव्हान देणारी ठरली आहेत.

आपली प्रगती तपासा :

१. आपल्या मते, संशोधकांचे लक्ष वेधू शकतील अशी संशोधन क्षेत्रे कोणती आहेत ?

_____

_____

_____

_____

_____

९.६ अध्यापकशिक्षणातील जालीकरण व सहप्रयोगाचे महत्व

अध्यापकशिक्षणातील संस्थांच्या विभक्तिकरणाच्या व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६) ठरवण्याच्या वेळी 'अध्यापकशिक्षणाची स्थिती' यावर पुनरावलोकन केले गेले.

अध्यापकशिक्षणसंस्था ह्या एकमेंकापासून व शाळंपासून दूर गेल्या आहेत. त्यांच्यातील संवादही माफक आहे. राज्य व राष्ट्रीय संस्थांपासूनही त्या वेगळ्यअ पडल्या आहेत. कार्यक्षम व सहज कार्यवाहीसाठी, अध्यापक शिक्षणसंस्था, राज्य / राष्ट्रीय यांच्यात योग्य जाळे गुंफण्याची गरज आहे. त्याचे फायदे खालीलप्रमाणे.

- **जालीकरणाचे फायदे :** जिल्हा, विभागीय व राज्यपातळीवर संसाधन व सोयी यांची कमला उपयोगिता होण्यासाठी रेटा लावणे शक्य आहे. ह्यामुळे द्विसक्ती व वाया जाणे टळेल. शाळांना आवश्यक असलेले मनुष्यबळ व सामुग्री अनेक संस्था पुरवत असतात.

- **अध्यापकांचा विकास :** अध्यापन-अध्ययन क्षमतेमध्ये गुणवत्ता सुधारण्यासाठी अपेक्षित अध्यापनक्षमतेचा विकासार्थ असे संस्थांचे जाळे उपयुक्त ठरते. ग्रामीण भागातील शिक्षकांचा गरजा भागवण्यासाठी उपलब्ध तज्ञता वापरता येईल.

- **गुणवत्तेमधील सुधारणा :** शालेय शिक्षण सुधारण्यासाठी गुणवत्तापूर्ण अध्यापकशिक्षणाची प्रणाली विकसित होणे गरजेचे आहे. त्यासाठी सेवापूर्व व सेवांतर्गत कार्यक्रमाचे प्रमाणीकरणासाठी हे संस्थाजाल उपयोगी पडेल.

- **सुधारणेसाठी प्रत्याभरण :** अशा संस्थाजालाद्वारे अध्यापकशिक्षण कार्यक्रमाचे कार्यक्षम व परिणामकारी नियंत्रण व मूल्यमापन घडेल.

- **संस्थाजालाची रचना :** अध्यापकशिक्षण संस्थांचा आडव्या जोडणीमुळे शैक्षणिक संसाधनांची भागिदारी करुन त्या एकमेकाला मदत करु लागतील. सेवापूर्व सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमाची जोडणी ही अध्यापकशिक्षणाची राष्ट्रीय प्रणाली विकसित करु शकेल. जिल्हास्तरीय 'डायट' संस्था ह्या जिल्हा शिक्षणमंडळ, माध्यमिक व प्राथमिक शाळअ यांच्यात शैक्षणिक बंध निर्माण करतील. राज्य शिक्षण विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, राज्य विज्ञान शिक्षणसंस्था, राज्य शैक्षणिक तंत्रविज्ञान कक्ष यासारख्या राज्यस्तरीय संस्थापासून दुरावा नाहीसा करण्यासाठी उभी जोडणी करण्याची गरज आहे. विभागीय इंग्रजी संस्था, विभागीय तांत्रिक अध्यापक, प्रशिक्षणसथा, विभागीय शिक्षण महाविद्यालये यांसारख्या विभागीय आधारसंस्थांमध्ये जोडणी झाली पाहिजे.

९.७ शिक्षकप्रशिक्षणातील संशोधनाचा ध्वन्यर्थ

इतर व्यवसायांप्रमाणे, अध्यापन व्यवसायाला विकसनशील ज्ञानाचा पाया असून तो संबंधित व्यावसायिकांना मार्गदर्शन करत असतो. यामध्ये संशोधननिर्मित ज्ञान हा महत्वाचा घटक असतो. एका बाजूला अध्यापकशिक्षण व अध्यापकविकसन कार्यक्रम हे ज्ञानादानाची मध्यवर्ती दालने तर दुसऱ्या बाजूला भिन्न संदर्भातील दालने मानावी लागतील. अधापकशिक्षणाचा अभ्यासक्रम व संबंधित पाठ्यपुस्तके हे होऊ घातलेल्या शिक्षकाचा संशोधनज्ञान म्हणजे काय हे दाखवतात. मानसशास्त्र, अध्यापनपद्धती ह्यामधील संशोधननिष्कर्ष हे संशोधन निष्कर्ष हे

शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रमाचे नेहमीचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. परंतु विद्यार्थीअध्यापकांना निष्कर्ष वर्गात शिकत असताना राबवणे कठीण जाते.

अध्यापकशिक्षणाच्या गुणवत्ते बाबत नेहमीच प्रश्न केला जात असल्यामुळे ते संशोधनक्षेत्र म्हणून महत्वाचे गणले आहे. तसेच शिक्षकाची गुणवत्ता ही शैक्षणिक निष्पती व विद्यार्थी संपादनाबाबत महत्वाची मानली आहे. परिणामी ह्या क्षेत्रातील संशोधकांची खालील बाबींसाठी एकत्रयेवून काम करण्याची गरज आहे.

- अलिकडच्या संशोधननिष्कर्षांची देवघेव करणे.
- ह्या क्षेत्राबाबत नवीन संशोधनपद्धती विकसित करणे.
- नवोपक्रमशील अध्ययन अध्यापन पद्धतीची माहिती देणे.
- प्रसिद्धीचे नवे झरोके शोधणे.
- संशोधनाबाबत मागासलेल्या सहकाऱ्यांना सहाय्य करणे.
- अध्यापकशिक्षणातील संशोधनाला निश्चित असे विधायक वळण देण्यासाठी महत्वपूर्ण असे उगवते विषय विकसित करणे.

अध्यापक शिक्षणात कार्यरत असणाऱ्या मध्यवर्ती संस्थांची जाळे प्रस्थापित केले पाहिजे.MHRD, NCTE, NCERT, UGC अशा संस्थांचा 'अध्यापकशिक्षणकक्ष' हा एक घटक आहे. ह्यातील संस्था याबाबतीत आधारभूत ठरतात –

नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ एज्युकेशनल प्लॅनिंग ॲन्ड ॲडमिनिस्टेशन (NUEPA), सेंट्रल हिंदी इन्स्टिट्युट (CHE) , सेंट्रल इन्स्टिट्युट ऑफ इंग्लिश (CIE), सेंट्रल इन्स्टिट्युट ऑफ इंडियन लॅग्वेजेस् (CIIL), डिरेक्टोरेट् ऑफ ॲडल्ट् एज्युकेशन (DAE), नॅशनल इन्स्टिट्युट फॉर हॅन्डिकॅप्ड् (NIH)

तुमची प्रगती तपासा :

१. भिन्नस्तरीय अध्यापकशिक्षणसंस्थांचे जाळे विणणे का महत्त्वाचे आहे ?

_____

_____

_____

_____

९.८ सारांश

अध्यापकशिक्षणातील संशोधनाचे स्वरुप व हेतु ह्या पाठात समजून घेतला. आगम-निर्गम, संदर्भ, प्रक्रिया ह्या अध्यापकशिक्षणातील चलांनी अध्यापकशिक्षणाची व्याप्ती भरलेली आहे. गुणवत्ताधारी व्यक्ती / संसाधने / सोयी / वित्त / संशोधकांमधील सहमती यांचा अभाव,

उद्दिष्टे / अध्यायनपद्धती / प्रतिमाने / प्रतिकृती यांची उपलब्धता अशा विसंगतीमुळे हे क्षेत्र समस्याग्रस्त आहे. अध्यापकशिक्षणसंस्था व भिन्नस्तरीय मध्यवर्ती - संस्थामध्ये जाळे विणण्याचे व संशोधननिष्कर्षांची त्यानुसार कार्यवाही महत्वपूर्ण ठरते.

९.९ स्वाध्याय

१. भारतातील अध्यापकशिक्षणातील संशोधनप्रवाहांची चर्चा करा. सदर संशोधन निष्कर्षांच्या आधारे, ह्या क्षेत्राच्या रचना व प्रक्रियेबाबत कोणत्या सूचना कराल ?

२. 'अध्यापन' व 'अध्यापक' संबंधित संशोधनप्रवाहांची चर्चा करा. अध्यापनशिक्षणप्रणालीचे उत्थापन करण्यासाठी सदर संशोधननिष्कर्षांचा कसा वापर कराल ?

३. "अध्यापकशिक्षणविषयक संशोधनाने अध्यापक व अध्यापनाची गुणवत्ता बदलली पाहिजे" - शिक्षकावरील प्रचलित संशोधनांद्वारे हे कितपत साध्य होऊ शकते ते स्पष्ट करा.

४. चले, संशोधनपद्धतींचा विचार करता भारतीय अध्यापनशिक्षणातील संशोधनप्रवाह वर्णन करा. सदर संशोधन अधिक सखोल व अर्थवाही होण्यासाठी कोणत्या सुधारणा सुचवाल ?

Suggested Readings:

1. Borg, W. R. and Gall, M.D. (1983) Educational Research: An Introduction New York, Longman Inc.
2. Biddle, B. J., Good, T., Goodson, L. I. F. (Eds.) International Handbook of Teachers and Teaching Vols. I & II, Dordrechet Kluwer, Academic.
3. Dunkin M. J. (Ed.) (1985) The International Encyclopedia of Teaching and Teacher Education, Oxford, Pergamon.
4. Gupta, A. K. (1984) Teacher Education: Current and Future Prospects New Delhi, Sterling.
5. Kerawalla, G. J. (Ed.) (1990) Redesigning Teacher Education: A Systems Approach Department of Education, University of Bombay.
6. NCTE (1998) Curriculum Framework for Teacher Education NCTE, New Delhi.
7. NCTE (1998) Policy Perspectives in Teacher Education. NCTE, New Delhi.
8. Sharma S. Teacher Education in India.
9. Singh, L. C. (1990) Teacher Education in India: A Resource Book, NCERT, New Delhi.

❖❖❖❖

१०अ

अध्यापकशिक्षण: एक व्यवसाय

घटक रचना:

१०. अ.० उद्दिष्टे
१०. अ.१ प्रस्तावना
१०. अ.२ व्यवसायाची संकल्पना
१०. अ.३ व्यावसायिकतेची संकल्पना
१०. अ.४ अध्यापकशिक्षकांसाठी व्यावसायिकतेचे विकसन
१०. अ.५ अध्यापकशिक्षकांसाठी व्यावसायिक नीति व आचारसंहिता विकसन करणे.

१०.अ.० उद्दिष्टे:

हा घटक अभ्यासल्यावर तुम्ही खालील गोष्टी करु शकाल -

- व्यवसायाची संकल्पना जाणणे.
- व्यवसाय व व्यावसायिकता यांचा संबंध लावणे व भेद करणे.
- अध्यापक शिक्षकांसाठी व्यावसायिकता कशी विकसित करायची हे स्पष्ट करणे.
- अध्यापक परिणामकारकतेची व्याख्या करणे.
- अध्यापक परिणामकारकतेचे घटक सांगणे.
- शिक्षक व शिक्षक-अध्यापक यांची परिणामकारकता जोखण्यास कृतिमूल्यमापिका (पर्फॉर्मन्स् अप्रैजल्) कशी मदत करते हे स्पष्ट करणे.

१०.अ.१ प्रस्तावना:

संकल्पना व आदर्श म्हणून 'अध्यापन' हा एक 'उदात्त' व्यवसाय आहे. बहुआयामी असल्यामुळे, इतर व्यवसायांपेक्षा तो वेगळा आहे. मानवी विकास विषयक उपक्रमात, मोठा व्यावसायिक गट म्हणून अध्यापक गुंतलेले असतात. इतर व्यवसायांपेक्षा यात कितीतरी गोष्टी मिळवायच्या असतात. 'व्यावसायिकांचे प्रशिक्षण' हे त्या व्यवसायाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरते. अध्यापकांना त्यांच्या भूमिकेत बसविण्यासाठी, अशा सखोल प्रशिक्षणाची गरज आहे. आरंभीचे ओळख प्रशिक्षण व निरंतर शिक्षण हे अध्यापकाला पर्याप्त ज्ञान व कौशल्यांनी सुसज्ज करतात की ज्यामुळे तो व्यावसायिक कार्ये पार पाडू शकेल. बालशिक्षणशास्त्र व अध्यापनतंत्रे यांच्या आशयज्ञानावरील प्रभुत्व हे अशा प्रशिक्षणामुळे साध्य होते.

अध्यापकांचे प्रशिक्षण हा अध्यापकशिक्षणाचा महत्त्वाचा घटक आहे. ह्या व्यवसायाला अनुकुल अशा नाना कृतींचा सदर शिक्षणात समावेश होतो. व्यावसायिक कौशल्यांचे सातत्याने उत्थापनासाठी शिक्षकाचे वास्तव नि सर्वसमावेशक चित्र अध्यापकशिक्षण उभारत असते.

१०. अ.२ व्यवसायाची संकल्पना:

मुक्त विश्वकोष 'विकिपिडिया' च्या मते "निरपेक्ष समुपदेशनाच्या उद्देशाने, धंद्याचे इतर फायदे वगळता निश्चित अशा प्रत्यक्ष भरपाईसाठी दिलेले विशेष प्रशिक्षण हे त्या व्यवसायाशी निगडित असते."

व्यवसायाची ऐतिहासिक पार्श्वभूमी वरुन धर्मशास्त्र, वैद्यक, विधी असे तीन व्यवसाय असल्याचे आढळते. खालील गोष्टींवरुन एखादा धंदा हा 'व्यवसाय' ठरतो.

- पूर्णवेळ व्यवसाय.
- प्रशिक्षण संस्थेची स्थापना.
- विद्यापीठाशी संलग्नता.
- स्थानिक संस्थेशी संबंधित.
- राष्ट्रीय संस्थेशी संबंधित.
- व्यवसायनीतिदर्शक आचारसंहिता लागू.
- शासनमान्यतेसाठी कायदा प्रस्थापित.

पुरोहित, वैद्य, वकील हे त्या त्या व्यवसायानुकुल अशा गणवेशामुळे ओळखले जातात. प्रत्येकाला समाजात उच्च दर्जा व प्रतिष्ठा मिळत असली, तरी साऱ्यांना समान वेतन मिळत नसते. एखाद्या व्यवसायांतर्गतही असमानता दडलेली आढळते.

व्यवसायांची उदाहरणे: विधिज्ञ,अभियंता, अध्यापक, लष्करी अधिकारी, प्रशिक्षित अध्यापक, वास्तुशिल्पज्ञ, लेखाधिकारी, दंतवैद्य, नर्स (परिचारिका), वैद्य, वैद्यकिय तंत्रशास्त्रज्ञ, औषधविक्रेता.

नियमितता: व्यवसाय संस्थाचे व्यवहारांची व्याख्या, त्यांना आधार व नियमन करणाऱ्या संबंधित संस्थांचे नियमन याद्वारे त्या व्यवसायाचा दर्जा व जबाबदाऱ्या ठरवल्या जातात. व्यवसाय परवाने, स्पर्धापरीक्षा, आचारसंहिता ह्यास संबंधित संस्था जबाबदार असतात. परवान्यापूर्वी त्या व्यक्तीने पहिली व्यावसायिक पदवी मिळवली पाहिजे.

स्वायत्तता: व्यावसायिक जवळजवळ स्वायत्त असतात म्हणजेच त्यांच्या स्वतःच्या संबंधित बाबींवर नियंत्रण असते. ते आपल्या कामाच्या बाबतीत स्वयंनिर्णय करु शकतात यालाच व्यवसायनिर्णय राबवण्याचे स्वातंत्र्य म्हणतात. व्यावसायिक स्वायत्तता खालील ३ बाबींवर अवलंबून असते -

- व्यावसायिकाला उच्च दर्जाची ज्ञान /कौशल्ये असणे अपेक्षित. व्यावसायिक कृतींचे अचूक मूल्यनिर्धारण हे व्यवसाय तज्ञाकडून होणे अपेक्षित.
- निस्वार्थीपणा व उत्तरदायित्व यामुळे त्यांच्यावर जाणीवपूर्वक काम सोपवले जाते.
- काही वेळा व्यावसायिकाकडून अपेक्षित कौशल्ये दाखविली जात नसतील, तर त्यांच्या सहकाऱ्यांवर जरुर ती जबाबदारी सोपवावी.

अशा स्वायत्ततेला इतरही अर्थच्छटा आहेत -

- स्वहितासाठी सेवा करणे हा व्यावसायिक हक्क म्हणजेच व्यावसायिक स्वायत्तता.
- इतर सदस्यांच्या चिकित्सक मूल्यमापनानुसार कृती व निर्णय घेतल्यासच व्यावसायिक स्वायत्तता राखली जाते.

स्वहित, निर्णय, अंतर्गत आचारांचे निरंतर चिकित्सक मूल्यमापन त्या बाबींची स्वायत्ततेची संकल्पना पूर्णत्वाला जाते.

दर्जा व प्रतिष्ठा: उच्च सामाजिक दर्जा, सामाजिक आदर व प्रतिष्ठा व्यवसायाला लाभत असते. सर्व व्यवसायांमध्ये तांत्रिक, विशिष्ट, उच्च तांत्रिक कौशल्ये असणारे 'व्यवसायतज्ञ' असतात. पदवी व व्यावसायिक गुणवत्ता याद्वारे प्रशिक्षण प्राप्त झाल्याशिवाय व्यवसायात प्रवेश करता येत नाही. निरंतर शिक्षणाद्वारे कौशल्ये अद्ययावत करणे यात अपेक्षित आहे.

सत्ता: आपले सहकरी, तज्ञताक्षेत्र व हितसंबंध नियंत्रित करण्यासाठी प्रत्येक व्यवसाय सत्ता राबवत असतो. सत्ता, प्रतिष्ठा व मूल्ये जी समाजाने त्या व्यवसायाला दिली आहेत, त्यावरुन 'व्यवसायाची' व्याख्या केली जाते.

व्यवसायाची वैशिष्ट्ये : प्रत्येक व्यवसायात कमी-अधिक प्रमाणात पुढील वैशिष्ट्ये आढळतात.

- **तात्विक ज्ञानाधारित कौशल्य:** वैद्यक, विधी, अभियांत्रिकी यांमधील व्यावसायिकांकडे सखोल तात्विक ज्ञान असणे अपेक्षित आहे. तसेच आपल्या व्यवसायात वापर करण्यासाठी त्या ज्ञानाधारित कौशल्यही असावे.

- **व्यावसायिक संघटना:** सभासदांनी उभारलेल्या व्यावसायिक संघटना हा त्यांच्या सभासदांचा दर्जा उंचावण्यासाठी आणि प्रवेश गरजा नियंत्रित करण्याची काळजी घेतात.

- **शिक्षणाचा विस्तृत कालावधी:** बहुतेक प्रतिष्ठित व्यवसायांमध्ये विद्यापीठाचे तीन वर्षाचे शिक्षण घेणे अपेक्षित आहे. यापुढे पी.एच.डी. संशोधन करण्यासाठी आणखी ४-५ वर्षे लागू शकतात.

- **क्षमताचाचणी:** व्यावसायिक संघटनेत प्रवेश देण्यापूर्वी, इच्छुकाच्या तात्विक ज्ञानाची चाचणी एखादी क्षमता कसोटी देवून करण्याची गरज आहे.

- **संस्थात्मक प्रशिक्षण:** परीक्षशिवाय, इच्छूक व्यावसायिकांना दीर्घकालिन संस्थात्मक प्रशिक्षणाची गरज आहे. त्याद्वारे विशिष्ट भूमिका घेऊन प्रात्यक्षिक अनुभव घेतल्यानंतर व्यावसायिक संघटनेचा सभासद होणे संयुक्तिक ठरेल.
- **मान्यताप्राप्त व्यावसायिक:** परवानेधारक व्यावसायिकांची नोंद व्यावसायिक संघटनांनी करावी की ज्यामुळे अशा व्यक्तींना व्यावसायिक म्हणून मान्यता मिळेल.
- **कार्यस्वायत्तता:** व्यापारी व सार्वजनिक संघटनांमध्ये जर व्यावसायिक आपल्या नियुक्तीच्या बाहेर काम करत असले तरी आपल्या कामावर नियंत्रण ठेवू शकतो. तसेच आपल्या तात्विक ज्ञानावर नियंत्रण ठेवू शकतो.
- **व्यावसायिक आचारसंहिता:** व्यावसायिक संघटनांमध्ये सदस्यांसाठी आचारसंहिता व शिस्तभंग कार्यवाहीसाठी नियमावली तयार करणे आवश्यक आहे.
- **आत्मनियमन:** शासनमुक्त व आत्मनियमन यासाठी व्यावसायिक संघटना आग्रह धरतात. वरीष्ठ, आदरणीय व उच्च गुणवत्ताधारी व्यावसायिकांकडून देखरेख व नियमन व्यवसायांकडून होणे अपेक्षित आहे.
- **सार्वजनिक सेवा व परहितदक्षता:** सार्वजनिक हितासाठी पुरवलेल्या सेवेबद्दल फी आकारल्यास तिचे समर्थन करता येईल. उदा. सार्वजनिक आरोग्यार्थ डॉक्टरची सेवा.
- **हकालपट्टी, एकाधिकारशाही, विधिवत मान्यता:** उचित व्यावसायिक संघटनेचे सभासदत्व व अटींची पूर्तता यांच्या अभावी त्या व्यवसायातून अशा अक्षम व्यक्तीची हकालपट्टी होऊ शकते. यालाच व्यवसायबंदी असे म्हणतात.
- **वेतन व जाहितारीवरील नियंत्रण:** वेतनस्तरांची निश्चिती शासनकडून होत असल्यास, संबंधित व्यवसाय संघटना अशावेळी वाटाघाटींसाठी कृतिशील असतात. जरी हे चांगल्या हेतूने केले असले, तरी ते चांगले तेव्हाच सिद्ध होईल जोपर्यंत भागीदार, कुटुंब वा प्रेरक हे ह्या विरुद्ध काही सुचवत नाहीत.
- **उच्च दर्जा व पुरस्कार:** सभासदांना उच्च दर्जा, सार्वजनिक प्रतिष्ठा व पुरस्कार मिळाल्यास ते व्यवसाय सर्वात यशस्वी गणले जातात.
- **वैयक्तिक ग्राहके:** वैयक्तिक फी देवून येणारी ग्राहके ही कैक व्यवसायात असतात. उदा. एखाद्या संघटनेच्या सेवेतील लेखाधिकाऱ्यापेक्षा 'लेखाजोखा' हा व्यवसाय करणाऱ्यास वैयक्तिक व संस्थात्मक ग्राहके अधिक असतात.
- **मध्यम वर्गीय व्यवसाय:** मध्यम व उच्चवर्गीसाठी शिक्षक, कारकून, व्यवस्थापक यांसारखे व्यवसाय 'आदरणीय' ठरतात.
- **पुरुषीवर्चस्व:** अत्युच्च दर्जा असलेल्या व्यवसायात पुरुषी वर्चस्व आढळते. पुरुषाइरक्याच स्त्रिया सक्षम असल्या तरी त्यांना अशा व्यवसायात प्रवेश अपवादात्मक दिल्या गेल्याचे आढळते. पुष्कळदा कष्टकरी व विशिष्ट वर्गाच्या बाबतीत हाच प्रकार आढळतो.

- **कर्मकांडे / प्रथा:** मंदिरे नि न्यायालये यांची कार्यपद्धती कर्मकांडात्मक अधिक आहेत.
- **विधिवत अधिकार:** व्यवसायांना व्यक्ती व्यवसायाला लायक आहे की नाही हे ठरवण्याचा अधिकार आहे.
- **ज्ञानस्त्रोत संपर्कमर्यादेपलिकडील:** काही व्यवसायातील ज्ञानस्त्रोत हे व्यवसायात नसलेल्यांना उपलब्ध होऊ शकत नाहीत. वैद्यक व विधी हे शालेय विषय नसले तरी विद्यापीठात त्यांना स्वंतत्र शैक्षणिक कर्मचारी, विद्यापीठांतर्गत स्वतंत्र ग्रंथालय उपलब्ध आहे.
- **ज्ञानाची अनिश्चिती:** प्रभुत्वाभावी, व्यावसायिक ज्ञानातील घटक हे दुर्लक्षित होतात, त्यामुळे ते नियमावली प्रमाणे संप्रेषित होतात आणि अनुभवातून मिळू शकतात.
- **गतिशीलता:** ज्ञानकौशल्य व व्यवसायाधिकार हे संस्थात्मक असण्यापेक्षा व्यक्तिगत आहे. नियुक्ती संधीमुळे व्यावसायिक हे फिरते असतात. उदा. शिक्षक / प्राध्यापक. व्यावसायिक प्रशिक्षणाच्या प्रमाणीकरणामुळे हा फिरतेपणा वाढतो.

अध्यापकशिक्षण: एक व्यवसाय - शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यात शिक्षक महत्त्वाची भूमिका पार पाडतो. शिक्षणपद्धतीचे मूल्यमापन करताना, विषयानुसार गुणवत्ता बदलता अभ्यासक्रम वाढते ज्ञान यांना तोंड देणास समर्थ असलेले पुरेसे शिक्षक आहेत की नाही हे पहावे. ज्ञान व अध्यापन कौशल्य अद्यायावत करण्यासाठी अपेक्षित सोयींची उपलब्धता तपासून पहावी.
अध्यापक व्यावसायिक विकसनाने भारतासह साऱ्या जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. सेवांतर्गत शिक्षण व व्यावसायिक विकास यावर संशोधित वाङ्मय उपलब्ध आहे का नाही हे देखील पहावे. अभ्यासक्रम सुधारणा, कार्यक्रमरचना, संस्थात्मक विकास अध्यापनस्त्रोत याबाबतीत संशोधन केंद्रित झाले आहे. अशा व्यावसायिक विकासाचा आशय क्वचितच तपासला जातो.

व्यक्तिगत ज्ञान व व्यवसायपूर्वज्ञान यात फरक आहे. व्यक्तिगत ज्ञान हे संबंधित व्यवसायिकाकडे असते. ते निरीक्षण, सामाजिक आंतरक्रिया व अनुभव याद्वारे मिळते. तर उच्चशिक्षण संस्थाद्वारे विकसित, संघटित व सांकेतिकीकरण होऊन व्यवसायपूर्व ज्ञान मिळते. त्यास शैक्षणिक दर्जा व वैधता प्राप्त झालेला असतो. ते सार्वजनिक ज्ञान बनून ते चाचणी व संशोधनासाठी उपलब्ध होते. व्यावसायिक ज्ञानाबाबत इरॅटने सुचवलेल्या नकाशाची गरज खालील कारणांमुळे भासते-

- अध्यापक शिक्षणाविषयी प्रचलित गैरसमज दुर करण्यासाठी
- तत्व नि व्यवहार यातील संबंध आणि प्रायोगिक अध्ययनविषयक भूमिका प्रकाशित करण्यासाठी.
- अध्यापक शिक्षणातील दुर्लक्षित ज्ञानात्मक बाबी उघड करण्यासाठी
- व्यावसायिक दर्जा /गुणवत्तेसाठी चर्चेत असलेल्या स्पर्धात्मक मार्गावर प्रकाश टाकण्यासाठी.

पद्धती, शैली, व्यवसाय नि व्यावसायिकांमील वर्णन करणाऱ्या संज्ञेस 'व्यावसायिकता' असे म्हणतात. समाजाच्या अपेक्षा, व्यावसायिकांच्या भूमिका यातून तयार झालेले अशी प्रत्येक

व्यवसायाची स्वत:ची संस्कृती आहे. जर 'अध्यापकशिक्षण' हा खऱ्या अर्थाने व्यवसाय व्हायचा असेल तर अध्यापक, महाविद्यालये व शिक्षणविभाग ज्याप्रकारे कार्य करत आहेत, त्यात मूलभूत सुधारणा होण्याची गरज आहे. प्रशासकीय प्रतिमानाची जागा ही व्यवस्थापकीय (व्यावसायिक) प्रतिमानाने घेतली पाहिजे. उभय प्रतिमानांची तुलना खालीलप्रमाणे करता येईल -

कोष्टक १: प्रतिमानांची तुलना

प्रशासकीय प्रतिमान	व्यवस्थापकीय प्रतिमान
१) आगमकांची ओळख	१) निर्गमकांची ओळख
२) जपणूक व नियंत्रणाची जबाबदारी	२) वाढ व निष्पत्तीची जबाबदारी
३) अधिकार व कार्यमर्यादांमध्ये संबंध	३) तज्ञता व स्वयंपूर्णता यातील संबंध
४) नियम व कार्यपद्धती यांचे बंधन	४) नियम व कार्यपद्धतीबाबत लवचिकता
५) ज्येष्ठतेनुसार बढती	५) कार्यनिहाय बढती

अध्यापनशिक्षणाची प्रतिमा:

अध्यापनशिक्षणाच्या प्रतिमेची समस्येची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजण्यासाठी व ती सोडवण्यासाठी योग्य कार्यक्रम तयार करण्यासाठी मूलभूत गृहितके व वस्तुस्थितीचा आढावा घेणे उपयुक्त ठरेल. विद्यापीठस्तरीय अध्यापनशिक्षण कार्यक्रमाची **मूलभूत गृहितके** खालीलप्रमाणे.

- प्रत्येक प्रगतिशील अध्यापकाने अध्यापनासंबंधित समान तात्विक ज्ञान व कौशल्ये आत्मसात करावीत.
- विद्यापीठ हे व्यावसायिक ज्ञानाचे कोठार आहे.
- व्यावसायिक गरजा व वाढीच्या संदर्भात, विद्यापीठ भविष्याभिमुख आहेत.
- उच्चशिक्षणातील संशोधनकृती व शैक्षणिक विभाग यांच्याशी अध्यापन शिक्षणातील महाविद्यालये व शिक्षण विभाग यांचा संबंध असतो.
- व्यावसायिक संशोधन, विकास व सेवाविषयक उपक्रमांशी जोडल्यास, अध्यापकशिक्षण कार्यक्रम यांचे चांगले व्यवस्थापन होते.

ह्या गृहितकानुसार 'वस्तुस्थिती कितपत आहे' हे दाखवणाऱ्या खालील मुद्यांचा विचार करु -

- कित्येकजण शालेय शिक्षकांना तयार करणे कमी प्रतीचा शैक्षणिक कार्यक्रम मानतात, हे विद्यापीठाच्या बौद्धिक परंपरेशी विसंगत आहे.
- ज्ञानसंश्लेषणासाठी पुरेसे कार्यक्रम अध्यापकशिक्षण विभागांनी विकसित केलेले नाहीत.
- शिक्षकांना तयार करण्यासाठी शैक्षणिक ज्ञानशाखांचा उपयोग करणारी अशी उपपत्ती आमच्याकडे नाही.
- अध्यापकशिक्षण कार्यक्रमातील विद्यार्थी हा तत्त्व / प्रात्यक्षिकाभिमुख असतो आणि उपपत्ती वा संशोधनामध्ये त्याला फारच थोडी गरज वाटते.
- विद्यार्थ्यांचा व्यावसायिक दृष्टिकोन विकसित करण्यात विद्यापीठनिष्ठ अध्यापकशिक्षण कार्यक्रम कितपत प्रभावी ठरतो यासंबंधी संशोधनाला शंका वाटते

सदर गृहितके व वस्तुस्थिती यांच्या विश्लेषणामुळे आपल्यापुढे अध्यापकशिक्षणाच्या दोन मूलभूत समस्या येतात -

- शिक्षण व्यावसायिक तयार करण्यासाठी व्यावसायिक ज्ञानकेंद्राची आवश्यकता प्रकट करण्याबाबत वैद्यक व विधिक्षेत्राप्रमाणे सहमती अध्यापकशिक्षकांमध्ये अल्पप्रमाणे आढळते आणि तसे असेल तर त्या ज्ञानाचे घटक कोणते आहेत / असावेत.
- भूमिका संकल्पना व मूल्यांबाबत मोठे मतभेद हे शिक्षकांना तयार प्रमाणित करणाऱ्या शिक्षण महाविद्यालये, शाळा, राज्यविभाग, शिक्षणसंस्था यांच्यात आढळतात.

अध्यापक शिक्षणातील चांगले उपक्रम:

ज्ञानाच्या प्रस्फोटामुळे महाविद्यालयीन / विद्यापीठ अध्यापकशिक्षकाने निवडक्षेत्रातील आपले ज्ञान सतत अद्ययावत करण्याची गरज आहे. अन्यथा अल्पावधीतच ते कालबाह्य ठरेल.

स्वयंप्रेरित अध्यापक हे आधुनिक अध्यापन तंत्र / पद्धती / प्रक्रिया ह्यामध्ये प्रशिक्षित होण्यासाठी स्वत:ची संसाधने वापरत असले तरी यासाठी पद्धतशीर / संघटित ओळख कार्यक्रम हे महाविद्यालयीन / विद्यापीठ शिक्षकांसाठी आखणे आवश्यक आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने विकसित केलेल्या ॲकॅडमिक स्टाफ कॉलेजाने कार्य करताना शिक्षक केंद्रस्थानी ठेवून केले पाहिजे. शिक्षक हा साऱ्या शिक्षणव्यवस्थेचा सुकाणू आहे, हे साऱ्या जगाने मान्य केले असले तरी आमची व्यवस्था त्याला पुरेशा सोयी त्याच्या विकासासाठी पुरवत नाही. म्हणून ज्ञानाधारित समाजाच्या चौकटीत अशा सोयी पुरवणारी अंतर्गत व्यवस्था असणे गरजेचे आहे. शिक्षकाने विद्यार्थ्याला माहिती / ज्ञान देण्याबरोबरच जीवनाची आव्हाने स्विकारण्यास शिकवले पाहिजे. त्याने प्रशिक्षित व्यावसायिक होण्याऐवजी चांगला नागरिक होणे महत्त्वाचे आहे.

आपले गुरु वा वरीष्ठ सहकाऱ्याचा आदर्श ठेवत, व्यवसाय करत असतानाच 'अध्यापनकला' पूर्वी महाविद्यालयीन / विद्यापीठ शिक्षक पूर्वी शिकत असत. असे शिक्षक विद्यार्थ्यांना प्रेरित करत. पण आता नवनियुक्त शिक्षकाला आपली अध्यापनकला विकसित करता येणार नाही. राष्ट्रीय विकास व सामाजिक-आर्थिक बदलाचे मध्यस्थ म्हणून शिक्षकावर 'ओळख कार्यक्रमाची' संकल्पना भर देत आहे. युजीसीच्या मार्गदर्शकतत्वानुसार, तरुण व्याख्यात्यांवर आत्मनिर्भरतेचा गुण बिंबवला पाहिजे. चार आठवड्याच्या ओळख कार्यक्रमाचे (६ तास / दिवस × २४ दिवस = १४४ तास) खालील ४ घटक आहेत -

घटक अ) समाज, पर्यावरण, विकास व शिक्षण यांमधील अनुबंधाची जाणीव.
घटक ब) शिक्षणाचे तत्वज्ञान, भारतीय शिक्षण व बालशिक्षणशास्त्र
घटक क) संसाधनांची जाणीव व ज्ञाननिर्मिती
घटक ड) व्यवस्थापन व व्यक्तिमत्व विकास

व्याख्यानसंख्या व त्यांची शैक्षणिक पार्श्वभूमी कशी असावी हे वरील घटकावरुन कळते. यातील विषयनिवड व अध्यापनपद्धती ठरवण्याचा अधिकार ॲकॅडमिक स्टाफ-कॉलेजला आहे. एखादा 'अध्यापक शिक्षण' या व्यवसायात शिरु पहात असेल, तर त्याच्याजवळ आवश्यक ते ज्ञान असतेच असे नाही, अशी टीका आपल्याला ऐकू येते. निरंतर बदल व शुद्धीकरण यामुळेच एखादा व्यवसाय हा दुसऱ्यापासून वेगळा ओळखला जातो. त्यामुळे त्याच्या वेधतेबाबत

प्रश्न केला जात नाही. इरॅटच्या मते, "अन्य कोणत्याही व्यावसायिक गटाकडे नसलेली व समाजमान्य अशी विशिष्ट तज्ञता एखाद्या व्यवसायाकडे असेल तर त्यावर व्यावसायिक कार्यकर्त्यांची दर्जा व शक्ती अवलंबून असते."

तुमची प्रगती तपासा:

१. 'व्यवसायाची' व्याख्या स्पष्ट करा.
२. 'व्यवसायाची' उदाहरणे लिहा.
३. 'व्यवसायाची' कोणतीही ३ वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
४. 'व्यवस्थापकीय व्यवसाय-प्रतिमान' स्पष्ट करा.

१०. अ.३ व्यावसायिकतेची संकल्पना:

व्यावसायिकतेचा खरा अर्थ शोधणे कठीण आहे. काही जण तो अर्थ 'क्षमतेच्या', तर काही 'सत्तेच्या', तर 'काही दुसऱ्याला प्रभावित करण्याच्या' संदर्भात घेतात. परिणामकारक संप्रेषण व कार्यक्षम कृती असा व्यवसायाचा खरा अर्थ फारच थोडे घेतात.

असे जरी असले तरी 'व्यावसायिकतेची' मूलगामी व्याख्या एकच असेल, भावनेपेक्षा मानवता व कार्याचे टप्पे विचारता घेता, विशिष्ट ध्येयाच्या संदर्भात, व्यावसायिकता ही केंद्रित, जबाबदार, विश्वस्त, सक्षम व प्रेरित असते. ह्या प्रक्रियेत वरीष्ठ, सहकारी कनिष्ठ व इतरेजन यांच्याबाबत आदर बाळगला जातो.

शब्दकोशावरुन, "व्यावसायिकता म्हणजे व्यावसायिकाची तज्ञता वैशिष्ट्ये किंवा व्यवसाय म्हणून एखाद्या उपक्रमाचा पाठपुरावा." सामान्यता X हा Y पेक्षा अधिक व्यावसायिक आहे. हा सर्वसाधारण अर्थ यातून घ्यावयाचा आहे.
इतर दृष्टिकोन खालील व्याख्यातून उमजतील -

- व्यावसायिकता म्हणजे व्यवसायाचे नियम पाळणे व ते बदलण्याचे धैर्य असणे.
- व्यक्तिगत व व्यावसायिक जीवनाचे संतुलन म्हणजे व्यावसायिकता.
- व्यावहारिक व व्यावसायिक आपल्या जीवनात असणे म्हणजे व्यावसायिकता.
- व्यवसायविषयक ज्ञान, कौशल्य व अभिवृत्ती दाखवणे म्हणजे व्यावसायिकता.
- आर्थिक लाभ मिळवून देणाऱ्या कामाशी गंभीर व बांधिल असणे म्हणजे व्यावसायिकता.

यावरुन, खालील व्यावसायिकाकडे असलेल्या वैशिष्ट्यांचा / संकल्पनांचा गुच्छ हा व्यावसायिकता दाखवितो -

"केंद्रित वृत्ती, कार्याभिमान, आत्मविश्वासु, सक्षम, ध्येयप्रेरित, उत्तरदायित्व, क्रम / दर्जा / लिंगनिरपेक्ष लोकांविषयी आदर, ध्येयमार्गाबाबत जबाबदारी, शब्द / कृतीशी बांधिल, भावनांवर नियंत्रण"

सामान्य ज्ञान / बुद्धि, पुरोगामी विचार, नियोजनपूर्वक व्यावसायिक कृती केली जाते, तेथे व्यावसायिकता असते.
खालील निकषाद्वारे व्यावसायिकतेचे विकसन होऊ शकते.

- आत्मक्षमताविषयी अभिमान व खात्री बाळगा.
- तुमच्यातील सर्वोत्तम देवून सर्वोत्तम काम करा.
- पूर्ण क्षमता मिळवा.
- वेळेवर हजर रहा.
- व्यवसायानुकुल वेष करा.

"काय व कितीपेक्षा कसे व केव्हा करावे हे जाणणे व तसे करणे म्हणजे व्यावसायिकता." क्षमता, भाषा, वर्तन, कृती, वेष व काम व्यवसायानुसार जी ठरवते ती व्यावसायिकता. सहकाऱ्यांचे आदर्श वर्तन व मूल्ये यामध्ये स्वेच्छेने भागिदारी करणे म्हणजेच व्यावसायिकता.

१०. अ.४ अध्यापकशिक्षकांसाठी व्यावसायिकतेचे विकसन:

शिक्षकाची भूमिका, बालशिक्षणशास्त्र, विद्यार्थ्यांची अध्ययनक्षमता यांवर शिक्षकाच्या व्यावसायिकतेचा लक्षणीय परिणाम होतो, मुलांकडे, नियोजित आशयाकडे अर्थपूर्ण व अभिनव मार्गाने जाणे, तरुण विद्यार्थीमनाला प्रगत तंत्रज्ञानाला सामोरे जाण्यास प्रवृत्त करणे हे व्यावसायिकता शिकवत असते. शिक्षकांना दिलेल्या वाढत्या स्वायत्ततेमुळे, व्यावसायिकता हे आजच्या शिक्षणाचे प्रभावी वैशिष्ट्य मानले जाते. क्षमता, कृती व वर्तन ही शिक्षक व्यावसायिकतेची आवश्यक वैशिष्ट्ये आहेत. शिक्षकांची ध्येये, क्षमता व दर्जा ही या वैशिष्ट्यांमध्ये परावर्तित होतात, त्याचा आघात प्रत्यक्षात शिक्षकपरिणाम कारकतेवर होत असतो.

क्षमता ही मूलभूत असून ती शिक्षकाला उत्कृष्टतेकडे नेते. तयारी विषयज्ञान, शिक्षणशास्त्र या ३ कल्पनांवर 'क्षमता' केंद्रित होते. वर्गप्रसंगातील बाधकतेला, (भाषिक / सांस्कृतिक / सामाजिक-आर्थिक भेदांना) सामोरे जाण्यास व्यावसायिकता तयार करते. प्रशिक्षित व्यावसायिकाद्वारे अचूक निर्णय कसा घ्यायचा नवागताला कळते, दैनंदिन व्यवहारात सुधारणा व शुद्धता आणली जाते. परिणामी नामा अडथळे पार करुन वर्गव्यवस्थापन करुन प्रभावी अध्ययन वातावरण व्यावसायिक तयार करु शकतो, प्रसंगी विद्यार्थ्यांनाही अडथळे पार करायला शिकवतो.

पुस्तके अभ्यासल्यावर आपला पुष्कळसा वेळ घालवण्यापेक्षा व्यावसायिक शिक्षक हा विषयक्षेत्राच्या ज्ञानासह तयारीनिशी उतरतो, तेव्हा त्याला अध्यापनाचे नवतंत्र तयार करण्याची संधी असते. जेव्हा त्याला अभ्यासक्रम कळतो, तेव्हा तो आत्मविश्वासाने शिकवू शकतो. अशातऱ्हेने, मूलगामी पद्धत, आशय व विद्यार्थ्यांची संधी यांची एकत्र बांधणी अधिक चांगल्या तऱ्हेने शिकतो.

विद्यार्थ्यास अनुकुल व परिणामकारक अशा शिक्षणशास्त्राचा शोध हा शिक्षकाच्या क्षमतेचा भाग आहे. ल्युनेन्बर्ग व ऑरन्स्टीन (२०००) यांच्या मते "आशय, कौशल्ये व अभ्यासक्रमाचे अग्रक्रम ज्ञात असलेल्या शिक्षकांना नियुक्त केल्यास, अभ्यासक्रमाच्या प्रत्येक भाग पूर्ण करण्यास किती वेळ लागेल हे निश्चित आहे." जरी ह्या बाबी चांगल्या तऱ्हेने पार पाडण्यास अनेक वर्षे लागली तरी व्यावसायिक हा स्वतः विकसित होताना आपल्या शिक्षणशास्त्राचे स्वयंमूल्यमापन करत असतो, जरुर तेव्हा सुधारतो आणि आपल्या कल्पना व्यावहारिक प्रसंगामध्ये वापरत असतो. प्रशासन, शालेय मंडळ नि पालकांनी रचलेल्या अडथळ्यांपासून काही अशी सुटका करुन घेत, व्यावसायिक हा सुस्पष्ट शिक्षणशास्त्र स्विकारुन, आपल्या स्वतःला स्वायत्तता निर्माण करत असतो.

'व्यावसायिकता' शिकवण्यासाठी जरी क्षमता आवश्यक असली तरी शिक्षक हा शिकवण्यास समर्थ असला पाहिजे. 'अभ्यासक्रमाची' संकल्पना परिणामकाररित्या शिकवण्याची क्षमता म्हणजेच त्याची कृती. "खास प्रशिक्षणाद्वारे प्राप्त ज्ञानावर आधारित, व्यावसायिकांना योग्य वाटेल तसे त्यांचे कार्य करण्याचा हक्क असतो," असे न्युमनला वाटते. पूर्वरचित व सुधारित तंत्रातून तयार झालेल्या कृतीची आवश्यकता यावरुन पटते. व्यावसायिक शिक्षक असे शिकवतो की ज्यामुळे विद्यार्थी शिकलेल्या संकल्पना आपल्या जीवनात वापरतो. याबरोबरच तो विद्यार्थ्यांना स्थानिक परीक्षांसाठीही तयार करत असतो, असा शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये रस घेतो, तो विश्वास पेशाला वाहून घेतलेला, कृतिशील व दर्जेदार असतो.

वर्तन हे ह्या पेशाचे अंतिम वैशिष्ट्य. त्याच्या वर्तनात वर्गाचे, शाळेचे, शिक्षकव्यवस्थेचे व समाजाचे प्रतिबिंब दिसते. भाषा, वर्तन, संस्कृती या संदर्भात किती चांगल्या तऱ्हेने स्वतःची काळजी घेतो याचे प्रतिनिधित्व हे त्याचा 'आचार' करतो. तथापि हे आचाराचे किमान गुण आहेत. विद्यार्थी, शिक्षक शाळामंडळ, प्रशासन व पालक ह्या शिक्षण घटकांमध्ये गुणवत्तापूर्ण संप्रेषण उत्तेजित व राखण्याची एखाद्याची क्षमता म्हणजे आचार. व्यावसायिक शिक्षक हा आपल्या पसंतीची शैक्षणिक ध्येये प्राप्त करण्यासाठी प्रभावी संप्रेषणकौशल्ये दाखवू इच्छितो.

शिक्षक हा विशिष्ट तऱ्हेने तयार करता येतो त्या समाजापलिकडे शिक्षक व्यावसायिकतेची व्याख्या जाते. सर्व वर्गप्रसंगाना सामोरे जाण्यासाठी त्वरित विचारशक्तीची गरज आहे. शिक्षकाची भूमिका ही स्वयंचलित होत असल्याने, शिक्षक आपल्या अभ्यासात प्रवीण हवेत. अशावेळी प्रशासन व पालक यांच्या नजरेखाली असण्यामुळे गुणवत्तापूर्ण संप्रेषण चांगल्या वर्तनामुळे होऊ शकते.

तुमची प्रगती तपासा -

१. व्यावसायिकता म्हणजे काय ?

२. अध्यापकशिक्षक हा स्वतंत्ररित्या स्वतःला विकसित कसा करु शकतो ?

१०.अ.५ अध्यापकशिक्षकांसाठी व्यवसायनीती व व्यावसायिक आचारसंहितेचे विकसन:

आपल्या व्यावसायिक सदस्यांसाठी वर्तन/आचारास मार्गदर्शनपर नीतीतत्त्वे तयार करणे हे प्रत्येक व्यवसायास अपेक्षित आहे. अशा तत्वांमुळे अपेक्षित व अनिष्ट वर्तनातील फरक कळतो.

नीतिशास्त्राची प्रथा ही प्राचीन, समाजमान्य व कालपरीक्षित आहे. व्यक्ति वा समाजमान्य अशा नीतितत्वांशी संबंधित आहे, व्यावसायिक उत्कृष्टता व आत्मसमाधान मिळविण्यासाठी आत्मस्विकृत तत्वांचा संच म्हणजे व्यावसायिक आचारसंहिता. वरिष्ठ, समाज पालक, विद्यार्थ्यांशी अध्यापन व्यवसायात वावरताना शिक्षकाला जी मार्गदर्शक नीतितत्वे मदत करतात, त्यास व्यावसायिक नीतिशास्त्र असे म्हणतात. प्रत्येक व्यवसायायाचा भिन्न कार्यसंस्कृती / वातावरणानुसार त्याची व्यवसायनीती ठरते. समाज व व्यवसायातील मोठ्या व्यक्ती अशी नीती ठरवतात. ती गतिशील असून, वेळोवेळी स्थलकालानुसार बदलती असते, समाजस्थिती, तिचे भिन्न आयाम यानुसार ती बदलते. त्यामुळे सामाजिक लाभ, नैतिक अचूकता, सत्य, मूल्य व मानवी प्रगती साधू शकते.

व्यवसायनीतीची गरज:

- **आत्मसुधारणेसाठी:** विचारांमुळे माणूस बदलतो. समाधान, स्वार्थ, आळशीपणा, पैसा ह्यांच्यासाठी माणूस जगू शकतो. सत्य, कष्ट, साधी रहाणी, प्रामाणिकपणा यांना चिकटून रहाणे कठीण असते. त्यामुळे नकळत माणूस स्वार्थी व अनैतिक होतो. सद्यस्थिती हेच दाखवते. व्यवसायनीती मात्र त्याला सुधारु शकते.

- **आत्मसमाधानासाठी:** आपला आंतरिक 'स्व', भावना व विचारप्रक्रियेशी संबंधित आत्मसमाधान हे अधिक संबंधित असते. समाजाची नि व्यवसायाची नीतितत्वे पाळणाऱ्याला कष्टाळू, प्रामाणिक, कर्तव्यनिष्ठ व योग्य समजले जाते. इतरांपेक्षा अधिक महत्वपूर्ण सन्माननीय मानले जाते. जेव्हा एखादा कामासाठी योग्य समजला जातो, तेव्हा त्याला मान / आदर मिळू लागतो. इतरांनी स्वतःविषयी काही ठरवण्यापेक्षा, स्वतःच ठरवण्यास व्यवसायनीती मदत करते.

- **आचार / वर्तनाबाबत मार्गदर्शनासाठी:** व्यवसायनीतीमुळे शिक्षकाचे व शिक्षकामुळे विद्यार्थ्यांचे वर्तन आकार घेत असते. अध्यापनाचे तत्वज्ञान व मानसशास्त्रामुळे शिक्षणाच्या व्यवसायनीतीला आधार मिळतो. अशा नीतीमुळे शिक्षकाचा आचार हा समाजमान्य व आदरणीय ठरतो.

- **व्यक्तिमत्वाला आकार देणे:** ज्ञान व वर्तन सुधारत, शिक्षक हा आपले व्यक्तिमत्व विकसित करत असतो. आपल्या आचारविचारात पूर्वनियोजित प्रमाणके (नॉर्म्स) अनुसरत, शिक्षकाचे बोलणेचालणे व व्यक्तिमत्व व्यवसायनीती घडवत असते, तो खराखुरा शिक्षक होतो.

- **विद्यार्थ्यांसाठी आदर्श प्रस्थापित करणे:** विषय / पुस्तकांच्या अभ्यासाबरोबरच, वर्तन नि व्यक्तिमत्व सुधारण्यास विद्यार्थी शिकू पहातो. दररोज विद्यार्थी हे भिन्न शिक्षकांच्या प्रभावाखाली येतात. जर शिक्षक हा सकारात्मक व योग्य तऱ्हेने वागत असेल तर विद्यार्थांना त्यांना आवडतो, आदर्श वाढतो व त्याला ते अनुसरतात.

- **मानवी संबंध सुधारण्यासाठी:** सामाजिक लाभ, दुसऱ्यांबद्दल आदर, बंधुत्वभाव, सहनशीलता सहकार्य हे लक्षात घेवून व्यवसायनीती मार्गदर्शन करत असते. असे मार्गदर्शन लाभलेला शिक्षक इतरांना कमाल मदत करतो, सकारात्मक भावना बाळगते, परिणामी मानवी संबंध सुधारतात.

- **समाजविकासासाठी:** सामाजिक गरजेची निष्पती म्हणजे शाळा, समाज व शाळा हे परस्परांना घडवत असतात. काळानुसार हे चक्र मोठे होत जाते. जर हे दोन्ही घटक व्यवसायनीती विसरले, तर दोघेही चुकीच्या मार्गाने भरकटू लागतील, व्यवसायनीतीमुळे शिक्षक समाजाला योग्य दिशेने नेवून सुस्थितीत ठेवतो.

- **व्यावसायिक उत्कृष्टतेसाठी:** प्रत्येक व्यवसायाला एक विशिष्ट कार्यसंस्कृती / वातावरण असते. जेव्हा व्यावसायिक हे क्रिया / आंतरक्रिया नैतिकतेने करत असतील, तर कार्यसंस्कृती सबळ होईल. म्हणजेच सहकार्य / प्रेरणे ऐवजी ते तंटेबखेडे करत नाहीत. सहज समन्वय व परिणामकारक कार्य याद्वारे व्यावसायिक उत्कृष्टता लाभते.

- **व्यावसायिक पर्यावरण सुधारण्यासाठी:** जनता, भौतिक, सुविधा, कामकाजाच्या शर्ती / तास या बाबींचा व्यावसायिक पर्यावरणामध्ये समावेश होतो. वरीष्ठांना योग्य स्थान नि आदर जबाबदारी नि कामाच्या तासाची कदर हे शिक्षक व्यवसायनीतीमुळे करत असतो. अशा आचारसंहितेमुळै पर्यावरण शांत / शिथिल होऊन, कार्य हे परिणामकारक होते.

- **व्यवसायतत्वे / प्रमाणके अनुसरण्यासाठी:** परिणामकारक कार्यासाठी, व्यवसायाने आगाऊ निर्धारित केलेले नियम म्हणजेच व्यवसायाची तत्वे नि प्रमाणके. हे नियम कालप्रसंगानुसार बदलतात. स्वार्थ नि व्यावसायिक विकास यातील भेद हे व्यवसायनीतीमुळे करणे शक्य होते. वेळोवेळी अतिरिक्त जबाबदारी पेलण्यासाठी जो आपल्याला तयार करते. चांगल्या व्यवसायनिष्पत्तीसाठी, व्यवसायनीती हे आत्मबंधन ठरते.

- **व्यावसायिक बंधने:** असे बंधन हे व्यक्तीने स्वत:वर लादलेली नैतिक जबाबदारी असून ते कर्तव्याच्या अनुरोधाने मानवी प्रगतीसाठी असते. वरीष्ठ, व्यवसाय, पालक, विद्यार्थी, समाज ह्यांना अनुलक्षून शिक्षक व्यावसायिक बंधने पाळतो.



- **विद्यार्थ्याप्रत बंधने:** विद्यार्थी व शिक्षक हे शिक्षणप्रक्रियेचे अविभाज्य भाग आहेत. शिक्षक शिकवतो, तर विद्यार्थी शिकतो. उभयतांमधील बंध खालील बाबींबर अवलंबून असतो.

- उपलब्ध संसाधने, वेळ, मार्ग लक्षात घेवून शिक्षकाने गांभीर्याने अध्यापन करावे की त्यामुळे विद्यार्थी इष्ट ते शिकेल.

- विषयाबरोबरच जीवनाचा अभ्यास करण्यास शिक्षकाने विद्यार्थ्याला प्रेरणा / धीर दिला पाहिजे, परिणामी विद्यार्थी शक्य त्या मार्गाने प्रसंगाला सामोरे जाईल

- सर्व सामान्य विद्यार्थी काहीवेळा भावनिकरित्या अस्थिर होतो. तेव्हा शक्य त्या सर्व चांगल्या मार्गाने शिक्षकाने विद्यार्थ्यांना भावनिक स्थिरता दिली पाहिजे. उदा. आंतरशालेय / राज्यस्तरीय फुटबॉलस्पर्धेत थोडक्यात यश हुकल्यावर विद्यार्थ्यास धीर देणे.

- दैनंदिन व्यवहारात विद्यार्थी काही विचित्र सवयी / कृती दाखवत असल्यास, याबाबतीत मानसशास्त्रीय हाताळणी करत विद्यार्थ्याला विधायक वळण लावले पाहिजे.

- अध्यापनाव्यतिरिक्त सजग कार्यकर्ता म्हणून शिक्षकाने शाळा नि विद्यार्थी सुधारण्यासाठी काम केले पाहिजे.

- भिन्न अध्ययनप्रसगात योग्य निर्णय घेण्यासाठी मदत शिक्षकाने केली पाहिजे. उदा. विद्यार्थ्याचा हेतु, अभियोग्यता नि अभिवृत्ती लक्षात घेवून इ. १० वी नंतर कोणती ज्ञानशाखा निवडणे योग्य ठरेल यासाठी शिक्षकाची मदत मोलाची ठरते.

- प्रत्येक विद्यार्थ्याला भिन्न जीवनप्रसंगाला सामोरे जाण्यासाठी तयार करणे. हे शिक्षकाचे काम आहे. मंचीय उपक्रम, प्रभातपरिपाठ यासारख्या उपक्रमामध्ये भाग घ्यायला लावून विद्यार्थ्यामध्ये नेतृत्वगुणांचा विकास करण्यास मदत केली पाहिजे.

पालकांप्रत बंधने:

आपली मुले आवश्यक ती भाषा / विषय शिकून, पुढे भावी आयुष्य त्यांचे उज्ज्वल होईल या आशेने पालक त्यांना शाळेत पाठवतात. म्हणून त्या मुलाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी

पालकांच्या संपर्कात राहणे हे शिक्षकाला एकप्रकारे बंधनकारक ठरते. अशी पालकांप्रत बंधने खालीलप्रमाणे -

- नेहमी वर्गात / शाळेत आपला मुलगा कसा वागतो हे माहीत नसते. त्यामुळे त्याचे वर्तन, भिन्न विषयांमधील त्याचे संपादन यासंबंधीची माहिती नियमितपणे पालकांना देणे हे पालकांप्रत असलेले बंधन शिक्षकाने मानून व्यवहार केला पाहिजे.

- मुलांचे भवितव्य ठरवण्यासाठी पालकांना मार्गदर्शन करणेः मित्र, नातेवाईक यांसारख्या भिन्न माध्यमांतून पालकांनी मिळवलेले ज्ञान हे ठराविक क्षेत्रापुरते असते. या मर्यादित ज्ञानावर विसंबून विद्यार्थ्यांच्या क्षेत्रनिवडीचा भावी पालक ठरवू पहातात. अशावेळी त्यांना अचूक मार्गदर्शन होणे गरजेचे आहे. ते शैक्षणिक / व्यावसायिक पर्यायाबाबत होणे आवश्यक आहे.

- शाळेत व्यक्तिशः वा गटात विद्यार्थी वावरत असल्याने, त्याची अभिवृत्ती व अभियोग्यता शिक्षक निरखू शकतात. त्यामुळे प्राप्त माहिती ही शिक्षकाने पालकांना वेळोवेळी देत रहाणे गरजेचे आहे.

- काही समस्याचे मूळ घरगुती असून त्या घरच्याघरीच सुटू शकतात. पण अशा समस्या विद्यार्थी पालकांसमवेत चर्चा करण्यास मागेपुढे पहातात. जेव्हा अशा समस्या शिक्षकांना कळतात, तेव्हा पालकांना बोलावून त्यांच्याशी चर्चा केल्यास, घरचे वातावरण अनुकूल करण्यास शिक्षकांकडून पालकांना मदत होईल.

- आपल्या पालकांनी आपल्याला जसे वागवले तसे मुलांचे पालक त्यांना वागवत असतात. प्रसंगकालानुसार न बदलता, आपली मते ते आपल्या मुलांवर लादत असल्याने समस्या निर्माण होतात. त्यामुळे याबाबतीत शिक्षकांकडून पालकांचे समुपदेशन होणे गरजेचे आहे. परिणामी विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्यातील संप्रेषण परिणामकारक होऊन विद्यार्थ्यांचे शिक्षण परिणामकारक होईल.

- पालकांना त्यांच्या मुलांचे छंद व अभ्यासेतर उपक्रमातील सहभाग म्हणजे वेळेचा अपव्यय वाटतो. यासाठी चर्चेद्वारे शिक्षकांनी पालकांचे मन वळवून विद्यार्थ्यांच्या छंदांना योग्य दिशा दिली पाहिजे. त्यामुळे विद्यार्थी अधिक सर्जनशील बनेल.

- शालेय कामकाज, शाळेचे आतापर्यंतचे यश, नवे उपक्रम याविषयी अद्ययावत शिक्षकांनी पालकांना देवून त्यांना शाळेविषयी जवळीक वाटेल असे पहावे. म्हणजेच त्यामुळे शिक्षक हा शाळा व पालक यांच्यात अनुबंध निर्माण करण्यात यशस्वी होईल.

समाजाप्रत बंधनेः

शाळा ही सामाजिक गरजेची निष्पती आहे, नव्हे ती समाजाची छोटी प्रतिकृती आहे. युवापिढीला सुधारण्यासाठी मदत करण्याचा तिचा हेतु आहे. समाज व राष्ट्राचे भवितव्य साकारणारा शिक्षक कारागीर आहे. खालीलप्रकारे शिक्षक हा समाजाप्रत बांधिल असतो.

- विविध विषयांच्या माध्यमातून शाळा ही विद्यार्थ्याला जीवनमार्ग दाखवते, प्रामाणिकपणे समाजाप्रती आपले कर्तव्य कसे पार पाडायचे हे तो शाळेत शिकतो. अशा तऱ्हेने शिक्षक हा विद्यार्थ्यामधून चांगले नागरिक तयार करतो.

- कायदेशीर हक्क / कर्तव्ये यांचे ज्ञान, नैतिकतेचे महत्व हे विद्यार्थ्यांना नागरिकशास्त्रद्वारे मिळते. समाजाचे कार्य सुलभरित्या होण्यासाठी विद्यार्थी हा हक्क / कर्तव्याप्रत जबाबदार कसा होईल हे पाहिले पाहिजे.

- समाजाच्या जन्मापासून, सामाजिक प्रमाणकानुसार समाज सहजरित्या चालत असतो, काहीवेळा नव्या पिढीला जुनी प्रमाणके कालबाह्य वाटतात, त्यामुळे त्यांच्या मनात उडालेला गोंधळ दूर करण्यासाठी सध्याची सामाजिक प्रमाणकांचे अनुसरण हे कसे योग्य लाभदायक हे पटवून देणे शिक्षकाचे काम आहे.

- आजचे विद्यार्थी उद्याचे नागरिक असल्याने, ते नैतिकदृष्ट्या ताठ असल्याशिवाय उद्याचा समाज योग्यरित्या चालणार नाही. व्याख्यान, दिग्दर्शन, उपक्रम याद्वारे शिक्षक त्यांना नैतिकतेचे धडे देवू शकेल. यासाठी समाजमान्य होईल असा नैतिक दंडक तयार केला पाहिजे.

- भारतात सात धर्मांचे पालन केले जाते. सर्व धर्मांची सामाईक मूलभूत तत्वे शिक्षकांनी समजावून घ्यावीत, कारण समाजाचा शिक्षकावर विश्वास आहे. सामाजिक प्रार्थनास्थळांना भेटी, धार्मिक उत्सव योग्य रित्या साजरे करणे याद्वारे विद्यार्थ्यामध्ये सामाजिक सहिष्णुतेचा विकास होईल.

- भाषा नि सांस्कृतिक भेदांचा भारतीय समाजावर प्रभाव आहे. हे भेद समजावून घेवून सहन केल्यासच राष्ट्रीय एकात्मता साधेल. भाषिक, प्रांतिक, धार्मिक सण विद्यार्थ्यांना साजरे करायला लावून शिक्षक हा विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण करु शकेल.

- सामाजिक आर्थिकदृष्ट्या सबळ असूनही कोणताही व्यक्ती वा गट एकटेपणी राहू शकत नाही. समाजघटकांचे परस्परांशी निर्माण झालेल्या नातेसंबंधांचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या लक्षात शिक्षक आणून देवू शकतो. त्याद्वारे सध्याच्या सामूहिक नातेसंबंधांचे संतुलन कसे साधायचे हे विद्यार्थ्यास समजेल.

- व्यक्ति नि समुदाय हा नैसर्गिक पर्यावरणात रहात असतो. त्यामुळे निसर्गाचे रक्षण हे प्रत्येकाचे कर्तव्य ठरते. पर्यावरण शिक्षणामध्ये शिक्षक हा विद्यार्थ्यांना वृक्षारोपण / संवर्धन / संरक्षण, प्रदूषण निवारण, लोकजागृती आदि उपक्रमाद्वारे शिक्षक हा विद्यार्थ्यांना, 'निसर्गाच्या सहवासात' रहाण्याचे महत्व लक्षात आणून देत असतो.

व्यवसायप्रत बंधने:

कृति, वर्तन व दर्शन याबाबतीत, शिक्षकाकडून समाज हा उत्कृष्टता अपेक्षित करत असतो, त्यामुळे समाजाला आपल्या जीवनास नवा आयाम / दंडक / अर्थ प्राप्त झाल्यासारखे वाटते. अध्यापन व्यवसाय हा सर्वश्रेष्ठ मानल्याने शिक्षकाची व्यवसायप्रत बांधिलकी अधिकच वाढते.

- बोलण्या चालण्यात साधेपणाबरोबर शहाणपणही दिसले पाहिजे. विद्यार्थी व इतरांशी संवाद साधताना शैक्षणिक सुधारणा व मानवी प्रगती याविषयी वाटणारी कळकळ दिसली पाहिजे. यासाठी व्यावसायिक यंत्रणेचे उत्थापन कसे होईल हे पहावे.

- व्यवसायप्रती आदर हा शिक्षकाच्या देहबोलीतून प्रकट झाला पाहिजे, जरी तो निवडीपेक्षा संधीने ह्या शिरला असला तरी त्यामुळे इतर त्याच्या व्यवसायाचा आदर करतील. त्यासाठी त्याने व्यवसायातील सकारात्मक गोष्टींची चर्चा केली पाहिजे.

- नवीन पुस्तक / मासिकांचे वाचन, सेवांतर्गत प्रशिक्षण, चर्चासत्र / कार्यशाळेतील सहभाग याद्वारे शिक्षकाने व्यावसायिक वृद्धीसाठी सज्जता दाखवली पाहिजे.

- लेख / शोधनिबंधाद्वारे आपले शैक्षणिक विचार हे शिक्षकाने 'अध्यापक जमातीपुढे' मांडल्याने व्यवसायवृद्धीस मदत होईल.

- विद्यार्थ्यांचा मित्र, मार्गदर्शक व तत्वज्ञ, सहकाऱ्यांशी आदर / सहकाराची भावना, वरीष्ठांशी नम्र व आदबशी वर्तन, अपेक्षित कर्तव्यपालन त्याद्वारे शिक्षक हा कामाच्या ठिकाणी अनुकूल वातावरण निर्मिती करु शकेल.

- शिक्षकाने नवागतांना व्यवसायनिवडीसाठी प्रोत्साहन / मार्गदर्शन केले पाहिजे. त्यामुळे सक्षम व शैक्षणिक अभिवृत्ती असलेले पुढे अध्यापन व्यवसाय निवडतीला ही व्यक्ती / व्यवसायप्रती दिलेली अप्रत्यक्ष सेवा म्हणायची.

- शिक्षकाने कृतिशील सहभागाद्वारे व्यवसायसंघटनेकी एकी / बळ वाढवले पाहिजे. त्यासाठी जरुर तेव्हा संघटनेचे ध्येय / कार्यक्रम ठरवण्यासाठी तिच्या सभांना उपस्थि रहाणे आवश्यक ठरते.

- धोरण, विद्यार्थीनोंदी, परीक्षाफल, प्रश्नपत्रिका तयारी, उत्तरपत्रिका तपासणी आदि कामाबाबत शिक्षकाने गोपनीयता राखावी. ही दक्षता घेताना, इतरांच्या बाबतीत मात्र ढवळाढवळ करु नये. तसेच अनाधिकृत व्यक्तीशी यासंबंधी चर्चा टाळावी.

वरीष्ठांबद्दलची बंधने:

संस्थेच्या विकासासाठी नियम / धोरण ठरवणाऱ्या अधिकारी गटास वरीष्ठ / उच्चाधिकारी म्हणता येईल. त्यांनी तयार केलेली धोरणे शिक्षकाने अंमलात आणणे अपेक्षित असते. बदलत्या गरजांनुसार शिक्षकाने वरीष्ठांशी साधल्यास संस्थेचे कार्य / विकास परिणामकारी ठरेल.

- वरीष्ठांनी संस्थेसाठी समानता यावी म्हणून तयार केलेल्या नियमांना शिक्षक हा बांधील असतो. त्यामुळे नियुक्त कर्मचाऱ्यांमध्ये शिस्त राहिल्याने विद्यार्थ्यामध्येही शिस्त दिसेल.

- वेळोवेळी वरीष्ठ हे शैक्षणिक / अशैक्षणिक धोरणे ही विद्यार्थी / संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी ठरवत असतात. ही धोरणे जोपर्यंत परिणामकारकरित्या संप्रेषित व राबवली जात नाही तोपर्यंत ती फलित होणार नाहीत. ही धोरणे आत्मसात करुन अपेक्षित फलासाठी वरीष्ठ व विद्यार्थी यांच्यातील शिक्षक हा दुवा झाला पाहिजे.

- विद्यार्थी व प्रत्यक्ष घडामोडी यांचा वरीष्ठांचा थेट संपर्क नसतो. त्यासाठी माहितीच्या स्त्रोत म्हणून ते शिक्षकांवर अवलंबून असतात. म्हणून शिक्षकाने कार्यनीति विषयी माहिती पुरवावी.

- कोणत्याही धोरणाचे यश हे पूर्णतः धोरणकर्ते, व्यवस्थापक, मूल्यमापक व शिक्षक (कार्यवाहक) यांच्यातील समन्वयावर अवलंबून आहे. विविध धोरणे / कार्यक्रमाच्या परिणामकारक कार्यवाहीसाठी शिक्षकाने मदतनीस म्हणून भूमिका पार पाडावी.
- शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी हे पुष्कळदा उच्चाधिकाऱ्यांबद्दल (वरीष्ठ) अपेक्षित आदरभाव दाखवत नाहीत, कारण वरीष्ठांनी बदललेली धोरणे ही प्रशासनाचे प्रचलित संतुलन बिघडवत असते. वरीष्ठ हे संस्थेच्या भल्यासाठी धोरणे बदलतात, हे ध्यानी घेवून वरीष्ठांशी आदरयुक्त वागावे.

खऱ्या अर्थाने शिक्षक हा तेव्हा व्यावसायिक होईल, जेव्हा तो साऱ्या अपेक्षित बांधिलकीची पूर्तता करेल आणि व्यवसाय हा व्यावसायिकाहून मोठा आहे हे ध्यानी ठेवेल. समाजाच्या भल्यासाठी शिक्षकाला कर्तव्ये / जबाबदाऱ्या ह्या पार पाडाव्या लागतात. व्यवसायनीति व व्यवहार हातात हात घालून चालल्यास, बदलत्या काळानुसार शिक्षक हा खरा व्यावसायिक म्हणून काम करु शकेल.

आपली प्रगती तपासा:

टीपा लिहा : अ) व्यवसायनीती ब) व्यावसायिक बंधने

_____

_____

_____

_____

_____

१०. अ.६ सारांश

अध्यापन हा व्यवसाय आहे. अध्यापकशिक्षणात अध्यापकाचे प्रशिक्षण हा महत्त्वाचा घटक आहे. व्यवसायात विशिष्ट प्रकारचे प्रशिक्षण आवश्यक ठरते. उदा. वकील, अभियंता, प्राध्यापक, लष्करी अधिकारी इ. व्यवसायाची खालील वैशिष्ट्ये महत्वाची ठरतात.

तत्वज्ञानाधारित कौशल्य, व्यावसायिक संघटना, कार्यस्वायत्तता, व्यवसायनीती, उच्च दर्जा व पुरस्कार, गतिशीलता.

व्यावसायिकता ही त्या व्यावसायिक व्यक्तिची तज्ञता दाखवते. ती प्रसंगी त्याने स्वतःला कसे हाताळावे हे सांगते. अपेक्षित शैक्षणिक ध्येये साध्य करण्यासाठी, व्यावसायिक शिक्षक हा परिणामकारी संप्रेषण कौशल्ये वापरतो.

इतर व्यवसायांप्रमाणे, अध्यापकशिक्षणात अध्यापक-शिक्षक हा आत्मसुधारणा व आत्मसमाधानासाठी व्यवसायनीती व आचारसंहिता विकसित करतो. विद्यार्थी, पालक, समाज, उच्चाधिकारी व व्यवसाय ह्या घटकांशी बांधिल राहून शिक्षक व अध्यापकशिक्षक हे व्यवसायनीती विकसित करत असतात.

स्वाध्याय:

१. व्यावसायिक बंधन म्हणजे काय ? ते का आवश्यक आहे ?

२. 'व्यावसायिकता म्हणजे काय ? एखादा ती कशी विकसित करु शकतो ?

३. व्यवसाय, व्यावसायिकता व व्यवसायनीती यांच्यातील फरक स्पष्ट करा.

संदर्भ:

१. www.google.com

२. University News.

❖❖❖❖

१० ब

शिक्षक-परिणामकारकता

घटक रचना :

१०ब.० उद्दिष्ट्ये

१०ब.१ प्रस्तावना

१०ब.२ शिक्षक परिरामकारकता अर्थ व घट़क

१०ब.३ अध्यापकशिक्षकांची कृतिमूल्यमापिकेद्वारे (पर्फॉर्मन्स ॲपैजल) शिक्षकपरिणामकारकतेमध्ये होणारी वाढ

१०ब.४ सारांश

१०ब.० उद्दिष्ट्ये

हा घटक अभ्याससल्यावर तुम्ही पुढील गोष्टी करू शकाल :

- शिक्षक-परिणामकारकतेची व्याख्या सांगणे.
- शिक्षक परिणामकतेचे घटक सांगणे.
- कृतिमूल्यमापिकेबाबत जाणून घेणे.
- अध्यापकशिक्षकाची कृतिमूल्यमापिकेद्वारे शिक्षकपरिणामकारकतेमध्ये वाढ कशी होईल ते स्पष्ट करणे.

१०ब.१ प्रस्तावना

अध्यापकाला प्रभावी ठरवणाऱ्या घटकांचा शोध घेणे या पाठात अपेक्षित आहे. शालेय घटकांपेक्षा वर्गघटक हे शालेय परिणामकारकता विचलित करत असतात. म्हणूनच अध्यापकाला प्रभावी बनवणाऱ्या गोष्टी ओळखणे महत्त्वाचे आहे.

१०ब.२ शिक्षक परिणामकारकता : अर्थ व घटक

प्रभावी अध्ययनाचे फल म्हणजे शिक्षक परिणामकता. प्रभावी अध्यापनाच्या बाबी खालीलप्रमाणे-

- सकारात्मक अभिवृत्ती
- वर्गात सुखद सामाजिक / मानसशास्त्रीय वातावरणाचा विकास

- विद्यार्थी संपादनाबाबत उच्च अपेक्षा
- पाठाबाबत स्पष्टता
- प्रभावी समयव्यवस्थापन
- सबळ पाठरचना
- विविध अध्यापनपद्धतींचा वापर
- विद्यार्थी कल्पनांचा स्विकार व वापर
- योग्य व विविध प्रश्नांचा वापर

तथापि, विशिष्ट संदर्भात अध्यापन पद्धती प्रभावी ठरत असतात. अध्यापकाचा प्रभाव हा खालील घटकांवर अवलंबून असतो-

- पाठात अपेक्षिलेल्या उपक्रमाचा प्रकार.
- पाठ्यांश
- विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी (वय, क्षमता, लिंग, सामाजिक आर्थिक दर्जा, लोकजीवन)
- विद्यार्थ्याची व्यक्तिगत वैशिष्ट्ये (उदा. व्यक्तिमत्त्व, अध्ययनशैली, प्रेरणा, आत्मसन्मान)
- विभाग वा शाळेचे संघटन / संस्कृती

ह्या पाठात आपण अशा बाबी पारखणार आहोत,की ज्यांच्या घडण, प्रेरणा व संगोपनामुळे शिक्षक प्रभावी ठरेल.

ह्या चर्चेअंती, आपण शिक्षकपरिणमाकरकतेचा अर्थ असा लावू शकतो-

अध्यापनपद्धती, अध्यापक-अपेक्षा, वर्गसंघटन, वर्गसंसाधनांचा वापर ह्या वर्गघटकांचा विद्यार्थी-संपादनावरील परिणाम म्हणजे शिक्षक-परिणामकरकता.

विद्यार्थ्यांना शिकायला लावणाऱ्या अध्यापककार्याला पूरक अशा समाजमान्य उद्दिष्टे ओळखण्याची शक्ति म्हणजे शिक्षक-परिणामकारकता.

विद्यार्थ्यांचे अध्ययन वर्तन व अभिवृत्ती यांच्यावर सकारात्मक ठसा उमटवण्याची अध्यापकांची क्षमता म्हणजे शिक्षक-परिणामकारकता.

१०ब.३ अध्यापकशिक्षकाची कृतिमूल्यमापिकेद्वारे शिक्षकपरिणाम-कारकतेमध्ये होणारी वाढ :

शिक्षणव्यवस्था बिघडल्यास वा सुधारायची असल्यास लोकांना शिक्षकाची आठवण येते. वेतन, कार्यशर्ती, समस्याविषयक भूमिका याबाबतीत शिक्षक जेव्हा वाटाघाटी करतात तेव्हा त्याला सार्वजनिक दर्जा प्राप्त होतो. बहुधा, वर्गात अध्यापक कार्यरत असता, त्याचे कार्य /

संपादनाबाबत शाळा अनभिज्ञ असते. शिक्षकाचे संकल्पनात्मक ज्ञान व त्याने दिलेले अपेक्षितफल याच्या मूल्यमापनासाठी कित्येक धोरणे आखली जातात.

आज, शिक्षण व्यवस्थेतील आमूलाग्र बदल हा अध्यापककार्या बदल घडवत असतो. सद्यस्थितीत दीर्घकालीन कार्यतीतीची बांधणी व तिची त्वरित कार्यवाही शिक्षक करत असतो. त्यामुळे ते पूर्वीपेक्षा अधिक कार्यमग्न आढळतात. अध्यापनाची गुणवत्ता ठरवणारी मानके ठरवणे आणि शिक्षक कार्याचे मूल्यमापन करणे ही आपल्यासमोरील समस्या आहे. ही मानके आपण कसून ठरवत आहोत, पण अध्यापक कार्याच्या मूल्यमापनाकडे म्हणावे तसे लक्ष दिले गेलेले नाही.

कृतिमूल्यमापिकेचे अर्थ :

- वस्तुनिष्ठ निकषाधारे, नियुक्त कर्मचाऱ्यांच्या कार्य प्रभावाच्या मापनासाठी वापरलेली व्यक्तिगत मूल्यमापन पद्धत म्हणजे कृतिमूल्यमापिका व्यवसायाच्या अपेक्षांना सामोरे जात उच्च कायर्निष्पत्तीची कर्मचाऱ्यांकडून अपेक्षा ही पद्धत करत असते. वस्तुनिष्ठता राखत, कार्यमानके ठरवणे हे ह्या पद्धतीला असलेले प्रमुख आव्हान आहे.
- मानव संसाधन व्यवस्थापनाच्या प्रणालीप्रक्रियेच्या कृतिमूल्यमापिका हा एक महत्त्वपूर्ण घटक आहे.
- निरिक्षक व कर्मचारी यांच्यातील रचनाबद्ध औपचारिक आंतरक्रिया म्हणजे कृतिमूल्यमापिका होय. ही आंतरक्रिया कालबद्ध (वार्षिक/अर्धवार्षिक) मुलाखतीच्या रूपाने होते.

उपयोग :

- वेतनवाढ, बोनस, बढती यासाठी प्रभावी कार्य करणारे कर्मचारी हुडकणे,
- कार्यव्यवस्थापन करणे.
- **कृतिमूल्यमापिका** ही कार्यास कितपत उपकारक ठरते ते शोधणे.
- पूर्ववर्तनाचा आढावा घेऊन पूर्वकार्यावर प्रतिक्रिया व्यक्त करण्याची संधी देणे.

कर्मचाऱ्यांच्या दृष्टिकोनातून :

अ) मी काय करावे अशी अपेक्षा आहे ते सांगा.
ब) मी कसे चांगले केले आहे हे सांगा.
क) माझ्या कार्यसुधारणेसाठी मदत करा.
ड) चांगल्या कार्याबद्दल मला पुरस्कार द्या.

संघटनेच्या दृष्टिकोनातून :

उत्तरदायित्वाचे तत्व प्रस्थापित करणे व उचलून धरणे.

अध्यापकाच्या कृतिमूल्यमापिकेचा अर्थ :

व्यवसायकार्य व सामर्थ्यविकास या संदर्भात अध्यापकाचे पद्धतशीर मूल्यमापन म्हणजे अध्यापकाची कृतिमूल्यमापिका. ती एक औपचारिक, रचनाबद्ध अशी अध्यापक कार्याचे

मूल्यमापन करणारी व सध्याचे व्यवसायकार्य तो कसे करतो याचा निर्णय देणारी पद्धत आहे. तसेच ते भविष्यात अधिक परिणामकारक कार्य करू शकेल का याचे भाकित ती करत असते.

अध्यापकाच्या कृतिमूल्यमापनासाठी निकष :

अ) शाळेच्या ध्येयाशी अध्यापकाच्या मूल्यमापनाचा संबंध लावणे.

ब) अध्यापक विकसित मानकांच्या त्याच्या मूल्यमापनाशी संबंध लावणे.

क) अध्यापक मूल्यमापनाकडे एक निरंतर प्रक्रिया म्हणून पहावे. पर्यायी औपचारिक मूल्यमापन तंत्रांपैकी योग्य असे तंत्र एकावेळी वापरावे, त्यानंतर दुसरे उपयोगात आणावे.

ड) अध्यापकाच्या नवमूल्यमापन पद्धतीनुसार समावेशक मूल्यमापनावर भर दिला पाहिजे. म्हणजेच पालक, प्रशासक, सहकारी यांची मते व अध्ययन निष्पत्ती यांच्या सहयोगाने केलेले अंतिम अध्यापक निर्णय.

शालेय ध्येय :

ध्येय म्हणजे दीर्घकालीन हेतू / उद्दिष्ट. प्रत्येक शाळेत स्वतःचे ध्येय असते. ते शाळेच्या दृष्टिकोनावर अवलंबून असते. त्याच्या पूर्तीसाठा, प्रभावी शिक्षकाने झटणे अपेक्षित आहे. ध्येय सिद्धिसाठी केलेल्या प्रयत्नांच्या माध्यमातून अध्यापकाचे मूल्यमापन करता येते. उदा. अहमदाबादच्या मणिनगरमधील एसडीए उच्च माध्यमिक शाळेचे ध्येय **प्रत्येक विद्यार्थी एसडीए विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हा शैक्षणिक संपादन, शारिरीक सुदृढता, मानसिक / आध्यत्मिक आरोग्य, सामाजिक जाणीव याद्वारे सर्वांगीण विकास साधणे.** त्यामुळे वर्गात व वर्गाबाहेर अध्यापकाने दिलेल्या अध्ययन, अनुभवाद्वारे एसडीए अध्यापकाचे मूल्यमापन करता येईल. शिक्षकाचे व्यक्तिमत्त्व हे उघडझाप होणाऱ्या विजेच्या दिव्यासारखे नसून, त्याची पाळेमुळे ही शारीरिक/मानसिक/आध्यमित्क/भावनिक आरोग्य, ज्ञान, आदर्श, सामाजिकता यांमध्ये गुंतलेली आहेत.

मानकांची निश्चिती :

शिक्षक जन्माला येतो, घडवता येत नाही ही म्हण चुकीची आहे. मन नि व्यक्तिमत्त्वाचे मूलभूत गुण जे व्यक्तिला अध्यापनातून निर्माण करता येतात. इष्ट व अनिष्ट गुणांचे ज्ञान हे अध्यापकाला प्रभावी व्यावसायिक होण्याचे उद्दिष्ट ठेवण्यास मदत करते. आपल्यासाठी ठरवलेल्या मानकांच्या आधारे अध्यापकाचे मूल्यमापन करता येते. अशी मानके ठरवण्यासाठी **अध्यापनपूर्व प्रश्नावलीचा** नमुना खालीलप्रमाणे-

- विशिष्ट पाठाबाबत तुमची उद्दिष्टे कोणती ?
- विद्यार्थ्यांनी काय शिकावे असे तुम्हाला वाटते ?
- अशी उद्दिष्टे शालेय ध्येय साध्य करण्यास कितपत मदत करतात ?
- राज्याने ठरवलेला अभ्यासक्रम व मानके अशा उद्दिषटांशी कितपत जुळतात ?
- अशी उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, अध्यापन नियोजन कसे कराल ?

- तुम्ही अध्यापनसामुग्री कोणती वापरता ?
- कोणते अध्यापन साहित्य तुम्ही वापरता ?
- तुमच्या विषयाच्या तात्विक ज्ञानाची प्रात्यक्षिक भागाशी संबंध कसा जोडाल ?

सदर प्रश्नावलीच्या प्रतिसादांवरून अध्यापककार्याचे मूल्यमापन हे खालील बाबींच्या आधारे करता येईल-

- कसून प्रयत्न करण्याची इच्छा
- आकर्षक प्रचारपत्रके तयार करण्यात रुची
- अध्ययनसामुग्री तयार करण्यात रस
- संसाधन-संघटनात रुची
- समय व्यवस्थापन करत, विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अध्ययन प्रक्रिया अर्थपूर्ण करण्याची इच्छा.

आकारिक मूल्यमापन :

– शिक्षणाच्या नावेचा सुकाणू सदैव शिक्षकाच्या हाती असतो, तो नेहमी विद्यार्थ्यांना खालील बाबतीत मदत / मार्गदर्शन करतो

– समस्या ओळखण्यासाठी, त्यांना आत्मविश्वासाने तोंड देण्यासाठी, आत्मगत कौशल्याचा व सर्जनशील कल्पनाशक्तीचा वापर करण्यासाठी, त्यांच्या इच्छा/आकाक्षांची ओळख व पुरेसे आकलन होण्यासाठी.

– अध्यापकाच्या हा सततच्या प्रयत्नांचे आकारिक(फॉर्मेटिव्) मूल्यमापन हे त्याच्या जबाबदाऱ्यांचे चार गटात वर्गीकरण करून करता येते-

क्षेत्र १: नियोजन/तयारी -

- आशयज्ञान हे संबंधित अध्यापनकौशल्यांचे दिग्दर्शन करणे.
- विषय / पाठ संबंधित अध्यापन / अध्ययन उद्दिष्टे निवडणे.
- उपलब्ध / मर्यादित संसाधनांमध्ये अध्ययन / अध्यापन उपक्रमांचे नियोजन करणे.

अध्यापकाने नमुन्यादाखल केलेल्या घटक नियोजन / पाठ नियोजन / उपक्रम नियोजन यांच्याद्वारे ह्या गटाचे मूल्यमापन करता येते.

क्षेत्र २: वर्ग वातावरण :

अ) **आदर वि जवळीक** साध्य करण्यात कितपत यशस्वी झाला हे खालील कोष्टकाधारे ठरवता येईल.

अध्यापकवर्तन	विद्यार्थी प्रतिक्रिया
१) नकारात्मक, अर्थहीन, उपरोधात्मक व आयोग्य	१) अध्यापकाबद्दल अनादर
२) सामान्यतः योग्य पण काही वेळा पक्षपाती व अनादराचे	२) अध्यापकाबाबत किमान आदर
३) मैत्रीपूर्वक,उबदार, काळजीपूर्वक व आदराची	३) अध्यापकाबाबत आदर
४) प्रत्येक मुलाबाबत मनापासून काळजी व आदर	४) विद्यार्थ्यांचा आदर्श वाटतो.

ब) अध्ययन संस्कृती प्रस्थापित खालील उपचारांनी करा

- परिणामकारक शिक्षक / समुपदेशक होऊन.
- विद्यार्थी तुमच्याशी बोलतीत असे पहावे.
- आत्मविश्वास नसलेल्या विद्यार्थ्यांना मदत करून
- भावुक विद्यार्थ्यांशी समायोजन करून
- व्यक्तिगत काळजी घेवून.

क) वर्गव्यवस्थापन हे अध्यापक यशस्वीरित्या कितपत करतो हे खालील बाबींवरून ठरवावे-

- चांगल्या तऱ्हेने स्वतः पाठाशी तयार करणे.
- पाठ शिकण्यास विद्यार्थ्यांना उद्युक्त करणे.
- प्रात्यक्षिक उपक्रम पुरवणे.
- विद्यार्थ्यांना कामात गुंतवा
- त्यांचा सहभाग घ्या.
- त्यांनी काम केलेले काम प्रदर्शित करा.
- तक्त्यांची तयार, प्रयोग, प्रकल्प यांसारख्या सांघिक उपक्रमात काम करू द्या.

ड) विद्यार्थीवर्तनाचे व्यवस्थापन : अध्यापक हा विद्यार्थीवर्तनाचे व्यवस्थापन कसे करतो या निकषाधारे त्याचे मूल्यमापन करतात. खालील बाबी लक्षात घ्याव्यात.

- अस्वस्थ विद्यार्थ्यांशी खंबीर राहून त्यांना तुमचे मित्र होण्यास अधिक वेळ द्या.
- मानसशास्त्राच्या ज्ञानाधारे, विद्यार्थ्यांचे दुर्वर्तन सुधारण्यास त्यांना वेळ द्या.
- सातत्याने चांगले व न्याय्य वर्तन करून विद्यार्थ्यांना सुरक्षित व समाधानी वाटू द्या.
- स्तुतीद्वारे, त्यांचा आत्मसन्मान वाढू द्या, तणावप्रसंग नियंत्रित करा व योग्य निर्णय घेण्यास त्यांना मदत करा.

इ) बैठक व्यवस्था : वर्गातील समाधानकारक बैठकव्यवस्था, प्रसाधन व्यवस्था, प्रकाश योजना, आरोग्य दक्षता, क्रीडा सुविधा या आधारे अध्यापकाचे मूल्यमापन करताना खालील बाबी लक्षात घ्याव्यात-

- तज्ञ प्राचार्य / पर्यवेक्षकाद्वारे वर्गातील अध्यापकवर्तनाचे थेट निरीक्षण
- अध्यापक विद्यार्थी संबंधदर्शक तक्ता
- विद्यार्थी सर्वेक्षण
- विद्यार्थी कामाचे नमुने
- शिकवणे.

क्षेत्र ३ : वर्गाध्यापन:

अ) शाळेच्या माध्यम भाषेवर प्रभुत्व, चढा आवाज, उच्चार स्पष्टता, बोलण्यातील योग्य चढउतार, नियंत्रित बोलण्याची गती हे अध्यापकाचे आवश्यक गुण आहेत. **स्पष्ट/अचूक भाषण नि संप्रेषणकौशल्ये** ह्या निकषाधारे, अध्यापक कार्याचे मूल्यमापन करावे.

ब) प्रश्न विचारणे, चर्चा, दिग्दर्शन आदि **विविध तंत्रांचा वापर** करून अध्यापकाने विद्यार्थ्यांना अध्यापक कार्याचे मूल्यमापन करावे आणि शिकवण्यात विविधता आणावी. त्यामुळे पाठ त्यांना सोपा व सुरस वाटेल. **विशिष्ट तंत्राची निवड व वापर** या निकषाधारे अध्यापकाचे मूल्यमापन करावे.

क) **विद्यार्थ्यांना अध्ययानात गुंतवणे** हे अध्यापकात कितपत जमले ह्या निकषाधारे अध्यापकाचे मूल्यमापन करावे. त्यासाठी अध्यापकाचे डोळ्यापुढे ठेवलेली उद्दिष्टे, वयोगटानुसार वापरलेली शैक्षणिक साधने, अध्यापनपद्धती, योजलेले उपक्रम/प्रकल्प/ क्षेत्रभेटी, विद्यार्थ्यात निर्माण झालेली अध्ययन रुची/सवयी. नामा तंत्राद्वारे विद्यार्थ्यांचे प्रगतिमापन ह्या गोष्टींचा विचार मूल्यमापन समयी करावा.

ड) प्रभावी शिक्षकाने विद्यार्थ्यांचे औपचारिक / अनौपचारिक निरीक्षण करून योग्य प्रत्याभरण करावे व त्यांच्यातील क्षमतेविषयी अंदाज करावा.

प्रस्तुत क्षेत्राचे मूल्यमापन खालील बाबींद्वारे करता येईल.

- तज्ञ प्राचार्य / पर्यवेक्षकाद्वारे, वर्गातील अध्यापकवर्तनाचे थेट निरीक्षण
- मानवी कौशल्य वापरून वस्तु तयार करण्यास शिकवणे.
- विद्यार्थी कार्याचे नमुने
- अध्यापकाने दिलेले स्वाध्याय.

क्षेत्र ४ : व्यावसायिक जबाबदाऱ्या :

पदवी, व्यावसायिकता, अध्यापन व नाना व्यावसायिक जबाबदाऱ्या यांद्वारे अध्यापक विकसित होत असतो.अध्यापक मूल्यमापन समयी, व्यावसायिक जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे लक्षात घेता येतील.

अ) अध्यापकाचे **विषयप्रभुत्व** मूल्यमापनसमयी महत्त्वाचे ठरते. पाठ्यविषयातील प्रगत नि सखोल ज्ञान असल्यासच तो उत्साहाने, दाखले देत अध्यापन करेल.

ब) अध्यापकाची **चर्चासत्र, कार्यशाळा, परिषदांना उपस्थिती** हा एक नंतरचा मूल्यमापन निकष. अशा उपस्थितीमुळे अध्यापकास व्यावसायिक समस्यांची उकल होऊ शकते.

क) अध्यापन प्रभावी करण्यासाठी, **प्रयोग / संशोधन प्रकल्पाद्वारे नवतंत्रांचा विकास** अध्यापक कितपत करतो हे पहावे.

ड) तो **बौद्धिकदृष्ट्या जागृत** कितपत आहे हे पहावे. यासाठी व्यावसायकि पुस्तके / नियतकालिके वाचून सहकाऱ्यांशी चर्चा करतोकाहे पहावे.

इ) अध्यापकाने विद्यार्थीनिहाय कार्यनोंदी अद्ययावत् ठेवाव्यात. तसेच शाळा/महाविद्यालय **बाह्यसंस्थांशी व्यावसायिक** संबंध कितपत ठेवतो हे पहाणे जरूरीचे आहे.

फ) **समावेशक मूल्यमापन** हे गुणदोषात्मक अभिप्राय देण्याची व्यवस्था असलेल्या साध्या मापन श्रेणीद्वारे करावे. ढ/मध्यम/हुशार **विद्यार्थी** अध्यापकवर्तनाबद्दल **दिलेले अभिप्राय** हे अध्यापकाला आपले अध्यापन सुधारण्यास उपयुक्त ठरतात. मदतीचाहात देणाऱ्या **अध्यापकांनी दिलेले अभिप्राय** हे भांडणासाठी नसून दुवा आहे. उभयतांशी त्यांचे संबंध कसे आहेत याचे **प्रशासकीय अधिकाऱ्यांशी मूल्यमापन** करावे.

पदनिश्चयनातील त्रुटी -

पूर्वग्रह व चुका ह्या पदनिश्चयन करताना खालील प्रकारच्या त्रुटी आढळतात.

अ) मुदत वा कठोरता : अतिमृदु वा अति कठोर वागल्याने परीक्षकाचे मूल्यमापन हे व्यक्तिनिष्ठ होते.

ब) केंद्रीय प्रवृत्ती : स्वतः सुरक्षित रहाण्यासाठी, कसेही मूल्यमापन केले तरी वाचण्यासाठी मध्यमानाच्या / सरासरीच्या आसपास मापन केले जाते.

क) तेजोवलय त्रुटी : व्यक्तीच्या एका घटकाच्या मापनाचा प्रभाव सर्व घटकांच्या एकंदरीत मूल्यमापनावर होतो. अशी त्रुटी शिक्षकाबाबतीत खालीलप्रमाणे आढळेल-

विद्यार्थ्यांना शाळेत उशीरापर्यंत थांबून, मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकाचे आशयज्ञान व अध्यापनपद्धती चांगली ठरवली जाईल. तसेच, लोकप्रिय शिक्षकालाही उच्च गुण दिले जावू शकतात.

ड) **परीक्षकाचा परिणाम :** पक्षपातीपणा, एकसुरीपणा, नातेसंबंध यामुळे परिक्षक खऱ्या गुणांऐवजी, विद्यार्थ्यास अतिशय जास्त / कमी गुण देतात.

इ) **अवबोधाचा परिणाम :** काही वेळा विद्यार्थ्याविषयी असलेल्या पूर्वग्रह / पूर्व अवबोधाचा परिणाम परिक्षकाने केलेल्या त्याच्या मूल्यमापनावर होतो. उदा. एखाद्या विशिष्ट भागातील शिक्षक बुद्धिमान व कष्टाळू आहेत, प्रशासकाचा असा विश्वास असेल, तर तो त्या भागातील शिक्षकाला जास्त गुण / श्रेणी देण्याचा संभव असतो.

फ) **कृतिक्रम :** परीक्षकाने पहिल्या कृतीचे मापन अचूक केल्यावर कृतीच्या दुसऱ्या आयामाचे मापन पाहिल्याप्रमाणे केले जाते. जर हा कृतीक्रम पहिल्यापेक्षा बदलल्यास, त्यांचे मापन भिन्न होईल.

ग) **आधिक्य त्रुटी:** पूर्वकृतीच्या परिक्षणाचा परिणाम अयोग्यरित्या प्रचलित परीक्षणावर काही वेळा प्रशासक वा सहकाऱ्यांकडून होतो.

परीक्षणसमयी, उपरोक्त समस्यांचे निराकरण केल्यास, समावेशक मूल्यमापन हे अध्यापकाच्या प्रचलित कृतीचे स्पष्ट चित्र देऊ शकेल आणि त्याचे क्षमताविकसत कितपत झाले आहे याचा निर्णय करू शकेल.

कृतिमूल्यामापिकेचे कोणीही अध्यापक स्वागत करत नाही. पण जर अध्यापक (बी.एड. विद्यार्थी देखील) तयार असेल, तर आपले कार्य सुधारण्याचा त्याचा हेतु राहील. शिक्षणप्रणालीला समजून घेत, कार्य सुधारण्याचा त्याचा हेतू राहील. शिक्षणप्रणालीला समजून घेत, बौद्धिक व भावनिक अध्यापक करू इच्छिणाऱ्या अध्यापकाची आज जरूर आहे.

व्यवस्थापन, व्यापार, वैद्यक, उद्योग यासारख्या व्यवसायाबरोबर शिक्षण व्यवसायात देखील कृतिमूल्यमापिकेचा वापर सक्तीचा झाला पाहिजे.

आपली प्रगती तपासा :-

१) कृति मूल्यमापिका म्हणजे काय ? त्याचे उपयोग कोणते ?

_____

_____

_____

_____

२) अध्यापकाची कृतिमूल्यमापिका म्हणजे काय ? त्याचे निकष स्पष्ट करा.

_____

_____

_____

_____

११ब.४ सारांश :

सध्याच्या समाजात, अध्यापकाने एक व्यावसायिक म्हणून उच्च शैक्षणिक गुणवत्ता, शिक्षणशास्त्रीय व प्रात्यक्षिक कौशल्ये, नैतिकमूल्ये त्याच्याजवळ असली पाहिजे. दुर्दैवाने **अध्यापन** हे अजूनही संक्रमणावस्थेत असलेले क्षेत्र असून, स्वतंत्र व्यावसायिक ओळख प्राप्तीसाठी धडपडत आहे. **अध्यापनाला व्यवसाय म्हणावे का?** यावरील वाद अजूनही मिटलेला नाही. त्यामुळे स्वतःला व्यावसायिक,अर्धव्यावसायिक वा अव्यावसायिक यापैकी कोणत्याही गटात बसवावे अशा अध्यापकापुढे प्रश्न आहे. प्रथम दर्जाची जबाबदारी सोपवून दुय्यम दर्जा दिल्याची अध्यापनसमाजात भावना आहे.

सेवापूर्व व सेवांतर्गत स्तरावरील अध्यापक शिक्षकांचीही हीच तऱ्हा आहे, असा गोंधळ असणे अध्यापन व्यवसायाला घातक आहे, उगवत्या समाजात त्यांच्याकडून अपेक्षित असलेली व्यावसायकिता मिळवण्यातही ही गोष्ट अडथळा ठरू शकते. म्हणून इतर व्यवसायांप्रमाणे व्यावसायिक ठरणे दूरचे ठरणार आहे.

जागतिक समाजातील व्यावसायिकतेत अध्यापक हा नवोपक्रमशील वृत्तीचा, मार्ग चोखाळण्यात लवचिक, मनाने, चौकस व परावर्तनशील असणे अपेक्षित आहे. आपल्या विषयक्षेत्रातील वाढते ज्ञान आत्मसात करून करून व्यावसायिकरित्या सज्ज व निरंतर सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमांद्वारे, व्यावसायिक विकास साधला पाहिजे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाद्वारे (NPE-1986), अध्यापक शिक्षण ही निरंतर प्रक्रिया असून सेवापूर्व व सेवांतर्गत घटकांपासून ते वेगळे करणे शक्य नाही. DIET व SCERT ह्या संस्थांनी सेवापूर्व / सेवांतर्गत घटकांच्या गुणवत्तेत सुधारणा करणे अपेक्षित आहे. तथापि अपुरे प्रशिक्षित तज्ञ व भौतिक सुविधांचा अभाव ह्यामुळे हे होणे दूरचे आहे.

शिक्षक परिणामकारकता ही अध्यापकाच्या व्यावसायिक उत्तरदायित्वावर अवलंबून आहे. प्राचार्य / शिक्षणाधिकारी हे अध्यापक कार्य नियंत्रित करू शकतात. ह्या जगात अध्यापक हा ज्ञान देणारा तांत्रिक नसून तो नैतिक दुवा मानला जातो. जबाबदारी स्विकारण्याची इच्छा, शालेय कामकाजाबद्दल जाणून घेण्याचा समाजाचा व विद्यार्थ्यांमध्ये सुधारणा झाली की नाही हे ठरवणे, ह्या साऱ्या गोष्टींचे उत्तरदायित्व अध्यापकावर असते.

अध्यापक व अध्यापकशिक्षकांची परिणामकारकताही कृतिमूल्यमापिकेद्वारे जोखली जाते. त्यामुळे कृतिमूल्यमापिका ही शिक्षणक्षेत्रातील सध्याची गरज मानली जाते.

अध्ययन समाजाचे स्वप्न साकारण्यासाठी, नैतिक, बौद्धिक - प्रात्यक्षिक - संप्रेषण कौशल्यांनी सुसज्ज अशा प्रभावी शिक्षकाची गरज आहे. सरतेशेवटी असे म्हणतात, **मुलांविषयी सहृदय, उत्कृष्टतेसाठी / सर्जनशीलतेसाठी जोर एकवटल्यास चांगला अध्यापक होऊ शकतो.**

स्वाध्याय :

१) व्यवसाय म्हणजे काय ?
२) व्यवसाय व व्यावसायिकता यातील फरक लिहा.
३) व्यवसायनीती म्हणजे काय ? ती का आवश्यक आहे ?
४) शिक्षकपरिणामकातेचा अर्थ व घटक स्पष्टकरा.
५) कृतिमूल्यमापिका म्हणजे काय ? त्याचे उपयोग कोणतेआहेत ?
६) अध्यापक / अध्यापकशिक्षकांच्या विकासासाठी, त्यांचे कृतिमूल्यमापिकेद्वारे कसे मूल्यमापन कराल ?

संदर्भ :

- Prasad, Himadri & Prasd Dharmendra (2005), Forwards, Profersionalism in Education, University News, 43 (18), May 02-08.
- www.google.com

❖❖❖❖